# सहा सोनेरी पाने

© Himani Savarkar,

Savarkar Bhavan, Raja Thakur Path, Shanivar Peth, Pune.

tel :+912025544751

Internet Rights are with Swatantryaveer Savarkar Rashtriya Smarak Trust, Dadar, Mumbai

# सोनेरी पान पहिले

## १. चंद्रगुप्त - चाणक्य

आपल्या भारताच्या राष्ट्रीय जीवनाच्या अुषःकालाचा आरंभ, न्यूनतः, पाच सहस्र वर्षांपासून दहा सहस्र वर्षांपर्यंत तरी, आजच्या संशोधनानुसार, प्राचीन आहे. चीन, बाबिलोन, ग्रीस प्रभृती कोणत्याही, प्राचीन राष्ट्राच्या जीवनवृत्तान्ताप्रमाणे, हा आपला प्राचीन राष्ट्रीय वृत्तान्तही, पुराणकालात मोडतो. म्हणजे त्यात असलेल्या अितिहासावर दंतकथेची, दैवीकरणाची आणि लाक्षणिक वर्णनाची पुटेच पुटे चढलेली आहेत. तरीही, ही आपली जुनी 'पुराणे', आपल्या प्राचीन अितिहासाचे आधारस्तंभच आहेत, हे विसरता कामा नये. हे प्रचंड 'पुराण-वाङ्मय' आपल्या साहित्याचे, मानाचे, कर्तृत्वाचे आणि अैश्वर्याचेही, जसे अेक भव्य भांडार आहे, तसेच, ते आपल्या प्राचीन जीवनवृत्तान्तांचेही, असंगत, अस्ताव्यस्त आणि संदिग्ध असले, तरी अेक अमर्याद संग्रहालय आहे.

परंतु आपली 'पुराणे' म्हणजे निर्भेळ 'अितिहास' नव्हे.

यास्तव, मी त्या पुराणकालाचा विचार या प्रसंगापुरता बाजूस ठेवणार आहे. कारण, मी ज्या सोनेरी पानांचा निर्देश करणार आहे ती सोनेरी पाने, भारताच्या 'पुराणातील' नसून 'अितिहासातील' आहेत.

### भारतीय अितिहासाचा आरंभ

अितिहासाचे मुख्य लक्षण म्हणजे त्यातील वर्णनांतील आणि घटनांतील, स्थल आणि काल, ही, जवळजवळ निश्चितीने तरी, सांगता आली पाहिजेत आणि त्यातील घटनांना, परकीय वा स्वकीय अवांतर पुराव्यांचे, शक्यतो, पाठबळ मिळत असले पाहिजे.

अशा कसोटीस, बहुतांशी, अुतरणारा आपला प्राचीन काळचा वृत्तान्त, हा, बुद्ध कालापासून मोजता येतो. यास्तव, अनेक भारतीय नि पाश्चात्त्य प्राच्यविद्यावेत्ते, आपल्या भारताच्या 'अितिहासा' चा आरंभ, ह्या बुद्धकालापासून, सध्या, समजत आहेत. ह्या प्राच्यविद्यावेत्त्यांच्या, सतत चालणाऱ्या, परिश्रमांमुळे, आज आपण ज्याला पौराणिक काल म्हणतो, त्यातलाही काही भाग, नवीन संशोधन झाल्यास, ह्या अितिहासकालात समावेशता येअील. पण, तोपर्यंत तरी, बुद्धकाल हाच आपल्या 'अितिहासा'चा आरंभ, म्हणून, समजणे भाग आहे.

त्यातही, कोणत्याही प्राचीन राष्ट्राचा निर्भेळ अितिहास, निश्चितपणे ठरविण्याच्या कामी, तत्कालीन जगातील तदितर राष्ट्रांच्या साहित्यादिक लिखाणात सापडलेल्या अपोद्बलक अुल्लेखांचा, फार, अुपयोग होतो. आज अुपलब्ध असलेल्या आणि निश्चितार्थ ठरलेल्या, जगातील अैतिहासिक साधनांमध्ये, भारताच्या ज्या प्राचीन कालखंडाला, असा, भारतेतर राष्ट्रांच्या सुनिश्चित साधनांचा पाठिंबा मिळतो, तो, आपल्या अितिहासाचा कालखंड, सम्राट चंद्रगुप्ताच्या काळाच्या आगेमागेच चालू होतो. कारण, अलेक्झांडरची स्वारी भारतावर जेव्हा झाली, तेव्हापासूनच्या, ग्रीक अितिहासकारांच्या नि पुढे पुढे, चीन देशातील प्रवाशांच्या प्रवासवर्णनांच्या लेखातून, भारतातील, त्या त्या पुढील घटनांचे, अैतिहासिक कसोटीस, बव्हंशी अुतरणारे, असे अनेक, अुल्लेख सापडतात.

### सोनेरी पान कोणते ?

ह्या, आपल्या अैतिहासिक कालातील, ज्या सोनेरी पानांविषयी मी चर्चा करणार आहे. तीच पाने काय ती सोनेरी म्हणून निवडण्यासाठी, मी कोणती कसोटी वापरीत आहे? तसे पाहता, आपल्या ह्या अैतिहासिक कालात, काव्य, संगती, प्राबल्य, अैश्वर्य, अध्यात्म प्रभृती अवांतर कसोट्यांना अुतरणारी शतावधी गौरवार्ह पाने सापडतात. परंतु, कोणत्याही राष्ट्रावर पारतंत्र्यासारखे प्राणसंकट जेव्हा गुदरते, आक्रमक परशत्रूच्या प्रबळ टाचेखाली ते स्वराष्ट्र जेव्हा पिचून गेलेले असते; किंवा जाअू लागते, तेव्हा तेव्हा, त्या प्रबळ शत्रूचा पाडाव करून नि पराक्रमाची पराकाष्ठा करून, स्वराष्ट्रास त्या पारतंत्र्यातून सोडविणारी आणि आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्याचे आणि स्वराज्याचे पुनरुज्जीवन करणारी जी झुंजार पिढी तिच्या नि तिला झुंजविणारे, जे धुरंधरवीर नि

विजयी पुरुष, त्यांच्या, त्या, स्वातंत्र्ययुद्धाच्या वृत्तान्ताचे जे पान, त्या पानास, मी, येथे सोनेरी पान, म्हणून, संबोधीत आहे. कोणत्याही राष्ट्रात, त्याच्या अशा परंजयी स्वातंत्र्ययुद्धाची अैतिहासिक पाने, अशीच, गौरविली जातात. अगदी अमेरिकेचेच अुदाहरण पाहा. रणांगणात अिंग्लंडला चीत करून, ज्या समयी अमेरिकेने आपले स्वातंत्र्य छिनावून घेतले, त्या विजयी दिवसालाच अमेरिकेच्या अितिहासातील सोनेरी दिवस, म्हणून सणासारखे गौरविले जाते; आणि त्या युद्धाच्या अितिहासाचे पान, हे, अमेरिकेच्या अितिहासातील सोनेरी पान गणले जाते.

## प्रत्येक मोठ्या नि प्राचीन राष्ट्रावर पारतंत्र्याचे संकट केव्हातरी कोसळलेलेच असते

त्यातही अमेरिकेच्या राष्ट्राचा जन्मच मुळी कालचा! म्हणून, त्याच्या टीचभर अितिहासात, त्यांच्यावर अेकच काय ते प्राणसंकट गुदरावे; आणि ते निवारणारे अेकच काय ते सोनेरी पान असावे; ह्यात काही विशेष नाही. परंतु चीन, बाबिलोनियन, पर्शियन, अिजिप्शियन, प्राचीन पेरू, प्राचीन मेक्सिको, ग्रीस, रोमन प्रभृती जी पुरातन राष्ट्रे सहस्रावधी वर्षे नांदत राहिली, त्यांच्या, त्या विस्तृत राष्ट्रीय जीवनात, प्रबलतर परकीयांच्या आक्रमणाखाली, चेचले जाण्याचे अनेक प्रसंग, त्यांच्यावर, साहजिकपणेच येअून गेले. तशा प्राणसंकटातून त्यातील काही राष्ट्रांनी, आपल्या पराक्रमाने, पुन्हा पुन्हा सुटकाही करून घेतली; आणि त्यांच्या, त्या, त्या, परशत्रूंना, दाती तृण धरावयास लावले. सहस्रावधी वर्षे, आपले राष्ट्रीय अस्तित्व नि प्राबल्य टिकवून धरणाऱ्या, अशा, राष्ट्रांच्या अितिहासात, वेळोवेळी, पुन:पुन्हा स्वातंत्र्यसंपादनार्थ केलेल्या रणांगणांची नि त्यात मिळविलेल्या विजयांची, अेकाहून अधिक अशी सोनेरी पाने सन्मानिली गेलेली आहेत. भारताचा अितिहास तर, त्या प्राचीनतम कालापासून आजपर्यंत, अखंडपणे, चालत आलेला! त्याच्या प्राचीन काळात, भरभराट असलेली वरील बहुतेक राष्ट्रे नि राज्ये, आज नामशेषसुद्धा होअून गेलेली आहेत. अेक, चीनचे महान राष्ट्र तेवढे, भारताच्या महनीयतेचे पुरातन साक्षी म्हणून, आज अुरलेले आहे.

चीन आणि भारत ही दोन्हीही राष्ट्रे अतिविस्तृत असल्यामुळे; आणि अतिप्राचीन कालापासून, सततपणे, आजपर्यंत आपले स्वातंत्र्य आणि सामर्थ्य टिकवून, नांदत आलेली असल्यामुळे, त्यांच्यावर, अनेक वेळा, अितर अल्पजीवी राष्ट्रांपेक्षा अधिक प्रसंगी, परदास्याची, प्राणसंकटे कोसळलेली आढळतात, यात काही आश्चर्य नाही. चक्रनेमिक्रमाचा अटळ नियम त्यांनाही होताच! हिंदुस्थानवर ज्याप्रमाणे, शक, हूण, मोगलादिकांच्या अनेक चढाया झाल्या; त्याचप्रमाणे चीनवरही, त्या आणि अितर परराष्ट्रांच्या, अनेक चढाया झालेल्या आहेत. हूणांच्या प्रलयापासून बचाव करण्यासाठी तर, चीनने, त्यांच्या राष्ट्राभोवती, ती जगप्रसिद्ध तटबंदी - ती Chinese Wall– बांधली होती. पण, तिलाही वळसे घालून किंवा अुल्लंघून, चीनच्या शत्रूंनी त्याला पादाक्रान्त करावयास सोडले नाही. बहुधा, अंशत:, परंतु काही वेळा तर संपूर्णत:, चीनही, परकीय राजसत्तेच्या जोखडाखाली, संत्रस्त होअून, पडलेला होता. तथापि, त्या त्या वेळी ते महान राष्ट्र, पुन:पुन्हा नवतेजाने नि चैतन्याने अुचंबळीत, प्रोत्साहित, प्रगल्भ होअून, त्या परकीय सत्तेला अुलथून पाडू शकले; आपले जीवित, सत्त्व नि स्वातंत्र्य राखू शकले; आणि आजही, पुन्हा अेक स्वतंत्र नि सामर्थ्यशाली राष्ट्र म्हणून, नांदत राहिले आहे. हेच खरे अैतिहासिक आश्चर्य होय! भारताच्या अितिहासाचे मूल्यमापन करताना, या प्रकरणी, तोच मानदंड वापरला पाहिजे. परंतु, विशेषत: अिंग्रजांच्या परकीय सत्तेखाली, जेव्हा हिंदुस्थान दबला होता तेव्हा, अनेक अिंग्रजांनी भारताचा अितिहास अशा विकृत पद्धतीने लिहिला; आणि त्यांनी काढलेल्या शाळा - महाशाळांतून, तरुणांच्या दोनतीन पिढ्यांकडून, त्या विकृत अितिहासाची अितकी पारायणे करून घेतली की, जगाचाच नव्हे; तर आपल्या स्वत:च्या लोकांचाही, त्या प्रकरणी बुद्धिभ्रंशच व्हावा. हिंदुस्थानचे राष्ट्र, हे, सतत ह्या वा त्या परसत्तेखालीच दडपलेले होते; हिंदुस्थानचा अितिहास, म्हणजे, हिंदूंच्या पराभवामागून पराभवांचीच काय, ती, अेक जंत्री आहे, अशी धडधडीत असत्य, अुपमर्दकारक आणि दुष्ट हेतूंनी, केलेली विधाने, चलनी नाण्यासारखी, परकीयांकडूनच नव्हे; तर, काही स्वकीयांकडूनही, बेखटक, व्यवहारिली जात आहेत. त्यांचा प्रतिकार करणे, हे, स्वराष्ट्राभिमानाच्या दृष्टीनेच, नव्हे; तर, अैतिहासिक सत्याच्या दृष्टीनेही, अत्यंत, आवश्यक आहे. ह्या कार्यी, जे काही प्रयत्न, अन्य अितिहासज्ञांकडून होत आले आहेत; त्यात, ह्या

प्रसंगानिमित्ते, प्रचाराची शक्यतो, अधिक भर घालणे, हे, अेक कर्तव्यच आहे. यासाठी, ज्या ज्या परकीय आक्रमकांनी, हिंदुस्थानवर, स्वाऱ्या केल्या किंवा राज्यसत्ता गाजविली; त्या त्या परकीयांचा, अंती धुव्वा अुडवून देअून, आपल्या हिंदुराष्ट्रास, ज्यांनी ज्यांनी, विमुक्त केले; त्या, त्या, हिंदुराष्ट्रविमोचक पिढ्यांचे आणि त्यांचे प्रतीक म्हणून, त्या, त्या, संग्रामातील काही युगप्रवर्तक, वीरवरांचे अैतिहासिक शब्दचित्रण करण्याचे, मी, येथे, योजिले आहे.

## अलेक्झांडरची स्वारी

पूर्वी अुल्लेखिलेल्या, भारताच्या अैतिहासिक कालातील, भारतावर झालेली परराष्ट्राची, पहिली प्रसिद्ध स्वारी, ही, अलेक्झांडरची होय. अिसिवी. सनपूर्व ३२७ मध्ये ही स्वारी झाली. त्या प्राचीन काली, युरोपमधली, सध्याची अिंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, प्रभृती राष्ट्रे, जन्मलीसुद्धा नव्हती. रोमन साम्राज्याची, पायाभरणीही, झालेली नव्हती. युरोपात, अेक ग्रीक लोक, तेवढे, गाजत होते. ग्रीकांची लहान लहान नगरराज्ये (City States) स्वतंत्रपणे नांदत असत. त्यात स्पार्टा, अथेन्स, ही, नगरराज्ये पुढारलेली; परंतु, ह्या फुटकळ नगरराज्यांवर, जेव्हा, संघटित, विस्तृत, अेककेंद्रित नि बलाढ्य अशा, त्या वेळच्या, पारसिक साम्राज्याच्या अधिपतीने स्वारी केली; तेव्हा, त्या स्पार्टा, अथेन्स, प्रभृती, फुटकळ नगरराज्यांचा, काहीच, टिकाव लागला नाही. त्या, लहान लहान, ग्रीक प्राजकांनी (Republics नी) लढण्याची पराकाष्ठा केली; पण, पारसिक साम्राज्याच्या सेनासागरापुढे, त्यांचे, काहीच चालेनासे झाले. ह्यामुळे, पारसिकांप्रमाणेच, आपल्या साऱ्या फुटकळ नगरराज्यांचे मिळून, अेक, प्रबळ ग्रीक राज्य स्थापावे; नि शत्रूशी अेकमुखी सामना द्यावा; अशी ग्रीक लोकांत तीव्र अिच्छा अुत्पन्न झाली. त्यांच्यातील, मॅसिडोनियाचा राजा फिलिप, याने, त्या महत्त्वाकांक्षेने, लहान- सहान ग्रीक प्राजके जिंकली. परंतु, त्याचे, अेकमुखी राज्य वाढत चालले असताच, तो, मृत्यू पावला. तथापि, त्याच्यामागे, राज्यावर बसलेला त्याचा पुत्र, हा, त्याच्यापेक्षा शतपटीने महत्त्वाकांक्षी, विजयिष्णु आणि शूर निघाला. त्याचेच नाव अलेक्झांडर. साऱ्या ग्रीक राष्ट्रात, त्याने, अेक राष्ट्रीयत्वाचे नवचैतन्य संचारविले; बलाढ्य सैन्य अुभारले; आणि ग्रीकांच्या राष्ट्राचा शत्रू जो, पारसिक सम्राट दरायस, त्याच्यावरच, अलेक्झांडर चालून गेला. ग्रीकांच्या, त्या संघटित सैन्यापुढे, दरायसच्या, बहुसंख्य पण असंघटित, साम्राज्यसेनेचा धुव्वा अुडाला. अलबेला येथील लढाअीत, तर, पारसिक राजसत्ताच, अुखडून पडल्यासारखी झाली. अलेक्झांडर, आपल्या, विजयोद्दीप्त सैन्यासह, पारसिक सम्राटाच्या, थेट, राजधानीवर, चालून गेला; आणि ती जिंकून, त्याने स्वत:चीच पारसिकांचा सम्राट, म्हणून, घोषणा केली. ह्या, अपूर्व विजयाने, अलेक्झांडरची राज्यतृष्णा, अधिकच, वाढली. ग्रीसच्या नि पारसिकांच्या सुविशाल, साम्राज्याचे सम्राटपद, हाती येताच; अलेक्झांडरला, स्वर्ग, दोन बोटे अुरल्यासारखा, वाटू लागला. आपण, मनात आणू तर, साऱ्या जगास, जिंकू शकू; आणि अितिहासात, आपले नाव जगज्जेता, म्हणून, गाजवू शकू; अशा, प्रबळ आत्मविश्वासाचा, अुन्माद, त्याला चढला. पारसिकांचे नित्यांच्याही पूर्वीचे, ते, बाबिलोनियाचे महाराज्य, जसे, अेका धडाक्यासरशी, तो, पादाक्रान्त करू शकला; तसेच, त्याला लागूनच असलेले आणि ज्याची कीर्ती ग्रीक लोक पिढ्यानुपिढ्या अैकत आलेले होते; ते, भरतखंडही, मी, सहज पादाक्रान्त करू शकेन; अशा, दुर्दम्य महत्त्वाकांक्षेने, अलेक्झांडरने, भरतखंडावरही स्वारी करण्याचे ठरविले. त्या धाडसी योजनेप्रमाणे, त्याने, लवकरच, ग्रीकांचे अगदी निवडक, ताज्या दमाचे नि कोऱ्याकरकरीत शस्त्रांनिशी सज्ज, असे, नवीन सैन्य अुभारले. त्यात, अेक लक्ष वीस सहस्र पायदळ नि पंधरा सहस्र घोडेस्वार होते. आजपर्यंत, विजयामागून, विजय मिळवीत आलेल्या, आपल्या महासेनानी नि सम्राट अलेक्झांडरवर, ह्या, त्याच्या पराक्रमी नि विजयिष्णु, सैन्यसंभाराची, अितकी, श्रद्धा बसलेली होती; की, ते ग्रीक सैनिक त्याला, अेक अलौकिक असा, दैवी पुरुषच, समजत. अलेक्झांडर, स्वत:सही, 'झ्यू' (द्यु:) देवतेचा पुत्र, म्हणून, म्हणवी.

## भारत राष्ट्राची तत्कालीन व्याप्ती

त्या दोन-अडीच सहस्र वर्षांपूर्वीच्या काली, सिंधू नदीच्या पलीकडे, अगदी, अिराणच्या सीमेला भिडलेल्या प्रदेशापर्यंत, भारतीयांची वस्ती नि राज्ये, पसरलेली होती. आज, ज्याला हिंदुकुश पर्वत म्हणतात; त्याला, ग्रीक लोक, 'परोपनिसस'

(Paropnisus) असे म्हणत. आज, ज्याला अफगाणिस्थान म्हणतात; त्याला, त्या काळी, गांधार म्हणत. 'अहिगणस्थान', हे, अफगाणिस्थानचे, आपले प्राचीन नाव आहे. काबूल नदीचे, आपले, त्या वेळचे प्राचीन नांव, 'कुभा' असे, होते. त्या, हिंदुकुश पर्वतापर्यंतच्या, ह्या, सर्व प्रांतांत, भारतीयांची लहानमोठी राज्ये होती. ह्या भागातील राज्यांपासून, तो, सिंधुनदी समुद्राला, जेथे मिळाली आहे; तेथपावेतो, तिच्या दोन्ही काठांना लागून, वैदिक धर्मानुयायी असलेल्या, भारतीयांच्या, लहानमोठ्या स्वतंत्र राज्यांची, मालिकाच मालिका, पसरलेली होती. ह्या राज्यांतील, बहुतेक राज्ये ही, प्राजके, होती. त्यांना, त्या काळी, गणराज्ये म्हणत. त्यांची घटना, अर्थात, लोकसत्ताक पद्धतीची असे. राजसत्ताक राज्ये म्हणण्यासारखी, तशी, दोनतीनच, राज्ये होती. त्यात, ज्याला, ग्रीक लोक पौरस असे म्हणत; त्या, पौरव राजाचे राज्य, सगळ्यात मोठे होते.

## डॉ. जयस्वाल ह्यांचा Hindu Polity ग्रंथ

'अभिनव भारत', ह्या, क्रांतिकारक संस्थेचे, लंडनमध्ये, सन १९०७ ते १९१० च्या कालात, अेक प्रमुख सदस्य असलेले आणि पुढे, प्राच्यविद्याविशारदांत, जागतिक कीर्ती पावलेले, डॉ. जयस्वाल ह्यांनी लिहिलेल्या, 'Hindu Polity' ह्या, सुप्रसिद्ध ग्रंथात, सिंधू नदीच्या, अुभय तटांवर, तिच्या, समुद्रसंगमापर्यंत पसरलेल्या ह्या, भारतीय 'गणराज्यांच्या', निरनिराळ्या, लोकसत्ताक राज्य घटनांचे, संशोधनपूर्वक, विस्तृत वर्णन केलेले आहे.

ग्रीक लोकांच्या पुराणांप्रमाणेच, त्याचे पूर्वज, फार प्राचीन काळी, भारताच्या सिंधूपलीकडील, गांधारप्रभृती प्रांतांतूनच, मूळच्या, आर्यवंशाच्या जानपदाची, अेक, तुटक शाखा होअून ग्रीसकडे गेले होते अशी, त्यांची, पुरातन भावना असे. अलेक्झांडरचे सैन्य, प्राचीन भारताच्या त्या भागात, प्रवेशले; तेव्हा, तेथे त्यांना, अकस्मात, अेक लहानसा समूह, स्वतःला, मूळचा ग्रीक समजणारा, असा, आढळला. तो, जरी, भारतीयांत मिसळून गेलेला होता; तरी, त्याने, ते ग्रीक सैन्य पाहताच, आपणही, त्यांचेच, पुरातन कालाचे, भाअूबंद आहोत; असे, सांगितले. अलेक्झांडरलाही, आपल्या प्राचीन पूर्वजांचे, हेच, मूळ ठिकाण असले पाहिजे; असे वाटले. त्याला, नि त्याच्या ग्रीक सैन्याला, त्यांच्या, ह्या, प्राचीन पितृभूमीचे दर्शन झाल्यावर, अितका, अत्यानंद झाला; की, त्या साऱ्या सैन्याने, काही दिवस, युद्ध बंद ठेवून, अेक महोत्सव साजरा केला. ग्रीक लोकांनी, ग्रीक देवतांच्या संतोषास्तव, यज्ञ करून, हवने अर्पिली.

ग्रीक लोकांच्या देवतांचे, वैदिक लोकांच्या देवतांशी, अत्यंत, सादृश होते. त्यांच्या, देवतांच्या नावांचे अुच्चार तेवढे, अपभ्रंशानुसार, पालटलेले होते. ग्रीक लोकही, यज्ञ करीत; हवने देत. ग्रीकांना, आयोनियन्स, असेही म्हणत.

## आयोनियन्स नावावरून
## 'यवन' शब्द पडला

क्वचित, ययातीचा पुत्र अनु, ह्याचेच, हे ग्रीक लोक, वंशज असतील काय? अन्वायन- अयोनियन अशी, अपभ्रष्ट रूपे, होत गेली असतील काय? पण, तो विषय, संशोधकांकडे सोपविला पाहिजे. अितके मात्र खरे की, ग्रीक लोकांना अगदी आरंभापासून, आपले भारतीय लोक, 'यवन' या नावानेच ओळखत आलेले आहेत. ही गोष्ट, संस्कृत साहित्यावरून, अुघड आहे. ग्रीकांच्या 'आयोनिअन्स' ह्या नांवावरून, त्यांना भारतात, 'यवन' किंवा 'योन' हे नाव पडलेले असावे.

## त्या काळी गांधार पंचनद ते सिंधूपर्यंत बुद्धाचा पत्ता सुद्धा नव्हता

आणखी अेक गोष्ट, येथेच, सांगून टाकण्यासारखी आहे की, पूर्वी अुल्लेखिलेल्या, गांधारपासून तो पंचनद (पंजाब) प्रांतापर्यंत आणि तेथून, सिंधू नदीच्या अुभय तटांवरील प्रदेशांपासून, तो, ती नदी समुद्रास मिळते तेथपर्यंत, भारताच्या, ज्या ज्या भागात अलेक्झांडरने संचार केला, त्या त्या भागातील लोकस्थितीचे विविधांगी वर्णन, त्या वेळच्या, ग्रीक लेखकांनी दिलेले आहे. परंतु, त्या सर्व वर्णनात वैदिक धर्मानुयायी भारतीयांचे, अनेक अुल्लेख असताही, बुद्धाचा किंवा बुद्धपंथाचा, चुकूनसुद्धा, अेखादा अुल्लेख आढळत नाही. ह्यावरून आणि अर्थातच अितर सर्व तत्कालीन पुराव्यावरून, हे स्पष्ट होते, की, त्या कालापर्यंत, भारताच्या, शतद्रू पलीकडील भागात तरी, बुद्धपंथाच्या

अस्तित्वाचा, पत्तासुद्धा नव्हता. म्हणजे, बुद्धाच्या मृत्यूनंतर, अडीचशे - तीनशे वर्षे अुलटून जाअीतोपर्यंत, केवळ मगध प्रांतातच, बुद्धपंथाचा, यत्रतत्र जो प्रसार झाला, त्यापलीकडे, काही त्याचे पाअूल पडलेले नव्हते. पुढील अितिहासाच्या अनुरोधासाठी, ही, गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे.

## ग्रीक म्हणजे 'यवन',
## मुसलमानांना यवन म्हणणे हे चूक !

परराष्ट्रीय, आक्रमक आणि अंशतः परधर्मीय, अशा ग्रीकांना, आपले तत्कालीन भारतीय लोक, 'यवन' म्हणून ओळखत. परंतु, त्यामुळे, सर्वच परराष्ट्रीय आक्रमकांना 'यवन' असे म्हणणे, ही, अर्थातच, चुकीची गोष्ट होते. विशेषतः, मुसलमानांना आपले लोक, जे 'यवन' म्हणूनच, म्हणू लागले, ती तर, घोडचूक होती. कारण, ग्रीक लोक, आक्रमक नि परराष्ट्रीय जरी असले, तरी, सापेक्षतः, ते, त्या वेळच्या विद्याव्यासंगी नि सभ्य जगतातच, मोडत होते. परंतु, भारतावर, ज्या मुसलमानांच्या टोळधाडी, शतावधी वर्षांनंतर, पुढे चालून आल्या, त्या, धर्मांध, रानटी नि विध्वंसक अशा राक्षसी वृत्तीच्या होत्या. तशा राक्षसी वृत्तीच्या मुसलमानांना, 'मुसलमान' म्हणून, ओळखणेच अवश्य होते. त्यांनाही 'यवन' म्हणण्यात, त्यांचा, नसता गौरव करण्याची, आणि 'यवन' शब्दाची नसती पायमल्ली करण्याची अशी दुहेरी, चूक आपल्या हातून घडत आली. मुसलमानांना, 'म्लेंच्छ' म्हणता येअील; यवन नव्हे.

## वेडगळ मुसलमान समजतात तसा शिकंदर हा काही कुणी मुसलमान नव्हता.

बहुसंख्य मुसलमानांतील, अेक वेडगळ समजूतही, येथे, सांगण्यासारखी आहे. 'अलेक्झांडर' ह्या नावाचे, पर्शियन भाषेत, 'शिकंदर' असे रूपांतर झाले होते. ग्रीकांचे साम्राज्य, पर्शियावर होते तोपर्यंत, अनेक पर्शियन लोक, अलेक्झांडरच्या अलौकिक पराक्रमामुळे मोहित होअून, आपल्या मुलांनाही 'शिकंदर' हेच नाव ठेवू लागले. पुढे, पर्शियातील लोक मुसलमान झाल्यानंतरही, त्यांच्यात, मुलांना, 'शिकंदर' हे नाव ठेवण्याची, प्रथा चालूच राहिली. भारतातील, बाटग्या मुसलमानांनीही, तीच प्रथा अुचलली. त्या शिकंदर ह्या शब्दाची, ही, मूळ कथा ठाअूकच नसल्यामुळे, हिंदुस्थानातील सहस्रावधी मुसलमानांची, अशी दृढ समजूत झालेली असते की, ज्या अर्थी, महंमद अल्ली, कासिम अित्यादी, त्यांच्या नावांप्रमाणे 'शिकंदर' हेही, त्यांच्या मुसलमानी नावातच मोडते; त्याअर्थी, हा पराक्रमी शिकंदरही मुसलमानांतीलच, कोणीतरी, महापुरुष असला पाहिजे! किंबहुना, तो मुसलमान होता, म्हणूनच, तो अेवढा पराक्रमी नि दिग्विजयी निपजू शकला! असल्या कित्येक धर्मवेड्या, अडाणी नि आत्मप्रशंसक मुसलमानांना जर कोणी सांगितले की 'शिकंदर' हा मुसलमान नव्हता. तो मुसलमान होअू तरी कसा शकेल? शिकंदराच्या मृत्यूनंतर, अुण्यापुऱ्या अेक सहस्र वर्षांनी, महंमद पैगंबराचा जन्म, तर तसले गावंढळ मुसलमान त्या सांगणाऱ्यालाच वेड्यात काढतील!

अलेक्झांडरच्या साम्राज्याची त्या वेळची सरसीमा हिंदुकुश पर्वत ही होती. अलेक्झांडर त्याच्यापुढे आपल्या तुंबळ ग्रीक सेनेसह भारतावर जो चालून आला तो तक्षशिलेला येअून पोचला. तक्षशिलेचा राजा अंबुज (अंभी) याने युद्ध न करताच अलेक्झांडरचे मांडलिकत्व मान्य केले. काही ग्रीक लेखक म्हणतात, की, ह्या तक्षशिलेच्याच राजाने, आपला प्रतिस्पर्धी जो पौरसराजा, त्याचा, मोड करण्यासाठी, अलेक्झांडरला, आपण होअून, बोलाविले होते. तसे असेल तर, ह्या, स्वजनद्रोहाचे प्रायश्चित, अंभी राजाला, ग्रीकांशी दोन हात न करताच, त्यांना शरण जाअून, हौसेने भोगावे लागले, हे, क्रमप्राप्तच झाले.

## तक्षशिलेतील विद्यापीठ आणि
## अेक विलक्षण योगायोग

तक्षशिलेला, तत्कालीन जगतात सुप्रसिद्ध असलेले, अेक भारतीय विद्यापीठ होते. त्या विद्यापीठात देशोदेशीचे विद्यार्थी येअून अनेक शास्त्रांचे नि कलांचे अध्ययन करीत. अितकेच नव्हे, तर, देशोदेशीच्या राज्यांतील राजपुत्रही, तेथे येऊन, तेथील अनुशासन पाळून, राज्यशास्त्र नि युद्धशास्त्र यांचे शिक्षण घेत असत.

कोण्या विलक्षण योगायोगाने, तिकडे, अलेक्झांडर तक्षशिलेच्या राज्याचा पाडाव करून, भारतात, ससैन्य चाल करून जात असता, अिकडे, त्याच तक्षशिला विद्यापीठात तेजस्वी, तरतरीत आणि भारताच्या अितिहासात, अेक दैदीप्यमान असे सोनेरी पान ज्याच्या हातून भवितव्यता लिहविणार होती, असा अेक तरुणही, राज्यशास्त्राचे नि युद्धशास्त्राचे शिक्षण घेत होता; किंवा ते शिक्षण घेऊन, अलीकडेच, बाहेर पडला होता. त्याचे नाव चंद्रगुप्त आणि ह्या तक्षशिला विद्यापीठाच्या परिसरातच विविध शास्त्रपारावारपारंगत नि राजकारणधुरंधर असे एक प्रौढ पंडित त्या तरुणाला राष्ट्रीय क्रांतिकार्याचे नि राज्यशास्त्राचे धडे देत होते, त्यांचे नाव चाणक्य!

परंतु, शिकंदरच्या स्वारीने अुडालेल्या हलकल्लोळात, ह्या दोन सामान्य व्यक्ती, कोणाच्याही डोळ्यात, असामान्यपणे, भरलेल्या नव्हत्या. त्या दोन व्यक्ती, शिकंदरच्या त्या साऱ्या प्रचंड परचक्रीय हालचालींकडे, डोळ्यात तेल घालून, बघत होत्या. भारतातील साऱ्या रावरावळ, राजा - महाराजांचे ते फुटकळ फुटकळ मुकुट, अेकत्र वितळवून, शिकंदर, स्वतःच्या शिरावर धारण करण्यासाठी, जो भारतीय सम्राटपदाचा महामुकुट, रणांगणात, घडवीत होता तो, आयताचे आयता, त्या परशत्रूच्या हातून हिसकून घेअून, आपल्या त्या तरुण शिष्याच्या मस्तकावरच, ज्यायोगे, बसविता येअील, अशा, अेका महान क्रांतिकारक कार्याची योजना, ते प्रौढ आचार्य, मनोमन आखीत होते.

## पौरवराजाशी युद्ध

तक्षशिलेचा राजा अंबुज हा ग्रीकांच्या म्लेंच्छ सैन्याशी युद्ध न करताच त्याचे आधिपत्य मानता झाला. ह्या त्याच्या कृत्याची जो तो छीः थूः करू लागला. अंबुज राजाच्या, ह्या क्षात्रधर्माला कलंक लावणाऱ्या क्लैब्याचा वचपा काढण्यासाठी, आपण आपापल्यापरी, ग्रीकांशी प्रखर सामना द्यावयाचा निर्धार, आजूबाजूच्या, राजसत्ताक असलेल्या भारतीय राज्यांनी नि गणराज्यांनी केला. दुर्दैवाची गोष्ट अितकीच की, त्या सर्व फुटकळपणे स्वतंत्र असलेल्या, भारतीय राज्यांना त्या ग्रीक युद्धापुरते का होअीना, पण, अेकत्र येअून अेकाच सैनिक नेतृत्वाखाली, ते युद्ध लढण्याची बुद्धी झाली नाही म्हणा; किंवा समय सापडला नाही म्हणा. अलेक्झांडरने वेळ न दवडता, तक्षशिलेला येताच, आजूबाजूच्या, सर्व भारतीय राज्यांना, शरण येण्याची आज्ञा सोडली; आणि तक्षशिला राज्याला लागूनच असलेल्या, पौरव (पौरस) राजाने ती आज्ञा धिक्कारून, युद्धाचे आव्हान स्वीकारताच, त्याच्यावर चाल केली.

पौरव राजाच्या बळाचा मुख्य भर, त्याच्या लढाअू रथांवर नि हत्तीच्या दलावर होता; तर, अलेक्झांडरचा मुख्य भर, ग्रीकांच्या, रणनिष्णात घोडदळावर होता. ह्या दोन्ही सैन्यांच्यामध्ये वितस्ता (झेलम) नदी होती. अितक्यात, त्या सैन्याचे तोंड लागायच्या आधीच, अकस्मात, मोठा वादळी पाऊस पडू लागला. त्यामुळे, नदीला मोठा पूर आला. तथापि, अलेक्झांडरने थोड्याच दिवसांत, दूरवर शोध करीत, नदीच्या वरच्या बाजूला असलेला, अेक अुतार शोधून काढला; नि झटपट, त्याच्या त्या रणनिष्णात घोडदळासह, नदी अुतरून, पौरवाच्या पार्श्वावर चाल केली. त्यामुळे, पौरवाचा व्यूहच ढासळला. तरीही, राजा पौरवाने तुंबळ लढाअी दिली. परंतु, पावसामुळे त्या रणभूमीत जिकडे तिकडे चिखलच चिखल झाल्यामुळे, पौरवाचे रथ नि हत्ती, ही, दोन्हीही रणसाधने निकामी झाल्यामुळे; आणि अलेक्झांडरच्या घोडदळाच्या चढाअू माऱ्यामुळे, पौरवाच्या सैन्याचा टिकाव लागला नाही. त्या रणधुमाळीत हत्तीवर आरूढ झालेला पौरव राजाही जिवावर अुदार होअून लढत असता स्वतःच घायाळ झाला; आणि अलेक्झांडरच्या हाती सापडला. अशा प्रकारे, अंशतः पौरवाच्या दुर्दैवामुळे नि अंशतः अलेक्झांडरच्या रणचापल्यामुळे ग्रीकांचा पूर्ण विजय झाला.

## कौतुकाने नव्हे, राजकारणासाठी

पौरव राजाला बंदिवान करून अलेक्झांडरपुढे नेले असता अलेक्झांडरने त्यास विचारले, ''मी तुला कसे वागवावे अशी तुझी अिच्छा आहे?'' तेव्हा पौरवाने अुत्तर दिले, ''राजासारखे!'' आपल्या अिकडच्या नि युरोपीय अितिहासकारांनीही, बहुधा, असेच लिहिले आहे, की, 'पौरव राजाच्या धिटाअीच्या अुत्तराचे अलेक्झांडरला मोठे 'कौतुक' वाटले आणि म्हणून, त्याने पौरवाला न मारता, केवळ अंकित करून, पुन्हा राज्यावर बसविले. परंतु, हे वर्णन चुकीचे आहे. विशेषतः, शालेय पुस्तकांतून तरी, अशी, भोंगळ स्तुतिवाक्ये घालू नयेत.

कारण, स्वप्नात राज्य देण्याचे वचन दिले, म्हणून, जागे झाल्यावरही, त्या वचनाप्रमाणे राज्य देऊन टाकणारा, अलेक्झांडर हा, कोणी भाबडा भारतीय राजा नव्हता. जर पौरवाला त्याने ठार मारले असते किंवा त्याचे राज्य छिनावून घेऊन, ग्रीक जातीचा ऐखादा 'क्षत्रप' अलेक्झांडरने त्या राज्यावर नेमला असता, तर, त्या राज्यातील स्वाभिमानी भारतीय जानपद, ग्रीकांच्या द्वेषाने, अधिकच खवळले असते. अलेक्झांडरला अनेक शत्रूंशी लढत, भारताची मुख्य राजधानी, जी पाटलीपुत्र तेथपर्यंत जावयाचे होते, ते, केवळ त्याच्यासमवेत असलेल्या, जातिवंत ग्रीक, सेनेच्या बळावर थोडेच साधणार होते! त्यापेक्षा, तक्षशिलेच्या अंबुज राजाप्रमाणेच, पौरवालाही दिखाऊ दयेने जिंकून, आपला अंकित नि पाठिराखा केल्यानेच, अलेक्झांडरच्या भारतविजयाचा अधिक संभव होता. यास्तव, पौरवाच्या धीरोदात्त अुत्तराने, अलेक्झांडरला जे कौतुक वाटले, तेवढ्यासाठी नव्हे, तर, या राजकीय डावपेचासाठीच, त्या राजकारणपटू अलेक्झांडरने, पौरवाचे राज्य त्याला परत दिले. अितकेच नव्हे, तर, आजूबाजूची जिंकलेली, काही, छोटीछोटी संस्थानेही, पौरवाच्या राज्यात समावेशिली; आणि त्याला, आपल्या त्या विस्तृत भारतीय प्रांतावरचा, 'क्षत्रप' (Governor) म्हणून नेमले. पौरवानेही, 'प्रसंग पडला बाका' ह्या न्यायाने, अलेक्झांडरचे ते बोलणे मान्य केले. परराष्ट्रीय शत्रूशी, पौरवाने, क्षात्रधर्माप्रमाणे झुंजण्याचे, कर्तव्य बजावलेलेच होते; आणि 'तावत् कालं प्रतीक्षेताम्', हाही, राजनीतीचाच दंडक आहे; हे जाणून, राजा पौरवाने, अलेक्झांडरचे नावापुरते आधिपत्य मानून, राज्य बचावले. ह्याचा भारतीयांना विषादही वाटला नाही. संधी येताच, 'क्षत्रप' पौरवाने, अलेक्झांडरचा हा डाव, त्याच्यावरच कसा अुलटविला, तेही पुढे दिसेलच.

## ग्रीसहून अलेक्झांडर नवे
## ग्रीक सैन्य भरीस मागवितो.

पौरवाचे युद्ध संपताच, अलेक्झांडरने, आजूबाजूच्या लहानसहान संस्थानांना जिंकून, त्या प्रदेशाची व्यवस्था लावली आणि तेथील नि त्यापुढील प्रदेशातील, लोकस्थितीची, चौकशी केली. हिंदुकुशापासून तेथपर्यंत देश जिंकीत येण्यात, त्याच्या मूळच्या ग्रीक सैन्याची जी हानी झालेली होती ती भरून काढण्यासाठी, त्याने, त्याच्या बाबिलोन नि ग्रीसमधील प्रांताधिपांकडून, नव्या ग्रीक सैन्याची मागणी केली. जुन्या सैन्यातील जे ग्रीक सैनिक, घायाळ, अधू नि अंगचुकार किंवा निकामी झालेले होते, त्यांना, परत धाडले.

## भारतीय यतींची नि योग्यांची चौकशी

भारताच्या, जिंकलेल्या आणि जिंकावयाच्या, प्रदेशातील लोकस्थितीचा वृत्तान्त समजून घेण्याकरिता, अलेक्झांडरने, जे चौकस लोक चहूकडे धाडले होते त्यांनी, आणलेल्या समाचारात, तेथील अरण्यात वसत असलेल्या तपोवनांची, तपस्व्यांची, निःसंग नि अेकअेकटेच विचरणाऱ्या तत्त्वचिंतक यतींची, योग्यांची नि प्रव्रजितांची वर्णनेही होती. स्वतः सम्राट अलेक्झांडरला विद्वत्तेची नि तत्त्वज्ञानाचीही अभिरुची असे. अलेक्झांडर हा, स्वतःस, तत्त्वज्ञ ॲरिस्टॉटलचा शिष्य म्हणवी. ग्रीस देशामध्ये अशा यती योगी, तत्त्वज्ञानी नि संन्यासी ब्राह्मणांची प्रख्याती असे. ती अलेक्झांडरच्याही कानावर पडलेली होतीच. त्यामुळे, त्याला त्या भारतातील संन्यासी ब्राह्मणांना, ज्यांना ग्रीक भाषेत 'Gymnosophist' म्हणून संबोधीत, त्यापैकी काहींना, प्रत्यक्ष, पाहण्याची नि त्यांच्याशी संभाषण करण्याची प्रबल जिज्ञासा होती. अरण्यातील तपोवनांतून, अलेक्झांडरने, अशा काही संन्याशांना बोलावून घेतले आणि काहींची, त्यांच्याकडे जाअून, भेट घेतली. अशा प्रसंगाच्या काही कथा, लोकांच्या नि अलेक्झांडरसारख्या अलौकिक सम्राटाच्या, भावना व्यक्तविण्यापुरत्या, ग्रीक कथानकांच्याच शब्दांत सांगतो.

अशा अेका यतीची भेट झाली असता, अलेक्झांडरने विचारले, "माझ्या ह्या दिग्विजयाच्या कार्यास यश येअील की नाही?" अशा अर्थाच्या, त्याच्या प्रश्नास, त्या यतीने, शब्दांमध्ये काहीच अुत्तर न देता, अेक मोठे चामडे - ज्याच्या दोन्ही बाजू अगदी सुकून वातड होअून धनुष्यासारख्या वक्र झालेल्या होत्या ते - आणविले आणि नंतर तो यती अलेक्झांडरला म्हणाला, "हे चामडे नीट सपाट पसरून याच्यावर अेकटा बैस." त्यावर, अलेक्झांडरने किंवा त्याच्या आज्ञेने त्याच्या कोणा अधिकाऱ्याने, त्या चामड्याच्या अेका टोकास बळाने दाबून, त्यावर बसण्याचा प्रयत्न केला, तोच, ते दुसरे वातड टोक

खाडकन वर आले. ते दुसरे टोक खाली दाबून, त्यावर बसू पहावे, तो पहिले वातड टोक खाडकन अुभे राहावे. अर्थात ते चामडे सपाट अंथरता येअीना नि त्याच्या मधोमध चपखल बसता येअीना! ते दाखवून तो यती म्हणाला, ''तुझ्या भारतावरील स्वारीची, अशी स्थिती होअील. तू अेका बाजूला पुढे, जिंकीत जाशील, तर, तुझी मागची जिंकलेली राज्ये, पुन्हा, तुझ्याविरुद्ध अुठून तुझे जोखड फेकून देतील. तू मागे वळशील, तर, तुझी पुढची जिंकलेली राज्ये, पुन्हा, तुझ्याविरुध्द अुठून, तुझे जोखड फेकून देतील. तुला, अखिल भारताच्या केंद्रीय सम्राटपदावर बसणे, हे, असे अशक्य आहे.''

## 'डंडामिस'चा दंडक

ग्रीक लेखक ज्याला Dandamis (डंडामिस) म्हणतात; आणि ज्याचे शुद्ध संस्कृत नाव, मला तरी आढळले नाही अशा अेका, संन्यस्त ब्राह्मणाची ख्याती तक्षशिलेकडे अैकून, त्यालाही बोलावून, त्याच्याशी संभाषण करावे, अशी, अलेक्झांडरला अुत्कट अिच्छा झाली. तो वयोवृद्ध नि ज्ञानवृद्ध ब्राह्मण, संन्यस्त नि अुल्लिंग अवस्थेत, विचरत असे. निरोपावारी तो संन्यस्त ब्राह्मण अलेक्झांडरकडे जाअीना. तेव्हा, अलेक्झांडरने, आपल्या 'सेक्रेटस' नावाच्या अधिकाऱ्याला, त्या सर्वसंगपरित्यागी ब्राह्मणाकडे धाडून, आज्ञापिले की, ''जे प्रत्यक्ष 'झ्यूज' देवतेचे (संस्कृत 'द्युः' चे) पुत्र आहेत त्या जगज्जेत्या सम्राट अलेक्झांडरनी तुला बोलाविले आहे. जर तू येण्यास पुन्हा नकार देशील तर तुझा आताच्या आता शिरच्छेद केला जाअील.'' ही धमकी अैकताच, तो संन्यासी ब्राह्मण खदखदून हसला; आणि अुत्तरला की, ''अलेक्झांडर, हा जसा नि ज्या अर्थी, 'झ्यूज' देवतेचा पुत्र आहे, तसा नि त्याअर्थी, मीही पण, त्या द्युः चाच पुत्र आहे! अलेक्झांडरची, जगज्जेतेपणाची बढाअी, ही, व्यर्थ आहे. त्याने, व्यास नदीचे परतीरही, अजून, पाहिलेले नाही. त्यापुढे, ज्या शूर भारतीयांची राज्ये आहेत आणि त्यांच्याही पुढे ते मगधाचे प्रबळ साम्राज्य आहे; त्यांच्याशी तोंड दिल्यानंतर, जर अलेक्झांडर अुरला तर, मग, तो जगज्जेता आहे की नाही याचा विचार करता येअील! मला, अलेक्झांडर भूमिदान देअू म्हणतो, धन देअू म्हणतो, परंतु, त्याला जाअून सांग की, अशा वस्तूंना माझ्यासारखे संन्यस्त ब्राह्मण तुच्छ मानतात. ही माझी मातृभूमी मला जे हवे ते, आअी लेकराला देते तितक्या मायेने, मला पुरविते आहे. अलेक्झांडर, जर माझे शिर छाटीत असेल, तर, फार तर माझे शिर नि पिंड, ज्या ह्या मातीतून घडले गेले, तीतच, ते मिसळून जाअील. पण, त्याला माझा आत्मा काही छाटता येणार नाही. तो अच्छेद्य, अमर आहे. अलेक्झांडरला सांग की, जे सत्तेचे नि सुवर्णाचे दास असतील आणि जे मृत्यूला भीत असतील त्यांना अशा धमक्या दे! आमच्यापुढे अलेक्झांडरसारख्या अेका मर्त्य मनुष्याच्या अशा धमक्याच पांगुळतात! कारण, खरा संन्यासी ब्राह्मण सुवर्णाने वश होत नाही; आणि मरणाला भीत नाही!! मी येत नाही जा!''

डंडामिसने, अलेक्झांडरच्या अधिकाऱ्याला, दिलेल्या अुत्तरातून काही वाक्ये तेवढी, वर दिली आहेत. ग्रीक लेखकांनी त्याचे ते बाणेदार अुत्तर सविस्तर दिले आहे. Plutarch नेही ह्या कथा वर्णिल्या आहेत. विशेषतः 'डंडामिसची' वरील कथा देअून काही ग्रीक लेखकांनी त्याच्या ह्या निर्भय नि बाणेदार अुत्तराने थक्क होअून म्हटले आहे, ''ज्या अलेक्झांडरने, अनेक राष्ट्रे जिंकली, त्या जगज्जेत्या अलेक्झांडरलाही, धूळ चारणारा, जर कोणी ह्या जगात भेटला असेल तर, तो हा, वृद्ध नि नागडा अुघडा, भारतीय ब्राह्मण संन्यासीच होय!!''

## अलेक्झांडर ब्राह्मणांना क्रांतिकारक म्हणून फाशी देतो!

ह्या चौकशीत, अलेक्झांडरला, असेही आढळून आले की, हे संन्यासी योगी नि यती जरी फटिंगासारखे अेकटे भटकत असले, तथापि त्यांच्या निःसंग, निर्भय नि निःस्पृह वृत्तीमुळेच, भारतीय गणराज्यांच्या काय किंवा अेकसत्ताक साम्राज्यांच्या काय, राज्यचालकांवर, त्यांच्या राजकीय मतांचा, अत्यंत प्रभाव पडत असे. भारतीय क्षत्रियांच्या खड्गाच्या धारेअितकीच, ह्या, संन्यस्त, ब्राह्मणांच्या जिभेची धारही, तीक्ष्ण असून, परकीय ग्रीकांच्या, अन्याय्य आक्रमणांची, ती, तीव्र प्रतिकार करीत होती; आणि अलेक्झांडरविरुद्ध, भारतीय जनतेत, प्रकटपणे वा गुप्तपणे, प्रक्षोभ पेटवीत चाललेली होती. हे, ध्यानी येताच, ह्या, 'Gymnosophist' तत्त्वज्ञानी वर्गाविषयी, अलेक्झांडरला, प्रथमप्रथम, वाटणाऱ्या

जिज्ञासेचे रूपांतर, अशा, संन्यस्त ब्राह्मणांच्या द्वेषात झाले. तेव्हा, अलेक्झांडर, अशा काही ब्राह्मणांना, पकडून, फाशी देऊ लागला. अशाच अेका ब्राह्मणाचा, शिरच्छेद करण्याआधी, त्याला, जेव्हा, विचारण्यात आले, 'तू, अमक्या अेका, भारतीय संस्थानिकाला, ग्रीकांविरुद्ध का चिथविलेस?' तेव्हा, त्याने ठासून सांगितले; की, ''कारण, माझे असे ब्रीद आहे की, जगायचे तर मानाने जगावे; अन्यथा, मानानेच मरावे! (Plutarch LXIV)

पौरव राजाचा पराभव केल्यानंतर, अलेक्झांडरला, साहजिकच, असे वाटले होते; की, त्याच्या त्या डोळे दिपविणाऱ्या जयामुळे, आजूबाजूच्या गणराज्यांचेही धैर्य, आपोआपच, खचून जाअील; आणि ती प्राजके, (Republics) आपण होअून, पटापट शरण येतील; परंतु, ही, त्याची समजूत, बहुतांशी, भ्रामक ठरली. तो वितस्ता (झेलम) अुतरून,भजसजसा पुढे जाअूं लागला, तसतशी, त्याच्या वाटेतील, बहुतेक लहानमोठी गणराज्ये, त्याच्याशी, लढाअी देत चालली. रणदेवतेचा निर्णय घेतल्यावाचून, ती; त्याचे स्वामित्व, सुखासुखी मानीनात. ह्यामुळे, त्यांतील बहुतेकांना, ग्रीकांचे बहुसंख्य नि प्रबळ सैन्य, जरी, जिंकीत चालले होते; तरी त्या सतत लढत राहण्याचा ताण, ग्रीकांवरही, पडल्यावाचून राहिला नाही.

अशा अनेक, झुंजार भारतीय गणराज्यांशी, झालेल्या, लढायांची वर्णने, ग्रीक ग्रंथकारांनी, दिलेली आहेत. परंतु, ती; सविस्तरपणे किंवा संक्षेपानेही, सांगण्याचा, हा प्रसंग नाही. तथापि, सारा भारत पादाक्रांत करून थेट मगध सम्राटाचा मुकुट, आपल्या डोक्यावर, मिरविण्यासाठी आलेल्या, त्या प्रबळ लक्ष लक्ष ग्रीक सैन्याशी आणि त्याच्या असामान्य नि जगत्प्रसिद्ध देवसेनीशी, - अलेक्झांडरशी, भारतीय स्वातंत्र्यार्थ, ज्या ज्या गणराज्यांनी, फुटकळपणे का होअीना, पण, आपापल्यापुरता तुंबळ नि भीषण लढा दिला; नि शेवटी अलेक्झांडरला अंगणातूनच परत जाणे भाग पाडले, त्यांच्यातील, काही गणराज्यांची नि राज्यांची वेचक अुदाहरणे, केवळ कृतज्ञतेसाठी तरी, सांगितलीच पाहिजेत.

## सौभूती नि कठ गणराज्ये

ह्या दोन्ही गणराज्यांची राज्यघटना प्रजासत्ताक होती नि ती स्वतंत्र होती. डायोडोरस हा ग्रीक ग्रंथकार लिहितो की, त्यांच्या हाताखालील सर्व नगरांतील राज्यव्यवस्था नि निर्बंध हे अत्यंत हितकारक नि प्रशंसनीय होते. (They were governed by laws in the highest degree salutary and their political system was admirable.) ह्याचे अेक वैशिष्ट्य असे होते की, आपली प्रजा, अधिकाधिक, बलिष्ठ नि सुंदर निपजत जावी म्हणून, प्रजनन हे, व्यक्तिविषयक लहरीवर न सोपविता, ते अेक, राष्ट्रीय कर्तव्य जाणून, त्यावर, राजसत्तेचे नियंत्रण ठेवलेले होते. ते शारीरिक सौंदर्यांचे भोक्ते होते; यास्तव, त्यांच्यात विवाहाचे वेळी हुंडा घेण्याची चाल नसे. वधू-वरांचे शरीरसौष्ठव, सुंदरता आणि निकोप नि बलिष्ठ संतती अुत्पन्न करण्याची पात्रता हे गुण जुळल्यास तो विवाह श्रेयस्कर मानला जाअी. त्यांच्या गणराज्यांचे धुरंधर पुढारी निवडण्यातही शरीरसौष्ठव नि बळ ह्या गुणांचा विचार केला जाअी. हे सुप्रजननाचे तत्त्व, अितके कठोरपणे, त्यांच्या निर्बंधात अनुस्यूत केलेले असे की, मुले जन्मल्यानंतर, तीन महिन्यांचे आत, त्यांची राज्याधिकाऱ्यांकडून शारीरिक परीक्षा केली जाअी. जर अेखादे मूल जन्मतःच अत्यंत व्यंग, दुर्धर रोगाने पछाडलेले वा विकृत असले, तर, त्यास राजाज्ञेने निर्दयतेने मारले जाअी.

ग्रीसमधल्या, 'स्पार्टा' ह्या प्राजकातही, अनुवंश (Heredity) सुधारण्यासाठी, असेच निर्बंध असत, हे, ज्ञात्यांस ठाअूकच आहे.

ह्या सौभूती नि कठ गणांप्रमाणे, अगदी कठोरपणे नसली, तरी, बलिष्ठ नि सुंदर प्रजा व्हावी, म्हणून जपणारी, आणखी, गणराज्ये भारतात असत. वृष्णीगणांतही, त्यांचे धुरंधर पुरुष, बलिष्ठ नि देखणे असावे, असा कटाक्ष, ह्या काळच्या फार पूर्वीपासून, असे. त्या वृष्णीगणाचा जगद्विख्यात नेता, जो श्रीकृष्ण, त्याच्या शरीरसौष्ठवाची नि बलिष्ठतेची ख्याती, तर, अजरामरच झाली आहे! श्रीकृणाचे पुत्रही अतिशय देखणे होते असे पुराणांतून सांगितले आहे.

**'आयुधजीवी' गणराज्ये :** पंचनद प्रांतात (पंजाबात) नि सिंधू नदीच्या तटाला लागून, थेट तिच्या मुखापर्यंत, पसरलेल्या भारतीय गणराज्यांतील अनेक गणराज्यांना, आयुधजीवी किंवा शस्त्रोपजीवी म्हणत. त्यांचे वैशिष्ट्य, हे असे की, त्या

सर्व पुरुषांनाच नव्हे, तर, बहुसंख्य स्त्रियांनाही सैनिक-शिक्षण, अनिवार्यपणे, घ्यावेच लागे. युद्धाचे काळी, ते सारे राष्ट्र, लढाअीवर जाअू शके, निरनिराळ्या प्रकारची असली, तरी, त्यांची राज्यघटना मूलतः, प्रजासत्ताक असे, हे सांगणे नकोच. ती लहानमोठी असली, तरी, स्वतंत्रपणे नांदत.

**यौधेय गणराज्य :** या आयुधजीवी वर्गाच्या गणराज्यांत, ज्याचे राज्य विस्तृत नि सुपीक प्रदेशावर पसरलेले होते, १८ ते २१ वर्षे वयाच्या, प्रत्येक, तरुणाने, शस्त्रविद्या शिकलीच पाहिजे, असा निर्बंध (Law) असल्यामुळे, ज्याचा पुरुषवर्ग तर काय, पण बहुसंख्य स्त्रियाही, शस्त्रसज्ज असत, ज्याला 'A nation in arms' म्हणून, परके अितिहासकारही संबोधितात; आणि आपल्या स्वातंत्र्यास्तव, जिवावर अुदार होअून लढण्याच्या ज्याच्या कीर्तीमुळे, ज्याच्या पराक्रमाचा सर्वांना दरारा वाटत असे जे यौधेय गणाचे राज्य, प्रमुखत्वे, गणले जाअी, ते, पंचनद प्रांतातील व्यास नदीच्या खाली, पसरलेले होते.

पौरव राजाचा पराभव करून, आजूबाजूची गणराज्ये नि डोंगराळ टोळ्यांशी लढत नि ती जिंकीत अलेक्झांडर वितस्ता (झेलम) नि चंद्रभागा (चिनाब) ह्या नद्या अुतरून व्यास नदी ओलांडण्यासाठी, झपाट्याने, पुढे येत आहे हे पाहून, तिच्या खालच्या तीराला निवासणाऱ्या या पराक्रमी यौधेय गणानेही, अलेक्झांडरचे, 'शरण येण्याचे' आव्हान, धिक्कारून, युद्धाची जय्यत सिद्धता चालविली! अितके झाले, तरी, मगध साम्राज्याचा 'सम्राट' म्हणविणाऱ्या, पराक्रमशून्य, धनानंद महाराजाच्या डोळ्यांवरील गुंगी अुतरली नाही. त्या भेकडाने, या शूर यौधेय गणाशी, शिकंदरला (अलेक्झांडरला) तिकडच्या तिकडेच, पादाक्रांत करण्यासाठी, कोणतेही सामरिक सहकार्य केल्याचे आढळत नाही. तरीही, यौधेयगण आपल्याच बळावर, शिकंदराशी, लढण्यास सज्ज झाला.

## शिंकदराच्या सैन्याने धास्ती खाल्ली!

पंचनदांतील सिंधू, वितस्ता, चंद्रभागा ह्या नद्या ओलांडून अलेक्झांडरचे सैन्य, लढत लढत, जेव्हा, ह्या व्यास नदीच्या काठापर्यंत आले तेव्हा, त्यांना, त्या नदीच्या पलीकडे असलेले, हे यौधेय गणाचे प्राजक, ग्रीकांशी, आपल्या स्वातंत्र्यरक्षणार्थ, लढण्यास सज्ज होअून ठाकल्याचे कळले. त्याच्या पराक्रमी सैन्यशक्तीची ख्यातीही ग्रीकांच्या कानांवर गेली. त्या यौधेय गणाच्या पुढेच, गंगेकाठची मोठमोठी राज्ये लढण्यास सिद्ध आहेत, ही वार्ताही, त्याच्या, कानावर आलेलीच होती. यामुळे, आजवर, पंचनदात भारतीयांशी लढत लढत, आधीच थकवा नि कंटाळा आलेल्या ग्रीक सैन्याची, व्यास नदी ओलांडून, ह्या पराक्रमी यौधेय गणादिक भारतीय राज्यांशी, युद्धे करीत पुढे घुसण्याची छाती होअीना!

परंतु, त्यांच्या त्या जयिष्णू नि धैर्यमेरू सम्राटाची नि सेनापतीची, त्या अलेक्झांडरची, राज्यतृष्णा नि युद्धपिपासा लेशमात्र अुणावलेली नव्हती! व्यास नदी ओलांडून, यौधेय गणास जिंकून, थेट मगधापर्यंत, पुढे घुसायचेच अशी, त्याने ग्रीक सैन्यात घोषणा केली. ह्या त्याच्या हट्टामुळे, लढाअीस कंटाळलेल्या, त्याच्या अगदी निवडक सैन्यात सुद्धा, असंतोष माजला. त्या ग्रीक सैन्यातील सैनिक, टोळ्याटोळ्यांनी गुप्तपणे, पुढे जाण्यास स्पष्टपणे नकार द्यावयाचा, म्हणून, ठराव करू लागले. अलेक्झांडरला ते अजिंक्य नि प्रत्यक्ष 'झ्यू' देवतेचा पुत्र म्हणून मानीत आले. पण, त्याच्या राज्यतृष्णेचा, त्यांना आता अगदी अुबग आला. ही ग्रीक सैन्यातील असंतोषाची जाणीव, अलेक्झांडरला होताच, त्यांना अुत्तेजविण्यासाठी, त्याने त्यांच्यासमोर अेक भाषण केले. तो म्हणाला, ''ग्रीसचें सैन्य अजिंक्य आहे ही तुमची जगभर गाजवणारी कीर्ती! तिला अशी काळोखी! भारतात शिरल्यानंतर तुम्ही आजवर ज्या लढाया लढलेत नि जय मिळविलेत, ते, लहानसहान शत्रूंशी गाठ पडली, तेव्हा होते; आता, मोठमोठ्या शत्रूंना तोंड द्यावयाचे आहे. व्यास नदीच्या पलीकडेच, हे, अेक आयुधजीवी गणराज्य, शरण न येता, तुमच्याविरुद्ध दंड थोपटून, रणांगणात अुतरले आहे! त्यांची खोड मोडून, पुढे असलेल्या गंगेच्या काठच्या अत्यंत सुपीक राज्यांना जिंकून, आपल्या ग्रीसच्या दिग्विजयचा डंका साऱ्या जगात गाजविलाच पाहिजे!''

पण, अशा आशयाच्या चेव आणणाऱ्या, अलेक्झांडरच्या, भाषणाचा परिणाम, त्याने, अपेक्षिला होता तसा न होता, अगदी अुलट झाला. आज आपण लढलो, त्यापेक्षा अधिक भीषण संग्राम, आपणास लढावे लागणार आहेत, हे स्वतः, अलेक्झांडरनेच,

सांगितल्यामुळे, त्याच्या ग्रीक सैन्याच्या हृदयात धडकीच भरली. डॉ. जयस्वाल, आपल्या 'Hindu Polity' ग्रंथात, लिहितात :

"The Greek army refused to move an inch forward to face the (Bharatiya) nations whose very name, according to Alexander struck his soldiers with terror.'

आपले ग्रीक सैन्य थकल्यामुळे, यौधेयगणाशी, तत्काळ, लढण्याच्या भयामुळे नि पुढील सर्वच कटकटी टाळण्यासाठी, व्यास नदी अुतरण्यास, स्वच्छ नकार देत आहे, हे पाहताच, प्रत्यक्ष आपली अवज्ञा केल्याविषयी, अलेक्झांडर संतापला ; पण, तो जसा धुरंधर योद्धा होता, तसा, धूर्त कारस्थानीही होता. काळवेळ ओळखून, संतापाच्या भरात, काही अेक झटकन न करता, अलेक्झांडर, वैतागासरशी, अेकदम आपल्या तंबूत गेला ; कोणाशीही बोलेनासा झाला. तीन दिवसपर्यंत, तो, तंबूबाहेर आलाच नाही. विचारपूर्वक, त्याने अेक निराळीच योजना, मनातल्या मनात, ठरविली. नंतर, त्याने सर्व ग्रीक सैन्यास, अेकत्र जमविले ; आणि तंबूबाहेर येअून त्यांना म्हणाला, ''व्यास नदी अुतरून पुढे जायचा बेत मी सोडून दिला आहे. आता ग्रीसला परत जावयाचे !'' या वाक्यासरशी शिकंदरच्या सैन्यास अर्थातच 'आनंदीआनंद' झाला ! शिकंदर पुढे म्हणाला, ''पण मागे परत फिरायचे कसे ? सरळ पाठ फिरवून, आल्यामार्गे जाअू लागलो, तर आपण जिंकलेलेच हे सारे भारतीय जानपद, 'जितं जितं करीत, बंड करून अुठल. आपण घाबरलो आहोत, असे, समजतील ! तेव्हा पाठ दाखवून, आलेल्या भूमीमार्गे परत न फिरता, आपण किंचित तिरपे वळावे. सिंधू नदीतून वाट काढीत समुद्राकडे जावे नि मग समुद्रमार्गे अिराणास परत जावे. पुढे पुन्हा, जेव्हा भारतात आपण येअू तेव्हा, गंगेकडील राज्येही जिंकून, आपण, आपला भारताचा दिग्विजय पुरा करू !!''

अलेक्झांडर म्हणाला खरा की, 'पुन्हा जेव्हा आपण भारतावर चालून येअू.' पण हे ग्रीक सेनापते, पुढे म्हणजे केव्हा ? गंगेकडील राज्ये जिंकण्याचे तर राहोच, पण आज तू ही भारताची सीमारेषा जिंकली आहेस तीच मुळी, तोवर, तुझ्या साम्राज्याचे जू झुगारून देअून, स्वतंत्र झालेली नसेल तर ? नव्हे, त्या तुझ्या 'पुढं'च्या आधीच, तूच मुळी बेपत्ता झालास तर ? 'झ्यू' चे कुल सुद्धा, बोलता बोलता, काळाचा ग्रास होअू शकते ; मग ग्रीसचे का असेना !

भारतावर, पुन्हा चालून येणाया अलेक्झांडरच्या धमक्यांची, जर, त्या भारतीय 'Gymnosophist' यतींनी नि योग्यांनी, अशी टिंगल अुडवली असेल तर, ती काही, अस्थानी ठरत नाही !

## अलेक्झांडरची पिछेहाट

तोंडाने, काहीही वल्गना करीत राहिला, तरी, व्यास नदीपलीकडील, यौधेयादी भारतीय दळभारांच्या पराक्रमास, ग्रीक सैन्य भ्याले, म्हणून, व्यास नदी अुतरण्याची अलेक्झांडरची छाती झाली नाही ! भारतीय पराक्रमाने त्याच्या चढाअीची रग जिरविली, म्हणून, अलेक्झांडरला मागे फिरणे भाग पडले. ते स्वेच्छेने मागे परतणे नव्हे, तर, ती, भारतीयांपुढे हतबल ग्रीकांची पिछेहाट होती. हे अैतिहासिक सत्य छपविण्यासाठी, जे काही ग्रीक किंवा युरोपियन अितिहासकार, लिहितात की, ''जर शिकंदर, व्यास नदी अुतरून, पुढे गेला असता तर, यौधेय गणाचाच काय, पण, मगधाचाही पराभव करू शकता. यौधेयांनी, प्रत्यक्ष रणांगणातच लढून काही, कुठे, पराभव केलेला नाही.'' अशा जर-तरच्या वल्गनांनी, यौधेयादिकांच्या, भारतीय रणप्रतापाच्या वतीने, ह्या प्रकरणी तरी, असे प्रत्युत्तरता येअील की,

**'का कथा बाणसंधाने ज्याशद्बेनैव दूरतः ।**

**हुंकारेणैव धनुषः स हि विघ्नन् व्यपोहति ।।**

जो शत्रू, आमच्या, नुसत्या धनुष्यांच्या टणत्कारासरशीच, भयभीत होअून पळ काढतो, त्याच्याशी, लढायचे काय कपाळ !

पुन्हा, अलेक्झांडरच्या ह्या ग्रीक सैन्याची, प्रत्यक्ष रणांगणात लढण्याची खुमखुमीही, मगधादिक भारतीयांचा रणप्रताप, पुढे, जिरविणार आहे ! युद्धाच्या आखाड्यांत अुतरतोच आहे तो चंद्रगुप्त ; थोडे थांबा.

## अलेक्झांडर अेक बलाढ्य नौदल अुभारतो

व्यास नदीवर, त्याच्या सैन्याची पिछेहाट होताच, सिंधूनदीतून समुद्राकडे, ससैन्य, निघून जाण्यासाठी, शिकंदरने, पांच-सहाशे रणतरी बांधून, अेक, बलाढ्य नौदल (आरमार) अुभारले. त्यावर, त्याचे सहस्रावधी ग्रीक सैन्य, शस्त्रास्त्रांनिशी सज्ज

करून, त्याने चढविले; आणि तो सिंधू नदीतून परतू लागला. या, जलप्रवासाच्याच आगेमागे, शिकंदरने, बाबिलोनिया येथून मागविलेली, त्याची नव्या दमाची, दोन ग्रीक सैन्येही, त्याला, येअून मिळाली. त्यामुळे, त्याचे थकलेले, जुने ग्रीक सैन्यही, अुल्हसित झाले.

परंतु अिकडे शिकंदरची पिछेहाट झालेली पाहून, त्याने जिंकलेल्या, गांधार ते व्यास नदीपर्यंतच्या भारतीय जानपदात, आतून आतून, ग्रीससत्तेविरुद्ध, मोठे षड्यंत्र चालू झाले. पण, त्याचा अुल्लेख पुढे येईल. अिथे, अितके सांगणे पुरे आहे की, ''मी परत येणार आहे तेव्हा पाहून घेअीन!'' ह्या, अलेक्झांडरच्या धमकीला, अेक, राजकारणी बागुलबुवा समजून, शिकंदर, सिंधुनदीच्या ज्या मार्गाने, परत जाणार होता; त्याच्या अुभय तीरांवर पसरलेल्या, लहानमोठ्या भारतीय गणराज्यांनी, त्या ग्रीक सैन्याचा, शक्यतो, सशस्त्र सामरिक प्रतिकार करावयाचे ठरविले; पण, तो, ज्या त्या स्वतंत्र गणराज्याने, ज्याच्या त्याच्यापुरता, फुटकळपणे, घेतलेला निर्णय होता. सर्वांनी मिळून, संघटितपणे, अेकाधिपत्याखाली, शिकंदरशी लढलेले, ते, संयुक्त युद्ध नव्हते. त्यामुळे, मागे गांधार नि पंचनदात झाले, तसे, अेकेका भारतीय गणराज्याला गाठून, शिकंदरचे संघटित सैन्य, लढत लढत, पुढे जाअू शके. ह्या भारतीय सैन्याशी, ह्या फुटकळ लढाया झुंजवीत राहण्याने, जरी, शिकंदरची हाडे खिळखिळी होत; तरी, त्याचा नि:पात असा, होअू शकत नसे. ज्या त्या स्वतंत्र गणराज्याने, आपल्यापुरते, लढण्याच्या ह्या फुटीर प्रवृत्तीला, काही, तुरळक अपवादही घडले. त्यांपैकी, शत्रुपक्षाकडील ग्रीक अितिहासलेखकही, ज्यांची, तोंड भरून प्रशंसा करतात; आणि ग्रीक अितिहास, जन्मभर, विसरणार नाही, असा, अेक तडाखा ज्याने, समरांगणात, शिकंदरला लगावला, त्या दोन गणराज्यांना, तरी, येथे अुल्लेखिले पाहिजे.

## मालव आणि शूद्रक गणराज्ये

ही दोन्ही गणराज्ये, सिंधूच्या तटावर, प्रत्येकी, स्वतंत्रपणे नांदत होती. दोन्हीही संपन्न, शूर, लोकसत्ताक नि अत्यंत स्वाभिमानी असत. त्यातही, मालवगण हा, प्राचीन कालापासून, विख्यात असे. त्याचे राज्य विस्तृत होते. ह्या गणांत, केव्हा, वैरही येअी; तथापि, जेव्हा, शिकंदराचे बलाढ्य नौदल, वाटेत, आडवे येअील त्या त्या, फुटकळ, भारतीय संस्थानांशी लढत, सिंधू नदीतून वाट कापीत चालले; तेव्हा, त्या दोन्ही गणांतील राजकारण्यांनी, तोवर, फुटकळपणे लढण्यात, स्वतंत्र भारतीय गणराज्यांची, जी, राष्ट्रघातक भूल, होत होती ती, सुधारण्याचा निर्धार केला. त्यांनी, स्वतंत्रपणे न लढता, दोन्ही गणराज्यांचे सैन्य, अेकत्र करून, अेकाच नेतृत्वाखाली, लढण्याचे ठरविले. केवळ, सैन्यच नव्हे; तर आपले जुने वैर विसरून, त्या गणराज्यांतील नागरिकांनी, आपले राष्ट्रीय नि सामाजिक जीवनही, अेकात्म करण्यासाठी, परस्परांत, शरीरसंबंध घडवून आणले. जातीत जात मिसळून जावी; अेकरक्त, अेकबीज व्हावे; ह्यासाठी, परस्परांत, त्यांचा मोठा सामुदायिक विवाहसमारंभ झाला. न्यूनत:, अेक सहस्त्र मुली, अेकमेकांत, देअून घेअून, परस्परांतील वरांशी, त्यांची लग्ने लागली गेली!

मालव शूद्रकांच्या, ह्या, संयुक्त सैन्याचा, ग्रीकांशी तुमुल संग्राम चालू असता, ह्या, गणराज्यातील अेका, महत्त्वाच्या नगराला, शिकंदराने वेढा घातला. त्या नगराचे, नक्की नाव, निश्चितपणे, आढळत नसले; तरी ते, राजधानीचे किंवा तशाच महत्त्वाचे, नगर असले पाहिजे. ते, गणराज्यीय नगर, अटीतटीने, लढत राहिल्याने, ग्रीक सैन्याचा वेढा रेंगाळत राहिला; तापट स्वभावाच्या अलेक्झांडरला, हे, सहन झाले नाही; त्याने शिड्या लावून, शत्रूच्या तटावर, सरळ चढून जाण्याची आज्ञा, ग्रीक सैन्यास देण्याचे योजिले.

पण, मागे, व्यास नदी ओलांडण्याच्या वेळी, झाले त्याप्रमाणे, याही वेळी, ग्रीक सैन्यात, शिकंदराविषयी असंतोष माजत चाललेला होता. नवी युद्धे टाळण्यासाठी, पिछेहाट पत्करून, ग्रीक सैन्य, सिंधुनदीतून घरी जाण्यासाठी परतले होते. पण, त्या, सिंधुनदीच्या जलमार्गाने, ठिकठिकाणी, त्यांना भारतीयांशी लढे द्यावे लागले; आणि शिकंदराने, राज्यतृष्णेपायी, धरलेले आक्रमक धोरण, सोडले नाही; तर, जिवावरच्या लढाया आणखी पुढे, लढाव्या लागणारच! ह्या प्रबळ अशा मालव - शूद्रकांशी छेडलेल्या, युद्धामुळे तर, ग्रीक सैन्याची सहनशक्ती, तुटेतो ताणली गेली हाती;

म्हणून, त्यांच्यातील असंतोष, शिगेला पोचून, शिकंदरची अुघड अुघड, अवज्ञा करावी, अशी, बंडखोरीची कुजबूज होअू लागली.

When the Macedonian soldiers found that they had still on hand a fresh war in which the most warlike nations (गण) would be their antagonists, they were struck with unexpected terror and began again to upbraid the king in the language of sedition. (Curtius as quoted in 'Hindu Polity')

तथापि, शेवटी, शत्रूच्या वेढ्यास, भीक न घालणाऱ्या, त्या, भारतीय नगरावर, त्याच्या तटास शिड्या लावून, शत्रूच्या माऱ्यास न भिता, सरळ आत अुडी घेण्याची, धाडसी आज्ञा, अलेक्झांडरने, सोडली. आपले ग्रीक सैन्य, तसे, साहस करण्यास अळंटळं करते आहेसे पाहून; तटास लावलेल्या, अेका शिडीवर, तो, ग्रीकांचा अतुल पराक्रमी सेनापती, शिकंदर, स्वतः, चढू लागला. त्या दृश्यासरशी, ते सारे ग्रीक सैन्यही, अकस्मात् अुत्तेजित होअून; शिड्यांवर भरभर चढू लागले. तट चढून जाताच, स्वतः अलेक्झांडरने, तटावरून जी अुडी घेतली ती, थेट खाली, त्या नगराचे आतल्या, रणभूमीतच, होय! मागोमाग, ग्रीक सैन्यही, तटावरून अुड्या घेत, नगरात घुसले. भारतीय सैन्यात नि ग्रीक सैन्यात, अेकच रणधुमाळी अुसळली!

अितक्यात, अेका भारतीय वीराने, भात्यातून अेक विषारी शर काढून, धनुष्याच्या प्रत्यंचेस जोडला; आणि जिथे, सेनापतिपदाचे सोनेरी शिरस्त्राण घालून, तुंबळ रण घुमवीत; पुढे घुसणाऱ्या ग्रीक सैन्यात, त्यांचा सम्राट सेनापती, अलेक्झांडर, तळपत होता, ते, लक्ष्य साधून त्या भारतीय वीराने, (ज्याचे नावही अुपलब्ध नाही त्याने,) तो, अमोघ शर सोडला.
तो शर नव्हता; तर, भारताचा मूर्मिमंत सूडच होता! पंतांचे आर्येत, किंचित, जुळवून, बोलावयाचे तर -

**'तो शर गरधरवरसा पविसा रविसा स्मरारिसायकसा ।**
**म्लेच्छहृदंतरी घुसला वल्मीकामाजि**
**नागनायकसा ।।'**

## त्या बाणाने घायाळ होअून अलेक्झांडर रक्ताच्या थारोळ्यात कोसळला

भारतीय वीराने, प्रबळपणे, सोडलेला तो बाण, नेमका, शिकंदरच्या वक्षःस्थळी, घुसला. त्यासरशी, मूर्च्छित होअून, शिकंदर खाली कोसळला. हे पाहताच, अेका ग्रीक सैनिकाने, आपल्या ढालीखाली, त्यास, झाकून घेतले. अलेक्झांडर रणात पडला; मूर्च्छित झाला; असा, अेकच विसंगत हाहाकार, ग्रीक सैन्यात अुडाला. कडोनिकडीने, ग्रीकांनी, रक्ताच्या थारोल्यात पडलेल्या, अलेक्झांडरला, रणातून तसाच बाहेर काढून, आपल्या शिबिरात नेले. तिथे, मोठ्या प्रयासाने, त्याच्या वक्षःस्थलात घुसलेला, त्या, भारतीय वीराचा, तो, भीषण बाण, अुपटून काढला गेला. अलेक्झांडर, जसजसा, शुद्धीवर येअू लागला; तसतसा, ग्रीक सैन्याच्या, जिवात जीव येअू लागला. कित्येक दिवस, तो घाव, भरून येण्यास लागले; तोपर्यंत, शिकंदर, अंथरुणास खिळून होता.
पण, तिकडे हां हां म्हणता, बाबिलोन ते ग्रीसपर्यंत, या घटनेची पहिली बातमी, हीच, गेली; की, युद्धात, भारतीय बाण लागून, शिकंदर ठार झाला! नि यामुळे, गांधार नि अिराणच्या काही भागात, बंडेही झाली. पुढे, 'शिकंदर घायाळ झाला नि आता बरा आहे'; ही, बातमी पोचल्यावर, स्थिरस्थावर झाले.
आणि त्या वृत्तासरशी, भारतात नि विशेषतः, त्या, वीर्यशाली मालव - शूद्रक गणराज्यांत, कृतकृत्यतेची, धन्यता वाटली असल्यास, ते, साहजिकच होते. भारतीय पौरव राजाला, लढाअीत, ग्रीकांनी, जेव्हा, घायाळ केले होते; तेव्हा, त्याचा अलेक्झांडरला, अितका गर्व झाला होता; की, त्याने ते चित्र ठसविलेले अेक नवे नाणे, स्वतःचे दर्पाचे, स्मारक म्हणून, पाडले होते. ते, आजही पाहावयास मिळते; भारताच्या, त्या, अपमानाचे अुट्टे, आज, त्या ग्रीकांच्या राजालाही, रणांगणात, अक्षरशः लोळवून, भारतीय वीरांनी

काढले! भारताचे रक्त सांडणाऱ्या, त्या, म्लेंच्छसम्राट अलेक्झांडरला, त्याचे स्वतःचे रक्त सांडून, भारतीय वीरांनीही, वैयक्तिक दंड, भोगावयास लावला!

भारतीय बाण, ज्याच्या वक्षःस्थळास, भेदून आत रुतलेला आहे; नि त्यामुळे, जो, रणांगणात, स्वतःच्या रक्ताच्या थारोळ्यात, मूर्च्छित पडलेला आहे; अशा, अलेक्झांडरचे, चित्र ठसविलेले, अेखादे नवे सोनेरी नाणे, मालव-शूद्रक गणानेही, पाडावयास, हवे होते! पाडले असेलही क्वचित!

अलेक्झांडरच्या, आजवरच्या, अत्याचारी रणनीतीप्रमाणे, जी त्यास विरोधतील, त्या त्या संस्थानांचा, तो, बहुधा, निर्दयपणे, निःपात करीत, आला होता. पण, अरेस, कारे म्हणून, हटकणारा, प्रतिवीर भेटताच, आपले काम साधून घेण्यासाठी, सुतासारखा सरळपणा दाखविण्याच्या, कलेतही, तो, निष्णात होता! त्याची प्रकृती, बरी होताच, मालव-शूद्रकांच्या, संयुक्त सेनापतीशी, उद्दंड भाषा न योजता, त्याने, शस्त्रसंधीचे बोलणे लावले. हा संधी करण्यासाठी, त्या संयुक्तगणाचे, शंभर प्रतिनिधी निवडले गेले होते. त्या, सर्व, भारतीय प्रतिनिधींच्या सन्मानार्थ, अलेक्झांडरने, आपल्या शिबिरात, अेक, मोठ्या थाटाचा समारंभ करण्याचे ठरविले. मालव-शूद्रकांचे, ते शंभर प्रतिनिधी, ग्रीकांचे शिबिरात येताच, त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. त्या प्रसंगाची, मोठी सुरस नि सविस्तर वर्णने, निरनिराळ्या, ग्रीक अितिहासकारांनी दिलेली आहेत. पण, स्थलाभावी, अिथे, त्यांचा, अगदी संक्षिप्त, अुल्लेख तेवढा केला आहे. ग्रीकांनाही, असाधारण (Uncommon) वाटावे, असे, भरपूर उंचीचे, धष्टपुष्ट नि डौलदार शरीराचे, भरजरी मूल्यवान वेष नि रत्नामोत्यांचे अलंकार, परिधान केलेले असे, ते, शंभर भारतीय वीरपुरुष, प्रत्येकी, आपल्या सुदृढ नि सालंकृत, सोनेरी रथात, बसून आलेले होते. त्यांचेसमवेत, अुत्तम नि मूल्यवान साज चढविलेले, हत्तीही, होते. ग्रीकांना, हत्तींचे, नेहमीच, मोठे आकर्षण वाटे.

ह्याच प्रतिस्पर्ध्यांनी, आपल्या स्वतःवर, प्राणसंकट आणलेले होते; ह्याची जाणीव, मनात सलत असताही, त्या समारंभात, अलेक्झांडरने, वीरोचित अुदारमनस्कता दाखवून, आपल्याही, राजवैभवाचे प्रदर्शन केले. त्या प्रतिनिधीमंडळातील, शंभर प्रतिनिधींसाठी, भोजनसमारंभाचे वेळी, सोन्याची, शंभर पीठे, हारीने मांडली होती. उंची मद्यांची नि पक्वान्नांची रेलचेल अुडाली. निरनिराळ्या, क्रीडोत्सवांची आणि गायनवादननर्तनादी समारंभाची, लयलूट झाली. शेवटी, अलेक्झांडरचा नि त्या मालव-शूद्रकांच्या संयुक्त गणराज्यांचा, संयुक्त संधी, झाला.

त्या काळच्या, ग्रीक लेखकांच्या, ह्या, संधिसंबंधात, विसंगत वर्णनांतून, जो काही समन्वय लागतो, तो, अितकाच की, ह्या, संयुक्त, गणराज्यांशी चाललेले युद्ध, ग्रीकांनी नि भारतीयांनी, अुभयपक्षी, बंद ठेवण्याचे मान्य केले; आणि ह्या, मालव-शूद्रकांच्या गणराज्यांनी, सिंधूनदीतून परतणाऱ्या, अलेक्झांडरच्या नौदलाला, कोणताही, अुपद्रव होअू देअू नये हे, त्या संयुक्त गणराज्यांनी मान्य केले. ह्या दोन गणराज्यांपैकी, मालव गणराज्याच्या, पराक्रमी अस्तित्वाचा, अुल्लेख, भारताच्या पुढच्या अितिहासात, शकयूचींच्या, म्लेंच्छसत्तेशी, झालेल्या युद्धातही, वारंवार येणारा आहेच. त्यावरून, ते मालवगणराज्य, पुढे अनेक शतके, भरभराटीत होते, हे, सिद्ध करीत बसण्याचे, कारणच, अुरत नाही.

भारतीय प्रतिकारकांच्या, आणखी, काही वीरकथा, त्या, प्रकरणीच्या स्थल-कालाचा, स्पष्ट अुल्लेख नसताही, ग्रीक लेखकांनाही, वर्णिल्यावाचून, राहवले नाही. त्यांपैकी, दोन-तीन तरी, येथे, अुदाहरणार्थ देअू.

**'मासागा' येथील छापा'** मासागा येथे, अलेक्झांडरच्या हाती सात सहस्र भारतीयांची, अेक, सशस्त्र टोळी, सापडली. तीत, अनेक स्त्रियाही होत्या. अलेक्झांडरने, त्यांस सांगितले की, जर, तुम्ही, माझ्या सैन्यात भरती व्हाल; आणि माझ्या स्वारीत, माझ्या भारतीय शत्रूंशी, लढाल, तर, मी तुम्हांस, जीवदान देतो; नाहीतर, सर्वांना कापून काढीन; किंवा, दास-दासी म्हणून, धरून नेअीन. त्या टोळीतील पुढाऱ्यांनी, ती अट, मान्य केली. पण, विनंती केली, की, त्या सर्वांचे, अेकमत व्हावे म्हणून, विचारविनिमयासाठी, त्यांना, अेक रात्र अवधी द्यावा. त्याप्रमाणे, शिकंदराने, त्यांना अवधी दिला; आणि ग्रीकांच्या शिबिरासमोर, नअूअेक मैलांच्या, अंतरावरील, टेकडीवर, रात्रभर वसती करण्यास, जाअू दिले. व्हिन्सेंट स्मिथ, आपल्या, अितिहासात लिहितो की, "The Indians being unwilling to aid to foreigners in the

subjugation of their country-men desired to evade the unwelcome obligation." ह्यामुळे स्वतःचा जीव वाचवावा, म्हणून, ग्रीकांसारख्या, परराष्ट्रीय शत्रूंना मिळून, आपल्या राष्ट्राला, पारतंत्र्यात ढकलण्यासाठी, लढण्याचे, पापी कृत्य, केव्हाही, करावयाचे नाही; असे त्या भारतीयांनी, त्या, रात्रीच्या गुप्त बैठकीत ठरविले; आणि भल्या पहाटेसच, ग्रीकांचा डोळा चुकवून, तिकडच्या तिकडे, निसटून जाण्याचा, त्यांनी, कट केला. विसाव्यासाठी, मग, ते थोडा वेळ निजले; पण, त्यांच्या त्या कटाची बातमी, तत्काल, शिकंदरला कळली. त्यासरशी, त्याने, ग्रीक सैन्यास घेऊन, त्या, निद्रित भारतीय दलावर, अकस्मात, छापा घातला; आणि अेकदम, कापाकापीस आरंभ केला. तेव्हा, त्या, सात सहस्त्र भारतीयांत, अेकच, हाहाकार झाला! पण, थोड्याच वेळात, ते, सावध झाले; त्यांनी आपापली शस्त्रे अुपसली; मध्ये पोकळ, असा, अेक गोल व्यूह रचला; त्या पोकळीत, स्त्रिया नि मुले घातली; आणि ते, सारे भारतीय वीर, शत्रूवर तुटून पडले. अनेक स्त्रियाही, आघाडीवर राहून, ग्रीकांशी बेभान झुंजताना, आढळत होत्या. शेवटी, ग्रीकांच्या बहुसंख्य सैन्याकडून, ठार मारले जाअीतो, ते भारतीय वीर, आपल्या राष्ट्राच्या स्वातंत्र्यास्तव, झुंजत राहिले!

"The gallant Defenders met a glorious death which they would have disclaimed to exchange for a life with dishonour." (Early History of India by V. D. Smith, Page 51)

**अग्रश्रेणी :** ह्या, भारतीयांच्या लहानशा, पण, स्वतंत्र प्राजकानेही, शरण न जाता, शिकंदराचे प्रचंड नौसैन्य, सिंधूनदीतून परत जात असता, क्षात्रधर्मानुसार, त्याच्याशी, प्राणांतिक संग्राम केला. त्यांच्या राजधानीवर, ग्रीक सैन्य चालून आले; तेव्हा, त्या भारतीय लढवय्यांनी, मार्गोमार्गी, आडोसे अुभारून, मायाची स्थले निर्मिली; आणि पावलोपावली, अशी लढत दिली; की, शिकंदरला, त्याच्या स्वतःच्या, ग्रीक सैनिकांचे बळी दिल्यावाचून, त्या नगरात, प्रवेश करता आला नाही. शेवटी, "According to Curtius, when those brave fellows could not further resist the odds, they (the Agrashrenees) set their houses on fire and their wives and children and all threw themselves into the flames !"

कर्टिस, हा युरोपियन ग्रंथकार, लिहितो की, ग्रीकांच्या, बहुसंख्य सैन्याला, हटविणे, जेव्हा, अशक्य झाले तेव्हा, त्या, झुंजार अग्रश्रेणींनी, आपल्या, साऱ्या घरादारांना, आग लावून दिली; आणि त्यांच्या शूर स्त्रिया, मुले-मुली, सर्वजण, त्या, ज्वालाकल्लोळात, अुड्या घेअून, भस्मसात झाले! म्हणजे, आजच्या भाषेत, त्यांनी जोहार केला.

## हाच तो जोहार!! – जय हर!

आपल्याकडे, सर्वसामान्यपणे, असे समजले जाते की, 'जोहार'ची ही तेजस्वी चाल, रजपुतात तेवढी प्रचलित असे. परंतु, ग्रीक लेखकांनी वरील अग्रश्रेणींसारख्या पराक्रमी लोकांची, जी अुदाहरणे आश्चर्यचकित, होअून दिली आहेत; त्यावरून, हे, अुघड होते की, रजपूत, ह्या नावाचाही, अुदय होण्यापूर्वीपासून, आपल्या, भारतीय योद्ध्यांच्या वर्गातून, ही, 'जोहार'ची तेजस्वी परंपरा, चालत आलेली आहे. 'जोहार', हा शब्द, अलीकडचा. तो, 'जय हर!' ह्या, रणघोषणेपासून निघाला असावा; विलय नि मरणमारणाचे थैमान चालत असलेले रणांगण, ह्यांची भारतीय देवता हर! महादेव! म्हणूनच, 'जय हर', ही तुमुल रणगर्जना करीत, भारतीय सैन्ये, बेभानपणे लढत. मराठ्यांचीही, युद्धगर्जना होती; 'हर हर महादेव' हीच! लढण्याची, पराकाष्ठा केली असताही, जेव्हा जेव्हा, परधर्मीय वा परराष्ट्रीय, अशा, आततायी शत्रूच्या हातून सुटण्याची, सारी शक्यता, नष्ट होअी; तेव्हा, पाडाव होअून, त्या, परशत्रूच्या सत्तेखाली, त्यांच्या दास-दासी होअून किंवा परधर्म स्वीकारून जिवंत राहण्यापेक्षा स्वधर्म, स्वराष्ट्र, स्वत्व ह्यांच्या सन्मानरक्षणास्तव, स्वयं-हौतात्म्य पत्करणारे, असे, आमच्या भारतीय युद्धतंत्राचे, हे, अग्न्यस्त्र, हा जोहार, हेच, अंतिम नि अमोघ, अस्त्र असे! लढाअू वयाचे, सर्व वीर पुरुष, रणांगणात, शत्रूस मारीत मारीत मारले जाताच, त्यांच्या, शतावधी वीरांगनांनी, आपली मुलेबाळे, छातीशी कवटाळून, आपणच, पेटवून दिलेल्या अग्निनारायणाच्या, ज्वालाकल्लोळात 'जय हर! जय हर!' गर्जत, पटपट अुड्या टाकून, भस्मसात होअून जायचे! ह्याचे नाव जोहार! ही तोंडाची गोष्ट नाही; वीरश्रीची, पराक्रमाची, स्वत्वरक्षक, क्षात्रधर्माची, प्राणांतिक, पराकाष्ठा आहे ती!

ज्यांनी ज्यांनी, अशा, जोहाराच्या अग्निकल्लोळांची कवचे, धारण केली, त्यांना त्यांना, बाटविण्याची, दास करण्याची, स्पर्श करण्याची सुद्धा, शक्यता, त्यांचा पाठलाग करीत येणाऱ्या, एखाद्या, शिकंदराला, अल्लाउद्दिनाला, सलिमला तर काय, पण, सैतानाला सुद्धा, उरलेली नसते! त्या, अग्निकल्लोळाच्या कक्षेत येताच, त्या चटक्यासरशी, तो शत्रू, हतबल, हताश, हिरमुसला होतो!

भारतात, लढत असता, काही ठिकाणी, ग्रीक सैन्याच्या हाती पडण्याची, मानहानी सोसण्यापेक्षा, जेव्हा, भारतीय वीर-वीरांगनांनी, असे, अंतिम रणकंदन करून सांघिक अग्निप्रवेश केले, तेव्हा, ते अद्‌भुत दृश्य पाहून, ग्रीकांची सैन्ये, आश्चर्यचकित झाल्याची, जी वर्णने, आहेत, त्यातच, वरील 'अग्रश्रेणी' ह्या, शूर जनपदाचीही, गणना होते.

**ब्राह्मणक जानपद :** शेवटी, अलेक्झांडरचे नौदल, असे लढत लढत, जेव्हा, सिंधू नदीच्या मुखापाशी आले, तेव्हा, तिथे असलेल्या, भारतीय स्वतंत्र गणराज्याशी, त्याची, गाठ पडली. ही गणराज्ये किंवा 'जनपदे', स्वतंत्र नि शूर असली, तरी, लहान लहान होती. अलेक्झांडरच्या, बहुसंख्य नि बलाढ्य सैन्याशी, समबलाने, लढू शकेल, असे, त्यांच्यात कोणीही नव्हते; तथापि, त्यांच्यातील, 'ब्राह्मणक' जनपदाने, शरण न जाता, ह्या परराष्ट्रीय शत्रूशी, दोन हात करावयाचे ठरविले. पाणिनि, ज्या, 'ब्राह्मणको नाम जनपदः' चा, उल्लेख, करतो, तेच, हे, जनपद होय; असे, डॉ. जयस्वाल म्हणतात. मागे, पंचनदात लढत असतानाच ह्या 'Philosophers' वर्गावर, अलेक्झांडरने, कसा डंख धरलेला होता; ते, वर सांगितलेलेच आहे. त्याच ब्राह्मणवर्गाचे, हे, छोटेसे राज्य आहे; हे ऐकताच, अलेक्झांडरने, त्यांच्यावर विशेष कडकपणे, सूड उगविण्याचे ठरविले. अलेक्झांडरवर लिहिलेल्या, आपल्या चरित्रात, Plutarch म्हणतो:

"These philosophers were specially marked down for revenge by Alexander as they gave him no less troubles than the mercenaries, they reviled the princes who declared for Alexander and encouraged free states (in India) to revolt against his authority.' त्या, छोट्याशा जानपदाने, स्वराष्ट्राच्या स्वातंत्र्यास्तव, मोठ्या बाणेदारपणाने, ग्रीकांशी शेवटपर्यंत, झुंज दिली.

**पट्टनप्रस्थ :** ज्याला, आज मुसलमान, सिंध हैद्राबाद म्हणतात, त्या नगराला, त्याकाळी, पट्टनप्रस्थ म्हणत. संस्कृतमध्ये, समुद्रकाठच्या किंवा मोठ्या नदीमुखांचे काठी, असलेल्या, नगरांना, बहुधा, पट्टन म्हणत. पट्टन म्हणजे, इंग्लिश 'Port' क्वचित, हा, इंग्लिश Port शब्द, त्या, संस्कृत शब्द 'पट्टन', शब्दापासून, आलेला असावा. शिकंदर, अगदी, समुद्राचे सन्निध येऊं लागला, तेव्हा, हे पट्टनप्रस्थाचे लहान राज्य, शिकंदरला, शरण जाण्यासही मान्य नव्हते; आणि त्याच्या बलाढ्य सेनेशी, लढण्याचे सामर्थ्य, आपल्यात नाही, हेही, ते जाणून होते; ह्यास्तव, त्या जनपदाने, तिसरी अेक तोड काढली. त्या साऱ्या जनपदाने, सामुदायिक देशत्याग केला; नि घरदार, मत्ता नि मातृभूमी, अशा, सर्वस्वास, अत्यंत दुःखित हृदयाने, सोडून; ते स्वातंत्र्यप्रिय जनपद, देशांतरी जाऊन, निवसू लागले.

## सिंधुसागरास पोचताच
## शिकंदर स्वदेशास परततो

सिंधुनदी समुद्रास मिळते, त्या, समुद्रभागास, 'सिंधुसागर', हे नाव देणे, उचित होय. जसे, तिकडे, आपल्या पूर्वेस, 'गंगासागर', हे, परंपरागत नाव आहे; तसेच अिकडे, आपल्या पश्चिमेस, 'सिंधुसागर', हे, जोडनाव खुलून दिसते.

शिकंदराचे नौदल, सिंधुसागरात पोचताच, शिकंदराने, आपल्या सैन्याचे, दोन भाग केले. एक भाग, आज ज्याला बलुचिस्थान म्हणतात; त्या बाजूने, भूमार्गाने, अिराणकडे, परत धाडला. शिकंदराचे, सारेच सैन्य, भारताच्या स्वारीत, दमून भागून, त्रासून, गेलेले होते. त्यातही, त्याकाळी, बलुचिस्थानाकडील हा भाग, अतिबिकट, अरण्यमय नि त्या ग्रीकांना, अज्ञात असल्यामुळे, शिकंदराचे, तिकडून गेलेले सैन्य, कसे तरी, पडत झडत, अिराणास जाऊन पोचले. अिकडे, आपल्या सैन्याचा, दुसरा भाग, स्वतःसमवेत घेऊन, अि.स.पू. ३२५ व्या वर्षी, शिकंदर, समुद्रमार्गाने, अिराणास जाऊन पोचला. पूर्वीचे, सारे अिराणी साम्राज्य, अलेक्झांडरच्या साम्राज्यातच, आता, मोडत असल्यामुळे, तेथील, आपली राजधानी, जी बाबिलोन, तिथे, तो परत गेला; पण, तेथून, दोन वर्षांपूर्वी, भारतावर चालून येण्यासाठी, जेव्हा, तो, वीरश्रीच्या अवसानात,

'भारतीय सम्राट' म्हणून, मिरवीत, परत येण्यासाठी, निघाला होता; तसा काही, बाबिलोनला परत येअू शकला नाही! भारतसम्राटासारखा तर नव्हेच; पण, सम्राटासारखासुद्धा, नाही; तर, तो परत आला, अेखाद्या, दमून भागून, मनोभंग होअून, अर्ध्याच, स्वारीवरून परत आलेल्या, एखाद्या सेनापतीसारखा!

## अिराणी साम्राज्यासारखे भारतीय साम्राज्य कोपराने खणता आले नाही!

अलेक्झांडरच्या, ह्या मनोभंगाचे कारण, असे होते; की, ग्रीक लोकांना, त्यावेळचे, त्यांच्या स्वत:पेक्षा, अत्यंत विस्तृत असलेले, अिराणी साम्राज्य, हेच काय ते, सर्वश्रेष्ठ साम्राज्य, म्हणून, परिचित होते. जेव्हा, अलेक्झांडरसारख्या, आपल्या, अलौकिक सेनापतीसह, त्या साम्राज्यावर, ते, चालून गेले; आणि दोनतीन लढायातच, ते, दरायसाचे सारे विस्तृत साम्राज्य, पत्त्यांच्या तंबूसारखे, कोसळून, ग्रीकांच्या पायाशी पडले; तेव्हा, त्या, अद्‌भुत विजयासरशी, ग्रीकांना, वीरश्रीच्या अुन्मादात, असे, वाटू लागले; की, आपला सेनानी, हा, देवसेनानीसारखाच, अजिंक्य आहे. अलेक्झांडरही, त्या 'ग'च्या बाधेपासून, अलिप्त, राहू शकला नाही. त्याला, त्या, आपल्या, विजयी ग्रीक सैन्याचे बळावर, जगज्जेता होण्याची, हाव, भरली. अिराणचे पुढेच, भारत, म्हणून, तो, भारताला अिराणाप्रमाणेच, लगोलग, जिंकून, भारतसम्राट होण्यासाठी, चालून आला. त्याला वाटले; की, विस्तृत नि अवाढव्य दिसणारी, ही, भारतीय राज्ये नि साम्राज्येही, ह्या, अिराणी साम्राज्यासारखीच, आतून पोकळ नि भुसभुशीत असणार! अिराणाप्रमाणेच, त्यांनाही, आपण, कोपराने खणू शकू!

पण, अनुभव अगदी अुलटा आला! भारतात, त्याला, पदोपदी, कट्टर विरोध झाला. झालेल्या लढायात, जरी, तो, लढाअी, अशी, हरला नाही तरी, जिंकता जिंकताच, तो, नि त्याचे ग्रीक सैन्य, हैराण झाले. अिराणाप्रमाणे, सारे भारत, चुटकीसारखे पादाक्रांत करण्याचे, ग्रीकांचे, चढेल बोल फोल ठरले; आणि शेवटी, भारताच्या, अेका, सिंधुसीमेवरील, पट्टी तेवढी जिंकून, त्याला, परत, स्वदेशी फिरावे लागले.

अलेक्झांडरचा, असा मनोभंग नि काही अंशी मानभंगही, झाला होता; पण, त्या पराक्रमी सम्राटाचा, धैर्यभंग, मात्र झाला नव्हता. जे, जिंकले आहे त्याची, नीट, व्यवस्था लावून, ते, विजित भारतीय प्रदेश, आपल्या साम्राज्यात, सीरिया, अिराण, बाबिलोनप्रमाणेच, पचवून, रिचवून, मग, भारतावर, कालांतराने पुन्हा चालून जावे; अशी खुमखुमी, शिकंदरला, वाटतच होती.

## भारताच्या जिंकलेल्या भागात शिकंदर आपले क्षत्रप नेमतो

हिंदुकुशापासून, गांधार तक्षशिलेपर्यंतचा प्रदेश, व्यास नदीपर्यंतचा, अर्धा पंचनद नि वितस्तेच्या संगमापासून, तो, सिंधुकाठचा प्रदेश, अितका, भारताचा भाग, शिकंदराने, आपल्या साम्राज्यास जोडण्याची, घोषणा केली. तक्षशिलेचा, भारतीय राजा अंबुज, ह्याला, शिकंदराने हिंदुकुश भागाचा, आपला, क्षत्रप (Governor) नेमले. पंचनदाचा; आपला क्षत्रप, म्हणून, राजा पौरव ह्याची, नियुक्ती केली. तिसरा, जो, सिंधु वितस्तासंगमापासून, सिंधूसागरापर्यंतचा, भाग होता; त्यावर, आपल्या विश्वासाचा फिलिप आणि निकियान, ह्या दोन ग्रीक सेनापतींची, नेमणूक केली. त्यांच्या हाताखाली, त्याने, फिरती, ग्रीक सैनिक पथकेही, ठेवली होती. ग्रीकांची काही गावेही, भारतीय प्रदेशात, त्याने, वसविली होती; आणि त्याच्या अितरत्रच्या पद्धतीप्रमाणे, 'अलेक्झांड्रिया' नावाचे, ग्रीकादिक नागरिकांचे, अेक नगरही, तक्षशिलेच्या दिशेकडे वसविले होते.

## 'शिकंदरचा मृत्यू'

भारतातील, जिंकलेल्या प्रदेशांची, ही, व्यवस्था लावण्याचे, शिकंदर ठरवितो न ठरवितो, तोच, त्याला कुणकूण लागली; की, त्या प्रदेशातील, अनेक भारतीय जनपदे, आपण, 'जिंकलेले' आहोत, हेच, मानावयास सिद्ध नाहीत. सिकंदर, सिंधमध्ये असतानाच, त्याच्या सत्तेविरुद्ध गांधारप्रांतात, भारतीयांचे बंड झाल्याची, वार्ता आली होती. तो, गांधारकडे, नवी नि भरपूर, ग्रीक सेना, धाडण्याचे बेततातही होता; पण, पंचनदामध्ये, शिकंदरची सत्ता, झुगारून देण्याचा, भारतीयांचा कट शिजतो आहे; अशीही, चिंताजनक कुणकूण, सिंध देशातून, शिकंदर, ससैन्य परत फिरण्याचे आधीच, कानावर आली असताही,

शिकंदरला, झटपट, काही करता येअीना. त्याच्या, भारतावरील, स्वरीच्या झालेल्या दगदगीने, त्याचे, सैन्यच काय ते थकलेले होते; असे नाही; तर, स्वतः, त्याच्याही प्रकृतीवर, ताण पडलेला होता. त्यातच, त्याचे अतिरिक्त मद्यपानाचे व्यसनही, बळावले होते. त्यामुळे, अकस्मात, प्रकृती बिघडून, अि.सनपूर्व ३२३ व्या वर्षी, म्हणजे, तो हिंदुस्थानातून ससैन्य परत गेल्यावर, अवघ्या, दीड-दोन वर्षांचे आतच, ग्रीकांचा, तो पराक्रमी सम्राट नि सेनापती, अलेक्झांडर, बाबिलोन येथे, मरण पावला.

## भारतीय राजकारण्यांचे राष्ट्रीय षड्यंत्र

अलेक्झांडरची पिछेहाट होअून, तो, सिंधु नदीचे मागे, परत फिरू लागला; त्याच वेळी, पंचनदात, ग्रीकांविरुद्ध, काही भारतीय राजकारणी पुरुषांचे, राष्ट्रस्वातंत्र्यार्थ, अेक, षड्यंत्र रचले जात होते. त्या, षड्यंत्राचा उद्देश, ग्रीकांच्या हातात पडलेला, सीमाप्रदेश, मुक्त करण्यापुरताच, काय, तो नव्हता; तर, साऱ्या भारताचा, राजकीय कायापालट करण्याचा आणि त्याप्रीत्यर्थ, अेका, प्रचंड अंतर्गत राज्यक्रांतीचाच, सूत्रपात, करण्याचा होता. शिकंदर मेला नसता, तरीही, ते षड्यंत्र, हाती घेतलेले, ते, राष्ट्रीय राज्यक्रांतीचे भव्य, भीषण साहस, करणारच होते; तथापि, शिकंदराच्या, ह्या अकस्मात, झालेल्या मृत्यूमुळे, त्या, भारतीय राजकारण्यांना, अेक अनपेक्षित सुवर्णसंधीच, मिळाल्यासारखे, होअून, त्यांनी, त्या ग्रीकांची राज्यसत्ता, अुखडून टाकण्यासाठी, तत्काळ, अुठावणी केली.

## ग्रीक गव्हर्नरांचा शिरच्छेद

ग्रीक सत्तेचे, मुख्य राजप्रतिनिधी म्हणून, शिकंदराने, निकियान नि फिलिप ह्या दोघांना, भारतात ठेवलेले होते; हे, वर सांगितलेच आहे. शिकंदरच्या, मृत्यूची बातमी येताच, अश्विनी नावाच्या गणराज्यात, त्या दोघा ग्रीक गव्हर्नरांपैकी, फिलिप, ह्याला, अकस्मात गाठून, भारतीयांनी, त्याचा शिरच्छेद केला; आणि त्याच्या लहानशा, ग्रीक पथकाचीही, तीच वाट लावली. अितक्यात, दुसरा अुरलेला ग्रीक गव्हर्नर, जो, निकियान, त्यालाही, कोणा भारतीयाने, अकस्मात, झेप घालून, ठार मारले. त्यासरशी, सिंधूच्या, ह्या तीरास, असलेल्या, ज्या ज्या, भारतीय पंथांनी, गणराज्यांनी, राज्यांनी, शिकंदराचे आधिपत्य मानले होते; त्यांनी त्यांनी, ते, झुगारून देअून, आपापले, राजकीय स्वातंत्र्य, पुन्हा, घोषित केले! ग्रीकांच्या वसती, ग्रीकांचे ध्वज, ग्रीकांच्या राज्याचे चिह्न म्हणून, जे जे, जिथे दिसले; त्याचा त्याचा, तिथेच, नायनाट करून टाकण्यात आला. पंचनदापासून, तो, सिंधप्रांतसुद्धा, सिंधुनदीच्या सीमापट्टीचा, सिंधुसागरापर्यंतचा, अिकडचा, जो भारतीय भाग, ज्याला, शिकंदराने 'जिंकलेला' म्हणून, ग्रीक साम्राज्यात, 'यावच्चंद्रदिवाकरौ' म्हणून, समावेशिलेला होता; तो, असा, चुटकीसरशी स्वतंत्र झाला; शिकंदराचा मृत्यू होताच, अवघ्या, सहा महिन्यांच्या आत!

शिकंदराने, ग्रीस, सीरिया, पर्शिया, बाबिलोन, अिजिप्त, असे देश, राज्ये नि साम्राज्ये जिंकली. तेथे, आपल्या नावाची, नगरे, स्थापिली. ग्रीकांच्या वसती, (Colonies) वसविल्या. त्याच्या साम्राज्याच्या वाटणीनंतर, त्याच्या, ग्रीकाधिकारी वर्गाची राज्ये, बाबिलोनप्रभृती, त्या त्या प्रदेशात, शतकानुशतके, चालली. अजूनही, अितर देशात, 'अलेक्झांड्रिया', नावाची नगरे, अस्तित्वात आहेत, त्याचे नाव तर, साऱ्या युरोपच्या, प्राचीन अितिहासातून, 'दी ग्रेट', ह्या पदवीस पोचलेले आहे.

पण भारतात? सतत दोन वर्षे, अनेक संगरात, लढून, झुंजून, झगडून, लाखो ग्रीकांचे नि भारतीयांचे रक्त सांडून, ज्या काही, भारतीय प्रांतांना, आपण, आता, नित्याचे जिंकले, असे समजून, अलेक्झांडरने, त्याच्या ग्रीक साम्राज्यास, जोडून टाकले; त्या प्रांतांनी, शिकंदरची सत्ता, त्याचा ध्वज, त्याच्या ग्रीकांच्या वसती, (Colonies), त्याच्या विजयाचे चिह्न नि चिह्न अुखडून टाकले; अवघ्या वर्ष, सहा महिन्यांच्या आत!

शेवटी, त्याने स्थापिलेल्या, अलेक्झांड्रिया, नगराचा तर काय, पण, अलेक्झांडरच्या, स्वतःच्या नावाचा सुद्धा, कोणताही थांगपत्ता, भारतीय अितिहासात, सापडेनासा झाला. जणू, अलेक्झांडर ह्या नावाच्या, युरोपमध्ये, 'दी ग्रेट', म्हणून, गाजू शकणाऱ्या, कोणा म्लेंच्छ राजाची स्वारी, भारतीय सीमेवर, झालीच नव्हती! वैदिक वा जैन वा बुद्ध, अशा, कोणत्याही, भारतीय प्राचीन ग्रंथातून, अलेक्झांडरचा, अुल्लेख सुद्धा, अजून, आढळलेला नाही.

व्हिसेन्ट स्मिथ, हा, आपल्या सुप्रसिद्ध 'Early History of India' ह्या ग्रंथात लिहितो.

"All these proceedings prove conclusively that Alexander intended the permanent annexation of those (Indian) provinces to his empire... But within three years of his departure from India (from 325 B.C. to 322 B.C.) his officers in India were ousted, his garrisons destroyed and all traces of his rule had disappeared. The colonies which he founded in India, no root. His campaign, though carefully designed to secure a permanent conquest was in actual effect no more than a brilliantly successful raid on a gigantic scale which left upon India no mark save the horrid sears of a bloody war India remained unchanged. She continued her life of splendid isolation and soon forgot the passing of the Macedonian Storm. No Indian author Hindu, Buddhist or Jain makes even the faintest allusion to Alexander or his deeds." (Page 110)

भारतीय राजकारणाच्या, ज्या, राष्ट्रीय षड्यंत्राच्या, स्फोटासरशी, अलेक्झांडरच्या, परराष्ट्रीय पारतंत्र्यातून, पंचनद ते सिंधूपर्यंतच्या, भारतीय प्रदेशांना, असे, अवघ्या, वर्ष - सहा महिन्यांच्या आत, स्वतंत्र करण्यात आले; त्या षड्यंत्राचे, प्रमुख नेते कोण कोण होते; त्यांची नावे, इतिहासास ठाऊक नाहीत. तथापि, त्यांतील दोघा पुरुषांची नावे मात्र, भारतीय इतिहासात अजरामर झालेली आहेत. अलेक्झांडर, तक्षशिलेपर्यंत, जेव्हा, आला; तेव्हाचे ते वृत्त, वर सांगितले आहे; तिथे, ज्या दोघा पुरुषांचा नामनिर्देश आम्ही केलेला आहे; तेच, ते दोघे पुरुष होत. पहिला, म्हणजे, तक्षशिलेच्या विद्यापीठात, युद्धशास्त्राचे शिक्षण घेऊन, नवथरच बाहेर पडलेला तो, तरतरीत तरुण चंद्रगुप्त; आणि दुसरा म्हणजे, त्या विद्यापीठात, पूर्वी आचार्य असलेला, नि नंतर, त्या तरुण चंद्रगुप्ताला राज्यक्रांतीचे नि राज्यशास्त्राचे, वस्तुपाठ सक्रियरीत्या शिकविणारा आर्य चाणक्य! यापुढचे साऱ्या भारताचे, प्रकट नेतृत्व तेच महापुरुष करणार असल्यामुळे, त्याचा पूर्वपरिचय अिथेच करून दिला पाहिजे.

## चंद्रगुप्ताची कुलकथा

जगाच्या प्राचीन इतिहासातील बहुतेक थोर पुरुषांप्रमाणेच, चंद्रगुप्त नि चाणक्य ह्यांच्या चरित्रांवर, दंतकथांची नि कल्पितांची, दाट पुटे चढलेली आहेत. त्यांपैकी अनेक कथा, निदान मनोरंजनासाठी तरी ज्यांना वाचाव्याशा वाटतील, त्यांनी राधाकुमुद मुकर्जी, यांचे 'Chandragupt Maurya & his Time' हे पुस्तक वाचावे. वैदिक, जैन, बौद्ध, ह्यांच्या, प्राचीन वाङ्मयात विखुरलेल्या ह्या, चंद्रगुप्त चाणक्याविषयीच्या, अनेक कथांतून, जे आमच्या मते ह्या दोन महापुरुषांच्या पूर्वचरित्राविषयी, अैतिहासिक असे वृत्त वाटते; तेवढेच अिथे, देत आहो.

ज्या जातीत, गौतमबुद्ध जन्मला, त्या शाक्य जातीवर काही संकट गुदरल्यामुळे अेके काळी त्यांच्या काही टोळ्या दूर प्रांतात जाऊन निवसल्या. शाक्य, आपणास क्षत्रिय समजत; तथापि, आपत्काल समजून, ती निर्वासित झालेली शाक्यकुटुंबे, तिकडे उपजीविकेसाठी अितर व्यवसाय करू लागली. त्या, रानात मोर फार असत. त्यांना पाळण्याचा नि विकण्याचा, व्यवसाय ही मंडळी करू लागली. म्हणून, त्यांना ‘मोरिया’ असे नाव पडले. त्यांची अेक पोटजातच बनली. ह्या, ‘मोरिया’ जातीतील एक कुटुंब, पुन्हा, पाटलीपुत्र नगराच्या आसमंतात, परतले होते. त्यातील ‘मुरा’ (मथुरा) नावाच्या अेका महिलेचा, पाटलीपुत्राच्या राजवाड्यातील अंत:पुरात, कोणत्या तरी कारणाने, प्रवेश झाला; आणि त्या वेळचा, नंदसम्राट महापद्मनंद, अुपाख्य धनानंद, ह्याची दासी म्हणून, ती नांदू लागली. त्या नंदसम्राटापासून, त्या मुरा दासीला जो पुत्र झाला, तोच पुढे प्रख्याती पावलेला सम्राट चंद्रगुप्त होय.

तथापि, ही कुळकथा चंद्रगुप्त पुढे जेव्हा सम्राट झाला; तेव्हा त्याला हीनपणा देणारी आहे; असे वाटूनच की काय, काही ग्रंथातून पुढे कोणीतरी तीत अशी सुधारणा केली आहे; की, मुरादेवी ही नंदसम्राटाची दासी नव्हती; तर, ती त्याची अेक, विवाहबद्ध राणी होती. म्हणजे चंद्रगुप्त हा दासीपुत्र नसून राज्ञीपुत्र होता.

परंतु, काही ग्रंथांतून दिलेल्या, तिसऱ्या अेका दंतकथेने तर, ह्या दोन्ही मूळ कथांवर ताण करून लिहिले आहे की, मुरेचा आणि नंदसम्राटाचा, कोणताच संबंध नव्हता. तिला तिच्या जातीच्या यजमानापासून अेक पुत्र झाला तोच

चंद्रगुप्त. पुढे आर्य चाणक्याच्या स्फूर्तीने नि साहाय्याने नि स्वतःच्या पराक्रमाने, त्याने, ह्या आपल्या निर्धन, सामान्य नि अप्रसिद्ध, मातापित्यांचे पांग फेडले; आणि नंदवंशाचे हातून, सम्राटपद छिनावून 'मौर्य', राजवंशाची स्थापना केली.

कोणत्याही मनुष्याचे महत्त्व वा लघुत्व त्याच्या स्वतःच्या प्रकट गुणांवरून न ठरविता, तो कोणत्या वर्णात, जातीत वा कुळात, जन्मला; ह्यावरून ठरविण्याची खोड सर्वच, समाजांमध्ये, या वा त्या प्रमाणात आढळून येते. त्यामुळेच, काळ लोटत जातो; तशा त्याच्या कुलवृत्तांताविषयी, अशा लोककथा नाटक, काव्य, कादंबयांतून किंवा तोंडोतोंडी, प्रसृत होतात. चंद्रगुप्ताला हीनत्व वा महत्व देण्यासाठी वर दिल्या आहेत; त्या वाचून, अितरही दंतकथा आहेत; पण वरील कारणांसाठी, त्यांना अुल्लेखण्याचे सुद्धा अिथे कारण नाही, स्थलही नाही.

चंद्रगुप्त, दासीपुत्र होता; तो क्षत्रिय नव्हता, तरी काय झाले? 'सूतो वा सूतपुत्रो वा यो वा को वा भवाम्यहम्। दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं तु पौरुषम्।।' हे अुत्तर ज्या बाण्याने, महावीर कर्णाने, त्याच्या 'सूतपुत्र' म्हणून अुपमर्द करणाऱ्यांना, दिले; त्याच यथार्थ स्वाभिमानाने चंद्रगुप्तही अुत्तरू शकतो की, म्लेच्छांच्या, त्या ग्रीकांच्या, सम्राटाची नि सेनापतीची पायधूळ मस्तकी धारण करणाऱ्या, तुम्हा, केवळ नामधारी अशा 'जातिवंत', राज्ञीपुत्रांपेक्षा नि क्षत्रियांपेक्षा, त्या, म्लेंच्छांची रणांगणात, धूळधाण अुडविणारा, खड्गधारी असा मी, 'गुणवंत', चंद्रगुप्तच, खराखुरा क्षत्रिय, आहे!

मुरेचा पुत्र, तो मौर्य; म्हणूनच, चंद्रगुप्ताला मौर्य म्हणत. त्याच आपल्या मातृकुलागत अुपपदाचा अभिमान धरून, चंद्रगुप्ताने, सम्राट पद मिळताच, आपल्या, राजवंशाला, मौर्यवंश म्हणविले; आणि आपल्या जन्मदात्रीचे, मुरादेवीचे नाव भारतीय इतिहासात, चिरंतन, करून ठेवले. त्याच्या आअीची, जी जात, मोरिया (मोर पाळणारी) म्हणून, वर सांगितलेच आहे; तीच मौर्यसम्राटही, आपली जात मानीत. मौर्यसम्राटाचे कुलदैवतही, मोर, हेच मानले जात असे. ह्याला, आता शिलालेखांचा, पुरावाही सापडला आहे. नंदनगडला, सापडलेल्या अशोकस्तंभावर त्याच्या तळाशी, मोराचे चित्र कोरलेले आहे. त्याचप्रमाणे सांचीच्या सुप्रसिद्ध स्तूपावरही सम्राट अशोकाच्या ज्या चरित्रकथा कोरलेल्या आहेत त्यांतून अशीच मोराची चित्रे कोरलेली आढळतात.

## मगधसम्राट महापद्मनंद

त्या वेळी, मगधाच्या, विस्तृत साम्राज्यावर, महापद्मनंद हा, राज्य करीत होता. त्याच्या अंगच्या अनेक दुर्गुणांमुळे, तो लोकांना अत्यंत अप्रिय झालेला होता. त्याच्या अनावर धनतृष्णेपायी ती तृष्णा पुरविण्यास द्याव्या लागणाऱ्या करांच्या भाराखाली, प्रजा रडकुंडीस आली होती. तिच्यात असंतोष माजलेला होता. ह्या त्याच्या धनतृष्णेचा, अुपहास करण्यासाठी, त्याला 'पद्मनंद' न म्हणता, लोक त्याला 'धनानंद'च म्हणत. सम्राटपदाला शोभेल, असा अेकही गुण त्याच्यात नव्हता. केवळ मागच्या सम्राटाचा भाअू म्हणून, तो राज्यपदावर चढला होता. जेव्हा अलेक्झांडर भारतावर चालून आला नि मगधावर स्वारी करून मी भारतसम्राट होणार म्हणून अुघड अुघड घोषणा करू लागला, तेव्हाच जर ह्या मगधाचा सम्राट म्हणविणाऱ्या, महापद्मनंदाने ते आव्हान स्वीकारून अलेक्झांडरला पंचनदातच गाठले असते आणि आपल्या तेथील भारतीय प्रदेशांना, ग्रीकांचा पाडाव करून मुक्त केले असते, निदान तसा बलवत्तर प्रयत्न जर केला असता तर त्याच्या सम्राटपणाला काही अर्थ अुरला असता! पण त्याने हूं की चूं, केले नाही. अलक्झांडरने, केलेला अुपमर्द निमूटपणे गिळला. ह्या त्याच्या भित्रेपणाचा स्वाभिमानी नि स्वराष्ट्राभिमानी अशा, प्रत्येक भारतीयाला, तिटकारा आला होता. तो भित्रा असे; म्हणूनच, तो कपटीही, होत गेला. निःस्वार्थी नि राष्ट्राभिमानी अशा, राजकारण्यांचा, तो द्वेष करी. लोकांत, त्यांची पत अुतरावी; म्हणून, अशा राष्ट्राभिमानी पुढाऱ्यांचा, तो अुपमर्द करी. कर्ता मनुष्य पाहिला; की, त्याच्या कपाळास आठ्या पडत.

ह्याच, सम्राट महापद्मनंदापासून, मुरा दासीला, चंद्रगुप्त हा पुत्र झाला होता. चंद्रगुप्ताच्या लहानपणीच्या काही कथा आहेत. पण त्या थोड्या नि केवळ दंतकथा आहेत. निश्चित, जे दिसते ते अितकेच की, तरुण चंद्रगुप्तासारखा तेजस्वी, तरतरीत, साहसी, महत्त्वाकांक्षी, दासीपुत्र असताही, राजपुत्राचे अधिकार गाजवू पाहणाऱ्या आपल्या ह्या पुत्राचा, त्या भेकड, पण धूर्त, अशा सम्राट महापद्मनंदाला असा धाक वाटू लागला की, न जाणो, आपल्या विरुद्ध असणाऱ्या, प्रबळ राजकारण्यांचा गट, ह्या आपल्या अुच्छृंखल दासीपुत्राला, हाती धरून आपल्यालाच सिंहासनावरून खाली ओढण्यास कचरणार नाही!

त्याच्या, नंदवंशाने मगधाच्या मूळच्या शिशुनाग राज्यवंशाचा अुच्छेद करून कसे राज्य बळकावले, ते वृत्त त्या महापद्मनंदाच्या, डोळ्यांसमोरच होते. अशा कोणत्यातरी भयावह कारणामुळे, खटका अुडून, त्या तरुण चंद्रगुप्ताला, सम्राट महापद्मनंदाने, मगधराज्यातून सीमापार होण्याची, शिक्षा दिली. यापुढचा वृत्तांत, अगदी, अज्ञात आहे. तरुण चंद्रगुप्त, जो, पुन्हा प्रकट होतो, तो तक्षशिलेच्या विद्यापीठात, राज्यशास्त्र नि युद्धशास्त्र प्रभृती विद्यांचे, शिक्षण घेत असलेला, अेक राजकुमार म्हणूनच होय. तिकडे, महापंडित म्हणून ख्याती पावलेल्या आर्य चाणक्याच्या पाठिंब्यानेच त्याला त्या विद्यापीठात शिरता आले; अशी, जी कथा ग्रंथांतरी आहे; तीत, काहीतरी, तथ्य असावे. चंद्रगुप्ताने सहा-सात वर्षे तक्षशिलेत, शिक्षण घेतल्यानंतर, तिकडे अलेक्झांडरची पूर्वी वर्णिलेली स्वारी झाली. त्या वेळी, ग्रीकांनी, आपल्या भारतीय राष्ट्राच्या केलेल्या, अुपमर्दाचे, अुट्टे काढून, त्यांनी जिंकलेला प्रदेश, पुन्हा स्वतंत्र करण्यासाठी, जे भारतीय राष्ट्रभक्तांचे नि राजकारण्यांचे, आर्य चाणक्याच्या नेतृत्वाखाली, मोठे षड्यंत्र रचले गेले म्हणून वर सांगितले आहे त्यात आर्य चाणक्याचा हा पट्टशिष्य, हा तरुण चंद्रगुप्त प्रथमतः आपल्या तेजाने तळपू लागला.

## अितिहासातील एक अद्भुत अर्धी घटका !

ग्रीकांच्या सैन्यरचनेतील, व्यूहातील, शस्त्रा- गारातील वैशिष्ट्ये तरी कोणती आहेत; ही पाहणी स्वतः करावी, ह्या हेतूने तरुण चंद्रगुप्त ग्रीकांच्या शिबिरात छद्मीपणे हिंडत असावा. कारण अेकदा तो त्यांच्या प्रत्यक्ष राजशिबिरातच, असा लपत लपत टेहळणी करीत असता ग्रीक पहारेवाल्यांनी, त्यास संशयावरून पकडले. स्वतः अलेक्झांडरपर्यंत, ते वृत्त पोचून, त्या ग्रीक सम्राटाने त्या अज्ञात तरुण भारतीयास आपल्या समोर बोलाविले. क्वचित आधी भेट ठरवूनच तो तरुण अलेक्झांडरला, भेटावयास गेला असेल; असेही काहींना वाटते.

चाळिशीकडे झुकलेला तो प्रतापी ग्रीक, सेनापती नि सम्राट अलेक्झांडर आणि विशीच्या वेशीत शिरणारा, तो भावी भारतीय सेनापती नि सम्राट पण त्या वेळचा, अेक भटकता तरुण चंद्रगुप्त अेकमेकांना काही क्षण, न्याहाळीत राहिले! मध्याह्न अुतरू लागलेला, अेक सूर्य नि अुषःकालाचे, आवरणातून अजून, पुरता बाहेर, न आलेला; तो अपर उदयोन्मुख सूर्य, जणू, परस्पर सन्मुख आले!

अेक, अर्धी घटकासुद्धा, त्यांची, ती भेट टिकली नसेल; पण अितिहासात चिरंतनपणे विस्मयावह वाटावी; अशी, ती अर्धी घटका, अदभुत ठरली खरी!

त्या भेटीचा अुल्लेख, बहुतेक ग्रीक लेखक करीत असताही, तिथे, अलेक्झांडरशी, त्या तरुण चंद्रगुप्ताचे काय बोलणे झाले; याविषयी, कोणीच, नक्की सांगत नाही. 'मगधाच्या राजवंशाशी माझा संबंध आहे.' असे काहीसे चंद्रगुप्त पुटपुटला; अेवढे, अेकदोघांनी लिहिले आहे. अेकंदरीत नक्की असे, अितकेच सांगता येते की, अलेक्झांडरच्या प्रश्नांना चंद्रगुप्ताने, बाणेदारपणे अुत्तरे दिली. त्या अुत्तर-प्रत्युत्तरात काही, विकोप अुत्पन्न होअून शिकंदरने, त्या तरुणाला तत्काळ शिबिराबाहेर काढून देण्याची आज्ञा सोडली. त्याप्रमाणे तो तरुण तेथून तत्क्षणी बाहेर पडला. पण, मध्यंतरी अलेक्झांडरला काय वाटले कोणास ठाअूक? त्याने काही वेळाने त्या तरुणास, पुन्हा आपल्यासमोर घेअून येण्यास आज्ञापिले; पण तो तरुण अितक्या वेगाने निसटला होता की त्याचा शोध ग्रीक सैनिकांना पुन्हा कुठेच लागला नाही.

## आर्य चाणक्याची कुलकथा

आर्य चाणक्य, हा ब्राह्मण कुळात जन्मलेला होता. त्याचे मूळचे नाव विष्णुगुप्त असे होते. चाणक्य, हे नाव त्याच्या मूळच्या चणक नावाच्या गावावरून पडले असावे; परंतु त्याचे 'आर्य चाणक्य', हेच नाव, सुप्रसिद्ध आहे. त्याचे, तिसरे 'कौटिल्य' हे, नावही लोकप्रिय आहे. त्याचा महनीय नि मौलिक ग्रंथ, 'कौटिलीय अर्थशास्त्र', ह्याच, नावाने विख्यात आहे. त्याचे गोत्र, जे कुटल, त्यावरून हे नाव पडलेले असावे. त्या वेळच्या बहुतेक शास्त्रांत तो, पारंगत झालेला असून, तक्षशिलेच्या विद्यापीठात नि भारतीय पंडितमंडळात, महापंडित, म्हणून त्याची कीर्ती दुमदुमत होती. दिसण्यात तो कुरूप होता. पुढे मगधात झालेल्या, साम्राज्यीय राज्यक्रांतीत जेव्हा, त्याचे नाव अखिल भारतातच नव्हे, तर त्या वेळच्या ग्रीस प्रभृती, जागतिक राज्यमंडळातही, सम्राट चंद्रगुप्ताचा, लहानपणीचा मार्गदर्शक नि नंतरचा भारतीय साम्राज्याचा महामात्य म्हणून, जगप्रसिद्ध झाले तेव्हा त्याच्या पूर्वचरित्राविषयीही चंद्रगुप्त किंवा अलेक्झांडर- प्रमाणेच अनेक भाकड दंतकथा

लोकांत प्रचलित झाल्या. चंद्रगुप्त नि चाणक्य हे दोघेही दिवंगत झाल्यानंतर, शतकांचा काळ लोटल्यावर, लिहिल्या गेलेल्या, अनेक ग्रंथांतून, नाटकांतून, लोककथांतून साधार असोत वा निराधार असोत; पण अनेक अुल्लेख आलेले आढळतात. जैन, बौद्ध किंवा वैदिक वाङ्मयातील, हे अुल्लेख, सर्वस्वी, विश्वसनीय नाहीत. अेका संस्कृत नाटकातही, त्याची रंगविलेली भूमिका, नाट्यप्रसंग रंगविण्यासाठी, अवास्तवपणे, वर्णिलेली आहे; ह्यास्तव, त्याच्या कुरूपतेविषयीची नि दांतांविषयीची, विक्षिप्त वर्णने किंवा त्याने, मार्गात खेळणाऱ्या अजाण नि ग्राम्य मुलांतून चंद्रगुप्त, ह्या, अेका हूड मुलाची भारताचा भावी सम्राट करण्यासाठी केवळ लहर लागली; म्हणून किंवा हस्तसामुद्रिकावरून निवड केली; अशा गप्पा, त्या प्राचीन ग्रंथात दिलेल्या असल्या; तरी, त्यांना 'गप्पां'पलीकडे, कोणतेही, अैतिहासिक मूल्य, देअू नये. तथापि, त्यांच्या मुळाशी काही, अैतिहासिक तथ्यकणिका आहेत की काय, याचा छडा अवश्य लावावा.

## आर्य चाणक्याच्या प्रतिज्ञेची विकृत आख्यायिका

चाणक्याविषयीच्या, अशा अेका आख्यायिकेची चर्चा अुदाहरण म्हणून तरी अिथे केली पाहिजे. कारण, ती आजच्या, शालेय अितिहासांतून सुद्धा, त्याच विकृत रूपात, शिकविली जात आहे. ती आख्यायिका थोडक्यात अशी: ''तक्षशिलेच्या विद्यापीठात नि तिकडच्या प्रदेशात महापंडित, म्हणून प्रसिद्धी पावल्यामुळे पाटलीपुत्रात, आर्य चाणक्याला, सम्राट महपद्मनंदाच्या प्रासादांत, 'दानाध्यक्ष' पदावर, नियुक्त करण्यात आले. त्या अुच्चपदावर तो कार्य करीत असता; अेक दिवस, नंदसम्राट, पाहणी करीत, तिथे आला. परंतु, आर्य चाणक्याचे, दांतांवाचून विद्रूप झालेले तोंड नि मूळचेच कुरूप शरीर, पाहून त्याने त्याची कुचेष्टा केली; ती न साहून चाणक्य, संतापला. तेव्हा नंदाने, त्यास तत्काळ खाली खेचून आणि काही ग्रंथात लिहिले आहे; तशी, त्याची शेंडी, अुपटेतो, ओढून त्यास राजप्रासादाबाहेर हुसकून पदच्युत करण्याची आज्ञा सोडली; तेव्हा, त्या तेजस्वी ब्राह्मणाने ताडकन अुत्तर दिले की, 'तुझ्या सिंहासनावरून तुलाही, असाच खेचून तुझा नि तुझ्या नंदवंशाचा नायनाट करीन; तेव्हाच पुन्हा शेंडीला गाठ बांधीन!' अशी प्रतिज्ञा करून तो राजवाड्यातून निघून गेला.''

परंतु, सम्राट नंद दानविभागाची पाहणी करण्यास तिथे आला होता; सौंदर्यविभागाची नव्हे! तेव्हा, ज्या महापंडिताला त्या नंदराजाने स्वतःच दानाध्यक्षाच्या अुच्चपदी नेमले होते तो केवळ कुरूपतेमुळे, त्या अुच्चपदास अयोग्य आहे; असे नंदराजा म्हणेल तरी कसा? त्या कार्याध्यक्षपदाला, धर्मशास्त्रादिक पांडित्याची आवश्यकता होती; दैहिक सौंदर्याची, नव्हे! परंतु, ह्या आख्यायिकेचा भाकडपणा ठरविण्यास, अशा किरकोळ आक्षेपापेक्षा, जो खऱ्या महत्त्वाचा आक्षेप आहे; तो असा, की चाणक्याच्या ह्या झालेल्या वैयक्तिक अपमानामुळेच, काय तो चाणक्य, नंदसम्राटाविरुद्ध, बंड करून अुठला; असे ती आख्यायिका सूचित करते; म्हणजे जर त्याचा हा, वैयक्तिक अपमान झाला नसता; तर तो नंदसम्राटाचा, अेक राजनिष्ठ सेवकचा सेवक म्हणूनच, राहिला असता! त्याने, जी, भारतव्यापी, प्रचंड राज्यक्रांती केली. ती भारतीय राष्ट्राला, म्लेंच्छांच्या दास्यातून सोडवून, स्वतत्रं करण्यासाठी नव्हे; तर, केवळ आपल्या वैयक्तिक अपमानाचा सूड अुगविण्यासाठी होय! म्हणूनच, ही आख्यायिका विकृत आहे.

जेव्हा शिवाजी, राजकारणातील अेक हूल म्हणून औरंगजेबाचे आधिपत्य मानून, आग्र्यास, त्या मोगल बादशहाच्या 'दरबारात' गेला; तेव्हा, औरंगजेबाने त्याचा अपमान केला. त्यात खटका अुडून, शिवाजी बंदीत पडला; पण, तेथून चातुर्याने, निसटून जाअून त्याने औरंगजेबाशी अुघड युद्ध मांडले आणि स्वतःचे स्वतंत्र राज्य स्थापले; अशी कथा सांगून, जर कोणा शहाण्याने निष्कर्ष काढला की, स्वतःचा वैयक्तिक अपमान केला; म्हणूनच काय, तें, शिवाजीने औरंगजेबाशी वैर केले नि आपले स्वतःचे राज्य स्थापले; त्यात स्वधर्माच्या नि स्वराष्ट्राच्या, राजकीय मुक्ततेचा हेतूबितू नव्हता; तर, ते, जितके विकृत नि वेडगळ कथन होअील; तितकीच, आर्य चाणक्याचा तो वैयक्तिक अपमान नंदराजाने केला; म्हणूनच, काय ती, चाणक्याने, नंदवंशाचे अुन्मूलन करून, ती, भारतीय राज्यक्रांती केली; असे सुचविणारी ही आख्यायिकाही अगदी असत्य नसली तरी विकृत नि अर्धवट आहे.

## ती आख्यायिका अशी अुलगडून शिकवावी

शिवाजीचा, अपमान झाला म्हणून त्याने औरंगजेबाविरुद्ध बंड केले; असे नसून; औरंगजेबाची परधर्मीय सत्ता, उलथून टाकण्यासाठी; हिंदुत्वाच्या अभिमानाने शिवाजी बंड करतो आहे; अशी धास्ती औरंगजेबाने, खाल्ली होती, म्हणून, त्याने शिवाजीस अपमानून बंदीत टाकले असा खरा कार्यकारणभाव आहे; त्याचप्रमाणे, आर्य चाणक्य, हा आपणास दुबळे लेखून मगध साम्राज्यवादी सत्ता, आपल्या हातून छिनावून घेण्यासाठी अेक राष्ट्रीय षड्यंत्र रचीत आहे; असे गुप्त वृत्त महापद्मनंदाला आधीच ठाअूक झाल्यामुळे, नंदाने त्याचा राजवाड्यात असा कोणता तरी अुपमर्द केला आणि त्यासरशी, त्या तेजस्वी ब्राह्मणाने, ''तुझ्या, प्रपीडक सत्तेचे अुन्मूलन करून भारताचा अुद्धार करीन; तरच मी खरा चाणक्य'' अशा आशयाचे प्रत्युत्तर दिले, असा कार्यकारणभाव, प्रतिपादिला पाहिजे. तोच सर्व वस्तुस्थितीशी जुळतो.

कारण, ह्याचा बळकट पुरावा स्वत: चाणक्याने रचिलेल्या, 'कौटिलीय अर्थशास्त्र' ह्या ग्रंथातच, आपणास सापडतो. त्या ग्रंथात, स्वत: ग्रंथकाराचा परिचय करून देताना म्हटले आहे:

**चाणक्य इति विख्यात: श्रोत्रिय: सर्वधर्मविद् ।।**
**येन शस्त्रं च शास्त्रं च नंदराजगता च भू: ।**
**अमर्षेणोद्धृतान्याशु तेन शास्त्रमिदं कृतम् ।।**

'नंदाचा अुच्छेद करून, त्याच्या सत्तेत, अध:पात होत चाललेल्या राष्ट्रीय शस्त्रशक्तीचे, शास्त्रशक्तीचे नि ह्या भारतभूमीचे अुद्धरण ज्याने केले, त्याने, हा ग्रंथ लिहिला आहे.' आपल्या, वैयक्तिक अुपमर्दाचा सूड, त्याने, नंदाचा नि:पात केला, अशा आशयाचा चकार शब्दही, त्या परिचयाच्या श्लोकात, अुल्लेखिलेला नाही. स्वराष्ट्राच्या आणि मातृभूमीच्या अुद्धारार्थ, नंदाचा नि:पात केला असे स्वत: चाणक्याचा ग्रंथच सांगत आहे!

चाणक्याच्या, ह्या राष्ट्रमूलक नंदद्वेषास नंदाने मागाहून केलेल्या, वैयक्तिक अुपमर्दाने अधिक, धार चढली असेल; अितकाच काय तो, त्या, अतथ्य अशा, नाटकीपणाच्या भाषेत सांगितलेल्या आख्यायिकेत, सत्याचा अंश असावा.

## शिकंदरच्या स्वारीच्या पूर्वीपासूनच
## चाणक्याच्या राजकारणाचा आरंभ

तक्षशिलेच्या परिसरात, चाणक्याचे वास्तव्य शिकंदराच्या स्वारीच्या आधी कितीतरी वर्षे होते. भारताच्या तिकडील सिंधूपर्यंतच्या सीमाप्रदेशाच्या राजकीय परिस्थितीचा त्याने प्रत्यक्ष परिचय करून घेतलेला होता.

भारताच्या, ह्या सीमाप्रदेशाला लागूनच, अिराणचे प्रचंड, संघटित, अेककेंद्र नि अेकराष्ट्र, असे शत्रुराष्ट्राचे साम्राज्य पसरलेले होते. तशा कोणा भारतविद्वेषी संघटित साम्राज्याने, स्वारी केली असता त्या सीमेवरील, हिंदुकुश ते पंचनद नि सिंधपर्यंत पसरलेली, आमची भारतीय, स्वतंत्र शूर पण लहान लहान विलग नि विघटित गणराज्ये नि राज्ये, रणांगणात कधीच अेकअेकटी पुरी पडणारी नाहीत; हे चाणक्याचे ठाम मत झालेले होते.

## ग्रीकांची गणराज्येही ह्यामुळेच बुडाली

अितक्यात, ग्रीसमध्ये वरील सिद्धान्ताचे समर्थन करणारे, अेक प्रात्यक्षिकच घडले. अिराणच्या सम्राटाने, ग्रीसवर स्वारी करताच भारताप्रमाणे पसरलेल्या ग्रीकांच्या लहान गणराज्यांची हाडे नि हाडे घुसळून निघाली. शेवटी, त्या सर्व फुटकळ ग्रीक संस्थानांना, जिंकून जेव्हा फिलिफने नि अलेक्झांडरने ग्रीकांचे अेक संघटित नि बलाढ्य साम्राज्य बनविले; तेव्हा काय ती त्यांना अिराणी साम्राज्यावर मात करता आली, हेही चाणक्याच्या चाणाक्ष दृष्टिक्षेपातून सुटले नाही.

त्याने निर्धार केला की, भारताचे स्वातंत्र्य रक्षिण्याच्या आणि त्याची राज्यशक्ती बलाढ्य नि अजिंक्य करण्याचा, शत्रुस्थानी असलेल्या त्या, विस्तृत साम्राज्याच्या, अस्तित्वामुळे नि शत्रुत्वामुळे, त्या परिस्थितीत, अेकच अुपाय होता; नि तो हाच, की, सारी लहानसहान राज्ये नि गणराज्ये, वितळवून टाकून त्यांचे अेकात्म, अेककेंद्र नि प्रबळतम असे अखिल नि अखंड भारताचे अेकछत्री साम्राज्य, स्थापिले पाहिजे. परंतु, त्यांच्या निर्धाराचा,

गांधार, सिंध प्रभृती, तिकडच्या प्रांतातून जे, पाठपुरावा करू शकेल; असे अेकही भारतीय गणराज्य किंवा राज्य, तिकडे नव्हते. चाणक्याने, त्यांची सर्वांची शक्ती नि प्रवृत्ती, मोजून मापून, पाहिलेली होती. त्यामुळे, साऱ्या अुत्तर भारतात, 'साम्राज्य' ही पदवी ज्याने, आधीच संपादिलेली होती, अशी, जी अेकच राज्यसंघटना, राज्यशक्ती, साम्राज्यसंस्था, अुरलेली होती, त्या मगधसाम्राज्याकडे, चाणक्याची दृष्टी वळली. ह्या, नियोजित, भारतीय राज्यक्रांतीच्या प्रेरणेने भारावलेला आर्य चाणक्य, मगधराज्याची, झोपडीपासून तो सम्राटाच्या राजवाड्यापर्यंत, गुप्तपणे, छाननी करण्यासाठी, मगधात पुन्हा आला. त्याप्रमाणे, तो काही मिषाने, राजप्रासादात वावरण्याच्या प्रयत्नात होता; तोपर्यंत, चाणक्य हा महापंडित आहे; अेवढेच काय ते नंदसम्राटाला ठाअूक होते. त्यामुळे, तसा प्रश्न निघताच, दानाध्यक्षपदाच्या अुच्च स्थानावर, आर्य चाणक्याची नियुक्ती करण्यास नंदाने आक्षेप घेतला नाही. ते पद, स्वीकारल्यामुळे, चाणक्यालाही, त्याच्या षड्यंत्रास, हवे ते साहाय्यच मिळाले.

परंतु, काही काळानंतर, चाणक्य हा नुसता, अेक महापंडित नसून, अेक कूटनीतिज्ञही आहे; आणि आपल्याविरुद्ध, त्याचे काहीतरी भयंकर कट चालू आहेत; अशी कुणकूण कानावर आल्यावरून सम्राट नंदाने त्याचा चारचौघांत कसा अुपमर्द केला, त्याला पदच्युत करून राजवाड्यातून काढून देअून, मगधराज्यातून, कसे सीमापार केले; तो वृत्तांत वर दिलाच आहे. सीमापार झाल्यामुळे, चाणक्य पुन्हा तक्षशिलेकडे गेला.

मध्यंतरी त्या राष्ट्रभक्ताच्या अखिल भारतीय साम्राज्य स्थापण्याच्या महान कार्याला अत्यंत अनुकूल अशी, अेक घटना घडली. ती, ही, की, मागे सांगितल्याप्रमाणे, नंदसम्राटाने, त्याचा दासीपुत्र असलेल्या, तरुण चंद्रगुप्तालाही सीमापार केल्यामुळे, तोही तक्षशिलेकडे जाअून आर्य चाणक्याला मिळाला.

## चंद्रगुप्तालाच चाणक्याने का पाठिंबा दिला?

दुबळ्या नि दुष्ट नंदाला, पदच्युत करून, त्याचे स्थान, कोणत्याही अुपटसुंभ पुरुषाला, तो, गुणवंत असला तरी, केवळ बळाने, मगध सम्राटपदावर स्थापू गेले असता, मंडळातील, भारतीय राजमंडळातील नि जनतेतील, परंपराप्रिय, अशा अनेकांचा, फार मोठा विरोध झाला असता; परंतु, चंद्रगुप्त हा दासीपुत्र असला तरी, राजपुत्रच असल्यामुळे, त्याच्या, त्या सिंहासनाशी, काहीतरी, जन्मसिद्ध रक्तसंबंध, होताच होता. त्यातही, पराक्रमादि गुणांनी तो संपन्न होता; त्यामुळे, वरील परंपराप्रिय शक्तींचाही, त्यास तितका तीव्र, विरोध होण्याचा संभव, फार थोडा होता. हे कूटनीतिज्ञ चाणक्याच्या तेव्हाच ध्यानात आले; आणि त्याने चंद्रगुप्ताचाच पक्ष घेअून त्याला मगधसम्राट पदावरच नव्हे; तर, भारतीय सम्राटपदावर अधिष्ठित करण्याचा दृढनिश्चय केला.

चाणक्य - चंद्रगुप्ताच्या, भारत साम्राज्य स्थापण्याच्या षड्यंत्राचे असे सूतोवाच होत आहे तोच, चाणक्याने तर्किली होती ती अशुभ घटना तिकडे अिराणकडे घडून आली. ग्रीकांच्या नवसाम्राज्याचा जो नेता अलेक्झांडर, त्याने, अिराणचे साम्राज्य बुडवून भारतावर स्वारी केली. मागे वर्णिल्याप्रमाणे, त्या संकटात, भारतीयांच्या प्रतिकाराने शिकंदराची पिछेहाट करून त्याला, जरी, स्वदेशी परत फिरणे भाग पाडले तरी, त्या संघटित नि साम्राज्यीय म्लेंच्छशक्तीचा निर्णायक पराभव असा आपणास करता आला नाही.

वाअीटातून चांगले अितकेच झाले की, चाणक्यादि राष्ट्रीय द्रष्टे जे सांगत होते की, शत्रूचे साम्राज्य जसे अेककेंद्रित, विस्तृत पण संघटित नि अेकराष्ट्र झालेले आहे, तसे भारतीय साम्राज्य स्थापिल्यावाचून त्या परिस्थितीत भारतीय स्वातंत्र्य रक्षिणे अशक्य आहे हे त्या सीमाप्रदेशीय गणराज्यातील लोकसत्ताप्रिय भारतीयांनाही, त्यांनाच, ती ठेच लागल्याने, पटू लागले.

ह्या क्रांतिकारक वृत्तीच्या प्रसाराचे पहिले प्रसादचिह्न म्हणजे हे होते की, सिंधपर्यंत जे जे भारतीय प्रांत शिकंदराने जिंकून त्याच्या साम्राज्यात समाविष्ट केलेले होते, त्यांच्यात, शिकंदर परतताच सामुदायिक अुठावणी होअून, मागे वर्णिल्याप्रमाणे, शिकंदराच्या मरणाच्या वर्ष-सहा महिन्याचे आत, ते सारे भारतीय प्रांत, ग्रीकांचे दो दिवसांचे आधिपत्य झुगारून देअून,

स्वतंत्र झाले. ह्या आश्चर्यकारक नि अभिमानास्पद सामुदायिक अुठावाचे श्रेय जस्टिन (Justin) हा प्राचीन नि प्रसिद्ध ग्रंथकार स्पष्टपणे चंद्रगुप्ताच्या पुढारीपणाला देतो : "Indian after the death of Alexander had shaken as it were, the yoke of servitude form its neck and put his governors to death. The author of this liberation was Sandrocottus." या अुताऱ्यातील **'सँन्ड्रोकोटस'** म्हणजेच चंद्रगुप्त. ग्रीक लेखक 'चंद्रगुप्त' नावाचा अुच्चार नि अुल्लेख, असाच करीत नि लिहीत.

## ग्रीक साम्राज्यीय सेना भारतावर पुन्हा स्वारी करणार हे नक्की ; त्याचा प्रतिकार असा!

वर दिलेल्या, सीमाप्रांतीय भारतीयांची, चंद्रगुप्त-चाणक्यादिकांच्या नेतृत्वाखालील, सामुदायिक अुठावणी अशी यशस्वी झाली; तरीही, तिने, ''भारतीय स्वातंत्र्य, ग्रीकांच्या आक्रमणापासून, अगदी निर्भय झाले असे नव्हे;'' असे चाणक्याचे हस्तक, सर्व राजमंडळाला बजावू लागले. त्यांनी सर्वत्र अशा प्रचाराचा धूमधडाका चालविला की, ''स्वत: शिकंदरच'', 'भारत विजयासाठी, मी पुन्हा स्वारी करणार आहे,' म्हणून, मरेतो प्रतिज्ञा करीतच होता. त्याच्या मृत्यूनंतर, त्याच्या प्रमुख सत्ताधिकाऱ्यांत नि सेनाधिकाऱ्यांत, सध्या, ग्रीक साम्राज्याच्या विभागणीविषयी लढा चालू झाला आहे; त्यात जो कोणी ग्रीक सेनापती भारताच्या सीमेस भिडलेल्या, बाबिलोनचा राज्याधिकारी होअील, तो, भारतावर पुन्हा पहिल्याहून प्रबळतर, स्वारी केल्यावाचून राहणार नाही; आणि तिला पहिले बळी पुन्हा तुम्ही पडाल; जर असेच फुटकळ फुटकळ राजके, प्राजके बनवून, असंघटित रहाल तर! पण, जर ग्रीक साम्राज्यांत चाललेल्या, या ग्रीकांच्या यादवीची संधी आपण साधली; आणि सिंधुसागरापासून गंगासागरापर्यंत, सारा भारत, अेका प्रबळ साम्राज्यात विलीन करून, अेकछत्र करू शकलो, तर, ग्रीकांच्या म्लेंच्छसाम्राज्याहून, प्रबळतर असे आपले भारतीय साम्राज्य, ते म्लेंच्छ, पुन्हा स्वारी करून आलेच तरीही, त्यांची, हड्डी न् हड्डी, नरम केल्यावाचून राहणार नाही! तरी सारे भारत अेकराष्ट्र करा!''

## चंद्रगुप्त-चाणक्यांची मगधावर स्वारी

ग्रीकांत चाललेल्या वरील यादवीच्या संधीचा, अेक क्षणही वाया न दवडता, चाणक्याच्या राज्यक्रांतीच्या आराखड्याप्रमाणे, प्रथम मगधावर चालून जाण्यासाठी, त्याचे चंद्रगुप्तादि अनुयायी अुघडपणे सैन्य अुभारू लागले. त्याविषयी काही स्पष्ट पण अगदी मोजके अुल्लेख 'महावंश' टीकेसारख्या अगदी थोड्या ग्रंथांत सापडतात. त्या नि अितर आधारांवरून असे दिसते की त्या सैन्यात बहुतेक भरणा अेकराष्ट्र असे भारतीय साम्राज्य अुभारण्याच्या चाणक्याच्या प्रचाराने अुद्दीपित झालेल्या पंचनदीय, पार्वतीय नि गणराज्यीय सैनिकांचाच होता. ह्या आपल्या बिकट कार्याला पाठिंबा मिळविण्यासाठी, स्वत: चाणक्य, 'पर्वतेश्वरास', म्हणजे तिकडील अेक प्रस्थ असलेल्या, पौरव राजासही, गुप्तपणे जाअून भेटल्याचा अुल्लेख आहे. अलेक्झांडरची राजसत्ताच भारतातून अुखडली गेल्यामुळे, राजा पौरव हाही, आता क्षत्रप म्हणून, ग्रीकांचा अंकित राहिलेला नव्हता. चाणक्याचे कार्यास राजा पौरवाचा पाठिंबाच नव्हे, तर काही धनीजनांचे प्रत्यक्ष साहाय्यही मिळाले; असे ग्रंथांतरीच्या अुल्लेखांवरून दिसते. चाणक्य हा ह्या सर्व सैन्याचे सेनापतित्व चंद्रगुप्तास देत गेला. पंचनदातील, शक्य त्या, प्रदेशावर आपली सत्ता स्थापून, ते वेगाने, मगधावर चालून गेले. नंदाच्या प्रपीडक नि दुबळ्या राजवटीची चीड आलेली आणि चाणक्याने प्रचारिलेल्या अेकछत्री नि अखंड अशा भारतीय साम्राज्याच्या ध्येयाने उत्स्फूर्त झालेली, भारतीय जनता नि सत्ताकेंद्रे चंद्रगुप्ताच्या सैन्यास, ते लढत, लढत जसजसे, पुढे चालले तसतशी, मिळत गेली.

ह्या झंझावाती अभियानात चंद्रगुप्त नि चाणक्य ह्यांना कित्येक वेळा अगदी जिवावरच्या संकटांनाही तोंड द्यावे लागले. अेकदा तर त्यांचे सैन्य विरोधी सैन्याच्या निकराच्या माऱ्यामुळे अुधळून गेले. जीव बचावण्यासाठी स्वत: चंद्रगुप्त नि चाणक्य हे रानावनात पळून गेले. अेक रात्र त्यांना नुसत्या अुघड्या भूमीवरच निजावे लागले; पण, अशा

कोणत्याही संकटाने हतोत्साह न होता, स्वकीय सैन्याची पुन:पुन्हा जुळवणी करून, चंद्रगुप्त नि चाणक्य, सारखे पुढे घुसत पाटलीपुत्राच्या, त्या प्रत्यक्ष राजधानीच्या, परिसरात येऊन थडकले.

कूटनीतिपटू चाणक्याच्या, गुप्त कारस्थानांनी नंदाचे सैन्य नि राजधानी, आधीच पोखरून ठेवलेली होती. त्या आधारावर, साहसी चंद्रगुप्त अेखाद्या तीरासारखा पाटलीपुत्रावर तुटून पडला.

## महापद्मनंदाचा शिरच्छेद

राजधानीच्या चारी बाजूंनी कडक नाकेबंदी करीत चंद्रगुप्ताचे सैन्य, पाटलीपुत्र नगरात घुसताच, त्या राजधानीत, जिकडे तिकडे गोंधळ अुडाला. स्वतः चंद्रगुप्त राजवाड्यात शिरला. परंतु, महापद्मनंद त्या सार्वत्रिक गोंधळात राजवाड्यातून आधीच बाहेर पडला होता. तो गुप्तपणे राजधानीबाहेर निसटून जाअू लागला असता मार्गातच धरला गेला. तत्काळ तेथे त्याचा शिरच्छेद करण्यात आला.

## सम्राट चंद्रगुप्त की जय!

लगोलग, चंद्रगुप्ताची मगधाचा सम्राट म्हणून सर्वत्र घोषणा करण्यात आली. त्याने आपल्या मातेच्या मुरा ह्या नावास अनुसरून मौर्य हे अभिधान धारण केले. त्यामुळे तो नि त्याचा राजवंश अितिहासात मौर्य ह्या नावानेच चिरंतन प्रख्याती पावला. सम्राटपदावर अधिष्ठित होताच त्याने आपल्या साम्राज्याच्या मुख्य प्रधान पदी आर्य चाणक्याची नियुक्ती केली. ही घटना अि. सनपूर्व ३२१ व्या वर्षाचे जवळपास घडली.

शिकंदर अिसवी सनपूर्व ३२३ मध्ये मरण पावला. तेव्हा, सर्वत्र विस्कळीत नि हतोत्साह झालेल्या, ह्या अुत्तर भारताचे स्वातंत्र्य नि राज्यशक्ती, पुन्हा प्रस्थापित करणारी ही प्रचंड राज्यक्रांती, सम्राट चंद्रगुप्त नि आर्य चाणक्य ह्या दोघा भारतीय महापुरुषांनी, अवघ्या दोन वर्षांचे आत, अिसवी सनपूर्व ३२१ व्या वर्षाचे जवळपास, अितक्या यशस्वीपणाने घडवून आणली! तिकडे, शिकंदराच्या ग्रीक साम्राज्यात मात्र, ग्रीक सामंत, आपआपसातल्या यादवी युद्धातच, लढत बसले होते! या अनुकूल संधीचा लाभ घेण्यासाठी चाणक्याने, अेक क्षणही विसावा न घेता, साऱ्या साम्राज्यात अंतर्गत शांती नि सुव्यवस्था स्थापण्यास तत्काल आरंभ केला.

## चाणक्य-नीतीचा मूळ दंडक 'प्रथम शस्त्रबळ'

परंतु, अेकछत्र साम्राज्याची शांतता नि सुव्यवस्था ह्या सुद्धा शेवटी त्या साम्राज्याच्या, मूलाधार असलेल्या, दंडशक्तीवरच, अवलंबून असतात; हा तर, चाणक्य-राजनीतीचा मूळ दंडक होता. 'क्षात्रतेज नि शस्त्रशक्ती, ही, समाजाच्या केवळ राजकीय अंगाचाच नव्हे, तर, साऱ्या समाजजीवनाचा प्राण होय. क्षात्रधर्म दुबळा झाला तर, सारे धर्म, सारी शास्त्रे, साऱ्या कला, राष्ट्राचे जीवनचे जीवन, बुडालेच म्हणून समजा! 'सर्वे धर्माः प्रक्षयेयुर्विवृद्धाः क्षात्रे त्यक्ते राजधर्मे पुराणे। पायावाचून भव्य भवन, तसे सैन्यशक्तीवाचून साम्राज्य; नुसत्या वाऱ्याच्या वादळानेही कोसळणारच,'' हे ज्याच्या राजनीतीचे सूत्र, त्या आर्य चाणक्याने, सर्वांआधी, त्या नूतन साम्राज्याच्या रक्षणार्थ, प्रबळ, विनियंत्रित, नि जयिष्णु वृत्तीने भारलेले असे प्रंचड सैन्य अुभारण्याचे कार्यही कडोनिकडीने चालविले; अितक्या झपाट्याने की, अवघ्या तीन-चार वर्षांच्या आत, सम्राट चंद्रगुप्ताच्या बलाढ्यतेचा विश्वास, त्याच्या प्रजाजनांना, नि दरारा भारताच्या शत्रूंनाही वाटू लागला.

अशा कटाक्षाने नि कडोनिकडीने, अुभारलेल्या, ह्या चंद्रगुप्ताच्या, प्रचंड सैन्यबळाची संख्या किती होती?

अवघ्या चार - पाच वर्षांपूर्वी चंद्रगुप्त-चाणक्यांनी, पंचनदात, जेव्हा अखंड नि अखिल भारताच्या अेकछत्री साम्राज्याचा नि स्वातंत्र्याचा, गुप्त संकल्प केला, तेव्हा त्यांचे सैन्यबळ होते अक्षरशः शून्य! त्या शून्यापासून प्रारंभ करणाऱ्या, त्याच सम्राट चंद्रगुप्ताचे, आज शस्त्रसज्ज नि कटिबद्ध सैन्यबळ आहे, सहा लक्ष पायदळ, तीस सहस्त्र घोडेस्वार, दोन सहस्त्र लढाअू हत्ती आणि चार सहस्त्र रथ!!

ह्या बलाढ्य सैन्यशक्तीच्या प्रभावाने, चाणक्याने, अुत्तर भारतातील लहानसहान पण फुटकळपणे, स्वतंत्र राहू अिच्छिणाऱ्या राजकांची, प्राजकांची नि संघांची बजबजपुरी मोडून टाकून, शांतता नि अेककेंद्रित सुव्यवस्था

प्रस्थापिली. शेवटी, सिंधूनदीच्या अिकडल्या तटापर्यंतचे पंचनद, पार्वतीय भाग आणि सिंध हे प्रदेशही, सम्राट चंद्रगुप्ताच्या मौर्य साम्राज्यात समाविष्ट करून टाकले.

याप्रमाणे, आमच्या अैतिहासिक काळातील, सिंधूनदीपर्यंतचे, अेकसंध असे भारतीय साम्राज्य, प्रथमच प्रस्थापित झालेले पाहून, कोणाही राज्यधुरंधराला नि भारतीय सम्राटाला, कृतकृत्यता वाटली असती, तर तीही शोभून दिसली असती. पण...

## सिंधुनदी नव्हे, भारताची नैसर्गिक नि सामरिक सीमा आहे हिंदुकुश!

पण चंद्रगुप्त - चाणक्यांना, सिंधुनदीच्या तटापर्यंतच, काय ती, भारतीय साम्राज्याची सीमा भिडविण्यात, काही केल्या, तशी कृतकृत्यता वाटेना. त्यांची प्रतिज्ञा होती, ''अखिल नि अखंड अशी भारतीय साम्राज्याची प्रस्थापना आणि अुदंड म्लेंच्छांचे पारिपत्य! परंतु, त्या काळी, भारतीय राष्ट्राची सीमा, सिंधुनदीच्या अिकडच्या तटापुरतीच, काय ती, मानली जात नसे; तर, सिंधुनदीच्या, तिकडच्या तटाच्याही, पलीकडे गांधार प्रभृती प्रदेशांना नि कुभा (आजची काबूल), क्रमू (आजची कुर्‍म), सुवास्तु (आजची स्वात), गोमती (आजची गुमल) प्रभृती, आज अफगणीस्थानात गेलेल्या पण पूर्वी आपल्या भारतीय सीमेत असलेल्या, सिंधूपलीकडील, वेदविख्यात नद्यांना सामावून, हिंदुकुश पर्वताच्या शिखरापर्यंत, विस्तारलेली असे; तेथपर्यंत आमची, वैदिक धर्मानुयायी किंवा भारतवंशीय, जनपदे निवसलेली असत. त्यावर, परंपरागत भारतीय राजे राज्य करीत आलेले होते. भारताच्या, त्या हिम-शीतल प्रदेशातील आमचे लोक, सापेक्षतः, गौरवर्णाचे असल्यामुळे, या प्रांताला कोणी कोणी, 'श्वेतभारत' ही म्हणत. यास्तव सिंधूनदीच्या या अिकडच्या तटापर्यंत थडकलेल्या, आपल्या साम्राज्याच्या संरक्षक सैन्याचा कडेकोट प्रबंध करून, चाणक्य- चंद्रगुप्तांची राष्ट्रीय महत्वाकांक्षा, अखिल भारताची नैसर्गिक सीमा असलेल्या हिंदुकुश पर्वताच्या शिखरांवर, त्या साम्राज्याचा, ध्वज कसा रोवता येअील, या, चिंतेत नि चिंतनात, योजनेत नि साधनेत व्यग्र होअून गेली. 'यत्कांक्षन्ति तपोभिरन्यमुनयः, तस्मिन् तपस्यन्त्यमी।'

## ग्रीकांच्या साम्राज्यातील यादवी नि विभागणी

अितक्यात, तिकडे ग्रीकांच्या यादवीयुद्धाचा, तात्पुरता का होअीना, पण, शेवट झाला. त्यांच्या शिकंदरी साम्राज्याची वाटणी झाली. तीत, भारतीय सीमेस लागून असणाऱ्या, बाबिलोनकडील ग्रीक साम्राज्याचा विभाग शिकंदरचा अेक शूर कसलेला, सेनापती नि सत्ताधिकारी, जो सेल्युकस निकेटर, त्याच्या वाट्यास आला. त्यावर, त्याचे संपूर्ण नि स्वतंत्र आधिपत्य स्थापिले गेले. अितकेच नव्हे, तर, त्याच्या त्या राज्यास लागून असलेल्या हिंदुकुशपासूनच्या, शिकंदरने पूर्वी जिंकलेल्या, भारतीय प्रदेशांचे स्वामित्वही, सेल्युकसच्याच वाट्यास आले.

म्हणून, भारतीय प्रदेशांपैकी, पंचनद ते सिंधदेशासुद्धा, जो भाग मध्यंतरी स्वतंत्र करून, सम्राट चंद्रगुप्ताने आपल्या भारतीय साम्राज्यात समाविष्ट केलेला होता, तो, आमचा आम्हास परत द्या, अशी मागणी, त्या ग्रीकांचा राजा सेल्युकस ह्याने, चंद्रगुप्ताकडे केली! अर्थात सेल्युकसच्या हे ध्यानात आले नाही की, ग्रीकांची गाठ, आता मागच्याप्रमाणे, कोणा तक्षशिलेच्या अंबुज राजाशी किंवा कोणा महामात्य नेभळूशी नव्हती, तर, ती होती राजा चंद्रगुप्ताशी नि महामात्य आर्य चाणक्याशी! त्यांनी सेल्युकसची, ती बाष्कळ, मागणी तर, धुडकावून लावलीच, पण अुलट मागणी केली की, सिंधुपार असलेला गांधार ते हिंदुकुशपर्यंतचा, जो भारताचा भूभाग ग्रीक बळकावून बसलेले आहेत तोही, सेल्युकसने, तात्काळ, भारतास परत द्यावा.

## तुंबळ ग्रीकसेनेसह राजा सेल्युकसची भारतावर स्वारी!

त्यामुळे चवताळून, सेल्युकस हा, शिकंदराच्या हाताखाली कसलेल्या ग्रीक सैन्यानिशी, अिसवी सनपूर्व ३१५ च्या जवळपास, सिंधुनदी ओलांडून, भारतावर स्वारी करता झाला. शिकंदरची, पहिली न गाजलेली, अि. सनपूर्व ३२९ ची गांधारकडील, लहानशी स्वारी सोडून दिली असता, त्याने सिंधू ओलांडून, अि. सनपूर्व ३२७ त केलेल्या नि मागे सविस्तर वर्णिलेल्या, त्या पहिल्या स्वारीनंतर सिंधू ओलांडून आलेली, ग्रीकांची भारतावरील, ही दुसरी स्वारी होय!

परंतु, यावेळी सिंधूनदी अुतरून, सेल्युकस पुढे येताच त्याला, ती पूर्वीची शिकंदरच्या वेळची, भारतीय राज्य-गणराज्यांची फुटकळ फुटकळ, सैन्ये कोठेच दिसेनात! मध्यंतरीच्या काळात चंद्रगुप्त-चाणक्यांच्या प्रयत्नामुळे नि पराक्रमामुळे भारताचा, जो राजकीय नि सामरिक कायाकल्प झालेला होता, तो पाहून, सेल्युकस चकित झाला, गोंधळला! सिंधूनदीच्या, पंचनदाच्या, या टोकापासून तो अगदी थेट सिंधुसागरापर्यंत, भारतीय राष्ट्राच्या संघटित, अेकछत्री, अेककेंद्री, अेकसंचालित अशा चतुरंग नि प्रबळ सैन्याची पोलादी भिंतच भिंत, त्याला अडविण्यास, शस्त्रसज्ज अुभी असलेली आढळली; आणि तिचा सेनापती स्वयं चंद्रगुप्त!

त्या दोन्ही युयुत्सु सैन्यांची गाठ पडताच निकराच्या रणकंदनास आरंभ झाला. ग्रीकांनी आपल्या पराक्रमाची पराकाष्ठा केली; पण शेवटी, त्यांची भारतीय सैन्याने कोणत्यातरी, सिंधुपरिसरातील, दोन-तीन रणांत (त्या स्थलाचे नावही अुपलब्ध नाही!) अितकी दाणादाण अुडवून दिली, की सेल्युकसला, त्या निर्णायक पराजयामुळे, विजयी चंद्रगुप्तास शरण जाण्यावाचून गत्यंतर अुरले नाही.

## राजा पौरवाच्या पराभवाच्या सूड!

शिकंदराच्या वेळेस, ग्रीकांनी केलेल्या पौरवाच्या पराजयाचा, अितर अत्याचारांचा नि अपमानाचा, चंद्रगुप्ताच्या ह्या निर्णायक विजयामुळे, पादाक्रांत झालेल्या ग्रीकांवर, भारताने, असा पुरेपूर सूड अुगविला! तेव्हा, विजयी सम्राट चंद्रगुप्ताच्या सर्व अटी पराजित सेल्युकस मुकाट्याने मानता झाला.

या अटींप्रमाणे, यवनसम्राट सेल्युकसने, सिंधुनदीच्या अिकडल्या बाजूच्या पंचनद ते सिंधप्रभृती भारतीय प्रदेशांवर, ग्रीक जो अधिकार सांगत होते तो, अधिकार सोडून दिला. अितकेच नव्हे, तर, सिंधूच्या पलीकडला जो गांधार ते हिंदुकुश प्रभृती भारतीय प्रदेश, ग्रीकांच्या हातात पडला होता; आणि जो भारतास परत दिल्यावाचून युद्ध थांबणार नाही, म्हणून, महामात्य चाणक्याने दरडावले होते, तो सारा भारतीय प्रदेशही, विजयी चंद्रगुप्तास, राजा सेल्युकसने, हूं का चूं न करता, परत देअून टाकला. आणि भारतावर चढाअी करण्यासाठी, सिंधू अुतरताना छाती वर काढून नि खड्गे अुपसून, चालून आलेल्या त्या सहस्रावधी ग्रीकांच्या शिकंदरी सेना, शस्त्रे खाली ठेवून नि मस्तके अधोमुख करून सिंधुपार, हिंदुकुशपार, चालत्या झाल्या.

## भय बिन होय न प्रीत

चंद्रगुप्ताच्या ह्या विजयामुळे, त्याच्या भारतीय साम्राज्याची सीमा सेल्युकसच्या ग्रीक राज्याशी भिडून गेली होती आणि त्या दोन्ही राज्यांच्या मधली सीमारेषा होती हिंदुकुश पर्वताची पंक्ती! या भारतीय साम्राज्याच्या बलाढ्यतेची आणि चाणक्य - चंद्रगुप्ताच्या व्यक्तिमत्त्वाची, अशी काही छाप यवनाधिपती सेल्युकसच्या मनावर पडली, की, अशा साम्राज्याशी विरोध करण्यापेक्षा, त्याच्याशी मन:पूर्वक स्नेह जोडण्यातच, आपल्या ग्रीकराज्याचे कल्याण आहे, अशी त्याची निश्चिती पटली. दुसरे असे की, सेल्युकसच्या अितर सीमांवर, जी राज्ये होती ती ग्रीकांचीच असतानाही, त्याची प्रतिस्पर्धी शत्रुस्थाने होती, त्यांनाही धाक पडावा ह्यासाठी, चंद्रगुप्तासारख्या बलाढ्य सम्राटाशी दृढ मैत्री संपादणे हे सेल्युकसला हितावहच होते. या कारणामुळे, त्या यवनाधिप सेल्युकसने सम्राट चंद्रगुप्ताशी मन:पूर्वक चिरंतन मैत्रीचा संधी केला.

अितकेच नव्हे, तर, राजकीय नि राष्ट्रीय स्नेहबंधाला त्या दोन राजकुलांतील शरीरसंबंधाचा वैयक्तिक जिव्हाळाही लाभावा अशासाठी त्या ग्रीकनरेशाने आपल्या कन्येचा सम्राट चंद्रगुप्ताशी विवाह करून दिला.

त्या सालंकृत ग्रीक राजकुमारिच्या कन्यादानाने सम्राट चंद्रगुप्ताच्या देदीप्यमान यशोमंदिरावर रत्नजडित सोन्याचा कळसच चढविला गेला!

## महामात्य चाणक्याचा प्रभावी प्रबंध

त्या स्वतंत्र, सुविशाल नि अखंड साम्राज्याचा सारा प्रबंध, महामात्य चाणक्याने, पात्रापात्र -विवेकानुसार किती कठोरपणे, किती प्रबळपणे नि तरीही किती कनवाळूपणे ठेवला होता हे स्वत: त्या राजकार्यधुरंधर पुरुषानेच लिहिलेल्या, 'कौटिलीय अर्थशास्त्र', ह्या, विख्यात ग्रंथावरून नि त्या भारतीय साम्राज्याच्या, पुढे पुढे न्यूनत: शंभर वर्षे

तरी, वाढत गेलेल्या नि दूरवर पसरत गेलेल्या, अजिंक्य प्रभावावरून दिसून येते. त्याचप्रमाणे, चाणक्याच्या त्या प्रभावी प्रबंधामुळे, साऱ्या राष्ट्रात शांतता, सुव्यवस्था नि सुखसंपन्नता कशी नांदत होती, तेही सेल्युकसने चंद्रगुप्ताच्या राज्यसभेत ठेवलेल्या ग्रीक राजदूत मेगॅस्थिनीस याने - लिहिलेल्या प्रतिवृत्तावरून परस्परेच प्रत्ययास येत आहे.

केव्हा केव्हा अेका, दिवसात घडलेल्या, अेखाद्या अैतिहासिक, घटनेचा प्रभाव, अेकेक सहस्र वर्षांचे अैतिहासिक भवितव्य ठरवून टाकतो. चंद्रगुप्ताने ग्रीकांच्या केलेल्या पराभवाचा परिणामही, तसाच किती दूरवर, प्रभाव पाडू शकला, ह्याविषयी अिंग्रजी अितिहासकार व्हिन्सेट स्मिथ म्हणतो की, ''शिकंदर - सेल्युकसच्या स्वाऱ्यांचा बोजवारा अुडवून, चंद्रगुप्ताने केलेल्या, ग्रीकांच्या ह्या निर्णायक पराभवामुळे, पुढे जवळजवळ १५०० वर्षेपर्यंत तरी, युरोपमधील कोणतेही राष्ट्र हिंदुस्थानवर स्वारी करू शकले नाही.''

सेल्युकसशी झालेल्या संधीप्रमाणे, हिंदुकुश, हिरात ते बलुचिस्थानलाही सामावणारी, भारताची त्या दिशेची जी नैसर्गिक, सामरिक नि म्हणूनच, शास्त्रोक्त (Scientific) सीमारेषा आहे, जी सीमारेषा गाठण्यासाठी, पुढे अिंग्लिश सत्तेच्या तोंडास सारखे पाणी सुटत असताही, ती त्यांना जिंकता आली नाही; किंवा मोगल बादशहांनाही, जी पुरतेपणी, हाती ठेवता आली नाही, त्याच अखंड भारताच्या, शास्त्रीय सीमारेषेला, अैतिहासिक कालातील, भारताचा पहिला सम्राट चंद्रगुप्त हा, दोन सहस्त्र वर्षांच्याहीपूर्वी, अशा रीतीने पादाक्रांत करता झाला![H]

H'....The first Indian Emperor, more than two thousand years ago thus entered into possession of that 'Scientific frontier signed for in vain by his English successors and never held in its entirely even by the Moghul Monarchs of the 16th and 17th century.' (Early History of India, by V. Smith)

## अलेक्झांडर हा जगज्जेता तर नव्हताच,
## पण तो भारतविजेताही नव्हताच

त्या प्राचीन काळी, साऱ्या युरोपमध्ये ग्रीक संस्कृती हीच पुढारलेली असल्याने, तिला आजची बहुतेक युरोपियन राष्ट्रे, आपआपल्या संस्कृतीच्या मातृस्थानीच मानतात. त्या प्राचीन काळच्या, अलेक्झांडरसारख्या पराक्रमी, ग्रीक सम्राटाचे नाव, त्यामुळेच, आजच्या युरोपियन जनतेला, आपआपल्याच कोणा पराक्रमी पूर्वजाच्या नावासारखे, आपुलकीचे स्फूर्तिस्थान, वाटत आहे. युरोपियन अितिहासातून, त्याला, 'अलेक्झांडर दि ग्रेट' या नावाने संबोधिले जात असून, त्याच्याविषयीच्या अनेक पौराणिक पद्धतीच्या आख्यायिकाही त्यांच्या शालेय पुस्तकांतून रंगवून रंगवून, त्यांच्या तरुणांना, शिकविल्या जातात. परंतु, त्या शिकंदराचा नि त्याच्या त्या ग्रीक साम्राज्याचा त्या काळचा भारतीय प्रतिद्वंद्वी जो सम्राट चंद्रगुप्त किंवा चाणक्य ह्यांच्या नावाचा, काही तज्ज्ञ अितिहासकार सोडले तर, सामान्य युरोपियन शिक्षित जनतेला, पत्ताही नसतो. अेक वेळ, युरोपातील जनतेपुरती ह्या अैतिहासिक विपर्यासाकडे डोळेझाकही करता येअील; परंतु, ब्रिटिशांचे राज्य हिंदुस्थानात स्थापिले गेल्यानंतर, आमच्या शाळा - प्रशाळांमध्येही, ब्रिटिशांनी लिहिलेल्या शालेय पुस्तकांतून आणि साहित्यातूनही, अलेक्झांडरची हीच वरील अवास्तव महती गायिलेली असे. तीन - चार पिढ्या, आमच्या अिकडे, हेच शिक्षण दिले गेल्यामुळे, आमच्या शिक्षित वर्गावरही, 'अलेक्झांडर दि ग्रेट' हे नाव घेताच अेक रोमहर्षक छाप पडे. परंतु, चंद्रगुप्त किंवा चाणक्य हा कोणत्या झाडाचा पाला, ह्याचाही बहुधा, त्यांना पत्ता नसे. हा अैतिहासिक विपर्यास आणि त्यामुळे झालेली जनमनाची दिशाभूल, आता यापुढे तरी, होअू देता कामा नये. शिकंदराविषयीच्या पौराणिक अशा प्रचलित दंतकथा सोडून दिल्या, तरी, प्रत्यक्ष भारतीय अितिहासाशी संबंध असलेल्या आणि शिकंदराची नसती बडेजावी करून भारतास हीनपणा आणणाऱ्या आख्यायिका तरी, आमच्या शालेय पुस्तकांतून किंवा साहित्यातून काढून टाकल्या पाहिजेत. अुदाहरणार्थ, युरोपमधल्या शालेय पुस्तकांतून नि अितर साहित्यातूनही रंगवून सांगितली जात असलेली आणि आमच्या अिकडेही ब्रिटिशांनी प्रचलित केलेली खालील ग्रीक आख्यायिका पाहा:

ग्रीकादिक युरोपियन जनतेत असा समज प्रचलित असे की, ‘अलेक्झांडर हा जगज्जेता होता; आणि त्याने सारा भारत जिंकला होता. तो पराक्रमी पुरुष जेव्हा सारे जग जिंकून, स्वदेशी परत आला तेव्हा जगात जिंकावयास असा, आता, देशच अुरला नाही, ह्या निरुत्साहक जाणीवेने त्या युयुत्सु सम्राटाला रडू कोसळले!’ आणि अशी ही अलेक्झांडरच्या दिग्विजयाविषयीची आख्यायिका युरोपातच नव्हे, तर हिंदुस्थानातही अैटीने सांगितली जाते! आता, ती किती खोटी नि हास्यापद आहे, हे ह्या पुस्तकात शिकंदरच्या दिलेल्या, त्रोटक वृत्तान्तावरूनही, दिसून येअील. त्या काळच्या चीनसारख्या, ज्या बलाढ्य राष्ट्रांकडे तो वळलाच नाही त्यांची गोष्ट सोडून दिली तरी, अलेक्झांडरच, दिग्विजय करीत भारतापर्यंत जेव्हा पोचला आणि मगधासुद्धा सारे भारत जिंकून, भारताचा सम्राट म्हणवून घेण्याची महत्त्वाकांक्षा त्याने जेव्हा धरली; तेव्हा, त्याच्या त्या भारतावरील स्वारीची आणि त्या महत्त्वाकांक्षेची, कोण दुर्दशा अुडाली, हे ह्या पुस्तकात वर दाखविलेलेच आहे. अलेक्झांडर हा पराक्रमी होता, विजेता होता, पण जगज्जेता नव्हता! भारतविजेता तर तो नव्हताच! जर त्या पराक्रमी पुरुषाला खरोखरी रडू कोसळले असेल, तर, तो ‘आता जिंकावयास जगात देशच अुरला नाही’ अशा जाणीवेने रडू कोसळणे अशक्य होते. कारण, तशी जाणीव खोटी आहे, हे, त्याचे त्यालाच ठाअूक होते. तर ते रडे अशा जाणीवेने कोसळले असले पाहिजे की, ज्या भारताचा मी सम्राट होअू अिच्छित होतो, त्या अखिल भारताला, मी मरेतो जिंकू शकलो नाही. अितकेच नव्हे, तर त्याचा जो अेक लहानसा कोना, मी जिंकला आहे, म्हणून मी समजत होतो, तोही, ते बंडखोर भारतीय माझ्या हातून हिसडून घेतील असे दिसते!

‘गोमांतक’ काव्यात म्हटलेच आहे की,

*अन्य कुणाचा असो शिकंदर परंतु भारत जेता ना।*
*अंगणहि ना तये देखिले कळलाही ना कुणा कुणा ।।*

## सवाअी शिकंदर

थोर पुरुषांची तुलना सहसा कोणी करू नये, ते निरनिराळ्या परीने थोर असतात. पण, जर कोणी, अशा पुरुषांची तुलना करताना, अेकाचीच नसती बडेजावी केली, तर, ती हाणून पाडणे भाग आहे. जोवर युरोप अलेक्झांडरलाच तेवढे ‘दि ग्रेट’ म्हणून गौरवीत आहे, आणि त्याचा नि त्याच्या ग्रीक साम्राज्याचा, यशस्वी प्रतिद्वंद्वी, जो सम्राट चंद्रगुप्त, त्याची अनुल्लेखाने अवहेलना करीत आहे, तोंवर आम्हा भारतीयांना हे सांगणे अवश्य आहे, की, तुलनाच करावयाची तर ‘जर शिकंदर अेक शिकंदर आहे, तर चंद्रगुप्त हा सवाअी शिकंदर आहे!’ शिकंदरला, त्याच्या बापाने आधीच मिळविलेल्या, प्रबळ राज्याचे नि सैन्याचे अुदंड भांडवल, आयतेच लाभलेले होते. त्या आधारावर, स्वतःच्या पराक्रमाने, त्याने ग्रीकांचे साम्राज्य अुभारले. परंतु, चंद्रगुप्ताला तसा कोणताही आधार नव्हता. पदरी अेकही सैनिक नव्हता. त्याच्या बापानेच त्याला राज्याबाहेर हुसकून दिलेले होते. अेकच पुरुष तेवढा त्याच्या पाठीशी अुभा होता, तो म्हणजे आर्य चाणक्य! अशा स्थितीत शून्यापासून आरंभ करून चंद्रगुप्ताने स्वतःचे बलाढ्य सैन्य अुभारले. स्वतः शिकंदरच्या आणि त्याचा सेनापती सेल्युकसच्या, भारतावर झालेल्या, स्वाऱ्यांचा बोजवारा अुडवून दिला आणि शिकंदराच्या साम्राज्याहूनही महत्तर असलेल्या भारतीय साम्राज्याची अुभारणी केली!

काळाच्या ज्या पानावर ह्या यवनविजेत्या सम्राट चंद्रगुप्ताची, ह्या सवाअी शिकंदराची, राजमुद्रा अंकिलेली आहे, तेच आहे आमच्या हिंदुराष्ट्राच्या अितिहासातील सोनेरी पान पहिले!

# सोनेरी पान दुसरे

## २. यवनान्तक सम्राट पुष्यमित्र

सम्राट चंद्रगुप्त मौर्य असवी सनपूर्व २९८ व्या वर्षी वारला. त्याच्या सिंहासनावर त्याचा पुत्र बिंदुसार हा बसला. तोही पराक्रमी होता. त्याने स्वतः 'अमित्रघात' (शत्रूंचा कर्दनकाळ) ही पदवीच धारण केली होती. चंद्रगुप्ताच्या मृत्यूनंतरही, मौर्यसाम्राज्याचे महामात्यपद, आर्य चाणक्याच्याच हाती काही काळ तरी होते; त्यामुळे, सम्राट बिंदुसाराने, चाणक्य चंद्रगुप्ताच्या भारतीय साम्राज्याच्या भव्य ध्येयाचे, जे, अेक अुपांग, चंद्रगुप्ताच्या मृत्युसमयी अर्धवट राहिलेले होते तेही, पूर्ण करण्याचे कार्य, लगोलग हाती घेतले. त्यांच्या वरील भव्य ध्येयानुसार, म्लेंच्छांचे अुदंड पारिपत्य झाले होते. अखिल भारत स्वतंत्र झाला होता आणि अुत्तर भारतापुरते अेक अखंड, बलाढ्य नि अेकछत्री भारतीय साम्राज्य प्रस्थापित झाले होते. परंतु, त्यांची प्रतिज्ञा सर्वच भारत अेकछत्री करण्याची होती. ह्यासाठी त्या अुत्तरेच्या मौर्यसाम्राज्यात अुरलेला दक्षिण भारतही विलीन करून घेणे, हे प्राप्त कर्तव्यच होते.

यद्यपि, दक्षिण भारतातील त्या काळची पृथक पृथक राज्ये ही आमचीच होती, आप- आपल्यापरी स्वतंत्र होती, कोणत्याही परकीयांच्या, म्लेंच्छांच्या अुपद्रवापासून विमुक्त होती; तथापि, अखिल भारतीय राष्ट्र जर, अेकतंत्र नि अेकराष्ट्र करावयाचे, तर या दाक्षिणात्य पृथक पृथक स्वतंत्र राष्ट्रांनी, त्या अुत्तर भारतीय, साम्राज्यात समाविष्ट होणे, हे त्यांचेही त्या परिस्थितीतील, राष्ट्रीय कर्तव्यच होते.

दक्षिण - विजयावर निघाल्यानंतर, सम्राट बिंदुसाराने, साम-दाम-दंड-भेदेंकरून तेथील बहुतेक राज्यांकडून, आपले आधिपत्य मान्य करविले. 'पूर्व नि पश्चिम समुद्राच्या मध्यंतरीच्या सतरा राजधान्या त्याने मौर्यांच्या राज्यात समाविष्ट केल्या' असे ग्रंथांतरी अुल्लेखिलेले आहे. अेकंदरीत, चंद्रगुप्त चाणक्याच्या अखिल भारतीय साम्राज्याच्या ध्येयाचे हे अुरलेले दुय्यम अुपांगही पूर्ण करून सम्राट बिंदुसाराने, अुत्तर - दक्षिण, पूर्व - पश्चिमेसुद्धा, सारे भारतवर्ष अेकछत्री नि अेकराष्ट्र केले! ह्या वैशिष्ट्याप्रमाणेच त्या मौर्य साम्राज्याचे आणखी अेक वैशिष्ट्ये हे की, अैतिहासिक पद्धतीने, अगदी मोजूनमापून म्हटले तरी त्या काळच्या जगातील ग्रीससुद्धा साऱ्या राष्ट्रांमध्ये सैनिकबळातही भारत बलिष्ठतम होते.

चाणक्याच्या प्रबळ प्रबंधाप्रमाणे अुभारलेल्या नि शस्त्रसज्ज राखलेल्या ह्या, चतुरंगदलाच्या अजेय बळामुळेच, चंद्रगुप्ताच्या राज्यारोहणापासून, तो अशोक बौद्ध झाल्यानंतरही त्याच्या मृत्यूपर्यंत, अुणीपुरी शंभर वर्षे त्या मौर्यकालीन अखिल भारतीय साम्राज्यास, भूमिमार्गे वा समुद्रमार्गे कोणतीही सीमा अुल्लंघून, जगातील कोणताही शत्रू काहीही अुपद्रव देअू शकला नाही!

### पुण्यश्लोक अशोक

सम्राट बिंदुसार अि. सनपूर्व २७३ व्या वर्षी वारला. त्याच्या सिंहासनावर त्याचा पुत्र अशोक हा स्वतःच्या वडील भावास बाजूस सारून आरूढ झाला. आपल्या अितिहासातच नव्हे, तर जगाच्या अितिहासात ज्याचे संकीर्तन 'पुण्यश्लोक नृपावलीत' केले जावे अशी सम्राट अशोकाची योग्यता होती. तथापि, ह्या पुस्तकातील सोनेरी पानांची जी कसोटी आणि विषयक्षेत्र आखून घेतलेले आहे, त्यात सम्राट अशोककालीन पान बसत नाही. ह्यास्तव, त्याच्या राजवटीचा अधिक अुल्लेख करता येत नाही.

तथापि अशोकाने बौद्धधर्माची दीक्षा घेतल्यानंतर, त्या धर्मातील अहिंसाप्रभृती काही तत्त्वांचा नि आचारांचा जो अतिरेकी पुरस्कार केला, त्याचा, भारतीय राजकारणावर, राजकीय स्वातंत्र्यावर, अितका हानिकारक परिणाम झालेला आहे की सम्राट अशोकाच्याच नव्हे, तर मुख्यतः, बौद्धधर्माच्याही, त्या तत्त्वांविषयी नि प्रवृत्तींविषयी अिथे नि ह्या पुस्तकाच्या पुढच्या भागातही, अवश्य ती चर्चा केली पाहिजे.

## नमो भगवते बुद्धाय!

बौद्धधर्मातील राष्ट्रविघातक अशा, काही प्रवृत्तींची नि परिणामांचीही चर्चा करण्याच्या आधी, माझ्या मतांचा विपर्यास होऊ नये म्हणून, अिथे आरंभीच, हे सांगणे, मी माझे कर्तव्य समजतो की, स्वतः बुद्धदेवाविषयी किंवा त्याच्या बौद्धधर्माविषयी, अेकंदरीत मला अत्यंत आदर वाटत आहे. भारतीय अितिहासात, अेकाहून अेक अुत्तुंग अशी, महान नि जागतिक विभूतींची, जी हिमालयीन शिखरे आहेत, त्यातील, अेका अुत्तुंग शिखराचे नाव आहे भगवान बुद्ध! ह्या आदरापुरता, त्याच्या शिष्याप्रमाणेच, त्याच्या मूर्तीपुढे नम्र होअून, मीही म्हणतो, 'नमो भगवते बुद्धाय!' ज्या हिंदुराष्ट्राने त्यांना जन्म दिला ते हिंदुराष्ट्रही आज त्यांना श्रीविष्णूंचा नववा अवतार मानीत आहे, तेही अेवढ्यासाठीच!

## बौद्धधर्म भारतातून नामशेष का झाला?

बौद्धधर्म हा, अशोकाच्या आधी तीनशे वर्षे तरी, मगधाचे आजूबाजूला, अुपदेशिला जात होता. त्याचा प्रचार तोपर्यंत, बहुशः, मतपरिवर्तनाने होअी. त्यामुळे, त्याचा प्रसारही मंदगतीने चाले. मागे, सांगितलेच आहे की शिकंदर सेल्युकसच्या कालापर्यंत, पंचनद (पंजाब), सिंध, गांधारप्रभृती प्रांतांत, बौद्धधर्माचे नावही फारसे, अैकिवात नव्हते. ग्रीकांना तर, त्याचा, पत्ताही नव्हता. बहुतेक अितिहासकारांचा असा समज झालेला आहे, की, बौद्धधर्म हा, वेदाचे प्रामाण्य न मानणारा आणि अेकंदरीत निरीश्वरवादी असल्यामुळे त्यावेळच्या, वैदिकधर्माभिमानी जनतेने, त्याचा प्रबळ विरोध केला आणि त्यामुळे, शेवटी, तो धर्म भारतातून नामशेष होअून गेला. परंतु, आजपर्यंतची दृढावलेली ही समजूत, सर्वांशी सत्य नाही. कारण, गौतमबुद्धानेच, अवैदिक किंवा निरीश्वरवादी किंवा शून्यवादी धर्मपंथ काढला, हेच, मुळात अतथ्य आहे. स्वतः बुद्ध जन्मला त्याचे आधी, अुणेपुरे, अवैदिक नि निरीश्वरवादी, पन्नास-साठ धर्मपंथ, भारतात प्रचलित होते. हे बुद्धग्रंथांनासुद्धा मान्य आहे. वैदिक नि अवैदिक तत्त्वज्ञानाचे नि प्रचारकांचे बौद्धिक वादविवाद होत. मतपरिवर्तनाने, ज्याला जो धर्मपंथ रुचेल, तो, त्या धर्मपंथात जाअी. बुद्धकालापासून शंकराचार्यांच्या कालापर्यंत, तत्त्वज्ञानाच्या आणि बौद्धिक संघर्षाच्या आघाताने, बौद्धधर्मास, काही अंशी हार खावी लागली, ही गोष्ट, जरी सत्य असली तरी, वैदिक धर्माभिमानी ब्राह्मण, क्षत्रियादी जनतेला बौद्धधर्माचा नि विशेषतः, त्याची, पुढे पुढे जी विकृती होत गेली, तिलाच अनुसरणाऱ्या, बौद्धांचा जो अगदी तिटकारा आला, त्याचे मुख्य कारण, तात्त्विक किंवा बौद्धिक, हेच काय ते नसून, ते राष्ट्रीय नि राजकीयही आहे. ते कसे, ते, ह्या पुस्तकाच्या कक्षेत मावेल त्या प्रमाणात, पुढे, यथाप्रसंगी सांगण्यात येअील.

## अशोकाने वैदिकधर्मीयांवर बौद्धधर्म बळाने लादला

अशोकाने बौद्धधर्म स्वीकारल्यानंतर त्याच्या राजवटीच्या अुत्तरार्धात, त्याच्या अंगी, त्या बौद्धधर्माचा अभिनिवेश अितका संचारला की, तोपर्यंत, केवळ अुपदेशाने, त्या मताचा जो प्रचार होत होता, तो पुरेसा नाही, असे वाटून, त्याने आपल्या सर्व साम्राज्यात, वैदिकधर्मातील अत्यंत मूलभूत, परंतु बौद्धधर्मात निषिद्ध मानलेल्या, अशा धर्माचारांना, अेखाद्या अपराधाप्रमाणे दंड्य ठरविले. अुदाहरणार्थ, दोन - तीनच गोष्टी स्थलाभावामुळे येथे देअू. यज्ञयागांना ते हिंसाप्रधान म्हणून, आपल्या साऱ्या साम्राज्यात, त्याने बंदी केली. यज्ञसंस्था, ही वैदिकधर्माचे आद्य केंद्र. त्या यज्ञसंस्थेच्या केंद्राभोवती, वेदकालापासून, भारतीयांची महान संस्कृती विकसून भरभराटलेली होती. ते यज्ञ राजदंडाच्या बळाने, अकस्मात दंड्य ठरविल्यामुळे, अशोकाच्या साम्राज्यात, ८० टक्के असणाऱ्या ब्राह्मण, क्षत्रियादिक वैदिकधर्मीयांत, केवढा क्षोभ माजला असेल याची कल्पनाच केलेली बरी. अशोकाने मृगयाही निषिद्ध, दंड्य ठरविली. वैदिक धर्मात, क्षत्रियांचे मृगया हे अेक, मुख्य कर्तव्य होते. त्यातही, लक्षावधी लोकांच्या आहारासाठी मासे, कोंबड्या मारणे हे निषिद्ध ठरविले गेले. ते तर राहोच, पण, घनघोर अरण्यांतून वावरणाऱ्या आणि वारंवार मनुष्यवस्तीत शिरून, माणसांनाही गट्ट करणाऱ्या, सिंह-व्याघ्रादी क्रूर पशूंची मृगयाही, 'प्राणिहिंसा करू नये' ह्या, निरपवादपणे आचरू गेल्यास, अगदी दुबळ्या नि मनुष्यघातक ठरणाऱ्या बुद्धमतासाठी, अशोकाने दंड्य ठरविली. ब्राह्मण, क्षत्रियादी वैदिक धर्मीयांच्या धर्माचरणावर, अशोक अिकडे

अत्याचारी बंदी घालीत असताना, तिकडे त्याच्या मोठमोठ्या स्तंभावरून, अुपदेश कोरून ठेवीत असे की, ''सर्वधर्मीयांशी सहिष्णुतेने वागावे! श्रमणांचा आणि ब्राह्मणांचा सत्कार करावा!'' ह्या त्याच्या कृत्यातील धडधडीत विसंगती, त्याच्यासारख्या, संयमशील नि विवेकी सम्राटाच्याही ध्यानात येअू नये, हे आश्चर्य आहे.

बौद्धधर्माच्या काही शिकवणींचा, राष्ट्रीय शक्तीवर नि समाजधारणेवर, घातक परिणाम झाल्यावाचून राहणार नाही, हे आर्य चाणक्याने, अशोकाच्या आधीच, पन्नास वर्षे हेरून ठेवलेले होते. ह्यास्तव, मौर्य साम्राज्याचा सारा राज्यप्रबंध ज्या 'अर्थशास्त्रा' वर आधारलेला होता, त्या, आपल्या 'अर्थशास्त्र' ह्या ग्रंथात, संसार सोडून भिक्षू होअू अिच्छिणाऱ्यांसाठी, काही राष्ट्रीय दृष्टीने अुपयुक्त असे, प्रतिबंध त्याने घातलेले होते. अुदाहरणार्थ, चाणक्याचा अेक दंडक असा आहे की, 'अल्पवयी स्त्रीने तिच्या मातापित्यांच्या नि राजसत्तेच्या अनुज्ञेवाचून, संसार सोडून, भिक्षुसंघात प्रवेश करू नये.' दुसऱ्या अेका दंडकाप्रमाणे, 'कोणाही पुरुषास त्याचेवर अवलंबून असलेल्या स्त्रिया-मुलांची व्यवस्था लावण्यापूर्वी, भिक्षु होण्यास, मज्जाव केलेला आहे!' परंतु, अशोकाचे काळात नि नंतर, हे प्रतिबंध लुप्त झाले; आणि कोणत्याही, लहानमोठ्या माणसास संसार सोडून, भिक्षुसंघात जाण्यास, सरळ मोकळीक झाली. ह्या भिक्षुसंघात शिरलेल्या सहस्त्रावधी लेकांना, अन्न-वस्त्र-शय्या-निवासादींच्या सोयी, धर्मार्थ, फुकट केल्या जात असत; आणि त्यांचा सारा व्यय, राजकोषातून, होअी. अशोकाने, त्याच्या साम्राज्याच्या कोषातील, कोट्यानुकोटी रुपयांचा व्यय, अशा भिक्षुसंघांकरिता मोठमोठे विहार बांधण्यासाठी आणि त्यातून निवसणाऱ्या लक्षावधी भिक्षूंची अुपजीविका चालविण्यासाठी चालविला होता. परंतु, साम्राज्याचा हा सारा राज्यकोष, बहुतांशी साम्राज्यातील वैदिकधर्मीयांच्या करांतून, संपत्तीतून भरला जात होता; आणि त्याचा विनियोग, त्यांच्या विरुद्ध जाणाऱ्या, बुद्धमताच्या, सार्वत्रिक प्रचारावर, होत होता! ही, त्यांच्याच संपत्तीची, त्यांच्याच विरुद्ध पक्ष बलवान करण्यासाठी, केलेली अुधळपट्टी, त्या वैदिकधर्मीय जनतेस असह्य होअून, त्यांच्यात, तीव्र, असंतोष वाढत जावा, हे साहजिकच होते.

## साम्राज्याच्या शस्त्रबळाच्या मुळावरच घाव!

परंतु, राजदंडाच्या बळाने, अशोकाने साऱ्या साम्राज्यात आणि बाह्य देशीही, चालविलेल्या, बौद्धधर्मातील अतिरेकी, अहिंसेच्या प्रचाराचा, भारतीय साम्राज्याच्या मुळावरच, जो घाव पडत होता, तो, वरच्या अितर कृत्यांहूनही राष्ट्रीय अस्तित्वास नि स्वातंत्र्यास, अधिक हानिकारक होता. सर्वच शस्त्रबळ हे हिंसामय आणि पापकारक आहे. क्षात्रधर्म आचरणारे, हे, हिंसक नि अधर्म्य वर्गात मोडणारे असून, जे जे कोणी, अहिंसेची शपथ घेअून, शस्त्रत्याग करून, संसार सोडून, भिक्षू होअून, विहारविहारांतूनच, बौद्धधर्मानुसार, जगत राहतील त्यांचा वर्ग, हा, राष्ट्राच्या संरक्षणासाठी लढणाऱ्या नि हताहत होणाऱ्या क्षत्रिय, सैनिक वीरांपेक्षाही अुच्चतर, पुण्यकर नि पूजार्हतर आहे, असा बौद्धधर्मोपदेश, जिकडे तिकडे, अशोकाने नेमलेल्या नि पोसलेल्या, सहस्त्रावधी भिक्षूंकडून, चालू झाल्यामुळे सामान्य समाजातसुद्धा, शस्त्रधारी नि वीरवृत्ती अशा कोणाही सैनिकापेक्षा, कोणीही अैतखाअू भटकता भिक्षू हा, मानार्ह आणि धर्माचरणी समजला जाअू लागला.

अशोकाने, त्याच्या स्तंभावर, अितर धर्मांतूनही आढळणारे, अेक ठराविक वाक्य कोरले आहे की, 'शस्त्रविजयापेक्षा, धर्मविजय, हा, श्रेष्ठ आहे.' पण, तो धर्मविजय हा अैहिक जगात शक्य आहे काय? व्यवहार्य आहे काय? अमृत प्याले असता मनुष्य अमर होतो; होत असेल, पण, ते अमृत, ह्या अैहिक जगात, कोणत्या दुकानात मिळते त्याचा पत्ता, कोणी सांगू शकत आहे का? 'बोलाचीच कढी बोलाचाच भात, जेवूनिया तृप्त कोण झाला?'

ज्या साम्राज्यीय अपार साधनांच्या, सत्तेच्या नि संपत्तीच्या आधारामुळे, सम्राट अशोक, साऱ्या भारतात आणि त्यावेळच्या परराष्ट्रांतही, धर्मविजय हा शस्त्रविजयापेक्षा श्रेष्ठ आहे', असे अुपदेशीत होता, ते, त्याचे साम्राज्यच त्या चाणक्य-चंद्रगुप्तांनी अुभारलेल्या, प्रबळ नि अजेय अशा चतुरंग सैन्याच्या शस्त्रबळानेच काय ते, संपादिलेले नव्हते काय? आणि अशोक सिंहासनावर येताच, जर ते चतुरंग सैन्यबळ, सारेच्या सारे बुद्धधर्मी होअून, शस्त्रत्याग करून आणि अैतखाअू भिक्षू होअून विहाराविहारांतून घोरत पडते, तर, स्वतः अशोकच सम्राट म्हणून अेक क्षणभर तरी, टिकू

शकला असता का? भारताच्या अवतीभोवती, तेव्हाही जी ग्रीक राष्ट्रे आणि त्यांच्याही पलीकडे, अत्यंत कडवी, हिंसक नि केवळ शस्त्राचारी शक-कुशाण - हूणादि राष्ट्रे, भारताच्या चतुरंग नि अजिंक्य सेनेच्या भयानेच काय ती तोवर दूर दूर दडून बसलेली होती, ती सारीच्या सारी, त्या भिक्षुमय बनलेल्या भारतावर सिंहासारखी झडप घालून त्यांच्या क्रूर नखांनी, अशोकाच्या त्या त्यक्तशस्त्र धर्मविजयाचाच गळा घोटून, त्याचे रक्त प्याली नसती का?

पण, ही, 'जर तर' ची चर्चाच करण्याचे कारण नाही, भारतीय क्षात्रवृत्तीचा नायनाट करू पाहणाऱ्या, केवळ, अशोकाच्याच नव्हे, तर माझ्या 'संन्यस्त खड्ग' नाटकात वर्णिल्याप्रमाणे, स्वतः, बुद्धाच्याच अुपदेशाचा वस्तुतः, तसा परिणाम, भारताच्या दुर्दैवाने त्याकाळीच, भारताला भोगावा लागला आहे. तोच दुर्दैवी परिणाम आणि त्याचा, वैदिकधर्मीयांनी केलेला, यशस्वी प्रतिकार, आता वर्णावयाचा आहे.

## धर्मांची नव्हे, तर त्यांच्या राजकारणविषयक परिणामांची चर्चा

हे वर्णन करताना, वैदिक किंवा बौद्ध-धर्मातील, तत्त्वांची किंवा त्याच्या कर्मकांडातील यज्ञ-याग-संन्यासादि आचारांची,पारलौकिकदृष्ट्या, छाननी करण्याचा हेतू तर नाहीच नाही; पण, अैहिकदृष्ट्यासुद्धा, सर्वांगीण पाहणी वा तुलना, करण्याचा आमचा मानस नाही. त्या तत्त्वांपैकी, आज काय काय विश्वासार्ह आहे किंवा त्यांच्या आचारांपैकी, आज अनुकरणीय काय आहे, हा प्रश्नसुद्धा अप्रस्तुत, म्हणून, अुपस्थित केला जाणार नाही. ह्या पुस्तकात, त्या त्या काळी, ह्या नि अितर धर्मातील मतांचे नि त्यांच्या अनुयायांच्या कृत्यांचे, भारताच्या त्या त्या काळच्या राजकीय जीवनावर, जे राष्ट्रीय नि राजकारणविषयक, परिणाम घडले त्यांची चर्चा काय ती, करण्याचा आमचा मानस आहे. कारण, तसे अैतिहासिक विश्लेषण केल्यावाचून, त्या अितिहासाचे धागेदोरे अुलगडता येणेच अशक्य आहे.

## अशोकाच्या मृत्यूनंतर

स्वतःच्या धर्मनिष्ठेप्रमाणे, लोककल्याणार्थ, शेवटपर्यंत झटणारा, हा पुण्यश्लोक सम्राट अशोक, अि.स. पूर्व २३२ मध्ये वारला. त्याचा अंत हाच त्या भव्यतम भारतीय, मौर्य साम्राज्याच्या अंताचा आरंभ ठरला! अशोकाच्या शेवटच्या २५ वर्षात, त्याने, आपले सारे तनमनधन बुद्धमताच्या प्रचारार्थ वाहिले. अशोकानंतर त्याच्या राज्यासनावर, जे त्याचे वंशज अनुक्रमे बसले, तेही सारे प्रामाणिक बौद्धधर्मीय आणि म्हणूनच, शस्त्रशक्तीने दुबळे, असे केवळ नामधारी राजे निघाले. त्या अहिंसाप्रवण अशा, बौद्धधर्माच्या अतिरेकी अनुयायांकडून नि राज्यकर्त्यांकडून, ह्या चाळीसपन्नास वर्षांत झालेल्या, साम्राज्यीय शस्त्रबळाच्या राष्ट्रघातक अुपेक्षेमुळे, मौर्य साम्राज्याच्या, विशेषतः, त्या वायव्य प्रांताकडची (सरसीमेकडची) सारी सैन्यसंघटना, अगदी विस्कळीत झालेली होती. ते पाहून, तोवर, केवळ मौर्य साम्राज्याच्या नावाच्या दराऱ्यानेच, दबून राहिलेल्या, भारताच्या बाहेरील शत्रूंनी, अशोकाच्या मृत्यूनंतर, अवघ्या तीसअेक वर्षांच्या आतच, भारतावर, चढाअी करण्याचे धाडस पुन्हा केले.

## बॅक्ट्रियन ग्रीकांची भारतावर स्वारी

सम्राट चंद्रगुप्ताने, सेल्युकस निकेटरचा पराभव करून, अिसवी सनपूर्व ३१५ च्या जवळपास, ग्रीकांना, हिंदुकुशच्या पलीकडे, पिटाळून लावले होते. त्या काळी भारताची सरसीमा असलेल्या ह्या, हिंदुकुशाच्या त्या पलीकडच्या बाजूला लागूनच जो बॅक्ट्रिया नावाचा, प्रांत होता त्यात, सेल्युकस निकेटरने, आपले स्वतंत्र ग्रीक राज्य प्रस्थापिले होते. ते, स्वतंत्र असल्यामुळेच, तेथून, सुदूर असलेल्या मूळच्या युरोपियन ग्रीक राज्याशी, त्याचा, काही संबंध अुरलेला नव्हता; जर असलाच, तर, तो संबंध, परस्पर वैराचा काय तो होता. त्यामुळे, ह्या बॅक्ट्रियन ग्रीकांना, 'आशियाअी ग्रीक', असेच, म्हणत. शिकंदरच्या मूळच्या जातिवंत ग्रीकांपेक्षा, मधल्या शंभरअेक वर्षातील, तुटत गेलेल्या पिढ्यान पिढ्यांनी, हे बॅक्ट्रियन ग्रीक, हीन अवस्थेत पोचले होते. त्यांच्या शिकंदरी पूर्वजांचे, ते पहिले तेज, आता त्यांच्यात अुरलेले नव्हते. पण, जी अेकच गोष्ट त्यांच्यातही, अद्याप जीव धरून अुरली होती, ती भारत जिंकण्याची शिकंदरी महत्त्वाकांक्षा! मौर्य साम्राज्याच्या शस्त्रशक्तीची, वर सांगितल्याप्रमाणे, वाताहत झालेली पाहताच त्या बॅक्ट्रियन ग्रीकांच्या हृदयात, ती, भारतद्वेषी महत्त्वाकांक्षा पुन्हा अुसळून आली; आणि त्यांचा त्या वेळचा राजा जो डेमेट्रियस त्याने हिंदुकुश ओलांडून, भारतावर

धाड घातली. भारतीय सैन्याचा, कोणताही, म्हणण्यासारखा प्रतिकार होतच नसल्यामुळे, डेमेट्रियस हा काम्बोज, गांधार प्रभृती प्रांत घेऊन सिंधुनदी अुतरला. पुढे, सारा पंचनदही (पंजाबही) हस्तगत करून, तो यवनाधीश, प्रत्यक्ष मगधावर चाल करण्यासाठी, ससैन्य, पुढे सरसावला. साऱ्या ग्रीक सैन्यात, मोठा वीरोत्साह संचरून ते अशी घोषणा करू लागले की, ''शिकंदरचे जे स्वप्न होते की, पाटलीपुत्र जिंकून तेथे भारतीय सम्राट, म्हणून स्वतःची घोषणा करीन, ते, अलेक्झांडरचे भारतसाम्राज्य जिंकण्याचे स्वप्न, आम्ही आता, खरे करून दाखवितोच!''

## पंचनदादि प्रांतांत भारतीय वीरवृत्तीचा ऱ्हास अकस्मात का झाला?

हे केवढे आश्चर्य आहे की, ज्या हिंदुकुशापासून, पंचनदसिंधादि प्रांतांत, शंभर-सव्वाशे वर्षापूर्वी, शिकंदर - सेल्युकससारख्या, जगद्विख्यात ग्रीक सेनानींच्या नि सैन्याच्या स्वाऱ्यांचा, त्या त्या प्रांतांतील भारतीय क्षत्रियांनी, गणराज्यांनी, सैनिकांनी आणि जनतेने बोजवारा अुडवून, त्यांना, मागे पिटाळून दिले, त्याच पराक्रमी भारतीय प्रांतांना, ह्या बॅक्ट्रियन ग्रीकांसारख्या, दुर्बलतर नि अधःपतित अशा आशियाअी ग्रीकांनी असे, केवळ चालता चालता जिंकून घ्यावे! पदोपदी, लढाया देणाऱ्या भारतीय वीरवरांच्या धास्तीमुळे, शिकंदर, सेल्युकसला ह्याच प्रांतांमध्ये लढत असता, स्वतःच्या तंबूतही, स्वस्थ, झोप घेता येत नसे; पण हे दुय्यम प्रगतीचे बॅक्ट्रियन ग्रीक सेनानी, विजयाच्या सुरक्षिततेत, आज, अयोध्येच्या प्रासादामध्ये, सुखाने झोपत आहेत.

अशोकाने, बौद्धधर्म स्वीकारल्यानंतर, तीस-चाळीस वर्षातच, डेमेट्रियसची ही ग्रीक स्वारी झाली. मध्यंतरीच्या ह्या तीस-चाळीस वर्षांतच त्या गांधार, पंचनदादि झुंजार प्रांतांतील, भारतीय प्रतिकारशक्तीचा नि वीरवृत्तीचा अितका ऱ्हास, अकस्मात, कसा झाला? अशी कोणती विशेष घटना, ह्या तीस-चाळीस वर्षात घडली की, जिच्यामुळे, हा भारतीय वीरवृत्तीचा ऱ्हास अपरिहार्य ठरावा?

शिकंदर सेल्युकसच्या ग्रीक सैन्यापेक्षा, हे डेमेट्रियसच्या सेनापतित्वाखाली, चालून आलेले बॅक्ट्रियन ग्रीक सैन्य, काय अधिक पराक्रमी होते? मुळीच नव्हे! अुलट, ते स्वतःच मानीत असत, की, त्यांचे सिकंदर, सेल्युकसच्या वेळचे पूर्वज, त्यांच्यापेक्षा अधिक पराक्रमी आणि जवळ जवळ, दैविक योग्यतेचे होते. म्हणजे, अशा हीनतर आणि दुर्बलतर यवनांनी, त्या त्या प्रांतांतून भारतीयांना, नुसते चालता चालता, जे यावेळी जिंकले ते, शिकंदरच्या कालापेक्षा भारतशत्रू ग्रीकांचे बळ वाढले म्हणून नव्हे; तर तिकडच्या, भारतीयांच्याच प्रतिकारशक्तीचा नि वीरवृत्तीचा, भयंकर, ऱ्हास झाला असला पाहिजे म्हणूनच होय.

अर्थात, शिकंदरच्या, अिसवी सनपूर्व ३२७ व्या वर्षाच्या, स्वारीपासून डेमेट्रियसच्या ह्या, साधारणतः अिसवी सनपूर्व २०० व्या वर्षाच्या, स्वारीच्या मध्यंतरी, भारतीयांच्या, परशत्रु प्रतिकारशक्तीचा नि वीरवृत्तीचा ऱ्हास करण्यासाठी मुख्यतः, अेकच अेक घटना जी घडली ती अशोकाने बौद्धधर्म स्वीकारल्यानंतर, आपल्या राजदंडाच्या बळाने, जो अप्रतिकारी, अहिंसक, शस्त्रबळनिंदक बुद्धमतांचा अतिरेकी प्रचार त्या त्या प्रांतांतून केला, तीच असली पाहिजे. कारण, दुसरी अशी महत्त्वाची नि अशा प्रकारची, घटना घडलीच नाही. त्याविषयीची तुलनात्मक, अशी दोनतीन विधेये, (Points) स्पष्टीकरणार्थ घेअू.

## अलेक्झांडरच्या वेळची भारतीय मनोवृत्ती आणि डेमेट्रियसच्या वेळची भारतीय मनोवृत्ती

शिकंदरच्या वेळी काम्बोज, गांधार, पंचनद ते सिंध प्रभृती प्रांतांत, बौद्ध धर्माचे नावसुद्धा जनतेस माहीत नव्हते. ती भारतीय जनता वीरपूजक वैदिक धर्मावलंबी होती. क्षात्रवृत्तीचा अभिमान धरणारी यौधेयांसारखी गणराज्ये, स्वतःस आयुधजीवी, (Nation in Arms) ही अभिधाने, एखाद्या बिरुदावलीसारखी, अभिमानाने, लावून घेत, केवळ क्षत्रियवर्णच नव्हे, तर, काही काही 'संघां'तून, सारेच्या सारे भारतीय नागरिक, स्त्री-पुरुषसुद्धा, परराष्ट्राचे आक्रमण होताच समरांगणात सशस्त्र होअून लढावयास जात. दुर्दैवाने जेथे कोणा 'जनसंघाचा' पराभव होअी तेथे तेथे यवनांच्या

हाती जिवंतपणी पडण्यापेक्षा, भारतीय वीरांगना वीरशिशूंसह, जोहार करून, अग्निप्रलयात अुड्या घेत, भस्म होत! हे सर्व वर्णन, ह्या पुस्तकात, आलेच आहे. आणखी अेकच गोष्ट, त्या चाणक्य चंद्रगुप्तांच्या काळच्या, वैदिकधर्मीय भारतीयांच्या स्वराष्ट्रसंरक्षक वीरवृत्तीचे द्योतक, म्हणून देअू म्हणजे झाले.

'अर्थशास्त्र' ह्या, वैदिकधर्मीय आर्य चाणक्याच्या, ज्या ग्रंथातल्या राज्यप्रबंधाप्रमाणेच, चंद्रगुप्ताच्या भव्यतम भारतीय साम्राज्याच्या प्रबंध बहुशः चालत असे, त्या ग्रंथात, भारतीय स्वातंत्र्य नि भारतीय साम्राज्यरक्षणार्थ अवश्य असलेल्या क्षात्रवृत्तीचा, केवढा गौरव केलेला आहे तो पाहा. चाणक्याच्या प्रबंधाप्रमाणे सैन्यामध्ये ब्राह्मणांसुद्धा साऱ्या वर्णांच्या नागरिकांना प्रवेश मिळत असे. 'अमर्यादप्रवृत्तेच शत्रुभिः संगरे कृते । सर्वे वर्णाश्च दृश्येयुः शस्त्रवन्तो युधिष्ठिर ।।' ही वैदिकधर्मीयांची परंपराच होती. जेव्हा हे असे साम्राज्यीय महासैन्य, परशत्रूवर चाल करण्यासाठी रणांगणात अुतरे, तेव्हा चाणक्य आज्ञापितो, "स्वतः सम्राटाने त्या चतुरंग, दलभारास संबोधून असे भाषण करावे :

"वेदेष्वप्यनुश्रूयते समाप्तदक्षिणानाम् यज्ञानामवभृथस्नानेषु या सा गतिः शूराणामिती । क्षणेन तामप्यतियान्ति शूराः, प्राणान् सुयुद्धेषु परित्यजन्ति । तुल्यभोगोऽस्मि, भवद्भिः सह भोग्यमिदं राज्यम् । परान् हन्तव्यम् ।"

भावार्थ की, 'जी यज्ञाने सद्‌गती तीच सद्‌गती शूरांना रणात मिळते! न्याय्य युद्धात (सुयुद्धे) प्राणार्पण करणाऱ्या शूरांना तत्क्षणी स्वर्ग प्राप्त होतो. हे राज्य जसे मी, तसेच, तुम्हीही, अुपभोगणारे आहात. मग, पाहता काय? शत्रूंवर तुटून पडा, त्यांचा वध करा!'

कोणी सांगावे! ह्याच ज्वलंत शब्दांत, सेल्युकसवर चढून जाणाऱ्या, आपल्या अजिंक्य भारतीय दलभाराला, स्वतः, सम्राट चंद्रगुप्तानेही, अुत्तेजिले असावे!

आक्रमक, अन्याय्य, 'परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्,' असे जे सशस्त्र युद्ध लढावे लागते तशा युद्धास वैदिकधर्म 'हिंसक' हे विशेषण लावीतच नाही. त्यास तो 'धर्मयुद्ध'च म्हणतो.

शिकंदराच्या वेळी, भारतीय स्वातंत्र्याच्या संरक्षणार्थ, यवनशत्रूंशी, असे धर्मयुद्ध लढण्यासाठी, तिकडच्या साऱ्या प्रांतात, वैदिकधर्मीय प्रचारक, वीरश्रीची आग पेटवीत चालले होते. त्यांपैकी, कित्येक ब्राह्मणादि राष्ट्रीय प्रचारकांना धरून, शिकंदर, फाशीही देत चालला होता!

अशा, वीरश्रीने रसरसलेल्या चंद्रगुप्ताच्या भारतीय सैन्याने, यवनाधिप सेल्युकसचा पराभव केल्यानंतर, त्या हिंदुकुशपर्यंतच्या, भारतीय साम्राज्याचे नि स्वातंत्र्याचे संरक्षणार्थ, चंद्रगुप्त-चाणक्यांनी, त्या वेळच्या, सर्व जगातील बलाढ्यतम अशा, आपल्या चतुरंग सैन्याचा, पोलादी तट, अुभारून ठेवला, त्या, त्याच्या शस्त्रबळाच्या भीतीनेच, हिंदुकुशपलीकडील बॅक्ट्रियामध्ये दबलेल्या नि दडलेल्या, ग्रीकांच्या राज्याने, साधारणतः १२५ वर्षेपर्यंत, भारताविरुद्ध, चकारशब्द काढला नाही. सम्राट अशोक, ह्या वीरवृत्तिपूजक वैदिकधर्माचा, अनुयायी, म्हणवीत होता तोपर्यंत, म्हणजे साधारणतः, अिसवी सनपूर्व २५२ पर्यंत, भारतीय मौर्यसाम्राज्याच्या, ह्या, वायव्य सरसीमेकडचा हा सैन्यसंभार तसाच्या तसाच, शस्त्रसज्ज नि अजिंक्य होता. परंतु -

परंतु, अशोकाने बौद्धधर्म स्वीकारताच, ही सारी सुरक्षितता, अकस्मात कोसळली. स्वतः गौतम बुद्धाने, त्याचे अिवलेसे शाक्य-राज्य सोडून, जसे, स्वतःच भिक्षुपण स्वीकारले, तसे, अशोकाने बौद्धधर्म स्वीकारताच, आपले सम्राटपद, जर सोडून दिले असते आणि भिक्षू होअून तो, बौद्धधर्माचा प्रचार करीत हिंडता, तर भारतीय राष्ट्रावर, मोठेसे संकट कोसळले नसते. अशोकाच्या, बौद्धधर्म-निष्ठेचीही, खरी कसोटी लागती. पण, मरेतोपर्यंत, अशोकास, भारतीय महाराज्याचे सम्राटपद, काही, सोडवले नाही. अुलट, त्याने त्या साम्राज्यासच, बौद्धधर्माचा, अेक प्रचारक मठ बनवून टाकले! अर्थात ह्या, वायव्येकडच्या पर्वतीय प्रांतात, (सरसीमेकडच्या प्रांतात), 'धर्मविजय हा शस्त्रविजयापेक्षा श्रेष्ठ आहे', 'अक्रोधेन जयेत् क्रोधम्', 'अहिंसा परमो धर्मः' 'मा हिंस्यात्सर्वभूतानि' प्रभृती, देशकालपात्रानुसार, आचरली गेली असता, हितकारक असणारी आणि वैदिकधर्मातच ज्यांचे मूळ आहे अशी, सूक्ते देशकालपात्रांचा विवेक सोडून नि निरपवाद सत्ये म्हणून, बौद्धधर्मात जशी प्रचारिली जात, तशी, प्रचारिली जाअू लागली. अशोकाच्या साम्राज्यकोषातून, पोसलेले नि

पाळलेले बौद्धभिक्षूंचे तांडेच्या तांडे, त्या प्रांतात, ''शस्त्रबळ हे पाप आहे'', असा प्रचार करीत, हिंडू लागले. जे बौद्धधर्मीय असतील, त्यांनाच, साम्राज्यातील 'धर्ममहामात्य', प्रांतीय अधिकारी, 'रज्जुक' नावाचे, अशोकाचे, विश्वासू राजकर्मचारी म्हणून, अुच्चपदी नेमले जाअू लागले. ह्या सर्वांना, अशोकाच्या आज्ञेप्रमाणे, बौद्धधर्मप्रचारास नि आचारास, शक्य ते ते राज्यीय प्रोत्साहन, द्यावे लागे. गांधार, पंचनदप्रभृती प्रांतांतही बौद्धधर्मीय प्रचार, नागरिकांतच नव्हे, तर, सैनिकांतूनही, चालू लागला. अर्थात, ज्या प्रमाणात वरील अहिंसादि बौद्धमतांचा अतिरेकी प्रचार जिकडे तिकडे राजदंडबळाने होअू लागला, त्याच प्रमाणात, त्या भारताच्या वायव्यपर्वताकडील प्रांतातही, क्षात्रवृत्ती नि शस्त्रबळ अुणावत गेले. वीस वर्षे, असा वीरवृत्तिविरोधक नि अराष्ट्रीय प्रचार केल्यानंतर, अशोक वारला. त्याच्या राज्यासनावर आलेल्या, दुबळ्या बौद्धधर्मीय वंशजांनी तर, त्या, पर्वतीय प्रांतांच्या संरक्षणार्थ, चंद्रगुप्तापासून शस्त्रसज्ज ठाणात अुभ्या असलेल्या भारतीय सैन्यसंभाराच्या, त्या अजिंक्य पोलादी कोटाची, अशोकाहूनही, अितकी अुपेक्षा केली की, पायाच ढासळल्यामुळे, दुर्ग ढासळावा; त्याप्रमाणे, ढासळून गेला.

## सारांश

बौद्धधर्माच्या, शस्त्रबळनिंदक आदी, राष्ट्रस्वातंत्र्यासाठी झुंजणाऱ्या वीरवृत्तीची अक्षम्य अुपेक्षा करणाऱ्या, मतांचा, अेकांगी नि अतिरेकी, प्रचार भारतीय जनतेत राजदंडाच्या बळाने, अशोक नि त्याचे वंशज, यांनी, साम्राज्यभर जो केला, साऱ्या साम्राज्याचे, बौद्धमठीकरण आणि सैनिकांचे बौद्धभिक्षुकीकरण, जे केले त्यामुळे, भारताच्या अत्यंत महत्त्वाच्या अशा, वायव्येकडील, पर्वतीय प्रांतांतील जनतेत, वीरश्रीचा ऱ्हास, भारत राष्ट्राच्या दुर्दम्य अभिमानाचा नायनाट आणि चंद्रगुप्ताच्या वेळेपासून, त्या वेळच्या साऱ्या जगात, बलिष्ठतम असलेल्या शस्त्रसज्ज सैन्यव्यूहाची, ह्या, अंतर्गत क्षयाने, धूळधाण झाली. म्हणूनच, शिकंदर - सेल्युकसच्या मानाने, अगदी दुय्यम असणारे डेमेट्रियसचे ग्रीक सैन्य, हिंदुकुशपासून पंचनदसुद्धा, सारे भारतीय प्रांत, चालता चालता जिंकून, मगधाच्या दिशेने पुढे सरसावले.

सारी साम्राज्यसत्ता, बौद्धांच्या हाती असताही, त्यांचा कोणताही प्रांताधिप, राज्याधिकारी किंवा बौद्धीय जानपदसमूह, क्षुब्ध होअून, भारतीय स्वातंत्र्य छिनावण्यास येणाऱ्या, ह्या, यवनशत्रूशी रणांगणात झुंजण्यास सबळपणे पुढे आला नाही. भारताच्या, ह्या राष्ट्रीय अपमानाची, त्यांना, चीड आली नाही, लाज वाटली नाही. प्रत्यक्ष मगधात, जो अशोकाचा वंशज, स्वतःस अजून सम्राट म्हणवून घेत, राज्यासनावर बसलेला होता, तो, बौद्धधर्मीय बृहद्रथ राजा तर, या यवनशत्रूच्या प्रतिकारासाठी, पायही, पुढे टाकीना.

क्वचित, असेही असेल की, अशा निरपवाद 'अप्रतिकारा' ने, तो बौद्ध राजा, 'अक्रोधेन जयेत् क्रोधम्' ह्या, धम्मपदातील सूक्ताचा प्रयोग, बसल्या बसल्याच, ग्रीकांचे मन जिंकून, यशस्वी करू पाहत होता!

## वैदिक धर्मीयांचा राष्ट्रीय प्रक्षोभ!
## कलिंगाचा प्रतापी राजा खारवेल
## ग्रीकांवर चालून जातो

परंतु, ग्रीकांचे परचक्र, भारतीय स्वातंत्र्याला आणि राष्ट्रीय सन्मानाला, ग्रासीत आहे ह्याची राष्ट्रीय चिंता, लाज किंवा चीड, भारतीय बौद्धधर्मीयांना जरी वाटली नाही, तरी, भारतीय वैदिकधर्मीयांत मात्र, त्या राष्ट्रीय अपमानाने आणि त्या राष्ट्रीय संकटाने, जिकडे तिकडे, संतापाची आग पेटली. त्या संकटाचा, तत्काल प्रतिकार करण्याअितके, वैदिकधर्मीयांचे समर्थ राज्यकेंद्र, अुत्तर भारतात, अुरलेले नव्हते. परंतु, सुदैवाने, अशोकाच्या मृत्यूनंतर, दहाअेक वर्षातच, दक्षिण भारतातील कलिंग (ओरिसा) आणि आंध्र ह्या दोन्ही दाक्षिणात्य राज्यांनी, बौद्धधर्मीय, मौर्य सम्राटाचे, आधिपत्य झुगारून देअून, आपआपली, स्वतंत्र राज्ये स्थापिलेली होती. ते दोघेही पराक्रमी राजे, वैदिकधर्माभिमानी आणि म्हणूनच, भारतराष्ट्राभिमानी, होते. दोघांनीही प्रबळ सैन्य अुभारून, शस्त्रसज्ज, ठेवलेले होते. अुत्तर भारत, ग्रीक यवनांनी, पादाक्रान्त केला आहे आणि मगधाचा दुबळा बौद्धधर्मीय राजा, त्याचा, काहीही प्रतिकार

करू शकत नाही; ह्या घटना अैकून, ह्या दाक्षिणात्य राज्यांतील, वैदिकधर्माभिमानी जनतेत, मोठाच, प्रक्षोभ माजला. शेवटी, त्या, स्वतंत्र कलिंग राज्याचा, पराक्रमी अधिपती जो खारवेल, त्याने, डेमेट्रियसच्या ग्रीक सैन्यावर, स्वतः, चालून जाण्याचे ठरविले.

## यवनांची दाणादाण नि भरधाव पिछेहाट

प्रथम, प्रबल सेनेसह, त्याने मगध हस्तगत करून, मग, अयोध्येच्या आसपास, डेमेट्रियसच्या, यवन सैन्याला गाठले. कलिंगाच्या, त्या प्रबल भारतीय सैन्याने, यवनांची रणांगणात, अितकी दाणादाण अुडविली की, डेमेट्रियस पाठ फिरवून, भरधाव माघार घेत, आपल्या अुरलेल्या सैन्यासह, थेट पंचनदापलीकडे चालता झाला.

## राजसूय यज्ञ

यवनांना, भारताच्या पर्वताकडे (सरसीमेकडे) असे, हटविल्यानंतर, त्यांचा पाठलाग करण्यात किंवा त्या, अुत्तरेकडच्या, सर्व प्रदेशाची, पक्की व्यवस्था करण्यास, खारवेलला, फार वेळ मिळाला नाही. राजकारणामुळे, त्याला, लगोलग, कलिंगास परतावे लागले. मगधाचा बौद्ध राजा, बृहद्रथ मौर्य यासही, त्याने, पदच्युत केले नाही. कलिंगास परत येताच, भारताचे स्वातंत्र्य आणि सन्मान, ह्यांच्या रक्षणार्थ, यवनशत्रूवर, रणांगणात त्या पराक्रमी खारवेल राजाने, जो विजय मिळवला होता, त्याच्या, घोषणेप्रीत्यर्थ, वैदिक धर्मीय राजश्रेष्ठांच्या परंपरेप्रमाणे, त्याने, राजसूय नावाचा, मोठा यज्ञसमारंभ, केला. ह्या राजसूय यज्ञाचे वैशिष्ट्य, असे की, तो यज्ञ, मुख्यतः, राष्ट्रीय आणि राजकीय स्वरूपाचा असे. त्यातही, अशोकाने सर्व यज्ञयागांवर बलपूर्वक बंदी घातल्यानंतर, चाळीस-पन्नास वर्षेपर्यंत, जवळजवळ, साऱ्या भारतात, वैदिक धर्मीयांना, प्रकटपणे, यज्ञसमारंभ असा करताच आला नाही. परंतु, कलिंगात आणि आंध्रात, वैदिकधर्मीयांची स्वतंत्र नि बलिष्ठ राज्ये प्रस्थापिली जाताच आज अशोकाचा तो वैदिकधर्माचरणावरील, बलात्कारी प्रतिबंध अुघडपणे झुगारून देअून आणि भारताचे राष्ट्रीय शत्रू असणाऱ्या यवनांसारख्या, म्लेंच्छांचा, रणांगणात पराजय करून, हा वैदिकधर्मीयांचा, राजसूय यज्ञाचा समारंभ, पन्नास वर्षानंतर पहिल्यानेच, साजरा होत होता!

## चारअेक वर्षातच ग्रीकांची पुन्हा स्वारी

प्रतापी राजा खारवेल, दक्षिणेत, परत गेला आहे, हे पाहताच, काम्बोज आणि गांधार ह्या प्रांतांत, ठाण मांडून बसलेल्या आणि डेमेट्रियसच्या मगधावरील स्वारीची, जी दुर्दशा झाली, तिच्यामुळे, चिडून गेलेल्या, मिन्यांडर ह्या, ग्रीक सेनापतीने, चारअेक वर्षातच, ताज्या दमाच्या सैन्यानिशी, भारतावर पुन्हा चाल केली. डेमेट्रियसच्याच स्वारीप्रमाणे, ग्रीकांच्या ह्या स्वारीलाही, त्या, बौद्धबहुल नि म्हणूनच, प्रतिकारशून्य झालेल्या, पंचनदादि प्रांतांचा किंवा मगधाच्या, दुबळ्या अशोकवंशीय राजाचा, म्हणण्यासारखा असा, काही अेक, प्रतिकार झाला नाही.

## बौद्ध भारतीयांची भारतशत्रू ग्रीकांना सहानुभूती

अुलट, यवनसेनापती मिन्यांडर ह्यास, ह्या, भारतावरील स्वारीत, अनेक बौद्धधर्मीयांची, सहानुभूतीही मिळू लागली! कारण, बौद्धधर्मातील, अनेक मते, आपणास आवडतात आणि आपण लवकरच बौद्धधर्म स्वीकारू, असे तो, अुघडपणे बोलून दाखवी. त्यामुळे, हे ग्रीक लोक, केवळ, वैदिकधर्मीयांविरुद्धच काय ते, लढावयास आलेले आहेत आणि ह्यांचे राज्य, भारतावर झाले, तर, ते, आपल्याच बौद्धधर्मीयांचे होणार आहे. आता, ग्रीक लोक, परकीय, परराष्ट्रीय आहेत, हे खरे, पण, आपल्यास, राष्ट्राबिष्ट्राशी काय कर्तव्य आहे? बौद्ध धर्म, जाति, राष्ट्र, वंश मानीत नाही. अशी, राष्ट्रघातक भारतविद्रोही नि दुर्बुद्ध विचारसरणी, त्या बौद्ध म्हणविणाऱ्या, भारतीय जनतेत, अनेक भिक्षुप्रचारक अुपदेशू लागले! त्यांच्या सहानुभूतीच्या साहाय्याचा, भारतशत्रू मिन्यांडरलाही, परिणामकारक, अुपयोग होअू लागल्यामुळे, त्याच्या ग्रीक प्रचारकांकडून, त्यानेही, असा प्रचार, भारतीय बौद्ध जनतेत चालविला की, 'आपली स्वारी', ही, बौध्दांच्या अगदी दुबळ्या मगध राजाचे हातून, भारतीय साम्राज्यसत्ता छिनावून घेण्याचा, जो, भारतीय वैदिकधर्मीयांचा कट होत आहे, तो, हाणून पाडण्यासाठी, तेवढी, काय ती आहे! मिन्यांडर, पंचनदादि प्रदेश, पुन्हा, यवनांकित करीत, अयोध्येपर्यंत आला. अपक्ववेळी, घाअी केल्यामुळे, डेमेट्रियसची झाली, तशी, आपलीही, दुर्दशा

होऊ नये म्हणून, हातात आलेला भारतीय प्रदेश नि राज्य, संघटित करून नि अधिक सैन्याची भरती करून, मग, मगधावर झडप घालावी; अशा सावधपणे, तो, अयोध्येकडे स्थिरस्थावर झाला; आणि अनुकूल संधीची वाट पाहत, बळकट ठाण मांडून बसला.

## पण तिकडे पाटलीपुत्रात!

कलिंगाच्या, प्रतापी खारवेल राजाच्या विजयामुळे, अुत्तर भारतातील, वैदिकधर्मीय नेत्यांत नि जनतेत, वीरश्रीची लाट, आधीच, अुसळली होती. त्यातच मिन्यांडरचे ग्रीक सैन्य, पुन्हा मगधावर चालून येत आहे, ही, बातमी आली. त्यातही, भारतीय बौद्ध जनतेत, स्वदेशद्रोही प्रवृत्ती बळावत असून, राष्ट्रशत्रू ग्रीकांचे राज्य, भारतात स्थापिले जावे म्हणून, ती, मिन्यांडरला अनुकूल होत आहे; अशी स्पष्ट चिन्हे दिसू लागली. तेव्हा, ग्रीकांचा, अेकदाचा, निःशेष निःपात करण्यासाठी, प्रथमतः, मगधाचा तेव्हाचा बौद्धधर्मीय राजा, जो बृहद्रथ मौर्य, त्यालाच, सिंहासनावरून खाली ओढून, कोणा अेखाद्या चंद्रगुप्तासारख्या, पराक्रमी, वैदिकधर्मीय पुरुषालाच, सम्राटपदी, स्थापावे या हेतूने, अुत्तरेत राष्ट्राभिमानी भारतीय नेत्यांचे, अेक मोठे, राज्यक्रांतिकारक कारस्थान रचण्यात आले; पण, त्या सर्वांसमोर, मुख्य प्रश्न जो होता, तो हा की, यवनांचा निःपात करणारा आणि ह्या राज्यक्रांतीचे धुरंधरत्व पत्करणारा, असा, पराक्रमी पुरुष, आहे कोण?

## पुष्यमित्र

मगधाच्या अुपर्युक्त बृहद्रथ मौर्य ह्या राजाचे, जे, काही, ‘सैन्य’ म्हणून अुरलेले होते, त्यात, पुष्यमित्र नावाचा, अेक, सैनिक होता. पुष्यमित्र, हा, जन्माने ब्राह्मण होता. वैदिकधर्माचा नि भारतीय राष्ट्राचा, तो कट्टर अभिमानी होता; आणि त्यातही निष्ठावंत शिवभक्त होता. त्याच्या कुलाचे नाव शुंग होते. मगधाच्या, त्या सैन्यामध्ये, तो आपल्या क्षात्रतेजानेही अितके वर्चस्व पावलेला होता, की, त्या बृहद्रथ मौर्य राजाने, ग्रीकांनी केलेल्या, स्वारीच्या प्राणसंकटात, पुष्यमित्रालाच, निरुपायाने, मुख्य सेनापतिपदावर नेमले. सेनापतित्व हाती येताच, मगधाच्या सैन्याचे शस्त्रबळ नि संख्याबळ वाढविण्यास, लगोलग, आरंभ केला. ह्या योगायोगाने, साऱ्या वैदिकधर्मीय, राष्ट्रभक्त जनतेचे डोळे, आपण होअून, सेनापती पुष्यमित्र ह्याचेकडे लागले. ज्याला त्याला, अशी अुत्कट आशा वाटू लागली की, जर, सेनापती पुष्यमित्रच, ह्या क्रांतीचे नेतृत्व घेअील तर? तर, त्या पराक्रमी पुरुषाहून, आज, भारतीय साम्राज्याच्या, परंपरागत सिंहासनावर बसण्यास, ह्या पिढीत तरी, त्याच्याहून अधिक योग्य, कोण आहे?

केव्हा केव्हा, अितिहासामध्ये, ‘फलानुमेयाः प्रारंभाः संस्काराः प्राक्तना अिव’ह्या न्यायाने, पुढे, प्रकटपणे घडलेल्या, घटनांवरूनच काय ते, कूट नीतिज्ञांनी, त्यांपूर्वी आणि त्या घडवून आणण्यासाठी, काय काय गुप्त कट आणि कारस्थाने, रचली, असलीच पाहिजेत त्यांचा, छडा लावता येतो. मगधातील ह्या राज्यक्रांतीत, पुढे, लवरकच वर्णिल्या जाणाऱ्या अितिहाससिद्ध घटनांमुळे, हे, स्पष्ट होते की, स्वतः, सेनापती पुष्यमित्राने आधीपासून, ह्या भावी राज्यक्रांतीच्या कटाचे नेतृत्व, गुप्तपणे स्वीकारलेले असले पाहिजे. अितकेच नव्हे; तर, त्याच्या हाती असलेल्या, राज्यीय सैन्याची आणि त्यातील प्रमुखांचीही, त्याने, ह्या क्रांतीला, प्रत्यक्षाप्रत्यक्ष, संमती मिळविली असली पाहिजे.

## बृहद्रथ मौर्याचा शिरच्छेद

ही सर्व पूर्वसिद्धता, चालली असता, अेके दिवशी, पाटलीपुत्र ह्या, राजधानीच्या पटांगणात, सर्व सैन्याचा, शस्त्रसज्ज, संचलनसमारंभ, करण्याचे योजिले गेले. त्याप्रमाणे, त्या, सैनिक समारंभाचे निरीक्षण करण्यासाठी, सम्राट बृहद्रथ मौर्य, हा स्वतः अुपस्थित होता. सेनापती पुष्यमित्राच्या आज्ञेनुसार, त्या चतुरंग सैन्यांतील, विविध शस्त्रविभागांचे कार्यक्रम, मोठ्या गाजावाजाने चालूं असता, ज्याचा अितिहासात, अुल्लेख सापडत नाही अशा, कोणत्या तरी कारणाने, राजा बृहद्रथ बसला होता, त्या बाजूला, काहीतरी, अुत्क्षुब्ध कटकट चालूं झाली. त्या अुत्क्षोभातच, स्वतः सेनापती पुष्यमित्र, ह्याने, नावानेच काय तो सम्राट असलेल्या, बृहद्रथ मौर्यावर, चालून जाअून, त्याचा, तेथल्या तेथेच शिरच्छेद केला!

ह्या शिरच्छेदातच, अशोकाच्या वंशाचा, राजकीय अंत झाला! बौद्धधर्मीय मौर्यराज्य लयाला गेले!

ह्या, अकस्मात घडलेल्या, भीषण घटनेसरशी, तेथे जमलेल्या जनसागरात, मोठी खळबळ उडाली. परंतु त्या, साऱ्या शस्त्रसज्ज दलभारातील किंवा बृहद्रथाभोवती बसलेल्या राजपुरुषातील कोणी, बृहद्रथाच्या वतीने, सेनापती पुष्यमित्रावर, तुटून पडला का? नाही! अुलट, त्या शस्त्रसज्ज दलभारातून सेनापती पुष्यमित्राच्या नावाचा, जयघोष, अुठू लागला.

कारण, सैनिकांसुद्धा, अनेकांच्या मनात, जे करावयाचे होते, परंतु, जे, महासाहसी कृत्य करण्याचे अुत्तरदायित्व, स्वतःकडे घेण्यास, साऱ्या अुत्तर भारतात, कोणीही, धजत नव्हता; तेच, भारतीय साम्राज्याच्या, स्वातंत्र्यसंरक्षणास अपात्र ठरलेल्या, अशोकवंशज बृहद्रथ मौर्याचा शिरच्छेद अशोकाचे, भर राजधानीतच करण्याचे अपरिहार्य राष्ट्रीय कर्तव्य, सेनापती पुष्यमित्राने केले होते!

भारतीय स्वातंत्र्यरक्षणार्थ, जे पूर्वी चंद्रगुप्तास करावे लागले तेच, साहसी कृत्य पुष्यमित्राने केले.

शिकंदराच्या, अगदी, पहिल्या स्वारीच्या वेळी, ग्रीकांचा प्रतिकार करण्यास, असमर्थ ठरलेल्या, नामधारी सम्राट महापद्मनंदाचा शिरच्छेद, भारतीय स्वातंत्र्याच्या आणि भारतीय साम्राज्याच्या, संरक्षणार्थ, ज्याप्रमाणे आर्य चाणक्य नि सम्राट चंद्रगुप्त ह्यांना, राष्ट्रीय कर्तव्य म्हणूनच करावा लागला; अगदी, त्याच कारणासाठी, मगधाच्या ह्या, बौद्धधर्मीय, नामधारी सम्राट, बृहद्रथ मौर्याचा शिरच्छेद, सेनापती पुष्यमित्रास, राष्ट्रीय कर्तव्य म्हणूनच, करावा लागला.

## सम्राट पुष्यमित्र शुंग

ही घटना, अिसवी सनपूर्व १८४ व्या वर्षाच्या, आसपास, घडली. वैदिकविधीनुसार, पाटलीपुत्रात, भारतीय सम्राटपदाचा अभिषेक होअून पुष्यमित्र, अशोकाच्या सिंहासनावर, आरूढ झाला. मौर्य-राजवटीचा अंत होअून सम्राट पुष्यमित्राच्या, शुंगवंशाची राजवट चालू झाली.

## सम्राट पुष्यमित्राची ग्रीकांवर चढाई

प्रथमतः, राजधानीतील नि आसपासच्या प्रदेशातील, सारा, राज्यप्रबंध व्यवस्थित नि बळकट करून; आणि चतुरंग, प्रबळ नि रणोत्सुक असे, भारतीय सैन्य अुभारून; सम्राट पुष्यमित्राने, अयोध्येस ठाण मांडून बसलेल्या, मिन्यांडरवर स्वारी केली. भारतीय, शस्त्रबळापुढे, रणांगणात टिकाव धरणे, अशक्य झाल्यामुळे, यवनसेनापती मिन्यांडर, मागे पंचनदाकडे सैन्यासह, पण झुंजत, हटू लागला. परंतु, पूर्वी, डेमेट्रियसचा पिच्छा पुरविण्याचे जसे राहून गेले, तशी ढिलाअी ह्यावेळी न करता, सम्राट पुष्यमित्राने, ग्रीकांच्या सैन्याचा, कडोनिकडीने पाठलाग केला. पराभवामागून पराभव खाल्ल्यामुळे नि त्याच्या ग्रीक सैन्याचा, सारा व्यूह ढासळून गेल्यामुळे, अगदी, हतवीर्य झालेल्या, मिन्यांडरला, पुष्यमित्राने सिंधुपार हुसकून दिले. सारा सिंधुपर्यंतचा भारत, ग्रीकांच्या राजकीय दास्यातून मुक्त झाला.

## ग्रीकांची तलवार तोडून टाकली, ढाल फोडून टाकली, त्यांच्या राजसत्तेचा कंदच अुपटून टाकला !

भारतावरील, ग्रीकांची, हीच शेवटची स्वारी ठरली. सम्राट पुष्यमित्राने, केलेल्या ग्रीकांच्या, ह्या पराभवामुळे, त्यांची, शस्त्रशक्ती, अितकी क्षीण झाली की, पुन्हा, सिंधुनदी ओलांडून, भारतावर स्वारी करण्याची धमकच त्यांच्यात, अुरली नाही. शिकंदरापासून, भारतास, अुपद्रव देत आलेल्या, ह्या यवनशत्रूचा भारताने असा नित्याचा निःपात केला!

ग्रीकांच्या हातून सोडविलेला, सारा प्रदेश पुष्यमित्राने, आपल्या साम्राज्यास जोडला. अुज्जयिनीला, तिकडच्या राज्यविभागाचा, मुख्य राजप्रतिनिधी म्हणून, त्याने आपला पुत्र सेनापती अग्निमित्र यास, नेमले. सेनापती अग्निमित्र हाही, बापाप्रमाणेच शूर आणि कर्ता पुरुष होता. त्याने दक्षिणेकडील, विदर्भ देशापर्यंत, आपल्या साम्राज्याचे आधिपत्य मान्य करविले. परंतु, पुढे, विदर्भाचा राजा, ते, आधिपत्य मानीना, ह्यास्तव, अग्निमित्राने, त्याच्यावर स्वारी केली. तीत, विदर्भ राजाचा पराभव झाला. त्याच घडामोडीत, विदर्भराजाची कन्या, मालविका, अग्निमित्राच्या पराक्रमी गुणांनी मोहित होअून त्याच्याशी, विवाह करावयास अुत्सुक झाल्यामुळे, विदर्भराजाने, पुष्यमित्राच्या संमतीने, अग्निमित्राशी, मोठ्या समारंभपूर्वक, तिचे

लग्न लावून दिले. ह्यामुळे, त्या दोन्ही राजकुलांचा, केवळ स्नेहसंबंधच नव्हे; तर रक्तसंबंधही जुळून आला. ह्या रमणीय कथेवरच, कालिदासाने आपले ‘मालविकाग्निमित्रम्’, हे नाटक लिहिले आहे.

## अशोकाच्या पाटलीपुत्रातच अश्वमेध यज्ञ!

ग्रीकांसारख्या, पुरातन परकीय शत्रूंचा, नि ःशेष नि ःपात करून, भारतीय साम्राज्याचे पुनरुज्जीवन करणाऱ्या सम्राट पुष्यमित्रास, आपल्या वैदिक परंपरेनुसार आता, अश्वमेध यज्ञ करण्याचा अधिकार, स्वपराक्रमानेच, प्राप्त झालेला होता. सम्राट पुष्यमित्राच्या, ह्या, अधिकाराविषयी, व्हिन्सेट स्मिथही, त्याच्या - 'The Early History of India' ह्या ग्रंथात गौरवपूर्वक लिहितो की : "The Yavanas and all other rivals having been disposed off in due course, Pushyamitra was justified in his claim to reign as the paramount power of North India and Straightway proceeded to announce his success by a magnificent celebration of the Ashwamedha sacrifice at his capital." (Page 189)

सम्राट पुष्यमित्राने, अश्वमेध यज्ञाचा सोडलेला संकल्प, अैकताच, साऱ्या भारतवर्षात, अत्यंत अल्पसंख्य असलेली बौद्ध जनता सोडून, भारतीय राष्ट्राभिमानाची नि विजयानंदाची, लाट उसळली. ज्या अशोकाने, वैदिकधर्मीयांचे, आचारस्वातंत्र्य राजदंडाचे बळाने, छिनावून घेतले होते, त्याच बौद्ध अशोकाची राजधानी असलेल्या पाटलीपुत्रात, वैदिकधर्माभिमानी सम्राट पुष्यमित्राचा, हा अश्वमेध यज्ञ, होणार होता. वैदिकधर्मीयांच्या धर्माचार- स्वातंत्र्यावरील, अशोकाने लादलेले सारे प्रतिबंध काढून टाकलेले आहेत; अशी सम्राट पुष्यमित्राने केलेली, तो अश्वमेध यज्ञ म्हणजे अेक प्रकट सम्राटीय घोषणाच होती!

सम्राट पुष्यमित्राचा पुत्र, युवराज अग्निमित्र, हा जसा पराक्रमी, रणधुरंधर नि कर्तृत्ववान, राजपुरुष होता तसाच, त्या, युवराज अग्निमित्राचा पुत्र, म्हणजे, पुष्यमित्राचा नातू, वसुमित्र, हाही अेक तरुण नि तेजस्वी, राजकुमार होता. सम्राट पुष्यमित्राने, जेव्हा, आपला अश्वमेधीय घोडा, विजययात्रेप्रीत्यर्थ सोडला, तेव्हा, त्याच्या मागे मागे त्याच्या रक्षणासाठी, ससैन्य राहण्याचे कार्य, ह्याच त्याच्या तरुण नातवावर, सेनानी वसुमित्रावर, सोपविले. त्या विजयाश्वाच्या स्वेच्छा संचारात सिंधुनदीच्या तीरापर्यंत, कोणीही अडथळा केला नाही. परंतु, सिंधुतीरी, कोणा यवनराजाने त्याला अडथळा केला. म्हणजेच, त्या वेळच्या संकेताप्रमाणे सम्राट पुष्यमित्राच्या आधिपत्यास, आव्हान दिले. तेव्हा, त्या तरुण सेनानी वसुमित्राने त्या यवनराजाशी लढून, त्याचा पुरता पराभव केला; आणि आपला विजयाश्व सोडवून आणला. जेव्हा, अेक वर्षानंतर, ह्या अश्वाला घेअून सेनानी वसुमित्र, विजयासह पाटलीपुत्रास परत आला; तेव्हा, जिकडे तिकडे केवढा आनंद झाला. ते वृत्त, स्वतः, सम्राट पुष्यमित्राने, युवराज अग्निमित्रास धाडलेल्या, आमंत्रणपत्रिकेत लिहिलेले आहे. ह्या पत्राचा, बव्हंशी, त्या सम्राटाच्या भाषेतच, प्रतविलेला मूळ लेख, सुदैवाने, आजही, आपणास वाचावयास मिळतो; कारण, कालिदासाने, वर अुल्लेखिलेल्या ‘मालविकाग्निमित्र’ नाटकात, तो बव्हंश, जसाच्या तसाच, दिलेला आहे. त्या नाटकातील, ते पत्र, अितके मनोवेधक आहे की, शक्यतो, ते, प्रत्येकाने वाचावे. त्या विजयशील काळातील, प्रत्यक्ष, सम्राट पुष्यमित्राच्या विचारांचे आणि सर्वसामान्य जनभावनांचेही ते अेक जिवंत चित्रण आहे.

## राष्ट्रीय विजयोत्सव

भारतवर्षातील, मोठमोठे जपी, तपी, वेदविद्यापारंगत, क्षत्रियकुलावतंस राजवृंद, साम्राज्यातील प्रमुख राज्याधिकारी, नगरश्रेष्ठी नि ग्राममुख्यजन, त्या, अश्वमेधयज्ञाच्या, महान समारंभास, अुपस्थित होते. त्या काळचा, पंडितांतील पंडित म्हणून, गाजलेला आणि आज तर, ज्याला, पाश्चिमात्यादिक परकीय विद्वद्वर्गातही, जागतिक मान्यता मिळाली आहे; तो पतंजलीही, त्या अश्वमेधास अुपस्थित होता. असल्या, असल्यांच्या आशीर्वादांनी नि सहभागित्वाने, त्या अश्वमेधाच्या समारंभास म्लेंच्छांचे मर्दन करणाऱ्या, भारतीय विजयोत्सवाची, प्रतिष्ठा नि शोभा प्राप्त झाली.

## आशियाअी ग्रीक वंशाचाच नायनाट

वर वर्णिल्याप्रमाणे, सम्राट पुष्यमित्राने साधारणतः, अिसवी सनापूर्वी १९० ते १८० वर्षांच्या मध्यंतरी, ग्रीक आक्रमकांना, नित्याचे, सिंधुपार हुसकून देअून, भारत स्वतंत्र केल्यानंतर, ग्रीक वंशाच्याच, अितिश्रीस, आरंभ झाला. सिंधूपलीकडे, गांधारात नि बॅक्ट्रियात (बाल्हिक देशात), त्यांची काही दुर्बळ होत चाललेली, लहानसहान फुटकळ राज्ये, टिकाव धरून होती. परंतु, अिसवी सनाच्या, पहिल्या शतकाच्या आरंभाचे आगेमागे, जेव्हा मध्यआशियातील शक जातीचा, प्रचंड लढाअू लोंढा बॅक्ट्रिया (बाल्हिक), अिराण नि गांधार ह्या प्रांतांवर येअून आदळला, तेव्हा त्या कडव्या नि रानटी शकांच्या खड्गापुढे तिकडील साऱ्या ग्रीक जनतेस पळता भुअी थोडी झाली; पुरुष-स्त्री, मुलाबाळांसुद्धा ते पुढे पळत, थांबत, पुन्हा पुढे पळत, आपला जीव वाचविण्यासाठी शेवटी सिंधू अुतरून भारतीय साम्राज्यात शिरले; पण आता केवळ आश्रयार्थी म्हणून, शरणार्थी म्हणून! कुठे, ते अिसवी सनपूर्व ३२९ ते ३२७ मध्ये, 'युद्धं देहि' म्हणून, गर्जत भारतावर चढून आलेले शिकंदर- सेल्युकसचे विजयार्थी ग्रीक आणि कुठे हे, भारतीय पराक्रमापुढे शेवटी, हतवीर्य झालेले, अिसवी सनाच्या आरंभी आरंभीचे, 'भिक्षां देहि' म्हणत, भारतीयांच्या दारोदार हिंडणारे, त्यांचे वंशज, शरणार्थी ग्रीक!

पण, अशा दुर्दशेतही, जुने वैर विसरून, भारताने त्यांना आश्रय दिला. भारतीयांच्या अुदारतेचा, त्यांच्या त्या टोळ्यांपैकी, जिला जिथे आश्रय मिळाला, त्या त्या नगरांत, प्रांतांत, ती ती ग्रीकांची टोळी फुटकळपणे वसत गेली. त्यांच्यापैकी, काही बौद्ध झाल्या. काही वैदिकधर्मीय झाल्या. परंतु त्या काळी वैदिकधर्मीयांचीच राज्ये असल्यामुळे, ह्या ग्रीक समाजातील, व्यक्तीव्यक्तींचा धर्म बौद्ध असला काय, वैदिक असला काय; तरी, कोणत्याही प्रकारचा, राजकीय अुपद्रव देणे, त्यांना, शक्य झाले नाही. हळूहळू, ते, स्वतःची ग्रीक भाषाही विसरले. भारतीय भाषा, चालीरीती, ही सारी आत्मसात करून, भारतीय समाजात, ते, झपाट्याने अेकरूप होत गेले; त्यांच्यात भारतीयांपासून आपण अलग आहोत, अन्य राष्ट्र आहोत, अशी, प्रेरणा देणारी जी अहंकारी ग्रीकपणाची भावना तीच मुळी, त्यांचे विवाहादि संबंधही, भारतीयांत होत गेल्याने, अेक-दोन शतकांच्या आत, नष्ट झाली. गंगौघात मिठाचा खडा विरून जावा तसे त्यांचे ग्रीकपणच, भारतीय जीवनौघात, विरून गेले.

## म्लेच्छांना प्रथम संगरात जिंकू शकलो म्हणूनच त्यांना संस्कृतीत आत्मसात करू शकलो

तथापि, ह्या प्रकरणी बहुतेक अितिहास-लेखकांचे आणि आपल्या लोकांचे अेका महत्त्वाच्या विधेयाकडे, लक्ष, आकर्षिले गेलेले नाही. त्यासाठीच, ते, विधेय अिथे, अुल्लेखिणे, अवश्य आहे. ती गोष्ट ही की, भारतावर चढाअी करून आलेले, विजयार्थी यवन काय, किंवा पुढे आणखी जे जे कोणी, म्लेंच्छ, भारतावर चालून आले, ते परशत्रू काय, त्यांच्यापैकी ज्यांना ज्यांना शतकव्यापी संघर्षानंतर का होअीना, पण, भारतीयांनी जिंकून, गिळून, पचवून, आपल्या संस्कृतीत, समाजात आत्मसात करून टाकले; नाहीसे करून टाकले; त्या त्या प्रत्येक प्रकरणी हेच सिद्ध झालेले आहे की, त्या त्या आक्रमकांची ती चढती तलवार भारतीय पराक्रमाने प्रथम जेव्हा तोडून टाकली, त्यांना सशस्त्र संगरातही जेव्हा चारी मुंड्या चीत केले; तेव्हाच काय ते, ते ते, परकीय सशस्त्र आक्रमक, आमच्या भारतीय संस्कृतीत नि समाजात, आत्मसात करून टाकण्याअितके चर्वणीय नि पचनीय, होअू शकले. केवळ शांतिपाठाने नव्हे; तर बलवत्तर शस्त्रपाठाने!!

## धर्मच्छल केला नाही, राष्ट्रदोहाच्या पापाचा योग्य तो दंड दिला!

सम्राट पुष्यमित्राने, बौद्ध भिक्षूंचा, फार, छळ केला. काहींना ठार मारले; काहीचे मठ अुद्ध्वस्त केले असे पौराणिक पद्धतीने रंगविलेले अुल्लेख जुन्या बौद्धग्रंथातून सापडतात. युरोपियन अितिहास -लेखकांनीसुद्धा, ह्या अुल्लेखांना, अतिशयोक्तिपूर्ण, म्हणूनच, बाजूस सारले आहे. तथापि, काही जणांनी, ह्या, अतिशयोक्तीच्या बुडाशी थोडेतरी तथ्य असले पाहिजे, पुष्यमित्राने केवळ धर्मद्वेषाने बौद्धांवर अन्याय्य सूड अुगविण्यासाठी थोडाफार छळ केला असला पाहिजे असे प्रतिपादिले आहे. आमच्या मतेही बौद्धांपैकी अनेकांना सम्राट पुष्यमित्राने धारेवर धरले असलेच पाहिजे, परंतु ते, केवळ तात्त्विक नि धार्मिक, मतभिन्नतेसाठी नव्हते.

बौद्ध लोक, शून्यवाद किंवा अज्ञेयवाद, मानीत; किंवा त्यात कोणी नास्तिक होते; किंवा अहिंसक होते; किंवा वेदनिंदक होते; किंवा त्यांच्या जपजाप्याच्या पद्धती वैदिकांहून वेगळ्या होत्या; म्हणून, काही बौद्धांचा सामुदायिक 'धर्मछळ' झालेला नव्हता. स्वत:, गौतम बुद्धाला, त्याच्या धर्माचा प्रचार करताना, कोणाचीही, आडकाठी, झालेली नव्हती! तेही राहो. पण, पुढे, चंद्रगुप्ताच्या, अखिल नि अखंड भारतवर्षीय साम्राज्यात नि वैदिक धर्मनिष्ठ अशा स्वत:, आर्य चाणक्याच्या प्रधानवटीत, बौद्धधर्माला, अुणीपुरी ३०० वर्षे, अस्तित्वात येअून झाली असताही, त्यांचा छळ होत असल्याची, कुणकूणही, त्या वेळचा प्रख्यात ग्रीक राजदूत, जो, चंद्रगुप्ताच्या राज्यसभेत, वर्षानुवर्षे राहिलेला होता, त्या मेग्यास्थिनीसने आपल्या अितिहासप्रसिद्ध प्रतिवृत्तात, नोंदलेली नाही. मेग्यास्थिनीसच्या प्रतिवृत्तात बुद्धधर्माचे, नावसुद्धा आलेले नाही! कारण, तेव्हा, शिकंदर किंवा सेल्युकस, ह्या, बलाढ्य ग्रीक सेनानींशी किंवा त्यांच्या सैन्याशी, बौद्धांनी राजद्रोहात्मक किंवा राजकीय, असे, देशघातक संबंध ठेवलेले नव्हते. त्यांना, ते, शक्यच नव्हते. म्हणूनच, तशा अितर अनेक पंथांप्रमाणे, बौद्धांनाही, चंद्रगुप्ताच्या नि आर्य चाणक्यासारख्याच्या, वैदिक धर्मीय साम्राज्यात, आपापल्या धर्माप्रमाणे आचरण करता आले; अितकेच नव्हे; तर, त्याचा, अुपदेशाने जो काही, प्रचार करता येअील तो, प्रचारही करता आला.

परंतु, शिकंदर-सेल्युकसनंतर, ग्रीकांची जी दुसरी चढाअी, डेमेट्रियस-मिन्यांडरच्या वेळी, भारतावर झाली; नि ते राष्ट्रशत्रू थेट, अयोध्येपर्यंत येअून मगधाच्या सम्राट पीठावरच, ग्रीक सम्राटाचा राज्याभिषेक करण्याच्या बेतात आले; तेव्हा अशा भारताचे राष्ट्रीय स्वातंत्र्य धोक्यात आणणाऱ्या, राजकीय संकटात भारतीय बौद्धांनी, मागे वर्णिल्याप्रमाणे, धडधडीत राष्ट्रदोह केला. अिथेच, हेही सांगणे विषयानुकूल होणार आहे की, मिन्यांडर, ज्याला, बौद्ध 'मिलिंद' म्हणतात, स्वत:, बौद्धधर्म स्वीकारता झाला; तेव्हा त्या ग्रीक राजालाच भारतीय बौद्धांनी, आपली राजनिष्ठा विकली. त्याला, त्या त्या भारतीय प्रदेशाचा, राजा मानले. त्या ग्रीकांच्या, भारतीय प्रदेशातील, राजसभेत बौद्ध पंडित नि बौद्ध भिक्षू, कोणा स्वराष्ट्रीय राजाच्याच राजसभेत मिरवावे, तसे, मानाने, मिरवू लागले. अशी, ही भारतीय बौद्धांची, भयंकर देशद्रोहक कृत्ये, मठांमठांतील स्वराज्यघातक कट नि राष्ट्रस्वातंत्र्यविरोधी, अुठावणी करण्याचा, जनतेत केलेला प्रचार, हाणून पाडण्यासाठी, ग्रीकांशी, प्रत्यक्ष युद्ध चाललेल्या काळात, सम्राट पुष्यमित्राला नि त्याच्या सेनाधिकाऱ्यांना, अशी राष्ट्रदोही कृत्ये नि प्रचार करणाऱ्या भारतीय बौद्धांना, देहान्त शासन देणे नि अशा भारतद्रोही कटांची केंद्रे असणाऱ्या, बौद्धमठांना, अुद्ध्वस्त करून टाकणे, भागच होते. भारतीय स्वातंत्र्याचे नि साम्राज्याचे संरक्षणार्थ, स्वदेशद्रोह्यांना नि परराष्ट्रास मिळणाऱ्या, स्वराष्ट्रघातक्यांना, दिलेला, तो, न्यायोचित राजकीय दंड होता. तो, त्यांचा केलेला, धार्मिक छळ नव्हता. भारतीय साम्राज्याचे, प्रमुखतम, दंडधारक असणाऱ्या सम्राटाने, अशा, राष्ट्रघातक पाप्यांना, मग, ते वैदिक असोत वा बौद्ध असोत; दंड करणे, हे, पुष्यमित्राच्या, वैदिकधर्मीय दंडनीतीप्रमाणे, त्याचे राजकर्तव्यच होते; धर्मकर्तव्यच होते.

## कोण धर्मसहिष्णू–अशोक की पुष्यमित्र?

गतानुगतिक अितिहास-लेखकांत, अशोकाला, परधर्मसहिष्णू म्हणून, गौरविण्याचा जो परिपाठ पडून गेला आहे; आणि पुष्यमित्राच्या धर्मस्वातंत्र्य प्रस्थापिणाऱ्या, महत्कृत्याविषयी, अुल्लेख करण्याचे भानही कोणा स्वदेशीय वा परदेशीय, अितिहासकाराला न राहता; अुलट त्याने बौद्धांचा 'धर्मछळ' केला असल्याच्या, बौद्ध पौराणिककथा, मात्र, अुल्लेखिण्याचा नि त्यामुळे पुष्यमित्र हा काही परधर्मसहिष्णू नव्हता; असे, सुचविण्याची किंवा ठासून सांगण्याची, जी, परंपरा चालू आहे; तिचाही बीमोड केला पाहिजे. जर, कोणी धार्मिक असहिष्णुतेचा, अधिक, दोषभागी असेल, तर, तो, अशोकच होय; कारण, नुसत्या प्रचाराने नव्हे, तर राजशक्तीच्या बळाने, त्याने, साऱ्या भारतवर्षभर, वैदिकधर्मीयांचे, म्हणजेच भारतीय राष्ट्रातील त्या काळच्या अधिकाअधिक जनतेचे यज्ञयाग, मृगयाप्रभृती अनेक मूलगामी धर्माचार सर्व भारतभर, दंड्य ठरविले होते. पण, अशोकाचे अुट्टे काढण्यासाठी सुद्धा, सम्राट पुष्यमित्राने, काही, अशी राजाज्ञा काढली नाही; की, ''बौद्धांनी मठांमठांतून सामुदायिक यज्ञ वैदिकपद्धतीनेच केले पाहिजेत!'' किंवा, ''निदान, प्रत्येक, गृहस्थाश्रमी बौद्धाने घरोघर, वैश्वदेव केलाच पाहिजे!'' राष्ट्रशत्रूंशी, कोणताही राजकीय संबंध न

ठेवता, आपआपला धर्मप्रचार किंवा धर्माचार करणाऱ्या, पण, वैदिकधर्मीय नसलेल्या, अनेक पंथांचे समूहांना भारतात त्याकाळीही जसे धर्मस्वातंत्र्य नि सुरक्षितता अुपभोगता येत होती, तशीच ती तितक्या निरुपद्रवीपणे वावरणाऱ्या बौद्धांनाही, अुपभोगता येत होती. आता, हे शक्य आहे ; की, भर युद्धकालात, देशद्रोह करणाऱ्या, बौद्धांची, अवश्य ती, ससेहोलपट चालली असता, सुक्याबरोबर ओलेही काही प्रकरणी जळले असेल, पण, तो नियम नव्हे ; अपरिहार्य अपवाद !

पुष्यमित्राने केले, ते, हेच सत्कृत्य होते ; की, अशोकाने बळाने अुच्छेदिलेले धर्मस्वातंत्र्य, भारतीय साम्राज्यात पुन्हा प्रस्थापिले. धार्मिक असहिष्णू किंवा पक्षपाती म्हणावयाचेच तर अशोकास म्हणावे ; पुष्यमित्रास नव्हे.

ह्या प्रकरणी वैदिकांविषयी, कोणत्याही प्रकारे विशेष सहानुभूती न बाळगणाऱ्या पण, त्यातल्या त्यात, राखून लिहिणाऱ्या, व्हिन्सेंट स्मिथसारख्या, परकीय अितिहासकाराने, काढलेले अुद्‌गार वाचनीय आहेत.

यद्यपि, अितर अितिहासकारांप्रमाणेच, स्मिथसारख्या विद्वान अितिहासकाराच्याही, हे, मुळीच ध्यानात आलेले नाही, की, भारतीय बौद्धांची, केव्हा, ससेहोलपट, भारतीय वैदिकांकडून झाली तिचे आणि बौद्धधर्माविषयी, भारतीय जनतेत, जी चीड नि अप्रियता अुत्पन्न हौअून बौद्धधर्माचा शेवटी नायनाट झाला ; त्याचे, अेक मुख्य कारण, भारतीय बौद्धांनी, भारतीय स्वातंत्र्य नि भारतीय साम्राज्य, ह्यांशी, वारंवार केलेले, राष्ट्रद्रोही, वर्तन हेच होते. तथापि, हे मुख्य कारण, लक्षात नसताही, व्हिन्सेंट स्मिथने, आपल्या प्रसिद्ध ग्रंथात, बौद्धांच्या अितर अैतिहासिक कृत्यातून, धार्मिक असहिष्णुतेच्या प्रश्नी, विशेषत :, बौद्धांनाच, दोषी ठरविले आहे. त्याच्या, ह्या, प्रकरणीच्या लेखातील काही वाक्ये अशी :

**"**The memorable Horse Sacrifice of Pushyamitra marked the beginning of Brahmanical (Vaidik?) re-action which was fully developed by centuries later, in the time of Samudragupta & his successors.... Its credit may be given to semimythological stories of Buddhist writers. Pushyamitra was not contented with the peaceful revivals of Hindu rites, but indulged in a savage persecution of Buddhism.... It will be rash to reject this tale as wholly baseless, although it may be exaggerated... That such outbursts after all should have occurred is not wonderful if you consider the extreme oppressiveness of the Jain and Buddhist prohibition when ruthlessly enforced as they certainly were by some Rajas and probably by Ashok. The wonder rather is that persecutions were so rare. And that as a rule the various sects managed to live together in harmony and in the enjoyment of fairly impartial official favour.**"** (Early History of India, page, 190-191)

शिकंदरच्या वेळेपासून, भारताला, वेळोवेळी अुपद्रव देत असलेल्या, यवनांच्या राजसत्तेचा, शस्त्रशक्तीचा आणि म्हणूनच, परिणामी, त्यांच्या वांशिक अस्तित्वाचा, ज्याच्या प्रतापी खड्‌गाने, शेवटी शिरच्छेद करून टाकला ; आणि अेतदर्थच ज्यास, ‘यवनांतक’, ही पदवी, यथार्थपणे, शोभते आहे ; त्या सम्राट पुष्यमित्राने, त्यानेच मुक्त केलेल्या आपल्या, भारताच्या स्वातंत्र्याचे नि साम्राज्याचे, संरक्षण, संगोपन नि संवर्धन ३६ वर्षेपर्यंत, केल्यानंतर, अिसवी सनपूर्व १४९ व्या वर्षाच्या, आगेमागे, आपला देह ठेवला.

ज्या अर्थी, यवनविजेत्या, सम्राट चंद्रगुप्ताच्या राजमुद्रेने, अंकित झालेले पान, आपल्या भारतीय अितिहासातील, ‘पहिले सोनेरी पान’ ठरते ; त्याच अर्थी, ‘यवनांतक’ सम्राट पुष्यमित्राच्या राजमुद्रेने अंकित झालेले, आपल्या भारतीय अितिहासातील जे पान, ते ठरते, ‘सोनेरी पान दुसरे.’

# सोनेरी पान तिसरे

## ३.    शक -कुशाणांतक विक्रमादित्य

ग्रीकांचा समूळ अुच्छेद केल्यानंतर भारतावर अितिहासात मोजले जावे असे आणि काही अंशी शिकंदरादि यवनाधिपतीच्या सैन्यांच्या आक्रमणाहूनही भयंकर नि व्यापक असे जे परचक्र चालून आले ते शक-कुशाणांचे होय. शक आणि कुशाण हे जरी काही अंशी परस्पर भिन्न लोक होते आणि त्यांचे आपापसात तुमुल वैरही होते, तथापि, अेकंदरीत भारतीयांसारख्या विभिन्न नि अपरिचित राष्ट्रास ते जवळजवळ अेकच वाटावेत अितके त्यांच्यात साम्यही होते. त्यामुळे त्यांच्या ज्या रानटी टोळ्या अेकामागून अेक भारतावर येअून आदळल्या त्या सर्वांना सर्वसामान्य भारतीय लोक शक ह्या नावानेच ओळखत. काही स्थानी कुशाणांचा अुल्लेख 'कुश' ह्या नावानेही भारतीय ग्रंथात केलेला आहे. अेवढ्यासाठीच ह्या नावानेच त्या दोघांनाही अुल्लेखिले आहे.

बाल्हिक (बॅक्ट्रिया) या प्रांताच्या पलिकडे मध्यआशियाच्या भागात शक हे लोक रानटी अवस्थेत मोठ्या-मोठ्या टोळ्या करून राहात असत. त्यांच्याही पलीकडला विस्तीर्ण प्रदेश कुशाण ह्या तशाच रानटी अवस्थेत राहणाऱ्या लोकांनी व्यापलेला होता. आणि त्याच्याही पलीकडे चीन देशाच्या काही भागांना व्यापून हूण हे तसेच टोळ्याटोळ्यांनी भटकते, सदैव अितरांशी वा आपापसांत लढत राहणारे, रानवट, क्रूर पण शूर असे लक्षावधी लोक राहात असत. ह्या शक, कुशाण, हूण लोकांच्या मध्ये तीव्र वैमनस्य असे आणि अेकमेकांच्या प्रदेशांत त्यांची वारंवार आक्रमणे नि युद्धे चाललेली असत.

अिसवी सनाच्या शे-दीडशे वर्षांपूर्वी ह्या लोकांतील परस्पर वैमनस्याचा भयंकर वणवा पूर्वी कधीही भडकला नसेल अितक्या व्यापक प्रमाणावर भडकला. त्यांच्यापैकी अत्यंत कडव्या आणि चीनकडे असलेल्या हूण लोकांनी मध्य आशियात त्यांच्यापुढे असणाऱ्या कुशाण लोकांवर चाल केली नि त्यांच्या प्रदेशातून त्यांना पश्चिमेकडे रेटले. तेव्हा त्या कुशाण लोकांनी त्यांना लागूनच बाल्हिक (बॅक्ट्रिया) प्रांताच्या वर रहाणाऱ्या शक लोकांवर धाडी घालीत त्या शकांना त्यांच्या प्रदेशातून खाली ढकलून त्या प्रदेशात आपले राज्य स्थापले. त्यामुळे शक लोकांनी त्यांना लागूनच असलेल्या बाल्हिकावर स्वारी केली. या बाल्हिक म्हणजे बॅक्ट्रियापासून तो थेट ग्रीसपर्यंत, मागे सांगितल्याप्रमाणे, शिकंदरच्या वेळेपासून ग्रीकांची लहानमोठी राज्ये चालू होती. परंतु ह्या कडव्या, रानवट आणि ज्यांच्यातील पुरूषांप्रमाणेच स्त्रियाही प्रत्येकी शस्त्र घेअून घोड्यावर बसून रणांगणात अुतरत असत, अशा असंख्य लोकांच्या धाडीमागून धाडी जेव्हा त्या ग्रीक राज्यावर कोसळल्या तेव्हा त्यासर्व ग्रीकराज्यांची दाणादाण अुडून गेली. ती ग्रीकराज्ये बुडविली गेली, आणि तो सारा प्रदेश शकांनी व्यापून टाकला. परन्तु तेथेही शंभर अेक वर्षांच्या आतच त्या शकांचा पाठलाग करीत त्यांचे शत्रू जे कुशाण लोक, ज्यांचे जीवन शकांच्या वर दिलेल्या वर्णनाप्रमाणेच स्थायी नगरग्रामांपेक्षा धावत्या घोड्यांच्या सशस्त्र नि लढत्या शिबिराशिबारांतूनच व्यतीत होत असे, त्या कुशाणांनी शकांवर पुन्हा स्वारी केली आणि शकांना बॅक्ट्रियाप्रभृति प्रदेशातूनही हुसकून देअून तेथे आपली सत्ता स्थापली. खाली रेटून दिलेल्या ह्या असंख्य शकांना मागे किंवा तिरपे वळण्याचा मार्गच न अुरल्याने ते खालच्या बलुचिस्थानच्या प्रदेशांत घुसले आणि बोलनखिंडीच्या मार्गाने अेक वर्षाच्या आतच भारताच्या सिंधू, काठेवाड, नि गुजराथ प्रांतांवर टोळधाडीच्या लाटांमागून लाटा येतात तसे अनावर वेगाने कोसळले. लूटमार, बायकामुलांसुद्धा नगरग्रामांचे सरसकट शिरकाण करीत प्रवेगाने पुढे घुसणाऱ्या त्यांच्या असंख्य घोडेस्वारांनी ते भारतीय प्रदेश आपल्या टापेखाली नुसते तुडवून टाकले. तिकडे त्यावेळी भारतीय राज्ये कोणती होती किंवा नव्हती, किंवा त्यांना ह्या अनावर म्लेंच्छांच्या धाडीचा काही प्रतिकार करवला किंवा नाही ह्याचा अितिहासाला निश्चित पत्ता नाही आणि अिथे त्याचा खल करण्याचे, ह्या पुस्तकाच्या आखलेल्या क्षेत्रात, प्रयोजनही नाही. अिथे अितके सांगणे पुरे आहे की, अिसवी सनाच्या आरंभाच्या आसपास भारतातील बलुचिस्थान,

सिंध, काठेवाड, गुजराथ नि खाली अपरान्तकाचा (कोकणचा) किंचित भाग व्यापून ह्या शकांनी वर अुज्जयिनीपर्यंतच्या प्रदेशावर आपली सत्ता स्थापिली होती नि त्यांच्यामागून प्रवेगाने पाठलाग करीत येणाऱ्या मध्यआशियातील कुशाण नि हूण यांच्या दडपणामुळे ते शक लोक भारताचा आणखी किती भाग पायदळी तुडवीत सहकुटुंब व्यापून टाकू शकतात ह्या चिंतेने सारे भारत संत्रस्त होअून गेले होते!

## अितिहासकाळात न्यूनाधिक अेक सहस्र वर्षे तरी दक्षिण भारत, म्लेंच्छांच्या आक्रमणापासूनच अलिप्त, स्वतंत्र, समर्थ नि संपन्नपणे नांदत होता!

परकीय शत्रूंच्या स्वाऱ्या बहुधा, ह्या आपल्या अितिहासाच्या प्राचीन खंडात तरी, वायव्येकडूनच होत गेल्यामुळे त्याचा प्रतिकार करण्याचा मुख्य भार आपल्या अुत्तर भारतातील राष्ट्रबांधवानाच सोसावा लागला नि त्याप्रमाणे त्यानी तो सोसून त्याकाळी राष्ट्रशत्रूंना दाती तृण धरावयास लावले. त्यामुळे कोणताही परकीय शत्रू विंध्याचल अुतरून ह्या कालखंडात दक्षिण भारतात येअूच शकला नाही. पुरातन, अनिश्चित नि क्षणभंगुर अशा अेका अिराणी आक्रमणाची कथा सोडली तर साधारणतः अिसवी सनपूर्व ५०० व्या वर्षापासून तरी विंध्य ओलांडून अुत्तरेकडून कोणीही म्लेंच्छशत्रू येअू न शकल्यामुळे सारा दक्षिण भारत स्वातंत्र्य नि साम्राज्य, सत्ता नि संपत्ती ह्याना अखंडपणे अुपभोगीत होता. कलिंगापासून ते पांड्य, चेल, चोल प्रभृति आमच्या दक्षिण भारतीय प्रांतांतील भारतीय राज्यसत्ताधिकाऱ्यांनी दक्षिण भारताच्या तिन्ही बाजूंना पसरलेल्या पश्चिमसमुद्र, दक्षिणसमुद्र नि पूर्वसमुद्र ह्यात नाविकदले सज्ज ठेवलेली असत. त्यामुळे, त्या समुद्रसीमांवरही त्याकाळी कोणत्याही परकीय म्लेंच्छ शत्रूंच्या नौदलांचे आक्रमण होअू शकले नाही. अितकेच नव्हे, तर अुलट ह्या भारतीय सामुद्रिक राजसत्तांनी आपली प्रबळ नि जयिष्णु नाविक सैन्ये घेअून ब्रह्मदेश - सयामपासून तो फिलिपाअिन्सपर्यंत आपल्या राज्यसत्तेचा, संस्कृतिचा नि वाणिज्याचा जयिष्णु प्रसार सतत चालविला होता.

वायव्येकडून झालेल्या परराष्ट्रीय आक्रमणांचा यशस्वी प्रतिकार आमच्या अुत्तरभारतीय वीरवरांनी वारंवार तिकडच्या तिकडेच केल्यामुळे ते परशत्रू नर्मदेपर्यंत पोचूच शकले नाहीत. परंतु ह्या शकशत्रूंचे अनावर आक्रमण बलुचिस्थानातील बोलनखिंडीतील मार्गे झाल्यामुळे पश्चिमेलगतच्या सिंध, कोठेवाड, गुजराथ प्रांतातून घुसून नर्मदा अुतरणे त्यांना सापेक्षत लगोलग साध्य झाले नि दक्षिण हिंदुस्थानावर परचक्राची पहिली छाया पडली ती या म्लेंच्छ शकांची होय. पण तीही किती क्षणिक! कारण -

## आंध्रांचा हुंकार

सुदैवाने याच वेळी दक्षिणेकडे कलिंग नि आंध्रा ह्या दोन वैदिकधर्मीय नि भारतनिष्ठ प्रबळ शक्तींचा अुदय झालेला होता. सिंधपासून अुज्जयिनीपर्यंतच्या भारतीय प्रांतांत शकांसारख्या म्लेंच्छ राष्ट्राने धुमाकूळ घालून त्यांची राजसत्ता स्थापना करावी नि त्यांचा प्रतिकार करण्याची कोणतीही शक्ती अुत्तर भारतात पुढे येअू नये, ह्याची लज्जा नि विषाद सर्व भारतनिष्ठ जनतेप्रमाणेच आंध्रांनाही संतप्त करता झाला. त्यातही शकांच्या काही टोळ्या नर्मदा अुतरून अपरांतकात पोचल्यामुळे तर स्वतः आंध्रांच्या तेथपर्यंत पसरलेल्या विस्तृत राज्यालाही धोका अुत्पन्न झालेलाच होता. ह्या सर्व कारणांमुळे आंध्र राजशक्तीने शकांचा पुरता मोड करण्यासाठी त्यांच्यावर प्रबल सैन्यासह स्वारी केली, आणि त्या शत्रूंना भारताच्या वतीने समरांगणात पहिल्याने हुंकारून धडाक्यासरशी नर्मदापार हुसकून दिले. ह्याच वेळी अुत्तरेत अुज्जयिनीपर्यंत चढून गेलेल्या शकांची गाठ यौधेय नि मालव गणांशी पडली. ह्या दोन्हीही गणराज्यांनी प्रत्यक्ष शिकंदरच्या स्वारीच्या वेळीही भारताच्या स्वातंत्र्यरक्षणार्थ किती दुर्दम्य शौर्याने लढा दिलेला होता ते मागे वर्णिलेलेच आहे. अशाप्रकारे खालून दक्षिणेकडून आंध्रांनी नि वरून अुत्तरेकडून यौधेयांनी नि मालवांनी शकांवर प्रबळ चढाया केल्यामुळे शकांच्या आक्रमक वृत्तीची नांगीच चिरडली गेली. त्यांची प्रगती खुंटली. साऱ्या शकांची मिळून कोणतीही संयुक्त अेककेंद्रित नि सर्वसमर्थ अशी राजसत्ता त्यांना भारतात आधीच स्थापन करता आलेली नव्हती. त्यांची जी फुटकळ स्वतंत्र राज्ये वर दिलेल्या पण भारतीय प्रांतात स्थापिली गेली होती ती ह्या भारतीय प्रतिकाराचा दुहेरी अुठाव हाताच त्याच्या कैचीत सापडल्यामुळे त्याला यशस्वीपणे तोंड देअू शकली नाहीत.

## मालवांचा विजय

अुज्जयिनीच्या आजूबाजूला पसरलेल्या शकराज्यावर वरील यौधेय नि मालव गणांनी स्वारी केली होती. अिसवीसन पूर्व ५७ वर्षाच्या आसपास 'अुत्तमभद्रा'ला मालवांनी वेढा घातल्याचा अुल्लेख सापडतो. शकांचा त्या वेळचा नांवाजलेला राजा जो 'नहपान' त्याच्या सैन्याने तो वेढा अुठविणे मालवांना भाग पाडले होते. परंतु, त्याच्या मागोमाग मालवांच्या सैन्यांनी नहपानालाच त्याच्या शकसैन्यासह चारी बाजूंनी कोंडले. अर्थातच, दोन्ही सैन्यांची तुंबळ लढाअी झाली. तीत मालवगणाच्या सैन्याने शौर्याची पराकाष्ठा केली. आणि रणात आजवर दुर्दम्य म्हणून नावाजलेल्या त्या शकसैन्याचाच काय तो संहार करून न थांबता त्यांचा रणधुरंधर म्हणविणारा राजा तो नहपान, त्यालाच, त्या लढाअीत मालवांनी ठार मारले.

## मालव संवत

मालवांनी म्लेंच्छ शकांवर मिळविलेल्या ह्या विजयाने शकांची लढाअू शक्ति आणि धैर्य अितके क्षीणत्वास पावले की, सुसंघटित भारतीय सैन्याशी ठाण मांडून लढाअी देण्याची त्यांनी धास्तीच खाल्यासारखे झाले. ह्या लढाअीचा दुसराही अेक अुल्लेखनीय विशेष म्हणजे, म्लेच्छांवर मिळविलेला आणि ज्याची किर्ति भारतभर पसरली अशा ह्या आपल्या मालवगणाच्या विजयाचे चिरंतन स्मारक रहावे ह्यास्तव मालवगणांनी त्या विजयाच्या वर्षी अेक नवा संवत् चालू केला. त्याचे नाव त्यानी 'कृत' असे ठेवले, तथापि त्या निमित्ते त्यांनी त्या संवताची जी नाणी पाडली त्या नाण्यांवर ब्राह्मी लिपीत 'मालवजय:' 'मालवानाम् जय:' 'मालवगणस्य' असे अुल्लेख अंकिलेले आहेत.

## हाच आजचा आपला विक्रम संवत् होय

आपल्या राष्ट्रात अनेक विख्यात सम्राट आपापल्या नावचे संवत् त्यांच्या काळी चालू करीत असत. दिग्विजय करणाऱ्या राजाची किंवा 'गणा'ची स्वत:स 'शककर्ता' म्हणवून घेणे ही अेक परंपराप्राप्त हौस नि अधिकारही असे. अगदी अलीकडचे अुदाहरण म्हणजे शिवाजीमहाराजांचे चाहत्यानींही 'शिव-शक' प्रचलविला होताच. ह्या अनेक संवतांपैकी बहुतेक संवत् त्या त्या राजवंशाच्या अंतासहच अंतर्धान पावत. तथापि, त्या अनेक संवतांपैकी ज्या दोन-तीन संवतांना राष्ट्रीय मान मिळाला आणि ज्यांना विभागश: का होअीना, पण आपल्या हिंदू जगताने अंगिकारले, आजपर्यंत आपली व्यावहारिकच नव्हे तर धार्मिक कृत्यांचीही कालगणाना त्याच संवतात गेली अुणीपुरी दोन सहस्त्र वर्षे चालू ठेवली आहे, त्या संवतात या मालव संवताची गणना प्रामुख्याने केली पाहिजे. कारण हाच मालव संवत् पुढे विक्रम संवत् म्हणून प्रख्याती पावलेला आहे.

सुप्रसिद्ध अितिहासतज्ज्ञ डॉ. जयस्वाल ह्यांनी आपल्या Hindu Polity ह्या ग्रंथात 'मालव संवत्' हाच 'विक्रम संवत्' हेच मत समर्थिले आहे. तथापि, त्यांच्या मते मालव संवताला प्रथमपासूनच 'विक्रम संवत' (विजयाचा संवत्) असे अभिधान दिलेले होते. परंतु ह्यापुढे आम्ही ज्या घटना देणार आहोत त्याप्रमाणे शक-कुशाणांचे भारतातून समूळ अुच्चाटन करणारा गुप्तवंशीय सम्राट विक्रमादित्य पुढे जेव्हा अुज्जयिनीस राज्य करू लागला तेव्हा त्या अखिल भारतीय राष्ट्रीय पराक्रमाचा गौरव करण्यासाठी ह्या मालव संवतालाच 'विक्रम संवत्' असे अभिधान देण्यात आले. हे दुसरे मत ग्राह्यतर दिसते. तो संवत् 'विक्रम संवत्' ह्या नावानेच अितका राष्ट्रपरिचित आणि राष्ट्रप्रियही होत गेला की साऱ्या अुत्तर भारतातील कोट्यवधी हिंदू आज तोच विक्रम संवत् आपल्या धर्मकृत्यांतही पाळीत आहेत.

## विक्रम संवत् नि शालिवाहन शक ह्यांच्या अुत्पत्तीत मतभेद

अिथेच हेही सांगितले पाहिजे की विक्रम संवताच्या ह्या अुत्पत्तीविषयी अितिहासकारांचे अेकमत नाही. आपल्या अितिहासाच्या ह्या प्राचीन कालखंडात अनेक महत्वाच्या घटनांच्या कालक्रमाविषयी जसे मतभेद आहेत तसेच ह्या प्रश्नीही आहेत. बुद्धजन्मासारख्या प्रश्नीसुद्धा शे-पन्नास वर्षाचे अंतर भिन्न भिन्न अितिहासकारांनी मानलेल्या कालात पडते. कनिष्काच्या कालावधीचीही तीच गोष्ट. कोणी तो अि.स. ७८ व्या वर्षी राज्यावर आला असे समजतात,तर कोणी तो अि.स.१२० मध्ये राज्यावर आला असे समजतात. ह्या विक्रम संवताविषयीही काही अितिहासकारांचे तिसरे मत असे आहे की विक्रम संवताचा संबंध मालवगण संवताशी नाही. भारतात शिरलेल्या शकांचा अेक क्षत्रप राजा जो ओझोझ पहिला त्याने अिसवी सन पूर्व ५८ व्या वर्षी त्याचा म्हणून अेक संवत चालू केला. त्यालाच पुढे जेव्हा गुप्तवंशीय सम्राट विक्रमादित्याने शक-कुशाणांचा अुच्छेद केला तेव्हापासून लोक विक्रम संवत म्हणून म्हणू लागले. चौथेही अेक मत आहे की, अिसवी सनपूर्वी ५८ व्या वर्षी विक्रमादित्य नावाचा अेक पराक्रमी सम्राट जो त्या काळीच तिकडे राज्य करीत होता, त्याने शकांवर मोठा विजय मिळविला आणि त्या विजयाच्या स्मारकार्थ हा आपल्या नावाचा विक्रम संवत चालू केला. त्याचा मालवगणाच्या मालव संवताशी किंवा शक-राजा ओझोझच्या संवताशी काही अेक संबंध नाही. परंतु अशा कोणत्या काळी होअून गेलेल्या विक्रमादित्याचा अुल्लेख शिलालेख प्रभृति साधनांत नसल्यामुळे किंवा त्याने विक्रम संवत् म्हणून पाडलेल्या कोणत्याही नाण्यांचा शोध न लागल्यामुळे ही पौराणिक आख्यायिका अद्याप तरी निश्चितपणा पावू शकत नाही.

तथापि ह्यापुढे जर नवीन नाणक, शिलालेखादि साधने अुपलब्ध होअून विक्रम संवताची दुसरी अेखादी अुपपत्ती अधिक विश्वासार्ह ठरेल तर ती आम्ही ग्राह्य मानू.

जी गोष्ट विक्रम संवताची, तीच गोष्ट शालिवाहन शकाची. ह्याविषयी पहिल्या मताचे पुरस्कर्ते म्हणतात की, हिंदुस्थानातील कुशाणांचा पहिला राजा विमा क्याड्फोअिसेस, ज्यास आपले लोक शकच म्हणत, हा अि.स. ७८ त राज्यावर बसला तेव्हा त्याने हा 'शक' चालू केला. परंतु दुसऱ्या पक्षाच्या मते अि. स. ७८ मध्ये विमा क्याड्फोअिसेस हा राज्यावर बसलेला नसून कुशाणांचा त्याच्या पुढचा राजा कनिष्क हा राज्यावर बसला होता. त्या सम्राट कनिष्काने आपल्या राज्यारोहणाच्या स्मृत्यर्थ ही शक-काल गणना चालू केली. पुढे पैठणच्या शालिवाहन सम्राटांनी जेव्हा शकांना पादाक्रांत केले तेव्हा आपल्या विजयाचे स्मारकार्थ ह्याच 'शका'ला शालिवाहन शक' असे नाव दिले. परंतु ही दोन्ही मते न मानणाऱ्या अितिहासकारांचे तिसरे मत असे आहे की, शालिवाहन शकाचा कनिष्क प्रभृति कोणाही कुशाण राजाशी काहीअेक संबंध नाही. अिसवी ७८ च्या आसपास शालिवाहनांतील 'गाथा-सप्तशती' लिहिणाऱ्या हाल नावाच्या राजाने स्वतःच गुजराथ -सौराष्ट्राकडील शक-क्षत्रपावर अेक मोठा विजय मिळविला आणि त्याचे स्मारक म्हणून हा 'शालिवाहन शक' चालू केला.

अिथे ह्याविषयीची अधिक चर्चा करण्याचे कारण नसल्यामुळे शक संवताविषयी केलेल्या वरील त्रोटक अुल्लेखावरून प्रस्तुत विषयापुरत्या दोन-तीन महत्त्वाच्या गोष्टी तेवढ्या प्रामुख्याने अुल्लेखिल्या की पुरे आहे. त्या अशा :

अेक संवत्सराविषयीच्या अितिहासज्ञांच्या मतभेदातील कोणतेही मत ग्राह्य तर हे सत्य वादातीत ठरते की ह्या दोनही कालगणाना शक-कुशाणांवर भारतीयांनी समरांगणात मिळविलेल्या निर्णायक विजयांच्याच द्योतक आहेत.

'शक' शब्दापेक्षा 'संवत्' हाच शब्द आपल्या भारतीय कालगणनेत अधिक स्वीकारार्ह आहे. वेदकालापासून संवत्सर नि संवत् हे शब्द कालगणनेसाठी आपण योजीत आलेले आहोत. शक शब्द त्याआर्थी सहसा योजलेला आढळत नाही. अर्थात् तो शब्द शक - कुशाणादि त्याकाळच्या आक्रमक म्लेंच्छ शत्रूंच्या नावाचीच विकृती असली पाहिजे. विक्रम संवत् हे नाव जसे शुद्ध संस्कृतनिष्ठ आहे तसे 'शालिवाहन शक' हे नाव संस्कृतिनिष्ठ नाही. ह्यासाठी म्लेंच्छशत्रूंचे शक हे नाव गाळून टाकून 'शालिवाहन संवत्' असे अभिधान आपल्या धर्मकृत्यादि सर्वप्रसंगी ह्यापुढे

तरी योजले जावे आणि आजच्या धर्मकार्यात दोषार्ह रूढीमुळे 'शालिवाहन शके' किंवा केवळ 'शके' हे जे म्लेंच्छ शब्द अुपयोजिले जातात ते बहिष्कारले जावेत.

विक्रम संवत् नि शालिवाहन संवत् ह्या दोन्ही राष्ट्रीय संवतांचा संबंध भारतीयांनी शक-कुशाणांवर जे विजय मिळविले त्याच्याच स्मृतिगौरवाशी आहे ही गोष्ट ही केवळ चमत्कारिक योगायोगाची नसून अर्थगर्भही आहे. गुप्तसम्राटांसारख्यांचे अनेक संवत् आपल्या अितिहासात त्या त्या काळी गाजले, पण ते सारे लुप्त झाले. केवळ शक-कुशाणांवर मिळविलेल्या भारतीय विजयांचे हे दोन संवत् तेवढे चिरंतनत्व पावले. ह्यावरून आपल्या त्या काळच्या वैदिकधर्मीय भारतनिष्ठ राष्ट्रीय जनतेला शक-कुशाणांच्या अनावर टोळधाडीपासून दीड-दोन शतके तरी किती अुत्पात नि अुपद्रव सहन करावा लागला असेल, ह्याची कल्पना करता येते. कारण, अन्यथा त्या शत्रूंच्या राक्षसी अुपद्रवांपासून नि राजकीय दास्यापासून भारतीयांची मुक्तता करणाऱ्या ह्या आमच्या शालिवाहन नि गुप्तसम्राटांच्या शक-कुशाणांवरील विजयाच्या स्मृत्यर्थ चालू झालेल्या 'विक्रम संवत्' नि 'शालिवाहन संवत्' ह्या दोन संवतांना, अितर अनेक विजयी संवत् लुप्त झाले असताही, अितके भारतीय महत्व येते ना आणि ते दोनच आज अुणीपुरी दोन सहस्त्र वर्षे अुलटली असताही आम्हा हिंदूंचे राष्ट्रीय संवत् म्हणून मुख्यतः पाळले जात राहते ना!

## शस्त्रविजयामागोमाग शकांवर भारताने मिळविलेला धर्मविजय!

मालवगणांनी शकांच्या नहपान राजास ठार मारून वर सांगितल्याप्रमाणे त्यांच्या माळव्याच्या पुढे होणाऱ्या अनावर आक्रमणास पक्का पायबंद जसा घातला तसा त्याचवेळी वर अुल्लेखिलेल्या आमच्या दाक्षिणात्य आंध्र सैन्याने दक्षिण भारतातून अुत्तरेकडे स्वाऱ्या करून शकांच्या गुजराथ, सौराष्ट्र, सिंध ह्या प्रदेशात असलेल्या राज्यांची समरांगणांत धुळदाण अुडवून दिली. शालिवाहन वंशातील विलीनयांकुर, गौतमीपुत्र शातकर्णी, वसिष्ठपुत्र मुलमाई ह्यांच्यासारख्या पराक्रमी राजांनी अुज्जयिनीपर्यंतच्या शक राजांवर ह्या ज्या चढायांमागून चढाया केल्या त्या समरांगणीय प्रतिकारामुळे संत्रस्त झालेल्या त्या त्या शकराज्यांनी शेवटी शालिवाहन सम्राटांचे आधिपत्य मान्य केले. असाही अेक शिलालेख आहे की, त्यांच्यापैकी रुद्र नावाच्या शकराजाने आपली मुलगीही शालिवाहन राजाला दिली, जशीपूर्वी ग्रीक राजा सेल्युकस याने आपली मुलगी सम्राट चंद्रगुप्ताला दिली होती.

हेही ध्यानात घेतले पाहिजे की, भारतीयांशी रणांगणात अेकसारखे लढत राहिल्यामुळे या शे-पन्नास वर्षांत शकांच्या भारतामध्ये मूळ आलेल्या लढाअू लोकांतील सहस्रावधी सैनिकांचा जो संहार होत होता, त्यामुळे शकांचे संख्याबळही क्षीणतर झालेले होते.

अशा प्रकारे, जसजशी शकांची शस्त्रशक्ती भारतीय प्रतिकारापुढे क्षीण होत गेली तसतशी भारतीयांच्या त्या प्रबळ संस्कृतीची छापही त्या परराष्ट्रीय शकांवर अधिकाधिक पडत चालली. शक शत्रूंशी भारतीयांचा हा जो संघर्ष शंभर अेक वर्षे तरी चाललेला होता त्याच्या परिणामी शकांनी भारतीय संस्कृतीला शरणागतीची वचनचिठ्ठीच लिहून दिल्यासारखे झाले. शकांतील सामान्य जनांपासून तो त्यांच्या राजवंशापर्यंत त्यांनी आपली मूळची शकभाषीय व्यक्तिनामे सोडून सत्यसिंह, रूद्रसेन ह्यांसारखी भारतीय नावेसुद्धा स्वीकारली. विशेष आश्चर्याची गोष्ट अशी की, बहुसंख्य शकांनी वैदिकधर्म स्वीकारला! तसे पाहता हिंदुकुश ओलांडून शक लोक बलुचिस्थान नि सिंध प्रभृति प्रांतात अुतरून तेथे वास्तव्य करून राहिले तेव्हापासून तिकडील अशोकाच्या नि मिन्यांडरच्या कालापासून प्रचार करीत आलेल्या बौद्ध भिक्षुकेंद्रांशी आणि बौद्ध जनतेशी त्या शकांचा सतत संबंध आलेला होता. त्यांतही त्यांच्याशी निकराने लढून त्या काळी त्यांचा पाडाव करणारी मालव, यौधेयादि गणराज्यांची नि शातवाहनांची पराक्रमी सैन्ये ही वैदिकधर्मीयच होती. बौद्धांनी असा त्यांचा सशस्त्र वा निःशस्त्र प्रतिकार केलेला नव्हता. अशा स्थितीत शकांचे शत्रू जे वैदिक त्यांच्या वैदिकधर्माचा द्वेष वाटणे आणि शकांची सत्ता मुकाट्याने आपल्यावर चालवून घेणाऱ्या बौद्धांचा बुद्धधर्म शकांनी स्वीकारणे हे अगदी संभवनीय होते. पण जे घडले ते ह्या अपेक्षेच्या अगदी अुलट घडले. शकांतील बहुसंख्य

जनतेपासून तो त्यांच्यातील प्रमुख राजवंशीयांपर्यंत त्यांनी वैदिकधर्माचाच आपण होअून मोठ्या आवडीने स्वीकार केला! बहुधा, ह्या चमत्काराचे कारण, असेही असू शकेल की, शक हे मुळातच अंगात लढाअू रक्त संचरणाऱ्या जातीचे लोक; त्यांच्याशी लढणाऱ्या पराक्रमी वैदिक वीरांविषयी, ते त्यांचे शत्रू असले तरी, शकांच्या मनात सभय आदर अुत्पन्न होत असावा आणि त्या वैदिकांत तसे क्षात्रतेज अुत्स्फूर्त करणारा त्यांचा तो वैदिकधर्मच त्या शकांना स्वभावानुसार स्वीकारार्ह वाटला असावा.

संस्कृत भाषेवरही शकांची कौतुकास्पद भक्ति जडली. त्यांच्या हाती जी दोन-तीन प्रांतांची मांडलिक राज्ये राहिलेली होती त्यांतील शकराजांनी संस्कृतविद्येस शक्य ते ते अुत्तेजन दिले. अेका शकराजाने तर आपल्या राज्यसभेची आणि राज्यकारभाराची सर्व कार्ये नि लेखन-व्यवहार संस्कृत भाषेतच चालू केली. भारतातील अितर सर्व लहानमोठ्या राज्यांशी त्यांचा राजकीय पत्रव्यवहारही संस्कृतमध्येच होअू लागला. त्यांचे सामाजिक आचार-विचारही झपाट्याने भारतीय समाजजीवनाशी अेकरूप होत चालले.

## कुशाणांच्या स्वाऱ्या

सामरिक क्षेत्रात नि सांकृतिक क्षेत्रांत शकांवर असे विजय मिळवीत शकांच्या आक्रमणाचा नायनाट करीत असताच भारताच्या हिंदुकुशकडील सरसीमेवर कुशाणांची टोळधाड येअून आदळली. ह्या कुशाण लोकसमूहाला त्यांच्या प्रदेशातून हूण लोकांनी मुलामाणसांसुद्धा हुसकून दिले होते. त्यामुळे त्यांच्या लक्षावधी स्त्रीपुरुषांच्या लढाअू टोळधाडी आशियाच्या खालच्या प्रदेशात रक्तपात, लूटमार, जाळपोळ करीत अनावर वेगाने शिरल्या. हिंदुकुश पलीकडील चीनच्या सीमेपासून तो ग्रीसच्या साऱ्या प्रदेशात त्यांनी भयंकर धुमाकूळ घातला. त्यांच्यातील काही टोळ्या त्यांचे जुने वैरी जे शक त्यांचा पाठलाग करीत शकांचे बॅक्ट्रियांतील राज्य घेअून आणि हिंदुकुश ओलांडून गांधार प्रभृति वायव्येकडील प्रांतात घुसल्या. तेथील त्या वेळेस असलेल्या शकांच्या लहानसहान राज्याना बोलता बोलता अुखडून ते पंजाबात घुसले आणि त्यांनी तेथे आपले अेक राज्य स्थापिले. हिंदुस्थानातील त्यांच्या या पहिल्या राजाचे नाव 'विमा क्वाड्फाअिसेस' हे होते.

शकांच्या आक्रमणाचा यशस्वी प्रतिकार करण्यात अुणीपुरी शंभर वर्षे लढत नि झगडत राहिलेल्या अुत्तरेकडील यौधेय, माल प्रभृति भारतीय गणांची नि दक्षिणेकडील शालिवाहनांची शक्ती आधीच पणास लागली असता शकांहूनही क्रूर, शूर नि रक्तपिपासू असलेल्या ह्या कुशाणांच्या आक्रमणाचे संकट भारतावर कोसळल्यामुळे त्यांचा पंजाबपर्यंत लगोलग प्रतिकार होअू शकला नाही. तथापि तशा संकटातही ह्या अनावर कुशाणांच्या टोळधाडींनाही आवर घालण्याअितका प्रतिकार पुढे पुढे भारतीयांकडून केला गेल्यामुळे पांजाबच्या अलीकडील भारतीय प्रांतात कुशाणांच्या ह्या टोळधाडी घुसू शकल्या नाहीत.

## सम्राट कनिष्क

विमा क्वाड्फाअीसेस वारल्यानंतर कुशाण-राजपीठावर कनिष्क हा अिसवी सन ७८ व्या वर्षी (काही अितिहासतज्ञांच्या मते अि. १२० मध्ये!!) आरूढ झाला. त्याची महत्त्वाकांक्षा जितकी असीम तितकाच त्याचा पराक्रमही त्या काळी अतुल होता. त्याच्याविषयीचा सविस्तर वृत्तांत देण्याचे अिथे काहीच प्रयोजन नाही. ह्या पुस्तकातील विषय-क्षेत्रापुरत्या काही घटना मात्र दिल्या पाहिजेत. शक-कुशाणांच्या हिमालया-पलीकडील आणि अलीकडील सर्व भटक्या लुटारू टोळ्या आणि पंजाबपर्यंतची सर्व लहानसहान राज्यकेंद्रे ही कनिष्काने मोडून काढून त्यांचे अेक विस्तृत साम्राज्य घडविले. कुशाणांचा सम्राट म्हणवून घेअून त्याने पुरुषपुर (आजचे पेशावर) येथे त्या साम्राज्याची राजधानी स्थापिली. नंतर त्याने माळवा ते सिंधपर्यंत शकांनी जी राज्यकेंद्रे स्थापिली होती आणि ज्यांनी आंध्रांपुढे हार खाअून त्यांचे आधिपत्य मान्य केले होते त्या शकांवर चढाअी केली. परंतु शकांना पादाक्रांत करताना आधीच अुणेपुरे अेक शतक अेकसारखी युद्धे जुंझविण्यात ज्यांचे रणसामर्थ्य व्यतीत होत गेलेले होते, त्याच भारतीय राज्यांवर कुशाणांचे हे नवीन संकट अकस्मात कोसळल्यामुळे त्याला तोंड देणे दुर्घट झाले. अेक दोन लढायांत प्रत्यक्ष शालिवाहनाच्या

सैन्याचा मोठा पराभव झाल्यामुळे नर्मदेच्या अुत्तरेकडील सर्व सैन्ये दक्षिणेत आणून कनिष्काच्या आक्रमणापासून आपल्या स्वतःच्याच राज्याच्या संरक्षणार्थ कडेकोट सिद्धता करणे शातवाहनांना भाग पडले. तोवर कनिष्काने मालव, गुजराथ, सौराष्ट्र, सिंध येथील शकांची सर्व राज्ये जिंकून घेतली. त्यामुळे, त्या शकराजांनी आंध्राचे अधिपत्य झुगारून देअून कनिष्काचे आधिपत्य स्वीकारले. त्यापुढे जाअून आंध्रावरच स्वारी करण्यासाठी कनिष्काची सैन्ये नर्मदा अुतरली आणि अपरांतकाचा (अुत्तर कोकणचा) अेक कोपराही त्यांनी जिंकला. परंतु शातवाहनांच्या केंद्रित जालेल्या सैन्यशक्तीचे सामर्थ्य पाहून, जाण्याचे धाडस न करता, कनिष्काने आपले दक्षिणेकडील आक्रमण तेथेच थांबविले. नंतर हिमालयापलीकडे पसरलेल्या त्यांच्या राज्यावर चीनच्या सेनापतीने केलेल्या स्वारीचा प्रतिकार करण्यासाठी कनिष्क फार मोठे सैन्य घेअून चालून गेला. अनेक लढायांनंतर त्याने चीनच्या सेनापतीचाही पराभव केला आणि आशियातील काश्गर, चासकंद, खोतान हे चीनच्या साम्राज्यातील प्रांत जिंकून घेतले.

## राष्ट्राच्या पौरुषाची नि जीवनपात्रतेची
## खरी कसोटी कोणती ?

हा प्रसंग येथे सांगण्याचे मुख्य कारण हे की, शक-कुशाणांच्या आशियात अुसळलेल्या ह्या प्रलयामुळे केवळ भारतालाच हादरा बसलेला नव्हता, तर त्या लक्षानुलक्ष शस्त्रधारी समूहांच्या अुत्पातामुळे चीनसारख्या त्या काळच्या बलिष्ठ नि संघटित साम्राज्याचीही काही काळ समरांगणात त्रेधा अुडाल्यावाचून राहिली नाही. परंतु, केवळ शक-कुशाणांच्या स्वारीत किंवा अितर प्रसंगी झालेल्या चीनच्या तशा अनेक तात्कालिक अपजयांमुळे, ''चीनचे राष्ट्र सदोदित दुबळेच होते आणि परदास्यांतच सदासर्वदा खितपत राहण्यापेक्षा त्याची अधिक पात्रताच नव्हती,'' हे म्हणणे जसे मत्सरी मूर्खपणाचे होअील, तसेच, भारतावरही आलेल्या परचक्रांतून ''भारताचे राष्ट्रीय जीवन म्हणजे पराजयांचाच अेक पाढा आहे.'' असे आमच्या शत्रूंपैकी जे कोणी म्हणतात, त्यांचे, ते म्हणणेही, मत्सराने आंधळ्या झालेल्या त्यांच्या दृष्टीला अितिहास सम्यक् दृष्टीने वाचता येत नाही, हेच सिद्ध करीत असते.

कोणत्याही राष्ट्रावर किती परचक्रे आली ही त्या राष्ट्राच्या पौरुषाची अंतिम कसोटी नसून त्या परकीय आक्रमकांच्या आघातासरशी ते राष्ट्र नष्ट झाले, का त्या राष्ट्रीय संघर्षाच्या अंतिम रणात त्या परकीय आक्रमणाला त्या राष्ट्राने पादाक्रांत केले, यावरच त्या राष्ट्राच्या पौरुषाची नि जीवनपात्रतेची खरी कसोटी अवलंबून असते.

ह्या कसोटीस शक - कुशाणांच्या नि भारतीयांच्या या संघर्षात कोण अुतरतो ? कोण जगातून बेपत्ता होतो ? बघू या.

## कनिष्क बुद्धधर्म स्वीकारतो,
## पण त्याचे कनिष्कीय नवे संस्करण काढून !

चीनपर्यंत स्वाऱ्या करण्यात नि युद्धे लढण्यात गुंतलेला असताही कनिष्काचे लक्ष आध्यात्मिक नि सांस्कृतिक विषयाकडे वेधलेले असे.त्याने मध्यंतरी बौद्ध धर्म स्वीकारल्याची घोषणा केली होती. तिच्या अनुरोधे त्याने अनेक स्तूप नि विहार आपल्या साम्राज्यात ठिकठिकाणी बांधले. त्यावेळी अशोकाच्या वेळेप्रमाणेच बौद्धधर्मात अनेक पंथांचे खूळ माजले होते. त्यांचे परस्परात जे वैमनस्य होते ते मोडून काढून बौद्धमतांची अेकवाक्यता व्हावी म्हणून अशोकाप्रमाणेच त्याने यच्चयावत् बौद्धपंथांची अेक महापरिषद बोलाविली. परंतु तीत अेकमत होण्याचे बाजूसच राहून बौद्धधर्माचे स्वरूपच बहुशः पालटून टाकणारा अेक नवा 'महायान' नावाचा पक्ष निघाला. कनिष्काला जी आवडत पण जी मूळच्या बुद्धमतांत नव्हती अशी सर्वसंग्राहक मते ह्या नव्या 'महायान' पंथात समाविष्ट केल्यामुळे जे अल्पसंख्य बौद्ध ह्या मतास मिळाले नाहीत, त्यांनी 'हीनयान' नावचा दुसरा बौद्धपंत स्थापला. कनिष्काने आपल्या हिमालयापलीकडील विस्तृत राज्यातूनही ह्या महायान बौद्धपंथाचा पुष्कळ प्रचार करविला. ह्या महापरिषदेत संस्कृत भाषेलाही धर्मभाषा म्हणून मोठी मान्यता मिळाल्यामुळे पूर्वी पाली-प्राकृतातच लिहिल्या गेलेल्या बौद्धग्रंथांचे संस्कृतमध्ये रूपांतर करण्यात आले. अितकेच नव्हे, तर बुद्धचरित्रासरखे अनेक नवे ग्रंथ अनेक विषयांवर कनिष्काच्या आश्रयास असलेल्या आशियाअी साम्राज्यातील शक, कुशाण प्रभृति जनतेतही जुन्या-नव्या संस्कृत वाङ्मयाचा आणि संस्कृतीचा प्रसार चालू झाला.

ह्याप्रमाणे भारतीय संस्कृतीने शकजगताला ज्याप्रमाणे भारतीय धर्म, भाषा, आचार, विचार प्रभृति अुपांगांसह आत्मसात केले होते त्याचप्रमाणे जेते म्हणून आलेले हे कुशाणजगतही ह्या भारतीय संस्कृतीच्या आपण होअून अंकित झाले.

बौद्धधर्म हाही अेक भारतीय धर्मच असल्यामुळे सम्राट कनिष्काने तो स्वीकारताच भारताला हा सांस्कृतिक विजय मिळविता आला. हे जरी अिष्ट तेच घडले तरीही हे ध्यानात ठेवले पाहिजे की कनिष्काने जो बुद्धधर्म स्वीकारला तो मुळचा बुद्धाचा किंवा अशोकाचाही निर्भेळ बुद्धधर्म नव्हता. तर तो बुद्धधर्माचे कनिष्कीय संस्करण होते. अुदाहरणार्थ, स्वतः सम्राट कनिष्काने बुद्धधर्माची दीक्षा घेतली तरी तो रूद्रासारख्या वैदिक अुपास्यांची अुपासनाही करीतच असे. 'प्राणिहिंसा करू नये, शस्त्रविजय हा खरा विजय नसून धर्मविजय हा खरा विजय आहे' असे अुद्घोषून शस्त्रसंन्यास करणाऱ्या सम्राट अशोकाच्या आत्यंतिक अहिंसेला सम्राट कनिष्काच्या बौद्धधर्मात लवलोही थारा मिळाला नाही. त्याने अेका बाजूला त्या महायानपंथी बौद्धधर्माचा प्रचार चालविला असताच तो बौद्ध म्हणविणारा कनिष्क त्याच्या शत्रूवर मोठमोठी सैन्ये घेअून स्वाऱ्यांवर स्वाऱ्या करीत होता. त्याने स्वतःस चीनचा सम्राट म्हणवून घेण्यासाठी सशस्त्र रणांगणाच्या शिबिरातच दहादहा वर्षे लढत घालविली. शेवटी त्याच्या ह्या युद्धपिपासेला कंटाळून त्याच्या सैनिकांनीच बंड केले आणि त्या बौद्ध सम्राटाला ठार मारले, तेव्हाच काय ती त्याची युद्धपिपासा शमली!

हेही ध्यानात ठेवले पाहिजे की, हिमालयापलीकडील चीनच्या प्रांतात कनिष्काने बौद्धधर्माचा प्रसार केला तो कसा शक्य झाला? प्रथम शस्त्रविजयाने त्याने ते प्रांत जिंकून घेतले, म्हणूनच त्याला तो धर्मविजय तेथे अितक्या शीघ्रतेने संपादिता आला. तिकडे त्याने शेकडो प्रचारक धाडले, बिहार बांधले, सहस्त्रावधी भिक्षूंना पाळले, पोसले ते हाती प्रबळ राज्य होते, म्हणजेच शस्त्रबळ होते म्हणून ना?

सारांश, शस्त्रविजय श्रेष्ठ किंवा धर्मविजयच श्रेष्ठ असली अेकांतिक विधाने अवास्तव असतात.

शस्त्रबळावाचून धर्मविजय पंगू असतो. धर्मबळावाचून नुसता शस्त्रविजय पाशवी असतो, हेच खरे.

## भारतीय बौद्धांचा पिढीजात राष्ट्रद्रोह

सम्राट कनिष्क हा धर्माने बौद्ध वा वैदिक कोणीही असला तरी तो अभारतीय अशा कुशाण जातीचा परराष्ट्रीय आक्रमक होता आणि भारताच्या पश्चिमोत्तर भागावर त्याने बळाने राज्य स्थापिलेले होते. त्याचे साम्राज्य हे भारतावर आलेले परचक्रच होते. ते भारतीय राज्य नव्हते. ह्यासाठी ते अुलथून पाडून कुशाणांच्या राजकीय पारतंत्र्यात सापडलेल्या त्या त्या भारतीय प्रांतांना स्वतंत्र करण्यासाठी भारतातील वैदिकधर्मीय राष्ट्रभक्त जनता शकांशी प्राणपणाने लढली तशीच कनिष्काशीही लढत होती. परंतु भारतीय बौद्ध त्यावेळी काय करीत होते? तर ते त्या म्लेंच्छशत्रू कुशाण सम्राटाला त्याने बौद्धधर्म स्वीकारताच आपलाही सम्राट मानून, आपली राजनिष्ठा त्याला विकून, भारतीय राष्ट्राचा आणि त्याच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या वैदिकधर्मीय स्वराज्यनिष्ठ वीर जनतेचा द्रोह करीत होते. मागे मिन्यांडर प्रभृति जे ग्रीक राजे बौद्ध झाले त्यांना मिळून भारतीय बौद्धांनी भारतीय स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या सम्राट पुष्यमित्राचे काळी (मागे वर्णिल्याप्रमाणे) जसा राष्ट्रद्रोह केला तसाच भारतीय बौद्धांनी ह्या कुशाणांच्या परचक्राचे संकट आले तेव्हाही स्वराष्ट्रद्रोह करण्यास मागेपुढे पाहिले नाही.

जर भारतीय बौद्धांनी म्लेंच्छ शकांचा पाडाव करून आपले अेखादे भारतीय बौद्धराज्य स्थापन केले असते तर भारताला स्वतंत्र करण्याचे श्रेय त्या बौद्धराजालाही वैदिक राजाप्रमाणेच मिळाले असते आणि वैदिकधर्मीय सम्राट पुष्यमित्र किंवा शालिवाहन यांच्याप्रमाणेच आम्ही त्या भारतीय बौद्धराजाचाही गौरव केला असता. परंतु भारतीय बौद्धात तसली राष्ट्रीय धमक कुठली असणार? शक - कुशाणांशी त्या वेळची भारतीय राष्ट्राभिमानी यौधेय, शातवाहन प्रभृति गणराजे नि राज्ये शेसव्वाशे वर्षे युद्धांवर युद्धे लढत असता ह्या भारतीय बौद्धांनी म्लेंच्छांविरूद्ध भारताच्या स्वातंत्र्यासाठी अिकडची काडीही तिकडे केली नाही. पण त्याच म्लेंच्छ शत्रूंतील प्रबळतम अशा कनिष्क सम्राटाने अर्धवट का होअीना, पण बौद्धधर्म स्वीकारल्याची घोषणा करताच त्या परशत्रूला ही सारी बौद्ध जनता प्रेमपूर्वक आपण होअून शरण निघाली. अेखाद्या देवासारखा त्यांनी त्याचा अुदाअुदो केला. ते म्लेंच्छ शक-कुशाणराज्य चिरकाल टिकावे म्हणून बौद्ध-

विहारविहारांतून प्रार्थना केल्या. अर्थात अशा भारतद्रोहाने भारतीय वैदिक जनतेत बौद्धांविषयी जी चीड अुत्पन्न झाली तीमुळे सम्राट कनिष्का- सारख्याचा पाठिंबा मिळाला असताही भारतात बौद्धधर्मास सम्राट पुष्यमित्राच्या काळापासून लागलेली ओहोटी तशीच चालू राहिली, यात काही आश्चर्य नाही.

## सम्राट कनिष्काचा नातूच वैदिक धर्म स्वीकारतो!

त्यातही वर सांगितल्याप्रमाणे कनिष्काला तो चीनमध्ये लढत असता जेव्हा त्याच्याच सैन्यांतील बंडखोरांनी ठार मारले तेव्हा तर त्या भारतीय ''बौद्धांची अितो भ्रष्टस्ततो भ्रष्ट;'' अशी दुर्दशा झाली, कारण कनिष्कामागून त्याच्या राज्यावर बसलेला त्याचा पुत्र सम्राट हविष्क हा बौद्धधर्माविषयी सापेक्षतः अुदासीन राहिला आणि हविष्काच्या मृत्यूनंतर कनिष्काचा नातू जो त्या शककुशाण राज्याचा अधिपती झाला त्याने चक्क समारंभपूर्वक बौद्धधर्माचा परित्याग करून वैदिक धर्म स्वीकारला! त्याने आपले नावसुद्धा पालटून सम्राट 'वसुदेव' अशी शुद्ध संस्कृतनिष्ठ अभिधा धारण केली! शिवाची नि नंदीची प्रतिमा असलेली आपल्या नावाची नाणी पाडली!

## कनिष्क मरताच त्याच्या साम्राज्याचे तुकडे तुकडे अुडतात!

सम्राट कनिष्काचा मृत्यू होताच त्याच्या भारतातील साम्राज्याच्या चिंधड्या अुडाल्या. कनिष्काचे भारतातील राज्य अुत्तर भारतातही फारसे विस्तारू शकले नव्हते. ते प्रबळ असे नव्हतेच नव्हते. पंजाब, माळवा, सौराष्ट्र आपण आज ज्यास गुजराथ म्हणतो तो गुजराथ नि अुत्तर कोकणची लहान पट्टी असा भारताचा जो पश्चिमोत्तर भाग पूर्वी शकांच्या हाती पडलेला होता तेवढ्यावरच काय ते आंध्राचे आधिपत्य जाअून कनिष्काचे आधिपत्य प्रस्थापित झालेले होते. आता कनिष्कानंतर ह्या भागात असलेली जी तीन-चार शकराज्ये होती ती, कुशाणांचे आधिपत्य झुगारून देअून, पुन्हा स्वतंत्रपणे राज्य करू लागली. शालिवाहन राजांनी ह्या शक-कुशाणांच्या शतकव्यापी युद्धात साऱ्या दक्षिण भारताचे स्वातंत्र्य अबाधित राखले होते. आणि आता अुत्तर पूर्व भारतातील कनिष्कांचे नाममात्र अधिपत्य मानलेल्या लहानमोठ्या भारतीय राज्यांनीही ते आधिपत्य झुगारून देअून आपले स्वातंत्र्य संपादन केले. ह्याच पूर्व भारतातील राज्यात पाटलीपुत्राचेही लहानसे राज्य त्या गडबडीत स्वतंत्र झाले.

## पाटलीपुत्राचा मावळलेला सूर्य पुन्हा अुगवला!

वरच्या ओळीत पाटलीपुत्राचे 'लहानसे राज्य' असे म्हटले आहे. कोणास वाटेल की पाटलीपुत्रास 'लहानसे' असे चुकून म्हटले गेले असावे. पण ते चुकून म्हटलेले नाही. कारण, ज्या पाटलीपुत्रातील सिंहासनावर सम्राट चंद्रगुप्त, सम्राट अशोक, सम्राट पुष्यमित्र असे सम्राट विराजमान होअून गेले आणि आसेतु - हिमाचल अशा भारतीय साम्राज्याचे नियंत्रण - नेतृत्व शतकानुशतके जेथून केले गेले ते पाटलीपुत्राचे सिंहासन सूर्य जसा दिसता दिसता अस्तास जातो तसेच ह्या शक-कुशाणांच्या अिसवी सनाच्या आरंभी आलेल्या प्रलयाचे काली दिसता दिसता अस्तंगत झाले होते. त्यापुढे शक - कुशाणांशी शे-दीडशे वर्षे चाललेल्या भारतीयांच्या महायुद्धात पाटलीपुत्राचे किंवा मगधाचे स्वतंत्र असे अस्तित्वही कोठे भासमान झाले नाही. कोणीतरी नि कुठलातरी नामधारी राजा तेथे पाटलीपुत्राच्या चार भिंतीत वसत असे वा नसे.

अि.सन ३०० च्या आसपास ह्याच पाटलीपुत्राच्या लहानशा राज्यावर लिच्छवी नावाच्या बुद्धापासून मगधात प्रख्यात असलेल्या गणराज्याची सत्ता स्थापिली गेली.

ह्या लिच्छवी गणाच्या प्रमुखाची मुलगी कुमारदेवी हिचे अेका नामांकित सामन्त घराण्यातील चंद्रगुप्त नावाच्या तरुणाने अि.स. ३०८ मध्ये पाणिग्रहण केले. त्याच लिच्छवी गणाच्या पाठिंब्याने त्याने आसपासच्या प्रदेशावर स्वामित्व स्थापले आणि अि. स. ३२० मध्ये त्याने पाटलीपुत्रात आपल्या स्वतंत्र राज्याची स्थापना केली. ह्या चंद्रगुप्ताचा प्रख्यात सम्राट चंद्रगुप्त मौर्याशी नामसादृश्यामुळे कोणाचाही घोटाळा होअू नये. सम्राट चंद्रगुप्त हा मौर्य कुळाचा होता. परंतु हा तरुण नि

अुदयोन्मुख चंद्रगुप्त गुप्त कुलातील होता. त्याचा पराक्रम मात्र सम्राट चंद्रगुप्ताच्या कुळाला शोभेल असाच होता. त्याने आपल्या १०-११ वर्षांच्या राजवटीत आपले ते पाटलीपुत्रातील लहानसे राज्य मगध, प्रयाग नि अयोध्या हे प्रांत आपल्या राज्यास जोडून अितके वाढविले की त्यास 'महाराज' ही अभिधा यथार्थपणे शोभावी. म्लेंच्छ शकांच्या राजसत्तेचे अुन्मूलन करून नि भारतीय साम्राज्यपदाची महत्त्वाकांक्षा धरणाऱ्या आपल्या समुद्रगुप्त नावाच्या मुलाचे हाती आपले राज्य सोपवून चंद्रगुप्त अि.स. ३३० मध्ये मरण पावला. हे गुप्त घराणे वैदिकधर्माचे नितांत अभिमानी असून श्रीविष्णु ही त्यांची अुपास्यदेवता होती.

## सम्राट समुद्रगुप्त

राज्यावर येताच समुद्रगुप्ताने भारतात त्यावेळी अुत्तरेत आणि दक्षिणेत जी अनेक निरनिराळी भारतीय राज्ये स्वतंत्रपणे पण फुटकळपणे नांदत होती त्यांना जिंकून, मौर्यकालीन चंद्रगुप्त-चाणक्याप्रमाणे प्रथमतः अेक प्रबळ भारतीय साम्राज्य स्थापण्याचा आणि नंतर त्या बलाढ्य शक्तीच्या आधारे शक-कुशाणांच्या हाती भारताचा जो पश्चिमोत्तर प्रदेश अद्याप राहिला होता, तो स्वतंत्र करण्यासाठी त्या म्लेंच्छांवर चालून जावयाचा संकल्प सोडला. त्याप्रमाणे त्याने कामरूप, समतट, नेपाल प्रभृति पूर्वोत्तर सीमाराज्यांपासून विंध्यपर्वताचा प्रदेश जिंकून घेतला. नंतर विंध्य ओलांडून पूर्व बाजूने सदलबल तो दक्षिणेत अुतरला. दक्षिणेतील प्रमुख प्रमुख अशी बारा राज्ये त्याने जिंकली. कित्येक राजांना, लढाअीत पाडाव करून, पकडून आणविल्यानंतर त्यांनी त्याचे आधिपत्य स्वीकारताच त्यांची राज्ये तो परत करी नि त्यांना सोडून देअी. त्याच्या ह्या अुत्तर - दक्षिण दिग्विजयातील पराक्रमाविषयी नि यशाविषयी अनेक पाश्चिमात्य अितिहास लेखकांनीही धन्योद्गार काढले आहेत आणि त्यांच्यात प्रचलित असलेल्या भव्यतम अुपमांपैकी अेक अुपमा देअून समुद्रगुप्ताला 'The Hindu Napoleon' (हिंदु नेपोलियन) म्हणून मनःपूर्वक गौरविले आहे. अितक्या विस्तृत दिग्विजयानंतर समुद्रगुप्त पाटलीपुत्रास परत आला. त्याने जिंकलेल्या ह्या नव्या भारतीय साम्राज्याची वैदिकधर्मानुसार घोषणा करण्यासाठी त्याने मोठ्या समारंभाने अश्वमेध यज्ञ केला नि तो सम्राटपदाचा अधिकारी झाला. नंतर त्याने शक-कुशाणांवर स्वारी करण्याची जय्यत सिद्धता चालविली.

## कुशाणांची अंतिम शरणागती

सम्राट समुद्रगुप्ताच्या ह्या आगामी स्वारीची वार्ता अैकताच वायव्य दिशेकडील गांधार प्रभृति भारतीय भागात कुशाणांची जी लहानसहान राज्ये जीव धरून राहिलेली होती त्यांनी आपण होअून समुद्रगुप्ताचे आधिपत्य मान्य केले. कुशाणांना त्यावेळी आपले लोक 'कुश' असेही म्हणत. आपल्या शरणागतीचे प्रतीक म्हणून त्या कुशांनी आपआपल्या दूतांकरवी सम्राट समुद्रगुप्तास अनेक पुरस्कारही (नजराणेही) धाडून दिले. अशाप्रकारे दीड-दोन शतकांच्या अव्याहत लढ्यानंतर भारतीय कृपाणाने कुशाणांच्या भारतातील राजसत्तेचे मूळच शेवटी कापून काढले. कुशाणांचा प्रश्न येथेच निकालात निघाला.

परंतु (मागे सांगितल्याप्रमाणे) कनिष्काशी युद्ध चालू असता जे माळवा ते सिंधपर्यंतचे शकराजे आंध्रांचे आधिपत्य झुगारून देअून स्वतंत्र म्हणून मिरवू लागले होते त्यांनी मात्र आपण होअून शरणागतीचे बोलणे काढले नाही.

## सम्राट समदुगुप्ताचा मृत्यू नि नंतर

त्या शकांच्या म्लेंच्छ राज्यांवर चढाअी करण्याच्या बेतात असताच हा पराक्रमी सम्राट समुद्रगुप्त अि.स. ३७५ मध्ये मरण पावला. त्याने आपल्यामागे त्याचा धाकटा पण तेजस्वी नि तरुण पुत्र जो चंद्रगुप्त (दुसरा) त्यासच सम्राटपद द्यावे असे सांगितले होते. परंतु ही त्याची आज्ञा न मानता त्याचा ज्येष्ठ पुत्र जो रामगुप्त तोच आपल्या ज्येष्ठत्वाचा अधिकार सांगून सिंहासनावर बसला. परंतु तो अितका दुबळा होता की त्याच्या मंत्रिमंडळातील नि सैन्यमंडळातील बहुतेक कर्तृत्ववान प्रमुखाधिकारी मनातून त्याचा तिटकारा करू लागले. अितक्यात ह्या रामगुप्ताच्या दौर्बल्याविषयी साऱ्या जनतेतही क्षोभ अुत्पन्न व्हावा अशीअेक घटना घडून आली. यद्यपि काही अितिहासकार ह्या घटनेस केवळ आख्यायिका म्हणून समजत, तथापि ज्याअर्थी विशाखदत्त नि बाणभट्ट ह्यांसारख्या प्राचीन ग्रंथकारांनी तिला सत्य मानलेले आहे, अमोघवर्ष

राजाच्या दानपत्रातही ज्याअर्थी तिचा अुल्लेख सापडतो आणि अर्वाचीन अितिहासातील अल्लाअुद्दिनाविरुद्ध पद्मिनीच्या प्रकरणी आपल्या राजपूत वीरांनी तशाच अेका प्रसंगाशी तसेच तोंड दिलेले आढळते, त्याअर्थी रामगुप्ताविषयीच्या या आख्यायिकेच्या मुळाशी असलेली ती घटना बव्हंशी सत्य असावी असे काही अितिहासकारांचे जे मत आहे तेच ग्राह्यतर दिसते. ती घटना अशी :

सम्राट समुद्रगुप्त मृत्यू पावल्यामुळे आणि त्याच्यामागे रामगुप्तासारखा दुर्बल पुरुष सम्राट झाल्यामुळे शकराजे निर्भय होअून त्यांच्या शत्रूस्थानी असलेल्या त्या भारतीय साम्राज्याशी अुद्दामपणे वागू लागलेले होते. त्यांच्यापैकी अेका अुर्मट नि अधम म्लेंच्छराजाने सम्राट रामगुप्ताचा अुपमर्द करण्यासाठी त्यास ‘आज्ञा’ केली की ‘तू तुझी सुंदर नि तरुण पत्नी गृहदेवी हिला माझ्याकडे धाडून दे. नाही तर युद्धास सिद्ध हो!’ हा अुपमर्दकारक नीचपणाचा निरोप अैकताच मगधराज्यातील सारे राजकीय वातावरण क्षुब्ध होअून अुठले. परंतु सम्राट म्हणविणाऱ्या रामगुप्ताच्या नेभळेपणाची नि निर्लज्जपणाची अितकी परमावधी झाली होती की, त्याने ‘केवळ युद्ध टळावे’ म्हणून आपल्या राणीस, गृहदेवीस त्या शकक्षत्रपाकडे धाडण्याची सिद्धता केली.हे पाहताच त्याचा वर अुल्लेखिलेला धाकटा भाअू जो चंद्रगुप्त तो संतापाने लाल झाला. रामगुप्ताच्या आज्ञेला भीक न घालता त्याने गृहदेवीला आपल्या संरक्षणाखाली घेतले. नंतर कूटनीतीचा अवलंब करून चंद्रगुप्ताने त्या शकराजाला परत निरोप धाडला की आपल्या आज्ञेप्रमाणे राणी गृहदेवीला आपल्याकडे धाडण्यात येत आहे. पण स्त्रीसुलभलज्जेमुळे ती पडदा सोडलेल्या मेण्यातून येअू अिच्छिते. तिच्यासमवेत तिच्या दासींचा परिवारही तशाच मेण्यांतून येत आहे. हा संदेश अैकताच तो शकराजा अगदी हुरळून गेला आणि त्या योजनेप्रमाणे राणीस धाडून द्यावे, असे त्याने कळविले. अिकडे चंद्रगुप्त स्वत: स्त्रीवेष धारण करून राणीच्या मेण्यात बसला. समवेत येणाऱ्या दासींच्या अनेक मेण्यांतूनही त्याचे निवडक सैनिक वीर स्त्रीवेष घेअून बसले. तो झाकलेल्या मेण्यांचा मेळावा त्या शकराजाच्या राजधानीशी येताच आनंदाने अुल्लू झालेला तो शकराजा राणीच्या स्वागतार्थ स्वत: तिच्या मेण्यापाशी आला. अितक्यात दासी वेषातील चंद्रगुप्ताने त्याच्यावर झडप घालून आपल्या तरवारीने त्या असावध राजाचा तत्काळ शिरच्छेद केला. अितर मेण्यांतूनही चंद्रगुप्ताच्या त्या सशस्त्र सैनिकांनी शस्त्रे अुपसून खाली अुड्या घेतल्या. शकराजाच्या शिरच्छेदाची भयंकर बातमी आजूबाजूला पसरते न पसरते तोच चंद्रगुप्तासह ते सारे सशस्त्र पथक शत्रूच्या आटोक्यातून पाहता पाहता भरधाव निसटून गेले.

हे अद्‌भुत साहसाचे कृत्य करून आणि आपल्या राष्ट्राचा अुपमर्द करणाऱ्या शकराजास स्वहस्ते देहान्त प्रायश्चित देअून राजपुत्र चंद्रगुप्त पाटलीपुत्रास परत आला आहे, ही वार्ता पसरताच सारी राजधानी आणि राष्ट्र चंद्रगुप्ताच्या जयजयकाराने दुमदुमून गेले. दिवंगत सम्राट समुद्रगुप्ताच्या आज्ञेचे अुल्लंघन करून सिंहासनावर चढलेल्या त्या भेकड रामगुप्ताला खाली ओढून चंद्रगुप्तालाच सम्राटपद दिले पाहिजे, म्हणून मोठी अुठावणी झाली. त्या प्रक्षोभात रामगुप्त ठार मारला गेला. चंद्रगुप्त साम्राज्यपदावर आरूढ झाला. शत्रूकडून होणाऱ्या विटंबनेपासून जिला त्याने आपल्या अद्‌भुत पराक्रमाने मुक्त केले होते त्या राणी गृहदेवीशीच चंद्रगुप्ताने विवाह केला. नंतर आपली बलाढ्य सेना सुसज्ज करून सम्राट चंद्रगुप्ताने शकक्षत्रपांवर स्वारी केली.

## शकांशी शेवटचे युद्ध,
## शकक्षत्रप रूद्रसिंह ह्याला ठार मारले

गुजराथ ते माळवा ह्या शकराज्याच्या सीमेशी युद्धाला तोंड जुंपताच शकराजांनी ठिकठिकाणी प्रतिकार केला. परंतु भारतीय सैन्याने शत्रुसैन्याची ठिकठिकाणी धूळधाण अुडवली. शेवटच्या लढाअीत तर शकांचा अुरलासुरला जो शकक्षत्रप सत्यसिंहाचा पुत्र, त्या क्षत्रप रुद्रसिंह ह्यालाच रणांगणावर गाठून सम्राट चंद्रगुप्ताने स्वहस्ते त्याचा शिरच्छेद केला.

## येथेच शकांच्या राजसत्तेचा अंत झाला

शकांचा असा पूर्ण मोड होताच त्यांच्या हाती त्यावेळी असलेल्या सिंध, कच्छ, सौराष्ट्र, गुजराथ, माळवा अित्यादी प्रांतांना स्वतंत्र करून सम्राट चंद्रगुप्ताने आपल्या भारतीय साम्राज्यात समाविष्ट केले. शकराजांचा असा समूळ अुच्छेद केल्यानंतर त्यांची तोवर जी राजधानी होती त्या प्राचीन नि प्रख्यात अुज्जयिनीनगरात सम्राट चंद्रगुप्ताने जेव्हा विजयप्रवेश केला तेव्हा तेथे मोठा राष्ट्रीय महोत्सव साजरा करण्यात आला. सम्राट चंद्रगुप्ताने 'विक्रमादित्य' ही पदवी धारण केली. पूर्वीपासून तिकडे चालत आलेल्या मालव संवतालाच शकांचा समूळ अुच्छेद करणाऱ्या ह्या महान विजयाच्या स्मरणार्थ आपले नाव देअून 'विक्रम संवत्' चालू केला, ते मागे सांगितलेच आहे. त्याने अुज्जयिनीलाच आपल्या भारतीय साम्राज्याच्या पश्चिम भागाची राजधानी केली आणि तेथे तो सिंहासनारूढ होअून वास्तव्य करू लागला.

विक्रमादित्याने म्लेंच्छांवर मिळविलेल्या ह्या विजयामुळे साऱ्या भारताला जी धन्यता वाटली ती काय वर्णावी? परकीयांच्या हातून सारा भारत स्वतंत्र होअून तो आपल्या अेकछत्र साम्राज्यात 'अेकराष्ट्र' झाला. शककुशाणांचा नाश करण्यासाठी १५० - २०० वर्षे लढत आलेल्या यौधेय, मालव, विलिनयंकुर, शातवाहन प्रभृति अनेक वीरवरांच्या आणि त्यांच्या स्वत:च्या पितृपितामहांच्या पराक्रमांचे, यशापयशांचे नि राष्ट्रीय आशा-आकांक्षांचे शेवटी सार्थक झाले; ते पाहून स्वत: विक्रमादित्यालाही किती धन्यता वाटली असेल!

ह्याविषयी व्हिन्सेंट स्मिथसारखा अिंग्लिश अितिहासकारही कण्हत कुंथत का होअीना, पण म्हणतो: "We may feel assured that differences of a race, creed and manner supplied the Gupta monarch with special reasons for Desiring to suppress the impure foreign (म्लेंच्छ) rulers of the Western India. Chandragupta Vikramaditya although tolerant of Buddihism and Jainism was himself an orthodox Hindu, especially devoted to the cult of Vishnu, and as such could not but have experienced peculiar satisfaction in 'Violently uprooting foreign chieftains."

## शेवटी कुशाणांप्रमाणेच शकही नामशेष झाले!

पूर्वी सांगितलेच आहे की, शकांनी वैदिक धर्म, संस्कृत भाषा आणि भारतीय आचार-विचार ह्यांना अंगीकारले होते. विक्रमादित्याने त्यांच्या राजसत्तेचेही आता आपल्या खड्गबळाने अुन्मूलन केल्यामुळे त्यांच्या शकपणाचे असे भारतीयांपासून भिन्न अस्तित्व मुळातच नाहीसे झाले. दोन-तीन पिढ्यांच्या आतच शक असा, कुशाणांप्रमाणेच त्या भारतीय जगतात कोणीही अुरला नाही.

भारतवर्षाच्या अैतिहासिक कालामध्ये अनेक सम्राट होअून गेले, पण शक-कुशाणांचा अंत करणाऱ्या हा सम्राट विक्रमाअितका लोकप्रिय असा सम्राट क्वचितच कोणी झाला असेल. त्याच्या राजवटीत फायिआन नावाचा जो चिनी प्रवासी आला होता त्या परकीयानेही त्याच्या साम्राज्यात भारतीयांच्या वैभवाचा, सुखाचा, संपन्नतेचा नि संतोषाचा कसा कळस झाला होता ते वर्णिलेले आहे. भारताच्या सर्व भागांतील खेड्यापाड्यांतून सुद्धा आख्यायिकांतून नि लोकगीतांतून आजही 'राजा विक्रमाचे' नाव नि त्याची न्यायप्रवीणता मोठ्या प्रेमाने संकीर्तिली जात आहे. अुणीपुरी पस्तीसअेक वर्षे अेकछत्र अशा त्या बलाढ्य भारतीय साम्राज्याचे संरक्षण नि संगोपन केल्यानंतर सम्राट विक्रमादित्य अिसवी सन ४१४ मध्ये दिवंगत झाला.

भारतीय अितिहासाचे जे पान ह्या शक-कुशाणान्तक सम्राट विक्रमादित्याच्या राजमुद्रेने अंकित झालेले आहे, तेच होय आपल्या भारतीय अितिहासातील सोनेरी पान तिसरे!

# सोनेरी पान चौथे

## ४. हूणान्तक यशोधर्मा

### हूणांची जगावरच धाड

ह्या पुस्तकात पूर्वी हूणांचा अुल्लेख आलेलाच आहे. ह्यांनीच शक - कुशाणांच्या झाडून साऱ्या लोकांना त्यांच्या प्रदेशातून हुसकून देअून ते प्रदेशचे प्रदेश व्यापून टाकले होते. पण आता त्या शक-कुशाणांहूनही अधिक भयंकर अशा ह्या हूणांच्या प्रळयाने सारा आशियाच नव्हे, तर सारा युरोपही हादरवून त्या वेळच्या ज्ञात जगातील जी जी स्थायी, सुसंस्कृत नि संघटित अशी राष्ट्रे नि राज्ये होती ती सर्वच्या सर्व चीनपासून ते रोमपर्यंत चळचळा कापावयास लावली. त्यांच्या संख्याबळाला अंतच नव्हता. त्यांची धाड ह्या वा त्या अेका प्रदेशापुरती नव्हती, तर ती त्या काळच्या साऱ्या ज्ञात जगावर पडलेली होती!

त्यांची सैन्ये, जेव्हा बाहेर पडत तेव्हा, सहस्त्रावधी स्त्री-पुरुषांसुद्धा घोड्यावर स्वार होअून हाती भाले नि तलवारी परजीत, जी समोर दिसतील त्या त्या नगरांना, ग्रामांना आग लावीत, मुलामाणासांसुद्धा सगळ्यांची शिरकाणे करीत, दिवसा नव्हे, तर रात्रीबेरात्रीसुद्धा, हिंस्त्र श्वापदांच्या थव्याप्रमाणे मोठमोठ्या कर्कश्य किंकाळ्या नि डरकाळ्या फोडीत, चळचळ कापणाऱ्या शत्रुप्रदेशांतून सारखी धावत सुटत. जेथे जेथे लढाअी होअी तेथे लढाअी संपताच शिरकाण केलेल्या स्त्री-पुरुषांच्या डोक्यांच्या कवट्या काढून त्यांच्या वाट्या करून त्या वाट्यांतून ते मद्य पीत नि त्याचे जयोत्सव साजरे करीत.

हूणांचा मूळचा प्रदेश चीनच्या साम्राज्याला लागून असल्यामुळे त्यांच्या अशा भयंकर अुपद्रवाने चीनचे प्रांताचे प्रांत अुजाड झाले. वर्षानुवर्षे हूणांच्या टोळधाडींना निवारता निवारता टेकीस आल्यामुळे चीनच्या साऱ्या देशाभोवतीच हूणांच्या टोळधाडीपासून संरक्षील अशी प्रचंड तटबंदी बांधण्याची योजना चीनच्या सम्राटाचे मनात आली, तीच होय आजची 'चीनची भिंत'! जगातील अेका आश्चर्यासारखी अुभी असलेली ही चीनची प्रचंड भिंत म्हणजे हूणांची ती मूर्तिमंत भीतीच होय!

अिकडे हूणांची जी अनेक घोडदले मध्य आशियास तुडवीत चालली होती त्यांना त्यांच्या 'आटिला' नावाच्या अेका सेनापतीने संघटित करून, आशिया ओलांडून, युरोपकडे धाव मारली. त्या असंख्य घोडदळांच्या भिन्न भिन्न सैन्याने सापडेल त्या दिशेने युरोपियन रशियात घुसून नुसता हलकल्लोळ माजवून दिला. विद्यापीठे, कलपीठे, घरे, देवघरे, झोपड्या नि राजवाडे, ग्रामे नि नगरे, जे दिसेल ते ते हूण पेटवीत चाललेल्या आगीच्या डोंबात भस्म होअून गेले जो जो दिसेल त्याला ते कापीत सुटले. रशिया तुडवून ते पोलंडमध्ये घुसले. तेथून त्या हूणांच्या धाडी पुढच्या गाथ लोकांवर तुटून पडल्या. रोमन साम्राज्याच्या सैन्यामागून सैन्याचा त्यांनी धुव्वा अुडविला. विजयापेक्षा हूणांच्या क्रूरतेला विध्वंसाचीच अधिक आवड असे त्यामुळे सारे युरोप नुसते पराभूत झाले अितकेच नव्हे तर सारे युरोप रक्तात न्हाअून निघाले, वैराण झाले. हूणांनी केलेल्या युरोपच्या दुर्दशेचे भीषण विवरण (तपशील) ज्याला पाहावयाचे असेल त्याने गिबनचा Decline and Fall of the Roman Empire हा अितिहास वाचावा. बहुतेक युरोपियन भाषांतून कोणा दुष्टाला शिवी हासडायची तर आजही त्याला 'अे हूण' असेच म्हणतात, जसे आपण 'पिशाच्च' म्हणतो. अितकी ह्या हूणांची धास्ती युरोपने घेतली होती.

मध्य आशियातून हूणांचा अेक महापूर जसा वर सांगितल्याप्रमाणे युरोपवर कोसळला तसाच त्यांच्या घोडदळाचा दुसरा महापूर काही काळ हिमालयाभोवती घोटाळत घोटाळत आणि हिमालयाच्या पलीकडल्या शक - कुशाणांच्या अुरल्या सुरल्या राज्यांचा नि लोकांचा नायनाट करीत शेवटी भारताच्या वायव्येकडील गांधारप्रभृती प्रदेशावरही कोसळला. चीनच्या, रशियाच्या, रोमन साम्राज्याची नि राज्यांची जशी दुर्दशा अुडविली त्याच आवेशाने नि आवेगाने भारतासही ह्या

टोकापासून त्या टोकापर्यंत तुडवून टाकू अशा अुतावीळ अीर्षेने ह्या हूणांच्या टोळधाडी गांधारप्रांत तुडवीत सिंधूकडे घुसू लागल्या.

## परंतु

परंतु भारताच्या सुदैवाने ह्या काळी भारतावर पूर्वीच्या ग्रीकांच्या स्वारीच्या वेळेप्रमाणे कोणा भेकड धनानंदाचे नामधारी साम्राज्य नव्हते, तर ते होते शक-कुशाणांतक सम्राट विक्रमादित्याच्या पुत्राचे, क्षत्रियकुलावतंस सम्राट कुमारगुप्ताचे! भारतात त्या काळी शतकव्यापी गुप्तकालीन सुवर्णयुग नांदत होते. मौर्यकालीन सुवर्णयुगात शेवटी शेवटी सम्राट अशोकाने आत्यंतिक अहिंसेच्या खुळापायी शस्त्रसंन्यास केल्यामुळे भारताचे सैन्यबळ जसे विस्कळीत नि दुर्बळ झाले होते तसे वैदिकधर्मीय सम्राट कुमारगुप्ताने कोणताही आत्मघातक शस्त्रसंन्यास केला नसल्यामुळे त्याच्या त्या भारतीय साम्राज्याचे शस्त्रबळ दुबळे झालेले नव्हते. साऱ्या जगात अुत्पात माजविणाऱ्या हूणांसारख्या भयंकर शत्रूची धाड भारतावरही कोसळण्याचा प्रसंग आज वा अुद्या येणार आहे, हे अुघड दिसत असल्यामुळे आपल्या भारतीय साम्राज्याचे पर्यंतांचे (सरसीमांचे) संरक्षण करण्यास समर्थ असा युयुत्सु संघटित सैन्यसंभार सम्राट कुमारगुप्ताने सुसज्ज ठेवलेला होता.

## हूणांच्या पहिल्या स्वारीचा बोजवारा अुडविला!

हूणांचे परचक्र गांधारप्रांतावर कोसळल्याचे अैकताच सम्राट कुमारगुप्ताने आपल्या चतुरंग सैन्यासमवेत आपला पराक्रमी पुत्र जो स्कंदगुप्त त्यास हूणांवर स्वारी करण्यास धाडून दिले. हूणांच्या अगणित संख्याबळाच्या आधारवर त्यांचे जे तोवर अजिंक्य ठरलेले अेक विशेष युद्धतंत्र होते, त्याप्रमाणे त्यांनी भारतीय सैन्याची लांडगेतोड करण्यास आरंभ केला. त्यांच्या चाल करून येणाऱ्या सहस्त्रावधि घोडेस्वारांच्या अेका टोळधाडीचा भारतीय सैन्याने फडशा पाडला, न पाडला तोच त्यांच्या नव्या टोळधाड, फुटलेल्या वारूळातील मुंग्याच्या रांगांसारख्या चहुबाजूंनी चालून येत असलेल्या दिसत. त्यांचा नाश होतो न होतो तोच पुन्हा नव्या टोळधाडी दत्त म्हणून साऱ्या प्रदेशात धुमाकूळ घालू लागत. पण अशा या अनिवार म्लेंच्छ शत्रूंशी कुमार स्कंदगुप्ताच्या भारतीय सैन्याने लढायामागून लढाया देत आणि त्यांचा संहार करीत वर्षनुवर्षे ते युद्ध अितक्य सातत्याने चालविले की, शेवटी हूणांचे ते अमित संख्याबळही क्षीण होअून त्यांच्यात गुप्तसाम्राज्याच्या सीमेत अेक पाअूलही पुढे सरकण्याची धमक अुरली नाही, किंवा त्यांना ते अुभे होते तेथे स्कंदगुप्ताच्या चढाअू माऱ्यापुढे अुभे राहणे अशक्य झाले. तेव्हा त्यांच्या त्या अुरलेल्या टोळ्यांनी मागे पळ काढला आणि पडतझडत आल्या वाटेने ते भारतीय सीमेच्या बाहेर निघून गेले. हूणांच्या ह्या पराभवाने त्यांना अितकी धास्ती बसली की, पुढे अुणीपुरी ४० वर्षे भारताकडे पुन्हा वळण्याची त्यांची छाती झाली नाही.

## हूणांना पिटाळून लावणारा
## विजयी वीर स्कंदगुप्त!

वर्षानुवर्षे समरांगणात लढत राहून आणि हूणांसारख्याजगातील मोठ-मोठ्या साम्राज्यांना पाणी पाजणाऱ्या म्लेंच्छशत्रूचा असा निर्णायक पराभव करून हा विजयी युवराज स्कंदगुप्त जेव्हा आपल्या पित्यास भेटावयास पाटलीपुत्रास परतला तेव्हा त्या भारतीय साम्राज्याच्या राजधानीत नि साऱ्या राष्ट्रात त्याचा अपूर्व गौरव झाला. त्याचा वृद्ध पिता सम्राट कुमारगुप्त ह्याच्या आनंदाला पारावर अुरला नाही. त्याने भारताच्या ह्या असामान्य विजयाची राष्ट्रीय अुद्घोषणा करण्याकरता वैदिकधर्मीय परंपरेप्रमाणे अेका मोठा अश्वमेघ यज्ञ केला.

## सम्राट कुमारगुप्ताचा मृत्यू :
## स्कंदगुप्त सम्राट होतो

**ह्यानंतर तो कृतकृत्य झालेला वृद्ध सम्राट कुमारगुप्त काही वर्षांनी अि.स. ४५५ त वारला. त्याच्या मागे त्याचा हूणांस पिटाळून लावणारा पराक्रमी पुत्र जो स्कंदगुप्त तोच सम्राट झाला. त्याच्या जीवनातील त्याच्या**

**कर्तृत्वाविषयीच्या अितर अुल्लेखनीय घटनांचा संबंध प्रस्तुत प्रकरणी येत नसल्यामुळे आणि विशेषतः स्थलाभावी, ते वृत्त येथे सोडून देणे भाग आहे.**

मध्यंतरी युरोपवर धाड घालणाऱ्या हूणांचा कर्तृत्ववान सेनापती आटिला प्रमाणेच आशियातील हूणांच्या विलग विलग सैन्यांना अेकत्र करून खिंखिल नावाच्या अेका कर्तृत्ववान पुढाऱ्याने आपल्या आधिपत्याखाली दुसरे अेक केंद्र संघटिले होते आणि तो स्वतः त्याचा राजा म्हणवून घेअू लागला होता. भारतात मागे झालेल्या हूणांच्या पराभवाचे अुट्टे काढण्यासाठी आणि भरतखंड जिंकून घेण्यासाठी त्याने ह्या नव्या संघटनेच्या बळावर भारतावर पुन्हा स्वारी केली. ही गोष्ट सम्राट स्कंदगुप्ताच्या राजवटीच्या अुत्तरकाळात घडली.

## भारतावर हूणांची बलवत्तर चढाअी

पहिल्या धडाक्यातच हूणांनी भारतीय साम्राज्याच्या वायव्य प्रांतावर रक्षणार्थ ठेवलेल्या साम्राज्यातील सैन्याचा अेक-दोन ठिकाणी पराभव करून त्यांना मागे हटविले. हे कळताच त्याचे आता अुतारवय झाले असताही सम्राट स्कंदगुप्त हूणांशी तोंड द्यावयाला आपली राजधानी सोडून स्वतः पंचनदापर्यंत चालून गेला. हूणांनी मागे हटविलेल्या आपल्या साम्राज्यीय सैन्याची पुन्हा सिद्धता करून हूणांवर अुलट चढाअी करण्याच्या सिद्धतेत तो तिकडे समरशिबिरात असताना अिकडे पाटलीपुत्र नगरात त्याचा सावत्रभाअू जो पूरगुप्त तो स्कंदगुप्ताचे सिंहासन बलकावण्याचे अधम कृत्य करण्याच्या बेतात आहे, असे त्याला कळले. तरीही वैयक्तिक स्वराष्ट्राभिमानी सेनानी स्कंदगुप्त न परतता म्लेंच्छांशी तिकडे झुंजतच राहिला. कारण साम्राज्य सेनेला तिकडेच सोडून जर तो गृहकलहापायी परत राजधानीस येता तर त्या भारतीय सैन्याचे धैर्य खचून तो बांध फुटताच महापुराप्रमाणे हूणांची क्रूर सैन्ये सारा पंजाब नि अर्धा अुत्तरभारत हां हां म्हणता ग्रासून टाकती. या शंकेने तो वृद्ध सम्राट तिकडे समरशिबिरातच राहून शत्रूंशी झुंजत होता. सम्राट असावा तर असा!

आणि आपल्या राष्ट्रासाठी असा लढत असतानाच तो वृद्द वीरावतंस, स्कंदगुप्त अि. स. ४७१ चे आसपास समरशिबिरातच मरण पावला. सम्राट असावा तर असा!

## सम्राटाने अुभ्याअुभ्याच मेले पाहिजे!

रोमन साम्राज्याच्या भरभराटीच्या काळात होअून गेलेल्या अेका नामांकित रोमन सम्राटाविषयी अशी अेक कथा सांगण्यात येते की तो आपल्या राजवाड्यात मरणासन्न होअून पडला असता अकस्मात अुठून नि खड्ग हाती घेअून अुभा राहिला. हे पाहताच त्याला वायूचा झटका आला की काय अशा शंकेने त्याचे राजवैद्य नि परिचारक घाबरून 'हां हां महाराज हे काय?' असे म्हणत त्याला खाली निजवू लागले. तेव्हा आपला अंतिम श्वास सोडण्याच्या आधी तो म्हणालाः 'दूर व्हा, रोमचा सम्राट शय्येवर लोळत घोळत मरता कामा नये! रोमच्या सम्राटाने आपल्या पायावर ताठ अुभे राहून रणसज्ज पवित्र्यातच अुभ्याअुभ्या मेले पाहिजे! A Roman Emperor must die standing.'

अशाच बाणेदारपणाने म्लेंच्छ शत्रूंशी झुंजत झुंजत भारताचा हा सम्राट स्कंदगुप्त सम्राट असताही सैनिकासारखा समरशिबिरात मरण पावला. पूर्वी त्याच्या तारुण्यात ह्याच अनावर हूणांच्या टोळधाडीची नांगी ठेचून त्याने त्यांना सीमापार पिटाळून दिलेले होते. आता वृद्धपकाळीही त्याच प्रबळ राष्ट्रशत्रूंशी तो रणांगणात अुतरून झुंजत होता. सारे राजविलास अुपलब्ध असताही त्यांच्याकडे पाठ फिरवून आपल्या जीवनाची अेकंदर पंधरा-वीस वर्षे तरी भारतीय साम्राज्याच्या नि स्वातंत्र्याच्या रक्षणार्थ त्याने रणशिबिरातील खडतर नि कठोर अवस्थेत काढली. त्याला त्या काळात अत्यंत क्लेश सोसावे लागले. पण त्याने ते सर्व कष्ट सोसून त्या विस्तृत भारतीय साम्राज्याला धक्का लागू न देता त्याच्या संरक्षणार्थ शेवटी देह ठेवला, तोही राष्ट्रशत्रूशी झुंजता झुंजता अेखाद्या सैनिकासारखा, पंचनदीतील सुदूरच्या रणशिबिरातच! राजधानीतील प्रासादात नव्हे!! सम्राट असावा तर असा!

ज्या पन्नास वर्षांत हूणांनी अिकडे चीनचे प्रदेश अुद्ध्वस्त करून तिकडे रशिया ते रोमन साम्राज्यापर्यंतचा प्रदेश पादाक्रान्त केला त्याच पन्नास वर्षांत त्या प्रबळ शत्रूला त्याच्या हाताशी असलेल्या भारतावर तो वारंवार चढाया करीत असताही जर सिंधुनदीपर्यंतच्या अेका कोपऱ्यापलीकडे स्थिरपणे पाअूल टाकता आले नसेल तर ते सम्राट स्कंदगुप्ताच्या नि

भारतीय सैन्यबळाच्या प्रतापामुळेच होय. नाहीतर हूणांच्या भर अुन्मादात साऱ्या आशिया, युरोपची त्यांनी जी दुर्दशा अुडवून दिली तीच त्यांनी साऱ्या भारताचीही अुडविली असती. हूणांचा पूर्ण नि:पात होण्यापूर्वीच सम्राट स्कंदगुप्ताला मृत्यू आला. पण त्याच्या ह्या प्रतापामुळेच पूर्वीचा भर अुन्माद ओसरून क्षीणबल झालेल्या ह्या हूणांचा नि:पात करणारी बलवत्तर वीरांची पिढी भारतात लवकरच रणांगणात अुतरण्याची शक्यता निर्माण झाली.

यास्तव सम्राट स्कंदगुप्ताच्या स्मृतिसमाधीला, विक्रमादित्यासारख्या कोणत्याही दिग्विजयी भारतीय सम्राटाला वाहावी तितक्याच गौरवाने, अभिमानाने नि राष्ट्रीय कृतज्ञतेने आम्ही श्रद्धांजली वाहत आहो!

## सम्राट स्कंदगुप्ताच्या मृत्यूनंतर

स्कंदगुप्ताच्या मृत्यूनंतर त्याच्याविरूद्ध आधीच बंड करून अुठलेल्या त्याच्या सावत्रभावाने, पूरगुप्ताने मगधाचे सिंहासन बळकावले. परंतु कर्तृत्व असे त्याच्यात लवलेशही नव्हते. स्कंदगुप्त मरताच त्याच्या पराक्रमाच्या नि नावाच्या दराऱ्याने वायव्येस घुटमळत राहिलेल्या हूणांच्या टोळधाडी त्यांचा राजा खिंखिल याच्या आधिपत्याखाली पुढे सरकल्या. खिंखिलाच्या मृत्यूनंतर त्याचे राज्यपद तोरमाण नावाच्या पराक्रमी पुरुषाने पटकाविले. त्याच्या राजवटीत हूणांच्या विध्वंसक नि अत्याचारी प्रवृत्ती मोकाट सुटून काम्बोज, गांधार नि पंजाब ह्या प्रांतात लुटालुटीचा नि जाळपोळीचा धुमाकूळ माजला. तक्षशिलेच्या जगद्विख्यात विद्यापीठाचाही विध्वंस झाला. तेथील सहस्त्रावधी मूल्यवान ग्रंथांची हूणांनी होळी केली.

राष्ट्रीय शस्त्रबळाचा पाठिंबा नसला म्हणजे राष्ट्रीय साहित्य नि संस्कृती ह्यांचीही परशत्रूकडून कशी धूळधाण अुडविली जाते, त्याचे हे आणखी अेक प्रात्यक्षिक पहा!

मध्यंतरी तिकडे अिराण देशावर तुटून पडलेल्या हूणांच्या सैन्याने सारा अिराण पादाक्रांत करून अि.सन ४८४ मध्ये अिराणचा राजा फिरोज ह्यास पकडले आणि त्याला जिवे ठार मारले. अिराणचा प्रश्न असा निकालात निघाल्यामुळे तिकडे लढत राहिलेले हूणांचे सहस्त्रावधि सैनिक त्यांच्या तावडीत तोपर्यंत न सापडलेल्या भारताचीही तीच दुर्दशा करण्यासाठी भारतात घुसून तोरमाणाच्या सैन्यात शिरले. त्यांचे बळ असे अकस्मात वाढताच तोरमाणाने ५११ च्या आगेमागे पंजाबातून पुढे घुसून माळवा प्रांत, अुज्जयिनी नगरासह जिंकून घेतला. तोरमाणाच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र मिहिरगुल हा हूणांचा राजा झाला. तो आपल्या बापापेक्षाही सवाअी पराक्रमी नि सवाअी क्रूर होता.

## मिहिरगुल रूद्रदेवतेचा अुपासक बनला

आश्चर्याची गोष्ट अशी की, निदानपक्षी भारताच्या वायव्य प्रांतात शिरल्यापासून हूणांमध्ये वैदिकधर्मातील रूद्र ह्या देवतेची अुपासना वेगाने फैलावू लागली होती आणि बुद्धधर्माचा तर त्यांना पहिल्यापासूनच मोठा तिटकारा होता. त्यांचा नवा राजा मिहिरगुल हाही त्याला अपवाद नव्हता. तो वैदिक रूद्रदेवतेचा अेकनिष्ठ भक्त होता आणि बुद्धधर्माचा नि बौद्धांचा कट्टर द्वेष्टा होता. त्याच्याविषयी व्हिन्सेंट स्मिथ लिहितो. : "The Savage Invader who worshipped as his patron deity Shiva, the god of destructiion, exhibited ferocious hostility against the peaceful Buddhistic cult and remoreselessly overthrew their Stupas and Monasteries which he plundered of their treasuries."

## वैदिकांचा स्वराष्ट्राभिमान आणि बौद्धांचा राष्ट्रद्रोह

ह्यामध्ये आम्ही वैदिकांच्या राष्ट्राभिमानी आणि बौद्धाच्या राष्ट्रद्रोही प्रवृत्तीविषयी जी विधाने केलेली आहेत ती वाचकांनी संदर्भासाठी पुन्हा अेकदा वाचावी. बौद्धांची ही राष्ट्रद्रोही प्रवृत्ती आणि वैदिकांची ही राष्ट्राभिमानी प्रवृत्ती ह्यांमधला विरोध स्पष्ट करण्यास आणि आमच्या विधानांचे सत्यत्व पटविण्यास हूणांचा राजा जो मिहिरगुल त्याचे हे प्रकरण अत्यंत अुपयुक्त कसे आहे ते पहा.

मिहिरगुल हा भारतावर आक्रमण करणारा हूण राजा वैदिकधर्मीय रुद्रदेवतेचाच अुपासक होता. आणि त्याने वैदिकांना पाण्यात पाहणाऱ्या भारतीय बौद्धांचा अनन्वित छळ चालविला होता. पण अेवढ्यासाठी वैदिकधर्मीय राजांनी किंवा जनतेने त्या परकीय हूण राजाचे राजकीय दास्यत्व स्वीकारले नाही किंवा त्यास मिळून भारतीय बौद्धांच्या छळास हातभार लावला नाही; तर, तो मिहिरगुल स्वधर्मीय असला तरी राजकीय दृष्टीने तो परकीय असल्यामुळे त्याला भारताचा राष्ट्रशत्रूच मानले आणि भारताचा जो प्रदेश त्याच्या हातात सापडला होता त्या प्रदेशास राजकीयदृष्ट्या मुक्त करण्यासाठी त्याच्याशी वैरच मांडले. वैदिकात तक्षशिलेचा अंबुज किंवा जयचंद ह्यासारख्या काही राष्ट्रद्रोही व्यक्ती पूर्वी किंवा नंतर निघाल्या नाहीत असे नाही. परंतु अेकंदरीत वैदिक समाज अशा म्लेंच्छ राजाचे कट्टर शत्रुत्वच करीत आला आणि भारताच्या स्वातंत्र्याच्या नि साम्राज्याच्या संरक्षणासाठी घनघोर युद्ध लढत आला. वैदिकांच्या ह्या स्वराष्ट्राभिमानी बाण्याचा स्मिथसारख्या अिंग्लीश अितिहासकारासही, किंचित् कुत्सित भाषेत का होअीना, पण वारंवर अुल्लेख केल्यावाचून राहवले नाही. वैदिकधर्मीय हिंदू हे कोणत्याही म्लेंच्छ राजसत्तेचे अुपजत शत्रू असतात, असा सर्वसाधारण अुल्लेख करताना तो लिहितो : "These foreign tribes Shakas, Pahlavas & Yavanas at the time settled in Western India as the lords of a conquered native population were the objects of hostility of the Vaidik King Vilivayankur II.. He recovered the losses which his kingdom had suffered at the hands of the intruding foreigners and utterly destroyed the power of (the Shaka King) Nahpan. The hostility of the Andhra (Vaidik) monarch was stimulated by the disgust felt by all Hindus, and especially by the followers of the orthodox Bramhanical system at the outlandish foreign barbarians."

क्वचित, भारतावरील ह्या अितिहासकार स्मिथच्या अिंग्लिश साम्राज्याचेही कट्टर शत्रू हिंदू हेच होते, ह्या त्याच्या स्वानुभावाचे शल्यही त्याच्या वरील वाक्यात व्यक्तविले गेले असावे.

## राजा यशोधर्मा

मगधातील गुप्तसाम्राज्यपद पुरगुप्तासारख्या कुपात्र नि दुबळ्या पुरुषाच्या हाती जाताच त्याचे आधिपत्य कोणीही मानीनासे झाले. गुप्तसाम्राज्याचे मांडलिक असलेले बहुतेक राजे नि प्रदेश स्वतंत्रपणे राज्य करू लागले. यद्यपि त्या निरनिराळ्या स्वतंत्र भारतीय राज्यातील प्रत्येकाला म्लेंच्छ हूणांच्या माळव्यापर्यंत वाढलेल्या राजसत्तेची भीती वाटत होती, प्रत्यक्ष अुज्जयिनीला विक्रमादित्याच्या सिंहासनावर हा मिहिरगुलसारखा म्लेंच्छ राक्षस बसत असलेला पाहून बहुतेकांच्या अंगाची जरी लाही लाही होत असली आणि हूणांचा अुच्छेद कधी होअील, अशी प्रत्येक स्वराष्ट्राभिमानी वैदिक भारतीयाला जरी सचिंत अुत्कंठा लागली होती तरी हूणांविरूद्ध स्वतः नि अेकट्याने चढाअी करण्याची त्या फुटकळ राज्यातील अेकालाही छाती होअीना. तो प्रश्नच कोणी काढू धजेना.

अशा वेळी तोच कठीण प्रश्न सोडविण्याची प्रकट प्रतिज्ञाकरून अेक साहसी वीरपुरुष पुढे आला. तो कोणी नामधारी महाराजाधिराज नव्हता. तो महाराजही नव्हता. तो होता मालव प्रांतातील यशोधर्मा नावाचा अेक सापेक्षतः लहानसा राजा. परंतु त्याची महत्वाकांक्षा, राष्ट्राभिमान नि साहस हे म्लेंच्छांच्या 'राजाधिराज' म्हणून मिरविणाऱ्या बलाढ्य मिहिरगुलला अुज्जयिनीच्या सिंहासनावरून खाली ओढून हूणांचा निःपात करण्यासाठी स्वतः रणांगणात अुतरण्याअितके अुत्तुंग होते!

## वौदिक राजांची संयुक्त आघाडी

त्याने प्रथमतः बाजूबाजूच्या स्वतंत्र अशा बहुतेक भारतीय राज्यांना हूणांविरुद्ध युद्ध करण्यासाठी अेका संयुक्त योजनेत संघटित केले. या संयुक्त युद्धयोजनेस मगधाच्या बालादित्य राजानेही अुचलून धरले. तेव्हा यशोधर्मा राजाच्या नेतृत्वाखाली त्या सर्व राजांनी हूणांविरुद्ध चहुबाजूंनी अुठावणी केली. जे साहस त्या वेळचा कोणताही अेकअेकटा राजा करू

धजत नव्हता ते साहस करण्याचा आवेश ह्या संयुक्त भारतीय सैन्यात अुत्पन्न होअून हूणांच्या प्रबळ सैन्याची रणांगणात लांडगेतोड चालू झाली.

## हूणांचा निर्णायक पराभव!
## स्वतः मिहिरगुल जिवंत पकडला जातो!!

शेवटी सेनापती यशोधर्मा ह्याने आपल्या हाताखालील सैन्यासह हूणांचा राजा जो मिहिरगुल त्याच्या मुख्य सैन्यावरच चाल केली. या दोन्ही सैन्यांची गाठ मंदोसर येथे किंवा कोरूर येथे अि. सन ५२८ च्या आसपास पडली. त्यांच्यामध्ये झालेल्या हटातटाच्या लढाअीत भारतीय सैन्याच्या माऱ्यामुळे हूणांच्या सैन्याची फळी फुटून त्याची दाणादाण अुडाली आणि आजव कर्दनकाळासारखा मातलेला त्यांचा राजा जो मिहिरगुल तो स्वतः जिवंत पकडला जाअून विजयी सेनापती जो यशोधर्मा त्याच्या हाती सापडला.

राजा यशोधर्मा ह्याच्या पराक्रमाने मिळविलेल्या हूणांवरील ह्या अभूतपूर्व विजयाच्या दुंदुभी साऱ्या भारतवर्षभर निनादू लागल्या. हूण जातीने नि स्वतः मिहिरगुलने भारतीयांवर केलेल्या आजवरच्या अत्याचारांचा भारतीय सूड अुगविण्यासाठी आणि त्याच्या पापाचे त्याला प्रायश्चित देण्यासाठी यशोधर्मा राजाने पाडाव केलेला हूण राजा जो मिहिरगुल ह्याचा शिरच्छेद करण्याची आज्ञा दिली.

## बालादित्याचे राष्ट्रघातक औदार्य का स्वार्थपरायणता?

परंतु त्या दुष्ट मिहिरगुलाला ठार मारण्याची आज्ञा राजा यशोधर्मा ह्याने दिली आहे, हे कळताच त्या संयुक्त आघाडीतील अेक घटक असलेला मगधचा राजा जो बालादित्य ह्याने मिहिरगुलाला ठार न मारता आपल्या स्वाधीन करावे असा अत्याग्रह धरला. त्यामुळे बालादित्यास दुखवू नये म्हणून त्या अत्याचारी हूण राजाला राजा यशोधर्मा याने मिहिरगुलाला स्वतः ठार न मारता बालादित्याचे हाती सोपविले. मिहिरगुलाचे हस्ते काही स्वार्थ साधण्याच्या गुप्त अटीवर असो किंवा वधार्ह राष्ट्रशत्रूलाही परत जीवदान देणे, सापाला दूध पाजणे, हेच अलौकिक औदार्याचे कृत्य होय असे मानण्याचे जे दुष्ट व्यसन आपल्या भारतीयांच्या हाडीमांसी खिळलेले आहे, तशा राष्ट्रघातकी औदार्यापायी असो, पण बालादित्याने त्या राष्ट्रशत्रू नि दुष्टात्मा असलेल्या मिहिरगुलाला जीवदान दिले. अितकेच नव्हे, तर त्याला सन्मानपूर्वक वायव्येकडे अुरलेल्या हूणराज्यात जाण्याची मोकळीक दिली, जशी अगदी अर्वाचीन काळी पृथ्वीराजाने महंमद घोरीला दिली!

## 'पयःपानं भुजंगानां केवलं विषवर्धनम् ।'

तेथून जीव घेअून मिहिरगुल जो निसटला तो काश्मीरमध्ये गेला. तेथे हूणसैन्याची पुन्हा गुप्तपणे जमवाजमव करून त्याने काश्मीरच्या राजास ठार मारले. गांधारचे राज्यही जिंकून तिकडील प्रजेचा त्याने अनन्वित छळ केला. विशेषतः त्याला जे जे 'बुद्धप्रस्थ' आढळले ते ते त्याने धुळीस मिळविले. अनेक बौद्धधर्मीयांचे त्याने शिरकाण केले.

'शस्त्रविजयापेक्षा धर्मविजय हा श्रेष्ठ आहे' अशा भ्रामक गुंगीत राहणाऱ्या भारतीय बौद्धांना, स्वकीय शस्त्रबळाच्या पाठिंब्यावाचून शत्रूच्या शस्त्रबळापुढे 'धर्माला जिवंत राहणेसुद्धा असे अशक्य होते, ह्याचा वस्तुपाठच शिककविण्यासाठी नियतीने मिहिरगुलाला जन्माला घातले होते की काय नकळे!

तथापि, मिहिरगुलावर सूड अुगविण्याचे जे अेकमेव साधन ह्या बिचाऱ्या दुबळ्या नि संत्रस्त बौद्धांच्या हाती होते त्याचा मात्र त्यांनी अुपयोग करण्यास सोडले नाही. मिहिरगुल जेव्हा शेवटी अेकदाचा आपल्या मरणानेच मेला तेव्हा त्या क्षणाचे वर्णन बौद्धांनी आपल्या पुराणातूनच असे केले आहे: 'जेव्हा तो हूण राक्षस मिहिरगुल गेला आणि बुद्धद्वेषाच्या अपराधास्तव अनंत यातना भोगण्यासाठी तो क्रूरकर्मा अक्षय्य नरकात पडला, तेव्हा त्या धडाक्यासरशी पृथ्वी दुभंग झाली. प्रलयकालासारखा पर्जन्य कोसळला. पशु-पक्षी संत्रासाने हंबरत नि किंचाळत रानोमाळ पळू लागले, अितरही अनेक अुत्पात झाले!' या अिहलोकात त्या बौद्धांना त्याचा केसही वाकडा करता आला नाही. त्याला शेवटी परलोकात अक्षय्यनरकाच्या अनंत यातना भोगणे आम्ही भाग पाडले, असा सूड अुगविल्याचे काल्पनिक समाधान

मानण्यावाचून तसल्या दुबळ्या लोकांना गत्यंतरच नसते! पण त्या अहिंसक बौद्धांचे हे समाधानही 'हिंसक' च नव्हते का? हे कारूण्य की दारूण क्रूरता?

## अुज्जयिनीत विजयप्रवेश

हूण राजा मिहिरगुल याचा पूर्ण पराभव केल्यानंतर यशोधर्माने पंचनदातून हूणांचे सारे प्रस्थ अुलथून पाहळे. पंचनदाला विमुक्त करून आणि तेथे भारतीय राजसत्ता स्थिरस्थावर करून राजा यशोधर्मा आपल्या विजयी सैन्यासह माळव्यास परतला. विक्रमादित्यापासून भारताच्या, मान मिळत आलेल्या; आणि हूणांच्या म्लेंच्छ सत्तेच्या हातून, आता त्याने स्वतः, मुक्त केलेल्या, अुज्जयिनी नगरात त्याने मोठ्या समारंभाने विजयप्रवेश केला. आता तो 'राजा' राहिला नसून 'महाराजाधिराज' झाला होता. भारतीयांनी हूणांवर मिळविलेल्या ह्या विजयाच्या स्मरणार्थ त्याने दोन कीर्तिस्तंभही अुभारले. ते अद्यापही त्या विजयाची तत्कालीन भारतीयांना केवढी धन्यता वाटली याची साक्ष देत आहेत!

## हूणांचे पुढे काय झाले?

दुसरे काय व्हावयाचे? यवन, शक, कुशाण, पार्थियन आदि पूर्वीच्या परकीय आक्रमकांची जी गत झाली तीच शेवटी हूणांचीही जाली मिहिरगुला अि.स.५४० च्या आसपास मेल्यानंतर हूणांची सिंधुनदीच्या पलीकडच्या वायव्य भागात असलेली संस्थानेही अेकदोन पिढ्यांतच नष्ट झाली. त्यांच्या हातून राजसत्ता हिरावून घेअून हिंदुकुशपर्यंत वैदिकधर्मीय हिंदुराजांची राज्ये पुन्हा नांदू लागली. त्यांच्यापेक्षा शस्त्रबळातही हिंदुराष्ट्राचे शस्त्रबल अधिक प्रभावी ठरल्यामुळे त्यांच्या हातातील राजसत्ता छिनावून घेतली जाताच तेच हूण नुसते गोगलगाय बनले. डॉ. जयस्वाल लिहितात : 'The Huns were fully crushed within a century by the successive (Hindu) dynasties. 'हिंदुराष्ट्राशी अुणींपुरी शंभर वर्षे लढता लढता चालेल्या महायुद्धात हुणांचा जो संहार झाला यामुळे त्यांचे पूर्वीचे संख्याबळही घटले होते. जे अुरले त्या हूण लोकांनी आपण होअून भारतीय धर्म, भाषा नि आचार अंगीकारून ते अेकदोन पिढ्यांत भारतीयांत विलीन झाले, अितके पूर्णपणे की त्यांना त्यांच्या हूणपणाची सुद्धा जाणीव अुरली नाही.

हूणांवर भारतीयांनी रणसंग्रामात मिळविलेल्या ह्या निर्णायक विजयाच्या दूरगामी परिणामाविषयी व्हिन्सेंट स्मिथने असा आशय व्यक्त केला आहे की, "After the defeat of Mihiragul and the extinction of the Hun power on the Oxus, India enjoyed immunity from foreign attack for nearly five centuries." अर्थात् मिहिरगुलाचा यशोधर्मा राजाने निर्णायक पराभव केल्यानंतर आणि हूणांच्या राजसत्तेचा तिकडे वक्षु नदीकडेही (ऑक्सस कडेही) अंत झाल्यानंतर हिंदुस्थानावर पुढे जवळजवळ पांचशे वर्षेपर्यंत परचक्र असे येअू शकले नाही. म्हणजे जवळजवळ पाचशे वर्षे पारियात्र पर्वतापासून (हिंदुकुशपासून) गांधार, काश्मीर, पंजाब, सिंध तो थेट कन्याकुमारीपर्यंत जिकडे तिकडे वैदिक हिंदूंची राज्ये स्वतंत्रपणे नांदत होती. सारा भारत स्वतंत्र, संपन्न, समर्थ नि सुखी होता.

## अैतिहासिक प्राचीन खंडाचा समारोप

अि. सनपूर्व ६०० वर्षापासून तो अि.सन ७०० पर्यंतच्या वर्षातील साधारणतः १३०० वर्षांच्या सुदीर्घ अैतिहासिक कालखंडाला जर प्राचीन खंड असे संबोधिले आणि त्यापुढच्या काळाला अर्वाचीन खंड असे म्हटले तर या पुस्तकातील विषयक्षेत्रापुरता त्या प्राचीन खंडाचा येथेच समारोप करणे युक्त आहे. या प्राचीन कालखंडातील जी अैतिहासिक विधेये (Points) ठसठशीतपणे आपल्या तरुणांच्या नि सर्वसामान्य वाचकांच्या मनावर अंकिली जाणे अवश्य आहे; परंतु जी अद्याप तशी ठसविली जात नाहीत त्या विधेयांपैकी काही विधेये या समारोपात सुटसुटीतपणे खाली देत आहो.

(१) या प्राचीन खंडात कोणतेही परचक्र सारा भारत असा केव्हाही जिंकू शकले नाही. ही वस्तुस्थिती बहुतेक परकीय किंवा स्वकीय लोकांच्या ध्यानात आलेली नसते. काहीजणांनी तर तिकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केलेले असते. 'भारतावर अलेक्झांडरची स्वारी', 'भारतावर शकांचे आक्रमण' अशा प्रकारची वाक्ये वाचताच सर्वसामान्य परकीय वा स्वकीय वाचकांचीही अशी अेक विपरीत समजूत होते की ह्या परकीय शत्रूंनी जणू काही साऱ्या भारतावरच स्वारी करून त्याचे स्वातंत्र्य हिरावून घेतले होते. अशा आभासमय समजामुळे अनेक शत्रूंनी नि हितशत्रूंनी असे आक्षेप घेतलेले असतात नि सिद्धांत

ठोकलेले असतात की भारतीय राष्ट्राचे अर्थात हिंदुराष्ट्राचे सारे जीवन परकीयांच्या दास्यातच व्यतीत झालेले आहे.' हा त्यांचा मूर्ख किंवा दुष्ट आरोप नि अपसिद्धांत सर्वतोपरी अेकतर अहेतुक अज्ञानाचा किंवा सहेतुक मत्सराचा असतो हे अुघडकिस आणण्यासाठीच हे पुस्तक हेतुत: लिहिले आहे. त्यात येथपर्यंत केलेल्या वर्णनानुसार हे स्पष्ट होअील की,

(२) नेपाळपासून पूर्वसमुद्रापर्यंतचा सारा पूर्वोत्तर भारत आणि दक्षिण भारत, म्हणजे आपल्या भरतखंडाचा सुविशाल असा साधारणत: ३/४ भाग ह्या १३०० वर्षांच्या प्रदीर्घ कालात पूर्णपणे स्वतंत्र होता. त्याच्यावर भूमार्गाने वा सिंधुमार्गाने कोणतेही परचक्र येअू शकले नाही.

(३) अुरलेल्या पश्चिमोत्तराच्या साधारणत: अेकचतुर्थांश भागात जी परचक्रे आली त्यापैकी यवनशत्रू अेकदा पंजाब ते अयोध्येपर्यंत पुढे सरकला होता आणि पंजाब ते गुजराथपर्यंतचा पश्चिमोत्तर पट्टा शक-कुशाणांनी काही काळ जिंकून घेतला होता. हूण तर पंजाब ते अुज्जयिनीपर्यंत जेमतेम येअू शकले. या सर्व शत्रूंची हिंदुराष्ट्राने शेवटी काय दुर्दशा केली, हे येथे संक्षेपत: वर्णिलेलेच आहे.

(४) त्या काळच्या जगातील आशियन वा युरोपियन राष्ट्रांपैकी आपले राष्ट्रीय स्वातंत्र्य नि अस्तित्व भयंकर परशत्रूंचा नि:पात करून अितक्या प्रदीर्घ कालापर्यंत नि अितक्या यशस्वीपणे हिंदुराष्ट्राने जसे अबाधित राखले तसे राखू शकलेले अेखाद दुसरेच समकालीन राष्ट्र या काळाच्या अितिहासात सापडू शकेल!

(५) ह्या प्राचीन कालात जी यवन, शक-हूणांदिकांची परचक्रे आली ती केवळ हिंदुराष्ट्रावरच काय ती आली होती असे नाही. त्यांच्यातील काहींनी तर त्या त्या कालातील जगामधील बहुतेक राज्ये अुद्ध्वस्त करून टाकली. अितकेच नव्हे, तर अितर लोकांची राष्ट्रेच्या राष्ट्रे नामशेष करून टाकली! हे त्यांच्या हिंदुस्थानावर झालेल्या आक्रमणांशी तुलना करताना ध्यानात घेतले पाहिजे.

(६) हिंदुराष्ट्रासही तसेच नामशेष करण्याच्या अीर्षेने त्या त्या काळी ते ते आक्रमक प्रचंड शस्त्रबळासह नि संख्याबळासह तुटून पडले. पण या साऱ्या यवन-शक-कुशाण-हूणादिक सशस्त्र आक्रमकांच्या शस्त्रबळास हिंदुराष्ट्राने प्रथम रणाग्नीत भस्मसात् केले आणि मग त्यांच्या म्लेंच्छीय बर्बरतेस यज्ञाग्नीत शुद्ध करून आत्मसात करून टाकले. अितक्या पूर्णपणे की, भारतास नामशेष करण्यासाठी आलेल्या ह्या शत्रूंचे अस्तित्व तर काय, पण 'नाम' सुद्धा 'शेष' अुरू दिले नाही.

क्षणभर अशी कल्पना करू या की, वरील प्राचीन कालखंडात आकाशातून पृथ्वीस निरखीत असलेला पण त्यानंतर आजवर पृथ्वीकडे न आलेला कोणी देवदूत पुन्हा आज हिमालयाच्या शिखरावर येअून हिंदुस्थानचे निरीक्षण करू लागला आहे; पण, मधली माहिती काहीही नसल्याने तो जर त्या शिखरावरून विचारू लागला: ''अहो, पूर्वी अेकदा ह्या हिंदुस्थानात यवन (ग्रीक) नावाच्या लोकांचे अेका कोनात राज्य होते. आज त्यांच्यापैकी कोणी यवन लोक येथे अुरले आहेत काय?' तर 'होय, त्या यवनांचाच मी अेक वंशज हा येथे अुभा आहे.'' असे सांगणारा अेकही मनुष्य ह्या हिंदुस्थानात आज अुरलेला नाही! जर त्या देवदूताने पुन्हा विचारले की, ''अहो! ह्या हिंदुस्थानातील अेका भागाला शक-कुशाणांची राज्ये नि लोकसमूह त्या काळी अेकदा नांदत होते. त्यांच्यातील कोणी शक-कुशाण आज येथे आहेत का?' तर 'होय, होय, त्यांचाच वंशज हा मी शक, हा मी कुशाण आजही येथे नांदत आहे'' असे सांगणारा अेकही मनुष्य आज ह्या हिंदुस्थानात सापडणे अशक्य आहे! जर त्या देवदूताने पुन्हा विचारले: ''अहो, पण त्याकाळी साऱ्या जगास संत्रास देणारे जे हूण नावाचे क्रूर लोक ह्या हिंदुस्थानात येथील लोकांशी लढत अुज्जयिनीपर्यंत पुढे सरसावले होते त्या हूणांपैकी तरी कोणी सज्जन येथे अुरलेले असलेच पाहिजे! तसे कोण कोण येथे आहेत? 'तर होय, होय.' त्यांचाच वंशज हा मी हूण येथे आहे.'' असे छातीवर हात ठेवून सांगण्यास पुढे येणारा अेकही मनुष्य आज ह्या हिंदुस्थानात अुरलेला नाही!

पण आश्चर्यचकित होअून त्या देवतूदाने शेवटी विचारले: ''अहो, पण त्या प्राचीन काळी ह्या यवन - शक - हूणादि प्रबळ आक्रमकांशी लढणाया आणि ह्या देशाचे स्वामित्व गाजविणाऱ्या त्या हिंदू लोकांपैकी तरी कोणी हिंदू येथे अुरला आहे

काय ?'' तर 'होय ! होय ! मी हिंदू, मी हिंदू'' असे प्रत्येकी अभिमानाने गर्जत तीस कोटींचे लोकारण्यचे लोकारण्य, हिंदुराष्ट्राचे राष्ट्र आजही ह्या हिंदुस्थानात अुभे राहिल !

ह्या प्राचीन कालखंडाच्या अंतिम शतकात बव्हंश जगास चळचळ कापावयास लावणाऱ्या हूणांनाही पादाक्रांत करून नि :पात करणाऱ्या हूणांतक यशोधर्मा राजाच्या पराक्रमाने जे झगझगाटलेले आहे तेच होय हिंदुराष्ट्राच्या अितिहासांतील सोनेरी पान चौथे !

# सोनेरी पान पाचवे

## महाराष्ट्रीय पराक्रमाचा अुच्चांक
## अटकेवर जरीपटका फडकतो!!

### (पूर्वार्ध)

### प्रकरण १ले

### प्रास्ताविक

हिंदुराष्ट्राच्या अितिहासातील 'सहा सोनेरी पाने' हा जो ग्रंथ आम्ही लिहीत आहोत, त्याचे विषयक्षेत्र ह्या ग्रंथाच्या पृष्टें २ नि ३ वरील परिच्छेदात व्यक्तविलेले आहे. त्याच अनुरोधाने हे सूचित होते की, सामान्यतः अिसवी सनांच्या आठव्या ते अठराव्या शतकाच्या अंतापर्यंत चालू राहिलेल्या संतत प्रदीर्घ नि प्रचंड हिंदू-मुस्लिम संघर्षाचा विगतवार (तपशीलवार) अितिहास देणे हा या ग्रंथाचा मूळ हेतू नाही; तर, आमच्या मते त्या महायुद्धाचे नि त्या कालखंडाचे हिंदुराष्ट्रीयदृष्ट्या जितके मर्मज्ञपणे, यथार्थपणे नि निर्भयपणे समीक्षण व्हावयास हवे आहे, पण, जे आजवर बहुधा कोणाकडूनही झालेले नाही, तसे समीक्षण, तेवढे करण्याचा आमचा येथे मुख्य अुद्देश आहे.

कारण, हिंदुराष्ट्राच्या हितार्थ ते आजही अत्यंत आवश्यक आहे, हितप्रद आहे.

### आपल्या अितिहासाचे दोन भाग :
### प्राचीन नि अर्वाचीन

आमच्या मते आपल्या निर्भेळ अितिहासाचे जे दोन कालखंड घटनांच्या ओघामुळेच पडतात ते म्हणजे साधारणतः अिसवी सनाच्या सातशेव्या वर्षापर्यंतचा प्राचीन भाग आणि सातशेव्या वर्षानंतरच्या वृतान्ताचा अर्वाचीन भाग हे होत. ह्या कालखंडाच्या अनुसारे आम्ही आपल्या प्राचीन अितिहासाची साधारणतः अिसवी सन सातशेपर्यंतच्या कालखंडाची समीक्षा करणारा आणि त्यातील चार सोनेरी पाने दिग्दर्शविणारा हा प्राचीन काल होय आणि आता त्यानंतरच्या अर्वाचीन कालखंडातील आपल्या हिंदुराष्ट्राच्या अितिहासाची समीक्षा करणारा काल हा अर्वाचीन काल होय.

हे समीक्षण करताना त्याला आधारभूत असलेल्या फुटकळ घटनांचा नि घडामोडींचा अवश्य तेथे विगतवार अुल्लेखही केला जाअील आणि कालक्रमाचाही अनुबंध यत्रतत्र अनुसरला जाअील. परंतु कालक्रमादि गोष्टी अितर कित्येकांनी लिहिलेल्या लहानमोठ्या अितिहासग्रंथातूनही सहजासहजी अुपलब्ध होणाऱ्या असल्याने ह्या ग्रंथात त्यांच्यासाठी अनावश्यक स्थळ अडविण्याचे काही कारण नाही. यास्तव या समीक्षणात सन शक-संवतादि कालानुबंधाच्या क्रमापेक्षा, परंतु कालानुबंधास न सोडता, जी जी विधेये (Points) चर्चिली जातील त्या त्या महत्त्वपूर्ण विधेयातील विषयानुबंधाच्या क्रमाकडेच मुख्य लक्ष पुरविले जाअील.

### हिंदु-मुसलमानांच्या महायुद्धातील
### अभूतपूर्व दुतोंडी संघर्ष

ह्या अर्वाचीन अितिहासाच्या आरंभी भारतावर मुसलमानांनी केलेल्या आक्रमणामागून आक्रमणामध्ये हिंदुराष्ट्राशी जी जी सशस्त्र युद्धे छेडली गेली त्यातील दुतोंडी संघर्ष ही हिंदुराष्ट्राच्या अितिहासातील अेक अभूतपूर्व दुर्घटना होती. कारण, अैतिहासिक कालात मुस्लिमांचे पूर्वी हिंदूस्थानावर यवन, शकादि जी जी परराष्ट्रीय आक्रमणे झाली त्या सर्वांचा प्रमुख हेतू हिंदुस्थानात त्यांची त्यांची राज्यसत्ता स्थापिण्याचाच काय तो होता. हा राजकीय हेतू सोडून त्यांच्या आक्रमणांना अितर कोणतेही सांस्कृतिक किंवा धार्मिक वैर मुख्यत्वे कारणीभूत झालेले नव्हते. परंतु ह्या नव्या अिस्लामी शत्रूची अेक महत्त्वाकांक्षा त्या प्राचीन शत्रूप्रमाणेच हिंदुराष्ट्राची राजसत्ता अुखडून टाकून साऱ्या हिंदुस्थानात मुस्लिम साम्राज्य करण्याची तर होतीच

होती, परंतु राजकीय महत्त्वाकांक्षेच्या जोडीला त्या कोणत्याही प्राचीन शत्रूच्या स्वप्नातसुद्धा जी आली नव्हती अशी अेक भयंकर धार्मिक महत्त्वाकांक्षाही अिस्लामच्या ह्या आक्रमणाच्या मागे धगधगत होती. त्यांच्या आक्रमणाला सतत चेतविणाऱ्या आणि त्यांच्या राजकीय महत्त्वाकांक्षेहूनही अनेक पटींनी राक्षसी असलेल्या या दुसऱ्या धार्मिक महत्त्वाकांक्षेच्या अुन्मादात हिंदुराष्ट्राचा जीवनभूतच असलेला जो हिंदुधर्म, त्यांचे हिंदुत्व, तेच नष्ट करण्यासाठी आणि त्या आक्रमकांचा मुस्लिम धर्म खड्गाच्या बळाने या हिंदूजगतावर लादण्यासाठी साऱ्या आशिया खंडातील हे लक्षावधी मुस्लिम आक्रमक अनेक राष्ट्रांतून बाहेर घुसून ह्या हिंदुस्थानवर शतकोशतके तुटून पडत आले.

## ख्रिश्चनांचेही अत्याचारी आक्रमण

ती मुस्लिम संकटपरंपरा कोसळत असताच दुष्काळात तेराव्या महिन्याची भर पडावी त्याप्रमाणे पहिल्या ख्रिस्ती शतकातच मलबार प्रांतात घुसलेल्या सीरियन ख्रिश्चनांचा प्रश्न सोडला तरी साधारणतः पंधराव्या शतकाच्या आगेमागे युरोपातून पोर्तुगीज, डच, फ्रेंच, ब्रिटिश अित्यादी ख्रिश्चन राष्ट्रेही पश्चिमेकडून सागरी मार्गाने हिंदुस्थानवर तुटून पडली! त्यांची ती ख्रिश्चन चढाओही मुसलमानांच्या आक्रमणाप्रमाणेच राजकीय आणि धार्मिक अशा दुहेरी स्वरूपाची आणि तितकीच राक्षसी होती. त्यांनीही लाखो हिंदूंना बेयोनेटांनी बाटवून त्यांच्यावर ख्रिश्चन धर्म बळाने लादण्याचा कसा प्रयत्न मांडला होता ते वृत्त यथास्थल पुढे अुल्लेखिले जाओलच.

## येथे प्रथम हिंदु-मुस्लिम संघर्षाचाच अूहापोह केला जाओल

मुसलमानी आक्रमणाच्या ह्या दोन्ही आघाड्या जरी अेकाच महायुद्धाची अुपांगे होत्या तरी त्यांची मूळचीच राजकीय नि धार्मिक अशी रूपे, त्यांच्या लढ्यांची साधने आणि त्यांची अंतिम फलाफले ही पुष्कळ अंशी भिन्न भिन्नच होती. अर्थात त्यांची चिकित्साही काहीशी स्वतंत्रपणे करणे आवश्यक आहे.

यास्तव प्रथमतः त्या महायुद्धातील मुस्लिमांच्या आणि तदितर म्लेंच्छांच्या धार्मिक आक्रमणांचे समीक्षण आम्ही करणार आहोत आणि नंतर मुस्लिमांच्या राजकीय आक्रमणाच्या आघाडीचे समीक्षण करू.

# प्रकरण २ रे

## केवळ हिंदुनिंदक अितिहास

विदेशी अितिहासकारच काय, किंवा आमच्या प्रत्यक्ष शत्रूंनी लिहिलेले अितिहासच काय, पण आमच्या स्वतःच्या लोकांनी लिहिलेले बहुतेक अितिहासही, हिंदुत्वाच्या निर्भेळ नि निर्भय दृष्टिकोनातून ते केव्हाही लिहिले गेले नसल्यामुळे हिंदूंच्या यथार्थ गौरवाच्या गाथा कशा वारंवार गाळतात आणि हिंदूंवर कोसळलेल्या आपत्तींचीच तेवढी टाचणे अेकत्र करून आमचा हिंदुंचा अितिहास म्हणून तेवढाच कसा प्रदर्शितात त्या विषयीच्या अनेक अुदाहरणांना आम्ही मागेच अुल्लेखिले आहे. पुढेही अुल्लेखू. ज्या कालखंडाविषयी आम्ही येथे आता लिहीत आहोत त्या कालखंडाचे अुदाहरण तेच सत्य विशद करणारे असल्यामुळे आम्ही त्याचा खाली विशेष निर्देश करतो.

सर्वसाधारण अितिहासग्रंथांमध्ये आणि विशेषतः गेल्या दीडशे वर्षांतील शालेय अितहासांतून हूणांच्या नंतर अेक - दोन ओळीही मध्यंतरातील हिंदूंच्या परिस्थितीविषयी न लिहिता अेकदम हिंदूंवर मुसलमानांची झालेली जी सिंधवरील पहिली स्वारी तिचाच वृत्तांत दिला जात असे. आणि त्यानंतर अेकामागून अेक मुसलमान आक्रमकांचे वृत्तांत वर्णिले गेले असत. त्यामुळे सामान्य हिंदू वाचकांवर नि विशेषत; विद्यार्थ्यांवर असाच संस्कार होअी की, हिंदूंचा अितिहास म्हणजे परकीयांनी त्यांच्यावर केलेल्या स्वाऱ्यांचा, हिंदूंच्या पराजयाचा आणि त्यांच्या संतत दास्याचा अितिहास होय. ह्या मिथ्या संस्कारांचा अेक प्रस्थापित सत्य म्हणून गेली दोनतीन शतके तरी आपल्या हितशत्रूंनी साऱ्या जगभर मोठा गाजावाजा केला होता. अुदाहरणार्थ, हिंदुत्वाच्या द्वेषाने डोके फिरून गेलेले डॉ. आंबेडकरांसारखे गृहस्थ लिहितात :

".....The Hindu's has been a life of a continuous defeat. It is a mode of survival of which every Hindu will feel ashamed."

## हूणांनंतर हिंदूंनी केलेला हिंदुकुशापलीकडील खोतानपर्यंतचा दिग्विजय

ह्या प्रसंगापुरतेच बोलावयाचे म्हणजे खरा अितिहास असा आहे की, हूणांचा निःपात केल्यानंतर म्हणजे साधारणतः सन पाचशेपन्नासाव्या वर्षानंतर हिंदुराजांनी अनेक मार्गांनी सिंधुनदीस पुन्हा ओलांडून आज ज्यांना सिंध, बलुचिस्थान, अफगाणिस्थान, हिरात, हिंदुकुश, गिलगीत, काश्मीर अित्यादी नावे आहेत, जे प्रदेश अशोकाच्या मृत्यूनंतर वैदिक हिंदूंच्या हातून यवन, शक, हूणादि म्लेंच्छांनी छिनावून घेअून अुणीपुरी पाचशे वर्षे तरी आपापल्या हाती ठेवलेले होते, ते सिंधूपलीकडील भारतीय साम्राज्याचे सारे प्रदेश त्या सर्व म्लेंच्छशत्रूंची राखरांगोळी करून वैदिक हिंदूंनी त्या काळात पुन्हा जिंकून घेतलेले होते. अितकेच नव्हे तर चंद्रगुप्ताच्या साम्राज्याच्या पलीकडे अुत्तर कुरूपर्यंत वैदिक धर्माचा नि राज्याचा ध्वज हिंदूंच्या विजयी सैन्यांनी पुनरपि नेअून रोवलेला होता! अेकदा तर काश्मीरपलीकडे मध्य आशियातील खोतानमध्ये हिंदु राज्य करीत असत. आणखी अेक त्या काळची चटकदार आठवण दिली म्हणजे पुरे की, कित्येक अितिहासकारांच्या मते प्रत्यक्ष गझनीला राजा शिलादित्य राज्य करीत असे.

## हिंदुराष्ट्राची पुनरुत्थानक्षमता

हिंदूंच्या राष्ट्रीय पुनरूत्थानक्षमतेची ही आश्चर्यकारक चिकाटी पाहून स्मिथसारखे परकीय अितिहासकारही क्षणभर तरी आश्चर्याने तोंडात बोट घालतात. सोनेरी पान चौथे याविषयीची माहिती आणि स्मिथचे हिंदूंच्या त्या काळच्या विजयशाली स्वातंत्र्याची वाखाणणी करणारे मूळ अुद्‌गारही दिले आहेत, ते जिज्ञासूंनी पाहावेत. या स्थळी लागू तेवढे वाक्य अुतरून खाली देत आहे : 'After the defeat of Mihirgul by the Hindoos and the extinction of the Hun power, India enjoyed immunity from foreign attack for nearly five centuries.'

डॉ. आंबेडकरांच्या पूर्वी दिलेल्या हिंदू अितिहासातील पिसाट नि भरमसाट आक्षेपांचे परस्पर स्मिथनेच असे सणसणीत खंडण केलेले आहे.

## मुसलमानांचा हिंदुस्थानशी झालेल्या प्रचंड संघर्षाचा प्रारंभ

साधारण समजूत अशी आहे की, सिंधवर महंमद कासीमने जी स्वारी केली तीच हिंदुस्थानावरील अरबी किंवा कोणत्याही मुसलमानाची पहिली स्वारी होय. परंतु वस्तुतः तसे नाही. त्या स्वारीच्या आधीपासून ते पन्नास वर्षे तरी अरबी मुसलमान, सिंधमध्ये राज्य करीत असलेल्या ब्राह्मण वंशीय राजांशी अधूनमधून तंटे करीत होते. सैनिक चढाओचाही प्रयत्न करीत. तथापि, मुसलमानांच्या परकीय तुकड्यांपासून तो सैन्यापर्यंत हिंदुस्थानात चंचुप्रवेश नाना दिशांनी करीत चाललेल्या या सर्व मुसलमानी आक्रमणांचा क्रमवार अुल्लेख करण्याचा काही येथे संकल्प नाही. अेकंदरीत या सर्व प्रयत्नांची हिंदूंनी डाळ शिजू दिली नाही. शेवटी अरबांच्या मुख्य खलिफाचा ओमान येथील गव्हर्नर जो अुस्मान, त्याने सिंधच्या हिंदुराज्यावर अुघड अुघड स्वारी केली. परंतु सिंधचा त्या वेळचा ब्राह्मण राजा चाचा ह्याने त्या अरब सैन्याचा पराभव करून त्याचा प्रत्यक्ष सेनापती जो अबदुल अजिज त्यालाच ठार मारले. साधारणतः ६४० पर्यंतच्या या अुलाढालीनंतर अरबांनी कोणतीही महत्त्वाची अुचापत केली नाही. केवळ अेकाकी पडलेल्या दूरचा मरकाणी नावाचा लहानसा प्रदेश तेवढा जिंकून घेअून तेथील हिंदूंना त्यांनी बळाने मुसलमान करून टाकले. तेच हे पुढे कट्टर मुसलमान झालेले त्या काळचे रानवट बलुची लोक होत.

## मुसलमानाची सिंधवरील पहिली मोटी स्वारी

त्यानंतर अिसवी सन ७११ मध्ये महंमद कासीम नावाच्या अरबी मुसलमान सेनापतीने पन्नास सहस्त्र सैन्यासह हिंदुस्तानच्या सिंध प्रांतावर पहिले मोठ्या प्रमाणावरचे असे आक्रमण केले. त्या काळी सिंधवर दाहीर नावाचा वैदिक धर्माभिमानी ब्राह्मण राजकुळातील राजा राज्य करीत होता. अर्थात सिंधमध्ये बहुसंख्य जनता वैदिक धर्माभिमानी हिंदूंचीच होत. अुरलेली अल्पसंख्य जनता बुद्धर्मीय होती. पूर्वी जेव्हा सिंधप्रांत हूणांचा शेवटचा अुग्र राजा जो मिहिरगुल याचे सत्तेखाली होता. तेव्हा त्याने बुद्धांचा पुष्कळ छळ केलेला होता. त्याचा अुल्लेख सोनेरी पान चौथे यात केलेला आहे. कारण अुग्र स्वभावी मिहिरगुल जरी वंशाने हूण आणि म्लेंच्छ होता तरी धर्माने तो वैदिकांच्या रुद्र देवतेचा अेकनिष्ठ अुपासक असल्यामुळे वैदिक धर्माभिमानी होता आणि तो बुद्धधर्माचा त्याच्या 'बुळगेपणासाठी' अत्यंत तिटकारा करी. परंतु मिहिरगुलाच्या मृत्यूनंतर सिंधप्रांत वैदिक हिंदूराजांच्या राजसत्तेखाली जेव्हा आला तेव्हापासून त्या वैदिक हिंदुराज्यात बुद्धांना तसा कोणताही त्रास होत नव्हता. त्यांना त्यांचा धर्म त्यांच्यापुरता निर्वेधपणे पाळता येत होता.

## बौद्धांचा राष्ट्रदोह

तथापि, वैदिक हिंदूंच्या राज्यावर कोणीतरी मुसलमान नावाचे परधर्मीय नि परकीय लोक चालून येत आहेत हे पाहताच ह्या भारतीय बौद्धांना आनंद वाटू लागला! त्या मूळच्या हिंदुद्वेषी लोकांना क्वचित असे वाटले असेल की, पूर्वी यवनांच्या (ग्रीकांच्या) मिन्यांडर प्रभृति परकीय राजांनी किंवा परकीय कुशाणांच्या कनिष्काने जसा बौद्धधर्म स्वीकारून भारतात बौद्धराज्य स्थापन केले होते तसेच हे नवे परधर्मीय मुसलमान लोकही करतील. अरब मुसलमानांच्या त्या सेनापतीने पहिल्या तडाख्यासरशी सिंधचे देवल हे महत्वाचे सिंधुद्वार (बंदर) दाहीर राजाच्या हातून जिंकून घेताच तेथील बौद्धांच्या पुढाऱ्यांनी त्या परकीय सेनापतीचे पुढे जाअून स्वागत केले. 'दाहिराच्या वैदिकधर्मीय राज्याशी नि लोकांशी आमचा संबंध नाही. आमचा धर्म निराळा, त्यांचा निराळा. आमच्या गुरुने (बुद्धाने) आम्हांस अहिंसा व्रताची कडक दीक्षा दिलेली आहे. आम्ही शस्त्र धारण करून राज्यांच्या अुलाढालीत भाग घेत नसतो. ज्याचा विजय होअुन राज्य होअील त्या राजाची - मग तो कोणीही असो - त्याची आज्ञा आम्ही अैहिक व्यवहारात मानतो. आता आपण विजय मिळविलात, आता आमचे राजे तुम्ही! तेव्हा आम्ही बौद्ध लोक दाहिराच्या सशस्त्र सैन्यात शिरू किंवा त्यास मिळू अशी

शंका सुद्धा मनात आणू नये आणि आपणांपासून आम्हा बौद्धांना कोणताही अुपद्रव होअू नये.' अशा आशयाची त्या बौद्धांची शरणागतीची विनंती अैकून त्यांना राजकारणपटू महंमद कासीमने त्या वेळपुरते अभय दिले.

तिकडे देवल सिंधुद्वार मुसलमानांच्या हाती पडले आहे हे कळताच राजा दाहीर आपले सारे सैन्य सज्ज करून मुसलमानांशी लढाअी देण्यास स्वतः रणांगणात अुतरला. महंमद कासीमही देवलच्या आजूबाजूचा सिंधचा प्रदेश जिंकीत पुढे घुसला. ज्या मुसलमान तवारिखकारांनी (वृत्तांत लेखकांनी) ह्या अरबांच्या स्वारीचे वृत्त लिहिले आहे तेच लिहितात की, सिंध प्रांत जिंकीत जाताना त्यातील दुर्गम वाटा दाखविण्यात, अरब सैन्यास ठिकठिकाणी दाणागोटा पुरविण्यात, दाहिरराजाची बित्तंबातमी देण्यात, सिंधमधील बौद्ध लोकांनी आणि त्यांच्या भिक्षूंनी मुसलमानांना शक्य ते साहाय्य दिले! काही वैदिकांनीही देशद्रोह केला, पण तो वैयक्तिक, अपवादात्मक.

## राजा दाहीर रणात झुंजत असता ठार होतो

शेवटी मुसलमानांच्या नि हिंदूंच्या मुख्य सैन्याची गाठ ब्राह्मणाबाद येथे पडली. हिंदूंनी हटातटाने लढाअी दिली. मुसलमानांपाशी त्या वेळी तोफा नव्हत्या तरी, अेका नवीन प्रकारची दुरून मारा करणारी भडिमार - यंत्रे होती, ती हिंदूंकडे नव्हती. त्यामुळे त्यांचे बळ तोकडे पडू लागले. दाहिरच्या सैन्यात अरब मुसलमानांची काही सैनिक पथके पगारावर लढाअू चाकरीत असत. कासीमशी दाहीरच्या सैन्याचे तोंड लागताच ह्या भाडोत्री मुस्लिम सैन्याने अकस्मात बंड करून दाहीरला कळविले की, 'सेनापती कासीम अरब मुस्लिम! हे धर्मयुद्ध आहे. आम्ही मुस्लिम यास्तव तुम्हा हिंदू काफरांचे पक्षाने महमद कासीमशी आम्ही लढणार नाही.' असे म्हणून त्यांनी हिंदू सैन्यावरच चाल केली. हिंदूंच्या शत्रूवरही विश्वासणाऱ्या भोंगळसूत्रीप्रमाणे प्रायश्चित यापुढेही ज्या ज्या हिंदूराजाने मुस्लिम सैन्य पदरी ठेवले त्याला त्याला असेच भोगावे लागले. भर रणात हिंदू सैन्याचा व्यूहच ढासळे!

तरीही झुंज न बिघहविता हत्तीवर चढून स्वतः दाहीर राजा शौर्याची परकाष्ठा करीत भर रणधुभाळीत लढत होता. पण, जेव्हा तोच रणात ठार झाला, तेव्हा, हिंदू सैन्याची दाणादाण अुडाली. मुसलमानांच्या सेना लगोलग पाठलाग करीत नगरात घुसल्या.

पण, दाहीर राजा रणात ठार झाल्याची बातमी कळताच त्याच्या तेजस्वी राणीने आणि तिच्यासह शतावधी हिंदू वीरांगनांनी अेका भडकलेल्या प्रचंड चितेत अुड्या घेअून जोहार केला! क्षात्रधर्माची सीमा झाली! त्या राणीला नि श्रेष्ठ वर्गातील कुलीन स्त्रियांना पकडून दासी करण्याचे शत्रूचे मनोरथ बव्हंशी धुळीस मिळाले.

तथापि, त्या कोलाहलात दाहीर राजाच्या सूर्यादेवी आणि परिमलादेवी ह्या नावाच्या दोन राजकन्या मात्र, नगरात घुसलेल्या मुसलमानांच्या हाती लागल्या. महमद कासीमने पाडाव केलेल्या सर्व सैनिकांना आणि नागरिकांनाही सरसकट कापून काढले. परंतु दाहीरच्या त्या दोन राजकन्या आणि अितर ज्या शतावधी हिंदू स्त्रिया त्यांच्या हातात पडल्या त्यांना त्याने दासी बनवून नेले. हिंदूंची लुटमार, जाळपोळ नि कापाकापी तर बेखटक चाललेलीच होती. ही दुर्दशा त्या अेका नगराचीच अुडाली नाही, तर मुसलमान सिंधमध्ये पुढे घुसत असता वाटेत आलेल्या नगर-ग्रामांचीही तशीच दुर्दशा अुडत चालली.

## पण ह्या भयंकर राष्ट्रीय संकटात बौद्ध काय करीत होते ?

राजा दाहीर रणांगणात ठार होऊन मुसलमानांचा विजय झाला आहे असे कळताच नगरानगरात असलेल्या विहारांतून हे बौद्ध लोक मुसलमानांच्या स्वागतार्थ मोठमोठ्या घंटा बडवीत होते आणि मुसलमानी राजाचा अुत्कर्ष व्हावा म्हणून सामुदायिक प्रार्थना करीत होते!

## बौद्धांच्या पापाचे हातोहात प्रायश्चित्त!

पण जे त्यांनी अशा नवसाने मागितले तेच त्यांच्या मुळावर आले! शेवटची लढाअी जिंकताच जेव्हा मुसलमान सिंधमध्ये वादळासारखे घुसले तेव्हा हिंदूंचे जसे शिरकाण होत चालले त्याहूनही निष्ठुरपणे मुसलमानांनी बौद्धांचे शिरकाण केले. कारण, वैदिक हिंदू गटागटाने नि व्यक्तिशः अिथे तिथे लढत तरी होते. त्यामुळे त्यांचा काहीतरी वचक मुसलमानांस बसे, परंतु बौद्ध विहारांतून नि बौद्ध वस्तीतून तर तसा सशस्त्र प्रतिकार करणारा कोणीही भेटण्याची चिंताच नसल्यामुळे भाजी कापावी तशी बौद्धांची मुसलमानांनी कापाकापी केली. जे बौद्ध मुसलमान झाले, तेच काय ते वाचले. साऱ्या सिंधमध्ये पसरलेले त्यांचे विहार नि त्यांतील भाराभर मूर्ति, 'बुद्धपरस्तीचा' म्हणजे मूर्तिपूजेचा भयंकर तिटकारा असलेल्या मुसलमानांनी, तोडून फोडून टाकल्या.

'बुद्धपरस्त' हा मुसलमानांत शिरलेला शब्दच मुळी 'बुद्धप्रस्थ' या बौद्धांच्या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश आहे. मुसलमानांना हिंदुस्थानात घुसताना प्रथम प्रथम बॅक्टिरिया, पार्थिया इत्यादी प्रांतात मूर्ती अशा बुद्धांच्या विहाराच्या 'प्रस्थां' तूनच बहुसंख्येने आढळल्या. त्यामुळे मूर्तिजकांना ते 'बुद्धपरस्त' म्हणजे 'बुद्धप्रस्थी' असे म्हणू लागले. अशा बुद्धप्रस्थांचा म्हणजे मूर्तिपूजकांचा विध्वंस करणे ही मुस्लिमांची धर्माज्ञाच होती.

## मुसलमानांच्या आततायी हिंसेने बौद्धांच्या आततायी अहिंसेचा केलेला शिरच्छेद

बौद्धधर्म हिंदूस्थानातून नामशेष का झाला? ह्या प्रश्नाचा जो अुह केला आहे त्याचा या पुस्तकातील विषयास अवश्य तितका समारोप करण्याचे कालप्राप्त स्थान हेच आहे. ज्या अिसवी सन ७०० च्या कालाविषयी आता आम्ही अिथे लिहीत आहोत, त्या काळी म्हणजे मुसलमान भारताच्या सीमेत सिंधकडे पाअूल टाकण्याच्या आधीच, भारतामध्ये चहूंकडे बौद्धांची संख्या सारखी घटत जाऊन तो पंथ क्षयाच्या मार्गास लागलेला होता. मागील प्रकरणातून हे दाखविलेच आहे की, बुद्धतत्वज्ञानाचे नि धर्ममताचे वैदिक धर्मधुरंधरांनी जे वैचारिक खंडन यशस्वीपणे केले ते काही भारतातून बौद्धांच्या झालेल्या समूळ अुच्छेदाचे अेकमेव कारण नाही. त्या अुच्छेदास अनेक राजकीय नि सामाजिक घटनाही कारणीभूत झालेल्या होत्या. त्यापैकी ज्या घटनांकडे यापूर्वीच्या बहुतेक अितिहासकारांचे लक्ष गेलेले नाही किंवा ज्यांना त्यांनी द्यावे अितके प्रामुख्य दिलेले नाही, अशा काही अिथे अवश्य त्या त्या घटनांचा नि कारणांचा अुल्लेख ठसठशीतपणे ह्या संक्षिप्त समारोपात करीत आहो.

## पहिले कारण म्हणजे बौद्धांचा राष्ट्रदोह

बौद्धसंघाने परचक्रांच्या राष्ट्रीय संकटात सांघिकरीत्या वारंवार केलेल्या भारताच्या ह्या राष्ट्रदोहाविषयी ह्या पुस्तकाच्या पूर्वपृष्ठांमध्ये खल केलेलाच आहे. बौद्धांच्या ह्या राष्ट्रदोही प्रवृत्तीमुळे सारी राष्ट्राभिमानी नि राज्यधुरंधर जनता त्यांचे अुच्चाटन करण्यास प्रवृत्त झाली. बौद्धसंघ म्हणजे अुपजत राष्ट्रदोह्यांचा संघ होय, अशी अनुभवांती राष्ट्रभक्त नि राज्यधुरंधर भारतीय जनतेची निश्चिती होअून चुकल्यामुळे त्या बौद्धसंघाला राज्यसत्तेचा असा लवलेश पाठिंबा अुभ्या भारतवर्षात कोठे सहसा मिळेनासा झाला. त्यातही ह्या अिसवी सन ७०० च्या काळात अुत्तर भारतामध्ये तरी जी वैदिकधर्माची अत्यंत कट्टर पुरस्कर्ती नि अभिमानी असत अशी नवोदित रजपूतराज्ये जिकडे तिकडे भरभराटत असल्यामुळे तो बौद्धसंघ, तो बौद्धसंप्रदाय भारतभर अनाथासारखा, बहिष्कृतासारखा, दुर्बळ नि पंगू होअून पडला होता.

## दुसरे कारण म्हणजे
## बौद्धांची आततायी अहिंसा

त्यांच्या राष्ट्रदोहाने ज्याप्रमाणे राष्ट्राभिमानी नि राज्यधुरंधर भारतीय वर्ग ह्या बुद्धधर्मास विटून गेला, त्याचप्रमाणे राष्ट्रातील सर्वसामान्य जनता जी पूर्वी अेकदा त्या बौद्धसंप्रदायाच्या भजनी लागली होती, तीही त्यांच्या आततायी अहिंसेच्या अुपद्रवाने त्रस्त होअून त्या बौद्धधर्मास विटून गेली. अशोकाच्या किंवा श्रीहर्षाच्या राजवटीप्रमाणे ज्या अिनमिन साडेतीन प्रसंगी बौद्धांचे हाती अफाट राजसत्ता आली त्यावेळी राजदंडाच्या बळाने त्यांनी आपली बौद्धमते वैदिक जनतेवर लादली होती. बौद्धांनी केलेल्या त्या वेळच्या धार्मिक अत्याचारांचे अनेक अुल्लेख नि अुदाहरणे त्या वेळच्या ग्रंथांतून आढळतात. तथापि, त्यापैकी वैदिक ग्रथांतील अुतारे दिले असता ते परपक्षीय म्हणून कोणा शंकेखोरालासुद्दा संदेहास्पद वाटण्याचा संभव अुरू नये, ह्यास्तव परदेशीय नि अवैदिक अशा अनेक अितिहासकारांनीही त्याविषयी किती कडकपणे लिहिले आहे त्याची अेक वानगी म्हणून व्हिन्सेंट स्मिथ यांच्या The Early History of India ह्या ग्रंथातील अेक अुतारा तेवढा खाली देत आहे.

It is recorded by contemporary testimony that in the seventh century, king Harsh, who obviously aimed at copying closely the institutions of Ashoka did not shrink from inflicting capital punishment without hope of person on any person who dared to infringe his commands by saying anything or using flesh as food in any part of his commune, Kumar Pal, a jain king of Gujarath imposed savage penalties upon violators of his (similar) rules. An unlucky merchant who had committed the atrocious crime of cracking a louse was brought before a special court at Anahilwada and punished by the confiscation of his whole property. An other wretch who had outraged the sandtity of the capital by bringing in a dish of raw meat was put to death. The special court constitued by Kumar Pal, (for this purpose) had functions similar to those of Ashoka's censors. And the working of the later institutions sheds much light on the unrecorded proceedings of the earlier ones.'

याचा भावार्थ असा : तत्कालीन पुराव्यावरून हे सिद्ध होते की, अशोकाप्रमाणेच श्रीहर्षानेही राजाज्ञा सोडली की, जो कोणी कोणत्याही प्राण्याची हिंसा करील किंवा मांसाशन करील, त्याला वधदंड देण्यात येअील. त्याला राजदयेचासुद्धा आधार मिळावयाचा नाही. आणि त्याप्रमाणे त्याच्या साम्राज्यात (मासे, पशू, पक्षी, हिंस्र श्वापदांसुद्धा, कोणताही प्राणी असा मारणाऱ्यांना किंवा मांसाशन करणाऱ्यांना वधदंडाची शिक्षा देण्यात येत असे. कुमारपाल हा गुजराथेतील राजा जरी जैनमताचा होता, तथापि प्राणिहिंसेच्या प्रकरणी त्याने बौद्ध अशोकाचाच कित्ता पुढे ठेवून त्याच्या राज्यात अशा प्राणिहिंसक किंवा मांसाशनी अपराध्यांना हुडकून काढण्यासाठी गुप्तहेरांचे जाळेच जाळे पसरलेले होते. अशा निष्ठुर राजाज्ञांपायी अशा 'अपराधी' लोकांना किती रासटी शिक्षा होत, ह्याची केवळ वानगीसाठी अेक-दोन प्रमाणित अुदाहरणे दिली म्हणजे पुरे. अेका अभागी व्यापाऱ्याने अेक अू अंगावरची अू टिचून मारली. ह्या घोर अपराधासाठी त्याला पकडून अनहिलवाडा येथील विशेष न्यायालयापुढे खेचून त्याची मत्ता, शेतीवाडीसुद्धा राजहृत (जप्त) करण्याची शिक्षा देण्यात आली. अेक माणूस कच्च्या मांसाचा अेक खाद्यपदार्थ राजधानीत आणताना पकडला गेला. ह्या घोर अपराधासाठी त्याला मृत्युदंडाची शिक्षा ठोठावली जाअून ठार करण्यात आले.

## पण त्या हुतात्मा (Martyred) 'अू' चे काय झाले ?

ज्या मनुष्याने आपल्या डोक्यातील ती अू टिचून मारली त्याच्या राजहृत मत्तेच्या विक्रीतून आलेल्या सहस्त्रावधी रुपयांच्या व्ययाने त्या 'अू' चे स्मारक करण्यासाठी अेक मोठे स्मृतिभवन जैन आचार्यांच्या सांगण्यावरून त्या जैनराजाने बांधले आणि त्याचे नाव ठेवले 'यूकविहार' (अूचे मंदिर) !

ही कथाही अितर कोणी लिहिलेली असती तर जैनमताचे विडंबन वाटले असते. परंतु स्वतः जैनग्रंथकारच ती कथा गौरवाने सांगतात आणि अशा अितरही अनेक घटना त्या ग्रंथकारांनी दिलेल्या आढळतात. यास्तव वरील घटना विश्वसनीय म्हणून दिली आहे.

डोक्यातील अुवा वाचाव्यात म्हणून डोकेच अुडवावयाचे! माशाचा जीव वाचावा म्हणून माणसाचा जीव घ्यायचा - ही म्हणे अहिंसा! जणू काय माणसाला मारणे म्हणजे हिंसा नव्हे, मनुष्याला काही प्राण नव्हता! हिंसेहून आततायी झालेल्या ह्या अहिंसेच्या राक्षसी छळाने भारतातील व्याध, मच्छीमार, कोळी, खारवी, पारधी अित्यादी हिंसात्मक व्यवसाय करणाऱ्या लक्षावधी लोकांच्या अुपजीविकेचे साधनच नष्ट झाले.

त्या त्या जातींच्या लक्षावधी लोकांना या राजाच्या ह्या अहिंसात्मक आज्ञेमुळे त्यांची नि त्यांच्या मुलाबाळांची मात्र अुपासमारीने कशी हिंसा होणारी आहे, त्याविषयी बरीच चळवळ केल्यानंतर त्या गुजराथेतील धर्मपाल राजाने कृपाळू होअून अशी दुसरी आज्ञा सोडली की, ह्या हिंसात्मक धंदे करणाऱ्या लक्षावधी लोकांनी ते धंदे सोडलेच पाहिजेत, तथापि, त्यांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या पोटगीसाठी तीन वर्षेपर्यंत शासनसंस्थेकडून त्यांना पैसे देण्यात येतील.

अर्थात तीन वर्षानंतर पुन्हा अुपासमारीने त्या लक्षावधी लोकांचे हाल काही बंद होणारे नव्हते. कारण मांसान्न हेच त्यांचे मुख्य अन्न होते आणि त्यांना ते बहुधा फुकट मिळू शके. पण ह्या आततायी अहिंसेच्या छळापायी तेच मृत्युदंडाई ठरल्यामुळे त्या सर्वसामान्य जनतेतही बौद्ध धर्माविषयी नि बौद्धराजवटीविषयी अत्यंत चीड अुत्पन्न होअून त्या त्या जातीतील लक्षावधी जनतेनेही बुद्धधर्माचे जू झुगारून दिले! आणि देशकालपात्रानुसारी नि मानवी हितकारी अशा सापेक्ष अहिंसेचाच काय तो पुरस्कार करणाऱ्या वैदिक, म्हणजेच त्या काली अधिक समावेशक स्वरूप असलेल्या 'सनातनधर्मास' लक्षानुलक्ष लोक पुन्हा शरण रिघाले.

## अस्पृश्यतेची रूढी बुद्धदर्मामुळे बळावली, अुणावली नाही.

आजही पुष्कळ लोकांची, प्रचारकांची नि कित्येक अितिहास-लेखकांचीही अशी अेक समजूत झालेली दिसते की, भारतीय बौद्ध अस्पृश्यता पाळीत नव्हते आणि बुद्धधर्मामध्ये बुद्धांच्या राजवटीत कोणीही अस्पृश्य समजले जात नसत. परंतु हा समज भ्रामक आहे. अिथे कोणाच्या पोथीत काय सांगितले आहे हा प्रश्न दुय्यम आहे. प्रत्यक्ष व्यवहारात काय घडत होते हा प्रश्न खरा महत्वाचा आहे. बौद्धांनी अहिंसा तत्वाचा वापर करताना जो वर वर्णिल्याप्रमाणे आततायीपणा केला आणि विशेषतः बौद्ध राजवटीत प्राणिहिंसा नि मांसाशनही वधार्ह ठरवून तशा अपराध्यास जेथे तेथे हुडकून काढून प्राणदंडाच्या शिक्षा देण्याचा प्रत्यक्ष सपाटा चालविला, त्या त्यांच्या आततायीपणाचा हा परिणाम अपरिहार्यच होता की, अस्पृश्यतेची रूढी व्यवहारात नाहीशी होण्याचे ठायी बौद्धकालात ती अधिकच तापदायक, विस्तृत नि दृढमूल झाली. स्थलाभावामुळे अिथे ह्याविषयी अधिक खल करणे शक्य नाही आणि त्याचे कारणही नाही. निःसंदिग्ध पुरावा म्हणून भारतीय वैदिक किंवा भारतीय बौद्ध ह्यांतील कोणाचेही तत्कालीन मत न देता त्या त्या वेळेस बौद्धधर्माचे अभिमानी असलेले जे त्रयस्थ चिनी प्रवासी भारतात येअून जात त्यांचेच मत अिथे दिले की पुरे आहे. ते लिहितातः 'ज्या ज्या जातींनी काही केल्या त्यांचे हिंसात्मक धंदे काही सोडले नाहीत आणि बौद्धधर्माप्रमाणे अहिंसापालन केले नाही, अशा चांडाल प्रभृति जातींना त्या अपराधासाठी बहिष्कृत समजून गावाबाहेर काढून दिले जाअी. महारोग्याप्रमाणे गावापासून दूरच्या ठिकाणी त्यांनी वस्ती करावी लागे. जर कधी बाजाराच्या दिवशी किंवा अितर कामासाठी त्यांना गावात प्रवेश देण्यात आला तर अितर ग्रामस्थांना त्यांचा विटाळ होअू नये, म्हणून त्या अस्पृश्यांनी हातात अेक खुळखुळा बांधलेली काठी किंवा टिमकी घेअून मार्गाने ती वाजवीत जावे, असा कडक दंडक आहे. म्हणजे तसा आवाज अैकताच मार्गस्थ लोक सावध होअून त्यांच्या विटाळापासून दूर राहत.

अस्पृश्यांना गावात येताना जी वाअीट वागणूक पेशवाअीत मिळे, त्यासाठी जे कोणी अज्ञानाने किंवा मत्सराने पेशव्यांच्याच नावाने काय ते खडे फोडतात त्यांनी प्राचीन कालाचा हा प्रत्यक्ष पुरावा पाहून ह्या अपराधासाठी अशोक, श्रीहर्ष प्रभृति बौद्धराजांच्या नि विक्रमादित्यापासून राजपुतांपर्यंतच्या क्षत्रिय राजांच्या नावानेही खडे फोडले पाहिजेत. कारण

अस्पृश्यतेची ही अपराधी रूढी पेशव्यांनीच काय ती प्रथम चालू केलेली नसून ती फार प्राचीन काळापासून भारतामध्ये वैदिक काय किंवा जैन काय सर्वांच्याच राजवटीमध्ये चालू होती. आणि त्यातही बौद्धकालात ती नष्ट केली जाण्याचे ठायी अधिकच निष्ठुरपणे नि कटाक्षाने पाळली जाअी. अितकेच काय, पण अस्पृश्यही त्यांच्या खालच्या जातींना असेच अस्पृश्य मानीत आले आहेत. जी काही अस्पृश्य मंडळी बौद्धांत अस्पृश्यतेला थारा नाही असे चुकीने समजून त्या बौद्धसंप्रदायाचे अवास्तव स्तोम माजवू पाहत आहेत त्यांनी हे ध्यानात ठेवावे की, वैदिक धर्मीयांच्या सापेक्ष अहिंसेपेक्षा बौद्धांच्या या आततायी अहिंसेपायीच चांडालादि अस्पृश्यांची अधिक दुर्दशा होत गेली. बौद्ध संप्रदायाने अस्पृश्यता वाढविली, अुणावली नाही. वरील अितिहासाच्या रोखठोक पुराव्याने हे पडताळून घेअून मग त्यांना काय परवडेल ते त्यांनी करावे.

त्यांनी हे ध्यानात ठेवावे की वर वर्णिलेल्या कारणासाठीच बौद्धकाळी मासेसुद्धा मारण्यास नि कोणतेही मांस खाण्यास वधदंड देणाऱ्या ह्या आततायी बौद्ध राजवटीपेक्षा त्या व्याध, चांडालादिक अस्पृश्य लोकांनाही, लक्षावधी मनुष्यांच्या चरितार्थाला नि सापेक्ष प्राणी हिंसेला दंडार्ह न समजणाऱ्या वैदिक राजवटीच तुलनेने अधिक सुखावह वाटू लागल्या. आणि त्यांच्यातील ज्यांनी पूर्वी स्वेच्छेने वा निरुपायाने बौद्धधर्म अंगीकारलेला होता ते सहस्त्रावधी अस्पृश्यही बौद्धधर्माचा त्याग करून पुन्हा वैदिक धर्माचेच अनुयायी झाले. अशा प्रकारे मुसलमानांचा सिंध प्रांतात पाय पडण्यापूर्वीच साऱ्या हिंदुस्थानात अुच्च वर्णापासून तो सामान्य जनतेपर्यंत बौद्धधर्माच्या लक्षानुलक्ष अनुयायांची संख्या सारखी घटत गेल्यामुळे तो संप्रदाय त्याच्या अंगभूत असलेल्या रक्तक्षयानेच ऱ्हास पावत आलेला होता. अितका की, त्या काळी ती दुर्दशा प्रत्यक्ष पाहिलेल्या बौद्धधर्मीय चिनी प्रवाशांनीसुद्धा हळहळून लिहिले आहे की, ''बुद्धाच्या प्रत्यक्ष निवासाने पवित्र समजली गेलेली आणि अेका काळी भरभराटीत असलेली बुद्धगया, मृगदाव, श्रावस्तीनगर, कुशीनगर, बुद्धाचे जन्मस्थान असलेले कपिलवस्तु अित्यादी बौद्धांची जागतिक तीर्थक्षेत्रही त्या काळी अुजाड झालेली होती. आणि तेथे जिकडे तिकडे रान माजलेले होते.

तथापि ऱ्हास पावत असला तरी बौद्धसंप्रदाय मुसलमान येण्याच्या आधी हिंदुस्थानातून अगदी नामशेष झालेला नव्हता. सिंध, कांबोजकडे त्यांच्या अनुयायांची बरीच संख्या होती. पूर्वबंगालमध्येही तो टिकून होता. हिंदुस्थानातील अितर सर्व प्रांतात अत्यल्प प्रमाणात का होअीना, पण बौद्ध लोक निवसत होते. अशी अेक आख्यायिका आहे की, बौद्धांच्या विहारांची नि अर्थात भिक्षूंची अितकी मोठी संख्या आजच्या बिहार प्रांतात फार पूर्वी होती की त्या प्रांतासच 'बिहार' हे नाव पडले. परंतु मुसलमान येण्याचे आधी तशी स्थिति जरी तेथे नसली तरी स्तूपादि काही बुद्धप्रस्थे आणि बौद्ध लोक त्या काळी निवसत होते. त्या काळी जिकडे तिकडे वैदिक राजवटच भरभराटीत असल्यामुळे राष्ट्रदोही अुपद्व्याप करण्याची किंवा आपले धर्माचार दुसऱ्यावर बळाने लादण्याची, अिच्छा असो वा नसो, पण शक्ती तरी हिंदुस्तानातील त्या बौद्धसंप्रदायात अुरलेली नव्हती. आणि ते जोवर आपापल्या परी आपला धर्माचार पाळून असत, तोवर त्यांच्या विहारांना, भिक्षुसंघांना किंवा अितर अनुयायांना वैदिक राजवटीत कोणत्याही प्रकारचा अडथळा करीत नसत. त्यांचे धर्मस्वातंत्र्य अबाधित होते, हे चिनी प्रवासी मनमोकळेपणाने मान्य करतात.

मग मुसलमान येण्याच्या आधी प्रांता-प्रांतातून बौद्धांची वसत असलेली ही लक्षावधी लोकांची संख्या आणि ती बुद्धप्रस्थे हीही हिंदुस्थानातून अगदीच नामशेष कशी झाली ?

अगदी पूर्वी विशेषतः पाश्चात्य अितिहास- कारांचा असा अेक ठाम पूर्वग्रह झालेला असे की, केव्हातरी किंवा अधूनमधून वैदिकधर्मीय राजसत्तांनी खड्गाच्या बळावर बौद्धांचे शिरकाण करून त्यांना निर्मूल केलेले असावे. किंवा त्यांच्यावर बळाने वैदिकधर्म लादला असावा. या पूर्वग्रहास अैतिहासिक आधार मिळावा म्हणून त्यांनी त्या त्या काळाचा भारतीय अितिहास चाळणीतून पीठ गाळावे तसा अगदी चाळून चाळून पाहिला, परंतु किरकोळ अपवाद जमेस धरूनही हिंदुस्तानातील बौद्धांचे असे बलपूर्वक नि योजनाबद्ध निर्मूलन झाल्याचा त्यांना कोणताही पुरावा मिळू शकला नाही.

शेवटी त्यांच्यापैकी कित्येक अितिहासकारांनी आपला पूर्वग्रह चुकीचा असल्याचे आणि असे बलपर्वूक निर्दालन झाल्याची कल्पना मूलत:च मिथ्या असल्याचे मनमोकळेपणे मान्य केलेले आहे.

तर मग हिंदुस्थानातून बौद्धांचे हे आमूलाग्र निर्दालन शेवटी कोणी केले? ह्या प्रश्नाचे अुत्तर मात्र परदेशी नि स्वदेशी अशा बहुतेक अितिहास- कारांना सापडलेले दिसत नाही, किंवा त्यांनी ते स्पष्टपणे सांगितलेले नाही. हिंदुस्थानातून बौद्धांचा धर्म जवळ जवळ नामशेष होण्याचे हे तिसरे कारण म्हणजे बौद्धांची मुसलमानांशी पडलेली गाठ!

बौद्धांनी सिंधप्रांतात मुसलमानांची स्वारी होताच कसा स्वराष्ट्रद्रोह केला, कशी मुसलमानांची मनधरणी केली आणि तरीही 'बुद्धप्रस्थी' म्हणजेच मूर्तिपूजक असणाऱ्या आणि आत्यंतिक अहिंसचा अुदोअुदो करणाऱ्या बुद्धधर्माविषयी मुसलमानी धर्मातच असलेल्या तीव्र द्वेषापायी मुसलमानांनी सिंधमध्ये बौद्धांचा कसा नि:पात केला ते वर संक्षेपत: सांगितलेले आहेच. अगदी त्याच कारणासाठी आणि त्याच पद्धतीने मुसलमान जसजसे हिंदुस्थानात प्रांतामागून प्रांत जिंकीत पुढे घुसले तसतसा बुद्धप्रस्थांचा आणि बौद्ध जनतेचा त्यांनी शस्त्रबलाने नि:पात केला. अेका हातात कृपाण नि दुसऱ्या हातात कुराण अशा आततायी हिंसेलाच स्वधर्म मानणाऱ्या त्या मुसलमानांच्या अेकामागून अेक सेनापतीने नि सैन्याने साऱ्या हिंदुस्थानातील बौद्धांचे स्तूप, संघाराम, विहार, बुद्धमूर्ती, स्तंभ तोडून मोडून पाडून अुद्ध्वस्त केले. बहुतांश बौद्ध मृत्यूच्या भीतीपायी मुसलमान होण्यास सिद्ध झाल्याने त्या सर्वांना त्यांनी मुसलमान करून टाकले. गांधार, कांबोज प्रभृति या वायव्येकडील प्रांतात बौद्ध असा अुरला नाही. सारे मुसलमान झाले. बिहार प्रांतात बखत्यार खिलजी चालून येतो आहे, असे कळताच कित्येक बौद्ध आपले ग्रंथ नि आपला जीव वाचविण्यासाठी तिबेट, चीनकडे अनेक ग्रंथ घेअून पळून गेले. अुरले ते बाटविले गेले. कोणी कोणी हुतात्मेही झाले असतील. पण लढले असे कोणीच नाहीत. संघटितपणे भारतीय बौद्धांच्या अेखाद्या सैन्याने वा समुदायाने मुसलमानांशी सशस्त्र म्हणण्यासारखी लढाअी वा झुंज दिली, असे काही कुठे आढळत नाही!

## पूर्वबंगालातच मुसलमान बहुसंख्य कसे ह्या कोड्याचा अुलगडा

तीच स्थिती पूर्वबंगालची! तेथे बौद्धांची बरीच संख्या होती. पण, तुरळक अपवाद सोडता सारेच्या सारे मुसलमान झाले. ज्या दिल्लीत पाचशे वर्षे तरी अेकाहून अेक कडवे मुसलमानी सुलतान नि बादशहा राज्य करून गेले त्या प्रत्यक्ष दिल्लीत वैदिक हिंदूंची तेव्हाही नि आजही बहुसंख्याच आहे. सारा अुत्तर प्रदेश तो थेट पश्चिम बंगाल यातही मुसलमानी राज्यात काय किंवा आज काय, वैदिक हिंदूंचीच बहुसंख्या आहे. कारण मुसलमान प्रथम जिंकीत आले तेव्हाही त्या प्रांतातून बौद्धांची संख्या होती नव्हती अशीच असे. अगदी पूर्व टोकास असलेल्या ह्या अेका पूर्वबंगालातच मुसलमानांनी तो प्रांत जिंकल्यानंतर हिंदूंची अल्पसंख्या झाली ती कशी, ह्या कोड्याचा अुलगडा ह्या घटनेमुळेच होतो की त्या पूर्वबंगालात बौद्धांची वरील प्रांतांपेक्षा पुष्कळ अधिक वस्ती होती. आणि ते अपवाद सोडता सारेच्या सारे मुसलमान झाले. म्हणून, तेव्हापासून प्रांतातच काय ती मुसलमानांची अेवढी मोठी संख्या अेकत्र सापडते.

अशा प्रकारे बौद्धांच्या संप्रदायाचे सामाजिक अस्तित्व जे हिंदुस्थानातून अकस्मात नामशेष झाले ते मुसलमानांच्या आततायी शस्त्रबलाने नि हिंसेनेच होय. त्या अेकमेकांची गाठ पडताच मुसलमानांच्या आततायी हिंसेने बौद्धांच्या आततायी अहिंसेचा शिरच्छेद केला.

पण बुद्धधर्माची नि स्वत: बुद्धदेवाची भारतात अंती काय गत झाली? भागीरथीतून फुटलेला अेखादा जलप्रवाह जसा अलगदपणे अनेक योजने वाहात वाहात पुढे कुठे तरी भागीरथीसच मिळावा तसा भारतीय बुद्धधर्म हिंदुधर्मात विलीन झाला आणि हिंदूंच्या अवतारमालिकेत बुद्धदेवाची प्रतिष्ठापना होअून त्यांचेही हिंदूकरण करण्यात आले!

तीनशे वर्षे, म्हणजेच निदान पाच पिढ्या मुस्लिम राजसत्तेला हिंदूंनी सिंधूप्रांताबाहेर पाअूल टाकू दिले नाही. अितकेच नव्हे, तर वरचेवर अुलट चढाया करून सिंधप्रांत हिंदूंनी परत दोनशे वर्षे तरी जिंकूनही घेतला होता.

मागे सांगितलेच आहे की, सिंधप्रांत अि. सन ७११ मध्ये अरबांनी हिंदूराजाच्या हातून जिंकून घेतला. बहुतेक स्वकीय नि परकीय अितिहास-ग्रंथातून मुसलमानांच्या सिंधच्या स्वारीनंतर त्यांच्या हिंदुस्थानावर झालेल्या पुढील स्वाऱ्या अितक्या दाटीवाटीने दिलेल्या असतात नि हिंदूंचे प्रांतामागून प्रांत जिंकीत सारे हिंदुस्थान मुसलमानांनी पादाक्रांत केल्याचे वृत्त अितके अेका श्वासासरसे सांगून टाकलेले असते. विशेषतः शालेय अितिहासातील २०-२५ पानांच्या आकुंचित स्थलात तर ते वृत्त अितके त्रोटकपणे लिहिलेले असते की, सामान्य वाचकांवर नि विशेषतः विद्यार्थ्यांवर त्याचा असा अेक विपरीत परिणाम होतो की, हिंदूंनी मुसलमानांचा प्रतिकार असा कोठे केलाच नाही. मुस्लिमांना डांबून असे कोठे धरलेच नाही.

जणू काय सिंधप्रांत जिंकताच मुस्लिम जेते जे कोणा जादूच्या घोड्यावर स्वार झाले ते सारे हिंदुस्थान जिंकीत जिंकीत थेट कन्याकुमारीला पोचले, तेव्हांच काय ते खाली अुतरले! पण हा समज अगदी विपरीत आहे!

## मध्यंतर कालाची जाणीव

असा विपरीत समज होअू नये, म्हणून अितिहासलेखकांनी मुसलमानांच्या स्वाऱ्यास्वाऱ्यातील मध्यंतराचा काल नि त्या त्या काली हिंदूंनी केलेला यशस्वी प्रतिरोध किंवा अयशस्वी असला तथापि, केलेला प्रतिकार यांचा स्पष्ट ठसा वाचकांच्या मनावर बिंबेल, अितक्या प्रमाणबद्ध नि परिणामकारक ठळकपणे त्या त्या घटना वर्णिल्या पाहिजेत. हे सिंधचेच अुदाहरण घ्या. अरबी मुसलमानांनी सिंधप्रांत जिंकल्यानंतर साधारणतः ३०० वर्षेपर्यंत हिंदूराजांनी त्याच्या पुढचा हिंदूप्रदेश मुसलमानांना व्यापू दिला नाही. परंतू ह्या महत्त्वाच्या घटनेचा ठसा सर्वसाधारण जनतेच्या मनावर मुळीच अुमटलेला नसतो. कारण, बहुतेक अितिहासग्रंथात त्याचा ठसठशीत अुल्लेखच केलेला नसतो.

## अशा कालखंडाच्या दीर्घत्वाची यथार्थ जाणीव होण्याची सोपी युक्ती

अशा मध्यंतरातील कालखंडाचा ठसा मनावर न बिंबण्याचे अेक कारण असे आहे की '३०० वर्षे' किंवा 'तीन शतके' हे शब्द आपण अवघ्या तीन विपलांत लिहून किंवा वाचून पुढे जातो. त्यामुळे ह्या कालखंडाच्या प्रदीर्घत्वाची यथाप्रमाण कल्पना आपल्या मनावर विशेषत्वाने सांगितल्यावाचून बिंबत नाही. अशा वेळी ते दीर्घत्व मापण्याची सोपी युक्ति म्हणजे त्याची अटकळ त्यातील पिढ्या मोजून करावी. तीनशे वर्षे म्हणजे त्यात न्यूनतः पाच पिढ्या तरी अुलटून गेलेल्या असतात! अिंग्रजांचे राज्य आपल्या चालू पिढीला कितीतरी दीर्घकाल टिकले आहे असे वाटत होते! पण ते शतकात मोजले तर दीड शतकच काय ते भरले! त्या मापाने मोजले म्हणजे हिंदूंनी मुसलमानांना ३०० वर्षे म्हणजे तीन शतके, म्हणजेच 'न्यूनतः' दहा-पाच पिढ्या अुलटून जाअीतोपर्यंत सिंधबाहेर जे पाअूल टाकू दिले नाही त्या घटनेचे अितिहासिक महत्व मनावर यथाप्रमाण ठसते! हीच गोष्ट अशा अितर मध्यंतरांनाही लागू आहे.

ह्या मध्यंतराच्या काळात मुसलमानी राष्ट्रांचा आवेश किंवा विजिगीषा सुन्न होअून गेली होती, असे तर मुळीच म्हणता येत नाही. अुलट तो काळ मुसलमानांच्या भर आवेशाचा होता. ह्याच तीनशे वर्षात त्या अरबी मुसलमानांनी बगदादपासून भूमध्यसमुद्रापर्यंत, तेथून अुभ्या आफ्रिका खंडाचा सारा अुत्तर तट आणि तेथून आज ज्याला जिब्राल्टर म्हणतात ती सामुद्रधनी अुतरून आजचा पोर्तुगाल नि स्पेन जिंकून दक्षिण फ्रान्सपर्यंतचा युरोपचा प्रदेश हस्तगत केलेला होता! आजचे जिब्राल्टर हे नावच मुसलमानांच्या ह्या अमोघ दिग्विजयाची साक्ष देत आहे. 'जेबल अि तारिक' म्हणजे अरबी विजेता तारिक ह्या सेनानीने जिंकलेली सामुद्रधुनी अरबांनी तिला दिलेल्या अरबी नावाचेच आजचे 'जिब्राल्टर' हे नाव अेक अपभ्रष्ट रूप आहे. पण शेवटी फ्रान्सचा शूर राजा 'चार्ल्स मार्टेल' म्हणजे 'घणाधारी' चार्ल्स ह्याने प्रबळ प्रतिकार करून आपल्या 'घणा'च्या घावाखाली अि. स. ७३२ मध्ये मुसलमानांच्या त्या आक्रमणाचे डोकेच ठेचून त्यांना नित्याचे परत फिरविले. त्यामुळेच काय तो पुढचा सारा युरोप वाचला! मुसलमानांनी ह्या दिग्विजयात त्या आशिया-आफ्रिका खंडांतील राज्येच काय ती जिंकली नाहीत, तर त्यांतील राष्ट्रांनाच तलवारीचे पाण्याने बाटवून मुसलमान करून टाकले! आजच्या स्पेन-पोर्तुगाललाही त्यांनी बळाने मुसलमान करण्याचा सपाटा चालविला होता. त्यांच्याही स्त्रियांचे अपहरण केले होते. पण ती दोन राष्ट्रे त्यांच्या तडाखातून अनेक शतकानंतर पुढे मुक्त झाली. कशी, ते पुढे सांगण्यात येअील. तथापि

आफ्रीका खंडातील अुत्तर पट्टीची सारीची सारी त्या वेळची बाटविलेली राष्ट्रे आजही मुस्लिमची मुस्लिमच राहिलेली आहेत!

बरे, तशाच आवेशाने नि राक्षसी धर्मांधतेने हिंदुस्थानचाही नायनाट करण्यासाठी सिंधप्रांतातून बाहेर पडून हिंदूंच्या शेजारच्या प्रांतांवर तुटून पडण्याचा प्रयत्न मुसलमानांनी त्या सन ७०० ते १००० च्या काळात केला नाही, असेही नाही! अुलट ते सौराष्ट्राकडून आणि वर गांधार प्रांताकडून अनेक वेळा तसे तुटून पडले होते. पण हिंदूकहून परत पिटाळले गेले होते.

त्या काळी सिंधच्या पूर्वसीमेपासून तो अुत्तर हिंदुस्थानातील प्रांताप्रांतापर्यंत प्रतापी राजपूत राज्यांची सलग मालिकाच मालिका अेखाद्या अनुल्लंघ्य नसली तरी दुर्लंघ्य पर्वतासारखी सिंधमधल्या मुस्लीम सत्तेला प्रतिरोधीत पसरलेली होती त्यामुळे सिंधप्रांतातून पुढे स्वाऱ्या करून येणाऱ्या मुसलमानांच्या टोळधाडी वायव्येकडे हिंदूंच्या निकराच्या प्रतिकाराने पुन्हा पुन्हा मागे पिटाळल्या गेल्या नि सिंधमध्ये डांबून टाकल्या गेल्या. चितोडच्या बलशाली बाप्पा रावळने तर अेकदा सिंधवरच अुलट स्वारी करून मुसलमानांना सिंधमधून हुसकून देअून तो प्रांत परत जिंकून घेतला होता. पुढे अरबांनी तो पुन्हा जिंकला. पण शेवटी सुमेर रजपुतांनी सिंधवर आपली राजसत्ता स्थापन केली.

ज्या तीनशे वर्षात वर सांगितल्याप्रमाणे मुसलमान पश्चिम आशिया, आफ्रीका खंड नि दक्षिण फ्रान्सपर्यंतचा युरोप पादाक्रांत करू शकले. त्या तीनशे वर्षात ते सिंध प्रांताबाहेर पुढे पाअूल टाकू शकले नाहीत. या अेका गोष्टीवरूनच हिंदूंनी त्या तीनशे वर्षात केलेल्या चिकाटीच्या प्रतिकाराची यथार्थ कल्पना येअील.

तरीही ह्याच कालात हिंदूंना अेखाद्या चंद्रगुप्ताप्रमाणे सारी भारतीय शक्ती अेकवटून मुसलमानांना पिटाळून लावता आले नाही. हे आमचे त्या काळचे वैगुण्यही मनास बोचल्यावाचून राहात नाही.

## प्रकरण ३ रे

# ह्या शतकव्यापी हिंदू-मुस्लिम महासंघर्षातील मुस्लिम धार्मिक अत्याचाराचे वैशिष्ट्य

### गझनीचे सुलतान

सिंधमध्ये अुण्यापुऱ्या तीनशे वर्षे डांबून ठेवलेल्या सत्तेने सिंधप्रांत जरी पूर्णपणे असा सोडला नाही तरी अरबी मुसलमानांचे पहिल्यासारखे मोठ्या प्रमाणावर असे आक्रमण हिंदुस्थानवर पुन्हा केव्हाही झाले नाही. शेवटी तर सिंधमध्ये सुमेर रजपुतांचेच राज्य झाले. परंतु गांधारपलीकडच्या गझनी या प्रांतात निराळ्या जातीच्या मुसलमानांची सत्ता स्थापन झालेली होती. तेथील सुलतान सबक्तगीन ह्याने गांधारातील त्यावेळी राज्य करीत असलेल्या हिंदुराज्यावर स्वारी करून त्या वायव्य दिशेने हिंदुस्थानात घुसण्याची जय्यत सिद्धता चालविली होती. पंजाब आणि गांधार ह्या प्रांतांवर हूणांना पादाक्रांत केल्यावर हिंदुकुशपर्यंत हिंदूंचेच स्वामित्व स्थापन झालेले होते आणि ब्राह्मणवंशीय राजसत्ता त्या प्रांतावर नांदत होती. त्याच ब्राह्मणवंशीय राजकुलात सबक्तगीनच्या वेळी जयपाल नावाचा राजा राज्य करीत होता.

### धर्मवीर राजा जयपाल आणि धर्मवीर अनंगपाल

राजा जयपालने सबक्तगीनाचे हे आक्रमक धोरण दूरदर्शीपणे आधी हेरून आपण होअून सबक्तगीनवर स्वारी केली. पण त्या लढाअीत जयपालाचा मोड झाला. त्यायोगे अुत्तेजन पावून सुलतान सबक्तगीन जयपालावर तुटून पडला. त्या मुसलमानी संकटाला पुन्हा पहिल्यापेक्षाही निकराने तोंड देता यावे, यासाठी राजा जयपालने आजूबाजूच्या हिंदूराजांमध्ये मुसलमानांविरूद्ध चेव अुत्पन्न करून त्या हिंदुराजांची अेक संघटित आघाडी निर्मिली आणि गांधारप्रांतात चढाअी करून आलेल्या सबक्तगीनशी निकराची लढाअी दिली. परंतु तीतही जयपालाचा पराभव झाला आणि गांधारसह त्या सिंधुपलीकडील वायव्य प्रांतातील हिंदुराजसत्तेचा अुच्छेद होअून तो सारा प्रांत सुलतान सबक्तगीनने आपल्या गझनीच्या राज्यास जोडून टाकला. त्यानंतर थोड्याच दिवसांत सुलनान सबक्तगीन मरण पावला आणि त्याचे गादीवर धर्मोन्मादात, हिंदुद्वेषात आणि पराक्रमातही शतपटीने कडवा नि क्रूर असलेला त्याचा पुत्र सुलतान महंमद हा गझनीच्या गादीवर बसला. हाच होय तो 'बुतशिकन्' मूर्तिभंजक अशी धर्मांध पदवी स्वतःस लावून घेणारा महंमद गझनी! त्याने राज्यावर येताच मुसलमानांचा त्या वेळचा सर्वश्रेष्ठ धर्माधीश आणि सत्ताधीश जो खलिफा त्याचे संमुख भरराज्यसभेत अुठून प्रकट प्रतिज्ञाच केली की, साऱ्या हिंदुस्थानातील काफरांचा नायनाट करीन, तरच मी खरा सुलतान! आणि त्या प्रतिज्ञेप्रमाणे लगेच त्याने सिंधु अुतरून हिंदुस्थानावर स्वाऱ्यांमागून स्वाऱ्या करण्याचा धूमधडाका चालविला.

येथून म्हणजे न्यूनाधिक अेक सहस्त्राव्या सनापासून पुढे शतकानुशतके चालणाऱ्या हिंदु-मुसलमानांच्या महायुद्धांना खरेखुरे तोंड लागले.

आधीच दोन वेळा राजा जयपालाच्या नेतृत्वाखाली संयुक्त हिंदुसैन्याचा पराभव केल्यामुळे मुसलमानांच्या सैन्यात प्रबळ आत्मविश्‍वास अुत्पन्न झालेला होता. अुलटपक्षी वायव्यप्रांत हातातून गेल्यामुळे आता केवळ पंजाबवरच ज्याचे स्वामित्व अुरलेले होते त्या राजा जयपालाने मागील दोन पराभवांनीही खचून न जाता मुसलमानाशी पुन्हा अेकदा टक्कर देण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याचा खऱ्या वीराला नि राजाला शोभेल असा अढळ निर्धार केला. महंमद गझनी पंजाबवर स्वारी करून येताच अि.स. १००१ मध्ये जयपालाने त्याच्याशी सिंधु नदीच्या आसमंतात पुन्हा अेकदा लढाअी दिली. परंतु आपले स्वराज्य नि स्वधर्म ह्यांच्या रक्षणासाठी जे जे राजाचे नि वीराचे कर्तव्य ते ते अढळपणे करीत आलेल्या ह्या राजा जयपालाचा ह्या तिसऱ्या लढाअीतही महंमद गझनीने पराभव केला. तेव्हा असे अयशस्वी जिणे जगण्यापेक्षा किंवा म्लेंच्छांना शरण रिघण्यापेक्षा राज्यत्याग करून मरणेच बरे, असे वाटून त्या मानधन राजा जयपालाने

आपला पुत्र जो अनंगपाल त्याचे हाती राज्य सोपविले आणि भडकलेल्या चितेत अग्निप्रवेश करून आपल्या प्राणांचे बलिदान केले.

राजा अनंगपाल ह्यानेही सुलतान महंमदाच्या आक्रमणास ताठरपणाने विरोध करण्याचे आपल्या शूर पित्याचे व्रत तसेच पुढे चालविले. अि. सन १००६ मध्ये महंमदाने मुलतानवर स्वारी करण्यासाठी अनंगपालाच्या राज्यातून वाट मागितली. पण अनंगपालाने त्याची ती मागणी झिडकारली. तेव्हा महंमदाने अनंगपालावर स्वारी केली. त्या लढाअितही अनंगपालाचा पराभव झाला. त्यास मागे हटावे लागले. पुढे महंमद मुलतानकडे गेला आहे, असे पाहून अनंगपालाने पुन्हा अेकदा आजूबाजूच्या हिंदुराजांची स्वधर्मरक्षणासाठी अेकजूट केली आणि सुलतान महंमद अि. सन. १००८ मध्ये अनंगपालावर पुनश्च चालून आला असता या संयुक्त हिंदू सैन्याने त्याच्याशी लढाअी दिली. सिंधु नदीच्या आसपास ह्या दोन्ही सैन्यांची गाठ पडली. ह्या युद्धात हिंदू अितक्या निकराने लढले की दोन प्रहरच्या संधीस मुस्लिम सैन्याचा व्यूह ढासळून ते अस्ताव्यस्त होअून गेले. तेव्हा सुलतान महंमदही रण सोडून माघारी फिरू लागला. अितक्यात, त्यापूर्वी नि त्यानंतरही हिंदूंनी परशत्रूंशी दिलेल्या अनेक लढायांत जी हानिकारक घटना अकस्मिकपणे हटकून घडत असे आणि तरीही जी टाळण्याचा आगाअू सावधपणा हिंदूंच्या ढिलाअीने सहसा केलेलाच नसे, तीच नेमकी घटना अकस्मात घडली! जळत्या बाणांच्या माऱ्यामुळे राजा अनंगपालाचा हत्ती हिंदूंच्या चढाअीत भर रणात अेकाअेकी भडकला आणि तोंड फिरवून पळू लागला. त्यामुळे हिंदूंच्या सैन्यात गोंधळ अुडाला. रणांगणात माघार घेत असलेल्या महंमदाच्या ध्यानात ती गोष्ट येताच हिंदूंच्यामुळे अस्ताव्यस्त झालेल्या त्याच्या मुसलमानी सैन्यापैकी काही निवडक पथके तत्काळ समवेत घेअून फळी बांधून पुन्हा अेकदा त्याने हिंदू सैन्यावर निकराची चढाअी केली. त्या शेवटच्या धुमश्चक्रीमुळे हिंदूंचा पराभव झाला. तेव्हा मुसलमानांचीही पुष्कळ प्राणहानी झाली असल्यामुळे अनंगपालाचा पाठलाग करण्याच्या भरीस न पडता सुलतान महंमद मिळाला तेवढा जय पदरात पाडून घेअून गझनीस माघारी गेला. परंतु राजा अनंगपालाचा नायनाट केल्यावाचून पंजाबात आपली मुस्लिम सत्ता प्रस्थापित होणे शक्य नाही, हे अुघड झाल्यामुळे दीडअेक वर्षानंतर सुलतान महंमद अनंगपालावर तिसऱ्यांदा चालून गेला. ह्या वेळी अनंगपालाला कोणीच सहाय्यक नव्हता, तरीही त्याच्या अुरलेल्या अेकनिष्ठ सैन्यासह त्याने महंमदाशी लढाअी दिली. त्याच रणधुमाळीत लढत असताना तो शूर हिंदू राजा अनंगपाल ठार मारला गेला.

अशा रीतीने पंजाबवर मुसलमानांच्या झालेल्या पहिल्या पहिल्या अनेक आक्रमणांना राजा जयपाल, त्याचा पुत्र राजा अनंगपाल आणि त्याचे सहस्त्रावधी वीर सैनिक यांनी आपले हिंदूराज्य आणि हिंदूधर्म यांच्या रक्षणासाठी अनेक लढाया देअून नि मुसलमानांचेही सहस्त्रावधी सैनिक मारून जिवात जीव असेतो त्या परशत्रूला रोखून धरले, त्यांचे वीर कर्तव्य ते करून गेले!

राजा अनंगपालाच्या मृत्यूनंतर वायव्य प्रांताप्रमाणेच सुलतान महंमदाने पंजाब प्रांतालाही आपल्या गझनीच्या साम्राज्यास अि. सन. १०१० चे आसपास जोडून टाकले. पंचनद प्रांतात हिंदूंच्या राजसत्तेचे अुच्चाटन होअून मुसलमानांची राजसत्ता प्रथमच स्थापन झाली. हा विजय मिळताच सुलतान महंमद ठाणेश्वर येथील हिंदूराजांवर आणि हिंदूंचे धर्मक्षेत्र गाजत असलेल्या मथुरा नगरावर लगोलग चालून गेला. ही नगरे जिंकून मुसलमानांच्या प्रत्येक धर्मांध आक्रमणाचा जो ठराविक कार्यक्रम असे त्याप्रमाणे तेथील हिंदूमंदिरे पाडून नि जाळून टाकून, हिंदू स्त्री-पुरूष नागरिकांचे करवेल तितके शिरकाण करून, शतावधी हिंदू स्त्रियांना पळवून नेअून आणि अपार धनाची लूट घेअून महंमद पुन्हा गझनीस परत गेला. त्या मागोमाग अि. सन १०१९ मध्ये प्रतिहारांची राजधानी असलेल्या कनोज नगरावर स्वारी करून महंमदाने तेथेही जाळपोळीचा, रक्तपाताचा नि धर्मांध अत्याचारांचा कहर करून सोडला. त्यामुळे आजूबाजूच्या हिंदू प्रांतावर त्याचा अितका दरारा बसला की अि सन १०२३ मध्ये तो जेव्हा ग्वाल्हेर नि कलिंजर येथील हिंदूराजांवर चालून आला तेव्हा तेथील हिंदूराज्ये निरुपायाने त्याचे आधिपत्य पत्करून त्याची मांडलिक बनली.

## महंमदाची सोमनाथवर स्वारी

त्यानंतर अि. सन १०२६ मध्ये सुलतान महंमदाची सौराष्ट्रातील सोमनाथ मंदिरावरील सर्वात अधिक गाजलेली स्वारी आली. त्या वेळी त्याने अितक्या प्रबळ सैन्यासह अगदी अटीतटीच्या घोषणा करून हिंदूंच्या त्या सुप्रसिद्ध मंदिरावर चाल केली होती की, सौराष्ट्राच्या सीमेला भिडताच गुजरात-सौराष्ट्रावर त्या वेळी राज्य करीत असलेला राजा भीम हा त्याच्या भीम नावालाही कलंकित करून अेखाद्या भ्याडासारखा राज्य सोडून पळून गेला. त्यामुळे त्या संघटित मुसलमानी सैन्याशी तोंड देण्यास हिंदूंचे कोणतेही शस्त्रसज्ज नि व्यूहबद्ध असे सैन्य अस्तित्वातच अुरले नाही. तथापी अशा बिकट प्रसंगीही आपल्या हातून होअील तितके तरी संरक्षण करण्यासाठी सोमनाथाच्या पुजारी मंडळानेच पुढाकार घेतला. आजूबाजूच्या सर्व हिंदू जनतेला आपल्या देवस्थानाच्या आणि आपल्या धर्माच्या रक्षणार्थ म्लेंच्छ शत्रूच्या प्रतिकारास मिळेल ते शस्त्र घेअून धावून या, असे अुच्चेतक आव्हान धाडले गेले. त्यासरशी लांबून लांबून सहस्त्रावधि हिंदूलोक धावून आले. हे युद्ध कोणा राजासाठी लढावयाचे नव्हते. त्यांत लढणाऱ्यांपैकी कोणत्याही हिंदू स्वयंसैनिकाला वैयक्तिक राज्यलाभ होणारा नव्हता. ते निर्भेळ धर्मयुद्ध होते. त्यातही ते सहस्त्रावधि हिंदू म्हणजे अेखादे व्यूहबद्ध, रणशिक्षित सैन्य नव्हते. तो आयत्या वेळी अेकवटलेला हिंदूधर्मवीरांचा अेक समुदाय होता. तरीही देव मस्तकी धरून, जिवावर अुदार होअून, महमदाच्या संघटित नि कसलेल्या मुस्लिम सैन्याशी ते अहोरात्र झुंजले. मुस्लिम सैन्य चढून येताना तटापर्यंत, देवालयाच्या तटावरून, शत्रू देवालयात घुसल्यानंतरही हिंदुधर्मवीरांचा सशस्त्र प्रतिकार चालूच होता. मुसलमानांच्या रक्ताचाही सडा पडतच होता. शेवटी सुलतान महंमदाने जेव्हा देवालयाचा पूर्णपणे पाडाव केला तेव्हा तो त्वेषासरशी थेट गाभाऱ्यात शिरला आणि सोमनाथाची मूर्ति त्याने स्वहस्ते फोडून टाकली ! ह्या आपल्या धर्मांध शतकृत्याचे प्रसिद्ध्यर्थ महंमदाने ‘बुतशिकन्’ (मूर्तिभंजक) ही पदवी धारण केली.

## पन्नास सहस्त्र हिंदुवीरांचे झुंजार बलिदान

मुस्लिम अितिहासकारही लिहितात की, आपल्या देवालयाच्या संरक्षणार्थ लढत असता त्या संग्रमात पन्नास सहस्त्र हिंदू तरी ठार मारले गेले! त्या पन्नास सहस्त्रांपैकी कोणीही हिंदू म्हणाला असता की ‘मी मुसलमान होतो’ तर त्याला मुसलमानांनी जीवदान दिले असते. कारण त्यांच्या धर्माची ती रणनीतीच होती. पण, तशा बाटग्या जीवितास धिक्कारून अेक नव्हे, अेक सहस्त्र नव्हे, तर पन्नास सहस्त्र हिंदू स्वयंसेवकांनी लढत लढत धारतीर्थी आपल्या प्राणांचे बलिदान केले!

ग्रीकांच्या प्राचीन अितिहासात अशाच अेका प्रसंगी परकीय शत्रूंशी झुंजणाऱ्या ‘होरेशिअस’ नावाच्या अेका प्रख्यात ग्रीक धर्मवीराचा गौरव करताना अेक इंग्लिश कवी म्हणतो :

"Thus outspake brave Horatius
the Captain of the gate,
To every man upon this earth,
death cometh soon or late,
And how can a man die better than
by facing fearful odds
For ashes of his fathers and
the temples of his Gods."

वरील वीर कवनातील गौरवार्ह भावनेनेच आपल्याही देवालयाच्या आणि देवधर्माच्या संरक्षणार्थ रणात झुंजत पडलेल्या ह्या हिंदूंच्या पन्नास सहस्त्र धर्मवीरांच्या स्मृतीस कोणता हाडाचा हिंदू आपली कृतज्ञ श्रद्धांजली वाहणार नाही!

परंतु अुद्वेगाची गोष्ट अशी की, सोमनाथावरील ह्या महंमदाच्या स्वारीविषयी लिहिताना केवळ परकीय अितिहासकारांनीच नव्हे, तर अनेक कृतघ्न हिंदू अितिहासकारांनीही त्या पुजारीमंडळाच्या आणि हिंदुसमुदायांच्या आपल्या देवावरील भाबड्या भक्तीचा अुपहास काय तो केलेला आहे. परंतु आपल्या राष्ट्रीय सन्मानार्थ आणि आपल्या धर्माच्या संरक्षणार्थ झुंजत त्या सहस्त्रावधी हिंदुधर्मवीरांनी आपल्या प्राणांचे जे भव्य बलिदान केले त्यांचा मात्र, काडीअितकाही गौरव केलेला नाही. तथापि रत्नांची पारख गाजरपारख्यांना झाली नाही तर तो दोष काही त्या रत्नांचा नसतो.

त्या हिंदूंच्या भक्तीविषयी योग्य ते दूषणही देणे जरी अपरिहार्य असले तरीही ज्यांना त्या दूषणासाठी अुपहास करावासा वाटतो. त्यांना हेही पण तेथेच बजावून सांगावयास पाहिजे की, आपल्या देवतेच्या जाज्वल्यतेविषयी आणि सामर्थ्याविषयी हिंदूंची जी श्रद्धा होती ती फार फारतर भाबडी होती अितकेच काय ते म्हणता येअील. पण दुसऱ्याच्या धर्मावर अत्याचारी शस्त्रबळाने आक्रमण करून निरागस स्त्री-पुरुष, बाल वृद्धांना 'माझ्या देवाची - अल्लाची भक्ती करतोस, मुसलमान होतोस, की ठार मारू ?' अशी प्रत्येकी धमकी देअून जो जो मुसलमान होण्यास नाकारी त्याचा त्याचा शिरच्छेद करीत पिसाळल्याप्रमाणे धावणाऱ्या मुसलमानांच्या अधर्मभक्तीसारखी, ती हिंदूंची त्यांच्या देवावरील भक्ती, राक्षसी, धर्मांध, रक्तपिपासू आणि आपल्या देवालाच दैत्य बनविणारी तरी नव्हतीच नव्हती ! पण तसे ठणकावून सांगण्याचे धैर्य मात्र, केवळ हिंदूंच्याच भक्तीचा तेवढा अुपहास करणाऱ्या ह्या अुथळ नि भित्र्या लेखकांना झाले नाही ! पुन्हा, सोमनाथादि हिंदूंच्या मूर्तींचा नि देवालयांचा जेव्हा जेव्हा महंमदासारख्या मुस्लिम सेनानींनी विध्वंस केला तेव्हा तेव्हा ज्या मुसलमान तवारिखकारांनी नि मुल्ला मौलवींनी वल्गना केल्या आहेत की, ''पहा ! ह्या तुमच्या मूर्ती आम्ही फोडल्या, पण तुमच्या देवाची आमचा हात धरण्याची छाती झाली नाही ! म्हणून तुमचा देव खोटा ! आम्हा मूर्तिभंजक मुसलमानांचा देव, 'अल्ला' च काय तो खरा !'' पण ह्या वल्गनांचीच कसोटी खरी मानायची तर मुस्लिम धर्म न मानणाऱ्या नि 'अल्लास धिक्कारणाऱ्या चेंगीझखानाने नि त्याच्या अुत्तराधिकारी पुरुषांनी जेव्हा प्रत्यक्ष खलिफाच्या राजधानीत घुसून, ती अुद्ध्वस्त करून, त्याला ठार मारून, ज्याला 'अल्लाचे घर' म्हणून मुसलमान समजतात त्या त्यांच्या कित्येक मशिदींना जाळून टाकले, बायबलांची राख केली, अितरांना आपल्या घोडशाळा बनवून सोडले आणि कुराण ग्रंथांना तर घोड्याच्या पायाखाली तुडविले तेव्हा अल्लाही त्या चेंगीझखानादिकांचा हात धरू शकला नाही ! अशा शेकडो प्रसंगावरून आपला अल्लाही दुबळा नि खोटा आहे, असे मानावयास त्या वल्गना करणारे ते मुसलमान सिद्ध आहेत काय ? अितके लांब तरी कशाला जा ! सोमनाथसारख्या अनेक हिंदू देवतांच्या मूर्ती मुसलमानांनी फोडल्या आणि ते विजयी झाले म्हणून जर मूर्तिपूजक (बुतपरस्त) धर्म खोटा नि मूर्तिभंजक (बुत्‌शिकन) धर्म खरा, असे मानावयाचे तर बुत्‌शिकन असणाऱ्या अफझुलखान नावाच्या अेका मुस्लिम सेनानीचे मस्तक कापून ते तुळजापूरच्या भवानीच्या मूर्तीस 'बत्तीस दाताच्या बोकडाचे मुंडके' नैवेद्य म्हणून जेव्हा शिवाजीने अर्पिले तेव्हा त्याचाही हात अल्ला धरू शकला नाही ! अशा अनेक प्रसंगांच्या आधारे मूर्तिपूजक धर्मच खरा असेही का म्हणू नये ?

सोमनाथाचे मंदिर फोडल्यानंतर तेथील अपार लूट अुंटांवर लादून सुलतान महंमद गझनीस परत जाण्यास निघणार तोच त्यास बातमी कळली की सोमनाथाच्या विध्वंसामुळे भिअून जाण्याचे अैवजी हिंदुजनता अुलट अधिकच चवताळली आहे ; आणि त्याचा परतण्याचा अपेक्षित मार्ग अडवून माळव्याचा राजा हा आपले सैन्यासह त्याच्याशी लढाअी देण्यास रणात अुतरलेला आहे. ह्या नव्या संग्रामाचा धोका ओढवून घेण्यास महंमद या वेळेस सिद्ध नव्हता. म्हणून तो आधीच मिळविलेला जय पदरात पाडून घेअून नि माळव्याकडील अपेक्षित मार्ग टाळून सिंधच्या वाळवंटातील दुर्गम पण अनपेक्षित अशा मार्गाने परतला. या वाळवंटातून जाताना त्याच्या सैन्याला पुष्कळ दुर्दशा नि कष्ट सोसावे लागले. गझनीस पोचल्यानंतर तीन-चार वर्षातच सन १०३० मध्ये सुलतान महंमद मरण पावला.

गझनीच्या ह्या पराक्रमी पण धर्मोन्मत सुलतानाने हिंदुस्थानावर मोठमोठ्या अशा पंधरा तरी स्वाऱ्या केल्या. हिंदूंनीही त्याच्या त्या स्वाऱ्यांत त्याला रणांगणामध्ये वारंवार निकराचे सामने दिले, पण त्याचा पराभव असा कोणीही हिंदू राजा करू शकला नाही. तथापि, महंमदाच्या ह्या स्वाऱ्यांमुळे नि नुसत्या राजकीय विजयांमुळे हिंदूंची अितकी चिरकालीन

हानी झालेली नव्हती की जितकी त्याने जे लक्षावधी हिंदूंचे वायव्य प्रांतात नि पंजाबात बलात्काराने धर्मांतर घडवून आणले, जी हिंदुराज्ये जिंकली ती हिंदूंनी लवकर वा अुशिरा पण पुन्हा जिंकून घेतली हे पुढच्या अितिहासावरून स्पष्टच आहे. परंतु त्याने लक्षावधी हिंदूंना जे मुसलमान करून टाकले त्यांना मात्र हिंदूंना पुन्हा धार्मिक दृष्टीने जिंकता आले नाही. आम्हांला आमच्या राष्ट्राचा प्रदेश स्वतंत्र करून आमचे गेलेले राज्यबळ परत जिंकता आले, पण हिंदुराष्ट्राची झालेली संख्याबलाची हानी काही आम्हाला भरून काढता आली नाही.

## धर्मांतर म्हणजेच राष्ट्रांतर

त्या काळच्या हिंदूसमाजाच्या नि हिंदूधर्माच्या धुरीणांच्या मते कोणकोणते आचार शास्त्रशुद्ध असत आणि कोणकोणत्या दुराचारांमुळे किंवा सदाचारांच्या लोपामुळे हिंदू हा धर्मभ्रष्ट समजला जाअी, याविषयीच्या आणि त्या भूतकालीन हिंदू-मुस्लिम महायुद्धामध्ये मुसलमानांनी बलात्काराने केलेल्या हिंदूंच्या भ्रष्टीकरणाशी ज्यांचा अत्यंत घनिष्ठ संबंध आहे, अशा काही त्या वेळच्या हिंदूंच्या धार्मिक समजुतींसंबंधी आम्ही पुढे थोडी चर्चा करणार आहोत. येथे अितकेच सांगतो की, त्या हिंदुराष्ट्राला परिणामी अत्यंत घातक ठरलेल्या तत्कालीन हिंदूसमाजाच्या जातिभेद, विटाळवेड, धर्मसहिष्णुतेची विकृती अित्यादी विक्षिप्त धर्मभ्रमामुळेच मुसलमानांनी बळाने बाटविलेले लक्षावधी हिंदु मुसलमानचे मुसलमानच राहिले. अितकेच नव्हे, तर त्या बाटविलेल्या हिंदूंची संख्या पिढीमागून पिढीने वाढत गेली. त्यातही त्या पुढच्या पिढ्या जन्मतःच मुस्लिम संस्कारांत वाढल्या गेल्यामुळे कट्टर मुसलमान बनत गेल्या! अितके कट्टर मुसलमान की पुढे हिंदुस्थानावर अिराणी, तुर्क, मोंगलादि परकीय मुसलमानांच्या या वायव्य दिशेकडून ज्या टोळधाडी वारंवार येत गेल्या त्यांच्या सैन्यांत याच बाटग्या मुस्लिमांच्या नव्या नव्या पिढीतील सहस्त्रावधि लोक भरती होत गेले आणि त्या परकीय मुसलमानां अितक्याच त्वेषाने नि द्वेषाने 'हिंदु काफिरांचा' समूळ विध्वंस करण्यासाठी आणि त्यांना बळाने बाटवून मुसलमान करण्यासाठी हिंदुराष्ट्रावर तुटून पडू लागले. वानगीसाठी अेकच अुदाहरण शतावधि अशा घटनांतून देअू. ज्या काळाची नि प्रदेशाची आम्ही चर्चा करीत आहोत त्या सिंधूपलीकडच्या भागातच घुरी नावाची हिंदू जात अशाच परिस्थितीच्या पेचात बाटून मुसलमान केली गेली. पण पुढे काही काळाने तीच जात हिंदूंची कट्टर वैरी बनली. कुख्यात हिंदुद्वेषी सुलतान महंमद घोरी ह्याच घुरी जातीचा होता. वस्तुतः अफगाणिस्थान, पठाणिस्थान, बलुचिस्थान, येथील मुसलमान जनतेतील बहुसंख्य मुसलमान हे त्या त्या प्रांतांतील मुळचे निवासी जे हिंदूलोक त्यांचेच बाटविलेले वंशज होते. पण आपले पूर्वज कधी काळी हिंदू होते याची लवलेश जाणीव त्यांना पुढे पुढे अुरलेली नसे. अितकेच नव्हे, तर ती जाणीव कोणी दिली तर त्यांची त्यांना चीड येअी. 'मागचे काय असेल ते असेल, आज तरी आम्ही जन्मतःच अिस्लामचे पाअीक आहोत, मुसलमान राष्ट्राचेच अंगभूत आहोत. हिंदू काफिरांशी आमचा आता तरी हाडवैरावाचून कोणताही संबंध नाही' अशा धर्मांध दुर्भावनेने ते भारावून गेलेले असत त्यांचे नुसते धर्मांतरच झालेले नव्हते, तर अशा धर्मांतराचा जो अपरिहार्य परिणाम पिढीमागून पिढीने बाटग्या लोकांवर होत जातो तो होअून त्या बाटग्या हिंदूंच्या वंशजांचे राष्ट्रांतरही होत गेले. हिंदूस्थानावरील थेट रामेश्वरापर्यंत झालेल्या पहिल्या पहिल्या मुसलमानी आक्रमणाच्या ज्या पाच - सहा शतकांविषयी आम्ही येथे लिहीत आहोत त्या काळच्या परिस्थितीत अेकंदरीत आजचे धर्मांतर म्हणजेच अुद्याचे राष्ट्रांतर ठरत गेले.

## पण येथे धर्म शब्दाचा अर्थ
## तरी कोणता?

पण धर्मांतर म्हणजेच राष्ट्रांतर, ह्या वरील सूत्रात धर्म नि धर्मांतर शब्द काय अर्थी योजलेले आहेत, ते स्पष्टपणे सांगितले पाहिजे. निरनिराळ्या धर्मातील किंवा स्वतंत्र दर्शनांतील तत्वज्ञानाचे तुलनात्मक चिंतन करणे किंवा त्यांत जे स्वीकार्य वाटेल असे दर्शन आपल्या व्यक्तीपुरते स्वीकारणे, अशा अर्थी काही वरील सूत्रात धर्म आणि धर्मांतर हे शब्द योजले नाहीत. अमुक पुस्तक अीशप्रेषित आहे, त्याच्या दोन पुठ्ठ्यात जें काही सांगितलेले आहे तें, तें आणि तें, तेंच काय तें धर्म्य आहे आणि अितर सर्व असत्य नि पापमय आहे, अशा अभिनिवेशाने जी धर्मसंस्था त्या धर्मग्रंथातील तथाकथित

तत्वज्ञानच नव्हे, तर आचार, विचार, निर्बंध (कायदे), व्यवहार, भाषा अित्यादी गोष्टी तदितर धर्मसंस्थांच्या अनुयायांवर अुपदेशाने न साधले तर कपटाने, क्रौर्याने नि बलात्कारानेही लादण्यास अनमान करीत नाही, त्या धार्मिक बलात्कारासही धर्म्यच समजते, अशा आक्रमक संस्थांच्या धर्मास अुद्देशूनच काय तो वरील सूत्रात धर्म शब्द वापरलेला आहे. अशा आततायी धर्मसंस्थांनी तदितरांचे केलेले जे धर्मांतर तेच परिणामी त्या तदितरांचे राष्ट्रांतर ठरते.

## जातीय बहिष्काराचे प्रत्यस्त्र

मुस्लिमांच्या त्या धार्मिक आक्रमणाचा प्रतिकार करील असे रामबाण प्रत्यस्त्रच हिंदूंना सापडेना! जे 'जातिबहिष्कारा'चे प्रत्यस्त्र म्हणून त्यांनी त्या मुस्लिमांच्या धार्मिक आक्रमणांचा प्रतिकार करण्यास सोडले ते त्यांच्याच अंगावर अुलटले!

ह्या 'जातिबहिष्कारा' च्या प्रत्यस्त्राची त्या हिंदू-मुस्लिम धर्मयुद्धाशी संबद्ध असलेल्या स्वरूपापुरती तरी कल्पना येण्यासाठी आणि त्याचा स्वधर्मरक्षक अुपयोग होण्याच्या ठायी स्वधर्मघातक अुपायच कसा होत गेला, ते लक्षात यावे म्हणून प्रथमतः जन्मजात जातिभेदाचीच कहाणी, अगदी संक्षिप्तपणे का होअीना, पण सांगणे हे हिंदूंच्या मुसलमानांनी केलेल्या भ्रष्टीकरणाची फोड करावयाची तर अपरिहार्य आहे.

## जन्मजात जातिभेदाची प्रथा आणि जातिबहिष्काराचा राष्ट्रीय दंड

मुसलमानांच्या स्वाऱ्या हिंदूंवर होअू लागल्या त्याच्या पुष्कळ आधीपासून म्हणजे हिंदूंनी हूणांचा नायनाट केल्यापासून हिंदू समाजाची आणि राष्ट्राची राजकीय सामाजिक आणि धार्मिक स्थिरस्थावरता पुन्हा अेकदा करण्याचा राष्ट्रीय प्रमाणावर मोठा सर्वांगीण प्रयत्न हिंदूंच्या शतावधी नेत्यांनी चोहोबाजूंनी भरतखंडभर चालू केला होता. त्या वेळी हिंदुराष्ट्राचे राजकीय नेतृत्व त्या काळीच अुदयास येअू लागलेल्या आणि वैदिक हिंदुधर्माचे कट्टर भक्त असलेल्या रजपुतांच्या प्रतापशाली राजघराण्यांकडे आलेले होते. त्या नवरचनेच्या प्रयत्नातच ह्या विशाल हिंदुसमाजाची घडी जातिभेदाच्या चौकटीत चोपून बसविली जात होती. हळूहळू पण अपरिहार्यपणे त्या जातिभेदाच्या प्रथेलाच जन्मजात जातिभेदाचे स्वरूप प्राप्त झाले. पूर्वीच्या चार वर्णांतच नव्हे, तर त्या चार वर्णांच्या पोटातून आणि अवांतर जातिप्रवाहांचीही त्यांत भर पडत पडत शेवटी बळकटपणे नि शास्त्रसंमतपणे, अितकेच नव्हे, तर जवळ जवळ सर्वसंमतपणे चार सहस्त्र जन्मजात जातींत हे हिंदुजगत् सामाजिक नि धार्मिकदृष्टया अंतर्गततः विभागले गेले. अेकप्रकारे हे त्या वैदिक हिंदुराष्ट्राचे सामाजिक स्थित्यंतर, त्या कालाच्या अैतिहासिक आवश्यकतेमुळेच घडले गेले.

जो ज्या जातीत जन्मला तोच काय तो त्या जातीत राहू शकेल हे ह्या जन्मजात जातिभेदाचे अेक मूळ सूत्र होते. दुसऱ्या जातीशी अन्नव्यवहार करणे वा दुसऱ्या जातीचे पाणी पिणे ही कृत्ये सुद्धा बहुतेक जातींमध्ये दंडनीय समजली जात. मग जातीजातीत मुली देण्याघेण्याची अत्यंत कडक बंदी होती, हे काय सांगावयास पाहिजे? त्या काळातील ह्याच निरनिराळ्या जातिसंस्कार म्हणून मानलेल्या 'धर्माचारांना' आम्ही लोटीबंदी, रोटीबंदी, बेटीबंदी, स्पर्शबंदी, आणि ज्या विषयी आम्ही आता पुढे सांगणारच आहोत ती शुद्धिबंदी, सिंधुबंदी अित्यादी सात नावे आमच्या जातिभेदावर लिहिलेल्या अनेक लेखांतून दिलेली आहेत. हिंदूंच्या प्रगतीलाच नव्हे, तर गतीला सुद्धा पायबंद घालणाऱ्या या सात बंद्या म्हणजे सात बेड्याच होत्या. त्या बेड्या आपल्या हिंदुराष्ट्राच्या पायात ख्रिश्चन किंवा मुस्लिम किंवा अितर कोणा परराष्ट्रीय म्लेंच्छाने बळाने ठोकलेल्या नव्हत्या, तर त्यांना हिंदूनीच आपण होअून अेका बुद्धिभ्रंशाच्या लहरीत, स्वधर्मरक्षक तोडगा म्हणून आपल्या पायात ठोकून घेतलेल्या होत्या! म्हणून तर आम्ही त्यांना विदेशी बेड्या न म्हणता 'सात स्वदेशी बेड्या' म्हणून आमच्या लेखातून नि भाषणांतून संबोधीत आलेलो आहोत.

जन्मजात जातिभेद या संस्थेसंबंधी सर्वांगीण चर्चा येथे करण्याचे काही कारण नाही. ज्यांना या संस्थेविषयी आमचे विचार जाणावयाचे असतील त्यांनी ''जन्मजात आत्युच्छेदक निबंध'' या नावाचा आम्ही लिहिलेला या विषयावरील समग्र प्रबंध वाचावा. येथे आमच्या परधर्मीय शत्रूंच्या धार्मिक आक्रमणाविषयी चर्चा करताना जितका आवश्यक तितकाच अुहापोह खाली करीत आहोत.

प्रथमत: हिंदुसमाजाच्या विशाल संघटनास नि आश्चर्यकारक स्थैर्यास ती जन्मजात जातिभेदाची प्रथा काही परिस्थितीत नि काही प्रकरणी कारणीभूत झालेली असली पाहिजे, हे विसरता कामा नये. या संस्थेचे महत्वमापन करताना शेवटी शेवटी तिच्यापासून होणाऱ्या दुष्परिणामांनाच तेवढे दाखविणे निव्वळ कृतघ्नपणाचे होअील.

आपले सामाजिक बीज, रक्त, जातिजीवन नि परंपरा शुद्ध राहावी, संकराने विकृत होअू नये, यासाठी त्या त्या काळच्या हिंदुधर्मीयांनी हिंदुराष्ट्राच्या हिताच्याच बुद्धीने ही जन्मजात जातिभेदाची प्रथा निर्मिली किंवा स्वयंप्रेरणेने निर्मू दिली, हेही मान्य केले पाहिजे.

अनुवंशविज्ञान, श्रमविभागात्मक अर्थकारण, सामुदायिक सहजीवन नि सामुदायिक नीती अित्यादी तत्वांचाही त्या काळी स्मृतिकारांना आकळला तेवढा दूरदूर विचार त्या संस्थेच्या रचनेत अनुस्यूत केला होता. सहस्त्रावधि वर्षे होअून गेली; सहस्त्रावधि संकटे येअून गेली; पण तथाकथित स्पृश्य काय किंवा अस्पृश्य काय, कोट्यानुकोटी हिंदूंच्या मनावर ह्या जातिभेदाच्या संस्थेने जो प्रभाव, जो मोह पाडलेला होता आणि अगदी परिया, भंगी, कोळी, भिल्ल, वैश्य, जाट, क्षत्रिय, ब्राह्मण अित्यादी हिंदूंच्या जातींच्या आणि त्यांच्या सहस्त्रावधी पोटजातींच्या श्रद्धेप्रमाणे त्यांचे ते मर्यादित जातिधर्म हेच आपले अैहिक नि पारलौकिक कल्याण साधणारे, देवाची कृपा संपादणारे नि आपापल्या संसारास पवित्र करणारे सदाचार आहेत, असा जो अेकनिष्ठ विश्वास, हिंदुजगतात अुत्पन्न झालेला होता तो ह्या जातिभेदाच्या संस्थेची पाळेमुळे शतकानुशतके हिंदुराष्ट्राच्या ह्या सर्व जातिजीवनक्षेत्रांतून अत्यंत खोल शिरलेली असल्यावाचून आणि त्यांतून संचरत राहिलेल्या जीवनरसाने त्या असंख्य भिन्न जातिसमूहामुळे विच्छिन्न दिसणाऱ्या ह्या राष्ट्राला आतून कोणत्या तरी अेकात्म सत्वाच्या आणि स्वत्वाच्या अदम्य भावनेने प्रस्फुरित केलेले असल्यावाचून, तसा कदापि अुत्पन्न होअू शकता ना. ह्या वरवर विभिन्न दिसणाऱ्या जातिभेदाच्या स्वायत्त पण संयुक्त संघाला ज्या आंतरिक, अंतर्यामी नि अनावर अशा अेकात्मभावनेने असे अेकजीव केलेले होते, त्या राष्ट्रीय भावनेचेच नाव होते -हिंदुत्व! हिंदुधर्म!

ज्या स्पर्शबंदी, रोटीबंदी, बेटीबंदी, अित्यादी त्या काळाच्या मुख्य धर्माचारांना आम्ही आज 'सात स्वदेशी बेड्या' म्हणतो आहोत, ते धर्माचार मुसलमानांची धार्मिक आक्रमणे चालू झाली, त्याकाळच्या अनेक शतकेपर्यंत हिंदूसमाजास त्याला जखडून टाकणाऱ्या 'बेड्या' वाटत नव्हत्या; तर, स्वत:च्या राष्ट्रदेहाने धारण केलेली रत्नखचित नि अभिमंत्रित रक्षाबंधने वाटत असत. प्रत्येक जात, मग ती ब्राह्मणाची असो वा भंग्याची असो, आपल्यापुरता आपल्या जातीचा पूर्ण अभिमान धरीत असे.

हिंदूंच्या ह्या जातीजातीत जर कोणाकडून काही जातीय आचारांचा कळत नकळत भंग झाला, कोणी दुसऱ्या जातीच्या हातचे पाणी प्याला किंवा दुसऱ्या जातीच्या व्यक्तीशी शरीरसंबंध जाणूनबुजून किंवा अजाणपणे केला तर अशा कोणत्याही जातिधर्माविरूद्ध जाणाऱ्या अपराधी हिंदूला त्या काळी जो अतिशय कडक दंड देण्यात येअी तो म्हणजे जातिबहिष्कार हा होय.

हा जातिबहिष्कार शब्द आज आपण सहजगत्या निर्भयपणे अुच्चारू शकतो. पण त्या मुसलमानांच्या धार्मिक आक्रमणाच्या काळी आणि त्यानंतर अनेक शतके हिंदूसमाजातील कोणत्याही व्यक्तीला, कुटुंबाला वा वर्गाला जातिबहिष्काराच्या दंडाचे नांव काढताच धसका बसल्यावाचून राहात नसे आणि ज्या हिंदूला जातपंचायतीकडून किंवा शंकराचार्यादिकांच्या धर्मपीठाकडून जातिबहिष्कार झाल्याचा दंड देण्यात येअी तो हिंदू राजमुकुटधारी असला तरी चळचळा कापत असे! जात अंतरणे म्हणजे जग अंतरणे, जीवन अंतरणे, अितका दु:सह परिणाम भोगावा लागे. प्रत्यक्ष आई-बाप, रक्ताचे बंधु-बांधव सुद्धा त्या जातिबहिष्कृतास अकस्मात् अंतरले जात. संक्षेपत: येथे अितके सांगणे पुरे आहे की, कोणत्याही देहदंडापेक्षा किंवा आर्थिक दंडापेक्षाही त्या कालच्या स्वधर्मनिष्ठ हिंदूंना जातिबहिष्काराच्या दंडाची भीती अधिक असे. आणि त्यामुळेही जातीजातींचे शास्त्रस्मृतिमर्यादित आणि व्यवस्थित असे जे रूढ झालेले आचार असत ते आपण होअून काटेकोरपणे पाळण्याची प्रवृत्ती हिंदूसमाजात पिढ्यान पिढ्या अगदी अंगी मुरत असलेली होती.

जातिभेदप्रथेच्या हिंदू जगताला बळकटी आणणाऱ्या नि जीवनावर दूरवर प्रभाव पाडणाऱ्या स्वरूपाविषयी वरील प्रकारचे आणखी कितीही अुल्लेख जरी आम्ही कृतज्ञपणे करू शकलो तरीही मुसलमानांच्या धार्मिक आक्रमणाचा आरंभ होताच त्या जातिभेदांच्या प्रथेमुळे नि तिच्याविषयीच्या हटवादी अभिमानामुळे हिंदूजगताची जी अपरिमित हानी झाली त्याविषयी त्या जातिभेदाच्या प्रथेवर अवश्य तितकी कडक टीका न करणे म्हणजे त्यांत आमच्या हिंदूजगताशी कृतघ्नपणा करण्यासारखे होणार आहे.

मुस्लिमांच्या धार्मिक आक्रमणाला हाणून पाडणारे धार्मिक प्रत्याक्रमण करण्याच्या कार्यी ह्या जातिभेदाच्या बोथट साधनांचा आम्हा हिंदूंना काहीही अुपयोग झाला नाही; अितकेच नव्हे, तर ह्या जातिभेदाच्या धर्माचारापायीच हिंदूधर्मावर नि हिंदुराष्ट्रावर ह्या धर्मांतराच्या संघर्षात मोठी अनर्थपरंपरा कोसळून कोटी कोटी हिंदूंना बाटविणे हे मुसलमानांस अत्यंत सोपे गेले आणि मुसलमानांना हिंदू करून घेणे हे तर हिंदूंना सर्वतोपरी अशक्य होअून बसले, हे सत्य काही नाकारता येणार नाही.

हिंदुस्थानात येण्याच्या आधी अरबादि मुसलमानांनी अिराण, तुराण, मध्य आशियातील राष्ट्रे, आफ्रिकेतील अिजिप्तपासून स्पेनपर्यंतची राष्ट्रे ह्यांमधील ज्या ख्रिश्चन, अिझरायेल, पारसिक अित्यादी अिस्लामेतर धर्मीयांच्या लक्षावधि अनुयायांना सशस्त्र बलात्काराने मुसलमान होणे भाग पाडलेले होते. त्यांच्याकडूनही त्यांनी अत्याचारी नि बलात्कारी साधनांनीच धर्मांतर करविले होते. तथापि नुसते मुसलमानांबरोबर अन्नव्यवहारिक संपर्क घडला म्हणून काही ते लोक मुसलमानी धर्मात आपण गेलो, आपण बाटलो, आपला मूळचा ख्रिस्ती वा अिझरायेल वा अितर स्वधर्म भ्रष्ट झाला आहे, असे मानीत नसत. त्या लोकांच्या डोक्यावर अिस्लामचे खड्ग शतकानुशतके सतत टांगत ठेवून त्यांच्याकडून वर दिलेले सर्व मुसलमानी धर्माचार बळाने करून घ्यावे लागत आणि त्यांच्यावर शंभर शंभर वर्षे राजसत्तेचा कडक, सशस्त्र आणि क्रूर पहारा ठेवावा लागे. जर क्वचित त्या काळात त्यातील अेखाद्या स्थानातून वा प्रांतातून मुस्लिम सत्ता अितर काही कारणाने नष्ट झाली तर ते बळाने मुसलमान केलेले ख्रिश्चनादि परधर्मीय लोक त्यांच्या मनातच आले तर अेका हुल्लडीसरशी परत मुसलमानधर्माचे हिरवे फडके फेकून देअून आपल्या पूर्वीचा धर्माचा ध्वज अुभारू शकत. या परिस्थितीमुळे अशा ख्रिस्ती, अिझराअेल प्रभृति धर्माच्या बाटविलेल्या लोकांना मुस्लिम धर्मातच डांबून ठेवणे हे मुस्लिम राजशक्तीलाही फारच कठीण गेले आणि शतकानुशतके त्या बाटविलेल्या लोकांना, मुसलमानी धर्माविरूद्ध हालचाल होते की काय आणि ते स्वधर्मात परत जाण्यासाठी बंडबिंड करतात की काय, हे डोळ्यांत तेल घालून मुसलमानांच्या सशस्त्र सैन्यांना पाहत बसावे लागे.

अुलटपक्षी, जेथे स्वतः मुस्लिमांवर असाच धर्मांतराचा प्रसंग ओढवला आणि स्पेन, ग्रीस, सर्व्हिया अित्यादी देशांप्रमाणे, "ख्रिश्चन धर्म' स्वीकार! नाही तर मुसलमान जातची जात सरसकट शिरच्छेद करून नष्ट करून टाकू!" अशी धमकी देअून लाखो मुसलमानांना बळाने ख्रिश्चन करण्यात आले, तेव्हा त्या धर्मांतरित मुसलमानांवरही त्या ख्रिश्चन राजसत्तांना असाच सक्त आणि प्रसंगी सशस्त्र पहारा ठेवावा लागत असे. कारण, मुसलमानही केवळ ख्रिश्चनांच्या हातचे अन्न खाल्ले किंवा त्यांच्याशी शरीरसंबंध जोडला गेला म्हणजे आपण नित्याचे बाटलो, ख्रिश्चन झालो असे मानणारे नव्हते. ते ख्रिश्चनांनी बळाने बाटविलेले मुसलमान ख्रिश्चनांची राजसत्ता कुठे ढिली झाली आणि त्यांची शस्त्रशक्ती नष्ट झाली तर तत्काळ बंड करून, दिसेल त्या हिरव्या फडक्याचा ध्वज अुभारून ख्रिश्चन धर्माचे जूं झुगारून देत आणि मुसलमानी धर्म परत स्वीकारीत. अितकेच नव्हे, तर तेथील अितर ख्रिश्चनांना शक्य तर अिस्लामी धर्मात बळाने कोंबून त्यांनी केलेल्या अत्याचाराचा सूड घेत.

ह्याच अनुभवामुळे हिंदूंनाही बळाने मुसलमान केल्यानंतर आपणाला सैन्यशक्तीनेच काय ते शतक दोन शतक तरी त्या हिंदूंना मुसलमानी धर्मात डांबून ठेवावे लागेल, असे अरबादि प्रारंभिक मुसलमान विजेत्यांना प्रथम प्रथम भय वाटत होते. परंतु, जेव्हा सिंधवर मुसलमानांनी स्वारी केली आणि हिंदू लोकांना सशस्त्र आक्रमण करून बाटविण्याचा, मुस्लिम करण्याचा प्रारंभ केला, तेव्हा त्यांच्या लवकरच लक्षात आले की ह्या हिंदू लोकांचा स्वधर्माभिमान आणि स्वधर्मनिष्ठा

ही जरी जगातील कोणत्याही धर्माच्या अनुयायांअितकी, किंबहुना काही प्रकरणी त्याहूनही कट्टर असली, अदम्य असली आणि त्यामुळेच हिंदूंना मनाने मुसलमान करणे हे जरी अत्यंत कठीण काम असले तरी त्यांना शरीराने मुसलमान करणे हे कार्य अतिशय सोपे आहे.

ही गोष्ट केवळ मुसलमानांच्या धार्मिक आक्रमणाचे काळाला लागू होती असे नव्हे, तर मुस्लिम धर्माच्या जन्मापूर्वीही ज्या सीरियन ख्रिश्चनांना मलबारमध्ये हिंदू राजांच्या औदार्यामुळे अिसवी सनाच्या पहिल्या चार शतकांचे आत आश्रय दिला गेला आणि ज्या ख्रिश्चनांनी हिंदूंना बाटविण्यास आरंभ केला त्या ख्रिश्चनांनाही ही गोष्ट कळून चुकली होती की हिंदूंना नुसते अन्नाचा घास तोंडात कोंबूनही 'बाटविणे' शक्य आहे किंवा विहिरीवर पाणी भरतात त्या जलाशयात ख्रिश्चनांचे अुष्टे पाव, बिस्किट, गोमांसाचे खंड (तुकडे) असे पदार्थ टाकले की ते पाणी प्यालेले सारेच्या सारे हिंदू त्या अन्न-जल-सहवास-संपर्काने जन्माचे बाटले जातात. त्यांना पुन्हा हिंदुधर्मात कोणी घेत नाही.

पुढे पंधराव्या-सोळाव्या शतकात पोर्तुगीजादि युरोपियन, ख्रिश्चन, सैनिक सामर्थ्यासह हिंदुस्थानात समुद्रमार्गे घुसले तेव्हा त्यांनाही हिंदूंच्या वर दिलेल्या सर्व विटाळवेडाच्या रूढी नि धर्ममोळेपणा पाहताच मोठा आनंद झाला आणि अशा या वेडगळ हिंदूंचे सारे हिंदूस्थान आता बोलता बोलता ख्रिश्चन करून टाकू, अशा निर्धाराने ते हुरळून गेले.

## बाटविलेल्यांच्या पायात शुद्धिबंदीची बेडी ठोकली!

परराष्ट्रांची राजकीय आक्रमणे हाणून पाडणारि अमोघ शस्त्रे हिंदूंच्या शस्त्रागारात पूर्वीपासूनच सज्ज असत. शत्रूच्या खड्गास खड्ग भिडवून हिंदूंनी तशी राजकीय आक्रमणे यशस्वी रीतीने अनेकदा हाणूनही पाडलेली होती. परंतु परकीयांच्या ह्या धार्मिक भ्रष्टीकरणाच्या आक्रमणास हाणून पाडणारा खड्ग हिंदूंच्या शस्त्रागारांत त्या काळी तरी मुळातच नव्हता. त्यामुळे त्यांच्या त्या शस्त्रागारात त्यांना त्या काळी अेकमेव काय तो अुपलब्ध असणारा हा जातिबहिष्काराचाच खड्ग अुपसून ते हिंदू ह्या धार्मिक भ्रष्टीकरणाच्या अभूतपूर्व मुस्लिम आक्रमणावर तुटून पडले. ज्या ज्या हिंदूंना मुसलमान बलात्काराने बाटवीत चालले त्यांच्या त्यांच्यावर हिंदूंनी जातिबहिष्काराच्या त्यांच्यातल्या त्यांच्यात चालू असलेल्या रूढीप्रमाणेच कडक बहिष्कार घातला. बळाने बाटविलेल्या हिंदूंची संख्या, मुसलमान पंजाबपर्यंत चढाअी करून येअितो, लक्ष लक्ष झाली असताही, आणि त्यापैकी अनेकांना परत हिंदुधर्मात येण्याची अिच्छा असताही, हिंदूंच्या ह्या जातिबहिष्काराच्या कठोर दंडविधानात हिंदुधर्मात किंवा समाजात शुद्ध होअून परत येता येण्याचा कोणताही मार्ग, कोणताही प्रायश्चित्ताचा पर्याय हिंदुसमाजाने अुघडा ठेवला नव्हता, अुपलब्ध ठेवला नव्हता. ही गोष्ट त्यांच्या त्या काळच्या आपापसातील जातीय प्रकरणांच्या रोटीबंदी, बेटीबंदी अित्यादी बेड्यांतील विचारसरणीला अितकी धरून होती की, जो हिंदू 'बाटून' अेकदा मुसलमान झाला त्याला आजन्म पुन्हा शुद्ध होअून परत हिंदुधर्मात येणे अशक्य करणारी ही 'शुद्धिबंदी' मानवी बेडीही, अगदी सहजपणे आणि तिच्या परिणामांची कोणतीही छाननी न करता त्या पूर्वीच्या बेड्यांप्रमाणेच त्या जातिबहिष्कृतांच्या पायात हिंदुसमाजाकडूनच ठोकण्यात आली. त्याचाच अर्थ असा की हिंदुसमाजाच्या स्वत:चा पायातही ती शुद्धिबंदीची बेडी आपसूकच ठोकली गेली. बाटविलेल्यांना जातिबहिष्काराचा दंड देअून हिंदुराष्ट्राच्याच पायावर कुऱ्हाड मारून घेतली!!

मुसलमानांच्या हिंदूंना बळाने बाटविणाऱ्या भयंकर आक्रमणास पायबंद घालण्यासाठी हिंदुसमाजाने जातिबहिष्काराचा दंड देण्यास आरंभ केला. अर्थात जे कोणी हिंदू स्वार्थासाठी, सत्तेसाठी, संधिसाधुपणाने आपण होअून स्वधर्मद्रोहाचे महापातक करावयास सिद्ध झाले आणि मुस्लिम धर्म स्वीकारून बाटले, अशा बाटग्या हिंदूंनाच काय ते जातिबहिष्काराचा, हा कठोर दंड देणे अुचित आणि अुपयुक्त होते. कारण जातिबहिष्काराच्या भयामुळेही सामान्यत: कोणी हिंदू बाटण्यास आपण होअून सहसा सिद्ध होता ना. जातिबहिष्काराच्या दंडाचा प्रतिबंधक साधन म्हणून अितका अुपयोग काही अंशी होणारा होता; परंतु, तितका अुपयोगही जे आपण होअून मुस्लिम व्हावयास सिद्ध झाले त्या धर्मद्रोह्यांच्या प्रकरणी होता ना. कारण, त्यांची हिंदुजातीशी असणारी सारी बंधने त्या पाप्यांनी स्वेच्छेने

तोडून टाकली होती. पुन्हा अशा बाटग्या हिंदूंच्याही प्रकरणी शुद्धिबंदीची अगदी परिवर्तनीय शिक्षा जी दिली जाअी ती देणे आत्मघातकच होते. कारण, पुढे मागे त्या पतितांतील काही हिंदूंच्या मनात पुन्हा परत स्वधर्मात येण्याचे आले असते तर त्यांनाही शुद्ध करून घेण्याची काहीतरी संधी ठेवावयास हवी होती.

काही अर्थी स्वत: होअून जे हिंदू बाटले त्यांना तेवढा हा दंड योग्य होता.

परंतु अशा स्वेच्छेने मुसलमान झालेल्या हिंदूंची संख्या अत्यंत अल्प असे. लाखांत अेखादा अितकेच; आणि म्हणूनच, अत्यंत खेदाची गोष्ट ही की, ज्या असंख्यात लक्षानुलक्ष हिंदूंना केवळ सशस्त्र अत्याचारांनी नि बलात्कारांनीच काय ते मुस्लिम प्रपीडक बाटवू शकले त्या निरपराध लक्षानुलक्ष हिंदूंवरही ह्या जातिबहिष्काराचा नि शुद्धीबंदीचा क्रूर, कठोर नि स्वधर्मघातक दंडाचा वज्राघात केला गेला. मुसलमानांच्या अत्याचाराने आधीच विव्हळत असलेल्या आणि स्वधर्महानीने मरणासही कवटाळू पाहणाऱ्या त्या लक्षावधी हिंदू स्त्रीपुरुषांना हा आणखी अेक भूर्दंड दिला गेला! त्यांना जातिबहिष्कृत केले! त्याचे आअी - बाप, पति - पुत्र, सर्व आप्त त्यांना पुन्हा केव्हाही या मृत्यूलोकात तरी 'आपले' म्हणून आता स्वीकारणार नाहीत. आपल्याला 'शुद्ध होअून' पुन्हा हिंदू होण्याचा कोणताही मार्ग अुघडा नाही!

## जे चोर ते सोडून दिले
## आणि सावांना फाशी दिले!

जे लक्षावधी हिंदू स्त्रीपुरुष मुसलमानांच्या धार्मिक अत्याचारास नि बलात्कारास बळी पडले त्यांना, त्या निरपराधी लोकांनाही, जातिबहिष्काराचा असह्य दंड दिला गेला. पण ज्या अत्याचारी नि बलात्कारी मुसलमानांनी हे राक्षसी अपराध केले त्या अपराध्यांना मात्र हिंदूंनी मोठे भयंकर म्हणून फेकलेल्या त्या जातिबहिष्काराच्या प्रत्यस्त्राचा लवलेश अुपसर्ग झाला नाही. त्या खऱ्या अपराध्यांचा हिंदूच्या जातिबहिष्काराने अेक केसही वाकडा झाला नाही. चोराला सोडून दिले आणि सावांना फाशी दिले! अुलट जातिबहिष्काराची म्हणजेच ह्या शुद्धिबंदीची शिक्षा बळाने मुसलमान केलेल्या हिंदूंना दिली गेल्यामुळे मुसलमानांच्या धार्मिक आक्रमणास अगदी प्रत्यक्ष आणि प्रभूत सहाय्यच दिले गेले.

मागे सांगितल्याप्रमाणे ज्या ख्रिश्चन, यहुदी अित्यादी अहिंदू लोकांना मुसलमानांनी अितर राष्ट्रांत बाटविले होते त्यांना मुसलमानी धर्मांत डांबून ठेवण्यासाठी शंभर शंभर वर्षे सशस्त्र पहारा ठेवावा लागला. परंतु अिकडे हिंदुस्थानात येताच लाख लाख हिंदू स्त्रीपुरूषांना अत्यंत क्रूरतेने मुसलमान बनविले असताही त्यांना धर्मात डांबून ठेवण्यासाठी मुसलमानांना अवघे अेक दिवसच काय ते कष्ट पडत!

लढाअीत किंवा नगरानगरावरील सबळ सशस्त्र आक्रमणात अेका दिवसात जे सहस्त्रावधि हिंदू स्त्री-पुरूष बाटविण्याचे वा बलात्कारीचे कष्ट घ्यावे लागतील तेवढे काय ते त्या दिवसापुरते घेऊन मुसलमानांनी ते शतावधी वा लक्षावधी हिंदू अेकदा अन्न, संभोग, सहवासाने अेका दिवसात बाटवून टाकले, की पुन्हा, त्या अेका वा लक्षावधी हिंदूंना आजन्मच नव्हे, तर वंशपरंपरा मुसलमानी धर्मातच डांबून टाकण्याचे अत्यंत बिकट काम ते हिंदू लोक स्वत:च स्वत:चे धर्मकर्तव्य म्हणून करीत! कारण जातिबहिष्कृताची शुद्धिबंदी!!! जो हिंदू अेकदा बाटला तो जन्माचा बाटला!

पण अेका हिंदूचे बाटणे, मुसलमान होणे म्हणजे अेका माणसाचे राक्षस होणे होते. अेका देवाचे दैत्य होणे होते. हिंदू-मुसलमानांच्या त्या प्रलयभीषण महायुद्धाच्या सहस्त्रवर्षीय कालातील ही अगदी वस्तुस्थिती होती. कोणत्या प्रक्रियेने त्या बळाने बाटविलेल्या हिंदूंचे असे दैत्यीकरण किंवा राक्षसीकरण होअी ते अगदी थोडक्यात मागे दिलेलेच आहे.

तरीही हिंदूसमाजाचे डोळे अुघडले नाहीत. सामुदायिक प्रमाणात बोलावयाचे म्हणजे हिंदू लोकांतील ह्या शुद्धिबंदीच्या धार्मिक रूढीमुळे, आपण बाटवून मुस्लिम करून घेतलेल्या लक्षानुलक्ष लोकांना हिंदू लोकच केव्हाही परत हिंदू करून घेणार नाहीत, अशी मुस्लिमांची निश्चिती झालेली होती आणि म्हणून मुस्लिमधर्मरक्षणाची त्यांना चिंताच अुरलेली नसे. जात्यंतर आणि धर्मांतर ह्यांतील राष्ट्रघातक प्रभेद हिंदूसमाजाच्या शतकेनुशतके लक्षातच आला नाही!

हिंदूसमाजातील कोणा अेका जातीच्या - अुदाहरणार्थ, वैश्य जातीच्या मनुष्याने त्या काळच्या जातीच्या कोष्टकाप्रमाणे वैश्याहून कनिष्ठ समजल्या गेलेल्या दुसऱ्या अेखाद्या हिंदूसमाजातील जातीच्या अुदाहरणार्थ, शहरातील शिंपी, भंडारी अित्यादी - कोणा

मनुष्याशी रोटीव्यवहार केला किंवा बेटीव्यवहार केला तर वैश्य हिंदूला त्याची जात जशी 'वाळीत' टाकी, त्याच्यावर जातिबहिष्कार टाकी, त्याचप्रमाणे कोण्या हिंदूला ह्या नवीनच आलेल्या निधर्मी नि मूलतःच पतित असे मानल्या गेलेल्या म्लेंच्छ जातीच्या कोणा मनुष्यासह बळाने रोटीव्यवहार करावा लागला, पाणी प्यावे लागले किंवा पत्नीला त्या दुष्ट म्लेंच्छांनी बळाने बलात्कारून बाटविले असता, तिच्यासह स्वतःच मुसलमानांचा गुलाम केले गेल्याने राहावे लागले, अन्न-पाणी व्यवहार करावा लागला तर त्या हिंदूलाही त्याची मूळची जातच नव्हे, तर हिंदूंतील कनिष्ठातील कनिष्ठ जातीतही त्या वरील वैश्याप्रमाणेच वाळीत टाकीत, तो बाटला असे समजून त्या वैश्याप्रमाणे जातिबहिष्काराचा कठोरांतील कठोर दंड देअी. म्हणजे, हिंदूसमाजातील आपसाआपसा- तल्या जातीमध्ये कोणा हिंदूंचे वाळीत पडणे ही गोष्ट आणि कोणा हिंदूचे मुसलमानाशी हिंदूंच्या जातिधर्माविरूद्ध रोटीव्यवहार, बेटीव्यवहार अित्यादी संव्यवहार घडल्यामुळे जातिबहिष्कृत होत्साता तो मुसलमान होअून जाणे ही गोष्ट, ही दोन्ही कृत्येही हिंदूंना सारखीच वाटत. त्या दोन घटनांत असणारा आणि हिंदूंच्या सामुदायिक संख्याबलावर दूरवर हानिकारक परिणाम करणारा राष्ट्रीय विभेद त्या काळच्या हिंदूसमाजाच्या ध्यानातच आला नाही.

अेक हिंदू हिंदूसमाजातल्या अेका जातीने खाण्यापिण्याच्या दोषापायी वाळीत टाकला, तरी तो हिंदुसमाजाला मुकत नसे; हिंदुसमाजातील अितर अनेक जातीत तो मिसळून जाअी किंवा त्याला अनुकूल अशा समदुःख्यांची स्वतंत्रच अेक जात बनवी, पण ती जात हिंदूसमाजातच राहणारि असे, त्याचे जात्यंतर होअी, परंतु त्यापोटी सहसा धर्मांतर होत नसे, समाजांतर सुद्धा होत नसे, राष्ट्रांतर होत नसेच नसे. आपापसांत रोटीबंदी, बेटीबंदी प्रभृति जातीय धर्माचारांच्या घडणाऱ्या भंगापायी वाळीत पडणारे, जातिबहिष्कृत होणारे ते सहस्त्रावधी हिंदू, हिंदूसमाजाच्या कक्षेबाहेर पडत नसत. वरचेच अुदाहरण घ्यावयाचे तर त्या जातिबहिष्कृत वैश्याचे वाणीपण पालटले तरी त्याचे हिंदूपण तसेच अखंड राही, अक्षुण्ण राही. अर्थात तशा आपसातील जातिबहिष्कारामुळे अेकंदर हिंदुसमाजाच्या संख्याबळाची हानी होत नसे.

परंतु जेव्हा त्याच रूढीप्रमाणे मुसलमानाने बाटविलेल्या कोणाही हिंदू स्त्री - पुरूषांना तोच जातिबहिष्काराचा दंड देअून हिंदुजाती त्या बाटलेल्या हिंदूलोकांना शुद्धिबंदीची बेडी ठोकून जातीबाहेर टाकी, तेव्हा त्यांचे हिंदूपणच हिरावले जाअी. अशा सहस्त्रावधि हिंदू स्त्री-पुरूषांना वारंवार होणाऱ्या धार्मिक आक्रमणातून मुसलमान लोक सारखे बाटवीत गेल्याने त्या त्या बाटविलेल्या हिंदू स्त्री-पुरूषांना हिंदूसमाज हिंदूजातीतूनच बहिष्कृत करीत गेल्याने आणि त्यामुळे त्यांना मुसलमानांच्या धर्मात नि समाजात राहणे भाग पडत गेल्याने हिंदुराष्ट्राच्याच संख्याबळाची भयंकर हानी होत गेली!

मुसलमानांच्या धार्मिक आक्रमणाला आणि अत्याचाराला पायबंद घालण्यासाठी म्हणून ज्या जातिबहिष्कार आणि शुद्धिबंदी ह्या प्रत्यस्त्रांचा हिंदूनी आघात केला त्यांनी मुसलमानांचा केसही वाकडा न होता अुलट हिंदूवर ते करीत चाललेल्या अत्याचारांना नि बलात्कारांना केवढे अुत्तेजन मिळत गेले हे साधारणतः महंमद गझनीच्या काळापर्यंतच्या वरील विवेचनावरून स्पष्ट होत आहे. परंतु तरीही त्यावेळच्या बाटविलेल्या हिंदूंची कोण दुर्दशा होत असे, याविषयी अनेक तत्कालीन मुसलमानांच्याच तवारिखांतून केलेल्या वर्णनापैकी केवळ वानगीसाठी अेक घटना खाली देत आहो.

ज्या हिंदूंना शेकड्यांनी गुलाम करून अिराण, तुराण, अरबस्थानाकडे गझनीच्या स्वाऱ्यांच्या काळी धरून नेत त्यांपैकी काही हिंदू लोक व्यक्तिशः वा टोळ्याटोळ्यांनी मुसलमानांना झुकांड्या देअून कालांतराने पंजाबात पळून येत. त्या वेळी म्हणजे महंमद गझनी मेला त्यावेळी आणि पुढे शंभरअेक वर्षे मुसलमानी सत्ता पंजाबपर्यंत येअून थांबली होती. निदान पंजाबपुढे १०० वर्षे तरी हिंदूच्या सशस्त्र विरोधाने घुसू शकली नव्हती.

पुढे मुसलमानांच्या तावडीतून सुटलेल्या हिंदू गुलामांच्या टोळ्या मुस्लिमांच्या सत्तेखालील पंजाबातूनही निसटून पंजाबला लागूनच असलेल्या आपल्या राजपुतान्याच्या हिंदुराज्यांत आश्रयार्थ येत आणि मनात आनंद मानीत की सुटलो अेकदाचे मुसलमानांच्या कचाट्यातून आता पुन्हा आपआपल्या हिंदु कुटूंबातून, हिंदुदेवालयातून, हिंदूसमाजातून सुखाने नांदू!

हाय! हाय! परंतु ही त्यांची अिच्छाही केवळ मृगजळच ठरे! कारण शुद्धिबंदी! त्या टोळ्या त्या हिंदुराज्यात येताच त्यांची पूर्वीची स्वत:ची जात नव्हे, पण कोणतीही हिंदुजात त्यांना जातीत घेण्यास म्हणजेच हिंदुधर्मात घेण्यास सिद्ध नसे. कारण त्यांना जातिबहिष्काराचा कठोर दंड ठोठावलेला 'जो हिंदू अेकदा बाटला तो नित्याचाच बाटला' ह्या शुद्धिबंदीच्या मूळ सूत्राच्या आधारे! त्या टोळ्यांतील स्त्री-पुरूषांना त्या हिंदूंच्या राज्यातही जगायची अिच्छा असल्यास मुसलमान म्हणूनच जगावे लागे! पुढे जेव्हा शंभरअेक वर्षांनी मुसलमानांच्या नव्या नव्या स्वाऱ्या यशस्वी होअून शेवटी दिल्लीपर्यंत, मध्यप्रांतापर्यंत, अशा पुढे-पुढे घुसत चालल्या तेव्हा तेव्हा त्यांना ह्या अनेक वर्षापूर्वी पळून आलेल्या हिंदू गुलामांच्या तुकड्या मुसलमान म्हणूनच त्या त्या हिंदुराज्यात नांदतात पाहून मोठे आश्चर्य वाटे! कारण मुसलमानांच्या राज्यात अशी हिंदूची अेखाददुसरी टोळी आढळली तर त्या काळी हिंदू म्हणून कधी जिवंत राहूच शकली नसती. बळाने वा छळाने केव्हाच मुसलमान केली जाती. हा मुसलमानांचा अनुभव! हा मुसलमानी धर्म!

पण अिथे हिंदुराज्यात बाटलेल्या आणि परत हिंदुधर्मात येअू अिच्छिणाऱ्या हिंदूंना सुद्धा मुसलमान म्हणूनच राहावे लागे, कारण 'शुद्धिबंदी'! 'हा हिंदुधर्म'!!

अशा मुसलमानी धर्माशी लढणाऱ्या प्रसंग ज्याच्यावर कोसळला त्या ह्या अशा हिंदुधर्माचे लाखो अनुयानी ह्या विषम संघर्षात भ्रष्टीकरण करून मुसलमानांनी बाटविले आणि हिंदूंच्या प्रचंड संख्याबळाची अपरिमित हानी केली, यात काय आश्चर्य?

आश्चर्य असेल, तर हेच की, अितक्या हानीवरच कसे निभावले!

# प्रकरण ४ थे

# सद्‌गुणविकृती

मुसलमानांच्या त्या महान संघर्षात धार्मिक काय किंवा राजकीय काय, दोन्हीही आघाड्यांवर हिंदूंचा जो घात मुसलमानांनी केला नाही तितका घात हिंदूंतीलच जन्मजात जातिभेदाच्या रोटी-बंदीपासून शुद्धिबंदीपर्यंतच्या रूढींनी केला, हे वरील काही प्रकरणांतून विशद केलेलेच आहे. परंतु, या जन्मजात जातिभेदाच्या धार्मिक खुळाप्रमाणेच हिंदूंच्या आक्रमक नि प्रत्याक्रमक सामर्थ्यास अगदी लुळे करून सोडणारी दुसरी अेक आत्मघातक मानसिक व्याधी हिंदूंच्या नाशास कारणीभूत झालेली होती. मुसलमानांच्या शस्त्राने जे त्यांना करता आले नाही, असे हिंदूंचे पराजय हिंदूंच्या अंगी मुरलेल्या व्याधीच्या बेशुद्धीत हिंदूंनी स्वतःचे स्वतःच करून घेतले होते. या बुद्धिभ्रंशाच्या व्याधीला वास्तविक पाहता तिच्यामुळे हिंदूंची जी प्रचंड हानी होत गेली, त्या मानाने त्यातल्या त्यात सौम्य असणारे नांव शोधायचे झाले तरी ‘सद्‌गुणविकृती’ अितके तरी म्हटलेच पाहिजे.

परोपकार, दया, अहिंसा, परधर्मसहिष्णुता, शरणागताला अभय देणे, शत्रूवर अुपकार करणे, परस्त्री-अपहार न करणे, शत्रु स्त्री-दाक्षिण्य, आपल्या जिवावर अुठलेल्या अपराध्यासही क्षमा करणे, अित्यादी.

## वस्तुतः सद्‌गुण किंवा
## दुर्गुण हे मूलतः केवळ गुण असतात

मनुष्याची माणुसकी म्हणून अुपदेशिले गेलेले सर्व सद्‌गुण हे वस्तुतः केवळ सारे गुणच असतात. कोणताही अेक गुण सर्व परिस्थितीत सद्‌गुणच असतो असे नाही. संक्षेपतः येथे अितकेच सांगणे पर्याप्त आहे की व्यवहारात नि नीतिशास्त्रात जरी गुण हा जेव्हा मनुष्यजातीच्या हितास अुपकारक ठरतो तेव्हा तितक्याच मर्यादेपर्यंत तो सद्‌गुण समजला गेला पाहिजे. आणि जेथून तोच गुण मनुष्यजातीच्या घातास किंवा अधःपातास कारणीभूत होतो, तेथून त्याचे दुर्गुणात रूपांतर होते; तो त्याज्य ठरतो.

अगदी संक्षेपतः का होअीना, परंतु काही गुणांचे सात्त्विक, राजस आणि तामस असे तीन भेद केलेले आहेत. म्हणूनच देशकालपात्राच्या विवेकाची कसोटी फार महत्त्वाची आहे. हिंदूंच्या संस्कृतीने मनुष्याला देवत्वाप्रत पोचविण्याची आकांक्षा बाळगून मनुष्याच्या अंगात सात्त्विक भाव अुत्पन्न करण्याची पराकाष्ठा केली. परंतु हे जग हे केवळ सत्त्वाच्या अेकाच धाग्याने विणलेले नाही, हे त्रैधातुक आहे, सत्त्व, रज आणि तम ह्या तीन धाग्यांनी ते विणलेले आहे. आणि म्हणूनच, जर आणि ज्याला या जगात जगावयाचे असेल, जिंकावयाचे असेल, निदानपक्षी अन्यांकडून, अन्यायांकडून जिंकले जावयाचे नसेल, तर आणि, त्याला, सत्त्व, रज आणि तम ह्या तिन्ही परिस्थितीतील अवस्थांना यशस्वीपणे तोंड देता येअील असे त्रिशूली साधनच वापरले पाहिजे. परंतु, त्या हिंदू-मुस्लिमीय महायुद्धाच्या काळी हिंदूराष्ट्राला त्या सद्‌गुणांच्या सापेक्षतेचा अुपदेश करणाऱ्या गीतेची सुद्धा विस्मृती झाली. नव्हे गीतेतील धर्माचाच त्या काळच्या हिंदूंनी विपर्यास केला. गीतेतील मुख्य जे मर्म आहे ते म्हणजे पात्रापात्र विवेक! त्याची ओळखही या हिंदूंना राहिली नाही.

अर्थातच, हे ध्यानात ठेवले पाहिजे की, हे सारे विवरण त्या वेळच्या कोट्यानुकोटी हिंदूराष्ट्रास अेकंदरीत नि सामुदायिक अर्थी लागू पडणारे आहे. अशी कोटि कोटी जनांच्या विसदृश, विरोधी समजक्रांतिकारक असे सहस्त्रावधी अपवादात्मक जनसमूह किंवा प्रतापी पक्षही निघत गेले. त्यांचे अुल्लेख यथास्थली दिग्दर्शनार्थ आले आहेत. पुढेही प्रसंगोपात्त येतीलच.

शरणागताला जीवदान देणे, हा सदगुण म्हणून काही पोथ्यांतून सांगितलेला आहे. यासाठी महंमद घोरी, नजीबखानासारख्या अनेक दुष्टांना ते हाती लागले असताही जिवंत मोकळे सोडून दिले. भुकेलेल्या किंवा तान्हेल्याला पेय पाजावे, हा सद्‌गुण आहे, येवढेच काय ते पाठ करून ठेवल्यामुळे नागांनाही आणि दुष्ट सापांनाही दूध पाजीत राहिले. स्वतःची देवमंदिरे ते मुस्लिम राक्षस धडाधड पाडीत असताही आणि सोमनाथासारख्या पूज्य मूर्ती भग्न करीत असताही -

**दिधले दु:ख पराने अुसने फेडू नयेचि सोसावे । शिक्षा देव तयाला करील म्हणोनी अुगेची बैसावे ।।**

असा, साधुसंतांनी सद्गुण म्हणून सांगितलेला असतो, त्यासाठी, अनुकूल परिस्थिति आली असताही, त्या दुष्ट मुसलमानांचा वचपा न काढता, त्यांच्या मशिदीचा अेक चिराही काही अुखडला नाही.

ज्या 'सद्गुणापायी' असे दुराचार आणि पंचमहापातकांहूनही भयंकर पापे घडतात, अशा सद्गुणांपेक्षा पोथीतल्या कोष्टकाप्रमाणे ठरलेल्या दुर्गुणातील दुर्गुणही अधिक मानवहितघातक, राष्ट्रहितघातक आणि धिक्काराई असू शकणार नाहीत. म्हणून, ज्या विवेकशून्य नि बुद्धिभ्रष्ट मनुष्याच्या हातून तसा गुण, सद्गुण म्हणून, पोथीनिष्ठपणे आचरला जातो, धर्म म्हणून, हटातटाने आचरला जातो, त्यांचा व्यक्तिश: आणि राष्ट्रश: आमूलात विध्वंस झाल्यावाचून राहणार नाही. असे गुण सद्गुण नसून सद्गुणांची विकृती होत. देशकालपात्राचा विवेक न करता जो जो सद्गुण केवळ वरीलसारख्या बुद्धिभ्रमापायी आचरला जातो तो तो सडलेला सद्गुण असतो आणि सडलेल्या अन्नासारखे त्याचेच प्राणघातक विष बनते.

'परधर्मसहिष्णुता हा सद्गुण आहे' हे बोधामृत प्रत्येक हिंदूला अगदी आअीच्या दुधासहच पाजलेले असते. परंतु त्या वाक्याचे मर्म मात्र त्याला कोणी विशद केलेले नसते. जर तो 'परधर्म' आपल्या स्वधर्माशीही सहिष्णुतेने वागणारा असेल तर अशा परधर्माशी आपणही सहिष्णुतेने वागणे, हा सद्गुण होअू शकेल. परंतु हा देशकालपात्राचा विवेक न करता, हिंदूधर्माचा निर्दय विनाश, काफरांचा भयानक अुच्छेद हाच आमचा धर्म होय, असे म्हणणाऱ्या मुस्लिमांच्या किंवा ख्रिश्चनांच्या धर्मास ती परधर्मसहिष्णुतेची व्याख्या लागू पडत नाही. तिथे त्या 'परधर्माचा' त्यांच्या असहिष्णु कृत्यांचा प्रतिकृत्याने आणि अत्याचारांचा अत्याचाराने प्रतिशोध घेणारी संकृद्ध असहिष्णुता हाच खरा सद्गुण होय.

अगदी या चालू अितिहास प्रकरणापुरतेच बोलायचे झाले तर प्रत्येक मुस्लिम आक्रमक मथुरेची किंवा काशीची हिंदू मंदिरे अुद्ध्वस्त करीत गेला. सबंध हिंदुस्थानातील अत्यंत पूज्य नि भव्य अशा रामेश्वरापर्यंतच्या अनेक मंदिरांतील मूर्ती जाणूनबुजून दिल्ली प्रभृती मुस्लिम राजधान्यास नेअून पालथ्या घालून त्यांच्या प्रासादांच्या पायऱ्यात चिणून टाकल्या गेल्या. अितकेच नव्हे, तर केवळ हिंदूंच्या भावनांना कुचलून टाकण्यासाठीच तशा पवित्र मंदिरांतील त्या मूर्ती आणि अनेक अितर अवशेष मलमूत्रोत्सर्जनार्थ अुभारलेल्या ठिकाणांची फरशी करण्यासाठी अुपयोग केला गेला. ह्या आणि अशाच अितर अनेक अमानुष अुत्पात्तांनाच आपला 'धर्म' मानणाऱ्या मुस्लिमांशी सहिष्णुतेने वागणे हा सद्गुण नसून सद्गुणविकृती होय. नव्हे, हिंदूंनी तशी सहिष्णुता पाळणे हे अेक नारकीय पाप करण्यासारखे होते. पण तेच पाप पुण्य म्हणून त्या हिंदूंनी आचरिले! मुसलमानांची ती ती राज्ये अधूनमधून हिंदूंनी अुखडून टाकली असताही म्हणजेच हाती राजसत्ता आल्यावरही हिंदूंनी काशी, मथुरा ते रामेश्वर येथील मुसलमानांनी बांधलेल्या मशिदींना भरडून काढून त्यांच्या अवशेषांना अशाच मार्गामार्गातील फरशांमध्ये चिणून टाकून सद्गती दिली नाही. फारफार तर, हिंदूंनी आपली मुसलमानांनी पाडलेली मंदिरे पुन:पुन्हा अुभारावीत अितकेच काय ते! या अुलट, अशी आश्चर्यकारक अुदाहरणे आढळतात की, ज्यात हिंदूंच्या अशा सत्ताकालात त्यांनी त्या मुस्लिम आक्रमकांनी बांधलेल्या अशा मशिदींना नवीन अुत्पन्ने लावून दिली आणि त्यांचे रक्षण करण्याचे दायित्व आपणांकडे घेतले! या प्रकरणी अेक फुटकळ असे अुदाहरण त्या काळच्या हिंदूंच्या या धार्मिक बुद्धिभ्रष्टतेचे, सद्गुणविकृतीचे अत्यंत लज्जास्पद प्रदर्शन करणारे, असे येथे देत आहोत. म्हणजे याविषयी आणखी चकार शब्दसुद्धा देण्याचे कारण अुरणार नाही.

सोमनाथचे देवालय हे प्रथम महंमद गझनीने पाडल्यानंतर तो प्रदेश पुन्हा हिंदूंनी जिंकून घेतला. हिंदूंनी ते सोमनाथाचे देवालय पुन्हा बांधले. पुन्हा मुसलमानांची स्वारी होअून त्यांनी ते देअूळ फोडून तोडून टाकले. अशी अुलाढाल त्या देवळाची होता होता जेव्हा तेथे अेका प्रबल हिंदुराजाची सत्ता त्या प्रदेशावरही स्थापन होअून ते देवालय पुन्हा विधिपूर्वक बांधले गेले आणि त्या क्षेत्राचीही चांगली भरभराट झाली. त्या सागरतटावर पूर्वीपासून येती-जाती-अरबी नाविक व्यापाऱ्यांची तारवे प्रवासाचा अेक टप्पा म्हणून अुपयोग करीत असत. वस्तुत: त्या हिंदुराजाने ह्या अरबांनाच त्या समुद्रात येणे बंद

करावयास पाहिजे होते. कारण असेच अरबी व्यापारी येता येता अरबी सेनाही त्यांच्यासह मागे आलेल्या होत्या, असा कटू अनुभव त्या हिंदुराजांना वारंवार आलेला होता. परंतु स्वतःच्या परधर्मसहिष्णुतेचे आणि औदार्याचे प्रदर्शन करण्यासाठी त्या हिंदुराजाने त्या अरबी व्यापाऱ्यांचे त्या तटास येणे-जाणे बंद केलेच नाही, तर अुलट त्यांना अगदी आपल्या घरीच आल्यासारखे वाटावे अितक्या सौजन्याने वागविले. तेव्हा त्या अरबी व्यापाऱ्यांच्या मनात, त्यांच्या नेहमीच्या स्वभावाप्रमाणे राजकीय कपटाने असो, असे आले की या सोमनाथ नगरातच, त्या काफरांनी पुन्हा अुभारलेल्या देवळासमोरच आपली मुसलमानांची अेक मशीद आव्हानाप्रमाणे अुभारावी. पण ती गोष्ट त्या वेळच्या परिस्थितीप्रमाणे दंडेलीने करणे त्यांना शक्यच नव्हते. यास्तव त्यांच्या नेहमीच्या कपट- पटुत्वाप्रमाणे त्यांनी मोठ्या नम्र भाषेत त्या हिंदुराजाला मशीद अुभारण्याविषयी अनुज्ञा असावी असे आवेदन सादर केले. आणि कोण आश्चर्य? त्या भोळकट हिंदुराजांने मुसलमानांची ती यच्चयावत विनंती मोठ्या आनंदाने मान्य केली; आणि, सोमनाथ मंदिरासमोरच अेक नवी मशीद - हिंदुधर्माला मूर्तिमंत आव्हानासारखी ताठ मान करून अुभी राहिली. वस्तुतः महंमद गझनीने त्या सोमनाथ मंदिराची जी दुर्दशा केली ती आठवून, त्या हिंदुराजाने, तो प्रदेश मुसलमानांच्या हातून परत घेताच त्यातील मशिदीवर नांगर फिरवावयास हवा होता. आणि मग सोमनाथाचे मंदिर पुन्हा बांधावयाचे होते. पण हिंदूंनी मशीद तितकी न पाडता अेक नवीन मशीद बांधण्याची अनुज्ञा दिली. आणि तिच्या वर्षासनाची सोय केली. ह्या हिंदूंच्या आत्मघातक परधर्मसहिष्णुतेचे (सद्‌गुण-विकृतीचे?) फळही त्यांना या हाताचे त्या हाती भोगावे लागले. कारण, काही काळानंतर जेव्हा अल्लाअुद्दिनादि मुस्लिम आक्रमकांनी गुजराथवर स्वाऱ्या करून सहस्त्रावधि हिंदू पुरूषांची सरसकट कापाकापी केली, सहस्त्रावधि स्त्रियांवर बलात्कार केले आणि शतावधी हिंदू मंदिरे पाडीत फोडीत अत्याचारी मुसलमानांची सैन्ये त्या सोमनाथ नगराजवळ आली तेव्हा हिंदुराजांनी ज्या अरबी व्यापाऱ्यांना मशीद अुभारू दिली त्या हिंदूच्या परधर्मसहिष्णुतेची फेड कशी केली? तो हिंदूचा अुपकार कसा फेडला?

तर, तो अुपकार हिंदूंच्या बावळटपणाचे, दुधखुळेपणाचे लक्षण समजून, त्या अुपकाराच्या फेडीकरिता पुन्हा अुभारलेले सोमनाथ मंदिर तरी सुरक्षित राहू दिले का? नाही! त्या अल्लाअुद्दिन प्रभृतींच्या मुस्लिम सैन्याने ते सोमनाथ मंदिर पुन्हा छिन्नविच्छिन्न करून टाकले आणि महंमद गझनी जे करावयास विसरला होता ती विटंबना करण्यासाठी त्याने सोमनाथच्या मूर्ती आणि गाभाऱ्यातील शिला दिल्लीला नेअून तेथील अेका मशिदीच्या पायऱ्यांत चिणून टाकल्या.

पुढेही हिंदूंची सत्ता अेकदा आली, काही, देवळे पुन्हा अुभारली गेली. पुन्हा मुसलमानांची स्वारी झाली आणि गुजराथवर म्लेंच्छांचे चिरकालीन सार्वभौमत्व स्थापिले गेले. सुलतान अहमदशाह, अित्यादी मुसलमानी सुलतानांनी सशस्त्र धार्मिक अत्याचारांनी, स्त्रियांवरील बलात्कारांनी आणि मंदिरांच्या विध्वसांनी गुजराथमधील यच्चयावत् हिंदू समाजाला त्राहि भगवन् केले. सहस्त्रावधि हिंदू स्त्रीपुरूषांना धरून गुलाम करून नेले नि देशोदेशी विकले. सोमनाथाचा पत्ता पुन्हा नाहीसा झाला, पण ती मशीद नि तिचे महत्त्व वाढतच गेले. जुन्या मशिदी तर सुरक्षित राहिल्याच, हिंदुराजांनी त्या पाडल्या नाहीत, मुसलमान सुलतानांनी अुलट त्या जुन्या मशिदीचे वैभव तर वाढविलेच, पण नवीनही अेकाहून अेक अुंच नि विस्तृत अशा मशिदी अुभारल्या.

हिंदूंच्या धार्मिक बेशुद्धीचे, सद्‌गुणविकृतीचे, आंधळ्या परधर्मसहिष्णुतेपायी स्वधर्माचा बळी देणाया आत्मघातकीपणाचे हे अेक अुदाहरण झाले. अशी सद्‌गुणविकृतीची अुदाहरणे काश्मीरपासून रामेश्वरापर्यंत, पावलोपावली आणि शतकानुशतके त्या मुस्लिम आक्रमणाच्या काळी घडत होती, ती कुठवर सांगावी? तथापि आणखी अेक अुदाहरण हिंदूंच्या 'औदार्यसद्‌गुणा'च्या सद्‌गुणविकृतीची वानगी म्हणून सांगू. सिद्धराज हा गुजराथेतील अनहिलवाड्याचा अेक पराक्रमी राजा म्हणून समजला जाअी. तो न्यायअन्यायाचा मोठा भोक्ता असे. पण तो 'हिंदुराजा' होता. अर्थात न्याय आणि अन्याय, स्वधर्म आणि परधर्म, औदार्य आणि संकुचित्व अित्यादी सर्व गुणांना देशकाल, पात्रापात्रविवेकाचा स्पर्शही न करता तो गुण स्वयमेवच सद्‌गुण अशा भ्रांतीने वेडावलेला होता, हे सांगणे नकोच. त्याच्या राज्यात खंबायत (कँबे) जवळ अेकदा

हिंदू-मुसलमानांमध्ये झगडा अुत्पन्न झाला. स्वत; महंमद औफी हा मुसलमान लेखक आमजवामी-अुल-हिकायत या पुस्तकात लिहितो की :

''अनहिलवाड्याच्या राज्यात अेकदा मुसलमानांवर काफर हिंदूंनी चढाअी केली आणि त्या दंगलीत जवळ जवळ अैंशी मुसलमान ठार मारले गेले आणि तेथील त्यांची मशीद जाळून टाकून तिचा मिनारही पाडून टाकला. तेव्हा तेथील अिमाम खातीब अल्ली याने त्या हिंदुराजाच्या स्तुतिपर अेक मोठी कविता रचून तीमध्ये मुसलमानांवर हिंदूंनी केलेल्या त्या अत्याचाराची माहिती गोवली आणि हिंदूंपासून आमचा बचाव व्हावा, म्हणून विनंती केली. ह्या कवितेचा आणि आवेदनाचा हिंदू राजावर अेवढा प्रभाव पडला की तो स्वत: गुप्त रीतीने त्या दंगलीचे गावी गेला आणि अेकंदर चौकशीनंतर त्याला, मुसलमानांना हिंदूंकडून मारहाण झाली ही गोष्ट खरी आहे, असे वाटले. आता राजाने अुदार असावे, न्यायदानात स्वपक्ष, परपक्ष काही पाहू नये, त्यातही आपल्या हिंदुराज्यात जे बिचारे अल्पसंख्य परधर्मीय राहतात त्यांना अधिक सवलती देअूनही परधमर्हिष्णुतेचे ब्रीद पाळावे, हा राजधर्म आहे, ही पोथ्यापुराणातील सर्वसाधारण वाक्ये त्याची पाठ झालेली होती. पण त्या वाक्यांना देशकालपात्राच्या कोणत्या अुपनेत्रांतून वाचले पाहिजे, हा गुरुमंत्र राजांना सांगणारी चाणक्यसूत्रे मात्र त्या राजाच्या सात पिढ्यात कोणी वाचली नसतील असे दिसते. कारण त्या तथाकथित अत्याचारांविषयी हिंदूंना कठोर दंड देअून त्या हिंदूराजाने मुसलमानांना अेक लक्ष बलोत्रा नाण्याची मोठी रक्कम दिली आणि तो मिनार पुन्हा बांधून दिला.

ह्या राजा जयसिंगाने पुनरुद्धार केलेल्या सोमनाथाची स्वत: पायी यात्रा केली होती. तो शिवभक्त होता आणि हिंदुधर्मावर त्याची नितान्त भक्ती असे. म्हणूनच बहुधा मुसलमानांसारख्या कट्टर नि कपटी शत्रूंना आपल्या राज्यातून हुसकून लावण्याच्या ठिकाणी किंवा त्यांना बळाने हिंदू करून घेण्याच्या ठिकाणी त्याने त्या मुसलमानांच्या मशिदी, सोमनाथाचे मंदिरच नव्हे, तर गुजराथेतील शतावधी मंदिरे आणि हिंदुस्थानातील सहस्त्रावधी मंदिरे फोडून तोडून टाकणाऱ्या मुसलमानांच्या मशिदी हिंदूंच्या खर्चाने पुन्हा बांधून दिल्या आणि त्यांना आपल्या राज्यात परधर्मसहिष्णुतेच्या आणि औदार्याच्या हिंदुब्रीदाप्रमाणे विशेष संरक्षण दिले.

महंमद गझनीच्या, महंमद घोरीच्या किंवा त्याच काळी दिल्ली माळव्यापर्यंत हिंदूंचा अुच्छेद करीत आलेल्या सुलतानांच्या राज्यातील हिंदूंना त्यांचे अेखादे मंदिर पाडल्याविषयी त्या मुस्लिम अधिकाऱ्याकडे चकार शब्दाने तरी गाऱ्हाणे सांगणे शक्य होते का? तसे गाऱ्हाणे करणे हाच मुसलमानी धर्माप्रमाणे त्या काळी त्या 'काफरांचा' भयंकर अपराध ठरता आणि त्या हिंदूंतील यच्चयावत् स्त्रीपुरुषांना मुसलमानाविरूद्ध 'ब्र' अुच्चारल्यासाठी गुलाम करून आशियातील काबूल-कंदाहारच्या बाजारात विकले गेले असते. अशा ह्या परधर्मीय मुसलमानांच्या मोठमोठ्या वसतींना हिंदुराजे परधर्मसहिष्णुतेचे आपले ब्रीद म्हणून आपापल्या राज्यातून विशेषादराने निवसू देत. आणि त्या काळच्या अितिहासात सहस्त्रावधी प्रकरणी हेच अल्पसंख्य, शरणार्थी म्हणून हिंदुराज्यातून निवसलेले मुसलमान बाहेरच्या कोणा मुसलमानाची स्वारी त्या राज्यावर येताच आतून बंड करून किंवा अितर प्रकारे त्या हिंदुराजाचा घातपात केल्यावाचून राहत नसत. हे त्यांच्या डोळ्यांना धडधडीत दिसत असून देश-काल-पात्राचा लवलेश विचार न करता 'राजाने परधर्मसहिष्णु असावे, नि:पक्षपाती असावे, अुदार असावे, हे सद्‌गुण आहेत' अितकीच ठोकळ वाक्ये पाठ करून हिंदुराजे त्या त्या सद्‌गुणांच्या फशी पडले. सद्‌गुणविकृती ती हीच!

## हिंदूंच्या लक्षावधी स्त्रियांच्या मुसलमानी अपहरणाचे आणि भ्रष्टीकरणाचे भयंकर संकट

मुसलमानांच्या धार्मिक आक्रमणाच्या भयंकर संकटाचेच अेक अुपांग असणारे आणि हिंदूंच्या संख्याबळास सारखी भीषण ओहोटी लावणारे आणखी अेक नवे संकट हिंदूवर त्या काळी कोसळले. ते म्हणजे त्या आक्रमक मुसलमानांनी परधर्मीय स्त्रियांचे अपहरण करणे आणि त्यांना मुसलमानी धर्मात ओढून स्वत:चे संख्याबळ वाढविणे. ही अिस्लामची

धर्माज्ञा आहे अशी त्यांची राक्षसी श्रद्धा होती. मुसलमानांच्या ह्या त्यांच्या कामविकारांना हव्याशाच वाटणाऱ्या धर्मश्रद्धेमुळे त्यांचे संख्याबळ अत्यंत वेगाने वाढत गेले आणि हिंदूंचे त्याच प्रमाणात घटत गेले, ही धडधडीत वस्तुस्थिती होती. शिष्टपणाच्या शेंदाड संकोचाने ही वस्तुस्थिती अुघडी करून दाखविण्यास कचरणे म्हणजे शस्त्रक्रियेच्या भयाने वैद्यापासून खरा रोग लज्जेने वा भयाने लपवून दुसऱ्याच असत्या नसत्या साध्यासुध्या रोगावर औषधोपचार घेण्यासारखी बालिश आत्मवंचना होय. हिंदूंच्या लक्षावधी स्त्रियांचे मुसलमानांनी अपहरण करण्याचा जो त्या कालखंडातील शतकानुशतके धुमाकूळ घातलेला होता त्याला नुसते धर्मवेड म्हणून हेटाळण्याअितकी किंवा त्यात अनुल्लेखाने दुर्लक्षिण्याअितकी ती गोष्ट तुच्छ नव्हती. ते वेड म्हटले तरी त्या वेडाला अेक वळण होते. मुसलमानांच्या धर्मवेडातील ते वळण अितके भयंकर होते की, त्याची अेक धर्मवेड म्हणून अुपेक्षा केल्यानेच हिंदुराष्ट्राला त्या काळी रक्तक्षयाच्या दु:साध्य व्याधीने ग्रासून टाकले. कारण वस्तुत: मुसलमानांचे ते 'धर्मवेड' अेक वेड नव्हते, तर ती अेका अटळ सृष्टिक्रमाला अनुसरून अंगीकारलेली राष्ट्रीय संख्याबळ वाढविण्याची परिणामकारक पद्धती होती.

पशूंच्या कळपातूनच हा सृष्टिक्रम माणसात अुतरला. गोवंशाच्या कळपात वळूंचीच संख्या जर गाअींपेक्षा अधिक असेल तर त्या कळपाची संख्यावृद्धी झपाट्याने होणार नाही. पण ज्या कळपात गाअींची संख्या वळूंच्या संख्येपेक्षा अधिक आहे त्या कळपाची संख्या झपाट्याने पिढीमागून पिढी वाढत जाणारच. तोच सृष्टिक्रम मनुष्याच्या कळपाला, मनुष्य हाही मूलत: पशूसारखा अेक प्राणीच असल्याने, अितर गोष्टी समान असता, लागू आहे. अगदी प्राक्काळात ज्याला आपण आज रानटी म्हणतो त्या वन्य अवस्थेतील मानवी टोळ्यांनाही संख्यावृद्धीचा हा क्रम चांगला माहीत होता. आफ्रिकेत आजही अशा तग धरून राहिलेल्या मनुष्यप्राण्यांच्या रानटी टोळ्या अस्तित्वात आहेत. त्या टोळ्यांत जेव्हा युद्धे होतात तेव्हा शत्रुपक्षीय टोळीतले पुरुष तेवढेच मारण्यात येतात पण शत्रूंच्या स्त्रियांना न मारता त्यांना हस्तगत करून विजयी टोळी आपसात वाटून घेते, आणि त्यांच्यापासून आपली संख्यावृद्धी करणे हा आपला धर्म मानते. नागा लोकातील निदान अेका टोळीविषयी तरी अशी माहिती सांगतात की त्या टोळीतील लोक त्यांच्या शत्रुपक्षीय टोळीवर जेव्हा तुटून पडतात तेव्हा तीमधील पुरूषांवर त्यांच्या धर्मयुद्धाच्या कल्पनेप्रमाणे साधे बाण मारतात, पण जर त्या शत्रुपक्षीय टोळीत काही स्त्रियाही लढताना आढळल्या तर त्यांच्यावर विषारी बाण मारून त्यांना ठार मारतात. याचे कारण विचारता ते सांगतात की शत्रूची जी स्त्री पकडता येत नाही अशी अेक स्त्री ठार मारणे हे कृत्य त्यांचे पाच पुरूष मारण्याअितकी त्या टोळीची संख्याहानी करते.

ह्याच सृष्टिक्रमाचा अवलंब अगदी सांगूनसवरून अरब मुसलमानांच्या आक्रमक पण अल्पसंख्य सैन्यांनी नि सेनापतींनी अुत्तर आफ्रिकेच्या बहुसंख्य लोकांवर तुटून पडताना केला. त्या काफर लोकांना जिंकताच त्यांच्यापासून जी खंडणी घेण्यात येअी ती अर्धी पैशात आणि अर्धी स्त्रियांत मोजून घेण्यात येअी. आणि त्या खंडणी म्हणून घेतलेल्या आफ्रिकेतील स्त्रियांना मुसलमान करून आपल्या अिमानदार सैनिकांत दहा-दहा-पाच-पाचांनी वाटून देण्यात येअी. त्या आफ्रिकी दासींपासून झालेली संतती जन्मत:च मुसलमानी वंशाची समजली गेल्याने आणि मुसलमानी वातावरणातच वाढली गेल्याने ती कट्टर मुसलमान बनत गेली. अशा प्रकारे अुत्तर आफ्रिकेत अिस्लामच्या अनुयायांची संख्या झपाट्याने वाढवीत जाणाऱ्या मुस्लिम सेनापतींना त्यांच्या धार्मिक पुढाऱ्यांनीही 'गाझी' म्हणून बहुमानाच्या पदव्या अर्पण कराव्या. विजित काफरांच्या स्त्रियांवर, त्या विजित काफरांच्या जडसंपत्तीप्रमाणेच विजयी, मुस्लिम सैन्याचा सर्वाधिकार स्थापन होतो हे मुसलमानांच्या धर्मयुद्धाचे अेक शासनसंमत सूत्रच ठरून गेलेले होते.

रावणाने सीतेला बळाने अपहरून पळवून नेल्यानंतर जेव्हा रामचंद्राने त्याच्यावर स्वारी केली तेव्हा प्रत्यक्ष युद्धाच्या आधी रावणाला त्याचे काही हितचिंतक अुपदेश करू लागले की 'तुझ्या ह्या अन्यायापायी हे युद्धाचे भयंकर संकट ह्या आपल्या राक्षसराज्यावर ओढवले आहे. परक्यांच्या स्त्रीचे अपहरण करणे हा अधर्म आहे. तरी तू असा अधर्म करू नकोस! सीतेला सन्मानाने रामचंद्राकडे परत धाड!' तेव्हा रावण रागाने अुफाळून अुत्तरला : 'काय म्हणता?

परकीयांच्या स्त्रियांना अपहरणे, बलात्कारणे हा अधर्म आहे ? अहो ! 'राक्षसांनां परो धर्मः परदारविघर्षणम।' दुसऱ्यांच्या स्त्रियांना पळवून बलात्कारिणे हाच तर आपणा राक्षसांचा धर्म आहे ! 'परो धर्मः श्रेष्ठ धर्म आहे !'

अशाच रावणी निर्लज्जतेने आणि धर्मोन्मादाने त्या काळातील हिंदुस्थानवर तुटून पडत चाललेले सारे मुसलमानी आक्रमक, हिंदू स्त्रियांचे अपहरण करणे, त्यांची जडवस्तूप्रमाणेच 'लूट' करून आणि त्यांना वाटवून मुस्लिम सुलतानापासून तो सैनिकांपर्यंत त्यांना यथाप्रमाण वाटून देणे हे आपल्या अिस्लामी धर्माचे पवित्र कर्तव्यच आहे, असे समजत असत. अिस्लामचे संख्याबळ वाढविणारे ते अेक शतकृत्य आहे असे मानीत. ज्या ज्या हिंदूंच्या प्रांतांवर मुस्लिम सत्ता नित्याची किंवा तात्पुरती स्थापन होअी, त्या त्या प्रांतांवरील सुलतानांनी आणि निजामांनीच, नबाबांनीच तर काय, पण गावोगावच्या फाटक्या मुसलमानांनीसुद्धा तेथील हिंदूंवर जिझिया कर जसा द्रव्यासाठी लादलेला असे, त्याचप्रमाणे, हिंदूंच्या राजघराण्या -पासून तो गावोगावातील कुलीन घराण्यांपर्यंत त्यांच्या कन्यकांना आणि प्रसंगी विवाहित स्त्रियांनाही धडधडीतपणे मागण्या घालण्याचा, नाही तर बलात्काराने पकडून नेण्याचा हा अेक अपहरणकरही सांगूनसवरून लादलेला असे !

त्या कालखंडात सिंधच्या स्वारीनंतर अरबांची स्वारी अशी जरी हिंदुस्थानवर झालेली नसली तरी अरबांच्या टोळ्या अितर जातींच्या मुसलमानी आक्रमकांच्या सैन्यात मिसळून हिंदुस्थानवर येतच होत्या. त्या अरबांप्रमाणे मुसलमानांनी बाटवून टाकलेल्या अिराण, तुराण, अफगाण, तुर्क, मोंगल अित्यादी साऱ्या आशियातील राक्षसी जातीच्या जाती हिंदुस्थानवर तुटून पडलेल्या होत्या. त्यांच्या त्यांच्या सहस्त्रावधी सैन्यांसह त्यांच्या जातीच्या तितक्या स्त्रिया काही घेअून ते हिंदुस्थानात घुसलेले नव्हते. परंतु हिंदुस्थानवर स्वाऱ्यांमागून स्वाऱ्यांतून आलेल्या ह्या सुलतानांपासून सैनिकांपर्यंत नि बाजारबुणग्यांपर्यंत मुसलमानांतील सहस्त्रावधी मुस्लिम पुरुषांनी लुटून किंवा अपहृत करून ज्या सहस्त्रावधी हिंदु स्त्रियांना बळकावले होते त्यांच्याशीच लग्ने करून किंवा त्यांना दासी करून ते मुसलमान हिंदुस्थानातच नित्याचे निवसत गेले. त्यांच्या बादशहांच्या, सुलतानांच्या, किंवा नबाबांच्या 'जनानखान्यात' राजस्त्रियांपासून तो बटकीपर्यंत शतावधी हिंदू स्त्रिया ज्या कोंडलेल्या असत त्यांची तर गोष्टच सोडा, पण गावगन्ना पसरलेल्या सर्वसामान्य मुसलमानांच्या अेकेका घरी प्रत्येक पुरूषामागे तीन चार बाटविलेल्या हिंदू स्त्रिया बहुधा बाळगलेल्या असत. अशा रीतीने ह्या आक्रमक मुसलमानी समाजात पुरूषांपेक्षा स्त्रियांचीच अशी बहुसंख्या झाल्यामुळे आणि त्यांच्यात बहुपत्नीत्वाची धार्मिक प्रथा चालू असल्यामुळे ह्या बाहेरून आलेल्या परकीय मुस्लिमांची संख्या वाढत वाढत पिढीपिढीने सहस्त्रावधीची लक्षावधी झाली आणि लक्षावधींची कोट्यावधी होअू शकली.

हेही ध्यानात घेण्यासारखे आहे की, हिंदूच्या ह्या बाटविलेल्या स्त्रियांच्या पोटीच सुलतान घियासुद्दीन तघलक, सुलतान फिरोझशहा तघलक, सुलतान शिकंदर लोदी अशा अनेक हिंदुद्वेषी नि राक्षसी राज्यकर्त्यांचा जन्म झाला !

## मुस्लिमांनी हिंदू स्त्रियांवर केलेल्या अत्याचारात मुस्लिम स्त्रीसमाजही हिरीरीने भाग घेअी

हिंदू-मुस्लिमांच्या शतकानुशतके चाललेल्या त्या युद्धपरंपरेच्या कालखंडात ज्या लक्षावधी हिंदू स्त्रियांना मुस्लिमांनी बळाने बाटविले, त्या हिंदू स्त्रियांच्या तशा अघोर छळात मुस्लिम स्त्रीसमाजही शक्य त्या त्या प्रकारे हिरीरीने भाग घेत असे. येथे वैयक्तिक प्रश्न प्रस्तुत नाही. समुदायदृष्टया हे विधान सत्य आहे. त्या काळच्या मुस्लिम स्त्रीसमाजाच्या ह्या राक्षसी क्रूरतेचा स्पष्ट नि विशेष अुल्लेख निर्भीडपणे कोणत्याही अितिहासलेखकाने केलेला आमच्या आढळात आलेला नाही ; यास्तव तो येथे ठळकपणे सांगणे आमचे कर्तव्य आहे.

हिंदू स्त्रिया म्हणजे काफरांच्या स्त्रिया, अुपजत बटकी, त्यांना मुस्लिम धर्मात बळाने ओढून आणण्याच्या कामी शक्य ते साहाय्य देणे हे प्रत्येक मुस्लिम स्त्रीचे धार्मिक कर्तव्य आहे, अशीच राक्षसी शिकवणूक त्या काळच्या मुस्लिम स्त्रियांना मिळालेली असे. मुस्लिम पुरुषांच्या हिंदू स्त्रियांवरील अत्याचारांचा निषेध तर त्या मुस्लिम स्त्रियांतील बेगमांपासून भीकमाग्या स्त्रियांपर्यंत कोणी करीत नसेच नसे, पण मुस्लिम पुरुषांना त्या अशा प्रकरणी अुलट अुत्तेजन देत असत, गौरवीत असत. त्या स्वतः हिंदू स्त्रियांचा त्यांच्या हाती असे तो तो छळ करीत. मुस्लिम सुलतानांच्या शिपायांच्या,

मुल्ला-मौलवींच्या किंवा गावोगावच्या मुस्लिम गावगुंडाच्या हातात सापडलेल्या हिंदू स्त्रियांना आपल्या राजमहालातील जनानखान्यात काय किंवा गावोगावच्या झोपड्यांतून काय, दडवून ठेवण्याचे, त्यांना बळाने मुस्लिम करण्याचे, दासी नि बटकीप्रमाणे राबवून घेण्याचे, मारहाण करून मुस्लिम समाजात कोंडून ठेवण्याचे, त्यांच्या मुलीबाळींची निर्दयपणे ताटातूट करून मुस्लिम पुरुषांत वाटून देणे अशी सारी पुढची क्रूर नि दुष्ट कार्ये करण्यात त्या मुस्लिम समाजातील स्त्रीवर्गही मुस्लिम पुरूषांअितक्याच हिरीरीने झटत असे. हिंदू मुसलमानांच्या लढ्यांच्या धामधुमीतच नव्हे, तर अधल्यामधल्या शांतता काळातही आणि हिंदुराज्यात निवसत असतानासुद्धा खेड्यापाड्यातील मुस्लिम स्त्रियांपर्यंत आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या हिंदू मुलीबाळींना भुलवून वा पळवून आणून, आपल्या घरी बळाने डांबून ठेवून किंवा गावच्या मशिदीतील मुस्लिम अड्ड्यात पोचवून देअून मुस्लिम समाजात त्यांना पचवून टाकणे हे आपले अेक अिस्लामधर्मीय नित्य कर्तव्यच आहे, असे साऱ्या हिंदुस्थानभर पसरलेला तो मुस्लिम स्त्रीसमाज समजत असे.

## 'स्त्रीत्वाची ढाल' हिंदूंचे शत्रु स्त्रीदाक्षिण्य

ह्या अधम राक्षसी कृत्यांसाठी कोणी हिंदु केव्हातरी त्यांचे पारिपत्य करील, ह्याची लेशमात्र भीती त्या मुस्लिम स्त्रियांना बाळगण्याचे कारणच नसे. लढायांत मुस्लिमांचा जय होअून मुस्लिम राज्य आले तर हिंदू स्त्रियांना बाटविण्याच्या ह्या कार्यासाठी त्या मुस्लिम स्त्रियांचा गौरवच होअी. पण जरी अधूनमधून हिंदू सैन्याचा जय झाला नि त्या त्या स्थळी हिंदुराज्य स्थापले गेले - त्या कालखंडात अशा घटना अनेकदा घडून येत - तरी फार तर मुस्लिम पुरुषसमाजाला काय तो अुपद्रव होअी. लढायांत मुस्लिम पुरुषच पाडाव केले जात. पण हिंदुंनी जिंकलेल्या लढायांच्या भर धुमाकुळीतही कोणीही हिंदुसेनानी, सैनिक वा नागरिक अशा आततायी मुस्लिम स्त्रियांच्या केसासही धक्का लावणार नाही, हे तो मुस्लिम स्त्रीसमाज पूर्णपणे जाणून होता. कारण शत्रुपक्षातल्या असल्या तरी आणि आततायी असल्या तरी त्या 'स्त्रिया' आहेत. यासाठी लढाअीत पाडाव झालेल्यासुद्धा मुस्लिम राजस्त्रियांना काय किंवा बटकींना काय, त्या कालच्या हिंदू विजेत्यांनी त्यांच्या त्यांच्या मुसलमानी घरी सुरक्षितपणे परत धाडून दिल्याची अुदाहरणे वारंवार घडत होती! आणि त्या कृत्याला सारा हिंदुसमाज ''पहा हो, आमचा परस्त्रीदाक्षिण्याचा सद्गुण! आमच्या हिंदुधर्माचा अुदारपणा!!'' म्हणून गौरवी. अुदाहरण द्यावयाचे झाले तर वानगीसाठी म्हणून अेक-दोन अुदाहरणे येथे देत आहोत.

शत्रुस्त्रीदाक्षिण्यासारखी राष्ट्रघातक आणि कुपात्री योजिलेल्या प्रकारच्या सहस्त्रावधि अुदाहरणापैंकी दोन ठळक अुदाहरणे येथे दिल्यास ते अप्रस्तुत होणार नाही. छत्रपति शिवाजी महाराजांनी कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेला सालंकृत तिच्या नवऱ्याकडे पाठविले आणि पोर्तुगीज किल्लेदाराच्या पाडाव झालेल्या शत्रुस्त्रीसही चिमाजीअप्पाने वरील प्रकारे गौरवून तिच्या पतीकडे परत पाठविले. ह्या दोन गोष्टींचा गौरवास्पद अुल्लेख आजही आपण शेकडो वेळा मोठ्या अभिमानाने करीत असतो. पण शिवाजी महाराजांना किंवा चिमाजीअप्पांना महंमद गझनी, घोरी, अल्लाअुद्दीन खिलजी अित्यादी मुसलमानी सुलतानांनी दाहीरच्या राजकन्या, कर्णावतीच्या कर्णराजाची कमलदेवी नि तिची स्वरूपसुंदर मुलगी देवलदेवी अित्यादी सहस्त्रावधी हिंदू राजकन्यांवर केलेले बलात्कार आणि लक्षावधी हिंदुस्त्रियांची केलेली विटंबना यांची आठवण, पाडाव झालेल्या मुस्लिम स्त्रियांचा गौरव करताना, झाली नाही, हे आश्चर्य नव्हे काय?

त्या विटंबना केलेल्या हिंदु राजस्त्रियांच्या नि बलात्कारिल्या गेलेल्या लक्षावधी हिंदुस्त्रियांनी फोडलेल्या करूण किंकाळ्यांनी नि टाहोंनी हे हिंदुस्थानचे सर्व वातावरण सूक्ष्म ध्वनीने सतत कंपित होत होते. त्याचे प्रतिध्वनि शिवाजी किंवा चिमाजीअप्पांच्या कानावर येत नव्हते काय? त्या बलात्कारिल्या गेलेल्या लक्षावधी स्त्रिया असे म्हणत असतील की, ''आम्हावर मुस्लिम सरदार आणि सुलतानांनी केलेले अत्याचार आणि बलात्कार, शिवाजीराजे आणि चिमाजीअप्पा, कदापिही विसरू नका. त्या मुस्लिम सुलतानांना तुम्ही अशी दहशत बसवा की हिंदूंचा विजय होताच मुसलमानांनी आमची ज्या प्रकारे विटंबना केली त्याच प्रकारची विटंबना मुसलमान स्त्रियांचीही केली जाअील. अशा प्रकारे हिंदु विजयी होताच मुस्लिम स्त्रियांवरही प्रत्याचार केला जातो, अशी दहशत मुसलमानांना बसली की मग पुढील मुसलमान

विजेते हिंदु स्त्रियांवर अत्याचार करण्यास धजणार नाहीत.'' पण, शत्रुस्त्रीदाक्षिण्याच्या सद्गुण विकृतीपायी शिवाजीमहाराज किंवा चिमाजीअप्पा तसा प्रत्याचार मुस्लिम स्त्रियांवर करू शकले नाहीत.

हिंदूंच्या त्या काळच्या ह्या स्त्रीदाक्षिण्याच्या धर्मघातक धर्मसूत्रामुळेच मुस्लिम स्त्रियांनी केलेल्या लाखो हिंदु स्त्रियांच्या अनन्वित छळाचे पारिपत्यापासून त्यांचे संरक्षण करण्यास त्या मुस्लिम स्त्रियांचे 'स्त्रीत्व' ही अेकच ढाल काय ती पुरेशी ठरली.

त्यातही मुस्लिम स्त्रीला हिंदु करून घरात घेणे, हे कृत्य स्वत: ते हिंदूच पाप समजत. मुस्लिम स्त्रीच्या संबंधामुळे आपण बाटून हिंदूचे मुसलमान होअून बसू अशी हिंदूंचीच बुळगी समजूत असल्याने प्रत्यक्ष हिंदुराज्यांतून निवसत असताना सुद्धा मुस्लिम स्त्रियांना हिंदुकडून पळविले जाण्याचे किंवा बळाने हिंदू केले जाण्याचे लेशमात्र भय अुरलेले नसे. अपवाद अगदी विरळा.

अशा परिस्थितीत शतको-शतके हिंदू स्त्रियांवर अनन्वित अत्याचार करण्याच्या आणि त्यांना बाटविण्याच्या अधम अपराधाचा यथोचित दंड त्या मुस्लिम स्त्रीसमाजास केव्हाही देण्यात आलेला नव्हता. आणि म्हणूनच हिंदू स्त्रियांना बळाने बाटविण्याचा मुस्लिम स्त्रीसमाजाचा दुष्ट खटाटोप निर्वेधपणे त्या शतको-शतकांच्या प्रदीर्घ कालखंडात साऱ्या हिंदुस्थानात सारखा चालत राहिला.

परंतु जर मुसलमानांची आक्रमणे चालू झाली त्या वेळेपासूनच मुस्लिम स्त्रीसमाजाने केलेल्या हिंदू स्त्रियांच्या राक्षसी विटंबनेच्या निष्कृतीसाठी हिंदू लोकही, त्यांना जे रणांगणांत मुस्लिमांवर प्रभावी जय मिळत त्या त्या वेळी तरी, त्या मुस्लिम स्त्रीसमाजाचेही पारिपत्य कठोरपणे करीत जाते, हिंदू स्त्रियांची त्या मुस्लिम शत्रूंनी जी जी दुर्दशा केली तशी तशी दुर्दशा त्या मुस्लिम स्त्रियांचीही करते, मुस्लिम स्त्रियांना प्रसंगी बळाने सुद्धा हिंदू करून हिंदू समाजात घरोघर पचवून टाकते तर ? तर, ह्या हिंदूंच्या प्रत्याक्रमणाच्या नि प्रत्याचाराच्या संभवनीय भयाने मुस्लिम स्त्रिया मुस्लिमांचे विजय होत तेव्हा सुद्धा हिंदु स्त्रियांवर अत्याचार करण्यास कदापि धजत्या ना. भयाने चळचळ कापू लागल्या असत्या. आज आम्ही हिंदु स्त्रियांना बाटविल्या, छळल्या, बटकी केल्या तर अुद्या वा परवा हिंदूंना विजय मिळताच आमची आणि आमच्या मुलीबाळींचीही तीच ताटातूट, विटंबना नि दुर्दशा करण्यास हिंदुसमाजही गावोगाव नि घरोघरी सोडणार नाही, सोडीत नाही. हिंदुस्त्री-पीडनाच्या भीषण दंडापासून आमची 'स्त्रीत्वाची ढाल' सुद्धा आमचे लवलेशही संरक्षण करू शकत नाही, अशी धास्ती मुस्लिम स्त्रीसमाजाने हिंदु-मुस्लिम युद्धकाळाच्या पहिल्या दोन-तीन शतकांतच जर खाल्ली असती तर आमच्या लाखो निरपराध हिंदु-भगिनी-माता-कन्यकांना जी दुर्दशा पुढे शतकानुशतके भोगावी लागली ती केव्हाही भोगावी लागली नसती. आमची स्त्रीसंख्या म्हणजेच त्यांच्या अुदरी अुत्पन्न होणाऱ्या आमच्या राष्ट्रीय संततीचे संख्याबळ घटते ना! अुलट, आमच्या त्या काळच्या कट्टर शत्रूंची - मुस्लिमांची स्त्रीसंख्या वाढती ना. म्हणजेच त्यांच्या अेकंदर समाजाचे संख्याबळ ठिकठिकाणी आटून गेल्यावाचून राहते ना! ते का नि कसे ह्याचे समाजशास्त्रीय स्पष्टीकरण मागे केलेलेच आहे. परंतु पात्रापात्रविवेकशून्य अशा शत्रुस्त्रीदाक्षिण्याच्या भ्रमिष्ट कल्पनेने पछाडलेल्या त्या कालखंडातील हिंदूंनी मुसलमानांच्या लाखो स्त्रिया अवश होअून त्यांच्या हाती अनेकदा आल्या असताही त्यांना त्यांच्या अत्याचारास्तव तसातसाच प्रत्याचाराचा असा कडक अुपाय योजिला नाही.

## ह्या शत्रु-स्त्री-दाक्षिण्यापायीच हिंदूंची मुस्लिमांची केलेली अधिकाधिक दुर्दशा !

पुन्हा, हिंदूंच्या ह्या देशकालपात्रविवेकशून्य शत्रु-स्त्री-दाक्षिण्याचा मुस्लिमांवर काहीतरी अनुकूल परिणाम झाला होता का? हिंदूंच्या त्या धार्मिक अुदारपणामुळे' मुसलमानांना त्यांच्या परस्त्री-विटंबनाच्या पापाची काहीतरी लाज वाटली का? मुसलमानांच्या राजकन्यादि पाडाव झालेल्या सहस्त्रावधी स्त्रियांना हिंदूंनी सुरक्षितपणे वारंवार त्यांच्या घरोघर परत पोचवून दिले, याविषयी मुसलमानांनी त्यांचे कधी अुपकार मानले का? मुळीच नाही, केव्हाही नाही! अुलट हिंदु आपल्या ह्या शत्रु-स्त्री-दाक्षिण्याचा जेव्हा सद्गुण म्हणून बडेजाव करू पाहात तेव्हा तेव्हा मुसलमान फिरून फिरून तेच अत्याचार करून त्यांची सक्रिय टर अुडवीत.

जर स्त्री-दाक्षिण्याची हिंदूंनी प्रतिष्ठा वाटत असती तर त्या त्यांच्या स्त्रीदाक्षिण्याच्या सद्‌गुणावर प्रथम अधिकार त्यांच्या स्वतःच्या माता, भगिनी, पत्नीचाच होता. पण आम्ही मुसलमान त्यांच्या डोळ्यादेखत त्यांच्या अशा बहिणींना, बायका-मुलींना शतकोशतके सहस्त्रावारी बलात्कारीत नि बाटवीत येत असताही त्या हिंदू स्त्रियांना स्त्री-दाक्षिण्यासाठी तरी आमच्या हातून सोडविण्याची छाती हिंदूंना झाली नाही.'ज्यांच्या अंगी आपल्या स्वतःच्या स्त्रियांना दाक्षिण्य दाखवण्याअितकेही पौरुष नाही ते हे बुळगे हिंदू आम्हा कडव्या मुसलमानांच्या स्त्रियांना म्हणे केवळ परस्त्रीदाक्षिण्याच्या पवित्र भावनेने छळीत नाहीत, स्पर्श करीत नाहीत! त्यांना म्हणावे प्रत्यक्ष हिंदुराज्यात निवसत असणाया कोणत्याही मुस्लिम स्त्रीकडे वाकड्या दृष्टीने पहा तर खरे! कोणत्याही मुस्लिम स्त्रीकडे डोळा अुघडून पाहणाऱ्याचे ते डोळेच मुसलमान तत्काळ फोडून बाहेर काढतील, ह्या भीतीसाठी हे बुळगे हिंदू आम्हा मुसलमानांच्या स्त्रियांना स्पर्श करू शकत नाहीत, त्यांच्या परस्त्रीदाक्षिण्याच्या व्रतामुळे नव्हे!' असा हिंदूंच्या ह्या स्त्रीदाक्षिण्याच्या अैटीचा अुलटा अन्वयार्थ लावून मुसलमान अधिकच शेफारत गेले आणि त्यांचे हिंदु स्त्रियांवरील अधमाधम अत्याचार आणि लक्षावधी हिंदु स्त्रियांची अपहरणे हिंदूंच्या ह्या प्रकरणीची प्रत्याचारशून्यता पाहून अधिकच चेकाळत गेली.

## मुस्लिम-पूर्वकाळी आमचे पूर्वज शत्रू–स्त्री-दाक्षिण्याचा असा राष्ट्रघातक नि बुळगा अर्थ करीत नसत!

जो चावायला आला तो साप ठेचलाच पाहिजे मग तो नाग असो किंवा नागीण (ज्या शत्रूच्या स्त्रियांनी आमच्या माता-भगिनींना बळाने बाटवून बटकी करून सोडले त्यांचे स्त्रीत्व त्या आततायी कृत्यानेच स्पष्ट होत होते. स्त्री-दाक्षिण्यावरचा त्या आततायी मुस्लिम स्त्रीसमाजाचा अधिकार तिथेच संपून आततायीपणाच्या कठोर दंडावाचून दुसऱ्या कशावरही त्यांचा अधिकार अुरत नसे. यास्तवच जेव्हा ऋषिजनांच्या हत्या करणाऱ्या नि यज्ञयाग विध्वंसिणाऱ्या राक्षसांसह त्राटिका रामावर चालून आली, तेव्हा रामचंद्राने तत्क्षणात तिला ठार मारून टाकिली. शूर्पणखा राक्षशीण सीतेला कोवळ्या काकडीसारखी खाअून टाकण्यास जेव्हा धावली तेव्हा लक्ष्मणाने तिचे नाक - कान कापून तिला परत धाडून दिले. परस्त्री - दाक्षिण्यासाठी तिची खणानारळांनी ओटी भरून नव्हे. नरकासुराने आर्यांच्या सहस्त्रावधि स्त्रिया पकडून त्यांच्या असुर राज्यात (आजच्या असिरियामध्ये) नेल्या हे पाहताच श्रीकृष्णाने त्या असुरावर स्वारी करून त्याला युद्धात ठार मारले. आणि हा सामरिक आणि राजकीय सूड अुगवूनच काय ते थांबले नाहीत, तर ज्या सहस्त्रावधि आर्य स्त्रिया त्या असुराच्या बंदीत बळाने कोंडून राबविल्या जात होत्या त्यांना सोडवून परत आपल्या राज्यात आणून, सामाजिक सूडही अुगविला. त्या आर्यस्त्रिया असुरांनी बळाने बाटविल्या, भ्रष्टविल्या, अेवढ्यासाठी त्या आपल्या सहस्त्रावधी राष्ट्रभगिनींना 'त्याही बाटल्या' असे समजणाऱ्या पौरुषशून्य दुधखुळेपणापायी त्यांना असुरांच्या हाती सोडून काही श्रीकृष्णाचे सैन्य परत फिरले नाही, तर अुलट त्या सहस्त्रावधी स्त्रियांना आपल्या राष्ट्रात परत आणून प्रतिष्ठेने स्वसमाजात संस्थापून, स्वतः 'भूपति' या नात्याने त्यांच्या पालनपोषणाचा नि संरक्षणाचा सारा भार श्रीकृष्णाने स्वतः आपल्याकडे घेतला. आपल्या राष्ट्राचे स्त्रीवर्गीय संख्याबळ घटू दिले नाही. श्रीकृष्णाच्या ह्या 'भूपतित्वा' च्या कर्तव्यासच आपल्या पौराणिक वर्गाने लाक्षणिक अद्भुत तत्त्वाचे पुट चढवून श्रीकृष्ण त्या सहस्त्रावधि स्त्रियांचा 'पति' झाला, म्हणजे त्याने त्यांच्याशी लग्न लावले अशी लोककथा पुढे वर्णिली असावी हे अुघड आहे.

वरील पौराणिक काळापुढच्या यवन, शक, हूणांच्या काळी तर त्या परकीय शत्रूंच्या, कोणीही सेनानीचा, राजाचा किंवा महाराजाचा लढाअीत पराजय करताना त्या परशत्रूच्या राजकन्यकांशी आमचे तत्कालीन पौरुषशाली विजेते हटकून प्रकटपणे विवाह करीत. ती परंपरा सम्राट चंद्रगुप्त मौर्यापासून तो गुप्त सम्राटांपर्यंत अव्याहत चाललेली दिसते. शालिवाहन राजेही विजित शक - राजकन्यांशी विवाह करीत असत. नुसते आमचे विजेते राजेच नव्हते, तर आमच्या त्या काळच्या भारतीय सामंतापासून तो सामान्य नागरिकांपर्यंतही आमचे लोक यवन, शक, हूणांच्या, परकीय स्त्रियांशी बेखटपणे लग्न लावीत. कारण त्या परकीय स्त्रियांना आणि त्यांच्यापासून झालेल्या संततीलाच नव्हे, तर ते परकीय समाजाचे समाज आमच्या धर्मात नि आमच्या संस्कृतीत आत्मसात् करून टाकण्याअितके आमच्या राष्ट्राचे पौरुष, पचनशक्ती आणि पराक्रम ही त्या काळापर्यंत प्रखर होती.

## शुद्धिबंदीचे दुष्परिणाम

आपली जात नि धर्म शुद्ध रहावी ह्या भ्रामक कल्पनेने त्या काळचा हिंदु समाज रोटीबंदी, बेटीबंदी प्रभृती आचार आपण होऊन आणि स्वधर्म म्हणून ते आचार हिंदूना हानिकारक असूनही स्वकर्तव्य म्हणून पाळीत होता. त्याचप्रमाणे आणि त्या कार्यासाठी म्हणजे आपली जात शुद्ध रहावी याच कारणासाठी ही शुद्धिबंदी आणि तीतूनच अुदभवलेले सिंधुबंदी, हे दोन नवीन धर्माचारही हिंदु समाज आपल्या स्वतःच्या अिच्छेने धर्मकर्तव्य म्हणून कट्टरपणे पाळू लागला. जो हिंदु अेकदा मुसलमानांकडून बळाने का होओीना, पण बाटविला गेला त्यास तर काय, परंतु त्याच्या वंशजांनाही परत हिंदुधर्मात घेणे नाही, त्या पापास शुद्धीचे प्रायश्चित नाही; हीच आपल्या हिंदुधर्माची आज्ञा आहे अशी भावना हिंदुसमाजाच्या रक्तातच पिढ्यानपिढ्या भिनून राहीली होती. अत्यंत तुरळक अपवाद सोडता भंगीजातीपासून ब्राह्मण जातीपर्यंत, छत्रपतीपासून पथपतीपर्यंत शंकराचार्यापासून ते शंखाचार्यापर्यंत, प्रबुद्ध काय, आणि निर्बुद्ध काय हिंदुमात्राचे ह्या शुद्धिबंदीच्या धर्माचाराविषयी काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत अेकमत झालेले होते.

ह्यापायीच, आपला हिंदुधर्म मुसलमानांकडून भ्रष्टविला जाअू नये म्हणून, आमच्या सहस्रावधी हिंदु स्त्रियांनी शतकानुशतके ज्या जोहाराच्या चिता धगधगत्या ठेवल्या, परधर्मीयांकडून आपले देह भ्रष्टविले जाअू नयेत म्हणून लक्षावधी हिंदु स्त्री-पुरुषांनी निरुपाय म्हणून देशातील सर्व नद्यांतून, तळ्यांतून नि विहिरींतून अुड्या घेअून जीव दिले, स्वतःची लहान लहान लेकरे अुराशी धरून स्वतःस जाळून घेतले आणि या लक्षलक्ष हिंदूंनी नाना प्रकारे मुसलमानांच्या हाती सापडण्यापूर्वीच आपल्या हाताने आपले प्राणनाश करून घेतले किंवा मुसलमानांच्या हाती सापडल्यानंतरही 'मी मुसलमान होत नाही जा!' म्हणून वीर गर्जना करीत छत्रपती संभाजीसारखे, गुरु तेगबहादूर प्रभृती आमच्या शीख धर्मबंधूंच्या अनेक गुरुवर्यांसारखे, धर्मवीर बाबा बंदा बैराग्याप्रमाणे मुसलमानांनी देहाच्या मासाचे लचके तोडून तोडून हाल हाल करून ठार मारले तरी ज्यांनी स्वधर्म सोडला नाही, त्या सर्व अपूर्व बलिदानाचे कृतज्ञ स्मरण आम्हास झाल्यावाचून कसे राहील? मुसलमानांच्या राक्षसी अत्याचारांच्या पायी हिंदुजातीने स्वधर्मासाठी अशा प्रकारे जे बलिदान केले, या बलिदानाने जातिभेद, शुद्धिबंदी, सद्गुणविकृती अित्यादी भ्रामक कल्पनांपायी का होओीना, पण बलिदान केले, त्याहून जगताच्या अितिहासात अधिक संख्येने किंवा अधिक कट्टरपणाने क्वचितच कोणा जातीने त्यांच्या धर्मासाठी केले असेल! त्या लक्षावधी हिंदूंचे बलिदानही मुसलमानांचे हातून हिंदुधर्म रक्षिण्याच्या कार्यी काही साहाय्य केल्यावाचून व्यर्थ गेले असे नाही. त्यांच्या बलिदानाच्या त्या गाथाही आमच्या हिंदुराष्ट्राच्या पिढ्यानपिढ्यांना धर्मरक्षणार्थ प्राणार्पण करण्याची स्फूर्ती देत राहिल्या. हेही काही थोडे नाही!

ह्या शुद्धिबंदीच्या नि जातिबहिष्काराच्या धर्मचारांचे राष्ट्रीय परिणाम कितीही अहितकारक ठरले असले आणि त्यासाठी त्या रूढीवर कितीही कठोर टीका करणे अवश्य असले तरी आम्ही हिंदूंनी हे विसरता कामा नये की, त्या काळच्या हिंदु जगताने स्वजातीचे नि स्वधर्माचे पावित्र्य विटंबिले जाअू नये या सद्हेतूनेच ते धर्माचार अवलंबिले होते. ह्या शुद्धिबंदीपायी नि जातिबहिष्कारापायी लक्ष लक्ष हिंदूंनी अपरंपार यातना पिढ्यानपिढ्या भोगल्या. पण त्यांनी जे ब्रीद स्वकीय धर्म म्हणून प्रामाणिक निष्ठेने अंगीकारले होते ते सोडले नाही. मुस्लिमांच्या हातचे अन्न खाल्ले, पाणी प्यायले शरीरसंबंध घडला - मग ते सर्व मुस्लिमांच्या अत्याचाराने बलपूर्वक घडविले का असेना - की त्या हिंदूला आपआपल्या कुटूंबातून, समाजातून जे बहिष्कृत केले जाओी, जन्माचे हुसकून दिले जाओी ते काही सुखासमाधनाने थोडेच होते? जिवापलीकडे जतन करून वाढविलेली ती आपली मुले-लेकरे, लेकी-सुना, रक्ताचे बंधु-बांधव त्या अत्याचारी परशत्रुंच्या तावडीत सापडून आज बाटविले जाताच दुसऱ्या दिवशी जरी ते परत घरी आले तरी त्यांना त्यांचे आओी-बाप, आप्त-अिष्ट धडाधड दारे बंद करून आपला तरी धर्म बाटू नये म्हणून निरुपायाने हुसकून देत तेव्हा त्या आाओीबापांच्या नि आप्तेष्टांच्या जिवास कोण यातना होत असतील, मन कसे मायेने व्याकुळ होत असेल, अेकमेकांच्या वियोगाच्या दुःखाने झुरून झुरून कितीक आओीबाप, पतिपत्नी, बंधुबांधव मरणी मरुन गेले असतील ते कुठवर वर्णावे!

पण -

**त्यजेदेकं कुलस्यार्ते ग्रामस्यार्थे कुलं त्यजेत् ।।**
**ग्रामं जनपदस्यार्थे धर्मार्थे पृथिवीं त्यजेत ।।**

अशा वीरोदात्त बुद्धीनेच काय त्या मूलतः प्रचलविलेल्या शुद्धिबंदीचे न जातिबहिष्काराचे धर्माचार त्या काळचे कोटिकोटि हिंदू पाळीत राहिले. त्यापायी ज्या अनंत यातना त्यांनी भोगल्या त्याविषयी आम्ही हिंदूंनी कृतज्ञताच बाळगली पाहिजे. त्या रूढींनी 'स्वधर्म' मानण्यात त्यांची बुद्धी चकली, पण निष्ठा चकली नाही. औषध म्हणून चुकून विषाचा प्यालाच पाजला गेला. पण हेतू औषध देण्याचा होता, हिंदुजातीचे जीवन रक्षिण्याचा होता. अशा स्वधर्मरक्षणाच्या प्रामाणिक हेतूने त्यांनी जी दारुण दु:खे भोगली त्याविषयी कृतज्ञतेचे दोन शब्द तरी लिहिल्या वाचून आम्हास राहवत नाही.

## राष्ट्रघातक, भ्रमिष्ट नि भोंगळ घोषणा!

मुस्लिमांची धर्मसत्ता अुखडून टाकू शकते असे जे साधन त्याकाळी हिंदूंना केव्हा केव्हा अुपलब्ध होअू शकते, ते म्हणजे मुसलमानांनी केलेल्या शतावधी धार्मिक आक्रमणात त्यांनी जशी सहस्रावधी हिंदूंची सरसकट कापाकापी करून अनेक नगरे नि ग्रामे निर्हिंदू करण्याचे अत्याचार केले, त्याचप्रमाणे जेव्हा जेव्हा हिंदूंची शस्त्रशक्ती बलवत्तर होअी तेव्हा तेव्हा हिंदूंनीही तशीच सशस्त्र धार्मिक प्रत्याक्रमणे करून मुस्लिमांचे सरसकट शिरकाण करीत, साधेल तितका प्रदेश, निर्मुस्लिम करून टाकणे, हे होते. जर हिंदूंनी असे सशस्त्र प्रत्याक्रमण केले असते तर त्यांना शुद्धिबंदीचा धर्माचारसुद्धा आडवा येता ना! कारण, तेथे मुसलमानांसमवेत खाण्यापिण्याचा किंवा जाति- संव्यवहाराचा प्रश्नच नव्हता. मुसलमानांना नामशेष करून टाकण्याचा काय तो प्रश्न होता पण....! पण शुद्धिबंदीचा हिंदुधर्माचार त्या त्या मार्गात आडवा आला नसता तरी परधर्मसहिष्णुतेचे हिंदूंचे आत्मघातक ब्रीदच आडवे येते! 'सर्वधर्म समान आहेत,' 'रामरहीम अेक है.' 'ज्याचा धर्म त्याला पाळू द्यावा,' 'परधर्मसहिष्णुता हीच आमची धर्माज्ञा, हाच आमच्या हिंदुजातीचा अनन्यसामान्य गौरव!' अशी प्रौढी मारण्याची खोड अगदी प्राचीन कालापासून स्वतः हिंदूंनाच जडलेली होती.

पराभूत आणि हतबल अशी लक्ष लक्ष मुस्लिम प्रजा प्रबळ झालेल्या हिंदूंच्या सत्तेखाली जेव्हा जेव्हा अधूनमधून येत असे त्यावेळी त्या मुस्लिमांवर हिंदूंवर पूर्वी झालेल्या अत्याचारांचा सूड अुगविण्यासाठी मुसलमान हिंदूंचा करीत-त्याप्रमाणे त्यांचा सरसकट शिरच्छेद करून टाकण्याची तर गोष्टच दूर, पण ते परधर्मीय आणि अल्पसंख्यांक म्हणूनच त्या मुस्लिम प्रजेला काडीअितकाही धार्मिक अुपद्रव हिंदूंकडून होत नसे. अुलट त्यांना आपल्या धर्माचा व्याप नि वैभव सुखाने वाढविता येअी. हिंदू नागरिकांप्रमाणेच नव्हे, तर अधिक सौम्यपणे नि सवलतीने मुस्लिम नागरिकांना त्या त्या काळच्या हिंदूंच्या राज्यात नैर्बंधिक अधिकार भोगता येत. त्या वस्तुस्थितीलाही अितिहासाच्या पानापानाच्या आधार आहे.

आणि ह्याच वस्तुस्थितीकडे मोठ्या अभिमानाने बोट दाखवून 'पहा' आमचा हिंदूधर्म किती परधर्मसहिष्णु आहे; सहिष्णुता हा आमच्या हिंदुधर्माचा भूषणास्पद नि विशेष सद्गुण आहे!' म्हणून त्या काळचे ते ते हिंदुराजे आणि सारे हिंदुजगत मोठ्या प्रौढीने आत्मस्तुती करीत असत. ह्या गोमुखी हिंदुधर्माच्या परधर्मसहिष्णु अनुयायांकडून त्या व्याघ्रमुखी मुस्लिम धर्माच्या अनुयायांवर धार्मिक प्रत्याक्रमण होण्याची आणि त्या मुस्लिम समाजाचे निःशेष निखंदन केले जाण्याची लवलेशही शक्यता नव्हती, हे काय सांगावयास हवे?

परधर्मसहिष्णुता! आणि हा सद्गुण! जेथे तो परधर्म आपल्या स्वधर्माशी सहिष्णुतेने वागत असेल तेथे त्या परधर्माशी सहिष्णुतेने वागणे हा सद्गुण असू शकेल; परंतु त्या मुस्लिमांचे महंमद गझनीपासूनचे सुलतानामागून सुलतान, शहा, बादशहा आपल्या तख्तावर' बसताना आपल्या गौरवार्थ काफरांच्या हिंदुधर्माचा अुच्छेद करून टाकणे हाच माझा धर्म आहे, हीच माझी प्रतिज्ञा आहे, अशी शपथ घेअूनच 'तख्तावर' बसत आले; आणि अशी अत्याचारी धार्मिक आक्रमणे हिंदूंवर अेक सहस्र वर्षे करीत आले; अशा राक्षसी धर्मीयांशी परधर्मसहिष्णुतेने वागणे म्हणजे स्वधर्माच्या गळ्यावर स्वहस्ते सुरा चालविणे होते! ती परधर्मसहिष्णुता नसून अधर्मसहिष्णुता होती! ती सहिष्णुता नसून षंढपणा होता! पण हे सत्य अेक

सहस्र वर्षांच्या अघोर अनुभवानंतरही त्या काळच्या हिंदूंच्या ध्यानी आले नाही. ते तशा धर्माशीही सहिष्णुतेने वागणे, हा स्वधर्म समजत. हिंदुजातीचा भूषणभूत नि विशिष्ट 'सद्‌गुण' समजत!

हे हिंदुजाती! तुझ्या अध:पतनास कारणीभूत झालेल्या दुर्गुणांपैकी प्रमुख दुर्गुण जर कोणता असेल तर हे तुझे 'सद्‌गुणच' होत!

अहिंसा, दया, शत्रुस्त्रीदाक्षिण्य, शरणागत शत्रूला अभयदान, क्षमा वीरस्य भूषणम्, परधर्मसहिष्णुता अित्यादी सद्‌गुणांच्या देशकालपात्राचा विवेक न करता तू केलेल्या नेभळ्या नि आंधळ्या अवलंबनानेच तुझ्या त्या सहस्रवर्षव्यापी हिंदु-मुस्लिम महायुद्धामध्ये धार्मिक क्षेत्रात असा भयंकर पराभव झाला. कारण.

**पात्रापात्रविवेकशून्य: आचरिला जरी सद्‌गुण ।।**
**तो तोचि ठरे दुर्गुण । सद्‌धर्म घातक ।।१।।**

## प्रकरण ५ वे

# मुसलमानांच्या ह्या राक्षसी धार्मिक अत्याचारांवर रामबाण अुपाय होता अेकच!

### तो म्हणजे सवाअी राक्षसी

### प्रत्याचार! प्रत्याक्रमण!

मुसलमानांनी आक्रमणांवर आक्रमणे करून हिंदुधर्माचा केवढा अुच्छेद मांडला आणि हिंदूंच्या लाखो स्त्रीपुरुषांना बाटवून त्यांच्या संख्याबळाची केवढी हानी केली आणि ती भरून काढण्यास हिंदूसमाज त्यांच्या जातिभेद, शुद्धीबंदी, सद्‌गुणविकृती अित्यादी नेभळट, धर्मभोळ्या आणि राष्ट्रघातक आचारांमुळे कसा असमर्थ झाला हे वृत्त वरील प्रकरणांतून दिलेले आहे. जर हिंदूंच्या संख्याबळाची हानी करणाऱ्या त्यांच्या त्या शुद्धीबंदी, सद्‌गुणविकृती अित्यादी आत्मघातक रूढींना, ज्यांना त्या काळचा सारा हिंदूसमाज आपला प्रत्यक्ष धर्म तो हाच म्हणून मानी आणि त्या आचारांना शिकविणाऱ्या त्या वेळच्या पोथ्यांनाच आपली 'शास्त्रे' म्हणून सन्मानी, त्या सर्व पोथीजात जंजाळाच अुच्छेद करण्याचे धैर्य या वा त्या प्रमाणात अंगी असणारे दूरदर्शी सुधारक, राजनीतिज्ञ, धर्मज्ञ, मोठमोठे विचारवंत आणि कृतिवीर अधूनमधून का होअीनात, पण हिंदूसमाजात तसल्या आंधळ्या युगातही निघते ना आणि आपल्या प्रभावाने राष्ट्राला धर्मरक्षणाचा पराक्रमी मार्ग दाखविते ना आणि आपल्या म्लेंच्छ शत्रूवर त्या धार्मिक समरात मात करते ना, तर हिंदूधर्माच्या संख्याबळाचा आणि म्हणूनच त्या हिंदूराष्ट्राचाही संपूर्ण ऱ्हास झाल्यावाचून राहिला नसता.

### महर्षि देवल आणि भाष्यकार मेधातिथी

अशा विचारवीरांपैकी, त्या काळच्या अुपलब्ध असलेल्या माहितीप्रमाणे अगदी आज जे आपल्या तेजाने, दृष्टी अचूकपणे स्वतःकडे आकर्षून घेतात ते म्हणजे महर्षि देवल आणि मनुस्मृतीचे भाष्यकार मेधातिथि हे होत. त्यांचे ग्रंथ जे आज अुपलब्ध आहेत त्यांवरून हे स्पष्टपणे सिद्ध होते की, मुसलमानांनी सिंधमध्ये केलेल्या धार्मिक अत्याचारांच्या आणि मुसलमान पंजाबपर्यंत हिंदूंची राज्ये जिंकीत गेल्याच्या मध्यंतराच्या काळात हे दोन्ही ग्रंथ हिंदुराष्ट्राला त्या आपत्प्रसंगीही पराक्रमी आणि विजिगीषु असे नवीन आचार, नवी शास्त्रे आणि नवी शस्त्रे पुरविणारे रचिले गेले.

त्या वेळच्या स्मृत्यांतून दिलेले आचारधर्म मुसलमानांनी सिंधवर स्वारी करून हिंदु स्त्री-पुरुषांना सशस्त्र बळाने मुसलमान करण्याचे जे भयंकर आक्रमण चालू केले त्याला तोंड देण्यास किंवा त्याचा प्रतिकार करण्यास सर्वत्तोपरी असमर्थ आहेत, असे पाहून मुसलमानांनी हिंदुधर्मीय संख्याबळाची केलेली हानी भरून काढण्याअितका तरी आपला आचारधर्म सुधारलाच पाहिजे म्हणजेच धार्मिक अत्याचारला धार्मिक प्रत्याचाराने तोंड दिलेच पाहिजे असा तेजस्वी निर्धार करणारा ब्राह्मण क्षत्रियादिक कर्त्या हिंदू पुरुषांचा अेक वर्ग सिंधमध्येच प्रथमतः संघटित झाला असला पाहिजे, हे देवल स्मृतीमधल्याच श्लोकांवरून अुघड दिसते :

**सिंधुतीरमुपासन्नम देवलं मुनिसत्तमम् ।।**

ह्या चरणावरून चालू होणाऱ्या धर्म-भ्रष्टीकरणाच्या प्रकरणातूनच स्पष्ट दिसते. सिंधुनदीचे काठी असलेल्या श्रीदेवलऋषींच्या आश्रमातील समुपस्थित हिंदू पुढाऱ्यांनी देवल ऋषींना प्रश्न केला की, 'म्लेंच्छांनी जो सशस्त्र धर्मछळ चालविला आहे, त्याला बळी पडलेल्या, बाटवून मुसलमान झालेल्या हिंदूंच्या सहस्त्रावधि स्त्री- पुरुषांना काहीतरी प्रायश्चित देअून परत मुसलमानांचे हिंदू करून घेता येअील काय?' असा त्या त्या वेळी झालेल्या चर्चेचा आणि देवल ऋषींनी आपल्या आपल्या स्मृतीमध्ये अंतिमतः अधिकारयुक्तपणे दिलेल्या नव्या शुद्धीकरणाच्या अनुकूल असलेल्या आचारांचा देवल स्मृतीतील श्लोकांमधून स्पष्ट अुल्लेख केलेला आहे. त्याकाळी अगदी सनातन म्हणून मानल्या गेलेल्या शुद्धीबंदीच्या

हिंदूंच्या आचारांमुळे हिंदूंच्या संख्याबळाचे भयंकर नुकसान होत आहे हे पाहून ते शास्त्रीय आचारच आपत्काली शास्त्रबाह्य म्हणून ह्या नवीन स्मृतिग्रंथाच्या प्रेरकांनी, लेखकांनी अनुयायांनी ठरवून टाकला.

आपद्धर्म म्हणून अेक प्रगतिशील आणि केव्हाही प्रतिकूल परिस्थिती येताच तिला चटकन तोंड देअू शकणारे अेक अप्रतिम शस्त्रच आमच्या धर्मशास्त्राच्या शस्त्रागारात संसिद्ध असे.

त्या शस्त्राचा वेळचे वेळी अुपयोग करणारा नेतृवर्ग तेवढा निघणे अवश्य असे. या हिंदू-मुस्लिम धर्मसंघर्षाच्या आपदेत सामुदायिक प्रमाणातच ते आपद्धर्म प्रथमच पुनरुज्जीविले असते तर हिंदूधर्मच मुसलमानी धर्माचा भारतातून आमूलात अुच्छेद करून टाकता! जसा पराक्रमी (म्हणजे शत्रूवर आक्रमण करणाऱ्या) दिग्विजिगीषु देवांनी, आर्यांनी राक्षसांचा करून टाकला. तथापि, त्या मानाने जरी तशी धार्मिक तेजस्विता हिंदुसमाजाकडून सामुदायिकरीत्या दाखविली गेली नाही तरी सिंधमधील या देवल ऋषींच्या क्रांतिकारक धर्मसुधारकांत मात्र तशी काही अंशी आढळून आली खरी! देवल ऋषींचा काळ सन ८०० ते ९०० असा मानण्यात येतो.

त्या तशा धार्मिक तेजस्वितेमुळेच देवलस्मृतीत शुद्धिबंदीच्या रूढीस वा शास्त्रास ठोकरून देअून त्यावर प्रायश्चिताची तोड काढली. मुसलमानांनी बळाने बाटविल्यानंतर त्या हिंदू स्त्री-पुरुषाने अमुक अेका वर्षाच्या आत जर आपण प्रायश्चित्तपूर्वक हिंदुधर्मात परत येण्याची अिच्छा प्रदर्शित केली तर त्याला अुपासादिकांची साधी व्यवहारी प्रायश्चित्ते देअून समाजाने त्यांना परत हिंदुधर्मात घ्यावे असे देवलस्मृतीत आज्ञापिले आहे. स्त्रियांविषयी तर या स्मृतीतील अुदारता त्या कालमानाने प्रशंसनीय आहे. मुसलमानांपासून बलात्काराने बाटलेल्या किंवा त्यांच्या घरी बटकी म्हणून राबविलेल्या हिंदू स्त्रियांनाही केवळ त्यांचे मासिक ऋतुदर्शन पुन्हा झाले की, त्यांना शुद्ध समजून हिंदूसमाजात पूर्णपणे सामावून घ्यावे. मुस्लिमांच्या हातून सोडविलेल्या अशा गर्भवती हिंदूस्त्रीलासुद्धा तिचे पोटातील ते 'शल्य' प्रसूतीनंतर निघून जाताच तिलाही हिंदूंनी तसेच शुद्ध मानावे की जसे अग्निपरीक्षेच्या कसोटीस अुतरलेल्या सुवर्णाच्या लगडीला समजले जाते!

बाटलेली हिंदू स्त्री आपल्या जातीचे संख्याबळ घटू नये म्हणून युद्ध करून परत घेण्याची अितकी आतुरता असणाऱ्या या देवलस्मृतीतही तिच्या पोटी अुत्पन्न झालेले ते म्लेंच्छबीजाचे मूल मात्र शुद्ध करून हिंदू जातीत घेण्याची काहीही व्यवस्था कशी केली नाही आणि कां केली नाही, याचे मात्र आश्चर्य वाटते. आम्हांला जेव्हा बंगालमधील हिंदूंची ही अेक चाल कळली की, कुटुंबात बहिष्कार्य अशी बालविधवा-प्रसूतीची किंवा कुमारिका संकराची अेखादी घटना जर घडली तर त्या कुटुंबाची प्रकट विटंबना होअू नये आणि हिंदूजातीलाही काही त्या पापाचा संपर्क भोवू नये, त्या सदिच्छेने शास्त्रीवर्गाने अशी तोड काढली होती की, त्या कुटुंबाने त्या गावाच्या नदीच्या पल्याड असलेल्या गावात जो मुसलमानांचा वाडा असेल त्यातील काही मुसलमानांना बोलावून आणून त्यांच्या ओटीत ते त्या हिंदू महिलेला झालेले अधर्म्य मूल घालावे आणि त्याला नीट सांभाळावे म्हणून 'आता हे तुमचेच मूल झाले' असे निवेदून अर्पावे. मुसलमानांनीही आनंदाने त्यांचे संख्याबल अशा हिंदू मुलाने वाढते असे हेरून अशी मुले आनंदाने स्वीकारावीत. पण आपले बळ त्याच मानाने घटते हे मात्र त्या बावळट, पापभीरूपणाच्या आहारी पडलेल्या हिंदूंना कळत नसे! ही रीत बंगालमध्येही देवलस्मृतीतील हे संकरज अपत्य मुसलमानांस देअून टाकण्याच्या धर्माचारास आज्ञापिणाऱ्या असल्या कोणातरी स्मृतींनी रूळविले होते, असे देवल स्मृतीचे हे अुदाहरण पाहिल्यानंतर आमच्या ध्यानांत आले.

जातिभेद, शुध्दीबंदी किंवा शुध्दीकरणाला अनुकूल असलेल्या धीट सुधारकांचाही हा, 'संकरज मूल तेवढे म्लेंच्छास देअून टाकावे' असा भ्याड पर्याय या सर्वांचे कारण म्हणजे जातीची बीजशुद्धी, काही झाले तरी जाती क्षय झाला तरी, शुद्ध राहावी, हे आपल्या हिंदूसमाजाच्या हाडीमाशी खिळलेले वेड होय! परंतु त्या हिंदूसमाजाला अेवढेसुद्धा कळले नाही की, तीच त्यांची जाति शुद्धी विपर्यासाच्या अर्थी त्यांच्याच त्या धर्माचाराने आपल्या लक्षावधि स्त्रिया जेव्हा मुसलमानांच्या हाती पडत तेव्हा तर हटकून नष्ट होअी. अितकेच नव्हे, तर ते शुध्दीबंदी आचार तसेच चालले असते तर ती हिंदू जातची जातच नष्ट होअून गेली असती.

दुसरी लक्षात घेण्यासारखी गोष्ट की, देवलस्मृतीचा आज जो भाग अुपलब्ध आहे त्यात शुद्धीकरणाची जशी काहीतरी सुधारणा केली आहे तशीच जन्मजात म्लेच्छांनासुद्धा हिंदू करून घेण्याची काही स्पष्ट अशी आज्ञा दिलेली नाही. त्याचेही कारण हेच असावे की, दुसऱ्या जातीला आपल्या जातीत घेण्याचे हिंदूंना भयंकर पाप वाटे. हिंदूंच्या आपापसातील जातीतसुद्धा 'संकर' होअू नये म्हणून गीताकारापर्यंत शास्त्रकर्ते चिंतातुर झालेले आढळतात.

सारांश असा की, देवलऋषींच्या आश्रमातील धाडसी सुधारक वर्गाने काही प्रमाणापर्यंत बळाने बाटविलेल्या हिंदू स्त्री-पुरुषांना परत हिंदू करून घेण्याची काहीतरी सोय केली. अितकी सुधारणा काय ती त्यांनी घडवून आणली. परंतु मुसलमानांच्या अत्युग्र अशा धार्मिक आक्रमणाला तसेच अत्युग्र असे हिंदूप्रत्याक्रमण प्रतिपदी आणि प्रतिप्रकारी करण्याचे साहस त्या काळच्या स्मृतिकारांनी किंवा समरधुरंधरांनी केलेले आढळत नाही. तथापि त्या वेळच्या परिस्थितीत मुसलमानांची राजसत्ता स्थापन झालेली असताही अितकी तरी धार्मिक क्रांतीची अुठावणी देवलादि शतावधि हिंदूनेत्यांनी केली, हेही काही थोडे नाही.

## मुसलमानांच्या सिंधवरील धार्मिक आक्रमणाला हिंदूंचा परिणामकारक अटकाव!

वर दिलेल्या देवलादि हिंदू पुढाऱ्यांनी मुसलमानांकडून बळाने बाटविलेल्या हिंदू स्त्री-पुरुषांना परत हिंदू करण्याचा जो धर्माचार पुरस्कारिला, त्याला हिंदूसमाजाचाही आश्चर्यकारक पाठिंबा मिळाला. मूळच्या जातिवेड्या असणाऱ्या त्या हिंदूसमाजाने सहस्त्रावधि भ्रष्टीकृत हिंदू स्त्री-पुरुषांना परत हिंदू करून आपल्या समाजात सामावून घेतले. अिकडे मुसलमानांच्या धार्मिक युद्धाच्या आघाडीवर अितकी तरी अुलट चढाअी करून त्यांची दाणादाण अुडविली असताच तिकडे सिंधमध्ये मागे दिल्याप्रमाणे मुसलमानांना राजकीय समरातही हिंदूंनी झोडपून काढलेले होते. हिंदूंनी मुसलमानांवर सिंधमध्ये हा जो विजय मिळविला आणि दोनशे अेक वर्षे तरी कासीमच्या स्वारीनंतर सिंध हिंदूंच्या हातात ठेवला, ही घटना आपल्या आजपर्यंतच्या भारतीय अितिहासात कुठेही यथाप्रमाण स्पष्टपणे नि गौरवाने वर्णिलेली नाही, नुसती सुचविलेली देखील नाही. अेवढ्यासाठी देवलादींच्या पतितपरावर्तनादि धार्मिक नि राजकीय चढाअीचा येथे हा विशेष अुल्लेख करावा लागला.

हिंदूंच्या या धार्मिक नि राजकीय विजयाला आपल्या अितिहासाचा जरी अगदी पुसटसा आधार असला तरीही नि त्यापेक्षाही महत्वाचा आधार त्याला आहे नि त्यातही तो शत्रूच्याच लेखाचा आहे, तोच अुद्धृत केला म्हणजे झाले. त्या वेळेस हिंदूंनी सिंध परत जिंकून घेताना मुसलमानांची जी दाणादाण अुडविली तिने वैतागलेले मुसलमान लेखकच त्या त्यांच्या दुर्दशेचे वर्णन करताना म्हणतात.

''सिंधमध्ये आम्हा अरबांची मुले माणसे स्त्री-पुरूष शिरजोर झालेल्या या हिंदू काफरांच्या भयाने रानोमाळ पळतात. आम्ही जिंकलेला सिंधप्रांत या काफर हिंदूंनी बहुतेक परत जिंकून त्यांचे राज्य स्थापन केले आहे. अेक अलयाह फुजाह हा किल्ला तेवढा आमच्या पराभूत आणि निराश्रित अरब स्त्री-पुरुषांना आश्रयाचे स्थल अुरलेला आहे, आमच्या हाती अरब झेंड्याखाली अजून तग धरून अुभा आहे. राजकीय आघाडीवर काय ती आम्हा अरबांची अशी धूळधाण अुडाली नाही तर ज्या सहस्रावधी हिंदू काफरांना आम्ही हिंदूंच्या दाहीर राजाचा शिरच्छेद केल्यानंतरच्या शंभर अेक वर्षांत बाटविले होते आणि हिंदू स्त्रियांना बटकी करून मुसलमानांच्या घरोघर राबविले होते, त्या धार्मिक आघाडीवरही आमची अशीच धूळधाण अुडून ह्या हिंदूत अुत्पन्न झालेल्या क्रांतिकारक नवहिंदुंच्या प्रभावी बंडाळीमुळे ते सारे अिस्लामने बाटविलेले हिंदू स्त्री-पुरुष आपल्या काफर हिंदुधर्ममतास स्वीकारते झाले आहेत.

## भाष्यकार मेधातिथी

देवल ऋषींचा काळ साधारणपणे सन ८०० ते ९०० असा मानण्यात येतो. त्या कालाच्या आगेमागेच म्हणजे सुमारे ८५० ते ९५० या काळात मुसलमानांच्या त्या दुष्ट, धार्मिक सशस्त्र आक्रमणास हाणून पाडणारी तशीच सशस्त्र धार्मिक प्रत्याक्रमण करणारी जी क्रांतीची लाट त्या काळात हिंदूसमाजात अुसळली होती तिला सर्वतोपरी अुचलून धरणारा,

हिंदूंना अत्यंत प्रभावी असे मार्गदर्शन, चाणक्याच्या अर्थशास्त्राने वीरवर चंद्रगुप्ताच्या पिढ्यांना जसे केले, तसे अखिल आर्यावर्ताला पुनरपि प्रसरणशील आणि विजिगीषु जगत, साम्राज्यवादाची दीक्षा देऊ पाहणारा अेक महनीय शस्त्रपूजक शास्त्रकार हिंदूंच्या सुदैवाने त्याच वेळी अुदय पावला, तो म्हणजे प्रत्यक्ष मनुस्मृतीवर नवभाष्य लिहिणारा भाष्यकार मेधातिथी हा होय. मेधातिथी हा हिंदूंवर शत्रूंच्या चहुबाजूंनी होणाऱ्या स्वाऱ्यांमुळे गोंधळून मार्गहीन झालेल्या त्या वेळच्या म्हणजे नवव्या-दहाव्या शतकातील हिंदुसमाजापुढे नेटाने घुसून त्यांना प्रत्याक्रमणाचे धैर्य देअून त्यांच्यापुढे मुसलमानांपूर्वीच्या आर्यसाम्राज्यवादी विस्तारशील प्रचंड पराक्रमी चाणक्याच्या अुपदेशाचा प्रकाशस्तम्भ पुन्हा अुभा करू पाहणारा त्या काळातील अेकच अेक आणि क्वचित् अंतिम स्मृतिकार, धर्मपुरूष आणि लोकनेता होता. त्याचा हेतु मुसलमानांनी त्यांच्या काली हिंदूंवर केलेली सशस्त्र धार्मिक आक्रमणे पूर्वीच्या आर्यसाम्राज्याच्या तेजस्वी नि पराक्रमी राक्षसांशी अवलंबिलेल्या रणनीतीनेच तत्काळ हाणून पाडली पाहिजेत आणि पूर्वीचे आर्यावर्ताचे साम्राज्य स्थापून आर्यावर्ताबाहेरचेही दिग्विजय करून, म्लेंच्छराज्ये जिंकून, त्यात प्रसंगी शस्त्रबळाने आर्यधर्म संस्थापून ती म्लेंच्छराज्ये आर्यावर्तीय साम्राज्यात समाविष्ट करून टाकावीत, हे ध्येय पुन्हा आपल्या समाजात जिवंतपणे सळसळविण्याचा होता. 'कृण्वन्तो विश्वमार्यम्' ही आर्यांची वेदकालीन गर्जना त्याच्या मनुस्मृतीवरील भाष्यांतून सारखी निनादत आहे.

त्या काळाचे न्यूनाधिक अेक सहस्त्र वर्ष आधीपासून हिंदूंच्या स्मृतीतील जातीपातींच्या, दयादाक्षिण्याच्या, विटाळवेडाच्या, आम्ही या भागातून वर अनेक वेळा अुल्लेखिलेल्या आणि पुढेही अुल्लेखू अशा, श्रुत्युक्त म्हणून सोंग घेतलेल्या आणि स्मृत्युक्त म्हणून अधिकार गाजवू पाहणाऱ्या धार्मिक आणि सामाजिक अशा ज्या नेभळटा, राष्ट्रीयदृष्टिशून्य आचारांनी आमच्या हिंदुसमाजात नुसता गोंधळ घातलेला होता, तो पाहून त्या अधोगतीला रोखून ह्या नेभळट आणि बुद्धू झालेल्या हिंदुसमाजाला पुन्हा अेकदा त्या 'त्या आर्यावर्ताचे' त्याचे मूळचे स्वरूप प्राप्त करून द्यावे, ही महत्वाकांक्षा धरणारा हे मेधातिथी अेवढाच काय तो भाष्यकार त्या काळी झाला. म्हणून त्यांनी सर्व स्मृतींचा मूळ आधार म्हणून मानल्या गेलेल्या मनुस्मृतीवरच भाष्य रचण्याचे ठरविले. आणि विशेषत: राजकारणीय आचार म्हणून जे सांगितले आहेत त्यांना चाणक्याच्या निकषाच्या धारेवर धरले. अशा प्रकारे अेका हातात मूळची आर्यवर्तीयांची मनुस्मृती आणि दुसऱ्या हातात चाणक्याचे साम्राज्यपूजक, दिग्विजयवादी आणि दिग्विजयक्षम अर्थशास्त्र धरून मेधातिथीने त्या काळच्या झालेल्या हिंदूसमाजाच्या नेभळट आणि बुद्दू अहिंसेमुळे पंगु झालेल्या सर्व आचारविचारांना धर्मबाह्य ठरवून टाकिले. अशा सर्व जातीपातींच्या वेडाने पछाडलेल्या आचारांना नव्हे, तर त्यांना जातिधर्म म्हणून सांगणाऱ्या स्मृतींनासुध्दा.

**''या वेदबाह्या: स्मृतय: याश्च काश्च कुदृष्टय: ।**
**सर्वास्तान् विपरीतार्थान् वेदविद् न समारचेत ।।''**

या अेका निषेधाच्या घावासरशी निर्माल्यवत् नि निर्जीव करून टाकले.

बहुधा त्याच अेक-दोन पिढ्यांत मुसलमानांनी धार्मिक अत्याचारांचा नि आर्यस्त्रियांवरील भ्रष्टाचारांचा निदान सिंध आणि पंजाबपर्यंत तरी जो हिंदूंचा राक्षसी छळ केला आणि हिंदूंच्या कोणत्या कोणत्या पंगूपणामुळे धार्मिक नि सामाजिक जातिभेद, शुद्धिबंदी, सद्गुणविकृती प्रभृती आम्ही सविस्तरपणे वर वर्णन केलेल्याप्रमाणे, धर्मवेडामुळे आणि अप्रतिकारक नेभळटपणामुळे त्या मुसलमानांच्या धार्मिक प्रत्याचाराच्या आघाडीवर तरी मुसलमानांचा सूड घेतला नाही, नुसता प्रत्याचारसुद्धा केला नाही, हे सर्व राष्ट्रीय वृत्त मेधातिथीच्या डोळ्यांसमोर घडले होते. आर्यावर्त, जेव्हा त्याच्या प्रगतिध्वजावर 'कृण्वन्तो विश्वमार्यम्' अशी प्रतिज्ञा करून देशोदेशी दिग्विजय करीत चाललेला होता, तेव्हाच्या, ते त्यांच्या स्मृतीतले प्रतिध्वनी पुन्हा त्याच्या काळच्या क्षीण, पतित, पराजित आर्यराष्ट्राच्या अंगात संचारवावेत अशाच शस्त्रवादी, युद्धवादी, साम्राज्यवादी धर्माचारांच्या आज्ञा मेधातिथीने त्याच्या तेजस्वी भाष्यातून अगदी स्पष्टपणे मनूंच्या मूळच्या आज्ञा म्हणून अुचलून धरल्या. अितर

सर्व 'वेदबाह्यः स्मृतयः।' त्याची वाक्ये त्याच्या काळच्या निर्जीव हिंदू राजांच्या तोंडी झेपणारीसुद्धा नव्हती, शोभणारी नव्हती. सम्राट चन्द्रगुप्ताला, पुष्यमित्राला शोभणारी नि पेलणारी ती आज्ञावचने, शास्त्रवचने होती.

मेधातिथी स्पष्टपणे सांगतात की, दुसऱ्यांच्या आणि विशेषतः संभाव्य शत्रूच्या राज्यावर स्वारी करणे हा राज्यशास्त्रात अन्याय होत नाही. किंबहुना, राजाचे हेच कर्तव्य आहे की, जोवर तो शत्रू आपल्यावर स्वारी करण्यास समर्थ झालेला नाही, तोवरच त्या म्लेंच्छ शत्रूवर झडप घालून, त्याला चिरडून टाकावा. अशा राजकारणात आपल्या आर्यावर्तीय राज्याचे संरक्षण हाच मुख्य राजधर्म होय! येवढ्यासाठी जे अर्धवट भाष्यकार म्हणतात की, 'परराज्यावर आणि त्यातही म्लेंच्छ राज्यावर स्वारी करताना आर्यराजांनी त्यांच्या हातून काहीतरी अपराध घडेतो स्वारी करू नये' हे सर्व, मेधातिथी म्हणतो की, 'आत्मघाताचे, कालव्ययाचे आणि म्हणून राजधर्माच्या विरूद्ध आहे. शेजारचा शत्रूराजा शत्रू आहे हाच त्याचा अपराध! संधी सापडताच झडप घालून त्यास चिरडून टाकावे! अितकेच नव्हे, तर जर शेजारचे अनार्य म्लेंच्छ राष्ट्र आपल्या आर्य राष्ट्रापेक्षा बलवत्तर होत आहेसे दिसले तर त्याचा दिखाअू अपराध घडो वा न घडो, आजूबाजूच्या शत्रूमित्रराष्ट्रांचा व्यूह रचून यशाची निश्चिती वाटताच त्या शेजारच्या अनार्य राष्ट्राविरूद्ध आपण होअून युद्ध करावे.'

त्या काळी म्हणजे नवव्या-दहाव्या शतकात म्लेंच्छांचा प्रतिकार करण्यासाठी अुत्तर भारतात त्यावेळी श्रीमान भोजराजा, राजपूत आणि अितर हिंदू राजांची जी राज्ये होती त्या साऱ्यांची राजशक्ती अेकवटून पुन्हा अेखादे त्यापूर्वीच्या बलिष्ठ साम्राज्यासारखे, नवे अजिंक्य आणि विजिगीषु भारतीय साम्राज्य स्थापले जावे, अशी प्रबळ अिच्छा मेधातिथीच्या भाष्यातून पदोपदी व्यक्त होत आहे. या दृष्टीने त्याने राज्यकर्तव्ये म्हणून जी सांगितलेली आहेत त्यात स्पष्टपणे लिहिले आहे की, म्लेंच्छांनी 'आर्यावर्तावर स्वारी करण्याचे अगोदरच राजाने त्या शत्रूवर चढाअी करून गेले पाहिजे, युद्धामध्ये अेकदा शत्रूशी शत्रू म्हणून झुंज लागली की मग राजाने दयामाया काही अेक पाहता कामा नये. शत्रूचा चेंदामेंदाच केला पाहिजे. हवे ते निमित्त काढून त्या परकीय शत्रूला कपटानेच हाणून पाडले पाहिजे. युद्धात नेभळेपणा, भाबडेपणा आणि चालण्या बोलण्यातील सुसंगती नि सभ्यपणा हे तथाकथित 'सद्‌गुणच' राष्ट्रनाशक दुर्गुण ठरतात. म्हणून राजाने त्यांच्या आहारी जाअू नये.

अशा प्रकारच्या कठोर राजनीतीच्या मेधातिथीने प्रबळ पुरस्कार केलेला आहे. कारण त्या काळच्या हिंदू राजांच्या भोळसट स्वभावाचा कपटी म्लेंच्छांनी जो वारंवार लाभ घेअून हिंदू लोकांचा अुच्छेद मांडलेला होता त्या भोळसटपणापासून हिंदूंना निवृत्त करण्यासाठी ती चाणक्य कूटनीती राष्ट्रास पुन्हा अेकदा शिकविणेच अवश्य होते. मेधातिथी त्याच्या त्या मनूवरील भाष्यात स्पष्टपणे सांगतो की, आर्यांनी आर्यावर्तातच स्वतःला कोंडून घेतले पाहिजे, असे आर्यधर्म कुठेच सांगत नाही. तर अुलट शास्त्राज्ञेचे मर्म असे आहे की आर्यावर्ताच्या बाहेरही बलसंपन्न आर्यराजांनी म्लेंच्छ देशांवर स्वाऱ्या करून जर ते जिंकले आणि तेथे आर्यधर्माचाच सर्वत्र प्रचार केला आणि आपले आर्यराज्य स्थापले तर तो पूर्वीचा म्लेंच्छ देशही त्यापुढे आर्यदेशच मानला गेला पाहिजे आणि आर्यावर्तीय साम्राज्यातच त्याचा समावेश करून टाकला पाहिजे.

मेधातिथीच्या ह्या भाष्याप्रमाणे त्या काळी हिंदूराष्ट्रातील काही हिंदुराज्ये तरी ह्या चंद्रगुप्तकालीन चाणक्याच्या आदर्शाप्रमाणेच भरतखंडाच्या सीमांबाहेर पडून म्लेंच्छदेशांवर अशा दिग्विजयी स्वाऱ्या अक्षरशः करीत होती. अुत्तरेला मुसलमानांच्या आक्रमणामुळे तिकडच्या हिंदू सीमाराज्यांना यद्यपि सीमा ओलांडण्याचे तर बाजूसच राहो, सीमा- संरक्षणाचीच निकड लागली होती, तथापि, तोवर म्हणजे महमंद गझनी, हिंदुस्थानावरील त्याच्या स्वाऱ्यांनंतर मरून गेल्यावरही दीडशे वर्षे तरी दक्षिणेतील हिंदूराज्यांचे स्वातंत्र्य आणि सामर्थ्य अक्षुण्णच राहिले होते. त्यामुळे आर्यांच्या चंद्रगुप्तकालीन विजिगीषु राजकारणाचे प्रयोग मेधातिथीच्या वर दिलेल्या भाष्यातील धार्मिक प्रेरणेनुसार दक्षिणेतील हिंदुराज्ये करण्यास समर्थ होती आणि म्हणूनच कलिंग, पांड्य, चेल, चोल, अित्यादी हिंदुराज्ये सिंधु ओलांडून पश्चिम समुद्रातून, दक्षिण समुद्रातून आणि पूर्व समुद्रातून मोठी मोठी सिंधुसैन्ये आजूबाजूच्या म्लेंच्छ राज्यांवर धाडून तिकडे चीनच्या आणि अिकडे आफ्रिकेच्या

सागरतटापर्यंत सिंधु - दिग्विजय करीत चालले होते. आश्चर्याची गोष्ट अशी की, अुत्तरेला महमंद गझनी आणि महंमद घोरी हिंदूंची राजधानीमागून राजधानी, क्षेत्रांमागून क्षेत्रे, आणि देवायलयामागून देवालये अुद्‌ध्वस्त करीत हिंदूराजसत्तेचा पाडाव करीत असताना तिकडे दक्षिणेत अगदी त्याच कालात भुवनेश्वरसारखी प्रचंड देवालये अुभारली जात होती आणि राजेंद्र चोलासारखा दिग्विजयी हिंदूसम्राट ब्रह्मदेश, पेगू, अंदमान, निकोबारसारख्या पूर्वसमुद्रातील द्वीपपुंजांना आणि देशांना मोठमोठ्या जलसेनांसह आक्रमून त्या पलीकडे जावापासून हिंदूचीन (सध्याचा इंडोचीन) पर्यंत पूर्वी स्थापन झाल्या असलेल्या हिंदूराज्यसंघाला भेट देअून अिकडे पश्चिम समुद्रामध्ये असलेल्या लखदीव नि मालदीव द्वीपपुंजांना जिंकून सिंहलद्वीपावरही आपले राज्य स्थापिता झाला आणि दक्षिण महासागरावर हिंदूंचा अजिंक्य ध्वज फडकविता झाला.

ही हिंदूंची दिग्विजयी नौसैन्ये सिंधु नि महासिंधु ओलांडून जी परतीरावरील देशोदेशी दिग्विजय करीत गेली आणि त्या देशांना आर्य साम्राज्याच्या कक्षेत आणीत गेली. ती वर सांगितलेल्या मेधातिथीसारख्या चाणक्याच्या स्फूर्तीने तेजाळलेल्या भाष्यकाराच्या शास्त्राधारेच होय! त्यापुढच्या शंभर - दोनशे वर्षानंतरच प्रचलित झालेल्या हिंदूंच्या दुर्दिनातील सिंधुबंदीच्या पांगळुणाऱ्या शास्त्राधारे नव्हत.

## प्रकरण ६ वे

# अधूनमधून का होईना, पण हिंदूंनीही मुसलमानांवर अुगविलेला धार्मिक आक्रमणाचा सूड!

मागील अेका प्रकरणाच्या शेवटी आम्ही आश्चर्य प्रकट केले होते की, जातिभेद, शुद्धिबंदी, सद्गुणविकृती अित्यादी हिंदूसमाजात मुरलेल्या आत्मघातकी दोषांपायी हिंदूसमाज संपूर्णपणे नष्ट कसा झाला नाही? केवळ लक्षावधी हिंदूंच्या भ्रष्टीकरणावरच कसे निभावले? कारण अशा प्रकारचे मुसलमानांचे धार्मिक आक्रमण हिंदुस्थानच्या सीमेपलीकडे जेथे जेथे झाले तेथे तेथे त्या भागातील मूळ निवासीयांचा धर्म संपूर्णपणे नष्ट झालेला आहे. स्पेनपर्यंतचा आफ्रिकाखंडाचा अुत्तर भाग आणि हिंदुस्थानच्या सीमेपर्यंतच्या आशिया खंडातील प्रदेशात मुसलमान जेथे जेथे गेले तेथे तेथे त्यांनी संपूर्ण प्रदेश मुस्लिममय करून सोडले, पण हिंदुस्थानमध्ये मात्र त्यांच्या प्रयत्नास संपूर्णपणे यश आले नाही. महंमद कासीमची आठव्या शतकातील पहिली स्वारी तरी अकराव्या शतकापासून म्हणजे महंमद गझनी नि घोरीच्या आक्रमणापासून तो अठराव्या शतकात पेशव्यांनी मोगली सत्तेचा नायनाट करीपर्यंत अेक सहस्त्र वर्षे मुस्लिम आक्रमकांनी हिंदूंवर राक्षसी सशस्त्र आणि धार्मिक अत्याचार करून, लक्षावधी स्त्री-पुरूषांवर बलात्काराने बाटवून आपले संख्याबळ वाढविण्याचा प्रयत्न चालविला. ही बाटवाबाटवी करण्यास या भूमीतील परिस्थितीसुद्धा त्यांना अनुकूल होती. अशी हिंदूंना प्रतिकूल परिस्थिती असताही हिंदुसमाज संपूर्णपणे नष्ट करण्यास मुसलमानांना यश का आले नाही?

वर जी शंका आम्ही प्रकट केली आहे ती निवारण्याचे, प्रथम कारण हे, की, हिंदूंनी मुसलमानांचा राजकीय आघाडीवर केलेला पराभव. प्रथम, भीम, राणाप्रताप अित्यादी राजपूत राजांनी नंतर विजयनगरच्या हिंदूराजांनी मुसलमानांची राजकीय सत्ता सशस्त्र प्रतिकार करून खिळखिळी करून टाकली होती. आणि शेवटी मराठ्यांनी पेशव्यांच्या नेतृत्वाखाली अटकेपर्यंत हिंदूंचा विजयध्वज फडकवून मुस्लिम सत्तेचा अंत केला आणि त्यामुळे राजकीय पाठिंब्यामुळे हिंदुसमाज बाटविणे अशक्य झाले. मुस्लिमांच्या राजकीय आघाडीवर झालेल्या पराभवाचा अितिहास सर्वविश्रुत आहेच.

पण मुस्लिमांच्या सशस्त्र धार्मिक आक्रमणाचा प्रतिकार करणारे आणि महर्षि देवल आणि विशेषत: भाष्यकार मेधातिथी यांनी प्रतिपादन केलेल्या तत्वज्ञानाचे आचरण प्रत्यक्षात आणणारे आणि मुस्लिमांच्या धार्मिक अत्याचारास सशस्त्र धार्मिक प्रत्याक्रमणाने प्रत्याचार करणारे वीर आणि कृतिवीर पुरुष अधूनमधून का होईना, हिंदूसमाजात अुत्पन्न झाले हे दुसरे महत्वाचे कारण होय. नि त्यामुळे हिंदूसमाज संपूर्णपणे नष्ट होअू शकला नाही. हिंदूंनी मुस्लिमांच्या धार्मिक आक्रमणास तशाच प्रकारे धार्मिक प्रत्याक्रमण करून कसे तोंड दिले, त्यातील वानगीसाठी शेकडो अुदाहरणांपैकी काही अुदाहरणे या प्रकरणात देण्याचे योजिले आहे.

(१) मुसलमानांनी सिंध जिंकल्यावर सिंधप्रांतावर आणि त्याच्याही पलीकडच्या मुसलमानांच्या हातातील प्रदेशांवर स्वाऱ्या करून ते प्रदेश परत जिंकून घेणारा मेवाडचा प्रख्यात राणा बाप्पा रावळ; याने रजपुतांच्याच रासोग्रंथातून सांगितले आहे, त्याप्रमाणे लढाअीत पाडाव केलेल्या मुसलमान राजकुमारीशी विवाह केला होता. तिला अंत:पुरात अितर राण्यांसह सरमिसळ ठेविले होते. अितकेच नव्हे, तर त्या शुध्दीकृत राणीपासून झालेल्या बाप्पा रावळच्या संततीला राजपुती समाजातही सूर्यवंशी म्हणूनच सन्मानिले गेले. पुण्याच्या परमप्रतापी बाजीरावांना मस्तानीपासून झालेल्या संततीला स्वत: बाजीरावाचे अिच्छेप्रमाणे हिंदूधर्मात न घेता जसे बळे बळे मुसलमानी समाजात ढकलून दिले गेले, तसला धार्मिक अुल्लूपणा काही या मेवाडच्या महाराण्याच्या संततीच्या प्रकरणी त्या वेळच्या हिंदूंनी केला नाही.

(२) जेसलमीरच्या रावतचेचकांनी सुलतान हैबतखानाच्या सोमलदेवी नावाच्या मुलीशी लग्न केले आणि तिला आपल्या यादव कुलातच प्रस्थापिले.

(३) मारवाडच्या राव मल्लीनाथ राठोडचा ज्येष्ठ पुत्र जो कुंवर जगमल त्याने आपल्या पराक्रमाने जेव्हा माळव्याच्या मुस्लिम सुलतानाचा पराभव केला आणि माळवा परत जिंकून घेतला तेव्हा त्याने त्या मुस्लिम सुलतानाची रूपवती म्हणून

नावाजलेली राजकन्या जी शिदोली हिच्याशी प्रकटपणे विवाह केला आणि तिच्यापासून झालेल्या संततीला मारवाडातील श्रेष्ठ 'जहागिरदारी' रजपुतात निर्विशेषपणे समावेशिले गेले.

(४) याच्याही पुढे जाऊन मुस्लिम आक्रमक शतावधी हिंदू स्त्रियांचे समुदायचे समुदाय बाटवून आमच्या स्त्रीसमाजातील संख्याबळ भयानक प्रमाणात जे घटवीत चालले होते त्या संकटाला तशाच सामुदायिक प्रत्याक्रमणाने आळा घालणारे साहसी नि प्रसंगावधानी प्रत्याघातही साधताच हिंदूवीरांनी यत्र तत्र का होईना, पण केलेले आढळतात. उदाहरणार्थ, मारवाडच्या रायमल राजाने ६०० मुस्लिम स्त्रियांना पाडाव करून त्या स्त्रियांना सामुदायिकपणे शुद्ध करून घेऊन आपल्या निरनिराळ्या सरदारांशी त्यांची लग्ने प्रकटपणे लावून दिली.

(५) मेवाडच्या कुंभराण्यानेही मुसलमानांना परास्त करून पाडाव झालेल्या मुसलमानांतील कित्येक स्त्रियांना आपल्या राज्यात नेऊन, त्यांना शुद्ध करून, त्यांची स्वराज्यांतील हिंदू सरदारांशी यथारुची लग्ने लावून दिली.

(६) प्रसिद्ध इतिहासकार टॉड याने लिहिलेल्या राजस्थानाच्या इतिहासात अशा आणखीही घटना वर्णिलेल्या आहेत.

(७) राजपूतांच्या 'रासो' नावाच्या काही कविताबद्ध इतिहासग्रंथांतून परत हिंदू करून घेतलेल्या मुस्लिम स्त्रियांशी लग्ने लावून त्यांच्या संततीला आपल्या हिंदू समाजात अंतर्भूत करून घेतल्याच्या घटना उल्लेखिल्या आहेत.

(८) नेपाळचा राजा जयस्थिती ह्यानेही मुसलमानांच्या धार्मिक सशस्त्र आक्रमणाचा सूड घेतला होता, तोही मेधातिथीच्या वृत्तीचाच म्हणजे परकीय दुष्टांची नांगी ठेचून टाकावी, ह्याच धोरणाचे अवलंबन करणारा होता. जेव्हा बंगालचा नबाब शमसुद्दीन ह्याने नेपाळवर सन १३६० च्या आगेमागे स्वारी करून मोठा प्रलय मांडला होता, त्याने शेकडो हिंदू, बौध्द देवळे पाडली आणि शेकडो हिंदू-बौद्ध लोकांस तलवारीच्या धारेने बाटविले, तेव्हा, हिंदूंच्या ह्या रणशूर राजाने राज्यावर येताच मुसलमानांना नेपाळातून दे माय धरणी ठाय करून घालवून दिले, इतकेच नव्हे, तर खऱ्या हिंदू बाण्यास शोभेल असा मुसलमानांवर सूडही उगविला. मुसलमानांनी पाडलेली सर्व हिंदू बौद्धांची देवळे पुन्हा बांधिली आणि बाटविलेल्या सर्व हिंदूंना आणि बौद्धांना सामुदायिकपणे शुद्ध करून घेतले.

(९) तत्कालीन मुसलमानांनी लिहिलेल्या तवारिखादिक इतिहासग्रंथामध्ये तर 'आमच्या मुस्लिम स्त्रियांनाही हे काफर लोक संधी सापडताच हिंदू करून घेतात आणि त्यांची हिंदूसमाजात लग्ने लावून देतात' म्हणून कुठे कुठे 'चोराच्या उलट्या या न्यायाने अगदी आक्रोश केलेला आढळतो. आमच्या हिंदूंच्या इतिहासग्रंथात अशा प्रकारच्या ज्या घटनांचा मागमूसही सहसा सापडत नाही, अशा काही घटना ह्या मुस्लिमग्रंथांतूनच अवगत होऊ शकतात.

(१०) उदाहरणार्थ, 'तवारिख - इ - सोना' या मुस्लिमग्रंथात तो लेखक म्हणतो की, 'अगदी महंमद गझनीच्या स्वाऱ्यांचा धुमाकूळ जेव्हा चाललेला होता तेव्हा सुद्धा अनहिलवाडाच्या राजाने संधी सापडताच मुसलमान सैन्यातून मागे रेंगाळलेल्या अनेक तुर्की, मोंगल नि अफगाण स्त्रियांना पकडून नेले आणि हिंदूंनी त्यांच्याशी नि:शंकपणे लग्ने लाविली.' या ग्रंथकाराने असेही ग्रंथिले आहे की, 'संधी सापडताच मुसलमानी स्त्रियांचे समूहचे समूह पकडून हिंदू लोक त्यांना हिंदू करून घेतात.'

इतकेच नव्हे, तर त्याने त्या हिंदूंच्या मुस्लिम महिलाशुद्धीकरण विधीविषयीही काही चटकदार माहिती दिलेली आहे. तो म्हणतो, मुस्लिम स्त्रियांना सामुदायिकपणे हिंदू करून घेताना त्यांच्या मस्तकावर हिंदू पुरोहित काही थोडेसे जव जाळीत. नंतर त्यांना गोमयमिश्रित पाणी (अर्थात पंचगव्य) प्यावयास देत आणि मग त्यांना संव्यवहार्य समजून त्यांच्याशी हिंदू लोक यथारुची लग्ने लावीत. काही ठिकाणी मुस्लिम स्त्रियांच्या अशा सामुदायिक हिंदूकरणप्रसंगी हे हिंदू लोक त्या स्त्रियांना उलटी आणि रेच देत. नंतर त्यांना निरनिराळ्या हिंदूजातीत किंवा वर्गात योग्यतेप्रमाणे वाटून देत. उत्कृष्ट स्त्रिया उत्कृष्ट हिंदूंच्या वाट्याला येत. कुलीन स्त्रियांशी सरदार लोक लग्ने लावीत आणि बटकी किंवा मोलकरणी असलेल्या स्त्रियांशी त्या त्या वर्गाचे हिंदू लग्ने लावीत. त्या सर्व स्त्रियांची संतती त्या त्या जातीतील नि वर्गातील हिंदूत संपूर्णपणे विलीन होऊन जाई.

(११) अजमीरच्या अरूणदेवरायाने मुसलमानांचा पराभव करून त्यांना जेव्हा त्या प्रदेशातून हाकलून लावले तेव्हा त्यांच्या संसर्गाने अपवित्र झालेली ती भूमी शुद्ध करण्यासाठी त्याने तेथे अेक मोठा यज्ञ केला. त्याच पवित्रीकृत स्थळी अेक विस्तीर्ण मंदिर आणि 'अनासागर' नावाचे अेक सरोवर बांधले. आजूबाजूचे जे जे स्त्री-पुरुष मुस्लिमांच्या सत्ताकाळी बाटलेले होते त्या सर्वांना ह्या सरोवरात स्नान घालून शुद्ध करण्यात आले. त्या सरोवरात जो जो बाटलेला हिंदू संकल्पपूर्वक नि संस्कारपूर्वक स्नान करील तो तो शुद्ध होअून हिंदूधर्मात पुन्हा प्रवेश करू शकेल, अशी स्थायी शास्त्रव्यवस्थाही लावून दिली होती.

(१२) जेसलमीरच्या अमरसिंग महाराजानेही असाच अेक मोठा यज्ञ करून अमरसागर नावाचे सरोवर बांधले होते. त्या यज्ञाच्या प्रतापे पवित्र झालेल्या त्या सरोवरात पूर्वी सिंधप्रांतात जे सहस्त्रावधि हिंदू स्त्री-पुरुष बाटविले गेले होते त्यांचे समुदाय येअून संकल्पपूर्वक नि समंत्रक स्नान करीत आणि त्यांना शुद्ध होअून पुन्हा हिंदूधर्मात आल्याची धर्माधिकाऱ्यांकडून प्रमाणपत्रे देण्यात येत.

(१३) या विषयानुरोधाप्रमाणे स्मृतिकार देवल, भाष्यकार, मेधातिथी यांच्यासारखे त्या काळी मुसलमानांच्या धार्मिक अत्याचारी आक्रमणांना रोखण्यासाठी, हिंदूंतही प्रत्याचारी प्रत्याक्रमक शक्ती संचरविणारे, क्रांतिकारक शास्त्राधार, अुद्‌भविणारे, प्रसंगी आततायी शत्रूचा नायनाट करण्यास अपरिहार्य असे नवे शस्त्राचारही शिकविणारे आणि प्रत्यक्ष शंकराचार्यांच्या पीठावर आरूढ होण्याचा ज्यांना सर्वोच्च अधिकार प्राप्त झाला होता त्या विद्यारण्यस्वामींचाही अुल्लेख करणे हे क्रमप्राप्त आहे. श्री. विद्यारण्यस्वामींनी शृंगेरीच्या धर्मपीठाचेच नव्हे, तर स्वधर्मसंरक्षणार्थ मुसलमानी राज्य अुलथून स्वतंत्र हिंदूराज्य स्थापणाऱ्या सशस्त्र क्रांतिपीठाचेही आचार्यत्व स्वीकारले होते. त्यांनी हिंदुराष्ट्रहितार्थ धार्मिक शुद्धीची नुसती शास्त्रोक्त व्यवस्थाच सांगितली नाही. तर तदनुषंगाने मुसलमानानी बळाने बाटविलेल्या हरिहर नि बुक्क ह्या तरुण वीरबंधूंचा शुद्धिसंस्कार प्रकटपणे घडवून आणला आणि जेव्हा त्या वीर बंधूंनी स्वपराक्रमाने शस्त्रसंगरात मुसलमानांचे पराभवामागून पराभव करून ते अिप्सित स्वतंत्र हिंदुराज्य अिसवी सन १३३६ मध्ये स्थापिले तेव्हा त्या शुद्धीकृत हरिहराला हिंदुसम्राट म्हणून स्वत: राज्याभिषेक करविला.

याच विद्यारण्य माधवाने गोमंतकामध्ये मुस्लिम राजसत्तेचा अुच्छेद करून धर्मभ्रष्ट केल्या गेलेल्या हिंदूंना शुद्ध करून घेण्यासाठी अेका क्षेत्रस्थळी माधवतीर्थ नावाचे सरोवर बांधले आणि धर्मभ्रष्ट केल्या गेलेल्या हिंदू लोकांना त्यात समंत्रक स्नान घालून त्यांचे सामुदायिक शुद्धिकरण केले. पुढेही त्याच स्थळी तशीच शुद्धिकरणे चालावीत, अशी शास्त्रव्यवस्थाही लावून दिली.

(१४) श्रीरामानुजाचार्य, त्यांचे शिष्य श्री. रामानंद आणि बंगालमधील श्रीचैतन्यप्रभू-अशा प्रभावी धर्मवेत्यांनीही म्लेंच्छांना बाटविलेल्या शतावधि हिंदूंना वैष्णव धर्माची दीक्षा देअून शुद्ध करून घेतले होते.

(१५) मुसलमानांनी हिंदूंवर केलेल्या अत्याचारांचा सूड घेअून स्वतंत्र हिंदूंचे राज्य स्थापन करणारे परमप्रतापी श्रीशिवछत्रपति यांनीही बजाजी निंबाळकर आणि नेताजी पालकर यांना ते बाटून मुसलमान झाले असताही शुद्ध करून परत हिंदुधर्मात घेतले ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे.

## याला म्हणतात प्रत्याक्रमण!

(१६) औरंगजेबाने शेवटी शेवटी हिंदूधर्मावर जी अगदी निकराची नि चतुरंग दलासह चढाओ केली त्या वेळी, मराठ्यांवर स्वारी करण्यासाठी दक्षिणेकडे प्रचंड सैन्य घेअून तो निघाला असता वाटेतील रजपुतांचा काटा समूळ काढावा म्हणून त्याने रजपुतांवर धार्मिक आक्रमण केले. परंतु तो पुढे दक्षिणेकडे निघून जाताच त्याचा वचपा अगदी तशाच प्रत्याचाराने मुसलमानांवर काढून हिंदूंच्या मानहानीची नि विशेषत: संख्याबळाच्या झालेल्या हानीची भरपाओ करून घेतल्याचे अेक नावाजण्यासारखे अुदाहारण जोधपूर संस्थानात राठोडांनी केलेल्या मुसलमानांवरील धार्मिक प्रत्याक्रमणाचे देता येते. जोधपूरचा प्रबल महाराणा जसवंतसिंग आणि वीर दुर्गादास राठोड यांच्या नेतृत्वाखाली, औरंगजेबाने मंदिरे पाडून अुभारलेल्या मशिदीच काय त्या नव्हेत, तर साऱ्या मशिदी पाडून टाकून तेथे हिंदु-मंदिरे अुभारण्यात आली. नवीनच

बाटविलेल्या हिंदूंना तर काय, पण संस्थानातील शक्य तितक्या मुसलमानांना राठोडांनी सामुदायिक शुद्धिसंस्काराने हिंदु करून घेतले. मुसलमान सैन्ये मंदिरा-मंदिरांतून गोमांस फेकीत पुढे जाताच राठोडांची सैन्येही मशिदीमशिदीतून डुकरे कापून जशास तसे या न्यायाने त्याचा वचपा काढीत होती. मुसलमानांच्या शतावधि स्त्रियांना हिंदु करून रजपूत लोकांशी त्यांची लग्ने लावण्यात आली; किंवा मुसलमान हिंदु स्त्रियांना ठेवीत त्याप्रमाणे राजपुतांच्या घरी त्यांना दासी करून ठेवण्यात आले. हिंदूंच्या ह्या प्रत्याक्रमणाचे रौद्र स्वरूप पाहून राजपुतान्यातील सारा मुस्लिम समाज गर्भगळीत झाला. मुस्लिमांशी खाण्यापिण्याने तर काय पण त्यांच्या स्त्रियांना घरात घेतल्यासाठीही कोणा हिंदूवर सामाजिक बहिष्कार पडेनासा झाला. जवळ जवळ तीस-चाळीस वर्षेपर्यंत तर हिंदूंचे हे धार्मिक प्रत्याक्रमण राजस्थानातील ह्या हिंदू-संस्थानातून वेगाने गावोगावापर्यंत चालत राहिले; गाजत राहिले. अर्थात वीर दुर्गादास राठोडाची सत्ता ओसरताच हिंदूसमाजाचे हे रौद्ररूपही त्या काळी पुन्हा ओसरून गेले, हे सांगणे नकोच! कारण? कारण, हेच की, त्या काळच्या जातिबद्ध हिंदुसमाजाचा स्थायीभाव धार्मिक प्रत्याक्रमण हा नसून जातिबहिष्कार हा होता.

## हिंदूंच्या पडत्या काळातीलही हिंदुराष्ट्राच्या मूलभूत पुनरुत्थानशक्तीची अेक आश्चर्यकारक घटना!

अेका बाजूला ज्या काळी हिंदूंवर महंमद गझनी, महंमद घोरींच्या आक्रमणासारखी हिंदुधर्माला अुत्सन्न करून टाकणारी आक्रमणे अेकामागून अेक होत होती आणि ज्या वेळी हिंदु जातिभेद, शुद्धिबंदी, सद्गुणविकृती यांसारख्या स्वतःच्या आत्मघातक रूढींमुळे स्वतःच्याच संख्याबळाचा क्षय करीत होते, अशा वेळीही हिंदुराष्ट्राची जी युगानुयुगाची अंगात मूळ धरून राहिलेली प्रचंड प्रचारशक्ती होती, (Missionary spirit and urge) तिचा स्फोटही अन्य बाजूस कसा होत राहिलेला होता आणि हिंदुराष्ट्राची राज्यसत्ताच नव्हे, तर नवीन नवीन सहस्त्रावधी लोकांच्या जाति, हिंदुराष्ट्र, हिंदुधर्म कसा कसा आत्मसात करीत चाललेला होता याचे अेक अुदाहरण म्हणून आसामच्या 'अहोम' जातीचे येथे देत आहोत. याच वेळी हिंदुसाम्राज्याचा विस्तार हिंदु-चीन (इंडोचायना) पर्यंत कसा झालेला होता, हे मागील प्रकरणात शेवटी अुल्लेखिलेले आहे.

गंगासागर (बंगालचा अुपसागर), सिंधुसागर (मुंबअीचा अुपसागर) आणि तेथून दक्षिणेस पसरलेला सारा हिंदुमहासागर, आफ्रिकेच्या दक्षिण टोकापासून तो चीनच्या किनाऱ्यापर्यंत दिग्विजयी लढाअू आणि व्यापारी नौदलांतील शतावधि मोठमोठ्या हिंदू जलतरींनी आणि हिंदू जल नौकांनी जेव्हा व्यापून टाकला होता, तेव्हा सिंदुबंदीची करंटी कल्पनासुद्धा आमच्या स्मृतीस सुचणे अशक्य होते. त्याच या सिंधुविजयाचाही अुल्लेख मागे केलेलाच आहे. त्याचप्रमाणे अुत्तरेकडेही महंमद गझनी, महंमद घोरीच्या अुत्पातांनी हिंदूंचे संख्याबळ घटत असताच अितर देशांकडे हिंदूंना नवीन धार्मिक विजय मिळून हिंदुधर्मात सहस्त्रशः लोकांचे समुदाय कसे समाविष्ट करीत, हिंदुधर्माचा प्रचारही त्याच काळी कसा वाढत चाललेला होता, ह्याविषयीही अेक तरी आश्चर्यकारक अुदाहरण म्हणून येथे आसाममधील अहोम जातीचे देत आहोत.

आसामला लागून वर्मन, सालस्तम् आणि पाल घराण्यातील हिंदुराजांवर त्या वेळच्या आसामपलीकडच्या ज्या अनेक टोळ्या विखुरलेल्या होत्या त्यांतील शान टोळीतील अेक शाखा असलेली आणि पिढ्यान् पिढ्या लढाअूपणाचे जीवन घालविणारी 'अहोम' नावाची जी अेक जात होती, त्या अहोमांचे दडपण आठव्या शतकापासून येअू लागले. अखेरीस या राज्यावर १२०८ मध्ये चुकूक राजाचा अंमल चालू झाला. स्वतःस आणि आपल्या प्रजेस 'अहोम' म्हणजे अजोड म्हणवून घेणारा हा पहिलाच राजा होय. या नव्या राज्यकर्त्यांनी मोगलांच्या सत्तेस यशस्वीरीत्या तोंड दिले. अहोम हे नाव त्याने आपल्या राज्याला दिले. आसाम हे त्याचेच भ्रष्टरूप होय, असे काही विद्वानांचे मत आहे. परंतु आश्चर्याची गोष्ट अशी की हूणांप्रमाणे किंवा शकांप्रमाणे त्या पर्वतीय अनेक टोळ्यांतून हिंदूधर्माची तत्वे आणि आचार त्या वेळेस तरी तिकडे जिवंत असलेल्या हिंदूधर्माच्या मठपतींनी नि मठप्रचारकांनी (मिशनरी आणि मिशनऱ्यांनी) अितके खोलवर रूजविले होते की, त्या पर्वतीय टोळ्यांनी अितर काही टोळ्यांप्रमाणे या लढाअू शान टोळीच्या आसाम - विजेत्या राजानेही आसामच्या राज्यावर येताच सन १५५४ मध्ये आपल्या टोळीतील अनेक लोकांसह हिंदुधर्माचा स्वीकार केला. हळूहळू

ती सहस्त्रावधी लोकांची टोळीच्या टोळीच हिंदूधर्म स्वीकारती झाली. त्या राजाने आपले पूर्वीचे शान भाषेतील नाव बदलून 'जयध्वजसिंग' हे क्षत्रियांतील नाव धारण केले. त्यापुढे आलेल्या सर्व अहोम राजांनीही अशी हिंदुनावेच धारण केली.

## अटकबंदी नि सिंधूबंदी
## केव्हा आणि का झाली ?

वरील अहोमसारख्या शूर जातींच्या जाति जेव्हा त्या हिंदूंच्या पडत्या काळातही हिंदुधर्माचा आपणहून स्वीकार करत होत्या; तेव्हा त्यांना हिंदु जाति संघात घेण्यास शुद्धिबंदीचा किंवा जातिभेदाचा काही अेक विरोध होण्याचा त्या काळी संभव नसे. कारण जशा अनेक हिंदूंच्या जाति हिंदुराष्ट्रात आपआपल्या शिबिरांतून पण हिंदूराष्ट्राच्या अेकाच ध्वजाखाली नांदत, त्यांतच अशा आणखी अेका जातीच्या शिबिराची नवी भर पडे. त्याचे काही व्यवहार, काही आचार त्यांच जातीत त्यांच्यापुरते पाळीत, बाकी सर्व व्यवहार हिंदुस्मृतीप्रमाणे आणि निर्बंधाप्रमाणे सर्वांचे मिळून मिसळून चालत. शुद्धिबंदी, मुसलमानांच्या आतताओीपणाने त्या वेळी प्रथम अुत्तरेकडेच पंजाबपर्यंत काय ती अगदी कडक होत चाललेली होती. अितरत्र साऱ्या हिंदुस्थानात मुसलमानांच्या वर्चस्वाचे संकट नव्हतेच. मुसलमान पुढे घुसलेलेच नव्हते. म्हणून शुध्दिबंदीचा प्रश्नही हिंदुसमाजापुढे तीव्रतेने आला नव्हता. अिथेच हे सांगून टाकतो की, शुध्दिबंदीतूनच अुत्पन्न झालेला अटकबंदी म्हणजे सिंधूनदी ओलांडून मुस्लिम देशात (म्लेंच्छदेशात) जाणे, हि हिंदु धर्माप्रमाणे अत्यंत निषिद्ध गोष्ट होय, जातिबहिष्कृत गोष्ट होय, अशी जी आज्ञा पुढे आपल्या स्मृतीतून घुसली तीही त्या वेळच्या परिस्थितीत सनातनवर्गांनी हिंदुधर्माचे संरक्षण व्हावे, म्हणूनच साधारणतः याच काळी घेतलेली असली पाहिजे. कारण महंमद गझनीनंतरही सिंधुपलीकडचा सारा प्राचीन भारताचा भाग अगदी परियात्र पर्वतापर्यंत (हिंदुकुश पर्वत) हिंदुराजांनी परत जिंकून घेतलेला होता. खोतानपर्यंत हिंदुराज्ये पूर्वी पसरलेली होती, हे आता अितिहाससिद्धच झालेले आहे. तेव्हा सिंधुनदी ओलांडून जाणे म्हणजे हिंदुधर्मच (वैदिक अित्यादी पंथ) ओलांडून, सोडून जाणे होय, स्वतःच बाटणे होय, अशी समजूत असणे शक्यच नव्हते. अगदी त्या वेळेपर्यंत 'कृण्वन्तो विश्वमार्यम्' ही प्रतिज्ञा आपल्या ध्वजावर कोरलेली होती. 'आर्यधर्माच्या प्रचारार्थ साऱ्या जगभर संचार करा', अशी स्वधर्माची अनिर्बंध आज्ञा होती.

पण पुढे जेव्हा मुसलमानांच्या आक्रमणामुळे सिंधुपलीकडची हिंदुराज्ये बुडाली आणि मुसलमानांसारख्या परधर्मीयांचा अघोर छळ करणाऱ्या राक्षसी समाजाकडून सहस्त्रावधी हिंदु शस्त्रबळाने बाटविले जाअू लागले तेव्हाच स्वकीय शस्त्रबळाचा कोणताही आधार न अुरलेल्या अगतिकपणामुळे तेवढ्यापुरता काही तत्कालीन स्मृतींमध्ये हा अटक न ओलांडण्याचा निर्बंध मागून घालण्यात आला असला पाहिजे, हे वर दिलेल्या अितिहासावरून सिद्धच होते. याचे आणखी अेक प्रत्यंतर म्हणजे आपल्या स्मार्तव्यवस्थेतच, कालाप्रमाणे, परिस्थितीप्रमाणे राष्ट्राला हानिकारक न होतील असे धर्माचार घालण्याची, निषिद्ध करण्याची, सोय असे.

**'अन्ये कृतयुगे धर्माः त्रेतामां द्वापरे परे ।**
**अन्ये कलियुगे नृणां युगऱ्हासानुरूपतः ।।**

त्याप्रमाणे त्या व्यवस्थेनुरूपच जेव्हा मुसलमानांच्या आक्रमणामुळे सिंधूपलीकडची हिंदूराज्ये बुडाली आणि हिंदू-पारसी अित्यादी मुस्लिमेतर धर्मीयांचा अघोर छळ करून बलात्काराने त्यांना मुसलमान करून घेणाऱ्या आततायी धर्माची राजसत्ता तिकडे स्थापन झाली आणि त्यायोगे सिंधु ओलांडून तिकडे जाणे हे स्वधर्मत्यागाअितकेच भयंकर झाले तेव्हा कोणाही हिंदूने सिंधुनदी ओलांडून पलीकडे जाणे हे पाप आहे, सिंधूपलीकडील भूमि ही म्लेंच्छस्थान समजली जावी, असा आपत्कालीन नवा धर्माचार तत्कालीन स्मृतींना सांगावा लागला. येथूनच अटकबंदी चालू झाली असली पाहिजे.

भविष्यपुराणात हिंदुस्थानची नवीन सीमानिश्चिती ज्या श्लोकांत सांगितली आहे त्यात निर्दिशिलेला प्रदेश म्हणजे 'सिंधूअलीकडचा देश हेच खरे सिंधुस्थान होय' असे सांगणारा आम्हीच प्रथमतः हुडकून काढून प्रामुख्य दिलेला हा खालचा अेतिहासिक श्लोक :

**'सिंधुस्थानमिति प्राहु : राष्ट्रमार्यस्य चोत्तमम् ।**
**म्लेंच्छस्थानं परं सिंधो : कृतं तेन महात्मना ।।'**

हा श्लोक ह्याच काली म्हणजे महंमद घोरीनंतरच्या कालातच स्मृतीत घातला गेला असला पाहिजे. आणि त्यातही त्या श्लोकात त्याचा हा काळही निर्देशित केला गेला आहे. ज्या त्या काळच्या हिंदुमहाराजाने ती सीमा निश्चित ठरविली आणि ज्याचा अुल्लेख 'तेन महात्मना' म्हणून श्लोकात केलेला आहे तो त्या वेळचा हिंदूंचा सर्वात प्रमुख असा राज्यकर्ता म्हणजे महाराजा भोज हाच बहुधा असला पाहिजे.

## त्याकाळी सिंधुबंदीची आज्ञा मात्र स्मृतिकारांनी सोडलेली नव्हती

सिंधुनदीकडील आमच्या भरतखंडाच्या अुत्तर नि वायव्य सीमेचे असे आकुंचन करण्याचा दु:खद प्रसंग मुसलमानांच्या शस्त्रविजयामुळे जरी हिंदुराष्ट्रावर कोसळला तरी तो त्या सीमेपुरताच काय तो मर्यादित राहिला. बाकी पंजाबच्या अलीकडील सारे भरतखंड, सारे सिंधुस्थान तिकडे नवीन नवीन जाति हिंदुधर्मात समाविष्ट करणाऱ्या सुदूर आसामपर्यंतच्या आणि तेथून पूर्व, पश्चिम आणि दक्षिण महासागरांवर समुद्रदलाचे स्वामित्व, संपादन करून हिंदुचीनपर्यंत (अिंडोचायना) साऱ्या अीशान्य पश्चिम सीमेपर्यंत हिंदुराष्ट्राची अप्रतिहत सत्ता गाजतच होती. नवीन नवीन विजय मिळतच होते. सिंहलद्वीप हेही भरतखंडाचेच अेक लहानसे बालराज्य (Baby India) होते. कारण सिंहलद्वीपावर बहुधा भारतीय राजवंशच राज्य करीत आले होते. तीच गोष्ट लखदीव, मालदीव अित्यादी पश्चिम समुद्रातील, त्या 'रत्नाकरातील' आफ्रिकेपर्यंत पसरलेले सारे द्वीपपुंजही त्या कालापर्यंत हिंदूंच्याच सामुदायिक सत्तेखालीच होते. अशा काली सिंधुबंदी ही वैदिकधर्मानुगामी म्हणविणाऱ्या स्मृतींनी निषिद्ध ठरविलेली होती, अशी कल्पना करणे सुद्धा वेडेपणा आहे. कारण, त्या भारताच्या, पूर्व, पश्चिम आणि दक्षिण अशा, तिन्ही समुद्रसीमांवर आधिपत्य गाजविणारे सम्राट राजेंद्र चौलासारखे दिग्जेते वैदिकधर्मानुयायीच होते; आणि स्वत:स 'त्रिसमुद्रेश्वर' ही अुत्तरेकडील सम्राट पदवीप्रमाणेच सर्वश्रेष्ठत्व गाजविणारी पदवी धारण करीत असत.

## मग सिंधुबंदीची बेडी हिंदूंनी
## स्वत: होअून स्वत:च्या पायांत ठोकून
## घेतली ती केव्हा आणि कां ?

ज्या कारणामुळे अुत्तरसीमेवर सिंधू-नदीपलीकडच्या प्रदेशात जाणे हे धर्मबाह्य कृत्य आहे, असे सांगणारी अटकबंदी झाली त्याच परधर्मीय लोकांच्या छळामुळे दक्षिणेकडेही आपल्या सीमेवरील तिन्ही समुद्रांतून प्रवास करणे हेही धर्मबाह्य कृत्य आहे, असा निषेध पुढच्या पुढच्या स्मृतींतून त्या काळच्या राजकीय प्रदास्याखाली पंगु बनलेल्या हिंदुशास्त्रकारांना करणे भाग पडले हे कारण स्मृतीतल्या वर दिलेल्या 'अन्ये कृतयुगे' अित्यादी श्लोकांत अप्रत्यक्षपणे गोविलेले आहे. हिंदूंच्या मूळच्या स्मृतींत पुढच्या पुढच्या परिस्थितींना तोंड देण्यासाठी जे जे काही नवे विधि-निषेध घालावे लागले, ते घालता यावे यासाठी 'युगऱ्हासाची' आणि कलिवर्ज्य प्रकरणाची प्रयुक्ति अंगीकारली गेली. अर्थात 'पूर्वीच्या स्मृति अपरिवर्तनीय आहेत' ह्या तत्त्वास त्या युगऱ्हासाच्या आणि कलिवर्जाच्या गृहीत कृत्यामुळेही तसे पाहता बाध आणल्यासारखे होअीच होअी. पण तसे अप्रत्यक्षपणे न बोलता बाध आणणे हे त्या त्या काळच्या समाजहितदृष्टीने जुन्या विधिनिषेधात अवश्य ते पालट करणाऱ्या शास्त्रकारांना अपरिहार्यच होअी.

**अन्ये कृतयुगे धर्मा: त्रेतायां द्वापरे परे ।**
**अन्ये कलियुगे नृणां युगऱ्हासानुरूपत: ।।**

हे आम्ही ह्या प्रकरणातच वर अुल्लेखिलेल्या बहुतेक स्मृतींत सापडणाऱ्या वचनावरून अुघडच होत आहे. त्या स्मार्त (Legal) पद्धतीनुसार मेधातिथीच्या किंवा देवलांच्या कालानंतरही रचलेल्या किंवा संशोधिलेल्या अगदी अर्वाचीन स्मृतीमध्येच काय ती

**'समुद्रयातु: स्वीकार: कलौ पंच विवर्जयेत् ।।**

अशी समुद्रप्रवासाचा निषेध करणारी, समुद्रप्रवास करणाऱ्या व्यक्तीस आपल्या धर्मात, जातीत परत घेऊ नये, त्याला परत घेणारा प्रायश्चित्तविधीच नाही, अशी कडक मर्यादा घातलेली आढळते. हा काल म्हणजे आपल्या पश्चिम सिंधूमध्ये ख्रिश्चनांचा आणि त्यातही विशेषतः पोर्तुगीजांचा प्रभाव जेव्हा पडू लागला आणि विशेषेकरून गोमंतकांत त्यांनी हिंदु लोकांवर सशस्त्र आक्रमणे करून त्यांच्या सहस्त्रावधि स्त्री-पुरूषांना अगदी मुसलमानांप्रमाणे बलात्काराने बाटवून ख्रिश्चन करण्याचा धूमधडाका चालविला होता आणि ज्या काळी विशेषतः अरब लोकांनी आपापली नाविक सैन्य अुभारून हिंदुमहासागरातून पुढे जाअून जावा, सुमात्रा ते हिंदूचीन (अिंडोचायना) पर्यंत स्वाऱ्या केल्या आणि तिकडच्या हिंदु-बौद्धधर्मीय राज्यांवर मुसलमानी धर्माच्या अितरत्र झालेल्या धार्मिक आक्रमणांप्रमाणेच सशस्त्र आक्रमणे करून तिकडील त्या हिंदुबौद्ध देशातील लोकांवर त्यांना मुसलमान करण्यासाठी राक्षसी बलात्कार केले, आणि हिंदुस्थानातील जी चोल, पांड्य यासारखी पराक्रमी सिंधूसैन्ये पूर्वी तिकडील त्या हिंदु बौद्ध राजांच्या साहाय्यास जात ती समुद्रगामी सारी हिंदूराज्येही, सारे दक्षिण हिंदुस्थानही, मुसलमानांनी जिंकून घेतल्यामुळे अुद्ध्वस्त होअून गेली आणि त्या जावाप्रभृति प्रांताकडे जाअीनाशी झाली. तेव्हा त्या हिंदूंच्या राजकीय, सैनिक नि धार्मिक अशा अत्यंत दुर्दशेने ग्रस्त झालेला तोच हा काळ. हा आमच्या स्मृतींमध्ये सिंधुबंदीची कडक आज्ञा घालणारा असला पाहिजे. आणि त्या काळाच्या अगदी अर्वाचीन स्मृतिमध्ये हे अटकबंदीचे आणि सिंधुबंदीचे श्लोक आढळतात.

ह्यावरून आपणाला हेही मानलेच पाहिजे की, आपले तीनही समुद्र ओलांडून जाणाऱ्या हिंदूला जेव्हा बलात्काराने मुस्लिम किंवा ख्रिश्चन करणाऱ्या मानवी नक्रांच्याच तोंडात पडावे लागे आणि त्या संकटातून त्यांची सुटका करील अशी समुद्रावरील वर्चस्व गाजविणारी हिंदुशक्ती अुरली नव्हती अशा काळी आपल्या काही समाजधुरीणांनी निरुपायाने समुद्र ओलांडून हिंदूंनी मुळी जाअूच नये, अशी धर्माज्ञा सोडावी, हे कृत्य हिंदुसमाजाचे रक्षण करण्याच्या सद्‌हेतूनेच त्यांना करावे लागले असले पाहिजे.

ज्या देशात आपल्या धर्माच्या किंवा राष्ट्राच्या लोकांची अवहेलना होते. मुसलमान, ख्रिश्चनांसारख्या परधर्मांना आपल्या लोकांवर सशस्त्र बळाने लादले जाते आणि अशा संकटास पायबंद करण्याचे सैनिक सामर्थ्य त्या राष्ट्रात नसते; अशा वेळी कोणत्याही राष्ट्राला स्वहितार्थच त्या शत्रुदेशात आपल्या नागरिकांनी जाअूच नये, अशी बंदी करण्यावाचून त्या परिस्थितीत काही गत्यंतरच नसते.

## मग शुद्धिबंदी, अटकबंदी, सिंधुबंदी
## अित्यादी रूढींच्या बेड्या हिंदूंनी आपल्या पायांत ठोकून घेण्यात चुकले ते काय?

ज्या भयंकर चुकीमुळे अटकबंदी, सिंधुबंदीसारखी त्या त्या काळी लाभदायक असलेली बंधने स्मृतींमध्ये घातली जात त्या त्या काली त्या बंधनाच्या नवीन प्रक्षिप्त श्लोकांवरही, ते श्लोक त्या स्मृतिकारांनी अितर जसे त्या स्मृतीत सनातनधर्म म्हणून घातलेले होते, त्यांचा सनातनत्वाचा अधिकार, ती पवित्रता आणि ती अनुल्लंघनीयता ह्या नवीन घालाव्या लागणाऱ्या धर्मबंधनांनाही, त्या प्रक्षिप्त श्लोकांनाही, प्राप्त व्हावी ह्या हेतूने ह्या 'नवीन बंदीवरील' श्लोकांपुढेही 'अेष धर्मः सनातनः' ही ठाम, परंपरागत नि स्मृतिशास्त्राची अधिकृत मुद्राही हटकून मारली जाअी; ग्रथिली जाअी. त्यामुळे ती सिंधुबंदी किंवा अटकबंदी ज्या परिस्थितीत हिंदूंना हितावहच होती, ती राष्ट्रनाशक परिस्थिती बदलल्यानंतरही तीच अटक ओलांडून अफगाणिस्थान, अिराणवर पुन्हा स्वारी करण्याअितके हिंदूंचे सैनिक सामर्ध्य अेखाद्या प्रौढप्रताप पेशव्यांच्या किंवा रणजितसिंगाच्या काळी वाढले असताही त्या पालटलेल्या परिस्थितीत हिंदुहितघातक ठरणारा हा बुळा धर्मभोळेपणा मात्र नष्ट होअू शकला नाही, जो जसाच्या तसाच त्या धर्मवेड्या समाजाला अटक ओलांडणे म्हणजे पाप करणे, ही भीती सोडू देत नसे! म्हणजे प्रथम हितावह असलेली धार्मिक रूढी पुढे राष्ट्रास अनर्थावह झाली तरी समाज तिला तत्काल तोडण्यास शास्त्रभयाने सिद्ध होत नसे! जेव्हा ती रूढी तोडणे हेच राष्ट्रहिताचे म्हणजे धार्मिक दृष्टयाही पुण्यप्रद होते तेव्हासुद्धा ती रूढी तोडणे हे पापप्रद आहे, असा आंधळा धर्माभिमान, हट्ट धरीत राही! तेव्हा हा जो 'अेष

धर्मः सनातनः' चा बाऊ तेवढा असले प्रक्षिप्त श्लोक लिहिताना आमचे अर्वाचीन स्मृतिकार दाखवीत, ती तेवढी भयंकर चूक झाली.

सिंधुबंदीचेच अुदाहरण घ्या! ह्या अर्वाचीन शास्त्रकारांनी जर स्पष्टपणे सांगितले असते की,''पूर्वी कृतयुगे'' आपले आर्यराष्ट्र समुद्र ओलांडून अनेक द्वीपांतरांवर राज्य करण्याअितके समर्थ होते. अगदी राजेंद्र चौलापर्यंत आम्ही 'त्रिसमुद्राधीशत्व' मिळविले होते. तेव्हा समुद्र ओलांडणे हे आमच्या धर्मप्रसारास नि राज्यप्रसारास अवश्यच होते, म्हणून पुण्यप्रदच होतेः पण, पुढे आता, आजकाल दुर्दैवाने आपल्या राष्ट्राची नौसैन्यशक्ती आणि ते सिंधुस्वामित्व नष्ट झाले आहे, यासाठी ते आम्हाला पुन्हा मिळविता येअील तोवर - आणि तोवरच - आमच्या लोकांनी समुद्रापलीकडील शत्रुराष्ट्रांत आणि शत्रुधर्मीय समाजात दुर्बलपणाने जाणे हे आपल्या राष्ट्रांस घातक म्हणून पापप्रद असल्यामुळे त्या कालापुरतीच ही सिंधुबंदी आहे. 'युगह्रासानुरूपतः' याचा खरा अर्थ 'शक्तिऱ्हासानुरुपतः' असाच घेतला पाहिजे. 'अेष धर्मः सनातनः' या वचनाचा बागुलबुवा येवढ्यापुरताच काय तो खरा समजावा.'' असे त्या कालच्या स्मृतिकारांनी स्पष्टपणे सांगितले असते तर ह्या अटकबंदीचे किंवा सिंधूबंदीचे जे भयानक दुष्परिणाम हिंदुराष्ट्रास भोगावे लागले, ते फार मोठ्या प्रमाणात तरी टळले असते! परंतु कलिवर्ज्याच्या प्रकरणातच ह्या जातिभेद, शुद्धिबंदी, अटकबंदी नि समुद्रबंदी अित्यादी वस्तुतः त्या काळच्या शास्त्रकारांनी स्वतःच घातलेले परंतु त्या मुख्य स्मृतिकारांच्या नावावर ठोकून दिलेले श्लोक घातले गेल्यामुळे, त्या सर्व बंद्या कलियुग संपेपर्यंत म्हणजेच 'सनातनीपणाच्या' अर्थात सदोदितच्या होअून बसल्या. पूढे हिंदुराष्ट्रहिताला त्या बंद्या तोडून टाकण्याची शक्ती जरी हिंदूत पुढील काळी प्रत्यक्षपणे आलीही होती, तरी त्या बंद्या 'कलौ पंच विवर्जयेत' अशी स्मृतीची आज्ञा असल्याने कलियुग संपेपर्यत म्हणजेच प्रलयकालापर्यंत तोडण्यास भाविक असा प्रचंड हिंदूसमाज सिद्ध होणे शक्यच नव्हते! पुन्हा कलियुग केव्हा चालू झाले, किती दिवस राहणार, नि कधी संपणार, आणि ते संपून प्रलयोत्तर सत्ययुग पुन्हा केव्हा चालू होणार, याविषयी आपल्या शास्त्रकारांमध्ये जे विक्षिप्त मतभेद आहेत त्या ब्रह्मघोटाळ्याचा प्रश्न निराळाच आहे!

## ख्रिश्चनांनी हिंदूंवर केलेल्या सशस्त्र धार्मिक आक्रमणांचा प्रारंभ!

वर ह्या ग्रंथामध्ये, ख्रिश्चन लोकांशी आम्हा हिंदू लोकांचा धार्मिक संबंध किती पूर्वीपासून आलेला होता, हे अुल्लेखिलेले आहे. जेव्हा ख्रिश्चन कथांप्रमाणे सीरियामध्ये ख्रिश्चन धर्माचा त्याच्या अगदी पहिल्या अिसवी सनातच प्रचार होअू लागला, तेव्हा स्वतः जीझसला फाशी देणाऱ्या ज्यू धर्मीयांकडून त्या मूठ मूठ ख्रिश्चन लोकांचा फार छळ होअू लागला. त्या वेळीच काही ख्रिश्चन लोक टोळ्या करून ज्यांना हिंदुस्थानचे जलमार्ग माहीत होते, ते पळून हिंदुस्थानांत मलबारकडे झामोरीन (हा शब्द सामुद्रीय या शब्दाचा अपभ्रंश आहे) या हिंदुराजाच्या आश्रयार्थ आले. वस्तुतः या परकीय लोकांना त्या हिंदुराजाने आपल्या समुद्रतटावर विनाअट पाअूलही टाकू द्यावयाचे नव्हते! पण सद्गुणविकृतीच्या व्याधीने ग्रस्त झालेल्या त्या हिंदुराजाने त्या सीरियन ख्रिश्चनांना आश्रय दिला! त्यांना अेक भूभाग वस्ती करावयास दिला! अितकेच नव्हे, तर त्यांना ग्रामपंचायतीत अेक स्वतंत्र जाति म्हणून समान हक्काचा ताम्रपट दिला!!! परंतु, पुढे पुढे त्या सीरियन ख्रिश्चन लोकांना असे आढळून आले की, आपल्या समवेत हिंदूंना बळानेही नुसते खाण्यापिण्यास लावले तरीही ते हिंदूलोक बाटून ख्रिश्चन होअू शकतात! आणि त्याप्रमाणे त्या अगदी पूर्वीच्या सीरियन ख्रिश्चन लोकांनी हिंदुस्थानात ख्रिश्चन धर्मप्रचाराची मुहूर्तमेढ रोविली! ज्या ख्रिश्चनांच्या पहिल्या शतकात प्रत्यक्ष अिंग्लंडमध्ये ख्रिश्चन धर्माचे नावही अेकू आलेले नव्हते त्या वेळी या हिंदुस्थानात हिंदू लोकांना बळाने ख्रिश्चन करण्यात येअू लागले होते, त्यावेळचा ख्रिश्चन प्रचाराचा अितिहास प्रत्येक हिंदूने वाचण्यासारखा आहे. आणि तसे धर्मांतर शत्रूला अगदी सोपे करणाऱ्या रूढी अिसवी सनाच्या त्या पहिल्या शतकात आमच्यात अगदी मूलधर्माचार म्हणून रूढ झालेल्या होत्या, असे दिसते. पण याविषयी स्थलाभावी आणि या ग्रंथातील मुख्य विषयाला तो भाग आवर्जून देणे आवश्यक नसल्यामुळे तो सोडून देअू.

तथापि, अेकच अत्यंत बोलके अुदाहरण देतो. अेका गावात अेका तळ्यात पुष्कळसे हिंदूलोक तीर्थ म्हणून स्नान करीत असतात. हे पाहून त्या सीरियन ख्रिश्चनातील काही प्रचारक (मिशनरी) पाद्रयांच्या मनात आले की, ख्रिश्चनांच्या हातचे अन्न खाताच किंवा पाणी पिताच आपण बाटतो असे मानणाऱ्या या हिंदूंना बाटविण्याची युक्ती येथेही वापरून पाहू या! असे मनात योजून हे ख्रिश्चन पाद्री हिंदू लोक ज्या मोठमोठ्या तळ्यांत स्नानाला जात आणि पिण्याचे पाणी भरीत अशा काही तळ्यांत अप्रसिद्धपणे जाअून त्या लोकांसह स्नान करीत आणि पाणी पीत. नंतर काही दिवसांनी तेच पाद्री आपणहून सार्वजनिक प्रार्थनेत मोठमोठ्याने ओरडून सांगत की 'अहो हिंदू लोकहो! आम्ही किरिस्ताव येशूच्या या धर्माचे अनुयायी! हिंदू नव्हे! त्या तुमच्या तळ्यात आम्ही तुम्हासहच स्नान करीत आलो आहोत, आमची पूजा-प्रार्थना करून ते अिसाअी धर्माचे तीर्थ आम्ही पितो आणि तेच तीर्थ आम्ही तुम्हा लोकांना आजवर देत आलो आणि तुम्ही ते भक्तिभावाने प्यालेले आहात. तुमच्या हिंदुधर्माप्रमाणे अिसाअी धर्माचे पाणी जो पितो, तो हिंदू जन्माचा अिसाअी होतो, अशी तुमची धर्माज्ञा आहे. तेव्हा आता तुम्ही सर्व लोक अिसाअी झालेले आहात! तुमच्या अितर हिंदू बांधवांची फसगत होअू नये म्हणून आम्ही सत्‌चरित्र लोक हे सत्य अुद्‌घोषित करीत आहोत!'' ही बातमी हां हां म्हणता निरनिराळ्या खेडेगावांतील ख्रिश्चन आणि हिंदूत पसरली! मोठा गोंधळ अुडाला! ते हिंदू बाटले, म्हणून त्यांच्यावर बहिष्कार पडू लागला. ठराविक पद्धतीने ती ती गावेची गावे हळूहळू किरिस्तावांची गावे म्हणून अितर हिंदू समाजाकडून बहिष्कृत झाली!

आता येथे आणखी अेक त्या वेळच्या मानव जातीलाच धर्मवेडाची व्यथा कशी निरनिराळ्या प्रकारे जडलेली होती, याची अेक गंमत-पण प्राणघेणी गंमत म्हणून पुढीलही थोडा प्रकार सांगतो. तो असा की, हिंदुस्थानात आलेल्या त्या पहिल्या ख्रिस्ती शतकातील ख्रिस्ती लोकांतही त्यांचे निरनिराळे पंथ होतेच. त्यांची अितर देशात खरा ख्रिस्ती प्रचार कोण अधिक करतो, याविषयी स्पर्धाही असे. त्यामुळे ज्या पंथाने ती हिंदु गावे बाटविली होती, त्या पंथाचा अितर पंथांच्या ख्रिश्चनांनी निषेध केला आणि त्यांच्याविषयी मत्सर वाटल्यामुळे त्यांच्या युरोपमधल्या आचार्यांना कळविले की. 'ते अन्यपंथीय लोक हिंदुस्थानात मूर्ख नि वेडगळ हिंदूंना अगदी ढोंगबाजीने फसवून किरिस्ताव करतात आणि दक्षिणा अुकळतात. ख्रिस्ताची तत्त्वे म्हणून काहीअेक प्रचार ते करीत नाहीत! येवढ्यासाठी त्यांच्या प्रचारांची संख्या खरी मानू नये! आणि त्यांना आम्हा प्रचारकांची पत अशी बुडवू देअू नये! ह्या त्या दुसऱ्या ख्रिस्ती पंथाच्या सतत कागाळीने कित्येक वर्षे ते बाटविलेले हिंदू स्वतःस किरिस्ताव म्हणवीत, परंतु तो दुसरा ख्रिस्तीपंथ त्यांना हिंदूच समजे! त्यांच्या चर्चमध्ये त्यांना घेअीनात! त्यांची दक्षिणाही घेअीनात! शेवटी हा प्रश्न त्या 'दक्षिणेनेच' सोडविला असावा! कारण, काही दिवसांनी युरोपमधून त्या आचार्यांची आज्ञा आली की, त्या सर्व 'बाटलेल्या' हिंदूंना आता ख्रिश्चनच समजावे आणि त्या सर्वांपासून 'दक्षिणा' म्हटली की ती अवश्य घ्यावी!' पुढे तर अगदी स्पष्टपणे सर्वच ख्रिस्ती पंथांच्या प्रचारकांनी हव्या त्या युक्तिप्रयुक्तीनेच काय, पण बळाने सुद्धा-शस्त्रबळाने सुद्धा हिंदूंना ख्रिस्ती करून घेणे, हेच हिंदूस्थानात ख्रिस्ती चर्चचे पवित्र धर्मकर्तव्य आहे. म्हणून घोषित केले. तेव्हा पाणी पाजून हिंदूंना बाटविणे, अन्न खाअू घालून त्यांना बाटविणे, अित्यादी प्राथमिक प्रयत्नांना नि वादांना अर्थच अुरला नाही!

पुढे सीरियन ख्रिश्चनांचे आणि सर्वसाधारण ख्रिश्चनांचे त्यांच्या देशातच पंथापंथीच्या अुलाढालीत वैमनस्य माजले. युरोपातील मोठमोठ्या ख्रिश्चन पंथांतच लढाया सुरू झाल्या, त्यामुळे दोन-तीन शतके तरी ख्रिश्चन पंथाच्या प्रचारकांचे (मिशनरी) हिंदुस्थानातील कार्य जवळ जवळ बंदच पडले. पण अिथेही ध्यानात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे जे हिंदू वर सांगितल्याप्रमाणे आधीच गावोगाव बाटले होते त्यांना हिंदू लोकांत परत घेण्याची कोणतीही चळवळ न निघाल्यामुळे ते स्वतःला 'किरिस्ताव' च म्हणवीत राहिले आणि त्यांचा हिंदू लोकांशी असलेला नाममात्र संबंधही नष्ट झाला!

या संक्षिप्त वृत्तान्तांत यानंतर सांगण्यासारखी ख्रिश्चन धर्माच्या प्रचारांची चळवळ म्हणजे साधारणतः पंधराव्या शतकात पोर्तुगीज लोकांनी गोमंतक जिंकून घेतल्यानंतर आणि समुद्रमार्गे मलबार येथेही ख्रिस्ती केंद्रे अुघडल्यानंतर वेगाने अुसळली. त्यांचा हिंदू लोकांना वाटेल ते अत्याचार करून ख्रिस्ती करणारा हिंदुस्थानातील पहिला प्रबळ मठपती म्हणजे सेंट (संत) झेव्हिअर हा होय. तो १५४० चे संधीस गोमंतकात आला. त्याने ख्रिस्तीधर्मप्रचाराचा आटोकाट प्रयत्न काही वर्षे

केल्यानंतर त्याच्या त्या प्रचाराच्या आड येणाऱ्यांविषयी पोर्तुगालच्या बादशहाला अनेक पत्रे लिहिली. त्यातील अेक पत्रात तो म्हणतो -

‘तुमचे हिंदुस्थानातील शासकीय अधिकारी स्वतः ख्रिस्ती असताही आपल्या धर्मप्रसाराच्या आज्ञांना ते धाब्यावर बसवीत आहेत. ते आपल्या चैनीत दंग असून साधेल त्या अुपायाने लक्षाधीश होअू पाहात आहेत. द्रव्य हाच त्यांचा देव आहे. खऱ्या देवाच्या सेवेस ज्या आम्ही मिशनऱ्यांनी सारे आयुष्य वाहून दिलेले आहे, त्यास ते लवलेशही साह्य करीत नाहीत. हिंदुस्थानात ख्रिस्ती धर्मप्रचारास आम्हांला जो मुख्य अडथळा होतो आहे तो येथील ब्राह्मण लोकांचा होय! ते आमच्या धर्मप्रचारास पुढे जाअू देत नाहीत. सहस्त्रावधि सामान्य हिंदू लोक आम्हीं बाटवीत जातो, पण मागे वळून पाहतो तो हे ब्राह्मण गुप्तपणे मांडवी नावाच्या नदीच्या तीरावर त्या सर्वांना नेअून त्यास सांगतात की ‘या नदीत स्नान करून आम्ही सांगतो ते श्लोक म्हणा, म्हणजे तुमचे ख्रिश्चन होण्यातले पाप धुअून जाअून तुम्ही पुन्हा हिंदूंचे हिंदू व्हाल!’ अशा थापा मारून हे ब्राह्मण लोक त्या बाटलेल्या हिंदूपैकी अनेकांना वरील स्नानाप्रमाणेच अितरही अनेक प्रकारे फसवून शुद्ध करून घेतात. या ब्राह्मणांना वचक घालण्याचा प्रयत्न आम्ही करतो, पण त्यास ते भीक घालीत नाहीत. आणि तुमचे अिकडचे शासकीय पोर्तुगीज अधिकारी त्या ब्राह्मणांना आम्ही सांगतो तशा अत्यंत कडक शिक्षा देत नाहीत.’

सेंट झेव्हिअर प्रभृति ह्या ख्रिस्ती पाद्रयांच्या सतत हाकाटीला कंटाळून पोर्तुगालच्या बादशहाने आपल्या शासकीय अधिकाऱ्यांस ख्रिस्ती धर्मप्रचाराच्या कार्यात लवलेशही हयगय होता कामा नये, नाहीतर तुमचीच सगळी संपत्ती छिनावली जाअील, अशा कडक आज्ञाही मधून मधून सोडल्या; तरीही तेवढ्याने समाधान न होता हा सेंट झेव्हिअर आपल्या पोर्तुगालच्या बादशहाला धाडलेल्या दुसऱ्या अेका पत्रात लिहितोच की,‘‘आमचे हिंदूंना ख्रिस्ती करण्याचे कार्य अतिशय वेगाने फैलावत आहे. आमच्या प्रचारकाला पाहताच हिंदूंच्या खेड्यापाड्यांत आमच्या भयाने पळापळी सुरू होते, अितके कडक अुपाय आम्ही जे हिंदू ख्रिस्ती होणार नाहीत त्यांना दंड करताना योजतो! सामान्य हिंदू खेडवळांचीच गोष्ट काय पण आम्ही पकडून, बंदिगृहात टाकून, सैतानाने पछाडलेल्या त्या हिंदूंच्या मोठमोठ्या देवस्थानांच्या आचार्यांची, मठाध्यक्षांची आणि नगरातील श्रीमंत हिंदूंची शारीरिक माराखाली जी लांडगेतोड करतो, तिच्या भयामुळे अनेक ठिकाणचे हे हिंदूंच्या देवालयांचे पुजारी, त्यांच्या मूर्ती घेअून गुप्त रूपाने गोमंतकाबाहेर पळून जात आहेत! त्यांची सारी संपत्ती आम्ही हिरावून घेतो, मूर्ती फोडून टाकतो, देवालये पाडून टाकतो, चाबकाच्या फटकाऱ्याखाली त्यांची शरीरे सोलून काढतो, आम्हांला त्या कामात आता अुदंड यश येत चालले आहे! फार काय, जर का हे ब्राह्मण लोक तेवढे माझ्या मार्गात आडवे येते ना, तर मी साऱ्या हिंदुस्थानभर बोलता बोलता ख्रिश्चन धर्माचा प्रसार करू शकलो असतो!’’ सेंट झेव्हिअरची त्यानंतरची अितर अनन्वित कृत्ये आणि हिंदू लोकांवर त्याने आणि त्याच्या नंतरच्या आलेल्या शेकडो पोर्तुगीज पाद्र्यांनी त्याचप्रकारच्या हिंदूंच्या केलेल्या अनन्वित धार्मिक छळाची माहिती स्थलाभावी येथे देता येत नाही.

अुत्तरेकडील सर्व प्रांतांतून हिंदुसमाजाला केवळ मुसलमानांच्याच काय त्या धर्मच्छळांना तोंड द्यावे लागले आहे. पण विंध्याद्रीच्या दक्षिणेकडील रामेश्वरापर्यंतच्या हिंदूंना मुसलमानांच्या ज्या पाच स्वतंत्र पादशाह्या या दक्षिणेत नांदत राहिल्या, त्यांच्या सतत भ्रष्टीकरणाच्या प्राणघातक जाचासच काय ते तेवढे बळी पडावे लागले नाही, तर मुसलमानांहूनही क्रूर असणाऱ्या पोर्तुगीजांनी हिंदूंच्या ख्रिस्तीकरणासाठी जो हिंदूंचा भयंकर छळ केला, त्यासही बळी पडावे लागले, तोंड द्यावे लागले. तो सर्व हृदयद्रावक वृत्तांत समजावून घेण्याची ज्यांना अिच्छा असेल त्यांना तो सर्व वृत्तांत Cs Hindus De Goa Republica Portuguesa' ह्या नावाच्या थेट पोर्तुगीज ग्रंथात ग्रंथिलेला सापडेल. ह्या ग्रंथाचे भाषांतर अिंग्रजीमध्ये झालेले आहे आणि मराठीमध्येही होत होते अशी माहिती मिळते. ह्याच ग्रंथाचे नाव अशाकरता दिले की, ख्रिस्ती धर्मप्रचारासाठी पोर्तुगीजांनी केलेल्या हिंदूंच्या धार्मिक छळाची मुसलमानांनाही लाजविणारी अत्याचारकृत्ये आणि त्यांचा हिंदुस्थानातील अेकंदरीत अितिहास अनेक लहानमोठ्या ग्रंथात वर्णिलेला आहे. पण वर दिलेल्या पोर्तुगीज अितिहासाचे वैशिष्ट्य हे आहे की, तो सर्व अितिहास डॉक्टर Palonio Noronhua ह्यांनी लिहिलेला असून हे गृहस्थ पोर्तुगीज सरकारच्या सुप्रीम

हायकोर्टाचेच न्यायाधीश होते. पोर्तुगीज लोकांना आपल्या अितिहासाविषयीची अुलटसुलट सर्व राजकीय कागदपत्रे प्राचीन कालापासून जतन करून ठेवण्याची अेक प्रामाणिकपणाची सवय आहे. आणि ते वृत्तभांडार अभ्यासूंना वाचावयास देण्याची त्यांची पुरातन रीत आहे. आणि त्यांतही ते स्वतः पोर्तुगीज! यास्तव त्यांना तेथील सर्व ग्रंथ पूर्णपणे नि प्रकटपणे अभ्यासण्याची विनाअट मोकळीक मिळाली! त्या वेळच्या पोर्तुगीज बादशहांच्या, हिंदुस्थानातील पाद्रयांच्या नि रोमच्या ख्रिस्ती पोपच्या मूळ पत्रव्यवहारासुद्धा सर्व कागदपत्रे अभ्यासून ह्या पोर्तुगीज सुप्रीम हायकोर्टाच्या न्यायाधीशाने हा ग्रंथ लिहिलेला आहे. हे त्याचे अनन्य वैशिष्ट्य आहे.

ह्या ग्रंथात सोडले तर अगदी अर्वाचीन काळी गोमंतकात पूर्वी बाटून ख्रिश्चन झालेल्या दहा हजारांवर हिंदुलोकांना शुद्ध करून घेण्याचे महान कार्य ज्यांनी केले त्या दिवंगत श्री. मसूरकर महाराजांच्या निरीक्षणाखाली लिहविलेला जो ग्रंथ 'गोमंतकातील शुद्धीकरणाचा अितिहास' या नावाने मराठीत प्रसिद्ध झालेला आहे तो तर अवश्य वाचावा. आम्ही प्रस्तुत लिहीत असलेला, 'सहा सोनेरी पाने' हा ग्रंथ काही हिंदुस्थानचा अितिहास नव्हे, तर त्याचे अेक समीक्षण आहे. यास्तव ती सर्व माहिती येथे देणे स्थलाभावी अशक्य आहे. त्यातही पूर्वी मुसलमानांच्या सिंधवरील आक्रमणापासून हिंदूंचे जे सशस्त्र आक्रमण आणि अभूतपूर्व असे धर्मयुद्ध मुसलमानांशी शतकानुशतके चालत आले, त्याच्या वृत्तांताची चर्चा या ग्रंथाच्या पूर्वीच्या प्रकरणातून यथेच्छ केलेली आहे. रोटीबंदी, लोटीबंदी, स्पर्शबंदी, बेटीबंदी, आणि विशेषतः शुद्धिबंदी अित्यादी आमच्या त्या वेळच्या धार्मिक वेडगळपणाच्या अनेक राष्ट्रहितघातक रूढींचे हानीकारक परिणाम आधीच दाखविलेले आहेत. ह्या पोर्तुगीजांच्या आगमनानंतर त्यांच्याशी आणि अेकंदर ख्रिस्तीधर्मप्रचारकांशी नि ख्रिस्ती राष्ट्रांशीही जी तशीच अत्याचारी नि सशस्त्र धर्मयुद्धे झाली, त्यांनाही तीच सारी चर्चा शब्दन्‌शब्द लागू पडते अितके सांगितले म्हणजे पुरे.

येथे हेही ध्यानात ठेवले पाहिजे की, याच वेळी अरब आणि ख्रिस्ती राष्ट्रे यांनी दक्षिण समुद्रावर आपली सत्ता स्थापून हिंदूचीनपर्यंत पसरलेल्या पूर्वीच्या आमच्या हिंदु-बौद्ध साम्राज्यावरही राजकीय नि धार्मिक आक्रमणे करून तिकडील कोट्यवधी हिंदूना धर्मभ्रष्ट केले नि त्यांची राज्येही ह्या अत्याचारी शत्रूंनी हरण केली. त्यामुळे समुद्रबंदीची नवी बेडी हिंदूंनी आपल्या पायात आपणहून ठोकून कशी घेतली याचे 'समुद्रबंदी केव्हा झाली?' यात विवेचन केलेच आहे. त्यामुळे अेकंदर हिंदुराष्ट्राच्या राज्यसत्तेची नि धर्मसत्तेचीच काय ती हानी झाली असे नव्हे, तर हिंदूंच्या विशाल सामुद्रिक दृष्टीचीही हानी झाली! हिंदूंचा सारा व्यापार, सारे नौदल नष्ट झाले! नौकानयनाची कला सुद्धा केवळ नष्ट झाली. अितकेच नव्हे, तर तसे समुद्रगामी नौदल ठेवणेही पापमय होअून बसले! हिंदुधर्माला नि हिंदुराष्ट्राला बहुधा स्वतःच्याच चुकीमुळे अगदी अक्षरशः कूपमंडूकत्व आले! कोणी साहसी हिंदु त्या कूपाच्या बाहेर जाण्याचा पराक्रम करू लागला तरी, पूर्व समुद्र, पश्चिम समुद्र (रत्नाकर) आणि दक्षिण महासागर या तिन्ही समुद्रांच्या तटावर 'मज्जाव' (मत जाव)!' समुद्रयातुः स्वीकारः कलौ पंच विवर्जयेत्।' अशी पाटी लावलेली अनुल्लंघनीय तटबंदी हिंदूकडून अुभारली गेली होती!

येथेपर्यंत मुसलमान ख्रिश्चनादि शत्रूंनी हिंदूंवर जी सशस्त्र धार्मिक आक्रमणे केली त्यांना तशाच सशस्त्र वा निःशस्त्र मार्गांनी अधूनमधून का होअीना, पण निकराने कसे तोंड दिले आणि हिंदूंनीही या हिंदु-मुसलमानांच्या भयंकर नि शतकव्यापी महायुद्धात मुसलमानांवरही सशस्त्र धार्मिक प्रत्याक्रमणे करून त्यांनी केलेल्या धार्मिक अत्याचारांचा कसा सूड घेतला त्या काही वेचक घटना स्थालीपुलाक न्यायाने या प्रकरणात दिलेल्या आहेत.

वास्तविक पाहता वैयक्तिक वा सामुदायिक शुद्धीकरणाचा आणि मुसलमानांवर केलेल्या धार्मिक आघाडीवरही हिंदूंनी केलेल्या सशस्त्र प्रत्याक्रमणाचा अुपक्रम विद्यारण्यासारख्या शंकराचार्यांनी, शिवछत्रपति, दुर्गादास राठोड, जोधपूरचे जसवंतसिंग महाराज ह्यांच्यासारख्या राष्ट्रवीरांनी आणि रामानंद, श्रीचैतन्य अशा अशा संत महंतांनी करून त्यांचे पुढारीपण स्वीकारले असता धार्मिक शुद्धीकरण आणि सशस्त्र प्रत्याक्रमणादि अुठाव हिंदुसमाजाने सारखे करीत राहावयास पाहिजे होते आणि मुस्लिम स्त्री-पुरूषांनाही बळाने हिंदू करून घेण्याचा धुमधडाका अुडवीत जुन्या

रूढींना तिलांजली देअून, हाच त्या काळचा हिंदूंचा ‘युगधर्म’ करून सोडला पाहिजे होता! तसेच हिंदूंना विभूतिपूजेची आवड नव्हती असेही नाही. हिंदुसमाजातील अनेक पंथ, अनेक धार्मिक रूढी आणि धार्मिक सिद्धांतही अशाच विभूतिंनी स्थापन केले होते आणि हिंदूसमाजाने जुने आचार त्या त्या विभूतिंच्या अनुयायांपुरते तरी हिंदुधर्माच्या चौकटीत बसवून दिलेले होते. त्यांच्या त्यांच्या पुरते ते त्या विभूतिंनी प्रतिपादिलेल्या आचारांचेच प्रतिपादन करीत राहिलेले होते. परंतु विभूतिपूजेची अितकी आवड अितर धार्मिक प्रकरणी असणाऱ्या हिंदूसमाजाने, शुद्धीकरण, परधर्मीयांवर सशस्त्र आक्रमण, आपल्या देवमंदिरादि धर्मप्रस्थांच्या आणि विशेषतः, हिंदूंच्या स्त्रियांच्या मुसलमानांनी केलेल्या अवहेलनेचा, त्यांच्या धर्मप्रस्थांची आणि स्त्रियांचीही तशीच अवहेलना करून, त्या धार्मिक शत्रूवर, सूड अुगविण्याचा हा नवीन युगधर्म तेवढा वरीलसारख्या हिंदुराष्ट्राला अत्यंत पूजनीय वाटणाऱ्या विभूतींच्या मागे काही जिवंत ठेवला नाही! त्या विभूति जाताच त्या त्या पंथातील हिंदूंनी त्या विभूतींचे धार्मिक सशस्त्र प्रत्याक्रमणाचे ते ते सक्रिय आचरण किंवा तो अुपदेश सुद्धा चक्क धाब्यावर बसविला! अितकेच काय, पण त्या चैतन्यासारख्या विभूतीचे पंथ अितर प्रकरणांपुरते आजही जिवंत असता आणि त्यांच्या स्तुतीने भरलेले भक्तिविजयासारखे ग्रंथ वाचीत असता त्या ग्रंथातून या विभूतींनीच मुसलमानांवर जो सशस्त्र धार्मिक सूड अुगविला, त्याचा अुल्लेख सुद्धा या ग्रंथात आढळत नाही! किंवा या विभूतींनी मुसलमानांवर केलेल्या सशस्त्र धार्मिक आक्रमणाचा किंवा मोठमोठ्या शुद्धीकरणांचा गौरव करणारा अेखादा पोवाडासुद्धा त्या काळच्या वीर भाटांनी किंवा चारणांनी रचलेला आढळत नाही. हिंदूच्या बहुजनसमाजास तर प्रसंगाची नुसती तोंडी तोंडी आठवणसुद्धा ठेवण्याअितकी त्यांची आवड किंवा आवश्यकता वाटली नाही! कारण....

अर्वाचीन हिंदुसमाजाच्या मनाचा स्थायीभाव सहिष्णुता म्हणजेच प्रावृत भाषेत बोलायचे म्हणजे कोडगेपणा हाच स्वभावसिद्ध झालेला आहे!

**ह्या सर्व पूर्वार्धातील प्रकरणांमध्ये येथपर्यंत चर्चिलेल्या विधेयांना आणि संदर्भांना अैतिहासिक बळकटी आणि आधार देणारे त्या काळचे अेका अर्वाचीनतम घटनेचे पान!**

ह्या चालू प्रकरणात हिंदूंनी मुसलमानांवर केलेल्या धार्मिक सशस्त्र प्रत्याक्रमणांची जी तुरळक अुदाहरणे आम्ही दिलेली आहेत ती अर्थातच त्या अनेक शतकव्यापी हिंदू-मुस्लिम महायुद्धाच्या कालावधीच्या मानाने अगदी अपवादात्मक होती. फाटलेल्या आकाशास ठिगळ लावण्यासारखे ते होते. पण तसे काही तरी हिंदुराष्ट्राच्या शौर्याला साजतील असे प्रत्याक्रमणाचे पराक्रम हिंदूनी केले, म्हणूनच धार्मिक आघाडीवरील युद्धातही हिंदूंचा पक्ष अगदीच अुद्ध्वस्त झाला नाही! हिंदूही प्रसंगोप्रसंगी धार्मिक सूड घेअू शकतात अशी धास्ती त्या मुस्लिम शत्रूला सारखी वाटत राहिली. त्या अपवादात्मक हिंदुवीरांच्या प्रत्याक्रमणाप्रमाणे जर सारी हिंदुजाति त्याच रणनीतीस धार्मिक आघाडीवरही सर्वत्र अवलंबिती, तर या देशी त्या काळी तरी अेकही मुसलमान - मुसलमान म्हणून कसा राहाता ना, हे आम्ही ह्या चालू पूर्वार्धात अनेक वेळा दिग्दर्शिले आहे.

परंतु अितर सर्व हिंदू तसे करण्यास कां धजले नाहीत, कां भ्यायले किंवा त्यांना तसे मुस्लिमांवर सशस्त्र प्रत्याक्रमण करणे हे हिंदुधर्माच्याच विरूद्ध आहे असे का वाटले, शुद्धिबंदी, सिंधुबंदी, रोटीबंदी अित्यादी बेड्याच हिंदुधर्माचे खरे आचार-अिष्ट आचार आहेत, अशी बुद्धी का झाली? अशा सर्व प्रश्नांच्या अुत्तरी मुख्य समर्थन जे त्या वेळचे हिंदु करीत असत आणि मुसलमानांनी हिंदूंवर किती धार्मिक आक्रमणे केली तरी आम्ही हिंदूंनी त्यांच्यावर तसे तसेच सशस्त्र धार्मिक प्रत्याक्रमण करणे हे हिंदुहिताला का अिष्टही होणारे नाही, आणि हिंदुसभ्यतेला शोभणारे नाही, असे जे प्रतिपादन करीत असत, त्यांचा आशय असा की, मुसलमानांची अेकामागून अेक भयंकर आक्रमणे होणाऱ्या त्या काळी जर त्या वेळच्या हिंदु राजाने आणि समाजाने, अेखादी तुरळक परिस्थिती येताच, आपल्या बाटलेल्या हिंदूंना परत शुद्ध करून घेतले असते किंवा मुस्लिमांवर आम्ही म्हणतो तसे धार्मिक सशस्त्र प्रत्याक्रमण करून त्यांच्या स्त्री-पुरूषांना बळाने हिंदू करून घेतले असते, तर

मुसलमान अधिकच चिडले असते आणि त्यांच्या त्या वारंवार होणाऱ्या नव्या नव्या सशस्त्र धार्मिक आक्रमणांत ते हिंदूंचा पुन्हा पुन्हा अधिक भयंकर सूड घेत जाते ! या भीतीने हिंदूंनी आपद्धर्म म्हणून, निरुपाय म्हणून, त्या काळी शुद्धिबंदी, प्रत्याचारबंदी, बेटीबंदी, रोटीबंदी, सिंधुबंदी, सद्गुणविकृती, अित्यादी शरणागतीच्या धर्माचारांना अवलंबिले ! आता या आणि अशा सर्वच तर्कटाचे निरसन करण्यासाठी आणि ह्यावर लिहिलेल्या सर्व पूर्वार्धातील आम्ही केलेल्या अनेक अुल्लेखांना, संदर्भांना आणि मतांना बळकटी देणारी शेवटची अशी अेक घटना देत आहोत की, जिच्यामुळे धार्मिक सशस्त्र प्रत्याक्रमणाची हिंदूत शक्ती होती, पण अिच्छाच नव्हती हे आमचे विधान निर्विवादपणे सिद्ध होअील. ती घटना म्हणजे टिपू सुलतानाचा नायनाट करून टाकणाऱ्या, मराठ्यांच्या, मुसलमानांशी झालेल्या संघर्षाची होय !

## प्रकरण ७ वे

# हिंदुप्रपीडक क्रूरकर्मा टिपू सुलतान

ज्या काळी महाराष्ट्र साम्राज्याचा विस्तार होत होता, मराठ्यांनी आपल्या पराक्रमाने प्रत्यक्ष दिल्लीच्या मोंगल बादशाही वस्तुतः (De facto) अुलथून पाडलेली होती आणि हिंदूंची राजसत्ता साऱ्या हिंदुस्थानात अितकी प्रबळ झाली होती की, तिला परिणामकारक विरोध करू शकेल अशी अेकही मुस्लिम सत्ता हिमालयापासून तो कन्याकुमारीपर्यंत अुठलेली नव्हती. अशा काळीही म्हैसूरला जे लहानसे हिंदूराज्य होते त्या राज्यात असलेला हैदरअल्ली नावाचा अेक मुसलमान त्या हिंदुराजाच्या हाताखाली अधिकारावर चढत चढत त्याच्या सैन्यातील अेक प्रस्थ होअून बसला होता. महंमद गझनीच्यापासून हिंदुराज्याचा घात, हिंदुराजांनीच विश्वास टाकून वाढविलेल्या त्यांच्या मुस्लिम सेवकांनी वारंवार कसा केला ह्याचा शतको शतकांचा अनुभव आलेला असताही ह्या म्हैसूरच्या हिंदुराजाने 'सर्वधर्मांना समान' मानणाऱ्या सर्वसामान्य हिंदुसमाजाच्या नेहमीच्या 'अुदार' भोंगळसूत्रीपणापायी हैदरअल्लीसारख्या कडव्या मुसलमानाचे हाती आपल्या सैन्याचे आधिपत्य जाअू दिले. परिणाम व्हायचा तोच झाला. हैदरने त्या हिंदुराजास शेवटी बाजूस सारून सारि राजसत्ता आपल्या हाती घेतली. त्याने मराठ्यांवरही चढाअी केली. परंतु समरांगणात मराठ्यांनी त्याची रग जिरून जाअीतो त्याला चांगला चोपून काढल्यामुळे तो पुढे पाअूल टाकू शकला नाही. त्याने अिंग्रजांवरही अेकदा यशस्वी चढाअी केली होती. परंतु अिथे हैदरच्या ह्या अितर वृत्तांताशी चालू विषयाचा काही संबंध नसल्यामुळे अितके सांगणे पुरे आहे की, हा हैदर अिसवी सन १७८२ ह्या वर्षी जेव्हा मरण पावला तेव्हा त्याचे मागे त्याचा त्याच्यासारखाच पराक्रमी पुत्र टिपू ह्याचे हाती ते म्हैसूरचे मूळचे हिंदु-संस्थान आले.

सत्ता हाती येताच टिपूने मूळच्या हिंदुराजाचे नांवगावही पुसून टाकून म्हैसूरच्या स्वतंत्र मुस्लिम राज्याचा सुलतान म्हणून आपल्या नावाची द्वाही फिरविली. मुसलमानांचे अेक नवे स्वतंत्र राज्य स्वतःस 'सुलतान' म्हणवून घेणारा त्या हिंदु-मुस्लिम महायुद्धाच्या अेक सहस्त्र वर्षीय कालखंडातील हिंदुस्थानमधील टिपू हा शेवटचा सुलतान होय!

कोणत्याही मुस्लिम 'सुलतानाचे' त्याच्या मुस्लिम परंपरेनुसार जे पहिले कर्तव्य त्या काळी समजले गेलेले असे त्याप्रमाणे टिपू सुलतानाने सर्व 'काफरांना' मी मुसलमान करून सोडीन अशी प्रतिज्ञा प्रकटपणे भरविलेल्या त्याच्या दरबारात केली आणि लगोलग त्याच्या राज्यातील सर्व हिंदूंना मुसलमान होण्याची आज्ञा सोडली! आपल्या गावोगावच्या मुस्लिम अधिकाऱ्यांना लेखी कळविले की, ''झाडून साऱ्या हिंदु स्त्री-पुरूषांना मुस्लिम धर्माची दीक्षा द्या. जे हिंदू स्वेच्छेने मुसलमान न होतील त्यांना बळाने मुसलमान करा, नाहीतर हिंदू पुरुषांना ठार करा आणि पकडून आणलेल्या हिंदू स्त्रियांना बटकी करून मुसलमानांत वाटून टाका!''

या भ्रष्टीकरणाची कार्यवाही टिपूने अितक्या निकराने, अितक्या मोठ्या प्रमाणावर चालू केली की, त्या म्हैसूर संस्थानातील साऱ्या हिंदुसमाजात अेकच हाहाकार अुडून गेला. टिपूच्या सैनिक पथकातील काय ती नव्हे, तर गावोगावच्या मुस्लिम मुल्ला - मौलवींनी स्थानिक मुस्लिम गावगुंडांना जमवून हिंदूंची ससेहोलपट चालविली पुढे स्वतः टिपूने मलबारवर स्वारी करून सपाट्यासरशी त्या अेका मलबारात अेक लक्ष हिंदू स्त्री-पुरूषांना बळाने बाटवून टाकले! त्याने कर्नाटकावर स्वारी करून मराठ्यांच्या राज्यावरही चढाअी केली. धारवाडपासून खाली त्रावणकोरपर्यंत पसरलेल्या लक्षावधि हिंदू स्त्री-पुरूषांना टिपूच्या सैनिक पथकांच्या आणि गावगन्ना मुस्लिम स्त्री-पुरूषांच्या ह्या अेखाद्या वणव्याप्रमाणे अकस्मात भडकत चाललेल्या हिंदु-भ्रष्टीकरणाच्या अुठावामुळे त्राहि भगवन् करून सोडले!

सर्व जातीच्या पंथांच्या शतावधि हिंदू स्त्री-पुरूषांनी टिपूच्या ह्या सशस्त्र आक्रमणास तोंड देणे अशक्य होअून मुस्लिम सैन्याचे तावडीत सापडण्याचे आधीच धर्मरक्षार्थ कृष्णा, तुंगभद्रेसारख्या मोठमोठ्या नद्यांतून मुलालेकरांसह अुड्या घअून जीव दिले! शतावधि हिंदू स्त्री-पुरूष आगीत अुड्या घेअून भस्मसात झाले! पण बाटून मुसलमान झाले नाहीत!!

## टिपूची अुन्मत्त घोषणा!

आपल्या त्या राक्षसी अत्याचाराच्या, विजयी आक्रमणाच्या आणि त्यामुळे नि:सहाय्य हिंदूंच्या अुडालेल्या दुर्दशेच्या आनंदाने नि अुन्मादाने फुगून जाअून टिपूने भर दरबारात अेकदा मोठ्या आढ्यतेने स्वत:च घोषणा केली की 'काफर हिंदूंच्या सामुदायिक मुस्लिमीकरणाच्या ह्या माझ्या सशस्त्र आक्रमणास अपेक्षेहूनही अधिक यश आलेले आहे. अेके दिवशी, तर २४ तासांच्या आत माझ्या राज्यात ५० सहस्त्र हिंदूंना बाटविले गेले! पूर्वीच्या कोणत्याही मुस्लिम सुलतानाला असले महत्कृत्य करवले नसेल! पण अिस्लामच्या प्रचाराचे आणि काफरांच्या अुच्छेदाचे ते महत्कृत्य अल्लाच्या कृपेने मी आज करू शकलो आहे!'

आपले 'हिंदू काफरांच्या अुच्छेदाचे हे महत्कृत्य शक्य तितक्या नेटाने नि त्वरेने पार पाडण्यासाठी त्या धर्मोन्मत्त टिपूने आततायी क्रौर्याने अितर मुस्लिम सैनिकांसही मागे टाकणाऱ्या अशा अेका नवीन सैन्याचीही अुभारणी केली होती. मुस्लिमांतील कडव्यांतील कडवे असे शेकडो तरूण निवडून निवडून टिपू सुलतानाने हे आपले विशिष्ट सैन्य अुभारले होते. त्या सैन्यास तो 'आपल्या मुलांचे सैन्य' म्हणून लाडिकपणाने संबोधी. हिंदू स्त्री-पुरूषांना बळाने बाटविण्यास, हिंदूंची लुटालूट करण्यात, त्यांची घरेदारे जाळून टाकण्यात आणि विरोध करतील तर त्यांचा अनन्वित छळ करून त्यांना सरसकट कापून काढण्यात ह्या सुलतानांच्या 'लाडक्या सैन्यातले' जे तरणेबांड मुस्लिम सैनिक विशेष पराक्रम करतील त्यांना प्रत्येकी त्यांचे पारितोषिक म्हणून ठिकठिकाणी पाडाव केलेल्या सहस्त्रावधि हिंदू स्त्रियांतील तरूण तरूण नि सुंदर मुली निवडून यथारुची वाटून देण्यात येत!

टिपू सुलतानाच्या ह्या अिस्लामी प्रचारामुळे नि पराक्रमामुळे हिंदुस्थानातील सारे अिस्लामी जगत कृतज्ञ भावनेने भारावून गेले. त्याला सुलतान, गाझी, अिस्लामचा कर्मवीर, ह्या पदव्या मुसलमानांकडून देण्यात आल्या. हिंदुस्थानातच नव्हे, तर थेट तुर्कस्थानातील मुसलमानी खलिफांकडूनही त्याला ती मान्यता मिळाली. अर्थात् हिंदुधर्मीयांवर त्याने चालविलेल्या धर्मोन्मादी अत्याचारामध्ये 'सारे' मुस्लिम जगत अशा रीतीने भागीदार झाले होते. विशेषत: कर्नाटक ते त्रावणकोर पर्यंत ज्या मुस्लिम समाजाने सामुदायिकपणे त्याच्या त्या अत्याचारात प्रत्यक्ष भाग घेतलेला होता तो मुस्लिम समाज तर स्त्री-पुरूषसुद्धा हिंदूंच्या दृष्टीने तरी टिपूसारखाच दंडनीय ठरला होता.

## अिकडे पुण्यात

टिपूचे हिंदूंच्या सामुदायिक नि बलपूर्वक मुस्लिमीकरणाचे हे अत्याचारी अभियान (मोहीम) जेव्हा चालू झाले तेव्हाच तिकडील हिंदुसमाजात अुडालेल्या हलकल्लोळाचे आर्त निनाद अैकून हिंदुधर्म संरक्षणाचे ब्रीद धारण केलेल्या मराठी साम्राज्याच्या राजधानीत, पुण्यात क्रोधाची लाट अुसळली आणि ह्या म्हैसूरच्या नव्या महिषासुराचे पारिपत्य करण्यासाठी त्याच्यावर चढाअी करून जाण्याचा मराठ्यांच्या राजधुरंधरांनी निश्चय केला. पेशव्यांचे मुख्य श्रीकरणाधिप (फडणीस) नाना ह्यांनी दक्षिणेतील हाताशी असलेल्या सर्व मराठी सरदारांना निरनिराळ्या बाजूंनी टिपूच्या राज्यावर ससैन्य चालून जाण्याची आज्ञा दिली.

## टिपूशी युद्ध

मराठ्यांची सैन्ये आपल्या राज्यावर चालून येत आहेत, ही बातमी समजताच टिपू नुसता चवताळून गेला. मराठी मुख्य प्रदेशापासून तुटक अंतरावर असलेली मराठ्यांची नरगुंद आणि कित्तूर ही जी दोन लहान संस्थाने त्याच्या राज्याला अगदी लागून होती त्यांच्यावरच टिपूने त्यांना मराठ्यांच्या मुख्य सैन्याचे सहाय्य येण्याच्या आधीच अेकअेकटे गाठण्यासाठीच त्वेषाने चाल केली.

टिपू सर्व हिंदूंचा तर द्वेष करीत असे; पण, त्यातही हिंदुसमाजात स्वत्वाचा आणि हिंदुत्वाचा जाज्वल्य अभिमान संचरवून त्यांना मुस्लिमांविरूद्ध चेतविण्याचे कामी जो वर्ग अग्रेसर असे, त्या ब्राह्मणवर्गावर तो सुलतान टिपू विशेषच जळफळत असे. अितरांपेक्षा ब्राह्मणांचा छळ करण्यात त्याने क्रौर्याची सीमा गाठावी. अितिहासाचार्य सरदेसाअीसुद्धा लिहितात: 'Brahmins were singled out for special indignities by Tippu'. नरगुंदचे आणि कित्तूरचे संस्थानिक हे दोघेही

ब्राह्मणच होते. त्यातही तत्काल शरण येण्याची टिपूने केलेली मागणी त्या दोघांनीही तिरस्काराने झिडकारून टाकली होती. त्यामुळे अधिकच चिडलेल्या टिपूने प्रथम नरगुंदवर आपल्या प्रबळ सैन्यासह चाल केली. संस्थानिक भावेही शक्य तो वीरोचित निकराने लढले. परंतु पुण्याहून येणारे सहाय्य वेळीच न आल्याने त्या संस्थानच्या छोट्याशा सैन्याचा पाडाव टिपू सहज करू शकला. नरगुंद नगर पडताच टिपू ससैन्य जाळपोळ आणि लूटमार करीत जो आत शिरला तो सरळ राजवाड्यात घुसला. तेथे त्याने संस्थानिक भावे आणि त्यांचे झुंजार कारभारी पेठे ह्या दोघांना पकडून बेड्या ठोकविल्या. त्यांचा नि त्यांच्या सर्व संबंधितांचा असह्य छळ केला गेला. त्यांच्या अंत:पुरात शिरून तेथील सर्व राजस्त्रियांची टिपूने जी विटंबना केली नि त्याच्या मुस्लिम हस्तकांकडून करविली, ती वर्णवत नाही. त्या स्त्रियांतील, ज्या तरूण त्या त्या, मुलींना प्रथम क्रूरपणे छळीत छळीत शेवटी त्यांच्यावर बलात्कार करण्यात आला. राजस्त्रियांतील जी अत्यंत सुंदर तरूणी होती तिला टिपूने स्वत:च्या जननाखान्यात बंद केले नि जाताना तिला आपल्या राजधानीत घेऊन गेला आपल्या सुना-लेकींची ही अमानुष विटंबना, तिच्या, डोळ्यांदेखत चाललेली पाहून पेठ्यांच्या वृद्ध मातेचे हृदय यातनांनी फाटून गेले आणि ती तेथेच गतप्राण झाली.

टिपूच्या सैन्यानेही साऱ्या नरगुंद नगरात हिंदू स्त्री-पुरूषांची करवेल तितकी तशीच विटंबना केली. हिंदूंतील लिंगायत वर्गासारख्या धनिकांच्या वाड्यापासून तो सामान्य हिंदू नागरिकांच्या घरांघरांपर्यंत मनसोक्त लूट केली. त्यांच्या घरादारांना आगी लावून आणि शतावधि निवडक हिंदू स्त्री-पुरूषांना आणि सैनिकांना पाडाव करून, बंदिवान करून, त्यांना, जाताना टिपू आपल्या समवेत घेऊन गेला.

नरगुंदचा असा पाडाव करून टिपू त्या कित्तूरच्या दुसऱ्या लढत राहिलेल्या छोट्याशा हिंदुस्थानावर तुटून पडला. कित्तूरच्या त्या संस्थानाचीही नरगुंदप्रमाणेच त्याने धूळधाण केली. संस्थानिकावर, त्याच्या कुटुंबियांवर आणि त्या संगरातील सर्व हिंदु स्त्री-पुरूषांवर टिपूने स्वत: आणि आपल्या सैन्यांकरवी नरगुंदला जे जे राक्षसी अत्याचार त्याने तेथील हिंदूंवर केले होते, तसेच अत्याचार कित्तूरलाही त्याने केले आणि करविले.

अेवढ्या अवधीत मराठ्यांची मुख्य सैन्ये कर्नाटकात टिपूने जिंकलेल्या प्रदेशास नि ठाण्यास परत जिंकित झपाट्याने पुढे घुसत होती. अिथे प्रत्यक्ष संबंध नसलेल्या त्या युद्धातील अितर घटना सोडून दैअून अितके सांगणे पुरे आहे की, शेवटी सरदार पटवर्धन, फडके, बेहेरे, होळकर, भोसले प्रभृति मराठी सेनानायकांनी टिपूच्या ठिकठिकाणच्या मुस्लिम सैन्यांना झोडपीत सारा कर्नाटक त्याचे हातून छिनून घेअून टिपूला म्हैसूरपर्यंत रेटीत पक्क्या कोंडीत घेतले. त्याच वेळी टिपूच्या भयंकर अडचणीची ही संधी साधून अिग्रंजही टिपूवर चालून आलेले होते. मराठ्यांच्या खड्गाचे वार जसजसे त्या टिपू सुलतानाच्या सैतानी मुस्लिम धर्मोन्मादाच्या पाठी सपासप बसू लागले तसतसा त्या सैतानाचाही तो मुस्लिम धर्मोन्माद अुतरू लागला. टिपूचा दम अुखडून गेला आणि कोण आश्चर्य, तोच हिंदुधर्मद्वेष्टा टिपू हिंदु देव-देवतांच्या भजनी लागला!!

हिंदुधर्मसंरक्षक मराठ्यांची मनधरणी करण्यासाठी आणि त्याच्या धर्मछळाने कावून गेलेल्या लक्षावधी हिंदु जनतेला पुन्हा आपल्या कच्छपी लावून घेण्यासाठी का होअीना, पण टिपूने अकस्मात हिंदूंच्या देवालयांना देणग्या देण्यास आरंभिले. पूर्वी मुस्लिमांनी विच्छिन्न केलेल्या काही मोठमोठ्या मंदिरांत नव्या मूर्तींचीही त्याने पुन्हा प्राणप्रतिष्ठा करविली. आपल्याला ह्या युद्धात यश मिळावे, यास्तव टिपूने देवालयांतून ब्राह्मणांकरवी प्रार्थना करविल्या आणि ज्या ब्राह्मणवर्गाचा तो सर्वांहून अत्यंत द्वेष आणि छळ करीत असे, त्याच ब्राह्मणवर्गाला प्रसादविण्यासाठी त्याने दक्षिणासमारंभ करविले, अनुष्ठाने बसविली, स्वत: शंकराचार्यांचा मोठा सन्मान करून आपल्या राज्यावरचे हे संकट टळावे म्हणून आशीर्वाद मागितले! आणि शंकराचार्यांनीही समारंभपूर्वक ते दिले! स्थलाभावी आणखी अेकच गोष्ट सांगणे पुरे आहे की, कांची क्षेत्रातील हिंदूंच्या प्रख्यात दैवतांच्या रथोत्सवाचे वेळी सुलतान टिपू व्यक्तिश: अुपस्थित राहून रथापुढे अितर भक्तांसमवेत त्या मिरवणुकीत चालू लागला. आपल्या हाताने त्याने शोभेची दारू अुडवून तो

दीपोत्सव आपल्या व्ययाने साजरा केला. ज्या देवतांच्या हातात तीक्ष्ण धारेचे शत्रुघ्न खड्ग अुपसलेले असते त्या देवास दैत्यही भजू लागतात ते असे!

परंतु न देव न दैत्य-कोणीही क्रूरकर्म्या टिपूला त्या दारूण संकटातून बचावण्यास पुढे येअू शकला नाही. शेवटी दोन-तीन स्वाऱ्यांत मिळून त्याचे सारे राज्य मराठ्यांच्या नि अिंग्रजांच्या सैन्याने जिंकून घेतले. स्वतः टिपूही पुढे ठार मारला गेला. टिपूच्या राज्याची वाटणी होअून त्यातील त्रावणकोरच्या हिंदुराज्याचा जो लहानसा भाग टिपूने हिसकावला होता तो त्या राजास परत देण्यात आला. ज्या मूळच्या हिंदू राजवंशास टिपूने पदच्युत करून ते म्हैसूर संस्थान बळकावले त्यावर त्याच हिंदू राजवंशाला पुन्हा स्थापन करण्यात आले. अुरलेल्या राज्यातील काही वाटा अिंग्रजांनी घेतला आणि कर्नाटक ते तुंगभद्रेपर्यंतचा टिपूने जिंकलेला सारा विस्तृत प्रदेश मराठ्यांनी आपल्या राज्यास जोडून टाकला. स्वतःस 'सुलतान' म्हणवून घेताना ज्या हिंदुराज्यांचा नायनाट करण्याची प्रतिज्ञा टिपूने केली होती ती सारि हिंदुराज्ये पुन्हा स्वस्थानी नांदू लागली. त्या युद्धात संपूर्ण नायनाट जर कोणाचा झाला असेल तर तो 'सुलतान टिपूच्या मुस्लिम राज्याचाच काय तो होय!'

असे राजकीय नि रणांगणीय क्षेत्रात हिंदू विजयी ठरले. पण तरीही अशा रीतीने ह्या सन १७८० च्या मागच्या पुढच्या मिळून वीसअेक वर्षात टिपूच्या नेतृत्वाखालील दक्षिणेतील मुसलमानांनी जी सामुदायिक नि सशस्त्र अुठावणी केली होती आणि हिंदुविद्रोही अत्याचारांचा प्रलय मांडला होता त्याचा रणांगणीय नि राजकीय क्षेत्रात त्या मुस्लिम राजसत्तेचा नि सैन्यशक्तीचा धुव्वा अुडवून देण्यात हिंदू पूर्णपणे विजयी ठरले. परंतु धार्मिक नि सामाजिक क्षेत्रात मात्र ते आक्रमक मुस्लिमच विजयी ठरले.

कारण की, टिपूशी झालेल्या त्या युद्धात मुस्लिमांनी हिंदूधर्माचाच अुच्छेद करण्यासाठी जी धार्मिक नि सामाजिक सशस्त्र चढाअी केली होती, हिंदूंचे जे लक्षावधी लोक बळाने बाटविले होते, हिंदूंच्या सहस्त्रावधी स्त्रियांवर अत्याचार करून त्यांना मुस्लिम दास्यात नि गोषात गावागावातून डांबून टाकले होते, हिंदुराष्ट्राच्या पौरुषाचीच जी लांच्छनास्पद मानखंडणा केली होती आणि त्या सर्वांमुळे मुस्लिम धर्माची जी समाजाची सत्ता, संख्याबळ नि शक्ती जी वेगाने वाढत जात होती तिचाही धुव्वा अुडवून देण्यासाठी, त्या धार्मिक नि सामाजिक मानखंडनेचा सूड अुगविण्यासाठी त्या बलात्कारी नि अत्याचारी सहस्त्रावधी मुस्लिम पुरूषांतील नि मुस्लिम स्त्रियांतील अघोरी अपराध्यांना तसतसाच कठोर दंड देण्यासाठी हिंदुधर्मरक्षणाचे ब्रीद मिरविणाऱ्या नि रणांगणात मुस्लिमांच्या शस्त्रशक्तीचा नि राजशक्तीचा वर वर्णिल्याप्रमाणे धुव्वा अुडवून देणाऱ्या मराठ्यांच्या विजयी वीरांनी मुस्लिमांवर लगोलग अेकही धार्मिक प्रत्याघात केला नाही! त्यांच्याही अिस्लाम धर्मावर सशस्त्र प्रत्याक्रमण केले नाही!! त्या प्रकरणी अिकडची काडी तिकडे केली नाही!!!

तसे प्रत्याक्रमण न झाल्यामुळे ते बळाने बाटविलेले अुणे-पुरे दोन तीन लक्ष हिंदू पुरुष-स्त्रिया, बाल-बालिका त्या दक्षिणेतील मुसलमानी समाजाच्या कचाट्यात, दास्यात, गोषात तशाच पिचत राहिल्या. टिपूने स्थापिलेली अिस्लामी राजसत्ता मराठ्यांच्या प्रत्याघाताखाली चक्काचूर होअून गेली; पण टिपूने लाखो हिंदूंवर बळाने लादलेली अिस्लामी धर्मसत्ता मात्र तशा प्रत्याघाताभावी अुलट भरभराटत राहिली!

ते कसे घडे तो क्रम पूर्वीच सांगितला आहे. त्या बळाने बाटविलेल्या हिंदू स्त्री-पुरुषांची संतती, त्यांना लगोलग शुद्ध करून न घेतल्यामुळे मुस्लिमातच मोडली जाअून पिढीमागून पिढी त्या काळच्या त्या हिंदुधर्मशत्रूंचे संख्याबळ दक्षिण प्रांतातून सवाअीदिडी-दुपटीने वाढवीत चालली आणि आजन्म मुस्लिम संस्कारांतच वाढल्यामुळे हिंदुधर्माची नि हिंदुराष्ट्राची कट्टर वैरी बनत गेली. ह्या बाटग्या, मुस्लिमांच्या पुढील पुढील पिढ्यांत, स्वतः हिंदुधर्मात परत येण्याची अिच्छा तर सोडाच, पण अुलट 'अिसाप' च्या गोष्टीतील लांड्या कोल्ह्याचीच मनोवृत्ती बळावत जाअून अुरलेल्या हिंदूंनाही आपल्याप्रमाणे बळाने बाटवून मुसलमान करणे हेच आपले धर्मकर्तव्य आहे, अशी आसुरी आकांक्षा मात्र अधिकाधिक अुफाळत चालली.

## पण जर टिपूवरील राजकीय प्रत्याक्रमण यशस्वी होताच मराठ्यांनी मुस्लिमांवर धार्मिक प्रत्याक्रमणही लगोलग केले असते तर ?

तर त्या टिपूच्या युद्धात अवघ्या चार-पाच वर्षाचे पूर्वीच बळाने बाटविले गेलेले ते दोन-तीन लाख हिंदु स्त्री-पुरूष नुसते 'या' म्हणताच हिंदुधर्मामध्ये नि आपापल्या हिंदु कुटुंबात प्रेमविव्हल होअून बहुशः परत आले असते. अवघ्या चार-पाच वर्षाचे पूर्वीच अंतरलेल्या त्यांच्या हिंदुधर्मावरील त्यांची भक्ती नि आसक्ती, त्यांच्या हिंदू माता-पिता, पुत्र-कन्या, आप्त-अिष्ट अित्यादी प्रियजनांविषयी माया ममता त्यांना अजून अितकी कासावीस करीत असलीच पाहिजे की त्यांची आठवण येताच त्यांचे डोळ्यांत चटकन आसवे अुभी राहावी!

अशा वेळीच त्या दोन-तीन लक्ष हिंदुबांधवांना शुद्ध करून हिंदुधर्मात परत समाविष्ट करून घेणे किती सोपे होते!

त्यातही त्याच वेळी टिपूच्या मुस्लिम राज्याला मूठमाती देअून सरदार पटवर्धन, होळकर, रास्ते अित्यादी अेकाहून अेक अधिक सेनानींची विजयी सैन्ये त्यांच्या रणांगणातील निरनिराळ्या आघाड्यांवरून महाराष्ट्राकडे वेगवेगळ्या मार्गानी परतू लागली होती, तेव्हा त्यांच्यातील सहस्त्रावधि घोडेस्वारांच्या, शिलेदारांच्या, पायदळांच्या, भिन्न-भिन्न सेना, पृतना (पलटणी), पथके, भगवे ध्वज फडकवीत, 'हर हर महादेवाचे' रणघोष करीत म्हैसूर, कर्नाटक, महाराष्ट्र या प्रांतातील ज्या नगरानगरांतून नि गावागावांतून सैनिक संचलनाचा दणका अुडवीत पृथक पृथकपणे परत चाललेली होती, त्याच नगरानगरांत नि गावागावांत अनेक ठिकाणी, त्या पाच-सहा वर्षातच धार्मिक आक्रमणे करून बाटविलेले दोन लाख हिंदू स्त्री-पुरुष मुस्लिम समाजात कोंडलेले होते; विशेषतः ज्या सहस्त्रावधी हिंदू स्त्रियांना मुस्लिमांनी त्या आक्रमणात पळवून नेअून आपल्या बटकी करून टाकल्या होत्या, त्यापैकी अनेक पतिता, दीन, दु:खिता, हिंदुकन्यका, कुमारिका, कांता त्या त्या नगरग्रामांतील तुरळक महालांपासून तो गावगन्ना पसरलेल्या मुस्लिम गुंडांच्या शेकडो खोपट्या-खोपट्यापर्यंत असलेल्या गोषांतून राबविल्या जात होत्या! हिंदूंचा विजय झाल्याच्या नि मुस्लिम राज्याचा सत्यानाश झाल्याच्या वार्ता त्यांच्या कानांवर जातात न जातात तोच त्या हिंदु वीरांची सशस्त्र पथके वा सैन्ये आपल्याच गावातून मिरवत येत आहेत हे त्यांना त्या हिंदुवीरांच्या दूरवरून अैकू येणाऱ्या 'हर हर महादेव' च्या जयघोषांनी चटकन लक्षात आले असेल; त्यासरशी त्या अभागी बाटविलेल्या हिंदू स्त्रिया अनावर वेगाने आपापल्या त्या मुस्लिम कोंडवाड्याच्या खिडक्याखिडक्यातून नि खोपट्या- खोपट्यांच्या दारातून त्या हिंदुवीरांच्या मिरवणुकी जवळ जवळ येताच त्यांचा रणघोष दुमदुमू लागताच त्या राक्षसांच्या बंदिवासात पडलेल्या आमच्या शेकडो माय-भगिनींच्या हृदयात अशा अुत्कट अपेक्षेच्या असह्य कळा आपसूक अुठल्या असतील! 'आले! आमच्या - माझ्या हिंदुधर्माचे भाअू ह्या अत्याचारी मुस्लिमांच्या अुरावर नाचत आमची सुटका करण्यास शेवटी आले!!' अनेक प्रसंगी त्या कोंडवाड्यातील हिंदु महिलांपैकी कोणाकोणाचा प्रत्यक्ष बाप, नवरा, भाअू, भाअूबंद, शेजारीपाजारी हे त्या विजयी हिंदूपृतनांतून डौलाने गर्जत चाललेले त्यांना समक्ष दिसले असतील!

## जर केवळ मनात आले असते तर

जर अशा वेळी त्या गावोगावातील संचलन करीत चाललेल्या निरनिराळ्या हिंदू सैनिकदलांच्या केवळ मनात आले असते तर त्यांना टिपूच्या युद्धकाळात मुसलमानांच्या बंदिवासात पडलेल्या ह्या आपल्या सहस्त्रावधी हिंदु अबलांना वाटेने चालता चालता मुक्त करता आले असते.

कारण, त्या वेळी त्या विजयी हिंदुदलभाराला आडवे येण्याचे सामर्थ्य वा धैर्य कोणाही मुस्लिमात वा मुस्लिमगटात अुरलेले नव्हते. मराठ्यांची सैनिकदले येत आहेत हे अैकताच त्या त्या गावातील नि नगरातील मुल्लामौलवींची नि गुंडापुंडांची स्वतःच्या जिवाच्या भयाने बिळा-बिळातून लपताना त्रेधा अुडत होती. त्या हिंदू सैनिकदलांच्या रणशृंगारातून असे आश्वासिणारी अेकेक ललकारी जरी सणसणत, खणखणत गावोगाव फुंकली गेली असती की, ''या! मुसलमानांच्या घराघरातून बाटवून आजपर्यंत मुसलमान म्हणून राबविल्या जाणाऱ्या हिंदू माता भगिनींनो, बाहेर पडा नि आमच्या

रक्षणाखाली या! तुम्हांला मुक्त करण्यासाठी नि घरोघर पोचवून देण्यासाठी हे आम्ही, तुमचे धर्माचे भाऊ, तुमच्या दाराशी आलेलो आहोत! जी कोणी मुसलमान व्यक्ती तुमच्या आड येईल ती ती तिथेच कापली जाईल. मग तो मुस्लिम पुरुष असो वा स्त्री! त्याचप्रमाणे मुसलमानांनी बाटविलेल्या हिंदू बांधवांनो, तुम्हीही जेथे असाल तेथून येऊन या आमच्या सैन्यविभागांना मिळत चला! हिंदुधर्माच्या ह्या भगव्या ध्वजाखाली येताच तुम्हा सर्वांना हे विजयी हिंदु खड्ग सर्व प्रकारचे नि संपूर्ण संरक्षण देईल!'' तरी अशा आश्वासक सशस्त्र आवाहनासरशी त्या चार-पाच वर्षातच बाटविलेल्या आणि विकल अुत्सुकतेने मुक्ततेची वाट पाहणाऱ्या त्या त्या गावातील मिळून सहस्त्रावधि हिंदु माता भगिनी आणि सहस्त्रावधि बाटविलेले हिंदुबांधव अत्यानंदाच्या अुद्रेकाने आपण होअून त्या त्या सैन्यविभागांना मिळाले असते! त्यांना सहजासहजी शुद्ध करून हिंदुराष्ट्रात परत घेता आले असते आणि त्या टिपूच्या युद्धात मुस्लिमांना मिळालेल्या धार्मिक विजयाचेही नाक कापले जाते!

**पण धर्मशत्रूने बळाने बाटविलेल्या हिंदूंचे असे साधे शुद्धीकरण करण्याचेही कोणाच्या मनात आले नाही ! मनासच आले नाही!!**

परंतु त्या मराठी सैनिकांच्या, सेनापतींच्या, सरदारांच्या, शंकराचार्यांच्या, प्रत्यक्ष पुण्याच्या पेशव्यांच्या किंवा सातारा - कोल्हापुरातील छत्रपतींच्या कोणाच्याही तसे साधे शुद्धीकरण करण्याचे सुद्धा मनातच आले नाही! मुस्लिम राक्षसांच्या बंदिवासात पडलेल्या त्या आपल्या सहस्त्रावधि अत्याचारित माता-भगिनींकडे ढुंकूनही न पाहता त्यांना तशाच सोडून पुढे जाण्याची कोणालाही लाज वाटली नाही! मुसलमानांवर मिळविलेल्या रणांगणीय नि राजकीय विजयांचे तेवढे नगारे पिटीत नि रणशृंगे वाजवीत गावोगावात ती सैनिक पथके जशी शिरली तशीच त्या त्या गावातून डौलाने पुढे आपापल्या शिबिराकडे चालती झाली. त्या अुण्या-पुऱ्या दोन लाख बाटलेल्या हिंदू स्त्री-पुरूषांपैकी संघतः बोलायचे म्हणजे, अेकालाही त्यांनी शत्रूच्या तावडीतून सोडवून हिंदूधर्मात परत आणले नाही.

फलतः, मुसलमानांच्या खोपट्याखोपट्यांतून ज्या सहस्त्रावधि बाटविलेल्या आमच्या हिंदु माता-भगिनी, बाल-बालिका, 'आता आपणांला ही आपली हिंदूंची सशस्त्र विजयी दले मुसलमानांच्या ह्या नरकतुल्य कोठड्यातून मुक्त करतील' अशा असह्य अपेक्षेने दारादारांतून दाटून अुभ्या राहिल्या होत्या त्या साऱ्या 'ती स्वधर्मीय विजयी सैन्यदले गावात आली तशीच मिरवत गाव सोडून पुढे निघून गेली, आमची कोणासही दया आली नाही, आमची सुटका तर राहोच, पण आम्हांशी कोणी ओळख सुद्धा दिली नाही, मायेचा शब्दही बोलले नाही!'' असे पाहताच त्या क्रूर अपेक्षाभंगाने मुळूमुळू रडत पुन्हा त्या मुस्लिमांच्या कोंडवाड्यामध्ये विवशपणे परत फिरत! आणि त्या स्वधर्मशत्रूंची वीण वाढवीत मरेतो तेथे तशाच पिचत पडत!

त्याचप्रमाणे त्या गावागावातून वर सांगितल्याप्रमाणे स्वतःच्या जिवाच्या भीतीने लपून बसलेल्या मुस्लिम मौलवी-मुल्लांना नि गुंडपुंडांना थोड्याच दिवसांत कळून चुके की हिंदूंची विजयी सैन्यपथके किंवा राज्याधिकारी हिंदूंवर केलेल्या धार्मिक अत्याचारांसाठी कोणत्याही मुस्लिम अपराध्याला व्यक्तिशः वा गटागटाने पकडून काहीअेक दंड करीत नाहीत आणि म्हणून आपल्या जिवास आता कोणतेही भय अुरलेले नाही, तेव्हा ते सगळे अत्याचारी मुस्लिम आपआपल्या बिळातून बाहेर पडून गावोगाव पुन्हा अुजळ माथ्याने वावरू लागले. अितकेच नव्हे तर हिंदूंच्या बळाने बाटविलेल्या त्या सहस्त्रावधि स्त्रियांना आणि लुटून आणलेल्या संपत्तीला अगदी वैधरीतीने (कायदेशीरपणे) आपापली मत्ता मानून आपापल्या संसारात राबवून घेअू लागले. अशा घटना घडत की, गावागावातील हिंदूंना त्यांच्या बळाने बाटविलेल्या सुना-लेकी त्या त्याच गावातील मुस्लिमांच्या घरांतून बटकी वा बिबी म्हणून अुघडपणे जन्मभर राबविल्या जात असतात ते दृश्य चुपचाप पाहावे लागे! परंतु ती ती गावे हिंदुराज्याच्या संरक्षणाखाली आलेली असताही तेथील हिंदु जनतेने वा हिंदुराज्याधिकाऱ्यांनी ते दृश्य पाहताच मुसलमानांवर तुटून पडून त्या आपल्या लेकी-सुनांची सुटका मुसलमानांच्या हातून केली, अशी अुदाहरणे सहसा आढळत नाहीत. कारण, शतकांच्या तशा आपद्धर्मीय सवयीमुळे तशी हृदयविदारक मानखंडनेची दृश्ये जसे काही त्यात काही विशेष झाले नाही अशा निर्लज्ज निर्विकारपणे पाहात राहण्याची हिंदूंना अेक सामुदायिक सवयच झालेली होती. ज्याला समाजात कोणीच नाव ठेवीत नाही अशा

निर्लज्जपणाची कोणाला काही लाजही वाटत नाही. 'अेका शुद्धिबंदी' च्या विषबाधेपायी साऱ्या हिंदुसमाजाचा ह्या प्रकरणी असा बुद्धिभ्रंश झालेला होता!

## ह्याचा लेखी पुरावा?
## हा पहा तत्कालीन कागदपत्रांचा ढीग!

टिपूशी झालेल्या मराठ्यांच्या युद्धांचा अितिहास आता कितीतरी सविस्तरपणे अुपलब्ध झालेला आहे. मार्शमनसारख्या अिंग्रजी अितिहासकारांचे ग्रंथ, आपल्या अितिहासाचार्य सरदेसायांसारख्यांचे ग्रंथ, मॅलेट प्रभृति तत्कालीन अिंग्रजी कारस्थान्यांचे नि राजदूतांचे मूळ पत्रव्यवहार; अितिहाससंशोधक राजवाडे, पारसनीस, खरे प्रभृतींनी अुजेडात आणलेले त्या काळच्या मराठी राजधुरिणांच्या, त्यांच्या हस्तकांच्या, त्या काळच्या व्यापाऱ्यांच्या, नगरश्रेष्ठींच्या, हिंदुसमाजातील धार्मिक, सामाजिक, राजकीय अशा सर्व थरांतील अनेक नागरिकांच्या पत्रव्यवहारांचे ढीगच्या ढीग आता प्रसिद्ध झालेले आहेत. लॉर्ड कॉर्नवॉलीस आणि टिपूवरील स्वाऱ्यांचे सेनापती हरिपंत फडके यांच्यासारख्या त्या काळातील प्रमुख आणि थोरांतील थोर पुरूषांच्या श्रीरंगपट्टण येथील युद्धकालीन साहचर्याचे वेळी हरिपंत फडके यांनी पुण्यास नानांना धाडलेल्या अत्यंत वाचनीय आणि संधिविग्रहादि अुच्च पातळीवरील राजकीय महत्त्वाच्या पत्रांपासून तो त्या काळच्या दरोडेखोरांच्या लुटालुटीचे, भाविकांच्या धार्मिक यात्रांचे, प्रवासांचे, तत्कालीन बाजारभावांचे, 'माझा मठ लुटला गेला' अशीच काय ती रडारड करती बसलेल्या शंकराचार्यांच्या रुसव्याचे वर्णन करणाऱ्या पत्रापर्यंत अितके मूळ कागदपत्र या ढिगाऱ्यात पाहता येतात की, त्या काळच्या हिंदुसमाजाच्या हालचालींचे, आचारांचे, विचारांचे नि व्यवहारांचे वाचणाऱ्यांच्या मनापुढे मूर्तिमंत चित्र अुभे राहते.

परंतु ह्या सहस्त्रावधि कागदपत्रातून अेकंदरीत पाहता मुसलमानांनी केलेल्या धार्मिक अत्याचारांचा आणि त्यांनी हिंदूंवर मिळविलेल्या अुपर्युक्त धार्मिक विजयाचा वचपा काढण्याची तळमळ कोणालाही लागल्याचे सहसा आढळत नाही. टिपूशी झालेल्या युद्धाचे कालावधीत आपल्या ज्या सहस्त्रावधि माय-भगिनींना मुसलमानांच्या गोषामध्ये त्या अधमांनी कोंडून टाकले आहे, त्यांची मुक्तता केली नाही तर धिक्कार असो आमच्या ह्या पौरुषाला, असा तीव्र विषाद वाटून मुसलमानांवर कोणताही हिंदू सेनापती वा सैनिकपथक वा जनसमूह आपल्यापुरता तुटकपणे का होअीना पण तलवार अुपसून चालून गेला आहे आणि त्याने अेखाद्या गावी वा नगरी तरी अशा बळाने बाटविलेल्या हिंदू स्त्रियांना सोडवून त्या मुसलमानांना कापून काढले आहे, असे कोणतेही मोजण्यासारखे अुदाहरण घडलेले आढळलेले नाही. कोणत्याही कागदपत्रात मुसलमानांच्या ह्या धर्मविजयामुळे हिंदुधर्माचे नि राष्ट्राचे सत्ताक्षेत्र नि भूमिक्षेत्र दिवसेंदिवस कसे संपुष्टात येत चालले आहे याची चिंता तर काय, पण जाणीवसुद्धा त्या काळच्या हिंदुसमाजाला अेकंदरीत नव्हती, असे ह्या तत्कालीन शतावधी कागदपत्रांवरून स्पष्ट होते. ही कितीही आश्चर्याची नि खेदाची गोष्ट वाटली तरी वस्तुस्थिती ही अशी होती. कोणीही, मुसलमानांनी हिंदुधर्मावर केलेल्या आक्रमणांचा वचपा काढण्यासाठी मुस्लिमांवरही तसेच सशस्त्र नि संघटितपणे धार्मिक प्रत्याक्रमण केले पाहिजे असे अवाक्षरही बोलल्याचे वा लिहिल्याचे सहसा आढळत नाही... मग तसे स्वतः करण्याची गोष्ट दूरच!

ह्या त्या काळच्या मूळ कागदपत्रांच्या सर्व ढिगाऱ्यास जरी स्थलाभावी बाजूस सारले तरी आम्हांस त्यातील अेका पत्राचा तेवढा अुल्लेख करण्याचा मोह टाळवत नाही. मागे 'सद्गुणविकृतीच्या आपल्या हिंदुसमाजास नेभळे नि लुळे बनविणाऱ्या प्रवृत्तीविषयी बरीच सविस्तर चर्चा केली आहे. त्याच सद्गुणविकृतीच्या आमच्या हाडीमासी खिळलेल्या दुर्गुणांवर झगझगीत आणि अद्यतन शोधाप्रमाणे 'क्ष' किरण टाकण्याचे कार्य त्या पत्रातील घटनेचा आणि त्याच्याच जोडीला टिपूच्या मृत्यूनंतरही मराठ्यांच्या हिंदुसत्तेने मुस्लिमांच्या राजसत्तेचा जो अंतिम अूरूभंग करून टाकला त्या खर्ड्याच्या विजयसमरात घडलेल्या घटनेचा अुल्लेख करणे आम्ही अपरिहार्य समजतो.

वर अुल्लेखिलेल्या पत्रात मराठी राजसत्तेचे सेनापति हरिपंत फडक्यांनी मराठी साम्राज्याचे श्रीकरणाधीष नानांना टिपूने त्याच्या पराजयानंतर केलेल्या करारातील वचने पाळली जातील याविषयी आश्वासक म्हणून आपले स्वतःचे दोन लहान पुत्र अिंग्रज-मराठ्यांच्या विजयी सेनापतींचे हाती तारण (ओलिस) म्हणून सोपवून दिले होते. ते वृत्त आपल्या शत्रूला आपण किती हीनदीन केलेले होते, ते क्वचित् सहजासहजी अुल्लेखण्यासाठी देअून पुढे लिहिले होते की 'टिपूची ती

दोन्ही मुले लॉर्ड कॉर्नवालीसने माझ्याकडे धाडली होती. मी (हरिपंतांनी) त्यांना पाहिले तेव्हा ती दोन्ही मुले म्हणत होती की, 'आम्ही भुकेले आहोत.' मी त्यांना ओका शेजारच्या तंबूत धाडले आणि त्यांना पोटभर जेवू घालण्यास सांगितले. नंतर काही वेळाने त्यांना कॉर्नवॉलीसकडे अिंग्लिश शिबिरात पोचविले!

ही गोष्ट ह्या ग्रंथात देत असता आमच्या मनापुढे दुसरी अशीच ओक घटना अुभी राहत आहे. तीही येथे देणे हे सद्‌गुणविकृतीच्या प्रकरणाचे हृदयविदारक ओक यथावत् चित्रच देण्यासारखे होणार आहे, म्हणून ती घटना सांगतो. पूर्वी सन सतराशेच्या आरंभीच्या दहा-ओक वर्षांच्या आसपास पंजाबातील आम्हा हिंदू-शिखांचे परमप्रतापी धर्मवीर श्रीदशमगुरू गोविंदसिंग यांना मोगली सत्तेपुढे युद्ध चालू ठेवणे अशक्य झाले. चंदनगडच्या वेढ्यात शेवटी गुरु गोविंदसिंगजी त्याच्या पुत्रांसह अटकले गेले. अगदी प्रतिज्ञाबद्ध अशा त्यांच्या केशधारी शीखसैन्यातसुद्धा मुसलमानांची धास्ती खाअून गुरुजींना सोडून जाण्याचा आणि शीख धर्माचा त्याग करण्याचा कट होअून त्यांतील अनेक शीख किल्ला सोडून शिष्यत्वाचे त्यागपत्र देअून निघून गेले. गुरुजींचे दोन वडील पुत्रही त्यांच्या समक्ष युद्धात ठार मारले गेले. शेवटी अशा अडचणीतून प्राण सोडून वाट फुटेल तिकडे ज्यांनी त्यांनी आपला जीव वाचविण्यास निघून जावे असे गुरुजींनी सागिंतले आणि ओक गुप्त संधी सापडताच ते स्वतः ही गड सोडून अज्ञातमार्गे निघून गेले. त्या घालमेलीत त्यांचे बारा वर्षाच्या आत वय असलेले दोन लहान पुत्र चुकामुक होअून मुसलमानांच्या हाती सापडले. त्यांना धर्मबुद्धीप्रमाणे कसे वागविले ?

सुलतान टिपूच्या अशाच दोन लहानग्या राजपुत्रांना मराठ्यांच्या हाती ती मुले पाडाव होअून पडल्यानंतर त्यांना मराठी धर्माचाराप्रमाणे किती दयेमायेने वागविले, ते वर सेनापती फडके यांच्या पत्रात दिलेलेच आहे.

अिकडे शिख गुरू गोविंदसिंगचे ते दोन लहान छावे मुसलमानांच्या हाती पाडाव होअून पडताच त्यांना सेनासभेत आणून प्रश्न करण्यात आलाः ''तुम्ही मुसलमान होता का ? होत असला तर तुम्हाला जीवदान आणि हवे ते देण्यात येअील, नाही तर नाही.'' मुलांनी अुत्तरिलेः ''आम्ही मुसलमान होणार नाही, आम्हांस जीवदान न मिळाले तरी चालेल.'' त्यासरशी, त्या मुसलमानांच्या राक्षस न्यायाने हुकूम दिला गेला की, त्या मुलांना तत्काल जिवंतपणी भिंतीत चिणून काढावे. तसे ते चिणले जात असता नवी नवी वीट ठेवतेवेळी त्यांस पुन्हा पुन्हा विचारले जाअी; ''मुसलमान होता का ?'' ते हिंदू छावे पुनःपुन्हा म्हणत; ''मुसलमान होत नाही.'' शेवटची वीट दोघांवर चढली, श्वास बंद झाला! आजही कोणीही हाडाचा हिंदू त्या स्थली बलिदानाच्या वातावरणात शिरला असता, ''मी मुसलमान होत नाही! होत नाही! होत नाही!!! हिंदू मी, शीख आम्ही, मरण मी वरी!!'' हे स्वर तेथे घुमू लागतात!

परंतु घटनाव्यत्यय होअून क्रूरतापूजक मुस्लिम टिपूच्या हाती आमच्या पेशव्यांची अशी दोन अर्भके रणधुमाळीत पाडाव होअून पडली असती तर ? त्यांना तो टिपू आमच्या हिंदुहृदय सेनापती फडक्यांप्रमाणे त्या अर्भकांना जेवू घालून, आश्वासून पेशव्यांकडे कधीही परत धाडता ना! तसे कृत्य तो त्याच्या धर्मसमजुतीप्रमाणे धर्मबाह्य आणि कापुरुषत्वाचे लक्षण समजता! त्याच्या परंपरागत धर्मप्रवृत्तीप्रमाणे तो क्रूरकर्मा टिपू त्या आमच्या पेशव्यांच्या अर्भक राजपुत्रांस भिंतीतच जिवंत चिणून टाकता; नाहीतर हत्तीच्या पायाखाली चिरडून टाकता! आणि हिंदुमात्र त्या राक्षसीपणाचा कोणत्याही प्रकारचा सूड, शक्ती असूनही सवाअी राक्षस होअून घेते ना! कारण त्यांच्या हाडीमासी खिळत असलेल्या सद्‌गुणविकृतीच्या रोगाने ते पछाडलेचे पछाडलेले राहिले होते!

हेही येथे सांगून टाकतो की, संकटात सापडलेल्या शत्रूवर तुटून पडू नये, रथ्यांनी रथ्यांशीच लढावे, खड्गींनी खड्गींशी, निःशस्त्र शत्रूशी तो सशस्त्र होअीतो लढू नये, बेशुद्ध शत्रूवर शुद्धीत येअीतो आघात करू नये अित्यादी प्रकारची रणनीती महाभारतकाली समुचित असेल; कारण, युध्यमान दोन्ही पक्ष तेच नियम पाळीत, ओकाच रणनीतीचे ते अुभयता पूजक होते. परंतु या सद्‌गुणविकृतीमुळे पात्रापात्रविवेकानुसारच ती रणनीती वापरली पाहिजे, ही गीतेतली शिकवण विसरली गेल्यामुळे सद्‌गुणविकृतीने नेभळट आणि बुद्धिभ्रष्ट झालेल्या हिंदूंनी मुसलमानांसारख्यांच्या राक्षसी रणनीतीशीही त्याच मूलतः सात्त्विक असलेल्या पण असमयज्ञतेने केवळ आत्मघातक ठरणाऱ्या रणीनीतीने लढण्याचे व्यसन काही सोडले नाही! वर दिलेल्या टिपूच्या अुदाहारणनंतरही मराठ्यांची आणि त्या दिल्लीच्या ओक सहस्त्र शतकांच्या मुस्लिम राजसत्तेचा अगदी

शेवटचा केवळ वळवळत अुरलेला जो अंश निजामशाहीत अुरलेला होता त्या निजामाशी हिंदू-मुस्लिम संघर्षातील शेवटची टक्कर अुडून ती मुस्लिम सत्ताही रणांगणात हिंदूंच्या पायाखाली चिरडून गेली तरीपण त्या लढाअीतही ह्या सद्‌गुणविकृतीचे अेक लाजिरवाणे अुदाहरण जे घडले तेही येथे या विषयाचा शेवटचा निरोप घेताना सांगून टाकतो.

## खर्ड्याच्या लढाअीचे प्रसंगी घडलेले सद्‌गुणविकृतीचे अुदाहरण!

हिंदू - मुसलमानांच्या ह्या सहस्त्रवर्षीय महायुद्धातील सामान्यतः अगदी शेवटची निर्णायक लढाअी सन १७९५ मध्ये खर्डा येथे झाली. त्या लढाअीत हिंदुछत्रपतींच्या मराठ्यांनी निजामाच्या मुस्लिम सत्तेचा अगदी चेंदा - मेंदा करून टाकला. पण या सद्‌गुणविकृतीच्या असाध्य रोगाचा असा अेक झटका या तुंबळ लढाअीमध्येच मराठ्यांना आला होता की जर तो किंचित अधिक काळ टिकता तर बाजू हिंदूंवरच अुलटून मुसलमान त्या लढाअीत मराठ्यांचीच दाणादाण करायला सोडते ना! रणांगणावर हिंदू-मुस्लिम सैन्ये भिडताच रणनीतीच्या डावपेचांत मराठ्यांनी निजामाला पकडून अशा निर्जन नि निर्जल स्थली कोंडले की, त्याच्या अवाढव्य सैन्याला दाणावैरण मिळेनाशी झाली. विशेषतः त्याच्या सैन्यात पाण्याच्या अभावी ज्याच्या त्याच्या तोंडचे पाणी पळाले! त्याचे शेकडो मुस्लिम सैनिक पशूही पिणार नाहीत अशा डबक्यांतले पाणीही पिअू लागले! स्वतः निजाम 'बहादुराच्या' डोळ्यात पाणी आले पण प्यावयास पाणी मिळेना! अशा दुर्धर पेचात मुस्लिम सेना सापडली असता मराठ्यांच्या तोफांच्या गडगडाटाने सारे आकाश दणाणू लागले!

परंतु याचवेळी संकटग्रस्त शत्रूला, तो शत्रू दुष्ट असताही आणि मूर्च्छित पडला असताही, रणांगणात त्याला थोडा सावध होअू देण्यास आपण हत्यार आवरून त्या शत्रूंसही अवश्य ते साहाय्य द्यावे, ह्या हिंदूंच्या पुरातन, अुदार वेडाच्या लहरीने पेशव्यांच्या मंत्रिमंडळास अकस्मात झपाटले! आपले मुख्य शत्रू जे 'निजाम साहेब' ते स्वतः तहानेने कासावीस होत असता त्यांना जिवंत पकडण्याची आणि मुस्लिमांची सर्व सेना नष्ट करण्याची संधी आली असताही त्या शत्रूवर शास्त्रोचित दया करणे, हेच खरे वीरभूषण होय, अशा कळवळीने पेशव्यांनी मंत्रिमंडळाच्या संमतीने स्वतःच्या सैन्यासाठी पराकाष्ठेने संरक्षिलेल्या पिण्याच्या पाण्यातून त्या निजाम बहाद्दरांच्या राजकुटुंबियांसाठी पुरेल अितक्या पाण्याचा पुरवठा करण्याची व्यवस्था केली! आणि हे भर लढाअीत!! निजामाचे सर्व मुस्लिम सैन्य हिंदूंनी त्या स्वतः निजामासुद्धा पक्के कैचीत पकडले ते 'क्षमा वीरस्य भूषणम' या सद्‌गुण-विकृतीच्या सूत्रान्वये!!!

## वदतो व्याघ्राताचे अुदाहरण!

मुसलमानांचा पाडाव होअून बलवत्तर अनुकूल संधी मिळाली तरी प्रथमपासूनच हिंदूंना अशी भिती वाटत आलेली असे की, जर आपण बाटविलेल्या हिंदूंना किंवा जन्मजात मुसलमानांना आज हिंदु करून घेतले, तर त्यायोगे अधिकच चवताळून देशातील आजूबाजूची मुस्लिम राज्ये नि लोक अुद्या आपल्यावर सशस्त्र स्वारी करतील किंवा सीमा प्रांतापलीकडून त्यांची अेखादी नवी टोळधाड आपल्यावर तुटून पडेल आणि ते आपणा हिंदूंचा दसपट अधिक अत्याचार नि छळ करतील! ह्या मुसलमानांच्या सतत भीतीमुळेच हिंदू लोकांनी बाटविलेल्या हिंदूंना पुन्हा शुद्ध करून स्वजातीत परत घेअू नये असा कडक जातिनियम केला. भंग्यापासून ब्राह्मणापर्यंत सर्व जातींनी आपण होअून जी ही 'शुद्धिबंदीची' धार्मिक बेडी आपल्या पायांत ठोकून घेतली ती मुस्लिमांच्या वारंवार होणाऱ्या सशस्त्र आक्रमणांना नि अत्याचारांना भिअूनच होय!

ही वरील समूजत किती असमंजस, अधूरी नि अवास्तव आहे हे दाखविण्यासाठी आणि या ग्रंथाच्या सर्वच प्रबंधांतून हिंदु-मुसलमानांच्या या महायुद्धाची चिकित्सा करताना आम्ही जी विधाने केली आहेत त्यांनाही अैतिहासिक पाठिंबा किती भरपूर मिळू शकतो ते दिग्दर्शिण्यासाठी या चालू ग्रंथात टिपूशी झालेल्या युद्धामधील कालावधीत घडलेल्या मराठ्यांच्या अितिहासातील काहीवृत्त अेक अुदाहरण म्हणून विस्तारशः दिलेले आहे.

तेही अुदाहरण क्षणभर बाजूला ठेवले तरी त्यांच्याही आधी अितका साधारण प्रश्न विचारणे पुरे आहे की, जर 'मुसलमान अधिक चवताळतील; अशा सदोदित आणि सरसकट भीतीने हिंदु लोक खरोखरीच ग्रस्त झालेले असते तर मुस्लिमांवरील धार्मिक

प्रत्याक्रमणाचा प्रश्न सोडाच, पण हिंदूंनी मुळातच आपल्या राजकीय स्वातंत्र्यासाठीसुद्धा मुस्लिमांवर राजकीय प्रत्याक्रमण कधीच केले नसते! त्यांचा प्रतिकारसुद्धा केला नसता! कारण मुस्लिमांनी सशस्त्र स्वाऱ्या करून हिंदूंची जेथे जेथे राज्ये घेतली किंवा ते घेऊ शकले तेथे तेथेच काय ते त्यांना हिंदूंवर धार्मिक अत्याचार करणे शक्य होणार होते. भीतीच वाटायची तर हिंदूंना प्रथम मुस्लिमांच्या राजकीय आक्रमणांची वाटावयास पाहिजे होती. परंतु, किरकोळ घटना सोडून त्या अितिहासाकडे अेकवटपणे पाहता अगदी महंमद गझनीच्या नि घोरीच्या अघोरी स्वाऱ्यांपासून आपआपल्या स्वराज्याचे नि स्वधर्माचे संरक्षणार्थ हिंदूंनी रणांगणामागून रणांगणे लढविली होती. राज्ये गेली, पुन्हा मिळविली, आज हार, तर अुद्या जीत, आज जीत तर अुद्या हार. पण सतत सहाशे सातशे वर्षे मुस्लिमांशी जो हिंदू साऱ्या हिंदुस्थानभर सशस्त्रपणे सारखा लढत राहिला, हिंदुस्थानची अंगुली न अंगुली भूमी लढवीत राहिला आणि शेवटी मुस्लिम राजसत्तेला दाती तृण धरावयास ज्या हिंदूंने भाग पाडले, तो हिंदू मुसलमानांच्या 'अधिक चवताळण्याला' भीक घालणारा होता, असे म्हणावे हे वदतो व्याघ्राताचेच अेक अुत्कृष्ट अुदाहरण होय!

मुसलमानांना हिंदु करून घ्यायचे नाही किंवा मुसलमानांनी हिंदुस्थानात स्थापिलेल्या अिस्लामी धार्मिक सत्तेवर कोणतेही प्रत्याक्रमण करावयाचे नाही, त्यांना धार्मिक प्रश्नी कोणताही अुपसर्ग द्यावयाचा नाही. कारण, ती कृत्ये आपल्या हिंदुधर्माच्या सर्वस्वी विरुद्ध आहेत, अशी हिंदूंची ठाम प्रवृत्ती पाहून मुसलमानांना अिस्लामी धर्मसत्तेच्या संरक्षणासाठी कोणतीही चिंता करण्याचे कारण अुरले नाही. त्यांना अेकच काय ती चिंता अुरली होती आणि ती म्हणजे आपले धार्मिक आक्रमण अेकसारखे वाढवून आपल्या हातून हिंदूंनी राजसत्ता जरी हिरावून नेली असली तरी निदान आपल्या अिस्लामी धर्मसत्तेची कक्षा भरतखंडावर वाढविण्याचे आटोकाट प्रयत्न करण्याची काय ती होती मुसलमानांच्या या धर्मसत्तेपायी हिंदू जगताची केवढी हानी झालेली होती. याची चर्चा आम्ही ह्या ग्रंथात वर अधून मधून केली आहे. आता येथे काही ठोकळ आणि अेकवट आढावा देत आहो आणि तोही त्या मुस्लिम धर्मसत्तेपायी झालेल्या दुय्यम अशा अनेक हानिकारक गोष्टीविषयी नव्हे, तर तिच्यामुळे जे दोन सर्वांहून अधिक हिंदुविघातक परिणाम झाले त्या दोन गोष्टींविषयीच होय.

## संख्याबळाची हानी

पहिली गोष्ट म्हणजे हिंदूंच्या संख्याबळाची झालेली प्रचंड नि राष्ट्रव्यापी हानी. साधारणतः त्या अेक-सहस्त्र वर्षात दोन ते तीन कोटी हिंदूंना मुसलमानांनी बाटविले!

हिंदूंच्या संख्याबळाचा जो रक्तशोष चाललेला होता तो त्या काळच्या हिंदुसमाजालाही कळत होता. परंतु त्या रक्तक्षयाच्या रोगावर शुद्धिबंदीच्या बुद्धिभ्रंशामुळे त्यांना दुसरा अुपचारच सुचत नव्हता. असाध्य रोगाची प्राणांतिक व्यथा रोगी जशी अगतिकपणे केवळ सोशीत राहतो तसे त्या काळचे हिंदुजगत ही रक्तक्षयाची प्राणांतिक व्यथा अगतिकपणे केवळ सोशीत राहिले!

## भूक्षेत्राची हानी

परंतु 'संख्याबळा'च्या ह्या हानीहूनही भयंकर अशी दुसरी जी अेक हिंदुराष्ट्राची हानी होत होती ती म्हणजे हिंदुस्थानच्या विस्तृत भूमीला खंडखंडशः मुस्लिमांची ही अिस्लामी धार्मिक सत्ता हिंदूंच्या हातून नकळत छिनावीत चालली होती ही होय.

हिंदूंशी लढून जितकी भूमी मुसलमानांना साऱ्या हिंदुस्थानभर जिंकता आली नाही तितकी भूमी मुस्लिमांनी हिंदुस्थानभर हिंदूंना बाटवून जिंकली!

कारण, जे दोन ते तीन कोटी हिंदू त्यांनी बाटवून मुसलमान केले आणि जे लक्षावधि मुसलमान बाहेरून हिंदुस्थानात आले त्या अुभयतांचे वास्तव्य हिंदुस्थानातच स्थायिकपणे झालेले होते. त्यांच्या ह्या कोटीकोटींच्या वस्तीखाली नि वस्तीसाठी हिंदुस्थानातील गावे, नगरे, प्रदेश यांतून जितकी भूमी व्यापली गेली तितकी वस्तुतः मुसलमानांच्याच सत्तेखाली गेली. त्या विस्तीर्ण भूमीवर मुसलमानांची धर्मसत्ता प्रभुत्व गाजवीत होती, त्यांचा हिरवा चांद हिंदूंच्या देशाच्या त्या विस्तीर्ण भागावर अप्रतिहतपणे फडकत होता. मुसलमानांच्या हातची राजसत्ता हिंदूंनी विशेषतः मराठ्यांनी, त्या महायुद्धाचे शेवटी

साऱ्या हिंदुस्थानात हिरावून घेतली असली तरीही वैयक्तिक नि सामुदायिक सत्ता नांदत होती मुसलमानांची. ती मत्ताही (Property) होती मुस्लिम नागरिकांचीच.

पुन्हा मुस्लिमांची ती लोकसंख्या त्यांच्या बहुपत्नीकत्वामुळे आणि प्रच्छन्न धर्मप्रसारामुळे सारखी वाढत होती आणि त्या प्रमाणात हिंदुस्थानची अधिक अधिक मूभीही त्याच्या वस्तीखाली जाऊन मुसलमानी धर्मसत्तेच्या हातात पडत चालली होती. ह्या वस्तुस्थितीची काही कल्पना येण्यासाठी अितके सांगितले तरी पुरे आहे की, हिंदूंची, विशेषतः मराठ्यांची राजसत्ता वस्तुतः (De facto) प्रस्थापित झाल्यावरही प्रत्येक लहान-मोठ्या गावातून, मुसलमान वाडा किंवा 'मुसलमान मोहल्ला' म्हणून अेक निराळा भाग वसलेला असे. प्रत्येक नगरातून तर सोडाच; पण प्रत्यक्ष पुणे,सातारा, कोल्हापूर, नागपूर, बडोदे, देवास, धार, अिंदूर, ग्वालियर, जोधपूर, अुदयपूर आणि पुढे पुढे शिखांचे अमृतसर, लाहोर ते थेट श्रीनगरसारख्या हिंदूंच्या मोठमोठ्या स्वतंत्र राजधान्यांतूनही प्रत्येक सहस्त्रावधि मुसलमानांनी व्यापलेले निरनिराळे विभागचे विभाग 'मुस्लिम पुरा', 'मुस्लिम आबादी' अशा नावांनी तुटकपणे वसलेले होते. आणि त्या त्या विभागावर मुसलमानांची धर्मसत्ताच नव्हे तर भूस्वामित्वही (जमीनमालकीपण) प्रस्थापित झालेले होते.

आणि विशेष हे की, त्या लक्ष लक्ष मुसलमानांच्या धार्मिक सत्तेचे आणि वैयक्तिक मत्तेचे नैर्बंधिक (कायदेशीर) संरक्षण, 'आपली प्रजा' ह्या भ्रमाने तेथील स्वतः हिंदुराजेच, त्या मुसलमान नागरिकांना हिंदू नागरिकांच्यासमान पातळीवर लेखून करीत होते. त्यातही त्या काळच्या मुस्लिमांच्या प्रकरणी 'धर्मांतर म्हणजेच राष्ट्रांतर ' हे सूत्र शंभर टक्के लागू होत असल्याने आणि त्या काळी हिंदू आणि मुसलमान ह्या दोघांमध्ये कट्टर वैराचाच काय तो अेकमेव संबंध अस्तित्वात असल्यामुळे मुसलमानांच्या हाती गेलेले हे सारे भूमीखंड राष्ट्रशत्रूंच्याच हाती सोपवून दिल्यासारखे होते.

अशा रीतीने, हिंदुस्थानातील गावागावांतून, नगरानगरांतून आणि प्रदेशांतून त्या काळापासून लहान - मोठी 'मुस्लिमस्थाने' निर्माण होत चाललेली होती. म्हणजेच हिंदुविभाग नि मुस्लिम - विभाग अशा दोन भागांत अखंड हिंदुस्थान देशाची वाटणी त्या काळापासूनच प्रच्छन्नपणे होत चाललेली होती.

ही लहान - मोठी मुस्लिमस्थाने म्हणजे प्रस्थापित हिंदु-राज्यसत्तांच्या बांधकामाच्या पायात त्या छुप्या अिस्लामी धर्मसत्तेने पेरलेले जिवंत कालध्वम्, टाअिम बाँबच होते!

तथापि, त्या भूहानीच्या विद्यमान नि संभाव्य अशा भयंकर परिणामांची तीव्र जाणीव किंवा नुसती जाणीवसुद्धा त्या काळच्या हिंदुराज्यसत्ताधिकार्‍यांना, सामान्यजनांना किंवा त्या काळच्या अितिहासलेखकांना सुद्धा नव्हती, असे दिसते. कारण शुद्धिबंदी प्रभृति धार्मिक खुळापायी हिंदुराष्ट्रावर त्या काळी झालेल्या नि होणाऱ्या संख्याहानीच्या नि भूमीहानीच्या दुष्परिणामांची आम्ही येथे करीत आहो अशी स्पष्ट सडेतोड, दूरदर्शी नि अैतिहासिक अुकल अन्यत्र कोणी कोठे केल्याचे आढळत नाही. ती चर्चा कोठे आढळली तरी केवळ अपवादभूतच ठरणार!

दुसरे असे की जर मुस्लिम धर्मसत्तेच्या ह्या वरील दुष्परिणामांची तीव्र जाणीव हिंदूंना त्याकाळी झालेली असती तर आम्ही पूर्वी वर्णिल्याप्रमाणे टिपू सुलतानाच्या राजसत्तेला धुळीस मिळविताच महाराष्ट्रीय राजमंडळाने लगोलग टिपूच्या नेतृत्वाखाली मुस्लिमांनी स्थापलेल्या अिस्लामी धर्मसत्तेलाही धुळीस मिळविण्यासाठी मुस्लिमांवर शस्त्रसज्ज नि बलवत्तर धार्मिक प्रत्याक्रमणही केले असते! कारण, तसे प्रत्याक्रमण करण्याची जितकी अनुकूल संधी हिंदूंना पूर्वी कधीही मिळाली नव्हती तितकी सर्वस्वी अनुकूल संधी त्या वेळी मिळाली होती. त्या वेळी साऱ्या हिंदुस्थानात मराठ्यांचा हात धरील किंवा त्यांच्याकडे वाकड्या दृष्टीने नुसता पाहील अशी कोणतीही मुस्लिम शक्ती अुरलेली नव्हती, हे आम्ही वर सांगितलेच आहे. आमचा त्या काळचा वीरभाट आपल्या पोवाड्यात हिंदुत्वाच्या रसरशीत अभिमानाने म्हणतो की -

**जलचर हैदर निजाम अिंग्रज रण करिता थकले ।।**
**ज्यानि पुण्याकडे विलोकिले ते संपत्तिला मुकले ।।**

## राक्षसाशी लढायचे आणि जिंकायचे तर सवाअी राक्षस होअूनच लढले पाहिजे

वरील अनुकूल संधी येताच टिपूच्या युद्धात लढलेले आणि त्या वेळी दक्षिणेत असलेले भोसले, होळकर, पटवर्धन, रास्ते अित्यादी मराठी राज्यमंडळाच्या सरदारांनी, कारभाऱ्यांनी, पेशव्यांनी आणि छत्रपतींनी प्रमुख प्रमुख धर्माधिकाऱ्यांसह विचारविनिमय करून खालील भाषेत जरी नसली तरी खालील आशयाची राजाज्ञा महाराष्ट्रातील हिंदुमात्रांना तत्काल सोडली असती की :

'महाराष्ट्रीय वीरांच्या पराक्रमाने जशी 'सुलतान टिपूची अिस्लामी राजसत्ता धुळीस मिळविली तशीच त्या 'सैतान' टिपूच्या नेतृत्वाखाली मुस्लिमांनी हिंदूंवर राक्षसी अत्याचार करून स्थापलेली त्यांची अिस्लामी धर्मसत्ताही धुळीस मिळविण्यासाठी आणि त्या अत्याचारी अपराध्यांचे कठोर पारिपत्य करण्यासाठी मुस्लिमांवर धार्मिक प्रत्याक्रमण करण्याचे आमच्या राज्यमंडळाने निश्चित केले आहे.

'आद्य श्री. शंकराचार्यांच्या खालोखाल ज्यांचे धुरंधरत्व अखिल हिंदुजगत् मानीत आले आहे त्या विजयनगराच्या - हिंदुसाम्राज्य - संस्थापक श्री शंकराचार्य विद्यारण्य स्वामी यांनी दिलेल्या शास्त्रार्थ नि शास्त्राचार शिरोधार्य मानून, मुस्लिमांच्या अत्याचारी धर्मसत्तेवर प्रत्याक्रमण करण्याचे कार्यी ज्या राष्ट्रघातक रूढींच्या बेडीने हिंदुसमाजास आजपर्यंत पंगू करून सोडले होते ती शुद्धिबंदीची मानसिक बेडी आज आम्ही प्रथमतः तोडून टाकीत आहोत. आणि आमच्या महाराष्ट्रीय राज्यात झाडून साऱ्या अधिकाऱ्यांना खालीलप्रमाणे कडक व्यवस्था करण्याची आज्ञा सोडीत आहोत.

'प्रत्येक ग्रामाधिकाऱ्यांना नि नगराधिकाऱ्यांना आपआपल्या कक्षेत ज्या ज्या हिंदु स्त्री-पुरूषांना मुस्लिमांनी बाटविल्याचे आढळून येअील त्यांना त्यांना अेका 'निरोधन शिबिरात' शासकीय संरक्षणाखाली अेकत्र जमवून ठेवावे. त्यांना चरितार्थाची कोणतीही अुणीव पडू देअू नये.

'प्रत्येक गावातील ज्या ज्या मुस्लिमांच्या घरात हिंदु स्त्रिया, मुली नि मुले बळाने बाटवून राबविली जात असतील त्या त्या घरातील सर्व मुस्लिम स्त्री-पुरुषांना तत्काळ बेड्या ठोकून कारागृहात बंद ठेवावे आणि तेथील हिंदु स्त्रियांना आणि मुलांना तत्काळ मुक्त करून नि समतेने वागवून वरील निरोधन शिबिरातील समुदायात पोचवून द्यावे.

'त्याचप्रमाणे टिपूने अुभारलेली जी क्रूरातील क्रूर मुस्लिम तरुणांची निवडक अिस्लामी पृतना (पलटण) होती आणि जिला तो माझ्या लाडक्या मुलांचे सैन्य म्हणून कुरवाळीत असे, तिच्यातील मुस्लिम सैनिक महाराष्ट्रात, कर्नाटकात किंवा अितरत्र ज्या ज्या ठिकाणी सापडतील त्यांना त्यांना तत्काल पकडून नि बेड्या ठोकून वरील कारागृहांत डांबून ठेवण्यात यावे. हिंदूतील तरूण नि सुंदर अशा ज्या अनेक निरागस स्त्रियांना पकडून टिपूने या अिस्लामी पृतनेतील तरूणांस त्यांच्या हिंदूंवरील अत्याचाराचे पारितोषिक म्हणून वाटून दिले होते त्या सर्व हिंदुतरुणींना मुक्त करून नि ममत्वाने वागवून वरील निरोधन शिबिरात धाडून द्यावे.

'अितकी व्यवस्था होताच अेक राष्ट्रीय शुद्धिसप्ताह वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून पाळण्यांत येअील. त्याच्या आधी वरील निरोधन शिबिरांतील जे सहस्त्रावधी बाटविलेले हिंदू स्त्री-पुरूष अेकत्र केलेले असतील त्या सर्वांना, मोठमोठ्या गटाने त्यांच्या त्यांच्या मूळ वस्तीला लागून असलेल्या पवित्र क्षेत्रस्थानात किंवा धारवाड, बदामी अित्यादी ज्या नगरात त्या रणधुमाळीत टिपूच्या अत्याचारी मुस्लिम सैन्याचा मराठ्यांनी मोड केलेला होता त्या त्या नगरात सामुदायिक शुद्धीकरणासाठी सैनिक संरक्षणाखाली पोचवून देण्यात यावे. तेथे तेथे त्या मुस्लिमांनी बाटविलेल्या लक्षावधि हिंदु स्त्री-पुरुषांचे शुद्धीप्रीत्यर्थ मोठमोठे यज्ञ केले जावेत आणि मोठ्या समारंभाने प्रचंड समुदायांच्या हिंदुधर्माच्या जयघोषात त्या सर्वांची शुद्धी करण्यात यावी. त्यांच्यापैकी ज्यांना त्यांची मूळची हिंदुकुटुंबे आपल्या स्वगृही ममतेने नि समतेने परत घेअू अिच्छीत असतील त्यांना त्यांना आपापल्या घरी पोचवून द्यावे. परंतु ज्या सहस्त्रावधी शुद्धीकृत हिंदूंना त्यांच्या मूळच्या पोटजातीत तसा ममत्वपूर्वक प्रवेश होअू शकत नसेल त्या सर्वांचा, आपल्या राजपुतातील पौराणिक कथेप्रमाणे 'अग्निकुल' नावाची अेक नवीन क्षत्रिय जाति हिंदुजगताच्या परिधातच निर्माण करून त्या जातीत सरमिसळ समावेश करण्यात

यावा. त्यांना हिंदुत्वाचे सर्व अधिकार अितर हिंदूंसह समानतेने अुपभोगता आले पाहिजेत, असे राज्याधिकाऱ्यांना आणि धर्माधिकाऱ्यांना आज्ञापिण्यात यावे.

'पूर्वी टिपूच्या आज्ञेने मुसलमानांनी जितक्या कुलीन नि सुंदर हिंदू तरुणींना पकडून, बाटवून त्यांच्या विशिष्ट 'अिस्लामी पृतनेतील' सैनिकांना वाटून दिले होते निदान तितक्या तरी मुस्लिमांतील सुंदर नि तरूण स्त्रियांना पकडून आणून वरील शुद्धिसमारंभातच हिंदू करून, त्या युद्धामध्ये ज्या ज्या मराठी वीरांनी विशेष पराक्रम केला होता त्यांच्या त्यांच्याशी त्यांची लग्ने लावून देण्यात यावीत.

'नंतर टिपूशी झालेल्या युद्धकाळात ज्या आततायी मुस्लिमांनी हिंदूंवर धार्मिक अत्याचार केले, हिंदू स्त्रियांवर बलात्कार केले, हिंदू देव-देवतांचा अुच्छेद केला त्या सहस्त्रावधी मुस्लिम अपराध्यांचे पारिपत्य करण्यासाठी त्यांना वर अुल्लेखिल्याप्रमाणे ज्या ज्या कारागारांतून बंद करण्यात आलेले होते तेथून तेथून काढून सशस्त्र पहाऱ्यात, वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून आयत्या वेळी कळविण्यात येअील अशा चार-पाच मुख्य मुख्य नगरस्थानी नेण्यात यावे. विशेषतः ज्या नरगुंद किंवा कित्तुर या राजधान्यांत हिंदू स्त्री-पुरूषांवर जे अनन्वित अत्याचार स्वतः टिपूने आणि त्याच्या मुस्लिम सैन्याने केले, त्या अत्याचारांचा सूड त्या मुस्लिम आततायींना कठोर प्रायश्चित देअून त्या नगरातील त्याच हिंदू स्त्री-पुरूष समाजाच्या डोळ्यांसमोर पुरेपूर घेतला जावा यासाठी त्या त्या कारागारांतून पकडून आणलेल्या मुख्य मुख्य मुस्लिम आततायींना आणि विशेषतः टिपूच्या त्या 'अिस्लामी पृतने' तील सैनिकांना नरगुंद आणि कित्तुर येथे नेण्यात यावे. त्या शुद्धिसप्ताहातील ठराविक दिवशी ह्या शतशः आततायी मुस्लिमांना त्या त्या नगरातील विस्तीर्ण पटांगणात सहस्त्रो हिंदू प्रेक्षकांच्या समोर सशस्त्र सैनिकांच्या नि तोफांच्या कडेकोट पहाऱ्यात अुभे करून त्यांना त्यांनी केलेल्या हिंदूंवरील अत्याचारांचा पाढा वाचून दाखवून अेकजात तोफांच्या तोंडी देण्यात यावे.

## हिंदू हुतात्म्यांच्या स्मृतीस
## राष्ट्रीय मानवंदना

'शेवटी ह्या अपूर्व शुद्धिसप्ताहाच्या सांगतेच्या दिवशी, पूर्वी टिपूच्या सहस्त्रावधि मुस्लिम सैन्याने हिंदूंची गावेची गावे वेढून त्यांना बळाने मुसलमान करण्याचा किंवा त्यांचा असह्य छळ करण्याचा प्रलय मांडला होता त्या वेळेस त्या पाठलाग करणाऱ्या मुस्लिम पिशाच्चांच्या हाती पडून आपला धर्म बाटला जाअू नये यासाठी दुसरा कोणताही मार्ग सापडेना, तेव्हा ज्या सहस्त्रावधि हिंदू स्त्री-पुरूषांनी कृष्णा, तुंगभद्रा ह्यांसारख्या नद्यांच्या प्रवाहातून अुड्या घेअून किंवा अन्य प्रकारे स्वतःचे प्राण दिले पण हिंदुधर्म सोडला नाही; त्या सहस्त्रावधि हिंदू हुतात्म्यांना राष्ट्रीय मानवंदना देण्यासाठी साऱ्या महाराष्ट्र राज्यातील नगरानगरांतून आणि गडागडांवरून आणि सहस्त्रावधि हिंदुलोकांच्या हिंदुधर्माच्या जयघोषात तोफांच्या तीन तीन फैरी सोडण्यात याव्यात.

## धार्मिक प्रत्याक्रमणांच्या ह्या हिंदू तोफांच्या गडगडाटाचे प्रतिध्वनि

जर मुस्लिमांच्या धार्मिक सत्तेवर मराठ्यांनी त्या काळी असे धार्मिक प्रत्याक्रमण केले असते तर त्याच्या वर दिलेल्या सांगतेच्या दिवशी महाराष्ट्रभर गडागडांवरून सुटणाऱ्या तोफांच्या ह्या प्रचंड गडगडाटाचे प्रतिध्वनि केवळ गोदा, कृष्णा नि तुंगभद्रा ह्या नद्यांच्या परिसरातच काय ते दुमदुमले नसते, तर गंगा, यमुना, सिंधू आणि तिच्याही पलीकडे वक्षु (ऑक्सस्) नदीच्या दऱ्याखोऱ्यापर्यंतच्या साऱ्या मुस्लिम जगतामध्ये दणाणून गेले असते : ''हिंदू लोकही बाटलेल्या लक्षावधि मुसलमानांसही परत हिंदू करून घेत आहेत! हिंदू लोकही पायातील शुद्धिबंदीची बेडी त्यांनी स्वतःच तोडून टाकली आहे!!'' या नुसत्या बातमीसरशी सहस्त्रावधि तोफांच्या दणक्यांनी बसला नसता अितका हादरा त्या काळी निदान हिंदुस्थानातील मुस्लिम जगताला बसला असता, त्यांचे अस्तित्व कोलमडू लागले असते. हा नुसता अैतिहासिक तर्क नाही, तर अैतिहासिक संभाव्यतेची ही हमी आहे.

परंतु ती संभाव्यता संभाव्यताच राहिली. हिंदूंनी आपल्या पायातील शुद्धिबंदीची बेडी नाही तर नाहीच तोडली, न तोडू दिली. अर्थात मुसलमानांनी हिंदुस्थानात त्या काळी स्थापलेली अिस्लामी धर्मसत्ताही अुखडून टाकता आली नाही.

परंतु मुस्लिमांची हिंदुधर्मावरील अघोर आक्रमणे होण्याच्या आधीपासूनच ज्या जन्मजात जातिभेदाचे राष्ट्रघातक विष हिंदू जगताच्या अंगात भिनू लागलेले होते त्यामुळे नि नंतर त्या मुस्लिमांच्या अघोर नि सतत आक्रमणांचा परिणाम म्हणून त्या जातिभेदाच्या कचाट्यात सारा हिंदुसमाज अधिकाधिक पक्केपणी जखडला जात चालल्यामुळे हिंदुधर्मातील, संस्कृतीतील नि सामाजिक आचारविचारातील ती मूळची प्रसरणशीलता, पचनशक्ती नि धार्मिक प्रांतांतसुद्धा प्रखर असलेली प्रत्याक्रमण प्रवृत्ती अगदी क्षीण होऊन गेली. त्यामुळे म्लेंच्छांसारख्या परधर्मीयांवर आक्रमण करून त्यांना हिंदुधर्मात नि हिंदुसमाजात आत्मसात करून घेणार तरी कसे ?

'जो जन्मजात हिंदु नाही त्यास गंगेत जरी स्नान घातले तरी तो जातिवंत हिंदु कसा होणार ? कारण जात जन्माने ठरते !

**रासभू धुतला महा तीर्थामाजी ।**
**नव्हे जैसा तेजी शामकर्ण ।।**

आणि अशा जन्मजात म्लेंच्छांना हिंदुत्वाचे गंध फासले म्हणून त्यांस आम्ही आमच्या जन्मसिद्ध जातीत घ्यायचे ? त्यांच्यासह आम्ही पंगत करायची ? आणि ती जन्मजात म्लेंच्छ स्त्री असली तर ? तिला नुसते हिंदूंच्या करंड्यातले कुंकू लावले म्हणून तिच्याशी आम्ही लग्न लावायचे ? आणि तेही अगदी अुघड अुघड !! अशक्य ! अशक्य !! अधर्म्य ! अधर्म्य !! अशा धर्मभावना केवळ ब्राह्मण - क्षत्रियांच्याच नव्हेत तर हिंदु जगतातील मांग, ढोर, भिल्ल अित्यादी तथाकथित अंत्यज वा वन्य जातीतही रोमरोमातून खिळलेल्या होत्या. त्यांना हाच खरा हिंदूधर्म वाटे. या जन्मजातपणाच्या मूळ सूत्राचेच मुख्य सूत्र होते - जो हिंदू स्वेच्छेने म्हणा, बळाने म्हणा, म्लेंच्छसंपर्काने अेकदा बाटला, तो बाटला ! जन्माचा बाटला ! वंशपरंपरेने बाटला !' अशा धार्मिक बुद्धिभ्रंशाने पछाडलेल्या त्या कालातील कोटी कोटी हिंदूंचा शुद्धीकरणास किंवा म्लेंच्छांवर धार्मिक प्रत्याक्रमण करण्यास तीव्र विरोध होता, त्यात काय आश्चर्य !

## सुदैव अितकेच की -

सुदैव अितकेच की, हिंदुस्थानावरील मुस्लिम आक्रमणाच्या प्रारंभकाळी रोटीबंदी, बेटीबंदी, शुद्धिबंदी, सिंधुबंदी अित्यादी बंद्यांप्रमाणे अेखाद्या बृहस्पतीने कुठल्यातरी स्मृतीत आणखी अेक अनुष्टुभ घुसडून 'राज्यबंदी' चीही बेडी हिंदुजातीच्या पायात ठोकण्याची आज्ञा सोडली नाही ! जसा मुस्लिमांनी बळाने बाटविलेला हिंदु पुन्हा हिंदु होअू शकणार नाही, मुसलमान आणि त्यांच्याशी व्यवहार करणारा हिंदूही मुस्लिम होअून जातो, असे आज्ञापिणाऱ्या या 'शुद्धिबंदी'च्या धर्माज्ञेच्या चालीवर 'कोणतेही हिंदुराज्य अेकदा मुसलमानांनी जिंकले की ते बाटलेले राज्य पुन्हा केव्हाही हिंदुराज्य होअू शकणार नाही, जो कोणी हिंदु ते राज्य परत घेण्याचा प्रयत्न करील तो स्वतःच बाटून मुसलमान होअील, पण ते राज्य काही हिंदु होअू शकणार नाही !' असे आज्ञापिणारी 'राज्यबंदी' चीही धर्माज्ञा जर अेखाद्या हिंदु बृहस्पतीने सोडली असती तर मुसलमानांची धर्मसत्ता अुखडून देणारे धार्मिक प्रत्याक्रमण करणे हे जसे शुद्धिबंदीमुळे हिंदूंना मुळातच अशक्य नि अधर्म्य झाले, त्याचप्रमाणे मुसलमानांची राजसत्ताही अुखडून टाकणारे राजकीय प्रत्याक्रमण करणेही ह्या राज्यबंदीच्या बेडीमुळे पंगू झालेल्या हिंदूंना अधर्म्य म्हणून अशक्य झाले असते. आणि, अफगाणिस्थान, अिराण, बाबिलोन, पुरातन अिजिप्त, तुर्कस्थान ते थेट मोरोक्कोपर्यंत जशी पूर्वीची सारी राष्ट्रे मरून जाअून मुस्लिममय झाली, तसेच हे हिंदुस्थानही त्याच काळी मुस्लिममय होते ! धार्मिक नि राजकीय दृष्ट्याही केवळ मुस्लिमस्थानच होअून जाते ! हिंदुराष्ट्राच्या अितिहासाची शेवटची ओळ तिथेच लिहिली जाती. परंतु हिंदुराष्ट्रावरील ते अरिष्ट तरी शेवटी टळले, अितकेच नव्हे तर हिंदुपराक्रमाच्या देदीप्यमान तेजाने अुजळलेला हिंदुजातीच्या पुनरुज्जीवनाचा अेक पुढचा अध्याय लिहिला गेला.

त्याकाळी, हिंदुस्थानातच नव्हे, तर जगाच्या ज्या बऱ्याच मोठ्या भागावर मुस्लिमांनी आपली राजकीय नि धार्मिक सत्ता स्थापिली होती त्या भागातील सर्व राष्ट्रांच्या अितिहासावरून हीच गोष्ट सिद्ध होते की, मुसलमानांची राजसत्ता आणि धर्मसत्ता ही दोन्हीही जी बहुसंख्य राष्ट्रे अुखडू शकली नाहीत ती तर आमूलात नष्ट होअून मुसलमानमय झालीच. परंतु, ज्या काही अमुस्लिम राष्ट्रांनी मुस्लिमांची राजसत्ता अुलथून पाडली परंतु त्यांनी स्थापलेली अिस्लामी धर्मसत्ता मात्र तशीच

अबाधित ठेवली ती राष्ट्रेही मुस्लिमांच्या सतत नि भयावह अुपद्रवांपासून सुटू शकली नाहीत. केवळ तीच दहा-पाच राष्ट्रे काय ती त्या काळी मुसलमानांच्या ग्रासातून मुक्त होअू शकली. अितकेच नव्हे, तर अुलट मुसलमानांचा ग्रास करू शकली की ज्यांनी त्यांच्यावरील मुसलमानांची राजसत्ता अुखडून पाडताच मुस्लिम धर्मसत्तेवरही लगोलग दारूण प्रत्याक्रमण करून आपआपले राष्ट्र धार्मिक प्रकरणीसुद्धा निर्मुस्लिम करून सोडले. ह्या अुदाहरणाच्या स्पष्टीकरणार्थ त्या काळचे अेकच अुदाहरण तेवढे अिथे देअू. ते म्हणजे स्पेनचे.

## मुस्लिमांनी पादाक्रांत केलेला स्पेन निर्मुस्लिम कसा झाला ?

हिंदुस्थानावर मुस्लिमांची आक्रमणे चालली होती. त्याच कालखंडात स्पेन देशासही पादाक्रांत करून त्या देशात अरब विजेत्यांनी ओमियेड खलिफाच्या आधिपत्याखाली अेक प्रबळ मुसलमानी राजसत्ता स्थापन केली होती. अर्थातच युरोपातील अितर भागात चालू होती तशीच मुस्लिमांची धार्मिक आक्रमणे स्पेनदेशातील ख्रिश्चनांवरही चालू होअून अनन्वित अत्याचारांचा कहर अुसळला, अगणित ख्रिश्चन स्त्री - पुरूषांना बाटविण्यात आले किंवा ठार मारण्यात आले. पुढे काही शतकांनंतर मुसलमानांतच आपापसात यादवी माजली. तेव्हा युरोपातील बळावत चाललेल्या फ्रान्ससारख्या ख्रिश्चन राष्ट्राच्या सहाय्याने आणि पोपच्या प्रबळ प्रोत्साहनाने, मुस्लिमांच्या राजकीय नि धार्मिक प्रपीडनामुळे गांजून गेलेल्या स्पेनमधील ख्रिश्चन लोकांनी आपल्या अेका जुन्या राजवंशाचे नेतृत्वाखाली मुसलमानी राजसत्तेविरूद्ध मोठे बंड अुभारले. अनेक वर्षाच्या लढायांनंतर शेवटी अिसवी सनाच्या पंधराव्या शतकात स्पॅनिश ख्रिश्चनांनी मुसलमानी राजसत्तेचा पुरा मोड करून टाकला. परंतु, हिंदुस्थानाप्रमाणेच स्पेनमध्येही मुसलमानांच्या हातून जरी राजसत्ता छिनावली गेली होती तरीही मुसलमानांनी बाटविलेल्या अगणित स्पॅनिश ख्रिश्चनांवर आणि त्यांच्या वसतीखाली असलेल्या भूक्षेत्रावर मुसलमानांनी जी अिस्लामी धर्मसत्ता स्थापलेली होती ती तशीच अबाधित राहिली होती. अितकेच नव्हे, तर स्पॅनिश राष्ट्राला पुढे-मागे दुभंगून टाकण्यासही कारणीभूत होण्याअितकी ती स्फोटक नि भयावह होती. हे संकट ज्यांना डोळ्यापुढे धडधडीत दिसत होते आणि मुसलमानांनी पूर्वी केलेल्या धार्मिक अत्याचारांचा संधी सापडताच सूड घेण्यासाठी जे नेहमीच टपलेले असत त्या स्पॅनिश ख्रिश्चनांनी मुसलमानी राजसत्तेप्रमाणेच वरील मुसलमानी धर्मसत्तेलाही धुळीस मिळविण्याचा निर्धार केला.

त्यातही ख्रिश्चन लोकांच्या पायांत काही हिंदू लोकांप्रमाणे रोटीबंदी, बेटीबंदी, शुद्धिबंदी अित्यादी 'धर्माचारांच्या' बेड्या ठोकलेल्या नव्हत्या.

त्यामुळे मुसलमानांनी बाटविलेल्या त्यांच्या आणि ख्रिश्चन स्त्री-पुरूषांना 'बाप्तिस्मा देअून' शुद्ध करून, ख्रिश्चन धर्मात परत आणण्याचे कार्य राजकीय रणात विजयी झालेल्या स्पॅनिश लोकांना मनात येताच पार पाडण्याअितके सुलभ होते. अडचण जी होती ती मुस्लिमांच्या राजसत्तेची नि शस्त्रबलाची. तिचा नायनाट होताच स्पॅनिश ख्रिश्चन लोकांनी साऱ्या स्पेन देशातून मुस्लिमधर्माचा अुच्छेद करण्यासाठी अेकच धुमाकूळ मांडला. मुसलमानांनी बाटविलेल्या सहस्त्रावधि ख्रिश्चनांना पुन्हा 'बाप्तिस्मा' देण्याची अखंड सत्रे चालू झाली. मुसलमानांकडून यत्रतत्र सशस्त्र संघर्ष होतो असे दिसताच स्पेन अधिकच चिडून गेले. स्पेनच्या ख्रिश्चन राजसत्तेने, ख्रिश्चन जनतेने प्रकट प्रतिज्ञा केली की स्पेनमध्ये मुसलमान म्हणविणारा कोणताही मनुष्य किंवा मशीद म्हणविणारे कोणतेही बांधकाम यापुढे अस्तित्वात राहता कामा नये!

स्वतंत्र झालेल्या स्पेनच्या राज्यशासनाने अेक निश्चित अवधी ठरवून दिला आणि साऱ्या राज्यभर घोषणा करविली की, या अवधीच्या आत झाडून साऱ्या मुसलमान स्त्री-पुरूषांनी अेकतर आपण होअून ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला पाहिजे, नाहीतर त्यांनी त्या अवधीमध्ये सहकुटुंब सहपरिवारे देशाच्या बाहेर नित्याचे निघून गेले पाहिजे. पण जे कोणी मुसलमान त्या अवधीत ख्रिश्चनही होणार नाहीत किंवा देशही सोडणार नाहीत त्या सर्व मुस्लिम स्त्री-पुरूषांचा अेकजात शिरच्छेद करण्यात येअील!!

काय म्हणता ? कोण घोर ही ख्रिश्चन राजाज्ञा ? होय! पण हेही ध्यानात ठेवा की, स्पेनला जेव्हा मुसलमानांनी जिंकले तेव्हा त्यांनी ह्याहून्ही अघोर असे अत्याचार ख्रिश्चन जनतेवर तेथे बळाने धर्मांतर घडवून आणण्यासाठी केलेले होते.

त्या वेळी ख्रिश्चन रक्ताचे पाट मार्गोमार्गी मुसलमानांनीही वाहविले होते! आज मुसलमानी रक्ताचे पाट मार्गोमार्गी ख्रिश्चन वाहविणार होते. वर दिलेला अवधि संपताच स्पॅनिश ख्रिश्चनांनी ठिकठिकाणी अुठाव करून स्पेनमध्ये अुरलेल्या मुस्लिमांचे, त्या अिस्लामी स्त्री-पुरूषांचे, आबाल-वृद्धांचे सरसकट, शिरकाण केले. मुस्लिम रक्तात न्हाअून स्पेनचे ख्रिश्चन चर्च 'शुद्ध' झाले! स्पेन निर्मुस्लिम झाले म्हणून स्पेन 'स्पेन' राहिले! त्याचे 'मोरक्को' झाले नाही! मुसलमानांची तीच दुर्दशा पोलंड, सर्व्हिया, बल्गेरिया, ग्रीस अित्यादी ख्रिश्चन देशांत होअून त्या त्या देशांनी मुसलमानी राज्याच्या नि धर्माच्या पंजाखाली पिचलेले आपले देश स्वतंत्र करून निर्मुस्लिम करून टाकले.

# प्रकरण ८ वे

# पूर्वार्धाचा समारोप

या सर्व पूर्वाधात जी अनेक विधेये चर्चिली गेली आहेत त्या चर्चेचा मुख्य आशय ह्या समारोपात संक्षिप्त अेकसूत्रीपणे असा सांगता येअील की.....

अैतिहासिक काली अितर कोणत्याही महान राष्ट्राप्रमाणे भारतावरही मुख्यत: यवन, शक नि हूण या परकीय म्लेंच्छांची जी सशस्त्र नि भयंकर आक्रमणे झाली आणि ज्यांच्याशी भारताला शतकानुशतके झुंजावे लागले त्या सर्व म्लेंच्छ-आक्रमणांचा समरांगणात शेवटी पूर्णपणे पराभव करून हिंदुस्थानने त्यांच्या राजसत्तेचा समूळ अुच्छेद केला आणि आपले राजकीय स्वातंत्र्य पुन्हा पुन्हा प्रस्थापित केले अितकेच नव्हे, तर यवनशकहूणादि म्लेंच्छराष्ट्रांच्या ज्या लक्षावधि लोकांनी त्या त्या राजकीय संघर्षाच्या काळात हिंदुस्थानातील अनेक प्रांत व्यापून टाकून नित्याचीच वसती केली होती त्यांना आपल्या वैदिकधर्माची, देवदेवतांची, संस्कृत-संस्कृतीची दीक्षा देअून आपल्या समाजात अितके पूर्णपणे संव्यवहार्य करून घेतले की, त्यांच्या मूळच्या म्लेंच्छीय गोत्रांचाच काय, पण नावाचासुद्धा त्याग करून आमच्या हिंदुजातीत ते बहुतांशी स्वेच्छेने नि पूर्णपणे अेकरस नि अेकजीव होअून गेले.

परंतु मुसलमानी आक्रमणाचे 'अभूतपूर्व संकट' जेव्हा हिंदुस्थानवर कोसळले, तेव्हा त्या संकटाला हाणून पाडण्यासाठी अेक सहस्त्र वर्षे हे हिंदुराष्ट्र त्या मुस्लिम आक्रमकांशी जरी झुंजत राहिले आणि शेवटी मुस्लिमांनी हिंदुस्थानात स्थापिलेली अिस्लामी राजसत्ता जरी यवनशकहूणादि परकियांच्या सत्तेप्रमाणे अुखडून टाकून हिंदूंनी आपले राजकीय स्वातंत्र्य पुन्हा प्रस्थापित केले, तरी मुस्लिमांच्या धर्मसत्तेखाली गेलेले हिंदूंचे संख्याक्षेत्र आणि मुसलमानांच्या त्या वसतीखाली मुस्लिमांनी बळकावून टाकलेले भूक्षेत्रही सोडवून यवन, हूण शकादींचे केले तसे मुसलमानांचे संपूर्ण हिंदूकरण ते त्याकाळचे हिंदू का करू शकले नाहीत?

या ग्रंथाच्या आरंभी प्रस्ताविलेल्या वरील मुख्य प्रश्नांची चिकित्सा अैतिहासिक आधारे ह्यावरील पूर्वार्धात मुख्यत: केलेली आहे. त्या त्या काळच्या परिस्थितीप्रमाणे केलेल्या ह्या अैतिहासिक चिकित्सेचा निष्कर्ष असा आहे की मुसलमानांची राजसत्ता अुलथून पाडताच किंवा पाडीत असता ज्या अनेक अनुकूल संधी सापडल्या त्या त्या वेळी शस्त्रबळाने बलवत्तर असताही आणि राजकीय क्षेत्रात मुसलमानांची धूळधाण अुडवून दिली असताही हिंदुजनतेने किंवा हिंदुराज्यमंडलाने अत्याचारी मुसलमानांनी स्थापिलेल्या धर्मसत्तेवर प्रत्याचारी प्रत्याक्रमण केले नाही. झाडून साऱ्या मुसलमानांना, अवश्य तर बळाने सुद्धा, हिंदू करून घेतले नाही!

पूर्वी जसे यवनशकहूणादि पादाक्रांत परराष्ट्रीयांना ते स्वधर्मात येअू पाहताच त्या काळच्या हिंदुजगताने सहासन-सहवास-सहविवाहादि सामाजिक जीवनाच्या सर्व अुपांगात, पात्रापात्रविवेक न सोडताही सामावून घेतले, त्याचप्रमाणे मुसलमानांची हिंदुस्थानातील राजसत्ता आपल्या पराक्रमाने पादाक्रांत करून टाकताच जर त्या काळच्या विजयी हिंदुजगताने, रोटीबंदी, बेटीबंदी, शुद्धिबंदी, सिंधुबंदी अित्यादी सामाजिक रूढींच्या बेड्या ताड ताड तोडून टाकून यच्चयावत् मुसलमानांना शुद्ध करून हिंदुसमाजाच्या त्या काळच्या जातिपरंपरेत पात्रापात्रविवेक न सोडता, सामावून घेतले असते तर त्याच काळी हे हिंदुस्थान, स्पेनप्रमाणेच निर्मुस्लिम होअून गेले असते; 'हिंदूंचे स्थान' अशा अगदी अन्वर्थकपणे हिंदुस्थान झाले असते.

ह्या ग्रंथात साधारणत: अिसवी सन ७०० ते अिसवी सन १८०० पर्यंतच्या कालखंडातील मुसलमानांच्या हिंदुस्थानावर झालेल्या आक्रमणांच्या आणि त्यामुळे सतत चाललेल्या हिंदु-मुस्लिम महायुद्धमालिकांच्या अितिहासाची चिकित्सा केलेली आहे. अर्थातच त्या चिकित्सेतील विधानांचा संबंध त्या कालखंडातील परिस्थितीलाच काय तो लागू आहे. अशी अैतिहासिक समालोचने वाचताना वाचकांनी हे नेहमीच ध्यानात ठेवले पाहिजे की, त्या अैतिहासिक परिस्थितीत देशकालपात्राच्या अनुषंगाने जे कृत्य अवश्य, अिष्ट वा हितावह ठरले असते किंवा ठरण्यासारखे होते ते अन्य परिस्थितीतही किंवा अन्या कालखंडातही

तसेच अवश्य, अिष्ट अथवा हितावह ठरतेच असे नाही. अितकेच नव्हे, तर क्वचित ते देशकालपात्रभेदांनी अनावश्यक, अनिष्ट नि अहितकारकही ठरू शकेल. मग तो राजकारणातील प्रश्न असो, धर्मकारणातील असो किंवा जीवनातील अितर अेखाद्या क्षेत्रातील असो. राजकारणात नि धर्मकारणात मुरलेल्या समर्थ रामदास स्वामींनी त्यांच्या खालील ओवींमध्ये हेच मर्म निक्षून सांगितलेले आहे -

**समयासारखा समयो ये ना ।**
**नेम अेकाचि चालेना ।**
**नेम धरिता राजकारणा ।**
**व्यत्ययो घडे ।।१।।**

## पूर्वार्ध समाप्त

# सोनेरी पान पाचवे

## (अुत्तरार्ध)

### प्रकरण १ ले

## विषयानुबंध

हिंदुराष्ट्राच्या अितिहासातील 'सहा सोनेरी पाने' हा जो ग्रंथ आम्ही लिहीत आहो, त्याच्या प्राचीन अितिहासाच्या, पूर्वीच प्रसिद्ध झालेल्या पहिल्या भागाच्या आरंभी आम्ही ह्या ग्रंथाची रूपरेषा अवश्य तितकी आखली आहे. त्यात वर्णिल्याप्रमाणे आम्ही आता ह्या दुसऱ्या भागाचा अुत्तरार्ध लिहिण्यास आरंभ करीत आहोत.

आताच संपविलेल्या पूर्वार्धात हे स्पष्ट केले आहे की, मुसलमानांशी हिंदूंचा जो धार्मिक आणि राजकीय अशा दोन प्रचंड आघाड्यांवर शतकोशतके युद्धसंघर्ष चाललेला होता, त्यातील धार्मिक आघाडीवर मुसलमानांच्या आक्रमणांचा पूर्ण प्रतिकार करून त्यांचा पाडाव करण्याअितकी हिंदूंची धार्मिक समरनीती सबळ नव्हती. अितकेच नव्हे, तर मुसलमानांच्या त्या धार्मिक आघाडीच्या राक्षसी समरनीतीपुढे ती हिंदूंची धार्मिक समरनीती अगदी दुर्बल नि आत्मघातक ठरली. कारण आततायी शत्रूच्या नीतीहून अधिक कठोर, क्रूर नि धारदार अशी समरनीती ज्याची असेल तेच राष्ट्र त्या शत्रूचा पाडाव करू शकते, हे कोणत्याही स्वरूपातील युद्धाचे मुख्य धोरण असावे लागते, ही गोष्ट हिंदुराष्ट्र धार्मिक आघाडीपुरते तरी त्या काळी पार विसरून गेले होते.

अगदी वैदिक नि पौराणिक काळी आपल्या हिंदुराष्ट्राच्या त्याकाळच्या पूर्वजांना ज्या दैत्य, दानव, राक्षस अित्यादी अघोरी, मायावी, क्रूर, अगदी नरमांसभक्षक अशा शत्रूंशी लढावे लागले, त्या त्या शत्रूंहून स्वतः ते आपले त्या वेळचे पूर्वज देव, सम्राट, युद्धस्तोत्रांचे अुद्गाते, वैदिक ऋषी किंवा पौराणिक महाकाव्यकार, हे युद्धात सक्रिय भाग घेणारे आपले सर्व पूर्वजही त्या राक्षसादि शत्रूंहून अधिक अघोरी, अधिक मायावी, अधिक क्रूर, राक्षसांहूनही सवाअी राक्षस, धार्मिक समरांगणात बनू शकले ; तसतसे युद्धधोरण आखू शकले, आचरूही शकले, ह्यामुळेच त्या त्या काळी त्या त्या युद्धात आपले पूर्वज यशस्वी होत गेले आणि आपले राष्ट्र अधिकाधिक प्रबळतर नि विस्तारशील होत गेले हे वेदकाळच्या किंवा पौराणिक काळच्या कथांतून दिसून येते.

त्या वेळेस राजकीयच नव्हे, तर धार्मिक आघाड्यांवरही शत्रूंशी सामना द्यावा लागे. श्रीरामाला ऋषींचे रक्षण करण्यासाठी विश्वामित्राने जेव्हा वनात नेले तेव्हा राक्षसांनी आमच्या त्या वेळच्या यज्ञयागादि धर्मकृत्यांचा केवढा विध्वंस मांडला होता, आमच्या ऋषिकन्यांचे कसे अपहरण केले जाअी, ते ते वर्णन करून सांगितले आहे. पुढे दंडकारण्यात तर श्रीराम गेले असता रावणाच्या राक्षस सैन्याने तेथील अल्पसंख्य ऋषींच्या आश्रमांची, यज्ञयागांची, अुपनिवेशांची आणि प्राणांची कोण दुर्दशा अुडवून दिली होती ती रामचंद्रास सांगितलेली आहे. आणि ऋषींच्या रक्तमासांना त्या नृशंस राक्षसांनी खाअून पिअून जी त्यांची हाडके फेकून दिली होती त्या अस्थींचे ढीगचे ढीग ठिकठिकाणी पडलेले दाखवून दिले. यावरूनच स्पष्ट होअील की, राक्षसांचा आपल्या पूर्वजांशी दीर्घकाल झोला पौराणिक काळचा संघर्ष धार्मिक आघाडीवरही होता आणि तेव्हा धार्मिक युद्धआघाडीवरही राक्षसांच्या क्रौर्यास हाणून पाडणारे सवाअी क्रौर्य, राक्षसास जिंकण्यास सवाअी राक्षस बनणे, हे देवही आणि ते देवतुल्य सम्राटही आमच्या धर्माचे अेक पवित्र कर्तव्य मानीत, याची चर्चा या पुस्तकात पूर्वीही केलेली आहे तरीही निर्देशासाठी अिथे अितका अुल्लेख केला तरी पुरे आहे की अगदी भक्तसंप्रदायी प्रल्हादाचे संरक्षण करण्यासाठी जो नृसिंहाचा अक्राळविक्राळ अवतार प्रकट झाला आणि ज्याने आमच्या धर्माचा द्वेष करणाऱ्या हिरण्यकश्यपूचे आपल्या सिंहीय नखाग्रांनी पोट फाडून आतडी बाहेर काढली, तो नृसिंह आमच्या राष्ट्राचे दैवत होता, पुढारी होता. कचाच्या आख्यानासारखी आख्यानेही हेच दाखवितात की देवांनी युद्धामध्ये -

**‘व्रजन्ति ते मूढधियः पराभवं ।**
**भवन्ति मायाविषु ये न मायिनः ।’**

हेच धोरण धर्म्य मानलेले असे. कपटी शत्रूंशी सवाअी कपटाने, क्रूर शत्रूंशी सवाअी क्रौर्याने लढणे हाच अशा शत्रूंना निर्दाळण्याचा अेकमेव मार्ग होय, हे धार्मिक युद्धातूनही पौराणिक काळच्या अंतापर्यंत तरी आमच्या पूर्वजांचे अभिमानास्पद धार्मिक युद्धसूत्र असे.

तथापि, जेव्हा देवादेवात किंवा आपल्या आपापसांतील जातीत युद्धे जुंपत-जशी कौरव-पांडवांत, तेव्हा, तेव्हांची, युद्धनीती ही अगदी निराळ्या प्रकारची होती. कोण्या अेका रथ्यावर अनेक रथ्यांनी तुटून पडू नये, शरण आलेल्यास जीवदान द्यावे, अितका बारिक न्यायान्यायविवेक प्रत्यक्ष रणावरही आचरला पाहिजे, असे सांगणारी युद्धनीती अुपदेशिली जाअी, कारण, ती अुदार युद्धनीती युद्धातील अुभय पक्ष मानीत असत.

परंतु पौराणिक काल संपून आम्ही सांगितल्याप्रमाणे, जेव्हा आपला अितिहासकाल चालू झाला तेव्हापासून आपल्या हिंदुस्थानावर पारसिकांची, यवनांची, ग्रीकांची, शक-कुशाणांची, हूणांची अित्यादी जी लहानमोठी परचक्रे चालू झाली ती सर्व मूलतः धार्मिक शत्रुत्वाने झालेली नव्हती. त्यांचा मूळ आणि केवळ, हेतु राजकीय सत्ता हाच होता. त्यांचा स्वतःचाच धर्म न्यूनाधिक प्रमाणात वैदिक धर्माच्याच अुपांगाप्रमाणे होता. पुढे तर ते सर्व आक्रमक आपणां हिंदूंकडून पराभूत झाल्यानंतर त्यांच्यापैकी जे लक्षावधि लोक हिंदुस्थानातच राहिले ते हिंदुराष्ट्रातच पूर्णतः सामावून गेले. अशा परिस्थितीत त्या अैतिहासिक काळात त्या परकीय आक्रमकांचा आपल्या धर्मावरही कोणचाही घाला पडला नसल्यामुळे त्यांच्याशी झालेल्या केवळ राजकीय युद्धात आपल्या पूर्वजांनी जशास तसे अशीच नीती अवलंबून त्या त्या डावपेचांनी त्यांना अंती चारी मुंड्या चीत केले. ती युद्धे केवळ राजकीय असल्याने तिथे आत्यंतिक दया, माया, सत्य, अहिंसा अित्यादी धर्माधर्मादि भावनांचा वा तत्वांचा, धार्मिक स्वरूपाचा कोणताही प्रश्न मूलतः संभवत नव्हता. त्यामुळे कोण्या परधर्मीय शत्रूने आपल्या धर्मावर सशस्त्र आक्रमणे केली असता त्यांचाही प्रतिकार राजकीय आक्रमणाप्रमाणेच जशास तसे, क्रौर्यास सवाअी क्रौर्य, कपटास सवाअी कपट, हिंसेस सवाअी हिंसा आचरून करणे हेच धर्म्य आहे, शूरांचे कर्तव्य आहे. ही जी वृत्ती, तिचा अुपयोग करण्याचा प्रसंग राक्षसादींशी झालेल्या धार्मिक युद्धानंतर शतकानुशतके न आल्यामुळे आपल्या राष्ट्रीय मानसात निश्चेतन होअून पडली.

त्यातही त्याच मध्यंतराच्या काळात आजीवक, जैन, बुद्ध अित्यादी वैदिक धर्मातूनच फूटून निघालेल्या संन्यासप्रवण नि आत्यंतिक अहिंसाप्रधान धर्ममतांनी अहिंसा, दया, माया, हाच काय तो खरा धर्म आहे, अशी शिकवणूक समाजास दिली. अुरलेल्या वैदिकांमध्येही वर्णभेदातूनच जातिभेदाच्या, खाण्यापिण्याच्या, स्पर्शास्पर्शाच्या, समाजातल्या व्यावहारिक अेकजीविताचीही खांडोळी करणाऱ्या धार्मिक रूढी बळावून त्यांनाच व्यावहारिक धर्म म्हणून समजण्यात येअू लागले. पुढे पुढे तर आपल्या यज्ञयागातही मांसभक्षण निषिद्ध ठरविले गेले. सत्यादि सद्गुणांची आत्यंतिक रूपेही बहुधा दुर्गुणच ठरतात ही जाणीवसुद्धा आपल्या त्या काळच्या धर्मसमजुतीत लोपून गेली, आणि तसा राष्ट्राचा आत्मघात करणारा सद्गुणांचा आंत्यंतिक, अप्रासंगिक आणि आत्मघातक अवलंब मोठा पुण्यतम सद्गुण समजण्यात येअू लागला. साधरणतः सत्य तेच वदावे हा सद्गुण हे ठीक; मान्य केलेले दान किंवा वचन पूर्ण करावे, हा सद्गुण हेही ठीक; पण या सद्गुणाची बढाअी करता करता, आणि करण्यासाठी, हरिश्चंद्राने विश्वामित्र ऋषीला स्वप्नामध्ये, ‘‘माझं राज्य मी तुला देतो’’ म्हणून, दिलेले वचन नि दान, जागे झाल्यानंतरही, खरे करण्यासाठी, विश्वामित्र ऋषीला, आपल्या राष्ट्राचे राज्य त्याने देअून टाकले आणि म्हणून, ते कृत्य सत्याच्या सद्गुणाचे अुत्कृष्ट अुदाहरण होय. अशा आत्यंतिक ‘सद्गुणांच्या’ बाष्कळ कथा पुराणांतून वर्णन करून राष्ट्रीय युद्धनीतीला भाबडट, मेंगळे नि आत्मघातक वळण देण्यात आले, याची, मात्र निंदा करावी तितकी थोडीच. सत्याचा जसा हा राष्ट्रद्रोही अतिरेक पूजनीय ठरला त्याहूनही अहिंसेच्या अतिरेकाचा सर्वोत्तम सद्गुण म्हणून जो आचारधर्म त्या काळच्या बहुतेक जैन, बौद्ध, काही अंशी वैष्णव ग्रंथातही गौरविला आहे आणि अुपदेशिला आहे, त्याने तर आमच्या मुसलमानादि शत्रूंनी आमचा पुढे घात केला नसेल,

अितका भयंकर घात, आमचा आम्ही, आधीच करून घेतलेला होता. पौरुष, पराक्रम हे दुर्गुणातले दुर्गुण समजून अधर्म्य मानले जाअू लागले. आणि जो जितका पौरुषहीन, पराक्रमशून्य, राष्ट्रीय अन्यायाचा सवाअी सूड घेण्याची शक्ती तर राहोच, पण अिच्छाही अंगी नसलेला बुळगा तो तितका धार्मिकदृष्ट्या मोठा महंत, संत, मुक्त, महात्मा असे आमच्या धार्मिक व्यवहारात मानण्यात येअू लागले.

या विषयाचा अवश्य तितका सविस्तर खल पूर्वार्धात 'सद्गुण-विकृती' अित्यादी प्रकरणातून सोदाहरण आणि साधार करण्यात आलेलाच आहे; आणि या अुत्तारार्धातही अनेक राजकीय आघाडीवरील वर्णनात तो न सांगता होणारच आहे. येथे हा अुल्लेख येवढ्यासाठीच केला की, पौराणिक कालानंतरच्या आमच्या राष्ट्रावर झाली परकीयांची सर्व आक्रमणे राजकीय स्वरूपाचीच काय ती असल्याने आणि आमच्या धर्मासच अुच्छेदिणारी सशस्त्र आक्रमणे आमच्यावर राक्षसकाळानंतर मोठ्या प्रमाणावर मुळीच झालेली नसल्यामुळे तशा धार्मिक सशस्त्र आक्रमणांचा प्रतिकार करणारी युद्धनीती आम्ही पार विसरून गेलो होतो. सद्गुणांची नि धर्माची आमची व्यावहारिक व्याख्या आणि आचारही पार पालटून गेले होते. त्यांची नरसिंहावताराची जशास तशी अुग्र धर्मयुद्धनीती पालटून ती शाकाहारी; गवतखाअू, सहिष्णु आणि कोडगी झालेली होती.

त्यामुळे पूर्वार्धात आवश्यक तितक्या सविस्तरपणे वर्णन केल्याप्रमाणे मुसलमानांनी जेव्हा त्या काळात आमच्या धर्मावरही त्या पौराणिक काळाच्या राक्षसांहूनही अत्युग्र, हिंसक नि सशस्त्र आक्रमण केले तेव्हा आमच्या त्या सन सातशेच्या कालखंडातील पूर्वजांनी हिंदूंची त्या काळची जी मेंगळी, धर्मरक्षक नीती होती तिनेच त्या मुसलमानांच्या आक्रमणाला तोंड दिले. सापाला दूध पाजणाऱ्या त्या अतिरेकी, भाबडी, आत्मघातक आणि स्वधर्मरक्षणास असमर्थ असणाऱ्या, तथापि स्वत:स स्वधर्मरक्षक समजणाऱ्या धार्मिक आचारनीतीनेच तोंड देण्याचा प्रयत्न केला. लांडग्याशी लढण्यासाठी शेळीने आपली मान आपणहून पुढे केली. हे सर्व पूर्वार्धात विशद केलेले आहेच. त्यामुळे धार्मिक आघाडीवर आमची जी प्रचंड हानी झाली तीही वर्णिलीच आहे. म्हणून आता धार्मिक आघाडीवरील मुसलमानांशी झालेल्या सशस्त्र संघर्षाचा विषय आटोपता घेअून त्यांच्याशी झालेल्या राजकीय आघाडीवरील महायुद्धाच्या समीक्षणाचा अुत्तरार्ध प्रारंभ करू.

# प्रकरण २ रे

# हिंदुस्थानचे नि अरबांचे पूर्वापार संबंध

हरिवंशादि अुपपुराणांपैकी अेका अुपपुराणामध्ये मौलपर्वाची कथा आलेली आहे. त्यातील 'मुसल' शब्द माझ्या अगदी विद्यार्थिदशेत मी जेव्हा वाचला आणि त्या समुद्रकाठची मोठमोठी शेवाळी यादवांनी आपसात लढण्यासाठी अुपटताच त्यांची मोठमोठाली 'मुसळे' होअून त्यांचाही अुपयोग यादवांनी अेकमेकांना झोडपून काढण्यात मारक शस्त्रासारखा केला ह्या तेथील वर्णनाचा जेव्हा मला अचंबा वाटू लागला तेव्हा, मला अकस्मात् सुचले की, हा 'मौसल' शब्द मुसल शब्दापासून पौराणिकांच्या अद्‌भुत रूपकांच्या परंपरेप्रमाणे त्या मुसल शब्दावर केलेली अेक कोटी असावी आणि त्या सौराष्ट्र-गुजराथच्या सिंधुतीराला व्यापारासाठी अगदी प्राचीन काळापासून येणाऱ्या जाणाऱ्या आज ज्यांना आपण 'अरब' म्हणतो, त्या देशांतील लोकांनी मुसलमानी धर्म स्वीकारल्यानंतर त्यांना मिळालेल्या 'मुसलमान' ह्या नावावरून सुचली असावी, असे मला वाटू लागले. परंतु या शंकेला कालाचा किंवा अितर घटनांचा कोणताही आधार तेव्हा मिळण्यासारखा नव्हता.

त्यानंतर अंदमानात असताना, मी बंगाली वाङ्‌मय जेव्हा पुष्कळसे वाचू लागलो तेव्हा, मला आज असे आठवते की, बंगालचे सुप्रसिद्ध अमित्राक्षर छंदाचे प्रवर्तक आणि मेघनाद काव्याचे कर्ते श्रीयुत मधुसुदन दत्त यांनी किंवा वंदेमातरम् राष्ट्रगीताचे कवि बंकिमचंद्र यांनी भगवान श्रीकृष्णाच्या देहोत्सर्गासंबंधी कोणता तरी अेक निबंध लिहिला आहे, त्यात भगवंताच्या देहावसानानंतर बलराम आपले मूळचे शेषाचे रूप घेअून समुद्रात आपल्या अनुयायांसह निघून गेले, अशी जी कथा आहे, तिचे त्यांनी अेक संभवनीय स्पष्टीकरण असे केले की, आपल्या अनुयायांसह नौयानांच्या समूहातून बलराम हे द्वारकेजवळील पश्चिम समुद्रात शिरले आणि कोणत्या तरी परद्वीपांत नौकांच्या सर्पाकार व्यूहाने समुद्रमार्गे निघून गेले. या अर्थाशी जुळेल अशी आणखी अेक वस्तुस्थिती अेका आर्यसमाजी प्रचारकाच्या प्रवासवृत्तात मी जी वाचली होती, ती मला आठवली. ती अशी की, हे आर्यसमाजी गृहस्थ न्यूनाधिक आजपासून पन्नास अेक वर्षामागे अरबस्थानातील हिंदुप्रवाशांची काय स्थिती आहे, हे पाहण्यास गेले होते. तेथे त्यांना शोध करता, असा अेक लहानसा गट आढळला की, ते लोक शेंडी ठेवीत असत. त्यांनी सांगितले की, आमच्यात जी अेक पूर्वापार दंतकथा पवित्र भावनेने आमचे वाडवडील सांगत आलेले आहेत तीवरून आम्ही केव्हातरी अगदी पुराणकाळी भारतातून अिकडे आलेले आहोत. भारतात अेक महायुद्ध झाले होते. त्यावेळेस आम्ही तो देश सोडून समुद्रमार्गे अिकडे येअून नवीन अुपनिवेश (वसाहत) स्थापिला. त्यानंतर अिकडच्या कोणत्याही अुलाढालीत येथील लोकांच्या भानगडीत आम्ही पडलो नाही. म्हणून अजून आपल्या मूळच्या स्वरूपात आम्ही टिकून आहोत. ह्यावरून त्या प्रवाशांनी जो तर्क केला की ते लोक महाभारताच्या शेवटी केव्हातरी अिकडे आलेले हिंदूच असावेत.

ह्या काही विधानांवरून जर हे गृहीत धरले की यादवांना बलरामाच्या नेतृत्वाखाली अेक मोठा नवीन अुपनिवेश अरबस्थानात जाअून तिथे निवसला, तर आणखी अेक-दोन गोष्टी त्या तर्काला पुष्टी देतात. पहिली ही की तामिळ भाषेला तिचे मुळचे नाव 'अरवी' हे आहे आणि अरबस्थानाच्या मूळच्या लोकांत जो लिंगपूजाप्रधान शैवधर्म प्रचलित होता असे अनेक अैतिहासिक मानतात, त्या धर्माच्या पुजाऱ्यांना द्रुअिड (द्रविड) म्हणून अिंग्लिशमध्ये म्हणतात. हाच द्रुअिड पुजारीवर्ग प्राचीन ब्रिटन नि आयर्लंडमध्ये विद्यमान असल्याच्या परंपरागत दंतकथा अितिहासकार सांगतात.

ह्या सर्व दंतकथा आणि अशाच याविषयीच्या अितर अैतिहासिक दंतकथा विस्ताराने सांगत बसण्याचे हे स्थळ नव्हे. त्यावरून 'अरबस्थान'चा आणि भारताचा पूर्वापार अगदी पुराणकाळापासून निकटचा संबंध असावा आणि त्या द्वीपकल्पातही भारतीय अुपनिवेश स्थापन झालेले असावेत. पूर्वसमुद्रातील जावा प्रभृति भूप्रदेशांप्रमाणेच पश्चिम समुद्रातील ह्या, आज ज्याला अरबस्थान अित्यादी नावे पडलेली आहेत, त्या प्रदेशातही विशेषतः दक्षिण भारतीयांची वसति, राज्ये, संस्कृती तेथे नांदत असावी, असे अनुमान काढता येअी. पण अिथे आम्ही कोणत्याही प्रकारे तो सिद्धांत

म्हणून अद्याप मांडू शकत नाही. केवळ त्याला सुचविणारी अनेक विभिन्न गमके तेवढी संक्षेपाने सांगून टाकली आहेत. अितर कोण्या संशोधकाचे चित्त या प्रश्नाकडे आकर्षित झाल्यास त्यांना अुपयोगी पडाव्यात, या दृष्टीने आम्हांस महत्वाच्या वाटणाऱ्या वरील सूचना टिपून ठेवलेल्या आहेत.

या ग्रंथाशी लागू असणारा अर्वाचीन काळातील हिंदुस्थानचा आणि अरबस्थानचा संबंध त्या काळी काय होता, तेवढ्यापुरते काय ते येथे पाहिजे. तो काळ म्हणजे त्या अरबांनी मुसलमानी धर्म स्वीकारल्यानंतरचा म्हणजे सातव्या शतकातला होय. मुसलमानी धर्माचा जन्मच अि.स. ५७० मध्ये महंमद जन्मला त्यानंतर झाला.त्यातही प्रत्यक्ष अरबस्थानात अरब लोकांनी मोठ्या प्रमाणात तो धर्म स्वीकारण्यास चाळीस-पन्नास वर्षे लागली. त्यांच्या आपसात याच प्रश्नावर लढाया झाल्या. तरीही साधारणतः मुसलमानांचा पळपुटा हिजरी सन अिसवी सनाच्या ६२२ मध्ये चालू झाला तेव्हापासून मुसलमानी धर्माचा आरंभ ते धरतात, तोच आपणही धरू.

त्याकाळी हे नवे आक्रमक मुस्लिम अरब लोक अरबस्थान सोडून प्रथम त्यांच्या शेजारच्या अिराणी साम्राज्यावर तुटून पडण्याचे आधीही हिंदु लोकांची राज्ये सिंधुनदीच्या पलीकडे हूणांचा नाश केल्यानंतर पुन्हा जवळजवळ चंद्रगुप्ताच्या काळच्या सीमांपर्यंत कशी पसरली होती, याचा त्या काळच्या अेका प्रख्यात त्रयस्थाचाच पुरावा आधारभूत धरू. ह्युएनत्संग हा चिनी प्रवासी अि. सन. ६२९ च्या संधीस हिंदुस्थानात वायव्येकडून जेव्हा आला तेव्हा त्याने केलेल्या चक्षुर्वैसत्यम् वर्णनाप्रमाणे हिंदुराज्याची वायव्य सीमा आज ज्याला काबूल, गझनी, कंदाहार असे म्हणतात त्या सर्व प्रदेशाला व्यापून अुरलेली होती. त्या काळी भारतात येणारे बहुतेक चिनी यात्रिक मध्यआशियातून याच हिंदुराज्यातून सिंधु ओलांडून हिंदुस्थानात येत.

हिंदु लोकांना चीनमध्ये त्या वेळी ‘शिन्त्सु’ असे संबोधीत

यामुळेच हिंदुस्थानला ते हिंदूंच्या प्राचीनतम सिंधु ह्या नावानेही निर्देशीत. म्हणूनच ते हिंदु लोकांना चीनमध्ये ‘शिन्त्सु’ असे संबोधीत. ह्या शिन्त्सु शब्दाचे हे रूप ‘सिंधु’ ह्या शब्दाचा चिनी अपभ्रंश आहे, हे अुघड आहे. हे हिंदु शब्दाची अुत्पत्ती मूळ सिंधु शब्दापासून आहे. या विधानाचा अगदी तत्कालीन हाही अेक चीनकडचा भक्कम पुरावा आहे.

## सिंधमधील हिंदूंवर अरबी मुसलमानांनी केलेली पहिली स्वारी आणि तीत हिंदूंनी केलेला अरबांचा सपशेल पराभव

आजच्या बहुतेक अितिहासातून अरबांची हिंदूंवरील पहिली स्वारी म्हणजे दाहीर राजावरची स्वारी आणि जीत हिंदूंचा पूर्ण पराभव झाला, ती होय असे अुल्लेखिले जाते. पण ही गोष्ट धादान्त खोटी आहे. अरबांची सिंधवरील पहिली स्वारी जी झाली ती सन ६४० मध्ये आणि तीत अरबांचा हिंदूंनी सपशेल पराभव करून त्यांचा सेनापती कसा ठार मारला होता, हे या भागात दिलेलेच आहे.

## अरब मुसलमानांची
## सिंधवर दुसरी मोठी स्वारी

परंतु अिसवी सन ७११ मध्ये, मात्र महमद कासीम नावाच्या अरबी मुसलमान सेनापतीने पन्नास सहस्त्र सैन्य समवेत घेअून हिंदुस्थानच्या सिंध प्रांतावर दुसरी मोठी चढाअी केली. ह्या वेळी महाराजा दाहीर हा हिंदु राजा सिंधवर राज्य करीत होता. त्याने महंमद कासीमशी मोठा निकराचा लढा दिला. पण त्यात महाराज दाहीरचा कसा पराजय झाला ते सर्व वर्णन या भागात केलेलेच आहे.

पण, त्यानंतर न्यूनाधिक पन्नास वर्षांच्या आतच, राजपुतांच्या आणि विशेषतः वीरवर बाप्पा रावळ ह्या, चितोडच्या पुढाऱ्याने आणि राण्याने सिंधमधल्या मुसलमानांपासून ते हिंदुराज्य छिनावून घेतले. अितकेच नव्हे, तर ह्या चितोडच्या महाराणा बाप्पाने आणि अितर हिंदु राजांनी आपापली सत्ता शक्य तो पुढे पुढे रेटीत शेवटी पुन्हा पारियात्र पर्वत म्हणजेच हिंदुकुश पर्वताच्या शिखरापासून तो काश्मीर, ‘गांधार’ ज्यास आपण आज अफगाणिस्तान म्हणतो ते, आणि अितर तिकडचे प्रदेश मिळून थेट सिंधुसागरपर्यंत (म्हणजे ज्यास आपण आज अरेबियनसमुद्र ह्या बहिष्कृत नावाने निर्लज्जपणे

संबोधितो तिथपर्यंत) हिंदुसत्ता पुनरपि राज्य करू लागली होती. ती हिंदु राजसत्ता हिंदुकुशपर्यंत त्यापुढे तीनशे वर्षे टिकून होती.

## तीनशे वर्षे म्हणजे न्यूनाधिक सात-आठ पिढ्या तरी होतातच होतात.

अितका दीर्घ काळ आपली हिंदुंची राज्ये सिंधुपार नांदत असता आणि सिंध तर अेका पंचवीस-तीस वर्षांच्या आत हिंदूंनी पुन्हा जिंकलेला असता बहुतेक अिंग्लिश आणि हिंदू अितिहासकार या वस्तुस्थितीचा अुल्लेखसुद्धा करीत नाहीत. आणि असल्या अत्यंत निराधार समजुतीवर हे वाक्य की, 'कासीमने सिंध जिंकला तेव्हापासून मुसलमान जे हिंदुस्थानमध्ये घुसले ते थेट रामेश्वरपर्यंत अेका दमात जाअून पोचले, आणि हा सारा काळ जणू काय सन ७११ पासून तो अिंग्रजांच्या हातून हिंदुस्थानची राजसत्ता जाअीपर्यंत हजार-बाराशे वर्षे हिंदु हे परदास्यात सारखे खितपत आहेत,' हे अितके असत्य तितकेच हिंदूंना अपमानकारक असणारे वाक्य बहुतेक मोठमोठे अितिहासकार, साहित्यिक आणि जगातील नामांकित प्राध्यापकांपासून तो आमच्या अिकडील शाळेतील पोरासोरापर्यंत जे घोकत आलेले आहेत ते आमच्या अितिहासाचे असह्य विडंबन आहे !

हे विडंबन आता यापुढे तरी आपल्या शालेय अितिहासापासून तो साहित्यिक अितिहासापर्यंत सर्व अितिहासग्रंथांतून कोणत्याही सत्यनिष्ठ लेखकाने कटाक्षाने टाळलेच पाहिजे, आणि पूर्वीचे वर दाखविलेले निव्वळ खोटे नि हिंदूंना अपमानकारक असणारे अुल्लेख अितिहासातूनच मुळासकट खोडून टाकले पाहिजेत.

## ही तीनशे वर्षे

कारण, ही तीनशे वर्षे, म्हणजे अिसवी सनाच्या अेक हजाराव्या वर्षापर्यंत हिंदुस्थानवर अगदी हिंदुकुशापासून तो सिलोनपर्यंत आणि पूर्वेस ब्रह्मदेशापर्यंत हिंदुराष्ट्राचे अधिराज्य स्वतंत्रपणे गाजत होते. त्याकाळातही आपले दक्षिणेतील हिंदुराजे चेर, चौल, पांड्य, राष्ट्रकूट अित्यादी कधी हा तर कधी तो स्वत:स 'त्रिसमुद्रेश्वराधीश' ही पदवी अविरोधपणे लावून घेण्याअितके पूर्व, पश्चिम नि दक्षिण समुद्रावर आपले स्वामित्व गाजवीत असत, ही त्या काळची दक्षिण हिंदुस्थानाची सामर्थ्यसंपन्न आणि स्वातंत्र्यसंपन्न स्थिती तर कोणा अितिहासकाराने विचारातच न घेता अशा तीनशे वर्षांच्या प्रदीर्घ काळामध्ये सारा हिंदुस्थान हा मुस्लिमांच्या किंवा अितर परकीयांच्या दास्यात पिचला जात होता हे म्हणणे अितिहासाला कधीही धरून होणारे नाही. वस्तुत: या सर्व काळात सर्व हिंदुस्थानवर हिंदु राजांचीच सत्ता सन अेक हजाराव्या वर्षापर्यंत नांदत होती.

## अिसवी सन १००० ते १०३०

अितक्यात अेखादा धूमकेतू अकस्मात अुगवावा त्याप्रमाणे गझनीचा महंमद अुदय पावला. त्याने राज्यावर बसताच सारे हिंदुस्थान जिंकून मुसलमानमय करण्याची प्रतिज्ञा कशी केली आणि स्वाऱ्यांवर स्वाऱ्या करून पंजाबातील मुलतानपासून तो सौराष्ट्रातील सोमेश्वरापर्यंत साऱ्या अुत्तर पश्चिम हिंदुस्थानाच्या विस्तीर्ण भागात जाळपोळ, लुटालूट, विशेषत: धार्मिक अत्याचार नि बलात्कार यांचा कोण धुमाकूळ अुडविला, त्या अितिहासाचे सविस्तर समीक्षण या दुसऱ्या भागात केलेलेच आहे.

परंतु, अशा प्रसंगी हिंदूंनी त्या प्रलयांतही टिकाव धरण्यासाठी अेकंदरीत जे साहस दाखविले आणि राष्ट्रीय संकटे सोसणाऱ्या शक्तीची, पराजयातही आत्मनिष्ठा खचू न देता, जी पराकाष्ठा दाखविली, तीमुळेच तशा प्रलयातूनही महंमद गझनीच्या सहस्त्रावधि पिशाच्च्यांच्या त्या स्वाऱ्या सन १०३० मध्ये महंमद गझनी मरताच पंचवीस-तीस वर्षातच नामशेष कशा झाल्या, आणि त्या युद्धाच्या राजकीय आघाडीवर तरी पंजाबच्या अुत्तरेच्या कोपऱ्यापर्यंतचा सिंधपलीकडील प्रदेश सोडता, हिंदुस्थानात हिंदु राजसत्ता पुन्हा जिकडे तिकडे देशभर कशी नांदू लागली,तेही कोणत्याही राष्ट्राच्या चिवटपणाचे अेक आश्चर्यकारक अुदाहरण म्हणून दाखविता येअील.

दुसरी हीही वस्तुस्थिती लक्षात ठेवली पाहिजे की, या अुत्तर हिंदुस्थानातील हिंदूंवर महंमद गझनीच्या स्वाऱ्यांत तीस-चाळीस वर्षे ओढवलेल्या राजकीय आघाडीवरील प्रळयातही सबंध दक्षिण हिंदुस्थान, हा वर वर्णन केल्याप्रमाणे स्वातंत्र्य, संपन्नता, साहस आणि तिन्ही समुद्रांचे स्वामित्वही जसाच्या तसाच गाजवीत राहिलेला होता.

म्हणूनच, या दोन्ही कारणांमुळे गझनीच्या स्वाऱ्यांच्या या तीस चाळीस वर्षांच्या काळातही सर्व हिंदुराष्ट्र मुसलमानांच्या किंवा कोणत्याही परकीयजातीच्या दास्यांत सडत पडलेले होते, असे म्हणणे शक्यच नाही. वर सांगितल्याप्रमाणे, हा, अुत्तर - पश्चिम हिंदुस्थानातील पंजाबकडचा थोडा भाग, मात्र, गझनीकडच्या मुसलमानांनी धार्मिक आणि राजकीय अशा दोन्ही प्रकारच्या सत्ता स्थापन करून त्यांच्या मुस्लिमराज्यास जोडून घेतला, हे आम्ही नाकारीत नाही. तथापि, तेव्हाही काश्मीरवर मात्र हिंदूचेंच राज्य स्थिर होते, हीही गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे.

महंमद गझनी १०३० मध्ये मृत्यू पावल्यानंतरच्या शे-सवाशे वर्षांच्या काळात म्हणजेच जवळजवळ पाच पिढ्यांच्या काळात काश्मीरपासून तो आसाम, वैभवशालित्वात नांदत होता. शंकराचार्यांनतरही मोठमोठे आचार्य, मठस्थापक, संत, महंत, देवलांसारखे स्मृतिकार, मेधातिथीसारखे भाष्यकार ह्याच कालात अुत्पन्न होअून साऱ्या भरतखंडभर आणि बृहत्तर भारतात सांस्कृतिक नेतृत्व करीत होते. संस्कृत भाषा हीच साऱ्या भारताची प्रचलित देवभाषा होती. काशी हीच साऱ्या भारताची सांस्कृतिक राजधानी होती. महंमद गझनीच्या अुत्पातात जे आमच्या राष्ट्राच्या राजकीय आणि सांस्कृतिक जीवनावर खोल घाव झाले होते ते आमच्या राजमंडळाने याच काळात पुन्हा भरून काढले. अिकडे सोमनाथचे देवालय पुन्हा अुभारले गेले, तर तिकडे ओरिसा ते आसमादि भागापर्यंत भुवनेश्वरासारखी नवीन प्रचंड देवालये आणि नवीन धर्मकेंद्रे अुभारली जात होती. पूर्व, पश्चिम आणि दक्षिण समुद्रांवर हिंदूंची सत्ता, व्यापार आणि सहस्त्रावधि सैनिकांची, राजकारण्यांची ये-जा पूर्वेकडे थेट मेक्सिकोपर्यंत आणि पश्चिमेकडे आफ्रिकेपर्यंत पूर्वकालाप्रमाणेच अप्रतिहतपणे चालू होती आणि त्यामुळे तिकडच्या द्वीपांतरातील हिंदुराज्यांना त्यांचा सतत पुरवठा होअून त्या बृहत्तर भारताचा या मूळ मातृभूमीशी, भरतखंडाशी या काळातही अविच्छिन्न संबंध भरभराटलेलाच होता.

अर्थात ह्या काळाविषयी साराही हिंदुस्थान पारतंत्र्यात, राजकीय दास्यात 'गुलामगिरीत' खितपत पडलेला होता, असे म्हणण्याची कोणा हिंदुनिंदक अितिहासलेखकाचीही छाती आहे का ?

# प्रकरण ३ रे

# अिसवी सनाच्या बाराव्या शतकापासून तो तेराव्या शतकाच्या शेवटाशेवटापर्यंतचा कालखंड

महंमद गझनीच्या मुसलमानी सत्तेला अगदी अुतरती कळा लागली. कारण, त्या प्रदेशात निवसत असलेल्या निरनिराळ्या जातींनी मुसलमानी धर्म बळाने नि छळाने अलीकडेच स्वीकारला होता. मोंगल नि तुर्क या आशियातील मोठ्या जाती मात्र तोपर्यंत अेकंदरीत मुसलमान झालेल्या नव्हत्या. अुलट, त्यांनी आशिया ते युरोपपर्यंत स्वाऱ्या करून अरब मुसलमानांच्या राज्यांचा चक्काचूर अुडविला होता.

गझनीच्या ह्या आजूबाजूच्या अशा लहानमोठ्या जातीपैकी 'घुरी' नावाची अेक हिंदुधर्म पाळणारी जात असे. वर सांगितलेलेच आहे की, त्या काळापर्यंत तिकडे हिंदूंच्या अनेक जातींची आणि राजवंशांचीच राजसत्ता चालत होती. त्यापैकीच ही घुरी नावाची अेक जात होती. ही जातची जात, मुसलमानांच्या तिकडील धार्मिक नि राजकीय आक्रमणांच्या रगाड्यात मुसलमान केली गेली. मुसलमानी धर्माचार या जातीकडून प्रत्यही पिढ्या दोन पिढ्या बळाने करून घेतल्याने ती मूळची घुरी ही हिंदूजात अगदी कट्टर मुसलमान बनली गेली; अितकी की, अितर मुसलमानांवर गझनी राज्यांत आपली स्वतःची सत्ता स्थापण्याची आकांक्षा त्यांच्यात निर्माण झाली. त्यात जातीत गझनीच्या सुलतान महंमदाच्या मृत्यूनंतर अुद्‌भवलेल्या मुसलमान जातीजातींतील यादवीत प्रबल ठरून स्वतःसच गझनीचा सुलतान म्हणून घोषित करणारा महंमद घोरी हा अुदयास आला. त्याने मुसलमानांचे निस्सीम पाठबळ मिळविण्याची त्यांची जी अेक ठरीव मात्रा असे तिचा अुपयोग करून, ''हिंदुस्थानातील सर्व काफरांस (अर्थात हिंदूंना) मी बळाने मुसलमान करून सोडीन आणि मुस्लिमांची राजसत्ताही साऱ्या हिंदुस्थानात स्थापन करीन'' अशी ती सारा प्रदेश आणि हिंदुस्थानाचाही अुत्तर-पश्चिम भाग दणाणून सोडणारी घोषणा ठिकठिकाणी केली.

तथापि, मागे महंमद गझनीने ज्या धडाक्याने हिंदुस्थानावर स्वाऱ्यांमागून स्वाऱ्या प्रबळपणे केल्या, तसे काही या महंमद घोरीला अिच्छा असूनही परिस्थिती प्रतिकूल असल्यामुळे करता आले नाही. सन ११७६ मध्ये घोरीने पंचनद नि सिंधुनद यांचे संगमाजवळ 'अूच' म्हणून जो अेक बळकट दुर्ग होता त्यावर स्वारी करून तो दुर्ग प्रथम जिंकला. त्या दुर्गातील राणीने तिच्या पक्षाचा पराभव झालेला पाहताच आपल्या नवऱ्याच्या दुबळेपणाची चीड येअून त्यास ठार मारले. विजयी महंमदाशी आपल्या मुलीचे लग्न लावून दिले आणि त्या प्रदेशाची सारी राजसत्ताही महंमदाच्या हाती दिली !

नंतर हिंदुराजांची चाचणी घेण्यासाठी महंमदाला त्यातल्या त्यात जो आक्रमणीय हिंदू शत्रू दिसला त्या गुजराथच्या राज्यावर राजस्थानच्या कोपऱ्याकोपऱ्याने पुढे सरकत घोरीने चाल केली. कारण, गुजराथचा मुख्य राजा मृत्यू पावल्यामुळे राणीने आणि सैनिक कारभाऱ्यांनी त्या मृत राजाच्या अगदी अल्पवयी मुलास गादीवर बसविले होते. त्यामुळे महंमदाला ते राज्य दुबळे झालेले आहे असे वाटले, म्हणून त्याने त्या राज्यावरच स्वारी केली. परंतु ह्या दिसण्यांत दुबळ्या परिस्थितीने महंमदास चांगलेच ठकविले. कारण महंमदाची स्वारी येत आहे, हे पाहून गुजराथचे हिंदुसैन्य आपणहून पुढे सरकत, त्यांच्याशी सहानुभूती असणाऱ्या काही हिंदुराजांच्या साहाय्याने अबू पहाडाच्या आजूबाजूपर्यंत पुढे चालून गेले. तेथे त्या राणीने त्या प्रसंगी अत्यंत शूरपणाने लढाअिस तोंड दिले. आणि त्या अल्पवयी राजपुत्रास आपल्या हिंदु सैन्यासन्मुख आणून 'तुमच्या ओटीत हा तुमचा बालराजा मी घालीत आहे, याचे रक्षण तुम्ही आता प्राणपणाने करा' अशा आशयाचे आवाहन सर्वांना केले. त्यासरशी पेट घेअून ते सारे हिंदुसैन्य आणि आजूबाजूचे साहाय्यक हिंदुराजेही महंमदाशी अितक्या आवेशाने लढले की, त्याचे सारे सैन्य हिंदूंच्या माऱ्यापुढे पाडाव होअून दशदिशा फुटून गेले. मोठ्या कष्टाने महंमद घोरी जीव बचावून जो पळाला तो थेट त्याची सत्ता असलेल्या सीमेकडील प्रदेशात गेला.

महंमद घोरी संकटांनी डगमगणारा पुरुष नव्हता. हिंदूंनी केलेल्या त्याच्या वर अुल्लेखिलेल्या पराजयाने खचून न जाता त्याने हिंदुस्थानावर पुन्हा सन ११९१ मध्ये स्वारी केली, आणि पृथ्वीराजाच्या राज्यात तो घुसला. हे पाहताच दिल्लीच्या त्या

वीरवर पृथ्वीराजानेही घोरीशी लढण्यासाठी शक्य त्या अितर हिंदुराजांनाही अेकत्र केले आणि तो घोरीवर चालून गेला. त्यांची गाठ पानपतजवळ कर्नाळच्या अुत्तरेस तरायण गावी पडली. येथे त्या हिंदु - मुसलमानी सैन्यांची मोठी निकराची लढाअी झाली. पण शेवटी मुसलमानी सैन्याचा धीर सुटून हिंदूंनी त्यांचा मोठा पराभव केला. स्वतः महंमद घोरी पृथ्वीराजाच्या हाती जिवंत सापडला. या लढाअिस तलावडीची लढाअी असेही म्हणतात.

सम्राट पृथ्वीराज आणि त्याचे सामंतमंडळ जातीचे हिंदु आणि त्यांतही राजपुतांचे मुकुटमणी ! आपल्या स्वदेशाच्या आणि स्वधर्माच्या शत्रूला सुद्धा तो हाती पडला असता त्याला जिवंत सोडून, गौरवून त्याचे राज्य त्याला परत देणे ह्यासारख्या पुण्यप्रद आणि प्रशंसनीय दुसरा वीरोचित सद्‌गुण नाही, ही त्यांची अेखाद्या धर्मभावनेसारखी अुपजत भावना त्या काळी असे.

**साप विखारी देशभूमिचा ये घेअू चावा ।**
**अवचित गांठुनि ठकवुनि भुलवुनि**
**कसाही ठेचावा ।।**

हे श्रीकृष्णाच्या नि चाणक्याच्या रणनीतीचे सूत्र जरी हिंदूंनाच शिकविलेले असले तरी त्या काळी हिंदूंना ते अेखाद्या पंचमहापातकासारखे वाटू लागले होते. कारण, आम्ही पूर्वार्धात सांगितलेल्या 'सद्‌गुण विकृतीच्या' बुद्धिभ्रंशाने त्या काळी हिंदुजगत पूर्णपणे झपाटले होते. पर मुसलमान मात्र ते सूत्र त्यांच्या अेखाद्या धर्मसूत्राप्रमाणे कटाक्षाने आचरीत असत !

कसे ते पहा : महंमद घोरीच्या ठिकाणी पृथ्वीराजाने गझनीवर स्वारी केली असती आणि तेथील मुसलमानांनी, महंमद घोरीचा हिंदूंनी केला तसा, रजपुतांचा संपूर्ण पराभव केला असता तर त्यांनी हाती सापडलेल्या पृथ्वीराजालाच काय ते ठार केले नसते, तर पाडाव केलेल्या त्या सर्व हिंदुसैन्याला बळाने मुसलमान केले असते, गुलाम करून त्यांच्या बरोबरच्या बायकामुलांनासुद्धा जन्मभर राबविले असते आणि त्यांतील हाती पडलेल्या सुंदर सुंदर हिंदू स्त्रिया स्वतः महंमद घोरीने अंत:पुरात नेअून अुपभोगल्या असत्या ! अशा या अुदंड आणि राक्षसी धर्मशत्रूला पृथ्वीराजाच्या सर्व राजपूतमंडळाने कोण्या धीरोदात्त शत्रूसाठी काय ते अुपयोजिले जावे म्हणून अुपदेशिलेले जे पुस्तकी सूत्र 'क्षमा वीरस्य भूषणम्' त्या सूत्राप्रमाणे देशकालपात्राचा लवलेश विवेक न करता महंमद घोरीला क्षमा केली ! अेकट्या महंमद घोरीलाच नव्हे, तर त्या सर्व मुसलमानी सैन्यास, शरणागताला अभयदान देण्याचा हा राजपुती बाणा पाळण्याचे शतकृत्य करण्यासाठी क्षमा केली. ''पुन्हा हिंदुस्थानवर स्वारी करून मी येणार नाही'' अेवढे काय ते महंमद घोरीकडून तोंडी वचन घेअून त्याला जिवंतपणे सोडून दिले ! त्याचे गझनीचे राज्यही त्याला परत दिले ! आणि महंमद घोरीच्या त्या मुस्लिम सैन्याचा पराभव केल्याच्या अभिमानापेक्षाही या आत्मघातक नि धर्मभोळ्या 'औदार्याच्या' अभिमानानेच अधिक फुगून ते राजपूत वीर दिल्लीला जाअून विजयोत्सव साजरा करीते झाले !!

## पण महंमद घोरीने सुटून गझनीला परत जाताच काय केले ?

पृथ्वीराजाच्या ह्या औदार्यामुळे घोरीने हिंदूंचे वैर सोडून दिले का ? नाही ! तर, त्याच्या राक्षसी धर्ममताप्रमाणे हिंदूंच्या त्या बुळ्या 'औदार्याविषयी' लवलेश कृतज्ञता न बाळगता डिवचून जिवंत सोडून दिलेल्या सापाप्रमाणे महंमद घोरी नि त्याच्या राज्यातले सारे मुसलमान अधिकच खवळून गेले आणि पृथ्वीराजावर पुन्हा स्वारी करून हिंदूंचा चक्काचूर करण्याचा निश्चय करिते झाले.निवडक मुसलमानांचे मोठे सैन्य बरोबर घेअून घोरीने पृथ्वीराजावर सन ११९३ मध्ये पुन्हा स्वारी केली.

## राजपुतांचे 'रासो' ग्रंथ आणि त्यांचा मुकुटमणी चांद भाटाचा 'पृथ्वीराज रासो'

राजपुतांच्या काळचा हिंदूंचा अितिहास खरे पाहिले असता, ह्या राजपूत भाटांनी नि चारणांनी त्या वेळेसच लिहिलेले, वीरसाने रसरसलेले, काही अंशी काव्यात्मक असलेले कविताबद्ध अितिहास ग्रंथ, जे तिकडे 'रासो'या नावाने सुप्रसिद्ध

आहेत त्यांच्या अभ्यासावाचून लिहिणे अयोग्य आहे. परंतु, आपल्या अिकडे या रासो ग्रंथाची माहिती आणि त्यांचे साधे वाचनसुद्धा ज्यांनी केले आहे, असे अितिहासकार दहा-पाच तरी निघतील की नाही याची शंका आहे. त्यामुळे आपल्या अिकडे लिहिले गेलेले राजपुतांचे अितिहास, राजपुतांचे किंबहुना त्या काळच्या हिंदुसमाजाचे खरे अितिहास गणले जाण्यास, अेक टॉड या अितिहासकाराचा अपवाद सोडता, पात्र नाहीत. ते केवळ मुसलमानी नि अिंग्रज लेखकांच्या बहुधा विपर्यस्त अशा तुटपुंज्या अुल्लेखांची भाषांतरे काय ते असतात. सर्व शूर धर्माभिमानी राणांच्या चरित्रांवर स्वतंत्र 'रासो' रचलेले आढळतात. जसे 'हमीर रासो' बुदेलखंडाच्या छत्रसालावरील 'छत्रसाल रासो' अित्यादी. हे रासोग्रंथ निर्भेळ अितिहास नव्हेत. परंतु त्यांच्यातील वर्णने आणि घटना, आवेश आणि त्या काळच्या अनेक महत्कृत्यांमध्ये त्यांच्या लेखकांनी स्वतः घेतलेला भाग, ह्यामुळे त्यांच्या वाचनामुळे ते ते अैतिहासिक भव्य प्रसंग जसे जिवंत होअून आपल्यासमोर अुभे राहतात, तसे वरील तुटपुंज्या वृत्तांताच्या शकावली, सनावलीच्या चार ओळींनी मुळीच राहात नाहीत. ही गोष्ट पृथ्वीराजाच्या वेळी हिंदूंचा आणि वायव्येकडून प्रथम प्रथमच येणाऱ्या मुसलमानी टोळधाडीच्या स्वाऱ्यांचा पृथ्वीराजाच्या पदरी असलेल्या सुप्रसिद्ध चांदभाटाच्या 'पृथ्वीराज रासो' या ग्रंथातून त्या कालखंडातील वीर, शांत, करुण अित्यादी रसाने रसरसलेल्या भव्य नि अुदात्त वर्णनावरून प्रत्ययास येते.

## अग्निकुलाची कथा

ह्याच पृथ्वीराज रासोमध्ये काही रजपूत कुलांच्या अुत्पत्तीविषयी असलेल्या अग्निकुलाची प्रख्यात कथा दिलेली आहे. त्या कथेप्रमाणे म्लेंच्छ दैत्यांचा अुपद्रव अतिशय वाढला तेव्हा वसिष्ठ ऋषींनी अबू पहाडावर अेक मोठा यज्ञ केला. या यज्ञाच्या ज्वालाकल्लोळातून चार दैदिप्यमान वीर पुरुष वैदिकधर्माच्या रक्षणार्थ प्रादुर्भूत झाले. चितोडचे गुहिलोत, कनोजचे प्रतिहार, सांब्राचे चौहान आणि धारचे परमार ह्या चार राजपूत वंशांचे तेच मूळ पुरुष होत. ह्या कथेचा भावार्थ आम्हांला तरी अितिहासाला धरून आहे असे वाटते. कारण हिंदूंनी केलेल्या हूण-राजवटीच्या पराजयानंतर ते जेव्हा सर्वतोपरी हिंदुधर्म स्वीकारून हिंदुराष्ट्रात विलीन झाले तेव्हा कोणत्या तरी महान शुद्धियज्ञांत त्यांच्यापैकी काहींचा शुद्धिसंस्कार ऋषिजनांनी करविला असावा आणि त्याची ही स्मृति पौराणिकांच्या परंपरेप्रमाणे काव्यमय रूपकांत चांदभाटांनी वर्णिली असावी.

ह्या पृथ्वीराज रासो ग्रंथाचा नागरी प्रचारणी सभेने पुनरुद्धार करण्याचे जे महत्कृत्य हाती घेतलेले होते त्या वेळी सन १९२२-२३ व्या वर्षी आम्ही रत्नागिरीच्या तुरुंगात असताही हिंदुत्वावरील निबंधाकरिता आम्ही मागितल्यावरून आम्हांला आमच्या बंधूंनी त्या ग्रंथांचे काही सुटे भाग धाडले होते. पण पुढे तो ग्रंथ समग्र प्रसिद्ध झाला आहे की नाही, याची काही माहिती मिळाली नाही.

## निर्लज्ज म्लेंच्छ लजै नहीं,
## हम हिंदु लजवान् !

वरील पृथ्वीराज रासोमध्ये या हिंदु-मुसलमानामधील लढायांची अगदी महाभारतीय शैलीची वर्णने दिली आहेत. त्या कवींनीही हिंदूंनी महंमद घोरीचा पराभव करून अनेकदा त्याला जिवंत परत सोडले, ही गोष्ट हिंदूंच्या वीरधर्माच्या परमगौरवाची होती म्हणून हिंदूंची फार स्तुती केलेली आहे. परंतु महंमद घोरीने, ''हिंदुस्थानावर मी पुन्हा स्वारी करणार नाही, परमस्नेहाने वागेन'' असे दिलेले वचन भंगून जेव्हा पृथ्वीराजावर वर दिल्याप्रमाणे सन ११९३ मध्ये पुन्हा स्वारी केली तेव्हा चांदभाट रागारागाने लिहिता झाला, 'आम्हा हिंदूंना धर्माधर्माची, सत्यासत्याची चाड आहे, दुष्कृत्यांची आम्हांला लाज वाटते, परंतु हे म्लेंच्छ मूळचेच निर्लज्ज आहेत' ''निर्लज्ज म्लेंच्छ लजै नहीं, हम हिंदु लजवान!''

पण पृथ्वीराजासारख्या काफरांचे राज्यचे राज्य ज्या वचनभंगाने मुसलमानमय करून टाकता येअील तो वचनभंग मुस्लिमांचे धर्मकर्तव्य असे. महंमद घोरीने असा वचनभंग वारंवार केला म्हणून तर तो मुसलमानांचे गाझीपद पावला - हे सत्यही हिंदूंनी हृदयावर कोरून ठेवले पाहिजे! ज्या मुस्लिमांनी चांदभाट म्हणतात असा हा 'अधर्म्य' वचनभंग केला

त्यालाच ओीश्वराने यश दिले आणि ज्यांनी तसा कोणताही वचनभंग न करिता ते शत्रूला जीवनदान देण्याचे भोंगळ औदार्य दाखविले त्या हिंदूंचा मात्र त्या नामधारी धर्मापायीच चक्काचूर अुडविला.
महंमद घोरीला पृथ्वीराजावर स्वारी करण्यास हीच संधी अनुकूल वाटण्याचे आणखी अेक कारण हे होते की, पृथ्वीराजाशी वैर असणारा कनोजचा राजा जयचंद याने महंमद घोरीला पृथ्वीराजाविरुद्ध सहाय्य करण्याचे गुप्त नि आत्मघातक आश्वासन दिलेले होते. ह्या सन ११९३ मध्ये पृथ्वीराजावर महंमद घोरीने केलेल्या स्वारीत त्यांची गाठ स्थानेश्वर येथे पडली. दोन्ही पक्षांची मोठी तुंबळ लढाअी झाली. त्या हातघाअीत राजपुतांचे चामुंडराय, हमीर, हाडा आणि अितर पुष्कळ योद्धे आणि राजे मारले गेले किंवा मुसलमानांच्या हाती पडले. मुसलमानांचीही प्राणहानी भयंकर प्रमाणात झाली. ती वर्णने चांदभाटाच्या पृथ्वीराज रासोमधूनच ज्याला शक्य असेल त्याने अवश्य वाचवीत. कारण, मुसलमानांनी लिहिलेल्या अितिहासात काफरांच्या निंदेवाचून दुसरे काही मिळणे शक्य नाही, आणि रासो ग्रंथातील काव्यमय भाषेत सांगितलेली का असेनात, पण ही अैतिहासिक वर्णने सोडता हिंदूंनी लिहिलेले अितिहास मुळी अुपलब्धच नाहीत. शेवटी त्या लढाअित पृथ्वीराज लढता लढता मारला गेला आणि मुसलमानांचा संपूर्ण विजय झाला, असे मुसलमान अितिहासकार लिहितात. महंमद घोरी जय होताच लगोलग दिल्लीवर चालून गेला. मुसलमानांच्या राक्षसी युद्धनीतीप्रमाणे पराजित पृथ्वीराजाच्या अंत:पुराचा शीलभंग, हिंदूंच्या देवालयांच्या विध्वंस, हिंदूंची सरसकट कापाकाप, लूट आणि विशेषत: पृथ्वीराजाची त्यावेळीही विख्यात झालेली सुंदर नि तरुण पत्नी संयोगिता, राजा जयचंदाची कन्या, तिचा अभिलाष, ही मुसलमानी धर्मातील राक्षसी ‘पुण्यकृत्ये’ अद्याप  पार पाडावयाची होती. परंतु कितीही त्वरेने मंहमद घोरीची सैन्ये दिल्लीवर चालून गेली तरी पृथ्वीराजाचा झालेला पराभव आणि तो मुसलमानांच्या हातात सापडला किंवा मारला गेला हे वृत्त दिल्लीच्या राजवाड्यात त्या सम्राज्ञी संयोगिताला आधीच कळलेले होते. ते कळताच बहुधा आधीच्या योजनेप्रमाणे त्या संकटास बिनतोड तोंड देण्याचे राजपूत वीरांगनांचे कर्तव्य करण्यास तिने अेक क्षणाचाही विलंब लावला नाही. तर ती वार्ता कानी पडताच अैश्वर्याचा, मातापित्यांचा, भावाबहिणींचा, साऱ्या जगाचा आणि जिवाचा मोह तत्क्षणी सोडून देअून तिने राजवाड्याच्या अत्युच्च तळावरून ‘जयहर’ गर्जून खाली अुडी घेतली आणि प्राणत्याग केला - जयहर केला, जोहार केला ! सम्राज्ञीची गोष्ट तर काय, पण शतावधि हिंदू स्त्रियांनी म्लेंच्छांनी त्यांना बळाने बाटविण्याचे आधीच यमुनेत धडाधड अुड्या घेअून प्राणत्याग केला !
महंमद घोरीने दिल्लीत घुसताच राजवाड्याची आणि त्या साऱ्या नगरातील हिंदू नागरिकांची मनसोक्त लूटमार, जाळपोळ, कापाकापी केली. नंतर तेथे मुसलमानी सत्तेची घोषणा केली आणि आपला मुख्य कारभारी म्हणून कुतुबुद्दिन नावाच्या त्याच्या अेका विश्वासू गुलामास तेथील मुख्य अधिकारी नेमले आणि तो गझनीला परत गेला. पुढे महंमद घोरीने जयचंदावरही दोन वर्षांच्या आत ११९५ मध्ये स्वारी केली. दिल्लीचा त्याचा कर्ता कारभारी कुतुबुद्दीन होता, त्याला संगती गेअून तो कनोजवर चालून गेला. तेथे झालेल्या निकराच्या लढाअित जयचंदाचा पराभव होअून तो जीवे मारला गेला. अेका  अर्थी त्याने केलेल्या हिंदुराष्ट्राच्या विश्वासघाताचे योग्य तेच प्रायश्चित त्याला मिळाले.
सोमनाथादि पूर्वीच्या महंमद गझनीच्या भयंकर धार्मिक स्वाऱ्यांना त्याकाळी शंभरावर वर्षे अुलटून गेली होती. ती स्मृती अेखाद्या क्षणिक दुष्ट स्वप्नाच्या स्मृतीसारखी हिंदूंच्या मनातून मावळत मावळत चालली असल्यामुळे, महमंद घोरीच्या या दोन स्वाऱ्यांमुळे साऱ्या अुत्तर हिंदुस्थानातील हिंदुमात्र, राजे, महाराजे, संतमहंतापासून, तो झोपडीतल्या माणसामाणसापर्यंत अेकंदर हिंदु समाजात हिंदूंच्या मनोधैर्याची नि सैनिक सामर्थ्याची अशी वाताहत अुडालेली पाहून अेकच हलकल्लोळ अुडाला. महंमद घोरीही त्याच्या या अनपेक्षित यशामुळे कनोजच्याही पुढे हिंदूंचे अत्यंत पवित्र असे काशी नावाचे अेक महाक्षेत्र आहे, असे अैकताच काफर हिंदुधर्माचे अुच्चाटण करण्यासाठी सरळ काशीवरच चालून गेला.
काशी क्षेत्रात सहस्त्रावधि मुसलमानांच्या अशा धर्मोन्मत आणि रक्तपिपासू स्वारीस तोंड देण्याची काहीच व्यवस्था नव्हती. अर्थात महंमद घोरीने काशी क्षेत्र तत्काळ पाडाव केले, तेथील हिंदू-स्त्री पुरुषांचा रक्तपात, लुटमार, स्त्रियांवरचे

बलात्कार, विशेषतः शक्य तितक्या हिंदू स्त्रीपुरुषांना बाटविण्याचा आणि गुलाम करण्याचा धूमधडाका अुडवून दिला आणि या सर्व धर्मछळांच्याही वर मात करण्यासाठी काशीला असणाऱ्या यच्चयावत् लहानमोठ्या हिंदूंच्या देवळांतील देवमूर्तीचे त्या मुसलमानी सैन्याने तुकडे तुकडे करून टाकले !

परंतु अितक्यात पुढे असलेल्या हिंदूंच्या संघटित नि प्रबल राज्यात आणि विशेषतः राजस्थानात महंमद घोरीवर चालून जाण्याचे नि त्याला वेढून टाकण्याचे कट चाललेले आहेत, ही बातमी त्याने अैकली. घोरीवरही संघटित हिंदुसैन्याच्या खड्गाचे पाणी चाखण्याचा हिंदूंनी त्याच्या केलेल्या मागच्या दोन-तीन पराजयांत, प्रसंग गुदरलेला होता. म्हणून कनोज ते काशीपर्यंत अेका स्वारीत साधले ते पुरे आहे असे समजून तो धूर्त मुस्लिम सुलतान महंमद घोरी हा परत गझनीकडे वळला. मागे सांगितल्याप्रमाणे त्याचा अत्यंत विश्वासू लढवय्या नि राजधुरंधर गुलाम कुतुबुद्दिन यालाच त्याने कनोजपर्यंत जिंकलेल्या हिंदुस्थानातील प्रदेशाचा राज्यप्रशासक नेमले.

आणि हाय हाय ! हया कुमुहूर्ती युधिष्ठिराच्या काळापासून हिंदूंच्या साम्राज्याची अेक राजधानी असलेले आमचे जे अिंद्रप्रस्थ, हस्तिनापुर, दिल्ली, ह्या हिंदूंच्या युगायुगांच्या सत्ताकेंद्राचा अुच्छेद होअून तेथे म्लेंच्छांच्या, मुस्लिमांच्या अधिराजसत्तेचा पक्का पाया घातला गेला ! दिल्ली ही परदास्याची गुलाम झाली ! ती अुणीपुरी पांचशे-सहाशे वर्षे त्या परदास्यातच अनेक मुसलमानी सुलतानांच्या आणि बादशहांच्या राजवटीखाली (मधले मधले अल्पकालीन अपवाद सोडता) खितपत पडली होती - जोवर शेवटी मराठ्यांनी थेट अटकेपर्यंत आणि अटकेपलीकडे मुसलमानी साम्राज्यसत्ता अुलथून पाडून तिला वस्तुतः हिंदुसाम्राज्याची आपली बटीक बनविले नव्हते!

गझनीला गेल्यावर महंमद घोरी थोड्याच दिवसात मारला गेला. काही मुसलमानी अितिहासकारांच्या मते घोरीच्या सैन्यातील अेका तुकडीने बंड करून त्याला ठार मारले असे लिहिले आहे. पण चांदभाटाच्या पृथ्वीराज-रासोमध्ये पृथ्वीराजाने आपल्या पराजयाचा सूड घेण्याची अेक अलौकिक संधी साधून घोरीला ठार मारले, असे त्या प्रसंगाचे रसभरीत आणि विवृत्त (Detailed) वर्णन केलेले आहे. यद्यपि राजपुतांमध्ये विश्वसनीय म्हणून प्रचलित असलेल्या या लोककथेला दुसरा अैतिहासिक आधार अद्याप मिळत नसला तथापि, ती येथे अुल्लेखिण्याअितकी महत्वाची नाहीच असे नाही. पृथ्वीराज-रासो या काव्यातील या अतिशय हृदयंगमपणे वर्णिलेल्या लोककथेचा सारांश असा की, पृथ्वीराज घोरीच्या हाती जिवंत सापडला, लढाअीत ठार मारला गेला. महंमद घोरीने त्यास बंदिवान करून गझनीला नेले आणि तेथे त्याचे डोळे काढून त्याला बंदिगृहात टाकले. हे वृत्त चांदभाटाला कळताच आपल्या सम्राटाला जिवाला जीव देण्याचे जे राजपूत भाटांचे कर्तव्य समजले जात असे, ते पूर्ण करण्यासाठी तो आपण होअून घोरीच्या राजसभेत गेला. चारण, भाट हे त्या काळी अवध्य समजले जात. हा त्यांचा अधिकार मुसलमान राजांनाही सहसा नाकारवत नसे. सुलतान महंमद घोरीनेही चांदभाटाला काय म्हणावयाचे आहे हे कथिण्यास सांगितले. चांदभाट हा प्रख्यात शीघ्र कवी होता. त्या शूर भाटाने त्याच्या त्या अुच्च पहाडी नि सरस सुरात वीर वृत्तांतून गात सांगितले की, ''माझा स्वामी हा तुमच्या हाती पडलेला आहे. त्याचा अंत तुला हवा तसा तू करशीलच. पण माझी विनंती अितकीच की, मलाही त्याच्यासहच त्याच प्रकारे किंवा अितर प्रकारे ठार करावे. दुसरे असे की, त्याआधी आमच्या भारतीय धनुर्विद्येतील अेक शब्दवेधाची जी अदभुत कला आहे, तीत माझा स्वामी किती प्रवीण आहे त्याचा अेक प्रयोग सुलतानाने स्वतः पहावा.' ह्या त्याच्या विनंतीने सुलतानासही त्या विद्येचे कौतुक वाटले. तरीही शक्य त्या सावधपणे तो प्रयोग करण्याची व्यवस्था करण्यात आली. अेकवीस तवे अेका हारीने बांधण्यात आले. सुलतान महंमद त्याच्या निवडक परिवारासह आणि सरदारांसह राजसभेत अुच्च स्थळी तो प्रयोग पाहण्यासाठी आतुरतेने बसला होता. नंतर चांदभाट आणि अंध झालेला तो दिल्लीचा भूतपूर्व हिंदूसम्राट पृथ्वीराज ह्यांना सैनिकांच्या पहाऱ्यात त्या तव्यांच्या सन्मुख बसविण्यात आले. नंतर प्रत्येक तव्यावर आघात करून त्याचा ध्वनी काढण्यात आला. तो ध्वनी निघताच त्या अनुसंधानाने पृथ्वीराजाच्या बाणाने अचूकपणे त्या तव्याचा वेध घेतला. अशा रीतीने अेकवीसही तव्यांचा शब्दवेध अचूक रीतीने तो अंध पृथ्वीराज करीत जात असता कौतुकाने आणि आश्चर्याने त्या साऱ्या राजसभेत टाळ्यांचा गजर होत गेला. आणि सुलतान घोरीही शेवटी

शेवटी प्रत्येक अचूक वेधास 'शाबास ! शाबास !' म्हणून मोठ्याने ओरडला. अितक्यात पृथ्वीराजाजवळ बंदिवान अवस्थेत असलेल्या चांदभाटाने तत्काल रचलेल्या 'दोह्यात' पृथ्वीराजाला सांगितले की, ''येथून अमुक अंतरावर 'शाबास ! शाबास' असे गर्जणारा सुलतान बसलेला आहे. तेव्हा आता क्षणाचाही विलंब न करता, हे वीरवरा ! तू शब्दवेधानेच त्या शत्रूचा वध कर.'' हे शब्द अैकताच पृथ्वीराजाने त्या शाबास शब्दाच्या अनुरोधाने तीक्ष्ण बाण सोडून महंमद घोरीस ठार मारले. तत्क्षणी सारा हाहाःकार झाला. पण पृथ्वीराजावर पहारा देणारे ते सुलतानाचे सैनिक त्याच्यावर तुटून पडण्याच्या आधीच पृथ्वीराजाने आणि चांदभाटाने आपापली खड्गें अुपसून आपली शिरे स्वतःच छाटून घेतली !

## गुलाम घराणे

वर सांगितल्याप्रमाणे महंमद घोरीचा मृत्यू होताच त्याने हिंदुस्तानातील प्रदेशावर नेमलेला त्याचा प्रतिनिधी कुतुबुद्दिन ह्याने स्वतःच सुलतानपद धारण करून दिल्लीस मुस्लिमांची स्वतंत्र 'सलतनत' (महाराज्य) स्थापन केली. कुतुबुद्दिन हा जातीने तुर्क होता. पण महंमद घोरीचा तो गुलाम असल्याने त्याच्या या राजवंशास 'गुलाम घराणे' असेच म्हणतात.

## कुतुबमिनारची बनावट कथा

त्याने दिल्लीत असलेला सुप्रसिद्ध स्तंभ, ज्यास आज कुतुमबीनार म्हणून म्हणतात तो, आपल्या विजयाचे स्मारक म्हणून बांधला, अशी जी समज आहे ती मुळीच यथार्थ नाही. हा स्तंभ फार प्राचीन काळी विष्णुस्तंभ या नावाने कोण्या हिंदुसम्राटाने (सम्राट समुद्रगुप्त याने बहुधा) अुभारलेला होता, आणि श्रीविष्णुस तो अर्पण केलेला होता. ह्या कृत्याची सत्यता स्थापिणारी अेक महत्वाची गोष्ट अलीकडेच अुत्खननात अुघडकीस आली आहे ती ही की त्या स्तंभाला लागून श्री. विष्णूची ती मूळची प्राचीन मूर्तीही सापडली आहे. नंतर सम्राट पृथ्वीराजाच्या राजवटीत त्याने त्या जयस्तंभाची पुष्कळ सुधारणा केली. त्यामुळे त्याला राजपूत कालात 'पृथ्वीस्तंभ' ही कुठे कुठे म्हटलेले आहे. मुसलमानांना जी चटकच लागलेली असे की ते जेथे जातील तेथे पूर्वीच्या स्मृतीचे नावसुद्धा पुसून टाकून त्यावर अिस्लामी छाप मारावयाचा, त्याप्रमाणे हिंदुस्थानातही त्यांनी जिंकलेल्या सर्व राजधान्यांची, तीर्थक्षेत्रांची, महत्वाच्या स्थलांची, कलाकृतींची मूळची हिंदूंची नावे पालटून आपली मुसलमानी नावे बळाने प्रचलित करावयाची. त्या खोडीप्रमाणे या प्रचंड विष्णुस्तंभास किंवा पृथ्वीस्तंभासच सुलतान कुतुबुद्दिनने कुतुबमीनार हे नाव दिले. त्या स्तंभावर अनेक ठिकाणी कुराणातली वाक्येही अरेबीत कोरली. त्याने त्या स्तंभाची थोडीशी यत्रतत्र नवीन बांधणीही केली. परंतु त्या शिल्पकामास लागलेले दगड त्या दुष्ट कुतुबुद्दिनाने जाणूनबुजून ठिकठिकाणी हिंदूंच्या मूर्तींचे दगड आवश्यकतेनुसार तासून घेतलेले होते.

## चितोडवर झालेल्या स्वाऱ्या आणि हिंदूंनी मिळविलेले विजय

सुलतान कुतुबुद्दिन पंजाब, दिल्ली, कनोज अित्यादी हिंदूप्रांतात विजय मिळवीत असताच त्याच्या डोक्यात स्वतंत्र राजपूत हिंदूराज्यांची राज्ये सतत सलत होती. अितक्यात चितोडचा राणा समरसिंह याचा मृत्यू झाला आणि त्याचा धाकटा अल्पवयी मुलगा कर्ण हा राज्यावर बसला. तो अल्पवयी असला तरी त्याची आई वीरांगना करुणादेवी मोठी कतृत्वशाली महिला होती. ही संधी साधून कुतुबुद्दिन याने चितोडवर स्वारी केली. परंतु त्या तरुण राणीने सैन्याचा स्वतः पुढाकार घेअून आणि आजूबाजूच्या हिंदूराजांमध्ये अवसान संचरवून मुसलमानांशी लढाअी दिली. अंबरजवळ झालेल्या या लढाअीत हिंदूंनी कुतुबुद्दिनाच्या मुस्लिम सैन्याचा पराजय केला. तेव्हा कुतुबुद्दिनाने आपला पूर्ण विनाश टाळण्यासाठी तत्काल माघार घेतली. आणि तो दिल्लीला निघून गेला. पुढे कर्णानंतर हूप हा चितोडास गादीवर बसला. तेव्हा पुन्हा त्याचेही पाणी जोखण्यासाठी कुतुबुद्दिनाचे मुस्लिम सैन्य चितोडवर चालून गेले. पण राजपुतांनी पुन्हा लढाअीस सज्ज होअून त्या मुस्लिम सैन्याची रणांगणात गाठ पडताच धूळधाण अुडवून दिली. राजा हूप हा मोठा कर्ता निघाला. त्याच्या राज्याची बळकटी पाहून तो होता तोवर मुसलमानांनी चितोडकडे पुन्हा तोंड दाखविले नाही.

येथे हेही लक्षात ठेवले पाहिजे की, असे वारंवार जय मिळत असताही मुसलमान चालून येअीतोपर्यंत हिंदू त्यांच्यावर आक्रमण असे काही करीत नसत किंवा पराभूत मुसलमानी सैन्याचा पाठलागही फारसा करीत नसत, किंवा मागे

अुरलेल्या मुस्लिम वसतीत कोंडीत पकडून नष्ट करीत नसत, किंवा मशिदी पाडून टाकीत नसत. ह्या ‘सद्गुण विकृतीमुळेच’ मुस्लिम अत्याचारांचा सूड अशा प्रत्याचारांनी संधी सापडली असताही, हिंदु घेत नसत, म्हणूनच मुसलमान पुन:पुन्हा त्यांना शक्य होताच हिंदूंवर अत्याचार करीत !

कुतुबुद्दिन हा सन १२१० त मृत्यू पावल्यानंतर अेकदोन असमर्थ सुलतान गादीवर बसून लगेच पदच्युत केले गेल्यामुळे शेवटी कुतुबुद्दिनची मुलगी सुलतान रेझिया हा राज्यकारभार पाहू लागली. तिला राज्यकारभाराचे सर्व शिक्षण कुतुबुद्दिनाने दिले होते. ती पुरुषवेष चढवून राजसभेत किंवा सैन्यात जात असे. पुढे तिची प्रीती तिच्या दरबारात मुख्य चालक असलेला तिचा विश्वासू गुलाम जलालुद्दीन याच्यावर बसली आणि ती अुघडपणे त्याच्या सहवासात राहू लागली. ही गोष्ट मात्र तिच्या तुर्क सरदारांस असह्य झाली. कारण जलालुद्दीन हा अेक हबशी (नीग्रो) होता आणि तुर्कांसारख्या स्वत:स अुच्च कुलातील समजणारे मुसलमान नीग्रोंना अत्यंत हीन जातीचे लेखीत असत. यावरून हेही वाचकांच्या ध्यानात येअीलच की, साऱ्या मुस्लिम अितिहासामध्ये तुर्क, मोंगल, अरब, पठाण, हबशी अित्यादी सर्व जरी स्वत:स मुसलमान म्हणवीत आणि आम्हा मुसलमानांत जातिभेद असा नाहीच असा समतेचा टेंभा पाजळीत, तरीही त्यांच्यातील ह्या जातीजातींच्या श्रेष्ठ-कनिष्ठ भावनेने जिकडे तिकडे धुमाकूळ माजविलेला असे.

अधिक स्थल या ग्रंथात नसल्याने ती गोष्ट येथे अेकदाच सांगून टाकली आहे. ज्यांना याविषयी विशेष माहिती हवी असेल त्यांनी आमचा ‘मुस्लिमांतील पंथोपपंथ’ हा अैतिहासिक लेख पहावा.

शेवटी हबशी जलालुद्दिनाच्या आणि सुलतान रेझियेच्या विरूद्ध तुर्कादि सरदारांनी अुघड अुघड बंड पुकारले. सरहिंदचा सुभेदार अल्तुनिया याने बंडाचे पुढारीपण घेअून सुलतान रेझियाशी लढाअी दिली. तीत रेझियाचा पराभव झाला. परंतु तिने चपळाअीने त्या अल्तुनियावरच मोहपाश टाकून त्याच्याशीच लग्न लावले. त्यांनी दिल्लीवर पुन्हा चाल केली. पण तेथील सरदारांच्या आणि सैन्यांच्या हातून त्यांचा पराभव होअून अल्तुनिया आणि रेझिया दोघेही ठार मारले गेले. पुढे काही अुलाढाली होअून सरदार बलबन ह्याने सर्व सत्ता सन १२२६ मध्ये बळकाविली आणि तोच सुलतान झाला.

## मोगलांच्या स्वाऱ्या - चेंगीजखान

दिल्लीमध्ये हे गुलाम-वंशाचे राज्य चालू असतानाच मोंगल लोकांच्या स्वाऱ्यांचा धुमाकूळ हिंदुस्थानच्या सरसीमेकडे मध्यआशियातून सारखा चालू होता. मंगोलियातून मोठमोठाली सैन्ये अेखाद्या वावटळीसारखी त्या काळात आपापल्या पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखाली पॅसिफिक समुद्रापासून काळ्या समुद्रापर्यंत सारे देश आणि सारी राष्ट्रे तुडवीत नि बुडवीत चाललेली होती. त्या काळात त्यांचा जगप्रसिद्ध पुढारी चेंगीझखान हा होता. ह्या मोगलांनी त्या वेळी काही मुसलमानी धर्म स्वीकारलेला नव्हता. चेंगीझखानाने तर मरेपर्यंत मुसलमानी राज्यांची, धर्माची आणि अरबादि मुसलमान राष्ट्रांची शक्य ती ती विटंबना केलेली होती. अल्लाचा धार्मिक नि राजकीय प्रतिनिधी म्हणून ज्या खलिफाला मुसलमान लोक अत्यंत सन्मान देत त्या बगदादच्या खलिफाला तर चेंगीझखानाने सिंहासनावरून खाली ओढून ठार मारले आणि बगदादची राजधानी अुद्ध्वस्त करून टाकली. पण अल्लाने त्याचा केसही वाकडा केला नाही! विध्वंसाचा नांगर चेंगीजखानने रशियापर्यंत असाच अप्रतिहतपणे फिरवून रशियाचे कीव्ह येथील राज्यही अुखडून दिले आणि आशियातील काळ्यासमुद्रापर्यंत कापाकापी, लूटमार यांचा धुमाकूळ घालून तो सारा प्रदेश आपल्या महाराज्यास जोडला. पण चेंगीझचा हात धरण्यास अेवढ्या विस्तीर्ण जगात कोणीही शक्ती धजली नाही. रशियाहून परतताना चेंगीझची ही मोगली सैन्ये हिंदुस्थानावर आदळणार हे अुघड दिसू लागले. परंतु योगायोगाने चेंगीझखान, गझनीचे मुसलमानी राज्य अुलथून टाकल्यानंतर, अकस्मात् मंगोलियाकडे निघून गेला आणि तिकडेच तो सन १२२७ त मरण पावला. पुढे चेंगीझखानाचा जो मोंगल वंशाचाच सर्वात बलाढ्य सरदार कुब्लाखान त्याच्या हाती सर्व मोगलांची राजसत्ता आली. सारा चीन नि कोरिया हाही ह्या मोंगलानी आधीच जिंकलेला होता. कुब्लाखान याने आपली राजधानीच त्याने पादाक्रांत केलेल्या चीनमधील पेकिंग ह्या चिन्यांच्या राजधानीतच आणून स्थापन केली.

ह्या मोंगलांचा आशियातील तुर्क लोकांशी जो संघर्ष झाला त्याचा अेक परिणाम असा झाला की, तुर्कांची आणि मोंगलांची अेक संमिश्र प्रजा अुत्पन्न झाली. त्या मिश्र प्रजेला नुसते मोंगल किंवा 'मुघल' म्हणत. हे मोंगल लोक वारंवार हिंदुस्थानात घुसण्यासाठी स्वाऱ्यांवर स्वाऱ्या करीत असत. शेवटी शेवटी ते दिल्लीपर्यंत पुढे सरसावले. त्यांच्यापैकी काहींनी मुसलमानी धर्माचा स्वीकार केला. परंतु जुने मुसलमान त्यांना समानतेने न वागविता अेक 'हीन जात' म्हणूनच लेखीत. हे लोक दिल्लीत अेक मोगलपुरा नावाची स्वतंत्र वसती करून राहू लागले. त्यांच्या त्यांच्यापैकी काही तर जुने मुसलमान त्यांची हेटाळणी करीत म्हणून राजपुतांच्या आश्रयालाही गेले. विशेषत: रतनभोरच्या शूर हिंदूराजाच्या पदरी ह्या नवमुसलमानांतील दोन अेक हजार सैन्यामध्ये नोकरीस राहिले.

गुलाम वंशातला सुलतान बलबन हा अेका अर्थी अत्यंत प्रबल कर्ता आणि स्वत:ला अल्लाचा प्रतिनिधी म्हणून समजणारा सुलतान होअून गेला. पण मुसलमानांच्या प्रत्येक सुलतानापासून तो फडतूस शिपायापर्यंत जो हिंदूधर्माचा आणि लोकांचा निव्वळ द्वेष केला जाअी त्यात मात्र हा सुलतान बलबनही अगदी अग्रेसर होता. त्याने नाना प्रकारचे कर हिंदू लोकांवर लादले. त्यांच्या तीर्थयात्रासुद्धा बंद करविल्या. हिंदूंची बलाने धर्मांतरे नि कापाकापी गावोगाव चालूच होती!

बलबन हा अगदी म्हातारपणी सन १२८६ त मरण पावला. त्याच्यामागे गुलामवंशातील कोणीही कर्ता पुरूष न निघाल्यामुळे दोन-चार वर्षातच जलालुद्दीन नावाच्या खिलजी घराण्यातील अेका बलाढ्य सरदाराने बलबनच्या मुला-नातवांना ठार मारवून अि. सन १२९० मध्ये स्वत:चीच दिल्लीचा सुलतान म्हणून घोषणा केली. तेथे गुलाम-घराण्याचा शेवट झाला.

## खिलजी घराणे

हे जलालुद्दीनाचे खिलजी घराणे पूर्वी कधी तुर्की असले तरी ते आता स्वत:ला पठाण (अफगाण) म्हणून म्हणवून घेत असे. जलालुद्दीन हाही अितर सर्व सुलतानांप्रमाणे किंवा मुसलमानांप्रमाणे हिंदुसत्तेची नि हिंदुधर्माची पाळेमुळे खणून काढण्याच्या अीर्षने भारावलेला होता. राज्यव्यवस्थेच्या अितर सर्व गोष्टीत तो न्यायी होता. मुसलमानांविषयी मात्र मनाचा हळवा असे. रजपुतांच्या रतनभोर नावाच्या प्रख्यात दुर्गाला मुसलमानांचा जो वेढा अटीतटीने चाललेला होता त्यात शेवटी अितक्या मुसलमानांच्या प्राणांची आहुती पडली की ती पाहून तो वेढा जलालुद्दिनाने अुठवून माघार घेतली आणि म्हणाला, ''असल्या शंभर दुर्गांपेक्षा मुसलमानांच्या अेका केसाचे मूल्य मला अधिक आहे''! पण हे शहाणपण त्याला अितक्या अुशीरा जे सुचले त्याचे खरे कारण राजपुतांचे दुर्दांत शौर्य हेच होय! ह्या पराभवानंतर तो पुन्हा राजपुतांच्या वाटेस गेला नाही.

अगदी वृद्ध झालेल्या जलालुद्दिनाच्या मनात त्याच्यामागे त्याचा अेक जो महत्त्वाकांक्षी, शूर आणि कट्टर मुस्लिम असा अल्लाअुद्दिन नावाचा पुतण्या होता त्यासच आपल्यामागे सुलतानपदावर अुत्तराधिकारी म्हणून स्थापण्याचे निश्चित झालेले होते. त्याप्रमाणे त्याने अल्लाअुद्दिनाच्या हाताखालीच मोठे सैन्य देअून त्याला राजपुताशी तोंड देण्यास धाडले होते. परंतु अल्लाअुद्दिनाच्या धाडसी आणि हिंदुद्वेषी महत्त्वाकांक्षेस तेवढे क्षेत्र अपुरेसे वाटून ज्या दक्षिणेतील हिंदुराज्याच्या अपरंपार संपत्तीविषयी वृत्त तो अैकत आला होता त्या दक्षिणेलाच पादाक्रांत करण्यासाठी आपला वृद्ध चुलता जो सुलतान जलालुद्दिन त्यासही न विचारता अल्लाअुदिनाने परस्परे विंध्याद्रि ओलांडून दक्षिणेवर अचानक छापा घातला. दक्षिणेतील ज्या पहिल्या राज्यावर अल्लाअुद्दिन धडाक्यासरशी तुटून पडला ते राज्य देवगिरीच्या यादवाचे होते.

ह्या अल्लाअुद्दिनाच्या दक्षिणेवरील स्वारीचे अेक महत्त्वाचे वैशिष्ट आहे. निदान अर्वाचीन अितिहासकालात तरी त्या अर्वाचीन अितिहासाच्या अगदी आरंभापासूनच म्हणजे अिसवी सनापूर्वी पाचशे-सहाशे वर्षापासून तो त्या तेराव्या शतकाच्या शेवटाशेवटापर्यंत म्हणजे जवळजवळ दोन हजार वर्षे संपूर्ण राजकीय स्वातंत्र्य, संपन्नता आणि सामर्थ्य दक्षिण हिंदुस्थानातील हिंदुजगत् अुपभोगीत आलेले होते, त्या दक्षिण हिंदुस्थानावर कोणत्याही परधर्मीय वा परराष्ट्रीय अहिंदू शत्रूंचे यशस्वी आक्रमण असे ह्या दोन हजार वर्षात झालेले नव्हते. ज्यांनी तसा आक्रमणाचा अपवादात्मक यत्न केला त्या त्या परकीयांना सीमा अुल्लंघिताच या दक्षिण हिंदुस्थानातील हिंदु वीरांनी तिथल्या तिथेच ठेचून टाकले होते. अशा ह्या दक्षिण हिंदुस्थानातील हिंदुजगतावर अल्लाअुद्दिनाने अकस्मात केलेली ही स्वारी म्हणजे परधर्मीय आणि

परराष्ट्रीय शत्रूची अितिहासकाळातील पहिलीच स्वारी होती आणि ती यशस्वीही होणारी होती! तिचा परिणामही दारूण नि दूरवर होणारा होता! ह्या त्या स्वारीच्या राज्यक्रांतिकारक नि विघ्नसंकुल वैशिष्ट्यामुळेच त्या पुढच्या वृत्तांताचे समीक्षण स्वतंत्र प्रकरणातून करणे भाग आहे!

## प्रकरण ४ रे

# दक्षिण भारतावर मुसलमानांच्या स्वाऱ्या चौदाव्या शतकाच्या आरंभापर्यंतच्या नि आरंभीचा काळ

हिंदुस्थानातील अैतिहासिक काळाच्या प्रारंभापासून म्हणजे साधारणतः अिसवी सनपूर्व पांचशे-सहाशेपासून तो ह्या अिसवी सन चौदाव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत दक्षिण हिंदुस्थानावर सिंधुमार्गाने किंवा भूमार्गाने परकीय अहिंदूंची व्यापक स्वारी अशी कधी झालीच नाही. दक्षिण भारतातील हिंदुराज्यांचे स्वातंत्र्य आणि सामर्थ्य अितक्या दीर्घकालपर्यंत बहुधा अक्षुण्णपणे अुपभोगले जात होते. अितकेच नव्हे, तर तिकडील कलिंग, पांड्य, चेर, चोल, आंध्र, राष्ट्रकूट, चालुक्य यादव-द्वारकेपर्यंत लक्षावधि हिंदुसैन्यांनी आणि समूहांनी आपली राज्ये आणि व्यापार, ज्ञान, विज्ञान, कला, शिल्प यांचा अिकडे मेक्सिको तो तिकडे निदान आफ्रिकेच्या मध्यापर्यंत दिग्विजयी प्रचार केलेला होता.

पण अितक्या दीर्घकालपर्यंत आमच्या हिंदुस्थानच्या दाक्षिणात्य हिंदुराज्यांनी आणि लोकांनी आपले स्वातंत्र्य टिकवून धरले, ही गोष्ट अितक्या स्पष्टपणे आणि ठामपणे अितिहासात कुठेही सांगितलेली नाही!

आम्ही अुलट आव्हानपूर्वक असे म्हणू शकतो की, आमच्या या दाक्षिणात्य खंडप्राय हिंदुद्वीपकल्पाप्रमाणे आपले स्वातंत्र्य, सामर्थ्य, साम्राज्य अितक्या दीर्घकालपर्यंत टिकवून धरणारे आणि भूमिमार्गे वा सिंधुमार्गे राजकीय परदास्याचा विटाळ ज्यांनी स्वतःस बहुधा होअू दिला नाही असे देश नि राष्ट्रे आजच्या ज्ञात अितिहासात तरी शोधू जाताही अगदी तुरळकच आढळल्यास आढळतील !

आणि असा गौरवार्ह भूतकाळ ज्या भरतखंडाचा अर्धा आणि अितका विस्तृत भूभाग अितक्या दीर्घकालपर्यंत आपल्या स्वतःच्या पराक्रमाने अुपभोगत आला होता - त्या भरतखंडाला आजच्या परकीय नि स्वकीयही अितिहासांत काही पिसाट, मत्सरग्रस्त किंवा डॉ. आंबेडकरांसारखे हिंदुद्वेषी आणि काही केवळ अज्ञानी लेखक अेकजात विटंबितात की, "साऱ्या हिंदुस्थानचा अितिहास म्हणजे प्रथमपासून परक्यांच्या दास्यात रुतलेल्या नि सतत तुडविल्या गेलेल्या लोकांचाच काय तो अितिहास आहे ! 'गुलामीचे जिणे' च काय ते शतकोशतके जगलेल्या हिंदूंचे ते अितिवृत्त आहे!"

यापुढे तरी प्रत्येक भारतीय किंवा अभारतीय अितिहासकाराने दक्षिण हिंदुस्थानाच्या या स्वतंत्र नि गौरवार्ह वैशिष्ट्याचा सुस्पष्ट अुल्लेख सत्यासाठी तरी केलाच पाहिजे! तरच त्यांच्या त्या लिखाणाला अितिहास हे नाव शोभेल!!

## अुत्तर हिंदुस्थानातील हिंदूंचे श्रेय

अर्थात दक्षिणेच्या ह्या प्रदीर्घ राजकीय स्वतंत्रतेच्या आणि साम्राज्याच्या श्रेयात, अुत्तर हिंदुस्थानातील हिंदू राष्ट्रवीरांनी जो मुसलमानांशी सहाशे-सातशे वर्षे घनघोर रणसंग्राम अखंडपणे चालू ठेवून या अरब, पठाण, तुर्क मोंगल जवळ जवळ साऱ्या आशियातील अनेक राष्ट्रांच्या आणि जातींच्या लक्षलक्ष लुटारू आक्रमकांना अितका दीर्घकाल तिकडे अुत्तरेतल्या अुत्तरेतच थोपवून धरले आणि ज्या लक्षलक्ष हिंदू धर्मवीरांनी हिंदुधर्मरक्षणासाठी पेटलेल्या अग्नीच्या डोंबात, नद्यांच्या पुरात, शत्रूंनी केलेल्या सरसकट कापाकापीत आपले प्राणदान केले, पण त्यांच्या त्यांच्या श्रद्धेनुसार हिंदुधर्मास सोडले नाही, त्यांच्या त्या पराक्रमाचा नि हौतात्म्याचा फार मोठा वाटा आहेच आहे !! याविषयी हिंदुराष्ट्राच्या अुत्तरेतील त्या त्या हिंदू पिढ्यांचे कधीही न फिटू शकणारे अुपकार अखिल हिंदुराष्ट्रावर झालेले आहेत, हे हिंदूंच्या अितिहासाने कधीही विसरता कामा नये !

तथापि, अितक्या प्रदीर्घ काळाने का होअीना, पण जगामध्ये प्रत्येक मोठ्यातल्या मोठ्या राष्ट्रावर सुद्धा केव्हातरी पारतंत्र्याचे संकट कोसळल्यावाचून राहत नाही, असे जगाच्याच अितिहासात आढळते, त्याप्रमाणे ह्या सन तेराव्या शतकाच्या अगदी अंताला ह्या दक्षिण भरतखंडावरही परकीय मुसलमानांच्या स्वाऱ्यांचे संकट कोसळले.

पण येथे हेही ध्यानात ठेवले पाहिजे की त्याच्याही आधी त्या काळच्या जगात हिंदुस्थानाशी विस्तृततेत आणि महत्तेत ज्यांची तुलना करता येअील असे जे चीनचे अेकच राष्ट्र होते ते, चौदाव्या शतकाच्या जवळजवळ शंभर वर्षे आधीच

चेंगीझखानाने आणि नंतर कुब्ल-आी-खानाने पूर्णपणे जिंकून घेतले होते आणि ज्या वेळी दक्षिण हिंदुस्थानावर अल्लाअुद्दिन खिलजी आम्ही आता पुढे सांगणार आहोत ती पहिली स्वारी करीत होता, तेव्हा सारे चीन राष्ट्र या परकीय मोंगल बादशहाच्या कुब्ल-आी-खानाच्या परकीय सिंहासनाचे पादपीठ आधीच होअून राहिले होते ! पण म्हणून काही चीनचे राष्ट्रही सदोदितच दुसऱ्याचे गुलामीत पिचत आलेले आहे असे म्हणण्याची छाती कोण्या करंट्या, शिवराळ,निंदक टीकाकाराची झाली आहे काय ?

## दक्षिण हिंदुस्थानचा अर्वाचीन अितिहास

दक्षिण हिंदुस्थानच्या प्राचीन अितिहासाचा आवश्यक तितका अुल्लेख या ग्रंथाच्या प्रसिद्ध झालेल्या पहिल्या भागात केलेलाच आहे. साधारणतः असे समजू की शालिवाहन वंशाची सत्ता जेव्हा समाप्त झाली त्या सन ३६६ च्या आसपास दक्षिण हिंदुस्थानाच्या अर्वाचीन अितिहासाचा आरंभ झाला. त्यानंतर चालुक्यांच्या वंशांतील प्रतापी सम्राट पुलकेशी हा दक्षिण देशाच्या अितिहासात अेखाद्या कालमापक दीपस्तंभासारखा शोभून गेला. त्याचाही अुल्लेख पहिल्या भागात आलेलाच आहे. त्याच्याच राजसभेत आलेला चीनचा प्रख्यात प्रवासी ह्यूअेनत्संग ह्याने पुलकेशीच्या प्रदेशास अनुलक्षून ‘महाराष्ट्र’ हा शब्द योजिलेला आहे. तोच त्या शब्दाचा अितिहासातील महत्वाचा असा पहिला अुल्लेख होय. सम्राट पुलकेशी हा दक्षिणेतीलच पल्लवराजा नरसिंह वर्मा ह्याच्याशी लढताना सन ६४२ त मारला गेला आणि त्याचे राज्य पल्लवांनी जिंकले. पण त्याचा मुलगा पहिला विक्रमादित्य याने ते राज्य थोड्याच वर्षांत पुन्हा युद्ध करून सोडवून घेतले.

या चालुक्य घराण्यातील दुसऱ्या विक्रमादित्याने पुढे आठव्या शतकात नवसारीकडे सैन्य धाडून तिथे स्वारी करून आलेल्या परकी अरबी मुसलमानांचा पराभव केला.

हिंदूंनी मुसलमानांचे केलेले असे कित्येक पराभव आजकालच्या अितिहासात अुल्लेखिलेच जात नाहीत. हा आजकालचा अितिहासच अडाणी आणि पक्षपातीही आहे. वर अनेक ठिकाणी असे प्रसंग आणि हिंदुपक्षाच्या वरचढ हालचालींच्या घटना ज्या दिलेल्या आहेत, त्यासुद्धा त्या काळच्या मुसलमानांनी लिहिलेल्या अितिहासात चुकूनमाकून सापडल्यास सापडतात. यापुढे तरी असे हिंदूंच्या पराक्रमी कर्तृत्वाचे प्रसंग हिंदूंनी आपल्या अितिहासात स्वतः संशोधून लिहिले पाहिजेत.

वर अुल्लेखिलेला पल्लव राजवंशही दक्षिणेतील पराक्रमी आणि वैभवशाली राजवंशातील अेक होता. त्यांची राजधानी कांची (कांजीवरम) येथे काही काल होती. नव्या शतकाच्या अंती दक्षिणेतील चौलवंशीय राजा आदित्य याने अपराजित पल्लवांचा पराजय करून त्याचे हे राज्य सततचे जिंकून घेतले.

## राष्ट्रकूट

चालुक्यानंतर दक्षिणेत प्रमुख राज्य असे राष्ट्रकूटांचे झाले. राष्ट्रकूटांनी जवळ जवळ सारा दक्षिण देश आपल्या राज्यात आणला होता. गुजराथचाही दक्षिण भाग त्यांनी जिंकून घेतला. मुख्य गोष्ट म्हणजे वेरूळचे सुप्रसिद्ध कैलास लेणे हे राष्ट्रकूटांनीच बांधले. त्यांची राजधानी काही काल मालखेड येथे होती.

अिसवी सनाच्या दहाव्या शतकानंतर अगदी दक्षिणेत तंजावरचे चौल आणि मदुरेचे पांड्य हीच प्रमुख राज्ये होती. सुदैवाने दक्षिण हिंदुस्थानाची त्या वेळची स्वातंत्र्य, वैभव आणि पराक्रम यांची अेका त्रयस्थाने चक्षुर्वैसत्यं अशी केलेली वर्णने आपल्याला आज अुपलब्ध आहेत. मार्कोपोलो हा सुप्रसिद्ध विवेचक, विद्वान आणि चीन देशामध्येसुद्धा जाअून कुब्ल-आी-खानाच्या पदरी वर्षानुवर्षे राहिलेला लेखक नि युरोपिअन प्रवासी या काळातच मदुरेच्या पांड्यराज्यास भेट देअून काही दिवस राहिलेला होता. त्याने स्वतः त्या वेळचे हे वर्णन आपल्या प्रवासवृत्तांत दिलेले आहे. त्यातही हिंदुलोकांनी समुद्रावर आणि समुद्रपार प्रदेशावरही राजसत्ता कशा स्थापलेल्या असत, याविषयीही मार्कोपोलोची साक्ष महत्वाची आहे. कारण, तो हिंदुस्थानात चीनमधून जेव्हा आला तेव्हा हिंदु-चीनच्या मार्गाने आला आणि तेथे त्याने सुमात्रा अित्यादीकडील हिंदुराज्यांना भेट दिलेली होती. सुमात्रा प्रदेशात त्यांचे वास्तव्य जेव्हा होते तेव्हा तेथे श्रीविजय

हा हिंदुराजा राज्य करीत होता. तो राजा बौद्धधर्मीयांचाही प्रतिपाल करीत असे. मार्कोपोलो सन १२९५ च्या संधीस त्याची जी जन्मभूमी होती त्या व्हीनसला परत गेला. आणखीही दोन-तीन परद्वीपस्थ प्रवासी त्यावेळी दक्षिण हिंदुस्थानात राहून गेले, त्यांचीही लहानसहान प्रवासवर्णने आहेत. त्यातही त्याकाळी सारें दक्षिण हिंदुस्थान राजकीयदृष्ट्या पूर्णपणे स्वतंत्र होते, अितरही आजूबाजूच्या अनेक देशांत त्या हिंदुराष्ट्राची साम्राज्ये नि धर्म नांदत होती. आजूबाजूच्या पूर्व, पश्चिम आणि दक्षिण या तिन्ही समुद्रांवर त्यांचेच स्वामित्व असून त्यांची मोठमोठी सिंधुसैन्ये, प्रचंड नौदले आणि नौवाणिकदले अखंड ये-जा करीत होती. आणि ते दाक्षिणात्य हिंदुराजे स्वतःस 'त्रिसमुद्रेश्‍वर' ह्या पदवीस अप्रतिस्पर्धित्वाने मिरवीत होते, ही डोळ्यांनी पाहिलेली वस्तुस्थिती मार्कोपोलोच्या प्रवासवर्णनाप्रमाणेच अुल्लेखिलेली आहे.

'त्रिसमुद्रेश्‍वर सम्राट राजेंद्र चौल' हा सन १०४२ त मरण पावला. त्याच्यानंतर चौल राजवंशात अेक-दोन तसेच पराक्रमी राजे निघून नंतर तो वंश आणि तो राज्यही तेराव्या शतकाचे अंती नष्ट झाले.

## शंकराचार्यादि धर्मप्रवर्तक

याच काळात दक्षिणेमध्ये राजेंद्र चौलासारखे केवळ राजकीय धुरंधरच अुत्पन्न झाले नाहीत, तर वैदिकधर्माविरूद्ध जी अनेक तथाकथित पाखंडे साऱ्या हिंदुस्थानभर अुत्पन्न झालेली होती, त्यांचा पाडाव करून वैदिक धर्माचे वर्चस्व पुन्हा स्थापन करणारे मोठमोठे धर्मधुरंधरही दक्षिणेत अुदय पावले. त्यांचे अग्रणी म्हणून अेका श्रीमंत शंकराचार्यांचा अुल्लेख केला तरी पुरे आहे. केवळ प्रांतात कालडी या गावी अि. सन ७७८ त ही शंकराचार्यांची अलौकिक विभूति नंबुद्री ब्राह्मण कुलात जन्मली. त्यांनी सोळाव्या वयाच्या आधीच सर्व वेदाध्ययन पुरे करून संन्यास घेअून धर्मोपदेश करण्यास आणि धार्मिक दिग्विजय करण्यास संचार चालू केला. प्रख्यात कर्ममीमांसक आणि बुद्धधर्माचे अुच्छेदक कुमारील भट्टही याच काळाच्या किंचित आगेमागे भरतखंडव्यापी प्रचार करून राहिलेले होते. दुसरे धर्मोपदेशक दिग्गज मंडनमिश्र हेही या तरुण शंकराचार्यांचेच समकालीन होते. श्रीमत् शंकराचार्यांनी आपला अद्वैत सिद्धांत स्थापन करण्यासाठी आणि वैदिक विजयाचा ध्वज अखिल भरतखंडात रोवण्यासाठी या सर्व केवळ कर्मवाद्यांचा किंवा अितर वैदिक मतवाद्यांचा आणि बुद्धधर्माचे जे कोणी महंत त्या काळी यत्र-तत्र गाजत होते त्यांना हुडकून हुडकून त्या मताचाही पूर्ण अुच्छेद केला. नंतर वैदिकधर्माची पताका आणि अधिकारपीठे भरतखंडाच्या दक्षिणेस शृंगेरी, पश्चिमेस द्वारका, पूर्वेस जगन्नाथपुरी आणि अगदी अुत्तरेस काश्मीर अशा चार दिशास प्रस्थापिली. या पीठांना राजदंडाचाही पाठिंबा हिंदुराज्य जेथे असे तेथे मिळाला. हे सर्व अघटित प्रचारकार्य करून आणि शांकरभाष्यासारख्या अद्वितीय ग्रंथाची रचना करून अवघ्या बत्तीस वर्षांच्या आत श्रीशंकराचार्यांनी गुहाप्रवेश केला - जिवंत समाधी घेतली !

## पाशुपतादि शैव पंथाचा राजकीय प्रपंच

ह्या काळाच्या आधीपासून पाशुपतांचा जो शैव पंथ, त्या हिंदूंच्या लढवय्या धार्मिक संप्रदायातील शाक्यपंथाप्रमाणेच असलेल्या, अत्यंत अुग्र संप्रदायाचे पुनरुज्जीवन झालेले होते. हा पाशुपतांचा पंथ, बुद्ध आणि जैन यांच्या मिळमिळीत आणि सोशीक 'अहिंसेंचा' नि संसारनिवृत्तीचा अत्यंत तिटकारा करी. त्या पंथाने हिंदूंमध्ये म्लेंच्छादि परधर्मीयांचा प्रतिकार करण्याची प्रबळ प्रवृत्ती नि युद्धोन्मुखता अप्रत्यक्षपणे तरी चांगलीच चेतविली होती. श्री लकुलेश नावाचा त्यांचा गुरु गुजराथेतच जन्मला होता. त्याचे प्रचंड कार्य आणि प्रभाव ह्यामुळे त्याला अितर हिंदू प्रत्यक्ष 'हराचाच' (शिवाचाच) अवतार समजत असत, शंकराचार्यांनीही त्यांचा अुल्लेख केलेला आहे.

## ह्याच काळातील बंगाल

सन ७०० ते ८०० पर्यंत बंगालमध्ये पालवंशाचे राजे राज्य करीत होते. त्या राज्याचा पहिला राजा गोपाल हा होता. हा वंश बुद्धधर्मीय होता. ह्या गोपाल राजाच्या राणीचे नाव देड्डादेवी असे होते. तिच्या पोटी राजा धर्मपाल हा जन्मला. त्याने सन ८०० ते ८२५ पर्यंत राज्य केले. हाही बुद्धधर्मीयच होता. त्यालाच दक्षिणेतील प्रख्यात राष्ट्रकूट वंशातील राजा गोविंद याची मुलगी रणदेवी ही दिलेली होती. अि. सन १०९५च्या संधीस बंगालमध्ये या बुद्धधर्मीय पालराजांचा अुच्छेद

करून दक्षिणेतील सेन नावाच्या वंशाने आपले राज्य स्थापन केले. हे सेन-राजे कर्नाटकातून आलेले होते आणि ते क्षत्रिय होते. क्वचित दक्षिणेकडून गेलेल्या राष्ट्रकूट वंशातील वर अुल्लेखिलेल्या राणी रणदेवी हिच्या संबंधानेच ह्या सेन वंशाचा चंचुप्रवेश या बुद्धधर्मीय पालांच्या राजमंडळात झाला असावा. काही असले तरी हे सेन-राजे वैदिकधर्माचे कट्टर अनुयायी असल्यामुळे त्यांनी बंगालमधील बौद्ध धर्माचा पाडाव केला आणि त्या बौद्धकालात संकराने खिळखिळी झालेली वर्णव्यवस्था, अितरही वैदिक धर्मसंस्था आणि वेदविद्या पुन्हा प्रबळपणे चालू केल्या. बोपदेवाच्या 'मुग्धबोध' या संस्कृत व्याकरणाचा प्रचार याच काळात बंगालमध्ये झाला.

## याच काळातील गुजराथ

गुजराथवर याच काळात कर्णराज या नावाचा प्रख्यात राजा सन १०६३ ते १०९३ पर्यंत राज्य करून गेला. त्याने कृष्णसागर नावाचे अतिविस्तृत सरोवर बांधले. त्याच्या राजवंशाची मूळ राजधानी पट्टण येथे असे. परंतु त्याने पुढे आपल्या नावाची नवीन राजधानी बांधून तिला 'कर्णावती' असे नाव दिले आणि तीच गुजराथ राज्याची सततची राजधानी झाली.

परंतु, पुढे गुजराथ मुसलमानांनी जिंकल्यानंतर तेथील हिंदूंचा असह्य छळ करणारा सुलतान अहमदशहा याने त्या कर्णावतीचे ते अैतिहासिक हिंदू नाव पालटून आणि त्यालाच जोडून आणखी अेक अुपनगर बांधून त्या दोन्ही मिळून झालेल्या महानगरास मुसलमानांच्या नेहमीच्या हिंदुद्वेषी रीतीप्रमाणे १४१२ मध्ये अहमदाबाद असे स्वतःचे नाव दिले. त्या काळच्या हिंदूंच्या मेंगळ्या आणि सोशीक वृत्तीमुळे त्यांनीही ते अहमदाबाद हेच नाव पुढेही स्वकीय नावासारखेच गोंजारीत चालविले आहे.

## दक्षिण मुस्लिम हिंदुस्थानवर परधर्मीयांची आणि परकीयांची पहिली स्वारी, १२९४

सुलतान जलालुद्दिन खिलजीचा पुतण्या अल्लाअुद्दिन ह्याने त्या वृद्ध सुलतानास न कळविताच मोठे सैन्य घेअून ज्या दक्षिणेच्या अैश्‍वर्याविषयी तो अैकत आला होता, त्या दक्षिणेवर अि. सन. १२९४ मध्ये विंध्याद्री ओलांडून स्वारी केली. ते वृत्त तिसऱ्या प्रकरणाच्या शेवटी दिलेच आहे. ती स्वारी अितकी अकस्मात होती आणि दक्षिणेतील त्या काळच्या हिंदुराजांची राजकीय असावधानता आणि कूपमंडूक वृत्ती अितकी निंदास्पद होती की जवळजवळ अल्लाअुद्दिनाची ही स्वारी झाल्यावरच तेथील मुख्य महाराजा देवगिरीचा रामदेवराव यादव हा त्याची लढाअीची काहीही सिद्धता किंवा कल्पनाही नसल्याने अगदी गांगरून गेला. अुत्तर हिंदुस्थानात मुसलमानांची राज्ये जिकडे तिकडे स्थापन झाली असता, त्यांनी हिंदुधर्माचा आणि राज्यांचा भयानक अुच्छेद दोन-तीन शतके मांडला असता, सहस्त्रावधि मंदिरे सारखी पाडली जात असता, काशीची जवळ जवळ मक्का केली गेली असता, ज्ञानदेव, नामदेव असले, असले संत, त्यांची मंडळे आणि लक्षावधि प्रवासी हिंदु यात्रेकरू यात्रेसाठी पंजाबपर्यंत सारखे जात-येत असता आणि हिंदुधर्माचा हा अुच्छेद पाहून येत असता, दक्षिणेवरही चालून जाअून दक्षिणेसही मुसलमानमय करून सोडण्याची त्यांची महत्वाकांक्षा मुसलमानांकडून अुघड अुघड बोलून दाखविली जात असता, अल्लाअुद्दिन या देवगिरीच्या राज्यात शिरेतो तेथील हिंदुराज्यकर्ते अितके असावध होते की त्यांचे सारे सैन्य अेकत्र करून मुस्लिमांच्या या स्वारीला तोंड देण्यासाठी अुत्तरेकडे राजपुतादिक हिंदूंना सहाय्य देण्यासाठी चाल करून जाण्याचे ठायी रामदेवरावाचे सैन्य त्याच्या काही सरदारांच्या हाताखाली दूरवर दक्षिणेकडे गेलेले होते तर स्वतः राजे रामदेवराव हे मृगया अित्यादी अगदी निष्काळजीपणातल्या काळज्या वाहात राजधानी सोडून ससैन्य भटकत होते. पण -

अेकट्या रामदेवाचेंच राज्य नव्हे, पण, त्या वेळेस दक्षिणेत राज्य करीत असलेली चार-पाच मोठमोठी जी हिंदुराज्ये होती त्यांच्या हेर विभागातील अेका मनुष्याने तरी अुत्तरेकडून हिंदूंचा हा अेवढा आक्रोश आकाश-पाताळ अेक करून सोडीत असता अुत्तरेत फेरफटका करून त्या राज्यांना ते भयंकर वृत्त कळविले नाही की काय ? पण !!

अशा परिस्थितीत रामदेवाचा पूर्ण पराभव झाला हे सांगणेच नको ! अल्लाउद्दिनाने रामदेवरावापासून अपार खंडणी घेऊन त्याला मांडलिक करून, आपण स्वतः दिल्लीकडच्या काही निकडीच्या राजकारणाच्या ओढीने दिल्लीस निघून गेला. म्हणून रामेदवरावाचे राज्यच मुस्लिम रीतीप्रमाणे तत्काल बुडवून टाकले गेले नाही, हा केवळ योगयोगच !

कारण, दिल्लीस जाताच अल्लाउद्दिनाचे सारे लक्ष्य त्याच्या वृद्ध चुलत्याला, सुलतान जलालुद्दिन याला नाहीसे करून स्वतःच सुलतानपद पटकविण्याकडे वेधले होते. त्याप्रमाणे त्याने मोठा कट करून जलालुद्दिनास ठार मारविले आणि सन १२९६ त तो स्वतःच सुलतान झाला.

अल्लाउद्दिनाने स्वतः सुलतान झाल्यानंतर सन १२९८ मध्ये गुजराथवर स्वारी केली. तेथील हिंदुराजाचा पराभव करून राजधानी जी अनहिलवाडा ती जिंकून घेतली. त्या लढाअीत गुजराथच्या हिंदुराजाची राणी लावण्यवती कमलदेवी ही पळून जात असता मुसलमानांनी पकडली. परंतु तेथील पराभूत हिंदुराजा मात्र त्यांची मुलगी जी देवलदेवी तीसह पळून जाअू शकला. अल्लाअुद्दिन तेथून थेट सौराष्ट्रात गेला आणि हिंदूंनी पुन्हा बांधलेले सोरटी सोमनाथाचे नवे भव्य मंदिर पुन्हा पाडून तेथील मुख्य मूर्ती जी होती तिला दिल्लीस नेले, हिंदूंचा भयंकर मानभंग करण्यासाठी त्या मूर्तीचा सिंहासनाच्या पायरीप्रमाणे त्याने अुपयोग केला !

दिल्लीस गेल्यावर राणी कमलदेवीशी, बहुधा तिच्याच अनुमतीने, अल्लाअुद्दिनाने लग्न लावले. अल्लाअुद्दिनासह सुखाने नांदूनच ती कुलटा थांबली नाही; तर तिने तिची तरुण मुलगी जी राजकुमारी देवलदेवी तिलाही पकडून मुसलमानांच्या गोटात दिल्लीस आणण्यासाठी आपल्या दक्षिणेवरील स्वारी करणाऱ्या मुसलमान सरदारांना कळविले.

अल्लाअुद्दिनाने गुजराथवर केलेल्या त्या स्वाऱ्यात तेथील अेका सावकाराच्या पदरी अेक देखणा, तरतरीत नि तरुण मुलगा गुलाम म्हणून होता; त्याला अल्लाअुद्दिनाने अेखाद्या मुलीला मागणी घालावी तशी मागणी घातली. परंतु तो सावकार त्या तरुण गुलामाला देअीना. म्हणून अल्लाअुदिनाने त्या मुलास बळाने खेचून आपल्याबरोबर नेले. त्या काळच्या मुस्लिम समाजात सुंदर मुलाशी सुंदर मुलीप्रमाणेच संबंध ठेवण्याचे जे लैंगिक समसंभोगाचे (Sodomy) व्यसन अरब लोकातून अनुकारलेले होते आणि जे अेकंदर मुसलमानी समाजातच धर्मबाह्य न समजले जाता पुढे रूढ झाले, त्याप्रमाणे अल्लाअुद्दिनानेही त्या तरुण, सुरूप गुलामाशी लैंगिक संबंध ठेवला. पण तो तरतरीत मुलगा राजकारणातसुद्धा अितका कर्ता निघाला की, प्रत्यक्ष रणांगणात सैन्याचे नेतृत्व तो अगदी अल्लाअुद्दिनप्रमाणेच कौशल्याने आणि प्रभावीपणे करू लागला. वृद्ध होत चाललेला अल्लाअुद्दिन त्या तरुणाला ‘मलिक काफूर’ ह्या नावाने संबोधी. पुढे आपला अत्यंत विश्‍वासू सरदार म्हणून सुलतान अल्लाअुद्दिन सर्व राज्याची सूत्रे त्याच्याच तंत्राने हाकू लागला.

## रतनभोरवर मुसलमानांची दुसरी स्वारी

जलालुद्दिन खिलजीचा रतनभोरच्या हिंदूंनी पराभव केला होता हे मागे दिलेच आहे. त्याचा वचपा काढण्यासाठी अल्लाअुद्दिनाने सन १३०१ मध्ये रतनभोर दुर्गावर दुसरी स्वारी केली. तेव्हाही मरेतो लढण्याची सीमा करून त्या रतनभोरचा राजा हमीर सहस्त्रोगणती रजपूत सैनिकांसुद्धा तुंबळ लढाअी देत ठार मारला गेला, आणि रजपूत वीर पुरुषांचा रणांगणात निःपात झाला हे पाहताच त्या दुर्गावर अुभ्या असलेल्या हमीराच्या राणीसुद्धा शतावधी रजपूत स्त्रियांनी पूर्व संकेतानुसार पेटलेल्या प्रचंड चितेत अुड्या घेअून जोहार केला ! स्वधर्मास्तव हिंदुवीरांनी आणि वीरांगनांनी असे दिव्य पराक्रम नि प्राणदान प्रसंगोप्रसंगी केले म्हणूनच हे हिंदुराष्ट्र त्या काळी परधर्मीय शत्रूशी लढत जिवंत राहिले !

## रतनभोर दुर्ग असा जिंकून घेतल्यानंतरच्या मुसलमानांच्या चितोडवरील लगोलगच्या स्वाऱ्या

सिंहलद्वीपाच्या राजपूत राण्याची अत्यंत रूपवती कन्या पद्मिनी ही चितोडच्या राणा भीमसिंगाला दिलेली होती. अशा रूपसंपन्न परस्त्रियांचे अगदी अुघडपणे अपहार करणे हे आपले अेक भूषणभूत मुस्लिम धर्मकृत्यच आहे अशी निर्लज्ज धारणा त्या काळी मुसलमान समाजाचीच असल्यामुळे सुलतान अल्लाअुद्दिनाने राणा भीमसिंगाकडे त्याच्या या रूपवती राणीची अुघड मागणी केली. राजपुतांनी ती धिक्कारताच अल्लाअुद्दिन सन १३०२ च्या आसपास चितोडवर चालून

गेला. त्या वेळच्या लढायांना वर्णिताना रजपूत अितिहासात, अल्लाअुद्दिनास ठकविण्यासाठी राजपुतांनी, 'आम्ही पद्मिनी तुमच्या भेटीस धाडतो.' असे आमिष दाखवून राजपूत सैन्यच स्त्रीवेषात अनेक मेण्यांतून अल्लाअुद्दिनाच्या शिबिरात घुसविण्याचा जो अेक अत्यंत धाडसाचा कट केला आणि पारही पाडला त्याची अेक कथा सांगितलेली आहे. पण स्थलाभावास्तव ती येथे गाळणे भाग आहे. त्या अटीतटीच्या लढाअितही राजपूत शौर्याचा पाडाव करणे अशक्य होअून अल्लाअुद्दिनास दिल्लीस परत फिरावे लागले. राजपूतही प्रसंगी कपटनीतीचा अवलंब करीत हे ह्यावरूनही अुघडच आहे.

हिंदूंनी ह्या स्वारीत केलेल्या पराभवाचा सूड घेण्यासाठी आणि पद्मिनीसाठी लगेच सन १३०३ मध्ये अल्लाअुद्दीनाने चितोडवर दुसरी स्वारी केली. या वेळीही यच्चयावत् राजपुती झुंजार पुरुषांनी केशरी वेष धारण करून रणांगणात मरेतो लढत लढत शेकडो मुसलमानांना कापून काढले, परंतु, शेवटी विजय मुसलमानी सेनेचाच झाला आहे आणि केशरी वेषांतील सर्व राजपूत रणात मारले गेले आहेत हे तटावरून पाहताच राणी पद्मिनीसह जवळजवळ दहा हजार राजपूत स्त्रियांनी लेकरे अुराशी घेअून पेटत्या चितांमध्ये अुड्या घेतल्या ! जोहार केला ! अल्लाअुद्दिनाने चितोड घेतले खरे, पण पद्मिनीची राख काय ती त्याला गोळा करावी लागली ! जेव्हा हिंदु वीर आणि वीरांगना लढल्या तेव्हा अशा लढल्या !!

येथेच हेही सांगून टाकतो की, अल्लाअुद्दिन वृद्ध होअून मरून जाण्याच्या आधीच हिंदूंच्या ह्या पराभवाचा सूड घेअून अल्लाअुद्दिनाच्या डोळ्यांदेखत हमीर नावाच्या चितोडच्या अेका सुप्रसिद्ध राजपुत्राने सन १३१३ मध्येच मुसलमानांचा पाडाव करून चितोड पुन्हा जिंकून घेतले. अल्लाअुद्दिनाचा अेक मुलगाही त्यांनी जिवंत पकडला. पण जशास तसे या न्यायाने त्यास प्रसंगी बलानेही हिंदू करून मात्र घेतले नाही. हिंदूंचे आत्मघातक औदार्य ते हेच!

सन १३०७ मध्ये अल्लाअुद्दिनाचा हा वर अुल्लेखिलेला सरदार मलिक काफूर ह्याला अल्लाअुद्दिनाने दक्षिणेवर स्वारी करण्यास धाडले. रामेदवरावाचा पुन्हा पराभव झाला. पण त्याने अल्लाअुद्दिनाची तुंबलेली खंडणी देअून संधी केला, याच घालमेलीत रामदेवरावाचा मुलगा जो शंकरदेव त्याला गुजराथची पळून आलेली जी राजकुमारी देवलदेवी दिलेली होती तिलाही मलिक काफूरने पकडून दिल्लीस धाडून दिले. लगेच, सन १३०८ मध्ये मलिक काफूर दक्षिणेत तिसरी स्वारी करून स्वत: वरंगळवर चालून गेला. वरंगळचा वीराग्रणी राजा प्रतापदेव ह्याने मागे मुसलमानांचा अेकदा पराभव केला होता. त्यामुळे मलिक काफूरने अटीतटीने लढाअी दिली. शेवटी राजा प्रतापदेव ह्याचा पराभव झाला आणि त्याला दिल्लीच्या सुलतानाचे मांडलिकत्व मानावे लागले.

मलिक काफूर त्या विजयाने अुत्तेजित होअून हिंदूंचे दक्षिणेकडील जे तिसरे राज्य म्हैसूरच्या होयसाल वंशाचे होते, त्याच्यावरही तसाच चालून गेला आणि त्या हिंदुराजाचाही त्याने पराभव केला. तेथून त्याने पुढे मदुरेच्या हिंदुराजावरही स्वारी करून त्या राजाचाही पराभव केला.

या प्रमाणे बहुतेक दक्षिण देश, आमच्या दोन सहस्त्र वर्षांच्या अितिहासकालात तरी, प्रथमच परकीय नि परधर्मीय शत्रूंचा अंकित झाला ! दक्षिणेचे स्वातंत्र्य आणि सौभाग्य ह्या वर्षी नष्ट झाले ! मलिक काफूरने दक्षिणेच्या अगदी टोकाला ह्या मुसलमानी दिग्विजयाचे स्मारकच अशी अेक भव्य मशीद बांधली! पण लगोलग त्याची प्रतिक्रिया होअून दाक्षिणात्य हिंदूंचे ह्या मुस्लिम दिग्विजयाविरुद्ध अुठावणी करण्याचे अेकामागून अेक यशस्वी कट चालू झाले.

रामदेवरावच्या मागे त्याचा मुलगा शंकरदेव हा देवगिरीचा राजा झाला. त्याने सुलतान अल्लाअुद्दिनाचे स्वामित्व पुन्हा झुगारून दिले. तेव्हा मलिक काफूरने दक्षिणेवर पुन्हा स्वारी केली. राजा शंकरदेव हा शरण न जाता हटातटाने या लढाअित ठार मारला जाअीतो लढला.

अल्लाअुद्दिनाने आणि मालिक काफूरने स्वाऱ्यांमागून स्वाऱ्या करून हे जे दक्षिणेतील सर्व मोठमोठ्या हिंदुराजांचे निर्मूलन केले त्याचप्रमाणे दक्षिणेतील मोठमोठी अनेक देवालये पाडून टाकली, त्यांचे कळस भंगून टाकले आणि बहुतेक ठिकाणी त्या त्या स्थानी मोठमोठ्या मशिदी अुभारल्या. सहस्त्रावधी हिंदूंना बळाने बाटविले ! ते असंख्य बाटे

मुसलमान दक्षिणेतच शेतीवाडी, जहागिरी करून राहिले ! पण त्यांचे मात्र, हिंदूंनी मुसलमानांनी हिंदुराजांचे जसे निर्मूलन कले तसे सरसकट कापाकापी करून निर्मूलन केले नाही! 'परधर्मसहिष्णुते' ची सद्‌गुणविकृती ती हीच !

## हिंदू तत्कालीन युद्धशास्त्राप्रमाणे बहुधा जशास तसे लढत होते

धार्मिक आघाडीवर हिंदूंचा असा पाडाव मुख्यत: त्यांच्याच मूर्ख रूढीपायी होत असताही राजकीय आघाडीवर मात्र हिंदु मुसलमानांशी लढावे तसे लढत होते, पराभवही झाले तरी पुन्हा अुठून मुसलमानांचे पराभवही करत होते! कूट युद्धाला बहुधा कूटयुद्धाने तोंड देत होते!

अल्लाअुद्दिनाने हिंदूंचा धार्मिक छळ करण्यात मागील कोणत्याही सुलतानापेक्षा अधिकच क्रूरता दाखविली. त्याने हिंदुधर्माची, हिंदुराज्याची आणि हिंदु लोकांची अधिकच दुर्दशा केली असती, परंतु त्याला अेकसारखे दुसऱ्या अेका सरसीमेवर सारख्या स्वाऱ्या करणाऱ्या मंगोलियातील आणि मध्य आशियावर धुमाकूळ घालणाऱ्या मोंगलशाहीशी सारखे लढावे लागले त्यांच्यापैकी काही थोड्यांनी मुस्लिम धर्म स्वीकारून प्रत्यक्ष दिल्लीत नवमुस्लिम वसाहतही केली होती. शेवटी अल्लाअुद्दिनाने क्रोधाविष्ट होअून त्या दिल्लीतील नवमुस्लिमांच्या मोगलपुऱ्याची सरसकट कापाकापी केली!

## अल्लाअुद्दिनाचा मृत्यू

अल्लाअुद्दिन हा चितोडसारखी काही काही हिंदुराज्ये सोडता बहुतांश भरतखंडावर अेकछत्री स्वामित्व गाजविणारा मुस्लिम सुलतान, पहिला आणि शेवटचा असा, अेवढाच काय तो झाला. अकबराला आणि औरंगजेबालाही ते स्थान देता येणार नाही. त्यांची सत्ता हिंदुस्थानच्या अेवढ्या मोठ्या भागावर केव्हाही प्रस्थापित झालेली नव्हती.

परंतु, वृद्धपणी अल्लाअुद्दिनाचे त्याच्या दैहिक व्यसनांमुळे शारीरीक व्याधींनी फार हाल झाले. तो सर्वतोपरी पंगु झाला. त्यायोगे तो मलिक काफूरच्या अगदी मुठीत राहू लागला. आणि त्याच स्थितीत जलोदराच्या विकाराने हा पराक्रमी पण हिंदुद्वेष्टा सुलतान सन १३१६ मध्ये अत्यंत दु:खात  मरण पावला किंवा मलिक काफूरने त्याला मारविला किंवा मारला असेही म्हणण्यात येते. हिंदुद्वेषाच्या 'पुण्याअीने' त्याला काही सुखाचे मरण 'अल्ला' ही देअू शकला नाही. थोड्याच दिवसांत अल्लाअुद्दिनाची सारी सत्ता जो त्याचा अेका काळचा गुलाम मलिक काफूर त्यानेच बळकावली. त्याचीही अल्लाअुद्दिनानंतरच्या माजलेल्या बेबंदशाहीत लवकरच हत्या झाली. आणि नंतरच्या घालमेलीत कोणी अेक खुशरूखान नावाचा अेका अर्थी अलौकिक असलेला पुरुष, जो आधीच दिल्लीच्या राजकारणात तळपू लागलेला होता. तो सर्वप्रमुखपदावर चढला. त्याचे वृत्त स्वतंत्रपणे देण्याअितके हिंदुस्थानच्या अितिहासात हिंदुत्वाच्या दृष्टीने महत्वाचे असल्यामुळे पुढच्या स्वतंत्र प्रकरणातूनच सांगणे अुचित होणार आहे.

## प्रकरण ५ वे

# खुश्रूखान आणि देवलदेवी

हिंदुस्थानातील सर्व प्रांतामध्ये आज अितिहास शिकत असणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांना जर असे विचारले की 'हिंदुत्वाच्या दृष्टीने गौरवार्ह नि अविस्मरणीय असलेल्या आणि दिल्लीच्या मुसलमानी राजवटीत सुलतानांचा सुलतान म्हणून गाजलेल्या, अेका अर्थी अलौकिक अशा, खुश्रूखान नावाच्या पुरुषाविषयी तुम्हाला काही माहिती आहे काय? 'तर त्या आजच्या लक्षावधी विद्यार्थीवर्गातील शेकडा नव्याण्णव टक्के तरी साश्चर्य अुत्तरतील की, 'खुश्रूखान? नाही बोवा! तुम्ही म्हणता तशा पुरुषाचा आमच्या शालेय अितिहासात ठळक असा अुल्लेखसुद्धा आम्हांला आढळला नाही!' विद्यार्थीवर्गाची गोष्ट तर सोडाच पण शिक्षकवर्गाला, संपादकवर्गाला, अेकंदर सुशिक्षित वर्गालाही जरी हाच प्रश्न विचारला तरी शेकडा पंचाहत्तर टक्के लोक असेच अुत्तर देतील की 'कोण काढलात हा अेवढा मोठा खुश्रूखान? आम्ही अशा खुश्रूखानाचे नावसुद्धा कधी अैकले नाही!'

येवढ्यासाठीच ह्या हिंदुस्थानच्या अर्वाचीन अितिहासातील अेका अलौकिक असलेल्या, परंतु त्याने हिंदुराष्ट्राच्या अपमानाचा सूड घेण्यासाठी मुस्लिम सुलतानशाहीचे नाकच कापून टाकले, येवढ्या 'अपराधासाठी' काय ते मुस्लिम अितिहासकारांनी आणि अर्थातच त्यांना आंधळेपणाने अनुसरणाऱ्या अिंग्रजी आणि हिंदूंतील पूर्वीच्या ते आजकालच्या शालेय अितिहास-लेखकांपर्यंतच्या बहुतेक अितिहासकारांनी ज्याचे नांव जवळ जवळ नाहीसे करून टाकले आणि ज्याचा अुल्लेख केला तिथे 'हलकट' 'पाजी', 'नरकनगामी' अशा विशेषणांनीच काय तो मुसलमान लेखकांनी यत्रतत्र केलेला आहे. त्या 'खुश्रूखानाचा' साधार देता आला तितका परिचय आम्ही या प्रकरणात देत आहोत.

### खुश्रूखानाचे पूर्ववृत्त

सुलतान अल्लाअुद्दिनाच्या राजवटीत गुजराथवर सन १२९८ पासून ज्या मुसलमानांच्या अगदी पहिल्या स्वाऱ्या झाल्या आणि तेथील हिंदूंची राजसत्ता अुच्छेदिली गेली, त्या घालमेलीत जसा मागे अुल्लेखिल्याप्रमाणे मलिक काफूर ह्या पुढे अत्यंत प्रसिद्धिस आलेल्या पुरुषाला त्याच्या तरुणपणीच गुलाम म्हणून दिल्लीला पकडून नेले होते, त्याचप्रमाणे आणि त्याच रूपगुणासाठी दुसऱ्या अेका अत्यंत कोमल, आकर्षक परंतु तेजस्वी दिसणाऱ्या मोहक हिंदू मुलास मुसलमानी सरदारांनी पकडून गुलाम करून अल्लाअुद्दिनाच्या सेवेस सादर केले होते. हा मुलगा मूळचा हिंदु. त्यातही गुजराथेतील परिया किंवा परवार (भंगी) जातीच्या अस्पृश्य वर्गातील. अेक-दोन मुसलमान लेखक त्याची जात भंग्याची नव्हती, रजपूत होती, असेही लिहून गेले आहेत. त्याला पकडून मुसलमान केल्यानंतर त्याचे नाव प्रथम 'हसन' असे ठेवले गेले. त्याला दिल्लीस थेट अल्लाअुद्दिनाच्या सेवेत घेतल्यानंतर त्याच्याशी मुसलमान समाजातील जे व्यसन या भागात सांगितले आहे, त्याच व्यसनापायी काही मोठमोठ्या सरदारांनी, लैंगिक संबंध ठेवले. त्यामुळे, दरबारातील ती मोठमोठी माणसे, त्याच्या, लोभाने अगदी मुठीत वागू लागली! अल्लाअुद्दिन सन १३१६ त मेल्यानंतर मलिक काफूर हा राज्यप्रमुख झाला. त्याचाही याच्या कर्तृत्वावर मोठा विश्वास बसलेला होता. थोड्याच दिवसांत हसनला 'खुश्रूखान' अशी पदवी मिळाली. कारण, अल्लाअुद्दिनाच्या अस्तित्वातच त्याच्या हाताखाली सैन्ये देअून त्याला लहानसहान स्वाऱ्यांवर स्वतंत्रपणे धाडण्यात येअू लागले होते. पण, हसनच्या लगोलग खुश्रूखान आणि नंतर सेनापती होण्यास त्याचे स्वतःचे असाधारण गुण जसे कारणीभूत झाले, त्याहीपेक्षा सुलतान अल्लाअुद्दिनाचा मुलगा जो मुबारीक त्या राजपुत्राचे अपरंपार प्रेम या मोहक नि कोवळ्या तरुणावर जे बसले होते तेच अधिक कारणीभूत झाले. त्यायोगे अल्लाअुद्दिन नि मलिक काफूर हे दोघेही मारले गेल्यानंतर अल्लाअुद्दिनाचा मुलगा मुबारीक याच्या हाती खुश्रूखानाच्या साहाय्यानेच सुलतानपद झटकन आले. आणि त्याचा अत्यंत लाडका, कर्तुत्ववान आणि विश्वासू सरदार जो हा तरुण खुश्रूखान त्याच्या हाती ओघानेच सुलतानपदाचा बहुतेक कारभारही चालत आला. पण तो तरुणही तो कारभार चालविण्यास पूर्णपणे समर्थ निघाला.

मुबारीक मूळचा व्यसनी आणि विलासी. त्यामुळे तर खुश्रूसारखा सर्व राज्यकारभार सांभाळणारा आणि त्यातही त्याच्या अंत:पुरातील विश्‍वासू वाटणारा समर्थ हस्तक त्याला लाभला, हे स्वत: मुबारीकही अेक वरदानच समजे.

**देवलदेवी :** दिल्लीच्या राजसभेत प्रमुख म्हणून पूर्वाश्रमीचा हिंदू का असेना पण मलिक काफूर हा अल्लाअुद्दिनाने बाटविलेला आकर्षक हिंदू मुलगा पुढे सेनापती आणि राज्यधुरंधर असा ज्या काली झाला, आणि जवळ जवळ त्याच काली खुश्रुखान - हसन हा देखणा नि कोवळा दुसरा अेक पूर्वाश्रमीचा हिंदू मुलगाही मलिक काफूर मारला जाताच सारी सलतनत आपल्या मुठीत ठेवणारा जसा निघाला, त्याचप्रमाणे त्याच काली दिल्लीच्या कारभारी मंडळात त्या दोघा हिंदुवंशीय व्यक्तीअितकीच राजकीय महत्वाची, कर्ती आणि राज्यचालन आपल्या केवळ भ्रूसंकेताने चालविणारी आश्‍चर्यकारक तिसरी व्यक्ती म्हणजे पूर्वाश्रमीची गुजराथची हिंदू राजकन्यका, हिंदुवंशीय महिला देवलदेवी हीच होय.

या तीन हिंदू व्यक्तींपैकी मलिक काफूर हा पुढे मनानेच मुसलमानमय झाला होता असे दिसते. आपल्या हिंदू रक्ताची किंवा त्याच्या बापाच्या हिंदुबीजाची लवलेश आपुलकी तर काय, पण जाणीवसुद्धा त्याच्या मनात अुरली नव्हती हे अुघड आहे. पण खुश्रुखान आणि ही गुजराथची राजबालिका यांच्या मनात मात्र ती हिंदुत्वाची, हिंदुरक्ताची, हिंदुबीजाची केवळ जाणीवच नव्हे, तर ओढ, आवड आणि केवळ हिंदू म्हणून त्यांच्या मुसलमानांनी केलेल्या छळाची चीडही अधूनमधून म्हणा किंवा सतत म्हणा, चेतलेली होती. त्यांच्या कृत्यांतून ती अुफाळून बाहेर येअी आणि शेवटी त्या त्यांच्या हिंदुत्वाच्या सूड घेण्याच्या वृत्तीतूनच भर दिल्लीत अुभ्या हिंदुस्तानभर नांदू लागलेली मुस्लिम सुलतानशाहीची सुलतानशाही औट घटका का होअीना, पण जाळून टाकणारा भडका, अेखाद्या खांडवनीय आगीच्या कल्लोळासारखा अुसळला!

अल्लाअुद्दिनाच्या गुजराथवरील पहिल्या स्वारीतच गुजराथचा राजा पराभूत झाल्यानंतर त्याची पट्टराणी कमलदेवी अल्लाअुद्दिनाच्या हाती, मार्गाने पळत असताना सापडली. परंतु तो हिंदुराजा मात्र त्याची राजबालिका ही देवलदेवी, ही अगदी किशोर असतानाच तिला, स्वत:च्या जिवाला आणि स्वधर्माला वाचविण्यासाठी तिच्यासह रानावनात पळून गेला. राजविलासात कालपर्यंत नांदलेल्या ह्या कोमल नि सुंदर राजकिशोरीला त्या रानोमाळी भटकण्याच्या आणि तिच्या पाठलाग करणाऱ्या मुसलमानांच्या सतत भयाच्या, यातना किती दु:सह झाल्या असतील! त्या लहानपणीचा मुसलमानांविषयी तिरस्कार नि द्वेष, तिच्या आप्तांच्या कथांवरून आणि स्वत:च्या अनुभवाने, तिच्या मनात खोलवर अंकिले गेले असलेच पाहिजेत. तिची आअी राणी कमलदेवी दिल्लीला मुस्लिम सुलतान अल्लाअुद्दिनाची आवडती पट्टराणी झाली; आणि ती तिची प्रत्यक्ष आअीच तिला धरून मुसलमान करण्याच्या प्रयत्नात आहे, हे अैकून तिला किती दु:ख झाले असेल? त्या जाचातून सुटण्यासाठी हिंदुधर्माच्या अभिमानाने काही अंशी आपल्या वडिलांच्या कलास बाजूस सारून तिने राजा रामदेवरावाचा हिंदुधर्माभिमानी नि शूर मुलगा शंकरदेव याच्याशी लग्न लावले. पण तिचे दुर्दैव तिथेच संपले नाही. मलिक काफूरने केलेल्या हिंदूंवरील स्वाऱ्यांत ती शेवटी पकडली गेली; आणि तिला मुसलमानांनी बंदिवान करून दिल्लीला नेले. त्या वेळी तिच्या मनाला अपमानाच्या कालकूटविषाने भरलेल्या नांगीने वारंवार मूर्च्छित केले असलेच पाहिजे! शेवटी, दिल्लीला पोचल्यावर तिला अल्लाअुद्दिनाच्या थोरल्या मुलाशी-खिजरखानाशी लग्न लावावे लागले. देवलदेवीचे आणि खिजरखानाचे मोठे प्रेम हाते, असे काही मुस्लिम लेखक म्हणतात. पण, ती केवळ त्या 'दरबारी' लेखकांची चाटुलता (खुषमस्करी) असली पाहिजे, हे देवलदेवीच्या पुढील प्रत्यक्ष कृतीवरून अुघड होते! पण, अनुकूल संधी मिळेतो तरी, त्या धूर्त हिंदुराजकन्येने वरवर मुसलमानी धर्म स्वीकारल्यासारखे केले. पण.....

अेवढ्या अत्याचारांतून आणि जाचांतून तिच्या मनाच्या देव्हाऱ्यात असलेल्या हिंदुत्वाच्या देवतेची पूजा गुप्तपणे अखंड चालू होती, हे तिच्या चरित्राच्या अुत्तरार्धावरून स्पष्ट होते.

अल्लाअुद्दिनाच्या वडील मुलाशी बळाने लग्न लागल्यानंतरही तरुण देवलदेवीचा मानसिक छळ थांबला नाही; कारण, अल्लाअुद्दिनाच्या मृत्यूनंतर थोड्याच दिवसांत पुन्हा राज्यक्रांती होअून अल्लाअुद्दिनाचा दुसरा मुलगा मुबारीक ह्याने

आपल्या त्या सुलतान झालेल्या वडील भावाला आणि त्याच्या काही पक्षीयांचे डोळे काढून त्यांना, ठार मारले; आणि स्वतः मुबारीकच सुलतान झाला. त्यानेही त्याच्या भावाशी लग्न लागले गेलेल्या देवलदेवीला छिनावून तिच्याशी स्वतःच लग्न लावले.

मुसलमानी सुलतानांची आणि बादशहांची 'सभ्य परंपरा' हीच होती. असे दिसते की, मागच्या मेलेल्या किंवा मारलेल्या सुलतानाच्या किंवा बादशहाच्या अुत्तमोत्तम बायकांशी आपण पुन्हा लग्न लावायचे!

अशा प्रकारे, ती हिंदुराजकन्या देवलदेवी त्या वेळच्या अत्युच्चपदी चढत सुलताना झाली खरी! पण, मुबारीकविषयी अत्यंत तिरस्कार असलेल्या, मनातून हिंदू असलेल्या, त्या राजकन्येस मुबारीकशी बळाने शरीरसंबंध ठेवावा लागला. तिच्या सोनेरी देहाची अशी सारखी विटंबना चाललेली असताही या विवाहामुळे तिला अेक अत्यंत अनुकूल गोष्ट मात्र घडून आली, ती अशीः

सुलतान मुबारीकला हे सुलतानपद देण्याच्या खटपटीत मुख्य आधार पूर्वाश्रमीचा हिंदु गुलाम आणि नंतर बळाने मुसलमान केला गेलेला नि आता वास्तवात साऱ्या सुलतानी साम्राज्याचाच सेनापती नि प्रमुख झालेला खुश्रूखान हाच होता. त्यातही सुलतान मुबारीक ह्याने सर्व कारभार आपण होअून खुश्रूखानाच्या हाती दिला; कारण, मुबारीकला त्याच्या अत्यंत घाणेरड्या विषयवासनातून दुसरीकडे लक्ष देण्यास वेळच मिळत नसे. त्याची अेक खोड सांगितली तरी पुरे. त्याला स्त्रियांचा वेष करून कलावंतिणींच्या संचासह त्याच्या मोठमोठ्या सरदारांच्या घरी जाअून स्वतःच नाचण्याचा, तमाशे करण्याचा अनावर छंद लागला होता. ह्यामुळे, विषयी मुबारीक हा त्याच्या व्यसनात गढून गेला असता त्याचा मुख्य प्रधान आणि मनातून आपल्या पूर्वाश्रमीच्या हिंदुत्वाची स्मृती जिवंत असलेला खुश्रूखान आणि तशीच मनोवृत्ति आणि चरित्रकथा असलेली ही गुजराथच्या राजाची कन्यका आणि आताची मुस्लिम सुलताना देवलदेवी ह्या दोन मूळच्या गुजराथी हिंदू मनस्वी व्यक्तींचा साक्षातच नव्हे, तर घनिष्ट परिचय, लोभ नि अन्योन्य विश्वास अुत्पन्न व्हावा अितका सहवास घडण्याची संधी अुभयतांना मिळाली. प्रत्यहींची राजकारस्थाने त्यांना अेकदा अेकांतात अधिकृतरीत्या सुलतानाच्या अंतरंग कक्षातसुद्धा करता येअू लागली.

तिथे त्यांचे हिंदुत्वाच्या दृष्टीने काहीतरी महत्वाचे कारस्थान जमले असलेच पाहिजे हे पुढे दिलेल्या वृत्तावरून अितिहासालासुद्धा गृहीत धरणे भाग आहे!

याचे पहिले निदर्शक असे की, खुश्रूखानाने ज्याचा मूळचा प्रांत जो गुजराथ त्यावर आपला स्वतःच्या पूर्वाश्रमीच्या हिंदू परिया किंवा परवार हिंदू जातीच्या सख्ख्या भावालाच मुख्याधिकारी नेमले होते.

दुसरे अत्यंत महत्वाचे निदर्शक त्या त्यांच्या स्वतःच्या पूर्वाश्रमीच्या हिंदू जातीचे लढाअू व्यवसाय करणारे असे सहस्त्रावधि लोक, निदानपक्षी वीस ते तीस हजारांपर्यंत तरी, खुश्रूखानाच्या स्वतःच्या आज्ञेखाली असणाऱ्या सुलतानी सैन्यविभागात स्वतःच्या संरक्षणासाठी म्हणून अुघडअुघडपणे दिल्लीत त्याने आधीच नियुक्त केले होते.

तिसरे निदर्शकः ह्या त्याच्या हालचाली अनेक मुसलमान सरदारांना आवडल्या नाहीत. परंतु, त्यांनी आपला अंतर्गत हेतु अितका गुप्त ठेवलेला होता की, तो अितर कोणाला तर काय, पण प्रत्यक्ष देवलदेवीला आणि खुश्रूलासुद्धा स्पष्टपणे काही तोपर्यंत मनात दृग्गोचर झालेला होता की नाही, हे निश्चितपणे सांगता येत नाही. या हेतूची धूसर आकृती मात्र त्यांच्या हृदयात हळूहळू साकारत चाललेली होती.

चौथे निदर्शक : सुलतान मुबारीकसारख्या अगदी कुचकामी सुलतानाला सुद्धा अुत्साह देअून खुश्रूखानाने दक्षिणेत झालेल्या विजित हिंदूंच्या अुठावण्या वेळीच दडपून टाकण्यासाठी म्हणून दक्षिणेत मोठी स्वारी करण्यास अुद्युक्तविले; आणि आपण स्वतः ससैन्य त्यांच्या हाताखाली स्वारीवर गेला. या स्वारीत हिंदूंची अपार हानी झाली. त्यांच्या अपार लुटीची सुलतानी कोषात भर पडली, बहुधा, याच स्वारीत देवगिरीच्या शंकरदेवाच्या मृत्यूनंतर त्यांचाच नातलग राजा हरपाळ देव याचे देवगिरीचे राज्य बंड करून पुन्हा प्रस्थापित केले होते; त्यासाठी त्याचा पराभव करून जिवंतपणी त्याचे

कातडे सोलून त्याला सुलतानाकडून ठार मारण्याची अत्यंत क्रूर शिक्षा दिली गेली!! आणि स्वधर्मरक्षणासाठी त्या राजकुलोत्पन्न हिंदुवीराने ती भोगली!

नंतर मुबारीक ससैन्य दिल्लीस परत गेला. खुश्रूखानाने मुसलमानी सुलतानासाठी आणि मुस्लिम राज्यासाठी केलेल्या ह्या प्रत्यक्ष पराक्रमामुळे आणि हिंदूंच्या विध्वंसामुळे त्याच्याविरुद्ध असलेल्या मुसलमानी सरदारांनासुद्धा खुश्रूखानाच्या कट्टर मुस्लिमपणाविषयी चकार शब्द काढण्याचे धाडस करवले नाही. अधिकात अधिक ते अितकेच कुजबुजत की हा खुश्रूखान सुलतान मुबारीकला अुखडून देअून स्वतःच सुलतान होण्याचे भय आहे; पण, तो मुस्लिम सुलतानच असणार याविषयी मात्र, त्याच्या शत्रूलाही लवलेश शंका त्या वेळेस आलेली असल्याचे संभवनीय वाटत नाही.

पण जर त्या वेळीही खुश्रूखानाच्या आणि देवलदेवीच्या मनात पुढील अचाट नि अदभुत अशा हिंदुराज्यक्रांतीचे बेत अुद्‌भवलेले असतील तर तो गुप्त कट अितक्या अपूर्व दक्षतेने गुप्त ठेवला गेला असला पाहिजे.

पुढे लवकरच मुबारीकने खुश्रूखानाला दक्षिणेवर आणखी अेक प्रचंड स्वारी करावयास धाडले. पण मुबारीक त्याच्याबरोबर गेलासुद्धा नाही. अितका अपार विश्‍वास खुश्रूखानावर त्याचा बसला होता. या स्वारीत खुश्रूखानाने मलबारच्या हिंदु राजालाही जिंकून अपार लूट मिळविली आणि ती सुलतान मुबारीकच्या नावाने! परंतु याच स्वारीत दक्षिणेत आम्ही वर लिहिल्याप्रमाणे मुस्लिम साम्राज्याविरुद्ध अुठावण्याचे अुघड वा गुप्त कट हिंदूंच्या अनेक बाजूंनी शिजू लागले होते. वरंगळचे राजकुल, गुजराथेतील पराजित हिंदुराजकुले, चितोड परत जिंकून घेणारा वीर राणा हमीर अित्यादी हिंदुराज्यप्रमुख, मोठमोठ्या शंकराचार्यासारख्या हिंदुंच्या मठसंस्थानातून वावरणारे प्रचारक धर्मप्रमुख यांच्यात आणि सामान्य हिंदुसमाजातही अेक मुस्लिमविरोधी लाट आणि काहीतरी खळबळ अुडविणारी अस्वस्थता स्पष्टपणे अुसळू लागली होती. या राष्ट्रीय अस्वस्थतेशी खुश्रूखानाचा काहीतरी अत्यंत भुयारी संबंध असावा, अशा, दिल्लीच्या सुलतानापर्यंत, खुश्रूखानाच्या शत्रूंनी निनावी कागाळ्याही पोचविलेल्या होत्या.

या वेळच्या, मलबार विजेत्या खुश्रूखानाच्या आणि अेकंदर मुसलमानी साम्राज्याच्या हालचालीविषयी अितकी अपुरी आणि अुलटसुलट माहिती तत्कालीन तुटपुंज्या मुस्लिम ग्रंथकारांनी दिलेली आहे की, त्यातील संगती पुढे घडलेल्या कृत्यांवरूनच काय ती लागेल तितकी लावावी लागते! अेकदा तर, दिल्लीत सुलतानाच्या भर राजसभेत, अशी भूमका अुठली की, खुश्रूखान हा त्याला मिळालेली दक्षिणेतील अपार संपत्ती घेअून दिल्लीस त्याच्या शत्रूच्या गोटात परत येण्याच्या ठिकाणी मलबारातूनच परस्परे कोण्यातरी परद्विपात सिंधुमार्गे निसटून जाण्याच्या बेतात आहे! अेका मुस्लिम ग्रंथकाराने तर लिहिले आहे की, खुश्रूखानाला बेड्या ठोकून दिल्लीला आणले!

ह्या सर्व शत्रूंच्या जाळ्यांना अेका मुसंडीसरशी तोडून टाकण्याची धमक अंगी असणाऱ्या खुश्रूखानाने अकस्मात दिल्लीस ससैन्य दक्षिण विजेत्याच्या अैश्‍वर्याने परत जाण्याचे अुद्‌घोषिले. कारण दिल्लीचे खडानखडा वृत्त तेथेच टपून बसलेली त्याची गुप्त सहकारिणी पूर्वीची हिंदू राजकन्यका आणि आता मुस्लिम सम्राज्ञी म्हणविणारी देवलदेवी त्याला कळवीत असलीच पाहिजे!

या त्या वेळच्या मुस्लिम ग्रंथांची अिंग्लिश भाषांतरे जी थोडीबहुत झालेली आहेत त्यावरून पर्शियन वा अरेबियन न जाणणाऱ्यांनाही काही माहिती मिळू शकते. बहुतेक मुस्लिम लेखक खुश्रूखानाचा अुल्लेख अत्यंत तिरस्काराने आणि अगदी चार-पाच ओळीत करून मोकळे होतात. कारण अुघडच आहे. खुश्रूखानाने पुढे जे मुसलमानी सत्तेचे नाकच कापले होते ते शल्य मुसलमान अितिहासकारांना अर्थातच असह्य होते. तथापि, अेक दोन त्या वेळच्या मुस्लिम अितिहासकारांनाही खुश्रूखानाविषयीचे सत्य ते वृत्त अगदीच विपर्यस्त करणे वा दडपून ठेवणे अिष्ट वाटले नाही. त्यांच्या विशेषतः अलीकडेच अुपलब्ध झालेल्या हस्तलिखितांचा बराच अुपयोग होतो. अगदी अर्वाचीन हिंदु अितिहासकारांनी वरील मुसलमानी जुन्या ग्रंथांना स्वतः वाचून दिलेले वृत्तही तसेच टाकाअू आहे. मुसलमानी लेखकांनी खुश्रूला दिलेल्या ‘हलकट’, ‘पाजी’ अित्यादी शिव्यांचाच काय तो या हिंदु लेखकांनी पुनरुच्चार केलेला आहे. पण या गोष्टीला दोन अपवाद सुदैवाने सापडतात. अेक अितिहासमहर्षी रियासतकार सरदेसाई आणि दुसरे श्रीयुत

मुनशी. या दोघांनी मात्र, खुश्रूखानाच्या नि देवलदेवीच्याही विषयी तुलनात्मक वृत्त देअून, त्यांनी, शेवटी केलेल्या हिंदुसाम्राज्यस्थापनेच्या महान क्रांतीची पुसट नि ओझरती वाखाणणी करण्याचा काही प्रयत्न केला आहे, पण, तो प्रयत्न स्वतःच्या निर्णयाला स्वतःच भिणारा, त्या क्रांतीचे खरे स्वरूप असे ठामपणे मुळीच न समजणारा किंवा सांगू धजणारा असा अर्धवटच आहे! त्या वेळची हिंदूंची बाजू सांगणारा असा लेखक तर कुणीही मिळणे शक्यच नाही; कारण, त्या काळी कोण्या हिंदूंची स्वतंत्र मते मांडण्याची छातीच होणे शक्य नव्हते.

अशा स्थितीत, वर अुल्लेखिलेल्या मुसलमानी मूळ ग्रंथातून त्यांची वृत्ते अंशतः परस्परविरोधी असताही जे काही सामंजस्य काढता येते त्यावरून आणि खुश्रूखानादी प्रमुख व्यक्तींच्या त्या काळी प्रत्यक्ष घडलेल्या निर्विवाद कृत्यांवरून जे निष्कर्ष पटतात तेवढे देणे, अितकेच, ह्या अितिहास-समीक्षणासारख्या प्रबंधात गोवणे शक्य आहे.

वर सांगितल्याप्रमाणे, खुश्रूखानही आपल्या विजयी सेनेसह दक्षिणेतील अपार संपत्ती घेअून दिल्लीस गेला. परंतु तो कशाला गेला? दिल्लीलाच नव्हे, तर दक्षिणेतसुद्धा अशी अेक राजकीय भूमिका हिंदुराज्यकारणी मंडळात अंतःस्थपणे प्रसृत झालेली होती की, दक्षिणेत मुसलमानांविरूद्ध अुठावणी करू पाहणाऱ्या हिंदुप्रमुखांचे आणि खुश्रूखानाचे काही गुप्त राज्यक्रांतिविषयक संगनमत चाललेले आहे. गुजराथेत खुश्रूखानाचा भाअूच वस्तुतः राज्यकर्ता होता. साऱ्या रजपुतांना मुसलमानांचे भरतखंडावर त्या कालापुरते तरी अगदी प्रथमच स्थापन झालेले अेकछत्री साम्राज्य अुलथून टाकून तेथे अेकछत्री हिंदु सांम्राज्य स्थापण्यास राणा हमीरने प्रोत्साहित केलेले होते. आणि महद्‌आश्चर्य हे की, सम्राज्ञी देवलदेवीच्या अधिकाराखाली सर्वात प्रमुख असलेला सुलतान (सम्राट) मुबारीकचा सेनापती नि कारभारी खुश्रूखान ह्यालाच त्या राजपुत प्रमुखांनी त्या हिंदुसाम्राज्यविषयक अत्यंत धाडसी कटाच्या प्रकरणी आपल्या विश्वासात घेतलेले होते! असला विरोधमय योगायोग अितिहासालासुद्धा क्षणभर तरी चकित केल्यावाचून राहत नाही! विश्वसनीय तर, तसे काही अद्‌भुत घडेतो, वाटत नाही!

पण, तसे काही घडू लागले खरे. त्या वेळेस, सम्राज्ञी देवलदेवीच्या आणि खुश्रूखानाच्या डोक्यात खरोखरच हिंदुसाम्राज्याची अशी काही तरी अचाट आणि जवळजवळ मूलतःच असंभवनीय पण कोणा नृसिंहीय कारस्थानाला नि पराक्रमाला काय ती शक्य वाटणारी कल्पना नि योजना घोळू लागली खरी!

पण, बाह्यतः त्याच्या शत्रूला वा मित्राला कोणालाही तिची अुघड वाच्यता करण्याचीसुद्धा सोय नव्हती! कारण, साऱ्या दक्षिणेतील हिंदुराज्ये ज्याने बुडवून मुसलमानांची मांडलिक बनविली, ज्याने अलीकडेच मलबारचे संपन्न हिंदुराज्य अुद्‌ध्वस्त करून तिथे मुस्लिम सुलतानाचा हिरवा चांद फडकविला आणि जो त्याच सुलतान मुबारीकच्या मुस्लिम सिंहासनापुढे ते सारे यश, अुपायन (नजराणा) म्हणून अर्पिण्यासाठीच दिल्लीस आला होता, तो साऱ्या भरतखंडामध्ये अितिहासकालात अगदी प्रथमच परधर्मीय नि परकीय साम्राज्यचे साम्राज्य, अेकछत्र, तोलून धरणारा, जन्माने हिंदू असूनही मुसलमान झालेला बाटगा, मुस्लिम सुलतान मुबारीकचा सरसेनापती, अेकदम अशी कोणती यक्षिणीची कांडी फिरवून त्या मुस्लिम साम्राज्याचे हिंदुसाम्राज्य करून टाकू शकणार होता? तशी अुघड शंका घेण्याचे धाडससुद्धा कोणा कट्टर मुसलमानासही करवले नाही! स्वतः कट्टरातील कट्टर मुसलमान असण्याचे आणि मुस्लिम साम्राज्याशी सगळ्यात अधिक सुलताननिष्ठ (राज्यनिष्ठ) असल्याचे सोंग न कळेशापणे खुश्रूखानाने आणि देवलदेवीने अगदी शेवटच्या क्षणापर्यंत धारण केले होते. त्याचे शत्रू असलेल्या हिंदुराजांशी ज्याचे काही अत्यंत भुयारी लागेबांधे असल्याची दाट शंका असलेल्या कट्टर मुसलमानी अुच्चाधिकाऱ्यांनाही भय वाटे की, आपल्या नावाने अुघडपणे तसा आरोप खुश्रूखानावर आपण दिल्लीत भर कारभारी मंडळात सुलतानासमोर केला तर वरील अुलट पुराव्याकडे बोट दाखवून सुलतान आपलेच दात पाडावयास सोडणार नाही. ही भीती ज्या त्या अुच्चाधिकारी मुसलमानास मनातून चळचळा कापावयास लावीत होती. जी काही गाऱ्हाणी दिल्लीस जनतेत पसरली किंवा सुलतानाच्या कानापर्यंत गेली ती अितकी निराधार आणि पूर्णपणे निनावी असत की ती केवळ विघ्नसंतोषी लोकांनी केलेल्या कागाळ्या किंवा अुठविलेल्या ‘अफवाच’ काय त्या कोणासही वाटाव्यात.

तो दिल्लीला येताच त्याच्या मुस्लिम शत्रूंच्या तर्काप्रमाणे त्याला सुलतान मुबारीकने बेड्या तर ठोकल्या नाहीतच; पण, त्याने वाहिलेल्या साऱ्या संपत्तीने आणि सत्तेने अत्यंत संतुष्ट होअून साम्राज्याच्या कारभाराचे सैनिकी आणि नागरी नि अुरलेसुरले अधिकारही त्याला देअून टाकले, आणि जर कोणाला बेड्या ठोकल्याच असतील तर त्या खुश्रूखानाच्या विरुद्ध ज्यांनी हव्या तशा कागाळ्या केल्या होत्या, त्या मोठमोठ्या मुस्लिम खानांना आणि खानखानांना पदच्युत करून त्यांनाच काय त्या ठोकल्या होत्या! अिकडे अल्लाअुद्दीनच्या वेळेस त्याने जे अत्यंत कडक निर्बंध हिंदूंविरुद्ध केलेले होते ते खुश्रूखानाच्या कारभारात आधीपासूनच ढिले होत आले होते; हिंदु-मुस्लिम शेतकऱ्यांची आणि नागरिकांची अल्लाअुद्दिनी पिळवणूकही बंद झालेली होती. हिंदूंना धार्मिक प्रकरणीही हायसे वाटू लागले होते! आणि सर्वसामान्य प्रजाजनातील राज्यकारभाऱ्याविषयीचा स्वाभाविक असंतोषही अुणावत आला होता! आणि त्या सर्व सापेक्ष सुस्थितीचे श्रेय साम्राज्यीय राज्यकारभाराचा त्या वेळचा मेरुमणीच असणारा जो खुश्रूखान त्यालाच लोक देअू लागले. हळूहळू सुलतान म्हणताच लोकांच्या डोळ्यांसमोर व्यसनग्रस्त आणि कुचकामी मुबारीक राहत नसे, तर त्याचा सर्व कर्ता-धर्ता असलेला हा पराक्रमी नि प्रजाप्रिय खुश्रूखानच अुभा राही आणि जिच्या अंतःस्थ आणि प्रकट पाठिंब्याने तो हा अधिकार गाजवू शके, ती सुलताना, सम्राज्ञी देवलदेवी!

ज्याने आपल्या राज्यकारभारत हिंदूंना अल्लाअुद्दिनाच्या अत्यंत जाचक धार्मिक करपाशातून नि अपमानातून अितक्या पुष्कळ अंशी मुक्त केले त्या खुश्रूखानाला सर्व राज्यांतील हिंदु लोक, तो अद्याप मुसलमान असला तरी आपला कोणी अेक त्राताच अुदय पावत आहे असे समजू लागले. मुसलमान शेतकरी, नागरीक अित्यादी वर्गातही करांच्या ढिलाअीपणामुळे खुश्रूखान लोकप्रिय होअू लागला. आणि मुख्य गोष्ट म्हणजे त्याच्या सर्व भरतखंडभर गाजलेल्या सैनिकी पराक्रमामुळे आणि राज्यसंचालनकौशल्यामुळे मोठमोठ्या मुसलमान सरदारांतील अनेकजण खुश्रूखानाच्या पक्षास मिळाले होते.

अितकी अनुकूल परिस्थिती पाहताच आपले अचाट कारस्थान आणि अत्यंत साहसी महत्वाकांक्षा फलद्रुप करण्याचा मुहूर्त असल्यास तो हाच! अितक्या अनुकूलतेतही जो हे साहस करण्यास धजणार नाही तो बुजरा पुरुष कधीही धजू शकणारा नसलाच पाहिजे! असे मनात ठरवून खुश्रूखानाने आणि देवलदेवीने आपल्या त्या अचाट राज्यक्रांतीच्या योजनेची अुघडअुघड घोषणा करण्याचे ठरविले! ती राज्यक्रांति नव्हती, तर साम्राज्यक्रांती होती! मृत सुलतान अल्लाअुद्दिनाच्या आणि विद्यमान सुलतान मुबारीकच्या भरत खंडावरील अेकछत्री, अकुतोभय मुसलमानी साम्राज्यास अुलथून पाडून त्याचे ठायी अेका दिवसात साऱ्या भरतखंडभर अकस्मात हिंदुसाम्राज्य स्थापन करणारी ती महान् साम्राज्यक्रांती होती! धार्मिक क्रांती होती!

अशी क्रांती पाचशे वर्षे जरी रणांगणात हिंदु-मुसलमानांत महायुद्धे लढत ठेवली गेली असती तरीही साध्य होणे दुर्घट होते, हे सिंधच्या सातव्या शतकातील अरब स्वाऱ्यांपासून तो ह्या चौदाव्या शतकातील सुलतान अल्लाअुद्दिनाच्या कालखंडापर्यंतच्या अितिहासावरून सिद्ध होते! परंतु खुश्रूखानाच्या आणि देवलदेवीच्या अलौकिक प्रतिभेने त्यांच्या हाती दिलेल्या त्या यक्षिणीच्या कांडीनेच काय ती, ती साम्राज्यक्रांती नि धार्मिक क्रांती अेकदाच का होअीना, शक्य नि यशस्वी करून दाखविली!

सर्व साम्राज्य, प्रथम शतकोशतके लढत हिंदूंना पूर्णपणे जिंकून ह्या मुस्लिम सुलतानशाहीने मुसलमानमय करून सोडले आहे ना? तर मग त्या अेकट्या मुस्लिम सुलतानासच जिंकून, ती सुलतानशाही नष्ट करून त्याचे सिंहासन मी हिंदुधर्माच्या नावेच जर बळकावून बसलो, तर ते सारे साम्राज्य अेका झटक्यासरशी हिंदुसाम्राज्य झाले पाहिजे! मुस्लिम सुलतानाचा हिंदुसम्राट झाला पाहिजे! हीच गोष्ट काय ती जितकी अचाट साहसाची होती तितकीच सापेक्षतः त्या परिस्थितीत सुघड होती; शक्य होती! मूळची हिंदुराजकन्यका देवलदेवी आणि मूळचा हिंदू परियाचा मुलगा आणि आताचा खुश्रूखान यांनी भरतखंडाच्याच नव्हे, तर अेकंदर अितिहासातीलच अेक अद्‌भुत चमत्कार घडविणारी यक्षिणीची कांडी फिरविली ती हीच!

आधी सगळी अशा राज्यक्रांतीला आवश्यक ती कडेकोट व्यवस्था गुप्तपणे करून, सुलतान मुबारीकला, ज्याच्या मुठीत तो मुबारीक आपणहून पूर्णपणे सामावलेला होता त्या, खुश्रूखानाने विनम्र आविर्भावाने विनविले की, ''मी गुजराथहून जे सहस्त्रावधि माझ्या जातीचे हिंदू लोक आणून दिल्लीत ठेवलेले आहेत त्यांच्या मनात संस्कारपूर्वक आज मुसलमान व्हावयाचे आहे. पण नगरातून अुघडपणे तसे करण्यास कित्येक संकोचत आहेत; कित्येक भीत आहेत. तरी, आज रात्री त्यांतील अेका मोठ्या निवडक गटाला मी अिथे सुलतानाच्या राजवाड्यात आणून ठेवून मुसलमानी दीक्षा हळूहळू देवविणार आहे.'' या निमित्ताने खुश्रुखानाने त्याच्या हिंदुजातीच्या दिल्लीत असलेल्या शतावधि निवडक लढाअू लोकांना राजवाड्यातील सैन्यागारात आणून ठेवले. सन १३१९ च्या अंती अेक दिवस रात्रीचा भर चालू होताच दिल्लीच्या त्या राजवाड्यात अेकाअेकी मोठी गडबड चालू झाली, आणि त्या कोलाहलात प्रत्यक्ष सुलतान मुबारीक याला ठार मारण्यात आले!

परंतु, त्या दिल्लीच्या राजवाड्यात मागेही असेच क्रांतीचे अनेक कोलाहल झालेले होते.... सुलतान अल्लाअुद्दिन असाच ठार झाला होता, सुलतान मलिक काफूर याची ह्याच सुलतान मुबारीकने अशीच भयंकर वाट लावली होती! अशा रक्तपातांना परिचित असलेली ती दिल्लीची राजधानी त्या सकाळी जागी होताच कुजबुजू लागली, 'काल रात्री असा भयंकर प्रसंग राजवाड्यात कोसळला तरी कोणता!'

थोड्याच अवधीत, अेका राजकीय घोषणेसरशी, अेखाद्या भूकंपासारखा साम्राज्यक्रांतीचा आणि धार्मिक क्रांतीचा धक्का साऱ्या राजधानीला गदगदा हलवू लागला की, काल रात्री, खुश्रूखानाच्या लोकांनी राजवाड्यात मोठे बंड करून सुलतान मुबारीकला ठार केले! त्यामागोमाग, दुसरी घोषणा झाली की, खुश्रूखानाने स्वतःच सुलतानपद धारण केले आहे!

ह्या घोषणेच्या धक्क्यासरशी अुघड किंवा संघटित अशी प्रतिक्रिया मात्र, जनतेत, तत्काळ कुठेही झाली नाही. सुलतान मुबारीक ठार मारला जाताच त्याची सुलताना देवलदेवी हिच्याशी ह्या नवीन सुलतान खुश्रूखानाने विवाह लावला. ही घटनाही लोकांच्या क्रांतीमय कुतहलाचा विषय झाला तरी, सभय आश्चर्याची झाली नाही! कारण, तीही रूढी दिल्लीच्या पूर्वीच्या सुलतानांच्या परंपरेची होती. कुतुबुद्दिनाच्या विधवांशी त्याच्यानंतरच्या सुलतानांनी आणि सुलतान अल्लाअुद्दिनाचा थोरला मुलगा खिजरखान याच्या विधवेशी म्हणजे ह्याच सम्राज्ञी देवलदेवीशी ह्याच सुलतान मुबारीकनेही स्वतः लग्न लावले होते. त्याच परंपरेस धरून मुबारीकची विधवा जी सम्राज्ञी देवलदेवी तिच्याशी प्रथमपासून अत्यंत घनिष्ठ संबंध असलेल्या आणि ह्या राज्यक्रांतीतील जी भागीदारीण होती त्या देवलदेवीशी ह्या नव्या सुलतान खुश्रूखानानेही विवाह लावला, यात काही अधिक क्रांतीकारक आहे असे सुलतानी राज्यातील कोणासही तत्काळ वाटल्याचे आढळत नाही, हे साहजिकच होते!

परंतु ह्या घोषणांच्या पुढची जी घोषणा या राजवाड्यांतील राज्यक्रांतीला अकस्मात अेका अद्‌भुत, धार्मिक महाराज्यक्रांतीचे स्वरूप देणारी सुलतान खुश्रूखान आणि 'सुलताना' देवलदेवी ह्यांच्याकडून अधिकृतरीत्या आणि राजकीय समारंभपूर्वक मोठ्या गाजावाजाने करण्यात आली, तिने मात्र साऱ्या हिंदुस्थानातील राजा महाराजांपासून तो परिया-परवारापर्यंत, महार-मांगांपर्यंत, केवळ हिंदूंनाच नव्हे तर मुसलमानांसही पहिल्या वर्गास अत्यानंदाचा, तर दुसऱ्या वर्गातील कित्येकांना अतिभयदायित्वाचा, परंतु, सगळ्यांना सारख्याच अत्याश्चर्याचा धक्का बसल्यावाचून राहिला नाही! ती अशा आशयाची घोषणा दिनांक १५ अेप्रिल सन १३२० ला सुलतानाच्या तख्तावरून, सिंहासनावरून स्वतः सुलतान खुश्रूखानाने केली -

''आजपर्यंत मला केवळ बलात्काराने मुसलमानाप्रमाणे बाटगे जीवन कंठणे जरी भाग पडले होते, तरी मी मूळचा हिंदूंचा मुलगा आहे. माझे बीज हिंदूबीज आहे! आणि माझे रक्त हिंदू रक्त आहे! यास्तव आज मला 'सुलतान' म्हणून समर्थ असे स्वतंत्र जीवन लाभले असल्यामुळे मी ती माझ्या पायांतील बाटगेपणाची परधर्मीय बेडी तोडून टाकीत आहे आणि अुद्‌घोषित आहे की, मी हिंदु आहे! आणि आता अुघडपणे या विस्तीर्ण नि अविच्छिन्न भरतखंडाचा हिंदुसम्राट म्हणून सिंहासनावर चढलो आहे! त्याचप्रमाणे कालपर्यंत 'सुलताना' म्हणवून घेणारी देवलदेवी, जी हिंदुराजकन्यका

असताही बलात्काराने मुसलमानी सैन्याने रानावनात भटकत असता तिच्या त्या राजजनकापासून आणि तिचा पती देवगिरीचा राजा त्याला मारून तिला छिनावून दिल्लीला आणले आणि सुलतानाच्या अंत:पुरांत खिजरखानाची बायको म्हणून जिची विटंबना केली गेली आणि पुढे जो सुलतान कालच्या राज्यक्रांतीत ठार मारला गेला त्या मुबारीकनेही जिच्याशी बळाने लग्न लावून अेक बाटगी सुलताना म्हणून राबविली, ती आजची माझी सम्राज्ञी जन्माने, बीजाने आणि रक्ताने मूळची राजकुलीन हिंदुवंशाचीच कन्या असल्यामुळे तीही यापुढे आपल्या बाटग्या मुसलमानीपणास धिक्कारून आजपासून आपले जीवन हिंदुधर्माप्रमाणेच व्यतीत करणार आहे! ही आमची दोघांची प्रतिज्ञा आमच्या विगत आणि बलात्कारजनित बाटगेपणाच्या पापाचे परिमार्जन करो!''

अशा आशयाच्या ह्या घोषणेचा तत्काल प्रतिवाद करणारा कोणीही बलवत्तर हिंदू तर काय, पण मुसलमानही निघाला नाही.

अेतदर्थ हिंदु सुलतान खुश्रूखानाला आता आम्ही ''हिंदुसम्राट' आणि देवलदेवीला'' हिंदुसम्राज्ञी' संबोधणार!

या हिंदुसम्राटाने त्याचे मुळचे अगदी लहानपणाचे हिंदु नाव मात्र घोषित केले नाही! बहुधा त्याला ते आठवतच नसेल; आज तर ते मुळीच लुप्त झालेले आहे. आता, त्याने जे सम्राटीय अभिधान घेतले ते 'नासिरूद्दिन' हे मुस्लिम भाषेतीलच होते! त्याचे कारण बहुधा असेही असेल की, साऱ्या मुसलमानांना काय किंवा पिढ्यानपिढ्या सुलतानांच्या मुसलमानी पदव्यांनाच सरावलेल्या लाखो हिंदूंनासुद्धा सर्वच गोष्टीत अेकदम बिचकल्यासारखे होअू नये. नासिरूद्दिन म्हणजे धर्माचा रक्षक असा काहीसा अर्थ होतो. अेतदर्थ या हिंदुसम्राटाने त्या घोषणेतच अितके मात्र स्पष्ट केले होते की, ज्या 'दीनाचा' म्हणजे धर्माचा मी संरक्षक होत आहे तो धर्म मुसलमानी धर्म नव्हे! अर्थात तो हिंदुधर्मच असला पाहिजे! यास्तव त्याचे नाव 'हिंदुधर्मरक्षक' असे भाषांतरिले तरी पुरे!

## ही अद्‌भुत राज्यक्रांती

ते सबंध विशाल भरतखंडातील मुस्लिम साम्राज्याचे साम्राज्य अेका दिवसात जिंकून त्याचे हिंदुसाम्राज्य करून सोडणारी धार्मिक नि राजकीय क्रांती, अशी घडविताच त्या हिंदुसम्राटाने मागे मलबारच्या स्वारीत हिंदुराज्य बुडवून जी अपार संपत्ती सुलतान मुबारीकच्या राज्यकोषात आणून ओतली होती ती आणि त्या सुलतानाच्या पूर्वीच्या अपार संपत्तीचीही त्यात भर घालून ती बहुतेक त्याचे जे सहस्त्रावधि, स्वजातीय सैन्य अुभारले होते त्यांच्यातील सैनिकांत वाटून दिली! त्याचप्रमाणे अेकंदर साम्राज्यातील हिंदु-मुस्लिम अशा अुभय जातीच्या सैनिकांचेही वेतन वाढविले. सैनिकवर्ग अशा प्रत्यक्ष लाभामुळे संतुष्ट करून त्याने साम्राज्यात पूर्वीच्या कोणत्याही सुलतानाने ज्या सवलती आणि सुधारणा शेतकरी आणि सामान्य हिंदु-मुस्लिम नागरिकांना अुपभोगू दिल्या नव्हत्या, त्या त्याने चालू केल्या. त्याचप्रमाणे त्याने धार्मिक छळापायी बंदिवासात टाकलेले सहस्त्रावधि हिंदु बंदिवान आणि पूर्वीच्या सुलतानास अप्रिय वाटले म्हणूनच केवळ बंदिगृहात टाकलेले शतावधि मुसलमान बंदिवान्सुद्धा बंदिगृहातून मुक्त केले. या सर्व कृत्यांमुळे साम्राज्यातील हिंदूंत तर काय, पण मुसलमानांतही हा हिंदु सम्राट 'धर्मरक्षक' लोकप्रिय झाला.

त्याचप्रमाणे प्रत्येक मुस्लिम सुलतानामागून सुलतानाने हिंदूंवर जिझिया, त्यांच्या यात्रांना बंदी, तीर्थस्थानांना बंदी अित्यादी ज्या ज्या धार्मिक अपमानास्पद अटी लादलेल्या होत्या, त्यापासून त्याने हिंदूंची तत्काळ मुक्तता केली, हे सांगणे नकोच! अर्थात् यच्चयावत हिंदुजनतेत आपला कोणीतरी त्राताच अवतरला आहे, अशी मुक्ततेची नि आनंदाची भावना अुचंबळली यात काय आश्चर्य!

हा हिंदुसम्राट मलबारमध्ये साऱ्या दक्षिणेचा विजेता म्हणून, पण खुश्रूखान या नावाने, मुस्लिमपणाच्या पांघरूणाखाली, जेव्हा लढत होता, तेव्हापासूनच, या राज्यक्रांतीची योजना त्याच्या डोक्यात रुळू आणि जुळू लागलेली असल्यामुळे, केवळ त्याच्याच आधारावर अवलंबिणारे मुसलमानी राज्याधिकारी नि सैन्याधिकारी, जे त्यानेच अुदयास आणविले होते, ते सर्व अर्थातच तो हिंदुसम्राट धर्मरक्षक (नासिरूद्दिन) सुलतान म्हणून अुद्‌घोषित झाल्यानंतरही, आपल्या स्वार्थासाठी, आणि त्यांचा मत्सर नि द्वेष करणारे पुरातन मुस्लिम खान, निजाम, नबाब जे होते त्या स्वधर्मीय मुसलमानांपासून आपले रक्षण

करण्याच्या बुद्धीनेही, या हिंदुसम्राटाच्या, धर्मरक्षकाच्या स्वामित्वाशी राजनिष्ठ राहिले! कारण, अनेक हिंदुराज्यांतून त्या त्या हिंदुराजांच्या सैन्यात किंवा सरदारक्यांत अेकनिष्ठ सेवा करण्याची सवय गेल्या दोन-चार शतकांमध्ये राजकीय संमिश्रणामुळे मुसलमानांनाही लागलेली होती! हिंदूराजांची राजकीय सेवा ही, अगदी पूर्वी, मुसलमान हिंदुस्थानात आले तेव्हा, जी अिस्लामी धर्मबाह्य गोष्ट समजली जात असे, ती या काळापर्यंत मुसलमानांतून नष्ट झालेली होती; आणि तीही मुसलमानी धर्मास धरूनच असू शकते, अशी राजकीय समजूत मुसलमानांतही दृढ होत आलेली होती ! याची अुदाहरणे या ग्रंथात पूर्वी येअून गेलेली आहेत आणि पुढेही येतील. अर्थात् हिंदुराज्यांच्या हाताखाली, कितीही मोठा राजकीय अधिकार घेणे, जरी मुसलमानी धर्मबाह्य नसले तरी अनेक कट्टर मौलाना, मौलवी त्या कृत्यास आपद्धर्मीय आणि मुसलमानी राजसत्तेखाली ठेवलेल्या अेखाद्या सुरुंगाप्रमाणे समजून मनात जळत असत! हिंदु तर अगदी पूर्वीपासूनच मुसलमानांच्या सैन्यात, मुसलमानांच्या बाजूने लढण्याने हिंदुधर्म बुडतो असे मानीतच नसत! केवळ मुसलमानांबरोबर खाणेपिणे केले किंवा मुसलमान स्त्रियांशी शरीरसंबंध ठेवले म्हणजे, काय तो, त्यांचा हिंदुधर्म बुडतो, अशी त्यांची हिंदुत्वाची आत्मघातक व्याख्या असे.

आपले हिंदुत्व घोषित करताच, ह्या हिंदुसम्राटाने तेथेच विसावा घेतला नाही; तर, ते प्रत्यक्ष मुसलमानांच्या समक्ष निर्भयपणे कार्यवाहीत आणण्यास आरंभिले. सम्राटाच्या राजवाड्यातील, म्हणजे दिल्लीच्या बादशहाचा दिवाण-अी-आम आणि दिवाण-अी-खास यांसारख्या मुस्लिम संस्कृतीच्या गाभाऱ्यातील पवित्रस्थानीही आता हिंदुमूर्तींची आणि हिंदुदेवांची लगोलग स्थापना करण्यात आली. राजवाड्यातील सर्व पूजा-अर्चा आणि सम्राटाचे धार्मिक विधी हिंदुधर्माप्रमाणे होअू लागले! कुराणातील आयते लुप्त हौअून हिंदूंचे मंत्रघोष नि भजने दुमदुमू लागली! स्वतः हिंदुसम्राट आणि त्याच्या त्या पूर्वीपासून हिंदूच राहिलेल्या नि राजवाड्यात पहारा देत असलेल्या शतावधी स्वजातीय सैनिकांच्या सशस्त्र पृतना त्या हिंदूंच्या नव्या देवमूर्तींचे पूजन आणि संरक्षण करीत होत्या. राजधानीतून तर हिंदू नागरिकांच्या आणि विशेषतः हिंदू सैनिकांच्या अुत्साहाला पारावार नव्हता! पूर्वी अेखादी हिंदु राजधानी जिंकताच ज्याप्रमाणे आक्रमक मुसलमान तेथल्या मंदिरातील मूर्ती फोडून टाकून त्यांच्या मशिदी बनवीत त्याचप्रमाणे आणि त्याच न्याये प्रत्याक्रमण करून या प्रत्याक्रमक हिंदूंनी मशिदी मशिदीतून नवीन नवीन देवमूर्ती स्थापित केल्या आणि मशिदींची मोठ्या समारंभाने मंदिरे बनविली आणि ती मंत्रघोषांनी दुमदुमून जाअू लागली! हिंदूंचे मंदिर मुसलमानी आक्रमक त्यात गायी मारून जेव्हा भ्रष्टवीत, त्यांच्या मशिदी बनवीत, तेव्हा परधर्मसहिष्णुतेच्या व्याधीने क्लीब बनलेल्या अेकंदर हिंदुसमाजाच्या मनातल्या मनात अपमानाच्या नि दुःखाच्या अिंगळ्या कशा दंश करीत असतील, याची काही कल्पना, त्या सुलतानशाहीच्या राजधानातील लाखो मुस्लिम धर्मोन्मत्त मुसलमानांनाही, या हिंदु परिवाराच्या धार्मिक सशस्त्र प्रत्याक्रमणामुळे, तेव्हा येअू शकली असलीच पाहिजे!

अशा हिंदूंनी केलेल्या अपवादात्मक सशस्त्र धर्मक्रांतीच्या खवळलेल्या अुत्साहात काही मुसलमान लेखक आरोपितात त्याप्रमाणे कुराणादि मुस्लिम धर्मग्रंथांचीही ''विटंबना'' झाली असल्यास असेलही. नालंदाच्या साऱ्या विद्यापीठाला आग लावून, हिंदूंचे सहस्त्रावधि धर्मग्रंथ जळत राहिलेले असता, जे मुसलमान काफरांच्या धर्मग्रंथांच्या त्या होळीला फिदीफिदी हसत, तेथे शेकत बसलेले होते, त्यांना, ''गाझी' समजणाऱ्या मुसलमानांना, तरी, दिल्लीच्या त्या मुस्लिम धर्माच्या विध्वंसक कृत्यांना दोषिण्याचा लवलेश अधिकार अुरलेला नव्हता! त्यांचे जे हिंदु परिया अनुयायी होते त्यांची, त्या हिंदुसम्राटाने, पूर्वीच्या सुलतानांच्या तरुण पत्नी, मुलीबाळी अित्यादी ज्या मुस्लिम स्त्रिया होत्या त्यांना त्यांच्या अिच्छेने हिंदू करून त्यांच्याशी लग्ने लावून दिली.

परंतु ह्यापुढे जाअून, मुसलमान आक्रमक जसे कोणतेही हिंदुराज्य पादाक्रांत करताच लक्षावधि हिंदूंना शस्त्रबळाने बाटवीत असत, मंदिरे धडाधड पाडीत वा जाळीत असत, सहस्त्रावधि हिंदू स्त्रियांना बलात्कारून गुलाम करीत असत, हिंदूंची लूटमार आणि सरसकट कापाकापी करीत असत, तसले धार्मिक वा आर्थिक शस्त्राचार या 'धर्मरक्षकाने'

राज्यात तर काय पण दिल्लीतही मुसलमान जनतेवर केले, असे मुसलमान अितिहास - लेखकांनीही काही अुल्लेखिलेले नाही.

अर्थात जर त्याने मुसलमानांच्या वरील नेहमीच्या अत्याचाराचा सूड घेण्यासाठी हिंदुत्वाचा अभिमान धरून मुसलमानांवर तसेतसे प्रत्याचार केले असते तर ते त्या क्रांतिकारक हिंदुसम्राटाला अधिक गौरवास्पदच ठरले असते! त्याच्या हिंदुजातीचा दरारा अहिंदु आक्रमकांना पूर्वी कधीही बसला नव्हता अितक्या बलवत्तरपणे बसला असता! अत्याचाराची नांगी तसतसे प्रत्याचारच काय ते ठेचू शकतात, हे आम्ही ''पूर्वार्धात' स्पष्ट केलेलेच आहे.

परंतु त्या ''धर्मरक्षकाने (नासिरूद्दिनाने) हेही शस्त्राचार मुसलमानांवर जे केले नाहीत, त्याचे मुख्य कारण, स्व-परपक्ष बलाबलाची जाणीव न विसरणारी त्याची राजनीति-पटुता, हेच काय ते, असले पाहिजे! जर त्याला हिंदुस्थानातील अुभ्या हिंदू समाजाचा आणि त्या काळी विद्यमान असलेल्या हिंदू राजांचा लगोलग नि सक्रिय पाठिंबा मिळाला असता, जर त्याने दिल्लीला जशी बाटलेल्या सहस्त्रावधि हिंदूंची त्यांच्याच अिच्छेने सामुदायिक शुद्धीकरणे केली, मशिदींची मंदिरे बनविली, अित्यादी धार्मिक क्रांतिकारक घटनांपुरता तरी अुघड पाठिंबा देणारी अुठावणी हिंदुस्थानातील राजपुतान्यापासून दक्षिणेपर्यंतच्या राज्यकेंद्रीय नगरानगरांतून नि तीर्थक्षेत्रातून हिंदूंनी अुघडपणे केली असती; आणि हिंदुसाम्राज्याची द्वाही फिरवली असती, तर मुसलमान आक्रमक जशी हिंदूंची ससेहोलपट अत्याचारांनी करीत, तशीच, हिंदूंचा सूड, अत्याचारांनी साऱ्या राज्यात ठिकठिकाणी, त्या ''धर्मरक्षका'नेही शस्त्रबळाने, अुगवीत लाखो मुसलमानांचीही ससेहोलपट केली असती!

परंतु हिंदुस्थानभर हिंदु राजांनी आणि लोकांनी या हिंदु राज्यक्रांतीला तसा अुघड-अुघड सक्रिय पाठिंबा दिला नाही. त्याना मनांतून मात्र साभिमान नि अपार हर्ष झालेला होता आणि मुसलमानी सुलतानशाहीचे नाकच कापून टाकले, याविषयी ''हिंदुरक्षकाला' सर्व हिंसुसमाज आणि हिंदुराजे जरी धन्यवादच देत होते तरी प्रत्यक्ष अुठावणी अशी कोणीही केली नव्हती. हिंदुसाम्राज्य स्थापनेला अशा अत्यंत अनुकूल असलेल्या संधीचाही हा जो अवसानघातकीपणा केला गेला त्याचे अेक कारण हे होते की, हिंदूंना सभय शंका वाटे की, अद्‌भुत क्रांती झाली खरी; पण ती टिकेल का? नाहीतर ती कोलमडल्यास तिला आम्हा सक्रिय पाठिंबा देणाऱ्यांचाही सत्यानाश झाल्यावाचून राहणार नाही! म्हणून हिंदु समाज नुसता वाट पाहत राहिला. दुसरी गोष्ट अशी की, दिल्लीकडे चाललेली मुसलमानांची सामुदायिक शुद्धीकरणे ही तरी हिंदुसमाजाला धर्म्य म्हणून कुठे वाटत होती? त्या काळच्या हिंदूंचा धर्म ''शुद्धिबंदी' हा होता! ''शुद्धीकरण' हा नव्हता!'' पर धर्मसहिष्णुता' हा त्यांचा सद्‌गुणविकृतीच्या व्याधिग्रस्ततेमुळे धर्म होता! मशिदी पाडणे किंवा मुसलमानांना बळाने शुद्ध करणे हा नव्हता! अशा प्रत्याचारांना हिंदूच अेकंदरीत महापाप समजत! तेव्हा हिंदुसमाजच ह्या धर्मक्रांतीच्या विरुद्ध अुठाव करणार नाही हे तरी कुठे निश्चित होते? मग मुसलमानांच्या विरोधाची गोष्टच बोलायला नको!

अशा स्थितीत, दिल्लीमध्ये त्याने केलेली धर्मक्रांती आणि राज्यक्रांती हीच मुळी अितकी धाडसाची आणि मुसलमानी राजसत्तेचे नाकच कापून टाकणारी घटना होती की, अखिल भारतीय हिंदुसमाजात तितकी तरी, अुठावणी सक्रियतेने पचविण्याची शक्ती आणि धाडस आहे, अितके जरी सिद्ध झाले तरी प्रस्तुत पुष्कळ साधले! मग पुढचे पाऊल, पुढची संधी मिळताच, यशस्वीपणे घेअूच घेअू. सध्याच तुटेल अितके ताणणे श्रेयस्कर नाही, अशा विवेकानेच काय ते त्या ''धर्मरक्षकाने'' (नासिरूद्दिनने) दिल्लीतील किंवा राज्यांतील मुसलमानांवर कोणताही अधिक धार्मिक शस्त्राचार केला नाही.

अुलट त्याने, आधी सांगितल्याप्रमाणे, त्याच्या राज्यातील मुसलमानी सैन्याला, शेतकऱ्यांना, नागरिक प्रजाजनांना हिंदू प्रजेप्रमाणेच नवीन सवलती आणि कराची सूट समानतेने दिली. त्यातही, जे मुसलमान राज्याधिकारी किंवा मुसलमान धर्माधिकारी मनातून, या हिंदुपक्षीय धर्मक्रांतीविषयी, चडफडत असावेत असा त्यास संशय येअी त्यांना तो, त्यांच्याशी राजनिष्ठ

असलेल्या मुसलमानी अधिकाऱ्यांसारख्याच अत्यंत मूल्यवान भेटी वारंवार धाडून आणि सन्मानाने वागवून आपले मिंधे करून ठेवी.

या राजनीतिपटुत्वामुळे, अेवढी मोठी धर्मांध मुसलमानाविरूद्ध, हिंदुधर्मक्रांति आणि राज्यक्रांति झालेली असताही, त्या हिंदुसम्राटाचे राज्यात, प्रथम प्रथम, महिनोगणती कोणतेही मुसलमानांचे बंड तर सोडाच, पण दंगेधोपे सुद्धा झाले नाहीत. ते त्या हिंदुसम्राटाचे, सारे राज्ययंत्र मुसलमान सुलतानांच्या वेळेप्रमाणेच, सुरळीतपणे चालले होते. राजस्व (महसूल) किंवा कर किंवा खंडण्या प्रांताप्रांतांतून दिल्लीस बिनबोभाट येत होत्या. प्रत्यक्ष दिल्लीमध्ये, राजमंडळाच्या राजसभांसाठी (दरबारासाठी) मोठे-मोठे मुसलमान सामंत, सेनानी, सरदार नि अधिकारीही ह्या हिंदु सम्राटाच्या आज्ञेसरशी राजवाड्यात येअून, त्या छत्रचामरादि हिंदुराजचिन्हांच्या दैदीप्यमान प्रभावळीत, सिंहासनावर आरूढ झालेल्या, हिंदु सम्राटाच्या राजसभांत (दरबारात) आपापल्या नियत मर्यादेप्रमाणे, अुपस्थित राहत असत. ह्या मोठमोठ्या मुसलमान सरदारांपैकी, त्या वेळच्या मुसलमान अितिहासकारांनीच दिलेल्या नावातून, केवळ वानगीसाठी, खाली काही नावे देत आहो. अैन-अुल-मुल्क मुल्तानी, युसुफ साफी, हतीम खान, कमलुद्दिन सूफी, फकिरूद्दिन तघलख, मुगलटी महंमद शाह, बहराम अनय्या, युकलाखी, होशंग, काफूरसाहेब असल्या त्या काळच्या मुसलमान धेंडांची अुपस्थिती आणि बहुतेक प्रांतांच्या सुभेदारांची, प्रशासकांची आणि मुस्लिम सैन्याच्या ठिकठिकाणच्या शिबिरांतील मुस्लिम सेनानींची लेखी मान्यतापत्रेही, त्या हिंदुसम्राटाच्या सेवेस सादर झालेली असल्यामुळे, साऱ्या राज्यात मुसलमानी समाजात अशांतता अशी कोणतीच कुठे महिनोगती प्रादुर्भवली नाही!

अिकडे, हिंदुराजांनी राजपुतान्यापासून तो मदुरेपर्यंत बहुधा पूर्वीच्या गुप्त कराराप्रमाणे, त्या हिंदुसम्राटाच्या ह्या क्रांतिविरूद्ध कोठेही चकार शब्द काढला नाही. अितकेच नव्हे, तर, ह्या दिल्लीच्या हिंदुक्रांतिचा लाभ घेअून आपआपली हिंदुराज्ये ठायी ठायी पुन्हा स्वतंत्रपणे चालविण्यास आरंभ केला. त्यांचा मुख्य दोष हा घडला की, त्यांनी अशा अत्यंत अनुकूल संधीस अेकत्रपणे नि अेकमुखाने अेककेंद्रीय हिंदुस्वातंत्र्याची आणि साम्राज्याची घोषणा नि प्रस्थापना केली नाही!

ह्या परिस्थितीत, त्या हिंदुसम्राटाचे राज्ययंत्र प्रथम प्रथम जरी सुरळीत चालू लागले तथापि, तो चाणाक्ष सम्राट 'धर्मरक्षक' हे पक्के जाणून होता की, त्या हिंदुसाम्राज्यक्रांतिचा मुख्य आधार अितर कोणत्याही अुपांगांवर अवलंबून, नसून तो अवलंबत होता केवळ त्याच्या बाहुबलावरच काय तो! यास्तव, त्याने त्याचे जे सहस्त्रावधि निवडक हिंदुसैन्य राजधानीत आणवून ठेवलेले होते, त्याची जय्यत सिद्धता ठेवली होती; आणि राज्यातीलही मुख्यमुख्य संरक्षण केंद्रावर त्याच्या अत्यंत विश्वासू हिंदुसैन्यांच्या आणि विश्वासाच्या शपथा घेतलेल्या मुस्लिम सैन्याच्याही पृतना (पलटणी) युद्धाच्या सिद्धतेत सज्ज ठेवलेल्या होत्या. कारण, सम्राट 'धर्मरक्षक' (नासिरूद्दिन) हा मनातून पुरतेपणी जाणून होता की, आज जरी राज्यातील मुसलमान सर्वत्र आपल्या कह्यात वागत असले आणि आपल्याशी राजनिष्ठा व्यक्तवीत असले तरी आज ना अुद्या त्यांच्यातील कोणता तरी विद्रोही मुसलमानी गट अुत्पन्न होअून ह्या आपल्या हिंदुक्रांतीविरूद्ध सशस्त्र प्रतिक्रांती करण्याचा अुठाव केल्यावाचून राहणार नाही!

स्थलाभावामुळे, मध्यंतरीच्या अितर घटना गाळून अितके सांगणे पुरे आहे की, अेकही दिवस जे राज्यमंत्र सुरळीत चालू शकेल असे कोणालाही वाटणे दुर्घट होते, तेच मुसलमानांची सुलतानशाही अुलथून देअून त्या 'तख्ता'सच हिंदुसम्राटाचे सिंहासन बनविणाऱ्या आणि जवळजवळ साऱ्या भरतखंडावर फडकत असलेला मुस्लिम हिरवा चांद अुखडून टाकून, त्या साम्राज्यावर हिंदुध्वज फडकविणाऱ्या, ह्या अद्‌भुत नि अतर्क्यपणे यशस्वी झालेल्या, हिंदुधर्मक्रांतीचे आणि राज्यक्रांतीचे राज्ययंत्र अेक दिवस नव्हे, अेक महिना नव्हे, तर न्यूनाधिक अेक वर्षपर्यंत सुरळीतपणे चालत राहिले! साम्राज्यातील लक्षावधि, 'अमीर' असो वा गरीब असो, यच्चयावत् मुसलमान त्या हिंदुसाम्राज्याचे प्रभुत्व निमूटपणे मानीत राहिला, वर्षभर तरी त्या हिंदुसम्राटाच्या राजाज्ञा मोठमोठे मुस्लिम प्रांताधिप आणि त्या हिंदुसम्राटाची आज्ञापत्रके सारी

मुस्लिम जनता शिरवंद्य मानीत राहिली. हेच त्या काळच्या हिंदु-अितिहासाला भूषणभूत असणारे अविस्मरणीय असे अेक महदाश्चर्य होते.

आणि त्या काळच्या आणि आजपर्यंतच्या हिंदू अितिहासाला दूषणास्पद असणारे दुसरे महदाश्चर्य जे होते ते हे की, अितक्या भूषणास्पद असणाऱ्या हिंदुसाम्राज्यक्रांतीचा, धर्मक्रांतीचा आणि त्यांच्या निर्मात्या त्या हिंदुसम्राट 'धर्मरक्षका'चा अुल्लेख सुद्धा हिंदु-अितिहासात कृतज्ञपणे तर सोडाच, पण ठळकपणेही केला जाअू नये! आणि जे काही दहा-पांच शब्द मुसलमानी अितिहासाच्या अनुकरणाने अुल्लेखिले गेलेले आहेत, ते त्याच्या गर्ह्य निंदेनेच काय ते बरबटलेले असावेत!

## धियासुद्दिन तघलख

परंतु हे आश्चर्याचे पहिले वर्ष गेले न गेले तो मुसलमानांतील अुच्चाधिकारावर असणाऱ्या अेकदोन व्यक्तींनी, या हिंदुसम्राटाच्या सत्तेचे जोखड मुसलमानांच्या मानेवरून फेकून देण्याचे कारस्थान रचण्याचे धाडस केले. ''मुसलमानांचा सुलतान, हा अेक, धर्माने अुघड अुघड हिंदू म्हणून सिंहासनावर असावा, मुसलमानांचे बादशाही तख्त कोण्या हिंदुसम्राटाचे सिंहासन व्हावे, हा साऱ्या जगातील अिस्लामाचा असह्य अुपमर्द आहे; अेका 'काफरापुढे' आम्हा मुसलमानांना मान लववून गुडघे टेकून सलाम करणे भाग पडावे, ह्या अिस्लामच्या विटंबनेचा अंत करण्यासाठी आपण साऱ्या मुसलमानांनी जिहाद, धर्मयुद्ध पुकारलेच पाहिजे,'' अशी चिथावणी गुप्त पत्रके धाडून नि तोंडोतोंडी काही धर्मांध मौलवी मशिदी-मशिदीतून मुस्लिम समाजाला गुप्तपणे देतच होते, पण, अुघड अुघड बंडाच्या नेतृत्वाचे धाडस करणारा कोणीही बलवत्तर मुसलमान अमीर, सेनापती वा अधिकारी असा पुढे येअीना, ते धाडस करण्याचे दायित्व शेवटी धियासुद्दिन नावाच्या दिल्लीच्या सुलतानाच्या हाताखालील, पंजाब प्रांतावर नेमलेल्या प्रशासकाने नि प्रांतसेनापतीने, स्वतःच्या अंगावर घेण्याची महत्त्वाकांक्षा धरली, सुलतान नासिरुद्दिनाच्या हाताखाली असलेल्या मोठमोठ्या मुस्लिम सेनानींना नि प्रांताधिकाऱ्यांना त्या अर्थाची गुप्तपत्रके धाडण्याचा त्याने प्रयत्न चालविला. स्वतः धियासुद्दिन ह्याने सम्राट 'धर्मरक्षक' (नासिरूद्दिन) ह्याला आपला सुलतान म्हणून मान्यता दिलेली होतीच. आणि त्या सुलतानी सेवेतच तो सुलतानी सैन्याच्या अेका विभागाचा सेनानी म्हणून पंजाबवर प्रांताधिकारी नेमलेला होता. त्याचा अेक मुलगा दिल्लीलाच नासिरूद्दिनाच्या हाताखाली अधिकारी होता. धियासुद्दिनाने त्या आपल्या मुलाला काही निमित्त काढून भेटीस बोलाविले. तो पंजाबमध्ये धियासुद्दिनाला अंतःस्थपणे भेटताच दिल्लीतील सारी बारीक माहिती त्याने विचारून घेतली. सुलतान अल्लाअुद्दिनाची हत्या झाल्यानंतर, त्याच्या मुलां-नातवांना ठार मारले गेल्यामुळे किंवा डोळे काढून निकम्मी केल्यामुळे, अल्लाअुद्दिनाचा राजपदार्ह वंशज असा कोणीही कुठेही अुरलेला नाही, हे धियासुद्दिनास नक्की कळले तेव्हा त्याला अधिकच अवसान चढून त्याने अुद्घोषिले की, ज्याअर्थी, सुलतान अल्लाअुद्दिनाचा कोणीही वंशज अुरलेला नाही. त्याअर्थी, त्याच्या तख्तावर कोणत्या तरी समर्थ अशा मुसलमान पुरुषालाच अधिकार असू शकतो. ह्या काफर हिंदु परियाचा तर त्या तख्तास स्पर्श होता कामा नये. या काफराने मागच्या सुलतानाच्या राजवाड्यात असलेल्या सगळ्या विधवा आणि मुलीबाळी प्रभृति मुस्लिम स्त्रियांची, केवळ मुसलमानांवर सूड घेण्यासाठी, त्याच्या जातीच्या ज्या परियांना (भंग्यांना) मोठमोठे अधिकार त्याने दिलेले आहेत, त्यांच्याशी लग्ने लावून दिली आहेत; आणि त्या सर्व राजकुटुंबीय मुस्लिम महिलांना हिंदू करून घेतलेले आहे, आणि या पापी हिंदू काफराला मुसलमानांच्या सुलतानी तख्तावरून खाली खेचण्याचे साहस ज्या अर्थी, कोणीही मुसलमान करीत नाही त्या अर्थी मीच तो अधिकार गाजविण्याचे दायित्व आपणावर घेत आहे.

त्याच्या या बंडाच्या गुप्तपत्रिकांना प्रथम बहुतेक मुसलमान अुच्चाधिकाऱ्यानी निषेधिले, काहींनी तर सम्राट 'धर्मरक्षका' च्याच (नासिरूद्दिनच्या) हाती ती पत्रके नेअून दिली. पण आधीपासूनच अशा बंडाचा संभव ओळखून असणाऱ्या त्या हिंदुसमाटाने न डगमगता धियासुद्दिनाच्या ह्या अुठावणीला तत्काळ चिरडून टाकण्याची सैनिकसिद्धता केली. त्याला सुलतान म्हणून मानणाऱ्या अनेक मुस्लिम सेनानींनी त्यांची मुस्लिम सैन्य त्याच्याच सेवेस सादर केली. त्या 'बादशाही' सैन्यातील हिंदुविभाग तर त्याच्या ध्वजाखाली प्राणपणे लढण्यास सिद्ध होताच.

शेवटी धियासुद्दिनाने त्याच्या स्वतःच्या हाताखालील जो सुलतानी सैन्याचा विभाग सरसीमेच्या नि पंजाबच्या संरक्षणासाठी ठेवलेला होता, त्या मुख्यतः मुस्लिम सैन्याच्या बळावरच दिल्लीवर चालून जाण्याचे ठरविले. त्यात काही हिंदू सैनिकही होते. धियासुद्दीन दिल्लीवर चालून येतो आहे हे कळताच हिंदुसम्राट 'श्री धर्मरक्षक' ही (सुलतान नासिरूद्दीन हाही) आपले सारे सुलतानी सैन्य घेअून त्याच्यावर चालून गेला. हिंदुसम्राटासह मोठमोठे मुस्लिम सेनानीही आपापल्या मुस्लिम सैन्यासह रणांगणांत त्याच्या आज्ञेखाली लढण्यास निघाले होते. सुलतानाच्या सैन्याची आणि धियासुद्दिनाच्या सैन्याची गाठ पडताच पहिल्या दिवशी सुलतान नासिरूद्दिनाच्या सुलतानी सैन्याचा विजय झाला. धियासुद्दिनाला रणांगण सोडावे लागले. पण, त्याने धीर सोडला नाही. आता कचरलो तर माझा सत्यानाश ठरलेलाच आहे; जयाची नि जिवाची काही आशा धारिष्ट्यातच आहे असा निर्वाणीचा निश्चय करून धियासुद्दिन पुन्हा लढाअीची फळी बांधून अुभा राहिला. त्याच दिवशी धियासुद्दिनाच्या सुदैवाने, सुलतानाच्या सैन्यातील अेक-दोन मुसलमान सेनानींनी, हिंदुसम्राटाचा आयत्या वेळी विश्वासघात करण्याचा कट करून ते आश्वासन धियासुद्दिनाला गुप्तपणे दिले. तेव्हा अधिकच अुत्तेजित होअून धियासुद्दिन आपण होअून सुलतान नासिरूद्दिनाच्या (हिंदुसम्राट 'श्री धर्मरक्षकां'च्या) सैन्यावर तुटून पडला. त्या रणधुमाळीत सुलतानाच्या हाताखाली वर अुल्लेखिलेल्या काही मुस्लिम सैन्य विभागांनी आयत्या वेळी विश्वासघात केल्यामुळे सुलतान नासिरूद्दिनाच्या सैन्याचा पूर्णपणे पराभव झाला. तेव्हा रणांगणातून तो सम्राट 'श्री धर्मरक्षक' (नासिरूद्दिन) निसटून दिल्लीस निघाला. परंतु धियासुद्दिनही विजयोन्मादाने सरळ दिल्लीवरच चालून गेला. त्या पाठलागात अशरण अवस्थेत हा सम्राट 'श्री धर्मरक्षक' शेवटी शत्रूच्या हाती सापडला!

विजयी धियासुद्दिनाने बंदिवान केलेल्या सुलतान नासिरूद्दिनाला आपल्या समोर आणविले आणि सुलतान मुबारीकचा खून केल्याचा आरोप त्याच्यावर ठेवून त्याला ठार मारण्याची शिक्षा देण्याचा चंग बांधला. तेव्हा त्याला धियासुद्दिनाने शेवटचा प्रश्न म्हणून विचारले की, 'राजकारणाचा अथवा सुलतानपदाचा प्रश्न सोडला असता अेक व्यक्ति या नात्याने मुबारीकचा व्यक्तिशः खून करण्यासारखा त्याने तुझा अेखादा वैयक्तिक अपराध केला होता की काय? तेव्हा त्या बंदिवान नासिरूद्दिन खुश्रूखानाने अशा आशयाचे अुत्तर दिले की 'अर्थात्! माझ्या कोवळ्या वयापासून त्या नीच नि व्यसनग्रस्त दुष्टाने माझ्या शरीरावर जे असह्य असे समसंभोगादि लैंगिक बलात्कार केले आणि माझ्या जीवनाची विटंबना केली त्याची चीड येअूनच मी प्रतिज्ञा केली होती की, ह्या वैयक्तिक अत्याचारांचा संधि सापडताच सूड अुगविण्यासाठी मी या दुष्टाचा जीव घेतल्यावाचून राहणार नाही!'

यानंतर धियासुद्दिनाने त्या बंदिवान हिंदुसम्राटाला - नासिरूद्दिनाला तत्काळ ठार करविले!!

हिंदुसम्राट ' श्री धर्मरक्षक' (नासिरूद्दीन) याचा असा शोकपर्यवसायी अंत झाला! पण हिंदूंचा पूर्वपरंपरागत दिल्लिचा शेवटचा हिंदुसम्राट जो वीरवर पृथ्वीराज त्यालाही शेवटी लढाअीत मुसलमानांचे हातून पराजय झाल्यानंतर शत्रूंनी असेच ठार मारले होते!

आणि पंजाबचा श्री गुरू वीरवर बंदा? त्याने मुसलमानांना धारेवर धरून, अनेक विजय मिळविल्यानंतर, तो असाच लढाअीत मुस्लिम बादशहाच्या हातात जेव्हा पडला तेव्हा त्याला पिंजऱ्यामध्ये हिंस्त्र पशूप्रमाणे बंद केले गेले; आणि तापलेल्या सांडसाने त्याच्या देहाचे मांस अुपसून काढून, त्याचा मुसलमानांकडून अनन्वित छळ केला गेला नाही का?

पण असे अनेक हिंदु वीरावतंस शेवटी पराजित झाले म्हणून त्यांचे ते ते हिंदुधर्मार्थ केलेले बलिदान आणि त्या विषयीची त्यांच्यासंबंधीची कृतज्ञता विसरेल असा कोणीही हाडाचा हिंदू निघेल काय? कारण, अशांच्याच स्मृती राष्ट्राची स्फूर्तिस्थाने युगानुयुगे होअू शकतात!

हे हिंदुसम्राट 'श्री धर्मरक्षक'! तुझेही हे बलिदान हिंदुराष्ट्राचे असेच अेक स्फूर्तिस्थान आहे! तुझ्याविषयी तुझ्या काळच्या किंवा त्यानंतरच्या हिंदू पिढ्यांनी कृतज्ञतेचा अुच्चार अेका शब्दानेही केला नाही, तुझी स्मृतिसुद्धा ठेवली नाही, या आम्हा हिंदूंच्या कृतघ्नतेचे प्रायश्चित घेण्यासाठीच या ग्रंथात तुला हे स्वतंत्र प्रकरण आम्ही वाहिलेले आहे!!

जर तू मुसलमान सुलतान म्हणूनच राहिला असतास तर कुतुबुद्दिनासारखे किंवा घियासुद्दिनासारखे ते बहुतांश भरतखंडाचे मुस्लिम सुलतानपद त्यांच्या गुलाम घराण्याप्रमाणे किंवा खिलजी घराण्याप्रमाणे तुला आपल्या घराण्यात वंशपरंपरा ठेवता आले असते. पण, तू हिंदुधर्माचा आणि हिंदुराष्ट्राचा अभिमान धरून त्या मुस्लिम सुलतानपदाचीच 'शुद्धि' केलीस, तख्ताचे 'सिंहासन' केलेस आणि मुस्लिम सुलतानपदावर थुंकून हिंदुसम्राट अशीच आपली स्वत:ची पदवी अुद्‌घोषिलीस.

सम्राट पृथ्वीराजानंतर प्रत्यक्ष दिल्लीच्या सिंहासनावर हिंदुसम्राट म्हणून चढण्याचे धाडस तूच केलेस! अत्यंत हीनदीन हिंदू-कुटुंबात जन्म झाला असता, मुस्लिम शत्रूंनी तुला लहानपणीच बाटवून मुस्लिमांचा गुलाम करून टाकले असता, तू आपल्या शौर्याने, कर्तृत्वाने, सैनिकी पराक्रमाने आणि कारस्थानपटुत्वाने सुलतानांचा सुलतान झालास आणि हिंदुधर्माचा डिंडिम साऱ्या भरतखंडात दुमदुमविलास! हे तुझे अेका दृष्टीने अलौकिक असलेले चरित्र हिंदुराष्ट्रास आणि जगतासही अितिहासक्षेत्रामध्ये 'साधार' सांगण्याचे कर्तव्य या प्रकरणात आम्ही यथाशक्य तितके केले आहे!

ह्या हिंदुराज्यक्रांतीचे खरे वैशिष्ट्य ते हेच की, हिंदु मुसलमानांच्या, शतकोशतके चाललेल्या, महायुद्धमालिकेत सशस्त्र राजकीय आघाडीवर हिंदुराष्ट्र जरी अेकंदरीत जशास तसे लढत मुसलमानांना पुरून अुरले आणि शेवटी त्याने मुसलमानी राज्यसत्तेचे पूर्ण अुच्चाटन केले; त्याप्रमाणे, त्या महायुद्धाची जी दुसरी आघाडी, म्हणजे हिंदुधर्मावरील मुस्लिमांनी केलेली सशस्त्र आक्रमणे होती, त्या सशस्त्र धार्मिक आघाडीवर मात्र, हिंदुराष्ट्राला अेकसारखी हार खावी लागली त्याचे कारण आम्ही पूर्वार्धात सविस्तरपणे विवरिलेच आहे. शुद्धिबंदी अित्यादी आत्मघातकी रूढींच्या शृंखला आणि सद्‌गुणविकृतीसारख्या व्याधी ह्यांच्यापायी हिंदु, मुसलमानी धर्मावर, सशस्त्र धार्मिक प्रत्याक्रमण करू शकले नाहीत! पण, हिंदुसम्राट 'श्री धर्मरक्षक' ह्याने राजकीय आघाडीप्रमाणेच मुसलमानी धर्मावरही जशास तसे या न्यायाने सशस्त्र धार्मिक प्रत्याक्रमण केले! पूर्वी वर्णिल्याप्रमाणे, हिंदूंना मुसलमान जसे बळाने बाटवीत तसेच, मुसलमानांनाही, भर दिल्लीत ''श्री धर्म रक्षकाने'' (नासिरुद्दिनाने) सशस्त्र बळाने शेकडो मुसलमानांना हिंदू करून घेणारे सामुदायिक शुद्धिसमारंभ केले. हिंदू स्त्रियांना बलात्कारून जसे मुसलमान बेधडक बाटवीत त्याचप्रमाणे हिंदूंनीही मुसलमानी सुलतानाच्या भर अंत:पुरात शिरून, त्यांच्या अनुकूल झालेल्या मुस्लिम स्त्रियांना हिंदू करून घेअून आपल्या हिंदू अनुयायांशी त्यांची लग्ने लावून दिली! मुसलमान बळाने मंदिरे पाडीत, तर श्री धर्मरक्षकाने या क्रांतीच्या विजयोत्साहात मशिदींचीच मंदिरे बनविली! अशा अनेक प्रकारे सशस्त्र बळाने हिंदूंवर जसे जसे धार्मिक अत्याचार पूर्वी आणि नंतरही मुसलमान करीत असत त्यांचा सूड घेण्यासाठी तसेतसेच सशस्त्र प्रत्याचार मुसलमानी धर्मावर करून ह्या क्रांतिकारक धार्मिक आघाडीवरही मुसलमानांची धूळधाण कशी अुडवून द्यावी हे सक्रियपणे हिंदूंना श्री धर्मरक्षकाने अितक्या मोठ्या प्रमाणावर आणि अितक्या यशस्वीपणे पहिल्यांदाच दाखवून दिले. मुसलमानांना जर पहिल्यापासून धार्मिक आघाडीवर असे रट्टे खावे लागते तर ते शस्त्रबळाने हिंदुधर्मावर घाव घालतेच ना! अितके ते या हिंदूंनी मुसलमानी धर्माला दिल्लीस हाणलेल्या पहिल्या सशस्त्र फटकाऱ्यासरशी हादरून गेले होते! हेच हिंदुसम्राट श्री धर्मरक्षकाने (खुश्रूखानाने) केलेल्या हिंदुराज्यक्रांतीचे खरे वैशिष्ट्य होय!

अर्थात् ह्या चित्रिलेल्या चरित्राला 'साधार' म्हणून आम्ही जे वर म्हटले आहे ते हेतुत:च म्हटले आहे. यद्यपि, आम्ही तुझ्याविषयी बरा शब्द असा अेखादा अपवाद सोडता, कोणीही लिहिलेला नाही असे दाखविले आहे, तथापि, तुझ्याविषयीच्या त्या विसंगत अुल्लेखातूनच जे सुसंगत वृत्त अनुमानता येते तेही तुझ्या धर्मवीरत्वाला पोषकच आहे. यास्तव, तुझ्या ह्या प्रकरणात आम्ही चित्रिलेल्या चरित्राला यद्यपि लेखी वा तोंडी असा तत्कालीन 'आधार' नसला, सबळ पुरावा नसला, तरीही, अितिहासातील अशा प्रश्नी आणि दैनंदिन न्यायनिर्णयातूनसुद्धा लेखी वा तोंडी पुराव्यांनाही प्रसंगी खोटा पाडणारा असा जो पक्का नैर्बंधिक पुरावा मानला जातो त्या पुराव्यांचा, तुझ्या या चरित्राला, आम्हास नि:शंक असा आधार मिळालेला आहे. तो पुरावा म्हणजे 'परिस्थितीजन्य पुरावा' (Circumstantial evidence) !!!

## परिस्थितिप्रामाण्य

प्रत्यक्ष अनुमान, आप्तवाक्य, अुपमान अित्यादी जी प्रमाणे तर्कशास्त्रात आधार म्हणून मानलेली आहेत त्या सर्वांपेक्षा काही प्रकरणी परिस्थितिप्रामाण्य हे श्रेष्ठ समजले जाते. विशेषतः अैतिहासिक कारस्थाने आणि कट यांविषयी कर्त्याचा हेतु नि भावना अनुमानण्यास परिस्थितीचे प्रामाण्य Circumstantial evidence हाच प्रबळतम आधार मानला जातो आणि मानला गेला पाहिजे. आरोपितांच्या स्वतःच्या स्वाक्षरीने लिहून दिलेल्या स्वीकारोक्तीही (confessions) परिस्थितिप्रामाण्याने त्या छळाबळाने लिहून घेतल्या आहेत, असे जर अनुमानता आले तर ते त्या लेखांचे प्रत्यक्ष नि लेखी प्रामाण्यही खोटे पाडले जाते!

हे तुझे चरित्र तुझ्या तोंडच्या शब्दापेक्षा किंवा तुझ्याविषयीच्या समकालीन किंवा तदनंतरच्या अितिहासलेखकांच्या लेखांपेक्षाही ह्या सर्वतोपरी तर्कशुद्ध असलेल्या परिस्थिती-प्रामाण्यावरच मुख्यतः आधारलेले आहे. अेतदर्थ ते साधार आहेच आहे! तुझे बोल नसले तरी तुझी प्रत्यक्ष कृती कार्येच अधिक बोलकी आहेत.

ह्या हिंदुसम्राट श्री धर्मरक्षकाचा भाअूही मोठा लढवय्या नि कर्तृत्ववान होता. त्याचेही हिंदू नाव अुपलब्ध नाही. कारण, तोही लहानपणीच मुस्लिमांकडून बाटवून गुलाम केला गेला होता. जेव्हा या हिंदुसम्राटाने त्याला गुजराथचा प्रांताधिप म्हणून नेमले तेव्हापासून त्यानेही हिंदुत्वाचा अुघड स्वीकार नि पुरस्कार केला. गुजराथेत मुसलमानी राज्य अुलथून पाडण्यासाठी हिंदूंचा मोठा अुठाव त्याने केला. त्याने हिंदूपैकी लढाअू असे वीस-पंचवीस सहस्त्र स्वतःच्या परवार जातीचे लोक दिल्लीस आपल्या भावाच्या, हिंदुसम्राटाच्या सैनिक साहाय्यासही धाडून दिलेले होते, त्याचा शेवट कसा झाला ते कळत नाही. त्यालाही हिंदूंच्या अितिहासात मानाचे स्थान मिळाले पाहिजे.

आणि या परिस्थितिप्रामाण्याच्या आधारेच या हिंदुसम्राटाच्या वरील राज्यक्रांतीच्या गुप्तकारस्थानातील जी कर्तृत्वशाली सहकारिणी होती हे सिद्धच होते आणि जी दिल्लीची ती हिंदुराज्यक्रांती यशस्वी झाल्यानंतर प्रत्यक्ष हिंदुसम्राज्ञी झाली, त्या यादवराज - पत्नी महाराणी देवलदेवीलाही भिन्न परिस्थितीत भिन्न प्रकारच्या असह्य यातना जरी हिंदुत्वासाठी सोसाव्या लागल्या, तरी शेवटी म्लेंच्छ शत्रूंच्या अत्याचारांचा तिने सूड घेतला. यासाठी, ती सुद्धा, अेखाद्या जोहार करणाऱ्या देवी पद्मिनीसारखीच हिंदुजातीतील अेक वीरांगना मानली गेली पाहिजे!

तिचा शेवट काय झाला हे कळत नाही. त्या काळच्या अेका मुस्लिम लेखकाने अितके काय ते लिहिलेले की, घियासुद्दिन सुलतान झाल्यानंतर, त्याने तिची चरितार्थापुरती काही स्वतंत्र सोय करून दिली होती.

## पण हे बलिदान व्यर्थ गेले नाही!

याप्रमाणे हिंदुसम्राट धर्मरक्षक आणि त्याचे वर वर्णिलेले दोन झुंजार सहाय्यक ह्यांचे त्या आश्चर्यकारक हिंदुराज्यक्रांतीत बलिदान झाले खरे; पण त्या बलिदानाने हिंदुराष्ट्राचे त्याकाळी तितकेच आश्चर्यकारकपणे मनोबळही वाढले. कारण, प्रत्यक्ष दिल्लीत हिंदुसाम्राज्य धार्मिकदृष्ट्यासुद्धा स्थापन होअून अुणेपुरे अेक वर्षपर्यंत साऱ्या भरतखंडातील मुस्लिम राज्यांना, नवाबांना आणि मुस्लिम जनतेला आपल्या तरवारीच्या कह्यात ठेवू शकले. ही वस्तुस्थिती पाहून भरतखंडभर पसरलेल्या हिंदुराजांच्या नि हिंदुजनतेच्या मनावर जे मुस्लिम राजकीय श्रेष्ठत्वाच्या आभासाचे दडपण गेली कित्येक शतके पडले होते त्याचा अकस्मात चक्काचूर झाला. आपण सर्वांनीही असेच थोडेसे साहस केले तर मुसलमानांची राज्यसत्ता ठोकरीने अुडवून देअू, अशी प्रबळ स्वजातीयनिष्ठा आणि स्वधर्मनिष्ठा हिंदुराष्ट्रात अकस्मात संचारली. श्री धर्मरक्षकाचे (नासिरूद्दीनचे) बलिदान १३२१ च्या सनात झाले आणि लगोलग साऱ्या राजस्थानातील हिंदुराज्ये आणि दक्षिणेतील हिंदुराज्ये अुघडपणे मुस्लिमांच्या साम्राज्यसत्तेविरूद्ध बंड करून अुठली. अितकेच नव्हे, तर दिल्लीचे कित्येक स्थानिक मुस्लिम सुभेही त्या त्या प्रांतात आपापली स्वतंत्र मुस्लिम राजघराणी स्थापण्यास्तव मुस्लिमांच्या दिल्लीच्या साम्राज्याविरुद्ध युद्धे करू लागली. अंती मुस्लिम साम्राज्यसत्ता दुर्बळ होअून, श्री धर्मरक्षकाच्या बलिदानानंतर अवघ्या पंधरा-सोळा वर्षांच्या आत हिंदूंचा हा प्रचंड राष्ट्रीय अुठाव यशस्वी होअून हिंदूंचे अेक बलिष्ठ नि पूर्णपणे स्वतंत्र असे विजयनगरचे हिंदू राज्य कसे स्थापन झाले, हे सर्व वृत्त पुढील प्रकरणातून दिग्दर्शिले जाअीलच.

## प्रकरण ६ वे

# मुस्लिम साम्राज्यसत्तेच्या अंतिम अतिश्रीची अथश्री

हिंदुसम्राट श्रीधर्मरक्षकाला ठार मारल्यानंतर लगेच घियासुद्दिन तघलखाने स्वत:च सुलतानपदावर सन १३२१ त आरोहण केले आणि तशी द्वाही साम्राज्यभर पसरविली. येथून खिलजी राजवट संपून तघलख सुलतानांची राजवट चालू झाली.

घियासुद्दिन हा वृद्धच होता. त्याने राज्यकारभारात मुसलमानांना सौम्यतेने वागविले. पण आश्चर्य असे की, तो स्वत: अेका हिंदू जाट स्त्रीच्या पोटी जन्मलेला असताही मागील प्रत्येक मुस्लिम सुलतानांअितकाच हिंदूंचा धार्मिक छळ करण्यात त्याने अुणे पडू दिले नाही. हा घियासुद्दिन सन १३२६ मध्ये मरण पावला.

घियासुद्दिनाचे मागून त्याचा मुलगा महंमद तघलख, जो 'विक्षिप्त' या नावाने अितिहासात प्रसिद्ध आहे, तो सुलतान झाला. त्याला अेकदा दक्षिणेस देवगिरी येथे आपली राजधानी आणण्याची लहर आली. तत्काल त्याने देवगिरीचे नाव पालटून मुसलमानी परंपरेप्रमाणे तिला दौलताबाद असे नाव दिले. वरंगळला मुस्लिमांनी आधीच सुलतानपूर असे नाव दिलेलेच होते. परंतु दिल्लीहून देवगिरीस राजधानी आणताना त्याला अितका त्रास झाला, त्याच्या राज्याच्या राजस्वविभागाची (महसूल विभागाची) आधीच अितकी दुर्दशा अुडालेली होती आणि दक्षिणेत मुस्लिमराज्यांविरूद्ध अुठावाचे अितके सक्रिय कट चालू झाले होते की, त्या सर्व आर्थिक आणि राजकीय पेचांनी संत्रस्त होअून ह्या महंमद 'वेड्याला' पुन्हा राजधानी दिल्लीलाच परत नेण्याची लहर आली. या असल्या अुलाढालीत कोट्यवधी रूपयांचा आणि सहस्त्रावधि जीवांचा चुराडा अुडाला. त्याने राजस्व (महसूल) विभागाची व्यवस्था लावण्यासाठी मध्येच तांब्याची नाणी चालू केली. त्यायोगे तर त्याच्या राज्यकोषाची धूळधाणच झाली. शेतकरी आणि अितर जनता कर देत नाही, असे त्याच्या मनाने घेतले आणि सैन्याकडून सक्तीने करांची अुगराणी (वसुली) करण्याच्या आज्ञा त्याने सोडल्या. पण मुसलमानी प्रजेला सौम्यतेने वागवून हिंदुप्रजेकडून तेवढी ती अुगराणी अत्यंत अमानुष क्रूरतेने चालू केली. मृगयेत रानांतील सर्व पशूंना हाकारून जसे कोंडून धरतात आणि त्यांची सरसकट पारध करतात अगदी तसेच अनेक हिंदु गावांना सशस्त्र मुस्लिम सैन्याचा गराडा घालून हिंदूंची सरसकट कापाकापी केली गेली! या अमानुष छळाने हिंदूंची गावेची गावे आणि कनोजसारखे समृद्ध प्रांतही ओस पडले!!

तथापि, मुस्लिम सुलतानांमागून सुलतानांच्या शतकोशतके चालत आलेल्या ह्या अशा हिंदूंवरील रावणीय अत्याचारांचा तात्पुरता का होअीना, पण नायनाट करणारा अेक 'रामबाण'ही हिंदुराष्ट्राच्या भात्यातून याच वेळी सुटला!

साऱ्या भरतखंडाचे अेकछत्री मुस्लिम साम्राज्य स्थापन करण्याची जी रावणीय मुस्लिम महत्त्वाकांक्षा अल्लाअुद्दिनाच्या सन १३०८ ते १० च्या थोड्या आगेमागे सफल होत आली होती ती अशी सफल होता होताच अकस्मात विफल झाली. कारण हिंदुसम्राट श्री धर्मरक्षकाने मागच्या प्रकरणी सांगितल्याप्रमाणे या अखिल भारतीय अेकछत्री मुस्लिम साम्राज्याच्या छत्रदंडावरच पहिला प्रबळ प्रहार जो केला त्यासरशी ते मुस्लिम अेकछत्र कोलमडू लागलेच होते. अितक्यात हिंदूंच्या, विशेषत: दक्षिणेतील हिंदुराजशक्तीच्या ज्या अुठावाचा अुल्लेख मागच्या प्रकरणात शेवटी केलेला आहे, त्या अुठावाचा प्रबळ स्फोट होअून त्यासरशी ते परधर्मीय नि परकीय मुस्लिमदास्याचे अखिल भारतीय कोलमडू लागलेले छत्र पुरतेपणी कोसळून छिन्नविच्छिन्न होअून गेले!!

### नवे हिंदुराज्य

कारण सन १३३६ त मुसलमानी सत्तेच्या अुरावर पाय देअून विजयनगरचे स्वतंत्र, समर्थ आणि अेक नवे हिंदुराज्य या वेड्या सुलतान महंमदाच्या डोळ्यांसमोरच त्याच्या मुस्लिमीय सम्राटसत्तेला प्रत्याव्हान देत स्थापन झाले!!! त्याचे सविस्तर वृत्त पुढील प्रकरणात येणार आहेच.

आणि या वरील घटनेच्या किंचित कालानंतर मुसलमान मुसलमानांतील राजसत्तेसाठी ज्या आपसांत अगदी त्यांच्या पैगंबराच्या काळापासून यादवी युद्धे अेकसारखी चालत आलेली असत, त्या फुटीरपणाच्या वृत्तीमुळे दक्षिण हिंदुस्थानातील

मुसलमानांनी हसन बहामनी या नावाच्या पुढाऱ्याच्या नेतृत्वाखाली दिल्लीच्या मुस्लिम साम्राज्याविरूद्ध बंड केले. हसन बहामनीस या बंडांत यश मिळाले आणि तो स्वतःच सन १३४७ मध्ये बहामनी राज्याची स्थापना करून आपणांसच स्वतंत्र सुलतान म्हणवू लागला.

आपल्याकडील ज्या असंख्य अर्धवट लोकांत अशी अेक समजूत आहे की, मुसलमान लोक राजकीय किंवा धार्मिक लढ्यात नेहमी अेकजुटीने असतात, त्यांच्यात आपसांमध्ये किंवा मुस्लिमेतरांशी लढताना यादवी अशी कधी माजतच नाही, फुटीरपणा हा दुर्गुण मुसलमानांत मुळीच नसतो - ती समज किती खुळी, परक्यांचे नसते स्तोम माजविणारी आणि स्वकीय हिंदुजातीला नसता अुणेपणा देणारी असते, ती किती बिनबुडाची आहे, हे या अुदाहरणांवरून स्पष्ट होते! ह्या ग्रंथातही अशी अनेक अुदाहरणे मागे आलेली आहेत आणि पुढेही येणार आहेत. मुसलमान जातीच्या जागतिक अितिहासातून तर ती पावलोपावली आढळून येतात.

## अखंड साम्राज्यसत्तेच्या मुस्लिम-स्वप्नाचे भयंकर अधःपतन आणि विध्वंस

अेखाद्या अितिहासाची गिर्यारोहकाने अशक्यप्राय असणाऱ्या महत्त्वाकांक्षेच्या भरात हिमालयाच्या अत्युच्च शिखरावर सर्वांआधी आपला ध्वज रोवण्यासाठी चढत चढत 'हेच ते अत्युच्च शिखर' म्हणून मोठ्या विजयोन्मादाने भलत्याच अुच्च शिखरासारख्या दिसणाऱ्या स्थली पाय ठेवावा विजयाचा अेकछत्रीय असा तो ध्वज रोवू जावा, तोच अत्युच्च शिखरासारखे दिसणारे ते शिखर कोण्या अचल शिलास्तंभाचे बनलेले नसून केवळ अेका हिमराशींचा साचतसाचत गोठलेला मूळचा अेक ठिसूळ हिमस्तंभच काय तो असल्यामुळे त्या गिर्यारोहकाच्या महत्वाकांक्षेच्या भारानेच खळदिशी कोसळावा आणि तो गिर्यारोहक त्या महत्त्वाकांक्षेसह हिमालयावरून अकस्मात घसरून घरंगळत त्या अेकछत्री विजयाच्या तुकड्या तुकड्यासुद्धा कोण्या खोल विनाशाच्या गर्तेत कोसळावा त्याप्रमाणे सबंध हिंदुस्थानवर मुस्लिमांची अेकछत्री राजसत्ता स्थापन करण्याच्या मुसलमानी महत्त्वाकांक्षेची फसगत होऊन दुर्दशा अुडाली! साऱ्या आशियातील मुसलमानांच्या अरब ते मंगोलियापर्यंतच्या राष्ट्रांनी हिंदुस्थानवर स्वाऱ्यांमागून स्वाऱ्या करून शतकोशतके घनघोर नि क्रूरतम संग्राम सतत चालविला आणि शेवटी सुलतान अल्लाअुद्दिनाच्या राजवटीत सन १३१०च्या आगेमागे बहुतांश हिंदुस्थान जेव्हा त्या सुलतानाच्या अेकछत्री राजसत्तेखाली आला तेव्हा असे वाटले की ती मुसलमानी महत्त्वाकांक्षा आता सफल होणारच होणार! पण मागे सांगितल्याप्रमाणे सात-आठ वर्षांच्या आत सुलतान अल्लाअुद्दिनाने गाठलेल्या महत्त्वाकांक्षेच्या शिखरावरून हिंदूंच्या पुनरुज्जीवित पराक्रमाच्या प्रत्याघातासरशी ती मुस्लिम राजसत्ता कोसळून जी खाली पडली ती पुन्हा काही त्या शिखरापर्यंतसुद्धा केव्हाही वर चढू शकली नाही! हिंदूंचे बळ 'प्रतिपद् चंद्ररेखेव वर्धिष्णू'च होत गेले!!

## महंमद तघलखाचा मृत्यू आणि नंतर

हा 'वेडा' महंमद सन १३५१ मध्ये मरण पावला. त्याच्या मागे त्याचा चुलत भाअू फिरोजशहा तघलख हा त्या छिन्नविच्छिन्न झालेल्या दिल्लीच्या सुलतानी सत्तेचा अधिपती झाला. त्याची आअी दीपलपूर येथील राजपूत राजा मलभट्टी याची मुलगी होती. जेव्हा फिरोजशहाच्या बापाने त्या राजपूत कन्येस मागणी घातली तेव्हा राजा मलभट्टीने तिला देण्याचे नाकारले त्यामुळे त्या राजा मलभट्टीवर फिरोजशहाच्या बापाने स्वारी केली, आणि तेथील हिंदूंचा अतोनात छळ मांडला. हा आपल्या राज्यातील हिंदु बांधवांचा छळ आणि आपल्या जनकाचा, राजा मलभट्टीचा छळ केवळ आपल्यासाठी व्हावा हे त्या राजकन्येलाच पाहवेना तेव्हा तिने स्वतः होअून त्या मुस्लिम फिरोझच्या बापाशी लग्न लावले. हा तिचा कनवाळूपणा जरी वाखाणण्यासारखा असला तरी तो तिच्या पितृकुळाला कलंक लावणारा होता. जर तिने अेखाद्या पद्मिनीसारखा धर्मार्थ बळी जाण्याचा मार्ग चोखाळला असता तर तिचे जीवन आणि तिचे कुलव्रतही धन्य झाले असते!

## मुसलमानांतील धर्मभ्रम

मुसलमानांतही धर्मभोळेपणा कुठवर गेलेला असे आणि त्या धर्माच्या स्थापनेच्या वेळेस अरबस्थानाकडली लोकांत ज्या ज्या धर्मभोळेपणाच्या किंवा धर्मवेडेपणाच्या लोकसमजुती प्रचलित होत्या त्यांची प्रतिबिंबे मुसलमान लोकांत त्या वेळेपासूनच कशी अढळ पडत गेलेली होती याची कल्पना येण्यासाठी अितिहासात नोंदलेली या तघलखांच्या काळातील ही अेक गोष्ट अिथेच जाता जाता सांगू. वर अुल्लेखिलेल्या वेड्या महंमदाच्या हातून जी जी विक्षिप्त धर्मकृत्ये आणि प्रजेचा छळ झाला होता (हिंदु प्रजेचा जो हिंदु म्हणून धार्मिक छळ झाला तो अर्थातच मुसलमानी धर्मसंमत मानला तरी) त्या अन्यायी भूमिका, दंड अित्यादी सर्व अपकृत्यांविषयी त्यांची भरपाअी करून ते मूळ कागदपत्र किंवा त्यांच्या शासनीय मूळच्या नोंदी अित्यादी पुरावा महंमदाच्या स्वतःच्या तशा कागदपत्रांसह महंमदाच्या शवपेटिकेत त्याची मृत्यूनंतरची अुत्तरक्रिया करताना फिरोझशहाने महंमदाच्या थडग्यांतच पुरून टाकला. कारण त्या लेखांना पाहून आणि त्यांची भरपाअी केल्याच्या पावत्या पाहून महंमदाच्या दुष्कृत्यांविषयी अीश्वराने शेवटच्या न्यायालयाच्या दिवशी महंमदाला क्षमा करावी! फिरोजशहासारख्या त्यावेळच्या सुशिक्षित आणि सुलतान असणाऱ्या मुसलमान समाजाच्या अुच्च व्यक्तिंपासून तो सामान्य जनतेपर्यंत मुसलमानांची ही अशी परलोकविषयक अेक धार्मिक म्हणविणारी अढळ श्रद्धा होती!

फिरोजशहाने स्वतःस जरी हिंदुस्थानचा सुलतान म्हणून आरंभी म्हणवून घेतलेले होते तरी दिल्लीच्या आसपासच्या काही प्रदेशांना सोडून जिकडे तिकडे हिंदु आणि मुसलमान समूहचे समूह त्या सुलतानाची सत्ता झुगारून देत चालले होते. दक्षिणेकडे तर दिल्लीच्या सुलतानांचे जोखड अुघडपणे फेकून देअून विजयनगरचे विख्यात हिंदुराज्य स्वतंत्रच झाले होते. अशा स्थितीत सारीच सल्तनत गमावून बसण्यापेक्षा अगदी आटोक्यात येअू शकेल अितका तरी प्रदेश बळकट धरून ठेवावा आणि जे हातातून निसटले त्याचे राजकीय वैर शमविण्याकरिता, त्याचे स्वातंत्र्य मान्य करून टाकावे, असा पक्का निश्चय करून सुलतान फिरोजशहा तघलख याने शेवटी दक्षिणेतील बहामनी राज्य आणि मुसलमानी सत्तेचे हाडवैर करणाऱ्या आणि तिला थेट हिंदुस्थानच्या बाहेर हाकलून देण्याचा मनोमय निर्धार केलेल्या हिंदु नरवीरांनी त्या कालीच स्थापन केलेले जे विजयनगरचे हिंदुराज्य; त्याचेही राजकीय स्वातंत्र्य मान्य केले!

अशा रीतीने सुलतान अल्लाअुद्दिनाच्या काळी सन १३१० - १३३२ च्या संधीस बहुतांश भरतखंडावर तीनशे वर्षांच्या सतत चाललेल्या हिंदू - मुस्लिम महायुद्धाचा परिणाम म्हणून मुसलमानांची स्थापन होत आलेली साम्राज्यसत्ता तशी स्थापन होताहोताच स्वतः त्या सुलतानाच्या वंशजालाच हिंदूंच्या प्रबळ प्रतिरोधास शरण जाअून त्या यावनी सत्तेचा अंत करावा लागला! मुस्लिमांच्या होत आलेल्या अखिल भारतीय साम्राज्याची पुन्हा केव्हाही न सांधू शकण्याअितकी तोडमोड होअून आता हिंदूंच्या तत्कालीन स्वातंत्र्यसत्तेची पुढे केव्हाही न हटू शकणारी मुसलमानांवरील राजकीय चढाअी चालू झाली!

खरे पाहिले असता मुस्लिमांच्या साम्राज्यसत्तेचा, या फिरोझ तघलखाने दक्षिणेचे राजकीय स्वातंत्र्य स्पष्टपणे जेव्हा वर दिल्याप्रमाणे मान्य केले, तेव्हाच खरा अंत झाला! मुस्लिम साम्राज्याच्या महत्त्वाकांक्षेलाच फिरोझशहाने मूठमाती दिली!

## हाच प्रत्यक्ष पुरावा

मागे, आम्ही आजवरच्या हिंदु अितिहासलेखकांच्या लक्षात न आलेले जे सत्य सांगितले आहे की, हिंदुसम्राट श्री धर्मरक्षक (नासिरूद्दिन) ह्याने भर दिल्लीत जी हिंदूंची धार्मिक आणि राजकीय अशी मुसलमानी सत्तेवर दुहेरी चढाअी केली आणि विशेषतः हिंदूंवरील धार्मिक अत्याचारांचा मुसलमानांवर तसे तसेच धार्मिक प्रत्याचार करून सूड अुगविला, त्या मुसलमानांना धाक बसविणाऱ्या हिंदु क्रांतीमुळे मुस्लिमांच्या अखिल भारतीय साम्राज्यसत्तेच्या महत्त्वाकांक्षेस धुळीस मिळविण्याची प्रत्यक्ष कामगिरी करणारी ही राजकीय अुठावणी झाली! हे सत्य ह्या प्रत्यक्ष दिल्लीच्या सुलतानानेच, फिरोझशहा तघलखानेच मान्य केलेल्या ह्या विजयनगराच्या नवीन स्थापन झालेल्या हिंदु राज्यासह साऱ्या दक्षिणेच्या स्वातंत्र्यावरून सप्रमाण सिद्ध होत आहे!

सुलतान फिरोझ तघलखाने निरुपायाने दक्षिणेकडील आपल्या राजसत्तेची शरणचिठी लिहून दिली खरी! तरी त्याच्या हाती दिल्लीसारखी जी मोठमोठी नगरे होती त्यांत हिंदूंचा धार्मिक छळ त्याने अतोनात चालविलेलाच होता. हिंदूंनीही

पण हौतात्म्यासही ना भिणारी स्वधर्मरक्षणार्थ प्रतिरोधाची कशी चिकाटी चालविली होती त्याचे अनेक प्रकारच्या अनेक अुदाहरणांतील हे अेक त्या काळचे म्हणून अुदाहरण तरी स्थालीपुलकन्यायाने दिल्यावाचून राहावतच नाही. ते मुस्लिमांनीही सांगितलेले अुदाहरण असे :- सुलतान फिरोझ हा हिंदूंतही ब्राह्मणांचा विशेष द्वेष करी. तो म्हणे, 'ब्राह्मण हे हिंदुधर्माच्या दुर्गाची किल्ली आहेत.' ब्राह्मणांनी फिरोझने पुन्हा बसविलेल्या जिझिया कराविरूद्ध मोठी चळवळ करून प्रतिवाद केला. त्यांनी राजवाड्यासमोर बसून सामुदायिक अुपोषणे केली आणि अग्निप्रवेश करून आत्महत्या करण्याचा निश्चय प्रकट केला, पण सुलतानाने त्यांचेकडे लक्षच दिले नाही. तेव्हा पुष्कळ ब्राह्मण त्रस्त होअून तसा त्रागा करून मृत्युमुखी पडले. शेवटी अितर जातीच्या हिंदू लोकांनी अशा स्वधर्माभिमानी ब्राह्मणांसाठी कर भरला आणि त्यांच्या जिवाचे रक्षण केले!

परंतु अेका ब्राह्मणाची गोष्ट त्याहूनही हौतात्म्याने रसरसलेली आहे. दिल्ली नगरात हा वृद्ध ब्राह्मण अुघडपणे मूर्तीची पूजा करीत असे. आता फिरोझ तघलखाच्या राक्षसी राजधर्माप्रमाणे त्याच्या राज्यात मूर्तीची पूजा करण्याची सक्त बंदी असे. पण त्या आज्ञेचा निषेध करण्यासाठी त्या ब्राह्मणाने आपल्या घराच्या अंगणात अगदी प्रकटपणे सर्व हिंदूंना बोलावून आपल्या मूर्तीचा मोठा अुत्सव करावा. शेवटी अनेक मुसलमान बायामुलेही त्या मूर्तीचे भक्त झाले. ह्या ब्राह्मणाचा देव भक्तास पावतो अशी कथा दूरवर पसरली. अेका लाकडी फळीवर रंगीत चित्रे काढून त्यांची तो त्या प्रकट स्थलीही पूजा करी. ही बातमी थेट सुलतानाच्या कानावर गेली. शेवटी त्या ब्राह्मणास त्याच्या त्या मूर्तीसुद्धा पकडून सुलतानाने आपल्यासमोर आणविले. नंतर त्याने सर्व अुलेमांना (मुसलमानी धर्मशास्त्र्यांना) जमविले आणि विचारले, 'या ब्राह्मणास काय शिक्षा द्यावी?' त्यांनी अुत्तर केले, 'या ब्राह्मणाने मुसलमान झाले पाहिजे. नाही तर त्यास जिवंत जाळून टाकावे.' ब्राह्मणास ती आज्ञा मिळताच त्याने मरण पत्करले! भर दिल्लीत राजसभेच्या अगदी समोर अेक लाकडाचा ढीग रचून त्या ब्राह्मणाचे हातपाय बांधून त्यास त्या ढिगावर ठेवले आणि त्यावर ती चित्रित मूर्तीची फळीही ठेवली. मुसलमानी राक्षसांनी त्या ढिगाऱ्यास चहूबाजूंनी आग लावून दिली. तरी तो ब्राह्मण मुसलमान होण्यास मान्य होअीना. थोड्याच क्षणांत ती आग चहूकडून भडकली. पण 'अुस्सऽ'ही न म्हणता तो ब्राह्मण त्या मूर्तीला नमस्कार करीतच राहिला! क्षणार्धात ज्वालांनी त्या धर्मनिष्ठ ब्राह्मणास स्वाहा केले!!

हा हिंदुद्वेषी सुलतान फिरोझ तघलख सन १३८८ मध्ये मरण पावला. फिरोझच्या मृत्यू नंतर त्याच्या अुरल्यासुरल्या राज्यात अेकच अंदाधुंदी माजली. अेकदा तर अेकाच वेळी राज्यावर अधिकार सांगणाऱ्या फिरोझच्या दोन नातवंडांत कलह होअून दिल्ली नगरात दोन टोकांना फिरोझचे दोन नातू महमूदशहा नि नसरतशहा अेकाच वेळी दोन स्वतंत्र सुलतान म्हणून राज्य करून लागले. अर्धी दिल्ली अेकाची राजधानी आणि अर्धी दिल्ली दुसऱ्याची राजधानी!!

## तैमुरलंगाची स्वारी

अशा स्थितीत दूरच्या समरकंदचा सुलतान आणि अितिहासात कुख्यात असलेला तैमुरलंग ह्याची हिंदुस्थानावर धाड पडली. तैमूरलंग हा तुर्क होता. तो धर्माने प्रथमतः मुसलमान नव्हता. त्याने बगदाद जिंकल्यानंतर तेथील मुसलमानी ग्रंथसंग्रह साफ जाळून टाकला होता आणि अनेक ठिकाणी मशिदीही जाळल्या होत्या. तो सन १३६९ त समरकंदचा राजा झाला. त्याने चेंगीजखानाचा आदर्श पुढे ठेवून मॉस्कोपासून आग्नेयेस अफगाणिस्तानपर्यंतचे जगताच्या विस्तीर्ण प्रदेशातील सत्तावीस राजमुकुट जिंकून घेतले. अेका स्वारीत त्याचा पाय मोडल्यामुळे त्याला 'लंग' (लंगडा) हे टोपण नांव मिळाले. नंतर त्याची दृष्टि हिंदुस्थानकडे वळली. पण ती अितर प्रदेशाप्रमाणे नुसती राजसत्तेच्या नि विजयोन्मादाच्या लोभानेच काय ती नव्हे, तर हिंदुस्थानविषयी त्याच्या मनात अेक दुसऱ्या प्रकारचा दीर्घ द्वेष अुत्पन्न झाला होता म्हणून! कारण, मध्यंतरी त्याने मुसलमानी धर्म स्वीकारला होता. त्याच्या मूळच्या विध्वंसक स्वभावात त्या नवीन धर्माचे अेक नवे भूतच संचरल्यासारखे झाले! तो आपल्या आत्मचरित्रात म्हणतो, ''भारतावर स्वारी करण्याचा माझा अुद्देश तेथील काफर हिंदू लोकांना ठार मारावे, त्यांच्या मूर्तीचा विध्वंस करावा, त्यांना अिस्लामी धर्माची दीक्षा द्यावी नि अल्लाच्या दरबारात 'गाझी' हे पद मिळवावे असा आहे.''

तेव्हा, लगेच अि. स. १३९७ त त्याने भारतावर स्वारी केली. त्याचे हाताखाली अेकंदर नव्वद सहस्त्र सैन्य होते. तो पानपतपर्यंत येअून थडकला. तथापि, त्याच्याशी लढण्यास कोणीही आलेले नाही असे पाहून तो थेट दिल्लीवर चालून गेला. तेथे दिल्लीच्या सुलतानाचे नावे काही सैन्य लढावयास आले. परंतु, त्याचा बोलता बोलता पराभव झाला. अेक मनोरंजक गोष्ट मात्र येथे सांगण्यासारखी आहे की, अर्ध्या जगताला जिंकत आलेले तैमुरचे हे निर्ढावलेले प्रचंड सैन्य, त्याच्याशी लढावयास आलेल्या त्या सुलतानाच्या यःकश्चित सैन्यात हिंदुस्थानातील हत्ती हे प्रचंड प्राणी प्रथमच सामोरे आलेले पाहून काही वेळ भयभीत होअून गेले होते. अर्थात लौकरच ते सावरले. सुलतानाच्या सैन्याची दाणादाण होताच तैमूरचे सैन्य दिल्लीत भयंकर लुटालूट नि कापाकापी करीत सुटले. त्यामुळे लक्षावधि लोक प्राणास मुकले. तैमूरची हिंदुरक्ततृष्णा दिल्लीस अशी थोडीशी शांत होताच तो पुढे मिरत नि हरिद्वारकडे वळला. वाटेत त्याने ठिकठिकाणी मूर्तींचा विध्वंस केला. हरिद्वारास त्याने हिंदूंच्या सरसकट कापाकापीची पराकाष्ठा केली. केवळ हिंदुधर्माचा त्याग न करण्याच्या कठोर नि पवित्र निश्‍चयापायी त्या हिंदु जातीवर कित्येकदा आणि किती अघोर प्रसंग गुदरले त्याची अुदाहरणे कोठवर द्यावी! थोडक्यात अितके सांगून टाकू की हरिद्वारहून हा नरराक्षस तैमूर शिवालिकपहाड, नागरकोट, जम्मू ह्या अुत्तरेच्या मार्गाने हिंदुरक्ताचा असाच सडा पाडीत आणि हिंदु देवस्थानांचा असाच विध्वंस करीत जात असता त्यास बातमी कळली की, त्याची मूळची राजधानी जी समरकंद तिकडे त्याच्या विरूद्ध मोठी बंडाळी माजलेली आहे. ह्या वृत्तामुळे तो रागाने नि चिंतेने वेडावून जाअून अेकदम त्याला त्याच्या प्रचंड सेनेसह भारत सोडून समरकंदकडे जाणे भाग पडले.

तैमुरलंगाच्या ह्या प्रलयात अुरलीसुरली तघलख घराण्याची सत्ता बुडून गेली. नंतर अुत्तर हिंदुस्थानात केवळ अंदाधुंदी काय ती अुरली. या अंदाधुंदीत सय्यद नावाच्या घराण्याने दिल्लीच्या नामधारी सुलतानाचे पद बळकावले होते.

तेव्हा, ह्या वेळेस मुसलमानी सत्तेची ही दुर्गती पाहून राजस्थानचे हिंदुधर्माचे चिरंतन संरक्षक जे स्वतंत्र राजपुत राजे, त्यांनी चांगलाच अुठाव केला, आणि विशेष म्हणजे त्यांना नेहमी जे करावे लागे त्याप्रमाणे आपल्या राजपुतान्यातीलच गडकोटांचे स्वातंत्र्य सांभाळून स्वस्थ न बसता या वेळी त्यांचे काही धुरंधर पुढारी हिंदूंचा मुसलमानांच्या निरनिराळ्या सुलतानांनी बळकाविलेला प्रदेशही मुक्त करीत चालले. तसे पाहिले असता पूर्वीही त्यांच्यापैकी काहींनी हिंदूंची काशी, प्रयाग अित्यादी मोठमोठी क्षेत्रस्थानेही मुसलमानांच्या हातातून जिंकून घेतली होती. पण!... मुसलमानी सत्ता जशी त्यांनी हुसकून दिली त्याचप्रमाणे त्या त्या क्षेत्रांतून वसलेली मुस्लिम वसतिस्थाने आणि त्यांची, मशिदी प्रभृति मोठमोठी, धर्मकेंद्रे यांचे काही निर्बीजीकरण करून टाकले नाही! जसे हिंदूंच्या मुसलमानांनी जिंकलेल्या स्थानात मुसलमानी जे-ते हिंदूंची सरसकट कापाकापी करून आणि हिंदूंची तीर्थक्षेत्रे यांचा विध्वंस करून तेथे तेथे हिंदूंचे निर्बीजीकरण करीत! पण हिंदु तसे करीत नसत, म्हणूनच जेव्हा जेव्हा मुसलमानी आक्रमणे पुनः पुन्हा अुत्तरेकडून खाली येत, तेव्हा तेव्हा स्थानिक जिवंत सोडलेले आणि नांदत ठेवलेले हे मुसलमान, घरात बाळगून ठेवलेल्या सापाप्रमाणेच पुन्हा त्या मुस्लिम आक्रमकांचे सहाय्य बोलावून त्या त्या तीर्थातील, क्षेत्रातील, नगरातील हिंदूंची दुर्दशा अुडवून देत! पण तसे न करण्याच्या ज्या आत्मघातकी अुदारपणाच्या व्याधीने राजपूत विजेते ग्रस्त झाले होते ते तसेच होते! (ह्या विषयावरील सविस्तर चर्चा ह्या ग्रंथाच्या प्रकरण ७वे, 'टिपू सुलतान' ह्यांमध्ये करण्यात आलेली आहे. ती वाचकांनी पुन्हा अवश्य पहावी.)

## राणा कुंभ

ह्या काळातील राजपुतांचा धुरंधर पुढारी राणा कुंभ हा विशेष अुल्लेखनीय आहे. चित्तोडच्याच काय पण हिंदुस्थानातील पराक्रमी नि यशस्वी हिंदु धुरंधरांपैकी हा राणा कुंभ अेक तेजस्वी नेता होअून गेला. त्याने त्याच्या शेजारच्याच बलवान आणि दिल्लीच्या साम्राज्यातून फुटून निघालेल्या माळव्याचा मुसलमानी सुलतान महंमद खिलजी, यांच्याशी युद्ध छेडून सुलतानपूरजवळच्या लढाअीत त्याची रग पुरती जिरविली. राणा कुंभच्या हाती शेवटी तो माळव्याचा सुलतान महंमूद खिलजी हा जिवंत सापडला. पण 'सद्‍गुणविकृती'च्या व्याधीने पछाडलेल्या अितर हिंदु वीरांप्रमाणेच राणा कुंभाने ते कृत्य क्षत्रियांचे भूषण आहे असे समजून त्या माळव्याच्या सुलतानाला पुन्हा जिवंत सोडून दिले! जर क्वचित राणा कुंभ

त्या मुस्लिम सुलतानाच्या हाती जिवंत सापडला असता तर? पृथ्वीराजाप्रमाणे राणा कुंभाचेही डोळे काढून त्या मुस्लिम राक्षसी राजनीतीप्रमाणे त्याला ठार मारले गेले असते! आणि खरे पाहिले असता अशा राक्षसी लढ्यात अशी राक्षसी राजनीतीच हितप्रद असते आणि म्हणूनच धर्म्य असते!

त्या वेळच्या हिंदूंच्या अितिहासात ही लढाअी अितकी लोकोत्तर मानली गेली की, तिच्यातील यशाच्या गौरवार्थ राणा कुंभाने चित्तोडला अेक भव्य आणि कलावान असा 'कीर्तिस्तंभ अुभारला. तो अद्याप अवशिष्ट आहे. त्याचप्रमाणे गुजराथचा सुलतान कुतुबुद्दिन याने कुंभलगडावर स्वारी केली, तेव्हा त्याचाही राणा कुंभाने पूर्ण पराभव केला. शेवटी सुलतान कुतुबुद्दिन याला राणा कुंभाशी संधी करून जीव वाचवावा लागला.

कुंभाच्या मागेही राजपुतान्यात अितके कर्ते आणि वीर पुरुष गाजून गेले की, त्यांच्या पिढ्यांचे स्वतंत्र अितिहासच लिहिले जावेत! पण आमचे आजकालचे परधार्जिणे अितिहास मुसलमानांच्या आणि युरोपीय परकीय राष्ट्रांच्यासुद्धा अितिहासानेच काय ते पछाडलेले असतात. त्यांना त्या हिंदु गौरवाच्या अितिहासाचीच तेवढी अडचण वाटते! वस्तुतः ते त्यांच्या स्वतंत्र संशोधनाच्या अभावाचे नि अज्ञानाचेच द्योतक असते. सुदैवाने त्या काळच्या हिंदूंच्या वीरश्रीने रसरसलेले प्रामाणिक नि प्रासादिक 'रासो' मात्र यत्रतत्र अुपलब्ध आहेत. पृथ्वीराज रासो, हमीर रासो, छत्रसाल रासो, असे अनेक रासो - पदबद्ध, लहानमोठी, अैतिहासिक, हिंदू कवींनी लिहिलेली वीरकाव्ये आजही अुपलब्ध आहेत. पण त्यांची नावेसुद्धा या अितिहासकारांना माहिती असतील - नसतील! त्यातही आजकालच्या शिलालेखांच्या संशोधनात राजपुतान्यातीलच नव्हे, पण अनेक ठिकाणच्या गिरिकुहरांतून अैतिहासिक शिलालेख सापडत आहेत. त्यांचाही या हिंदू वीर पुरुषांचा अितिहास लिहून काढण्यास मोठा अढळ आधार मिळण्यासारखा आहे. पण ते कार्य अेखाद्या मोठ्या शासनसंस्थेत प्रमाणावर करण्याचा काळ सध्याचा तरी दिसत नाही! तसा तो येअीतो, निदान लहानमोठ्या संस्थांनी तरी किंवा व्यक्तींनी तरी, ते संशोधनकार्य नसले तरी, संकलनकार्य, हाती घेऊन पुष्कळ अंशी पार पाडणे शक्य आहे. या आशेला पर्वतासारखा अढळ पाठिंबा द्यावयास अेकट्या राजवाड्यांचे नाव अुच्चारणे पुरे आहे!

## लोदी घराणे

सय्यद घराण्याचा शेवट सन १४५० मध्ये झाल्यावर पुढे काही दिवस लोदी या अफगाण वंशाच्या घराण्यातील स्वतःस सुलतान म्हणवून घेणारे काही पुरुष दिल्लीला नावाचे राज्य करून गेले, त्या शिकंदर लोदी ह्याने अि.सन १४८८ ते १५१७ पर्यंत राज्याची काहीशी सावरासावर केली. हा शिकंदर लोदी अेका हिंदु स्त्रीच्या पोटी जन्मलेला होता. तथापि प्रत्येक मुस्लिम अधिकाऱ्याप्रमाणे त्याने हिंदूंवर मात्र अगदी करडी दृष्टी ठेवली होती. मध्यंतरीच्या अंदाधुंदीत हिंदूंनी पुन्हा चालू केलेल्या त्यांच्या मोठमोठ्या यात्रा शिकंदरने पुन्हा बंद केल्या. अितकेच नव्हे, तर साध्या पर्वणीच्या दिवशी नदीतीर्थावर स्नान करण्याचीही बंदी केली. तरीही हिंदू लोकांचे प्रतिरोधक बलिदान अितरत्र जसे चालत आले होते तसेच चालू राहिले. अुदाहरणार्थ, ह्याखालील अेका प्राणत्यागी महापुरुषाचे वृत्त सांगणे पुरे आहे.

लखनौकडील अेका गावी बुद्ध नावाचा अेक ब्राह्मण राहत असे. कोणताही न्याय्य नि सदाचारी धर्म मनापासून आचरला असता अीश्वरास सारखाच मान्य आहे, असे त्याने प्रतिपादिले. यासाठी मुसलमानांनी त्यास फार त्रास दिला. त्या ब्राह्मण प्रचारकाने स्वतःचा मतप्रचार अितक्या प्रभावीपणे चालविला की, लखनौच्या काझीनेही हात टेकले. शेवटी अधिकाऱ्यानी तो तंटा सुलतानाकडे पाठविला. तेव्हा शिकंदरखानाने नअू विद्वान मौलवींकडून त्या ब्राह्मणाशी वाद करविला, पण तो स्वधर्मनिष्ठ सत्यप्रतिज्ञ ब्राह्मण आपले मत सोडीना. तेव्हा स्वतः सुलतानाने 'मुसलमान हो; नाही तर शिरच्छेद होअील', अशी धमकी दिली. तीही त्या हिंदु धर्मवीराने धुडकावून दिली, तेव्हा त्याला ठार मारण्यात आले!

## राणा संग

हा शिकंदर लोदी सन १५१७ मध्ये मेला आणि त्याचेमागून त्याचा मुलगा अिब्राहिम लोदी हा त्या नाममात्र अुरलेल्या दिल्लीच्या सुलतानपदावर बसला. त्याकाळी विस्कळीत झालेल्या मुस्लिम राजसत्तेला राजपुतांनी मरणप्राय करून सोडले होते. त्यावेळी त्यांचा पुढारी चित्तोडचा पराक्रमी राणा संग हा होता. राणा संगाचा विक्रम पाहून लहानसहान मुस्लिम

संस्थानिकांच्या पायाची आग मस्तकात जात असे. त्यापैकी ओीडरच्या मुसलमान ठाणेदाराने आपल्या दारात अेक कुत्रा बांधून त्याचे नाव संगराणा असे ठेवले. त्या नावाने तो त्या कुत्र्यास हाक मारी. मुसलमानांच्या अनेक माकडचेष्टा कानावर आल्यामुळे संगराण्याने त्यांची सरसकट खोड मोडून टाकण्यासाठी मोठ्या सैन्यासह ओीडर प्रांतावर चाल केली. ठिकठिकाणी मुसलमानांचा खरपूस समाचार घेतला आणि हिंदूंवर केलेल्या अत्याचारांचा पुरेपूर सूड अुगविला. या साऱ्या आजूबाजूच्या प्रदेशातील हिंदु लोकांना मात्र ह्या स्वारीचा कोणताही त्रास झाला नाही. अुलट ओीश्वरानेच ह्या राणासंगाच्या रूपने आपला त्राता धाडला आहे अशा भक्तिभावाने सारे हिंदु लोक त्याच्यावर प्रसन्न झाले. मुसलमानांवर ठिकठिकाणी असे विजय मिळवून आपला यशोदुंदुभी वाजवीत नि कीर्तिध्वज फडकवीत संग राणा चित्तोडास सन १५१९ ला परत गेला. रतनभोर, गागरोन, काल्पी, भिलसा नि चंदेरी हे भाग मुसलमानांच्या हातून सोडवून राणा संगाने आपल्या राज्यास जोडले.

## खानोलीच्या लढाअीत सुलतान अिब्राहीम लोदीचा राणा संगाने केलेला पराभव

अशा प्रकारे विस्कळीत झालेल्या मुस्लिम राजसत्तेला राजपुतांनी अगदी मरणप्राय करून सोडले होते. ही स्थिती पुन्हा सुधारावी म्हणून सर्व बळ अेकटवून सुलतान अिब्राहिम लोदीने सर्व राजपुतांचा त्याकाळी पुढाकार घेतलेला पराक्रमी चित्तोडचा राणा संग ह्याचेवर आपण होअून स्वारी केली. राणा संगाच्या सैन्याची गाठ सुलतान अिब्राहिमच्या सैन्याशी खानोली येथे पडली; आणि त्या खानोलीच्या निकराच्या लढाअीत राणा संगाने सुलतान अिब्राहिमच्या सैन्याची दाणादाण अुडविली आणि अिब्राहिम पराभव पावून दिल्लीस परत गेला.

## बाबरची स्वारी

अशा संकटात लाहोरचा सुभेदार दौलतखान लोदी अितर अनेक मुस्लिम पुढाऱ्यांसह स्वतःच्या अस्तित्वाविषयीच भयभीत झाला होता. त्यानी शेवटचा अुपाय म्हणून अफगाणिस्थानात त्यावेळी राज्य करीत असलेल्या शक्तिशाली बाबराला हिंदुस्थानात राणा संगाचे पारिपत्य करण्यास सहाय्य देण्याची प्रार्थना केली. बाबरालाही अशीच संधी हवी होती. कारण बाबर तैमुरलंगाचा वंशज म्हणवीत असून हिंदुस्थानवर आपला औरस अधिकार आहे असे समजे. तेव्हा बाबर हा सन १५२६ मध्ये ससैन्य सुभेदार दौलतखान लोदी याच्या साहाय्यास धावून आला.

अिकडे हे संयुक्त मुस्लिम सैन्य आपणावर चालून येत आहे हे पाहताच गर्भगळीत झालेला सुलतान अिब्राहीम लोदी ह्याने हिंदुस्थानातील सर्व हिंदु-मुसलमान सुलतानांत नि राजांत विजयी झालेल्या राज्यधुरंधर चित्तोडचा हिंदू महाराजा राणा संग ह्यास आपल्या साहाय्यास बोलाविले. वस्तुतः सुलतान अिब्राहीम लोदीचाही राणा संगाने अलीकडेच मोठा पराभव केला होता. पण प्रसंगी हवा तो अपमान गिळून हिंदूनाही प्रसंगी शरण जाण्याची मुसलमानांना केव्हाच लाज वाटत नसे. दुसरे आपल्याकडे असलेली जी बाजारी समज, की मुसलमान मुसलमानांशी कधी लढत नाहीत किंवा त्यांच्या आपसात राजसत्तेसाठी लढाअी झालीच तर त्यांतील कोणताही मुसलमान पक्ष दुसऱ्या मुसलमानी पक्षाशी लढण्यासाठी हिंदूंचे साहाय्य काही मागत नाही, ह्या दोन्ही बाजारी समजुती किती खोट्या आहेत, हे आम्ही मागे या ग्रंथात दाखविलेच आहे आणि पुढेही दाखविले जाअील. त्याचेच हे सुलतान अिब्राहिम लोदीचे कृत्यही अेक अत्यंत ठळक अुदाहरण आहे. हिंदु राणा संगाचे सहाय्य घेअून सुलतान अिब्राहिम लोदी त्याच्या राज्यावर चाल करून आलेल्या मुस्लिम बाबराशी पानपत येथे अि. सन १५२६ मध्ये लढला. परंतु रणांगणात अिब्राहिम लोदीच ठार झाला अणि त्याचे सैन्य अुधळले. तेव्हा निरूपायाने राणा संगानेही रणांगण सोडून दिले आणि अवतीभोवती सांगाती येअील त्या राजपुतांसह भटकत भटकत रानावनातून रजपूत सैन्याची पुन्हा अुभारणी करुन बाबरावर फिरून तुटून पडावे अशा कष्टसाध्य प्रयत्नात तो मनस्वी योद्धा महाराणा संग खटपटत असता त्या वनवासातच सन १५३० मध्ये दु:साध्य रोगांना बळी पडला! हिंदूंचा त्या काळचा मुकुटमणी निखळला!!

## मोंगल वंशाची दिल्लीस स्थापना

अिकडे बाबराला विजय मिळताच त्याने त्याला हिंदुस्थानात बोलविणाऱ्या पंजाबच्या मुसलमान सुभेदाराचीही दिल्लीचे सुलतानपद बळकाविण्याची अिच्छा धुळीस मिळवून स्वतः आपणच दिल्लीचे सुलतानपद सन १५२६ मध्ये बळकाविले. तेथूनच दिल्लीच्या मोंगल बादशाहीचा आरंभ झाला.

## या काळच्या अुत्तर हिंदुस्थानातील अुरल्यासुरल्या प्रांतांमधील काही समीक्षणीय घटना

**सिंध**-अरबांच्या हातून सिंधला हिंदूंनी परत जिंकून घेतल्याचा अुल्लेख पूर्वी केलेलाच आहे. त्या हिंदू सुमेर रजपुतांच्या हाती सिंधची सत्ता सन १३३६ पर्यंत होती. सन १३३६ त जामआफरा नामक त्या रजपुतांचा राजा स्वतंत्रपणे तेथे राज्य करीत होता. दिल्लीच्या सुलतानांच्या आणि ह्या हिंदु राजकुलाच्या लढाया सारख्या चाललेल्या असत. १३६७ ते १३८० पर्यंत तेथील हिंदु राजा जाम तिमाजी ह्याने राज्य केले. त्यानंतर त्याचाच राजपूत भाअू राज्यावर बसला. पण अनेक विकृतींमुळे त्याचा मतिभ्रंश होअून तो आपण होअून मुसलमान झाला!

**बंगाल -** महंमद घोरीने जेव्हा दिल्लीचे सिंहासन नित्याचे असे सन ११९२ मध्ये जिंकले तेव्हा त्याने त्याचे अनेक पराक्रमी सरदार आजूबाजूचे हिंदू प्रदेश जिंकावयास धाडले. त्यांतील बखत्यार खिलजी ह्या त्याच्या सरदाराने बिहार नि बंगाल या प्रांतावरील हिंदुराजसत्ता अुलथून टाकून मुसलमानी राज्य त्या प्रांतात सन ११९५ च्या आसपास प्रथमच स्थापले. बिहारमध्ये त्याने हिंदूंचा विशेषतः त्यातील बुद्ध संप्रदायाचा जो छळ केला आणि त्यांना बलात्काराने बाटविले त्याचा अुल्लेख या ग्रंथात पूर्वी केलेलाच आहे. ह्या प्रसंगीच जे जगतप्रसिद्ध नालंदा विद्यापीठ तेथे पांच शतकांहून अधिक काळ नांदत होते त्या पवित्र विद्यापीठाचा सत्यानाश या रानटी, अघोरी नि विध्वंसक वृत्तीच्या मुसलमानी सेनापतीने केला. तेथील त्या विशाल, अमूल्य, असंख्य अशा प्रचंड ग्रंथसंग्रहालयास त्या मुसलमानांनी आग लावून दिली. असे म्हणतात की, ती आग सहा महिनेपर्यंत जळत होती! ती भस्मसात होअीतो मुसलमानांनी कोणालाही ती विझवू दिली नाही! शस्त्रबळ नसले तर शास्त्रबळच काय पण धर्मबळही किती पंगु ठरते याचे हे आणखी अेक हृदयद्रावक अुदाहरण आहे!

त्या जळत असलेल्या प्रचंड ग्रंथसंग्रहालयात वैदिक, बुद्ध, जैन अित्यादी धर्मांचे असंख्य पूज्य ग्रंथ होते. पण त्यांचे रक्षण करण्यास न वैदिक देवता आल्या, न प्रत्यक्ष बुद्ध, न जिन! भक्तांचे प्रत्यक्ष शस्त्रबळ हेच देवांचे शस्त्रबळ असते!

शेवटी, बंगालमध्ये त्या वेळेस राज्य करीत असलेल्या हिंदूंच्या शेवटच्या सेनवंशीय राजाचा पाडाव करून बखत्यार खिलजीने बंगाल हस्तगत केला आणि तिकडेही हिंदूंना बळाने बाटविण्याचे अभियान (मोहीम) चालविले.

दिल्लीच्या मुस्लिम सुलतानाच्या बंगालवर चालत असलेल्या ह्या सत्तेविरूद्ध दिल्लीचे मुस्लिम सुभेदारच मधूनमधून बंडे करून स्वतःसच बंगालचे सुलतान म्हणून स्वतंत्रपणे राज्य करीत. त्यापैकी सन १३४७ त फकरूद्दिन नामक सरदाराने बंड करून बंगालवर आपले स्वतंत्र मुस्लिम राज्य स्थापन केले. तेव्हापासून १५७६ पर्यंत हे अफगाण सुलतानच राज्य करीत होते. मध्यंतरी, सन १३८६ च्या आसपास, हे अफगाणी राज्य कंस नामक अेका हिंदु जमीनदाराने पादाक्रांत केले आणि बंगालवर हिंदुसत्ता स्थापन केली. तो राजा कंस सन १३९२ मध्ये मरण पावल्यावर त्याचा मुलगा जितमल्ल ह्यास बंगालचे राज्य प्राप्त झाले. पण तत्रस्थ हिंदूंचा त्या काळचा अकर्तेपणा असा की, त्या हिंदु जितमल्ल राजास विपरीत बुद्धी होअून त्याने स्वतःच मुसलमानी धर्म स्वीकारून जलालुद्दिन असे नाव धारण केले! आणि हेही ध्यानात ठेवण्यासारखे आहे की, या दुष्कृत्यासाठी त्याला शासन देणारा अेकही हिंदु त्या सबंध बंगाल प्रांतात निघाला नाही! ते मुसलमानी राज्य त्यांनी निमूटपणे स्वीकारले.

आणखी अेका वेळी अेका कर्तृत्ववान आणि धर्माभिमानी हिंदू जमीनदारानेही अशीच क्रांती जवळजवळ घडवून आणली होती. पण तिचाही शेवटी असाच विचका झाला. बंगालमध्ये ज्या मोजक्या हिंदु वीरांनी म्लेंच्छांविरूद्ध अशा निकराच्या अुठावण्या केल्या त्या सर्वांत हिंदु स्वातंत्र्यधुरंधर योद्धा आणि राणा प्रताप, बाबाबंदा अित्यादी भारतीय हिंदुवीरांच्या मालिकेत सन्मानिला जावा असा अेकमेव पुरुष म्हटला म्हणजे जशोधराचा महाराजा प्रतापादित्य हा होय! त्याचे

कार्यक्षेत्र विस्तीर्ण नव्हते तरी, आणि शेवटी त्यांसही तिकडील हिंदुसमाजाच्या प्रबल पाठिंब्याच्या अभावी जरी अपयश आले असले तरी, हिंदु स्वातंत्र्याच्या अितिहासात त्याचे नाव संस्मरणीय आहे!

**काश्मीर** - ह्या समीक्षणाच्या ग्रंथात ह्या प्रकरणाच्या कालखंडात काश्मीरच्या अितिहाससंबंधी स्थलाभावामुळे अितकेच सांगणे पुरे आहे की, खाली अुत्तर हिंदुस्थानातल्या गुजराथ प्रभृति प्रांतांतून मुसलमानांचे कितीही अुपद्व्याप चालू असले, आणि ज्यांची वृत्ते या ग्रंथात अवश्य तितकी अुल्लेखिलेलीच आहेत, तथापि काश्मीरमध्ये अि. सन चौदाव्या शतकापर्यंत हिंदु राज्यच कधी प्रबळपणे तर कधी मंद पण स्वतंत्रपणे नांदत होते. तेथील शेवटचा हिंदुराजा सेनदेव या नावाचा होता. ह्या काश्मीरच्या हिंदुराजाच्या राजतरंगिणी या नावाचा अितिहास कल्हणपंडित या विद्वानाने लिहिलेला आहे. येथे अितकेच काय ते अुल्लेखिले पाहिजे की, ह्या सेनदेवाने शहामीर किंवा मिर्झा नावाचा कोणी मुसलमान आपल्या राजसभेतील अधिकारावर नेमता नेमता त्याला मुख्य प्रधान केले होते. सेनदेवाच्या मृत्यूनंतर, अनेक हिंदुराज्यांच्या अितिहासात घडले त्याप्रमाणे येथेही घडून ह्याच मुसलमानाने आधीपासून रचलेल्या कारस्थानाच्या बळावर काश्मीरच्या हिंदुराज्याचा विश्वासघाताने अंत केला. आणि शेवटी शमसुद्दिन नावाची पदवी धारण करून तो त्या राज्याचा स्वामी झाला!

अर्थात शेवटी सगळे हिंदुस्थान, जसे हिंदुंनी, मुसलमानांच्या हातून परत हिसकावून घेतले, त्याचप्रमाणे, आम्हा हिंदूंच्या शिखांनी आणि डोग्रांनी, केवळ काश्मीरच मुसलमानांच्या हातून परत हिसकावून घेतले अितकेच नाही तर त्यापुढे अेका बाजूला लडाख आणि दुसऱ्या बाजूला गिलजितपर्यंत चढाया करून तेथेही हिंदुध्वज रोविले!.... पण ते अनेक रणांगणे गाजविल्यानंतर यथासमय काही शतके पुढे!

## प्रकरण ७ वे

# विजयनगरच्या विजयशाली नव्या स्वतंत्र हिंदुराज्याची स्थापना

वाचकांच्या अनुसंधानासाठी मागील प्रकरणातील काही घटनांचे कालदर्शक सन आरंभीच अुल्लेखिणे आवश्यक आहे. दक्षिणेवर परकीयांची आणि विशेषतः परधर्मीयांची पहिली स्वारी अशी जी झाली ती म्हणजे सुलतान अल्लाअुद्दिनाने केलेली सन १२९४ मध्ये देवगिरीवर जी केली तीच स्वारी होय. त्यानंतर अत्यंत कटोविकट त्वरेने अेकामागून अेक अशा मुसलमांनी सुलतानांच्या मलिक काफूर आणि खुश्रूखान ह्या पराक्रमी, क्रूर आणि सहस्त्रावधि हिंदु लोकांना बळाने वाटविणाऱ्या सेनापतींच्या प्रचंड अशा सन १३१८ पर्यंत तीनचार स्वाऱ्या दक्षिणेत झाल्या. या पंचवीस वर्षांच्या आत मुसलमानांनी सारा दक्षिण देश पादाक्रांत करून टाकला आणि पाचसहा मोठमोठी प्राचीन आणि प्रबळ म्हणून गाजत आलेली देवगिरी ते मलबारपर्यंतची हिंदुराज्ये रसातळाला नेली!... हे गेल्या प्रकरणात वर्णिलेले अैतिहासिक सत्य हिंदुराष्ट्राच्या स्वाभिमानास जितके हिणविणारे आहे आणि आपल्या अितिहासातील अेक लांच्छनीय आश्चर्य आहे तितकेच ह्या राक्षसी म्लेंच्छ शत्रूंच्या प्रलयासारख्या अनावर वेगाने अुफाळलेल्या सेनासागरास अगस्तीप्रमाणे अेका आचमनात पिअून टाकून ज्या दाक्षिणात्य हिंदुवीरांनी दिल्लीच्या सुलतानी सत्तेच्या पुढील अवघ्या दहा बारा वर्षांतच चिंधड्या अुडवून टाकल्या आणि हिंदुराष्ट्राचे दक्षिणेत तरी पुनर्निर्माण करणारे अेक विजयशाली असे विजयनगरचे नवे हिंदु साम्राज्य अुभारले! - ही अैतिहासिक घटनाही अितकी भूषणास्पद आहे की तिचा आपले हिंदुराष्ट्र जितका अभिमान वाहील तितका थोडाच होणार आहे!

कारण मुसलमानांनी सारी दक्षिण सन १३१८त पादाक्रांत करण्याच्या आधीच त्या काळी मलबारवर स्वारी करून आलेल्या त्यांच्या प्रबळ सेनापतीशी -खुश्रूखानाशीच दक्षिणेत पुन्हा हिंदुसत्ता लगोलग स्थापन करण्याची दुर्दम्य महत्त्वाकांक्षा धारण करणाऱ्या काही हिंदु पुढाऱ्यांनी लागेबांधे बांधण्यास प्रारंभ केला होता. सेनापती खुश्रूखानाचे मनात दिल्लीस जाअून तेथील सुलतानास ठार मारून स्वतःच सुलतानपद घेण्याचे गुप्त बेत चालले होते. पण या साहसी नि भयंकर कारस्थानात त्याला सुलतानाच्या कट्टर अिस्लामनिष्ठ सरदारांचे साहाय्य मिळणे अशक्य होते. पण हिंदु संस्थानिकांचे नि सरदारांचे सक्रिय वा निष्क्रिय साहाय्य मिळणे मात्र शक्य होते. कारण खुश्रूखान हाच त्यावेळी त्याला स्वतःला बळाने मढविण्यात आलेल्या मुस्लिमपणाच्या कातड्यास फाडून तोडून अुघड अुघड आपल्या मूळच्या हिंदुपणात प्रकट होण्यास आतुर झालेला होता. त्यामुळे दक्षिणेतील तेवढ्यातच मुसलमानांनी पादाक्रांत केलेल्या हिंदुसमाजाच्या धुरंधरांशी त्याचे काहीतरी सहकार्याचे अत्यंत गुप्त खलबत चाललेले होते, अशा चुगल्या थेट दिल्लीच्या मुस्लिम सुलतानाच्या दरबारापर्यंत आतून आतून पोहोचत होत्या. ह्या सर्व प्रकरणांचे संभवनीय, शक्य आणि सिद्ध ते वृत्त समन्वित करून तो सुसंगत अितिहास गेल्या ५व्या प्रकरणातच आम्ही सांगितला आहे. तो वाचकांनी वाटल्यास पुन्हा पहावा. स्थलाभावी येथे खालील त्रोटक वृत्त देणे या काळच्या अितिहासाच्या समीक्षणापुरते पर्याप्त आहे.

यादव कुळातील संगम नावाच्या अेका गृहस्थाचे मुलगे हरिहर नि बुक्क हे अनागोंदी राजाच्या पदरी होते. देवगिरी आणि वरंगळवरील अल्लाअुद्दिनाच्या राजवटीतील मागे अुल्लेखिलेल्या मुसलमानी स्वाऱ्यांनंतरच्या धुमाकुळीत अनागोंदीच्या राजाचाही मुसलमानांनी पराभव केला. अनागोंदी हीच किंवा तिच्या जवळपास वालीची किष्किंधा नगरी होती अशी दंतकथा आहे. अनागोंदीच्या राजाचा पराभव केल्यानंतर हरिहर नि बुक्क या तरुणांना धरून मुसलमानांनी दिल्लीला सन १३२७ मध्ये नेले आणि त्यांना बाटवून मुसलमान केले. पुढे त्या मुलांचे वृत्त आणि तेज पाहून स्वतः सुलतान महंमद तघलखने हिंदूंशी लढण्यासाठी जी नवी स्वारी दक्षिणेत जाण्यास धाडली त्या मुस्लिम सैन्यासह त्यांनाही प्रमुख पदे नि अधिकार देअून पुढे सन १३३१ मध्ये धाडले पण दक्षिणेत येताच....**बहुधा पूर्वसंकेताप्रमाणे** त्यांची, त्यावेळचे संकेश्वराच्या शंकराचार्य पीठाचे अधिकारी असताही राजकार्यधुरंधुर असलेले श्री विद्यारण्यस्वामी यांच्याशी भेट झाली. तेव्हा स्वतः

शंकराचार्यांच्या हस्तेच, त्यापूर्वी बळाने मुसलमान केलेल्या त्या, तेजस्वी तरूणांना शुद्ध करून परत हिंदुधर्मात घेण्यात आले. त्या तरुणांनी नवे हिंदु सैन्य अुभारून, जी मुस्लिम सेना त्यांच्या हाताखाली हिंदुंशी लढण्यासाठी म्हणून दक्षिणेत आलेली होती तिच्यावरच अुलटून तिला धुळीस मिळविले. नंतर, विद्यारण्यस्वामी-संकेश्वरचे हे शंकराचार्य यांच्या नि त्या वेळचे अितरही धुरंधर हिंदु पुरुषांच्या अेकमताने तुगंभद्रेच्या काठी, दिल्लीच्या मुस्लिम सुलतानाची किंवा कोणत्याही मुस्लिमाची सत्ता नसलेले संपूर्णपणे स्वतंत्र नि सार्वभौम असे नवे हिंदुराज्य स्थापण्याचे ठरले. त्याची राजधानी तुंगभद्रेच्या काठी हिंदुंच्या विजयाचे द्योतक असे विजयनगर नावाचे नगर वसवून तेथे स्थापण्यात आली. त्या राज्याचे अधिपत्य श्री हरिहर यांनाच सन १३३६ त देण्यात आले आणि स्वतः श्री विद्यारण्य स्वामी त्याचे मुख्य प्रधान झाले.

या सर्व घटनांविषयी अितिहासकारांना आजपर्वंत बहुधा न अुकललेले अेक कोडे येथे अुलगडून सांगितले पाहिजे; ते हे की, महंमद तघलख हा जरी वेडा म्हणूनच अितिहासात अुल्लेखिला जातो तरी तो वेडा नसून फार तर त्याला वेडसर म्हणता येअील. त्याने दिल्लीहून देवगिरीस राजधानी आणण्याचा जो बेत केला तो सुद्धा अगदी वेडाची अेक लहर म्हणून सांगितला जातो तसा नव्हता, तर दक्षिणेत सुलतानांनी जे नवीन विजय संपादन केलेले होते ते पुरतेपणी पचवून टाकण्यासाठी मध्यवर्ती राजधानी आणि तीही दक्षिणेत त्या विजित प्रदेशाजवळ असेल तर तिकडे सुलतानाची सत्ता अधिक प्रबळपणे नांदविता येअील, या मुख्य विचाराने त्याने राजधानी दक्षिणेत देवगिरीला नेण्याची विलक्षण धडपड केली - त्याला केवळ वेडाची लहर आली म्हणून नव्हे! आता देवगिरीला राजधानी आणल्यानंतर लवकरच पुन्हा दिल्लीला राजधानी नेण्याची त्यास जी 'लहर' आली आणि त्यापायी लोकांचे अतोनात हाल झाले तीही महंमद तघलखाची केवळ लहर नव्हती. खरी गोष्ट अशी होती की, सुलतानाची सार्वभौम सत्ता, जी दक्षिणेस अलीकडेच दहावीस वर्षे स्थापन झाल्यासारखी वाटली होती ती तेथील हिंदूंना असह्य नि मानहानीची वाटून ती अुलथून टाकण्यासाठी सर्व हिंदुराजांची, धर्मगुरूंची आणि हिंदू जनतेची मोठी सिद्धता गुप्त रीतीने चाललेली हाती, आणि त्या सशस्त्र अुठावणीचा धाक मुसलमानांच्या सैन्यालासुद्धा पडलेला होता. अशाच स्फोटक परिस्थितीत आपण स्वतः त्या बंडखोर हिंदूंच्या जाळ्यात जाणूनबुजून गुंतून राहावे हे प्रसंगी प्राणघातकही ठरणारे आहे, ही खरी वस्तुस्थिति सुलतान महंमद तघलखाच्या ध्यानात आली; आणि म्हणूनच त्याने देवगिरी सोडून राजधानी परत अुत्तरेकडे लांब नेण्याचा बेत तडकाफडकी सिद्धीस नेला - केवळ त्याला 'लहर' आली म्हणून नव्हे! हिंदूंच्या वाढत्या शस्त्रशक्तीची भीती ही त्याच्या ह्या अुलटसुलट वेडाच्या लहरींच्या गोंधळास आणि घाबरगुंडीस कारण झालेली होती!

आणखी अेका महत्त्वाच्या घटनेचे कोडे या प्रकरणी बहुतेक अितिहासकारांच्या लक्षातच आलेले नाही; पण ते न डावलण्याअितके आश्चर्यकारक आहे- ते, हे की, संगम नावाच्या यादवकुलीन ज्या गृहस्थाचे हरिहर नि बुक्क हे तरुण पुत्र मुसलमानांनी पकडले ते गृहस्थ अनागोंदीच्या नि वरंगळच्या राजांचे निकटवर्ती संबंधी होते. त्यामुळे, हे त्यांचे पुत्रही त्या राजघराण्याशी संलग्न होते. त्यांना धरून दिल्लीस नेअून जे मुसलमान करण्यात आले ते महंमद तघलखाने त्यांचे हे राजकीय महत्त्वही विचारात घेअूनच होय. अनेक हिंदू राजांवर असा बळाने मुसलमान केले जाण्याचा प्रसंग आलेला होता. पण अशा भयंकर संकटातून त्यापैकी कोणी सुटले तरी त्यांना परत हिंदू होण्याची काही आशा नसे. कारण शुद्धिबंदी! याविषयी चर्चा या पुस्तकाच्या पूर्वार्धात केलेलीच आहे. तरीही, हरिहर, आणि बुक्क या दोन हिंदु तरुण वीरांमध्ये बळाने मुसलमान केल्यावरही परत हिंदु होण्याची जी धमक निर्मिली गेली आणि विद्यारण्यांसारख्या शंकराचार्यांनी शुद्धीविरुद्ध तत्कालीन जनमत नि कलियुग-वर्जादिक प्रक्षिप्त पण रूढ शास्त्रे अगदी ताठ विरुद्ध असताही या दोघांना शुद्ध करून घेण्याचे जे धाडस केले आणि अनेक हिंदु धुरंधरांनी त्या नवीन अुपक्रमाला अुचलून धरले, त्याची प्रेरणा हिंदूंमध्ये कोणत्या कारणाने अशी दूरवर संचरली?

याचे सरळ अुत्तर, त्याच घटनेच्या केवळ दहाबारा वर्षांच्या आधीच, हिंदुसम्राट धर्मरक्षकाने (नासिरूद्दिनाने), जी अभूतपूर्व राज्यक्रांती नि धर्मक्रांती, भर दिल्लीत केली तीतच सापडते! कारण सुलतान नासिरुद्दिन हाही मूळचा हिंदु! बळाने बाटवून मुसलमान केलेला! पण अल्लाअुद्दिनाचा नि त्याच्या मुलाचा त्याच्यावर विशेष लोभ जडून त्याला खुश्रूखान ही

पदवी देअून चढवीत चढवीत शेवटी त्याचे हाताखाली मोठे मुस्लिम सैन्य देअून सेनापती म्हणून दक्षिणेवर स्वारी करण्यास सुलतानाने धाडले, अितके सामर्थ्य हाती येअीतो त्या खुश्रूखानाने बाह्यात्कारी मुसलमानीपणच पाळले, पण स्वारीहून दिल्लीत परतताच त्याने अकस्मात मुस्लिम सुलतानाला ठार मारून स्वतः आपण मूळचे हिंदु होतो आणि तोच धर्म परत स्वीकारीत आहोत, असे अुद्‌घोषून 'हिंदुसम्राट' म्हणून दिल्लीच्या सिंहासनावर आरोहण केले! अितकेच नव्हे, तर शतावधि बाटविलेल्या हिंदूंची शुद्धी केली, मशिदींची मंदिरे केली! मुसलमानी साम्राज्य आणि मुसलमानी धर्म या दोहो वरती हिंदुत्वाची अशी अपूर्व चढाअी करणाऱ्या या हिंदुसम्राटाच्या साऱ्या भारतभर खळबळ अुडविणाऱ्या ह्या क्रांतीच्या बातम्या आधीच पसरलेल्या होत्या. अर्थात जेव्हा हरिहर नि बुक्क यांना मुसलमान करून दिल्लीस तीनचार वर्षे सुलतान महंमदाने निबद्ध करून ठेवलेले होते तेव्हा दिल्लीस घरोघर त्या हिंदुसम्राटाच्या हिंदुधर्मक्रांतीच्या अवघ्या दहाबारा वर्षांपूर्वी घडलेल्या त्या अपूर्व घटनेची चर्चा चाललेली त्यांनी अैकली असलीच पाहिजे, आणि तिच्याच प्रेरणेने त्यांनाही मुसलमानांच्या हातून पुन्हा सुटून दक्षिणेस ससैन्य परतण्याची अशक्यप्राय घटना शक्य करण्याचा हाच गुप्त मार्ग आपणही अनुसरावा असे वाटले असले पाहिजे! त्याप्रमाणे त्यांनी मुस्लिम सुलतान महंमद तघलख याचा विश्वास पूर्णपणे संपादून आपण दोघेही कट्टर मुसलमान आहोत, असे त्यास भासविले असले पाहिजे! म्हणूनच सुलतान महंमदाने त्या हरिहर-बुक्कांना मुस्लिम सैन्याच्या त्या विभागाचे सेनापतिपद दिले! ज्या वेळी महंमद तघलख देवगिरीहून राजधानी दिल्लीस परत आणता झाला तेव्हा त्याने दक्षिणेत आपल्या मागे सुलतानी सत्ता सांभाळणारे असे पुरेसे मुस्लिम सैन्य ठेवलेले नव्हते. त्यातही दक्षिणेकडच्या संभाव्य हिंदू अुठावाच्या बातम्या आल्या. तेव्हा या दोघा दक्षिणेकडच्या राजकुटुंबाशी निकट संबंध असणाऱ्या तरुणांनाच ते आता कट्टर मुस्लिम झाले असल्याने मुस्लिम सैन्यासह दक्षिणेत मुस्लिम सत्ता पुन्हा प्रबळ करण्यास धाडावे, असे योजिले. त्या हरिहर-बुक्कांना हवी होती तीच संधी मिळाल्याने त्या दोघांनीही ते कार्य पार पाडण्याचा विडा अगदी आवेशाने अुचलल्याचे बाह्यात्कारी भासविले. बाटलेल्या हिंदूंना मुस्लिम सत्ता वाढविण्यास धाडण्याचा दिल्लीच्या सुलतानांचा हा प्रघातच होता आणि असे प्रयोग मलिक काफुरादि अनेक अुदाहरणांत यशस्वीही होत असत. सुलतानाच्या या वरील आज्ञेप्रमाणे मुस्लिम सैन्य घेअून दक्षिणेतील हिंदुराजांचे बंड मोडून काढण्यासाठी म्हणून दक्षिणेकडे हरिहर नि बुक्क जे गेले ते थेट त्यांच्या मूळ वरंगळ ते अनागोंदी या प्रदेशातच येअून अुतरले.

बहुधा दक्षिणेत येण्याच्या आधीच त्या बंधूंनी त्यांच्या गुप्त बेताची नि मनिषेची सूचना श्री स्वामी विद्यारण्य नि अितर हिंदुराजमंडळ यांना कळविलेलीही असली पाहिजे. सुलतानाच्या हातावर तुरी देअून निसटून दक्षिणेत ते जे आले आणि पुन्हा हिंदुधर्मात जे अुघडपणे प्रवेश करणार होते; ती प्रेरणा प्रत्यक्ष हिंदुसम्राट धर्मरक्षक (सुलतान नासिरुद्दिन) याच्या दिल्लीतील धर्मक्रांतीमुळे दक्षिणेतील राजमंडळात आणि शंकराचार्यादि धर्मगुरूंतही आधीच संचारलेली होती. त्यामुळे हरिहर आणि बुक्कांनाही समारंभपूर्वक शुद्ध करून घेण्याचे स्वामी विद्यारण्य प्रभृति हिंदुधर्मधुरंधरांनी वीरवर हरिहर आणि बुक्क यांच्या संमतीने ठरविले.

'हिंदुसम्राट श्री धर्मरक्षक (नासिरुद्दिन) याने दिल्लीस केलेल्या राज्यक्रांतीच्या प्रचंड प्रयोगाचे परिणाम दूरवर झाले' असे जे आम्ही, मागे पाचव्या प्रकरणाचे शेवटी, म्हटले आहे ते किती यथार्थ आहे; हे, त्या महान घटनेच्या विजयनगरच्या या राज्यक्रांतिवर झालेल्या या परिणामांवरूनहि सिद्ध होअील आणि तरीही त्या महान घटनेचा अुल्लेख, आजवर अितिहासकारांनी, काही तुच्छ लांच्छनास्पद शब्दांनीच काय तो केलेला असावा ही गोष्ट आजचे अितिहासग्रंथ, हिंदुदृष्टि नसल्यामुळेच, असे काही प्रकरणी तरी अगदी आंधळे झालेले आहेत, हेच सिद्ध करते!

विजयनगरचे हे नवे हिंदुराज्य स्थापणाऱ्या हिंदू पिढीच्या कर्तृत्वाचा जितका गौरव हिंदु अितिहासात व्हावयास हवा आहे तितका अजूनही झालेला नाही. श्री. माधवाचार्य अर्थात संकेश्वरचे शंकराचार्य श्री विद्यारण्य स्वामी यांचेच अुदाहरण घ्या! हा अलौकिक पुरुष महान राज्यक्रांतिकारक कसा होता हे वर सांगितलेच आहे. परंतु तितकाच तो धर्मक्रांतिकारकही होता, हे त्यांनी त्या वेळच्या रूढ 'शास्त्रास' झिडकारून केलेल्या हरिहर नि बुक्क यांसारख्या

राजपुरुषांच्या शुद्धीवरून स्पष्ट होते. त्याचप्रमाणे ज्ञानातही तो त्या काळच्या विद्वानांचा मुकुटमणी होता. त्यांनी संस्कृत भाषेत अनेक विषयांवर अनेक ग्रंथ लिहिले. त्यातील सर्वदर्शनसंग्रह आणि पंचदशी हे सुविख्यात आहेत. खरोखर, आद्यशंकाराचार्यांनंतर असा शंकाराचार्य शृंगेरीपीठावर तर काय, पण कोणत्याही धर्मपीठावर आरूढलेला आढळत नाही! त्यातही नवीन स्थापन झालेल्या या हिंदुराज्याचा राजा जो पराक्रमी वीर हरिहर त्याचे मुख्य प्रधानत्व स्वीकारून ते राज्य प्राथमिक अवस्थेत असलेल्या अत्यंत कठीण परिस्थितीत साऱ्या मुसलमानांच्या छातीवर वाढवून दाखविण्यात त्यांनी जे राज्यव्यवहारी नैपुण्य नि कूटनीती प्रकट केली त्यास तर दुसरी तोडच सापडणार नाही! ज्याप्रमाणे, राणा प्रताप, राजा छत्रसाल, गोविंदसिंह, चैतन्य, बंदाबैरागी अित्यादी हिंदुराष्ट्रातील त्या काळच्या महापुरुषांची नावे आपणा हिंदूंच्या तोंडी रुळलेली आहेत, त्याप्रमाणे, या विजयनगरच्या राज्यकालातील वरील विद्यारण्य स्वामी, वीरवर हरिहर, बुक्क, महाराजाधिराज पदवी धारण करणारे दुसरे हरिहर, आणि त्यांचे प्रधान सायणाचार्य - जे विद्यारण्य स्वामींचे बंधू होते आणि ज्यांनी वेदांवर आजही अधिकृत मानले जाणारे महाभाष्य लिहिले, महाराजाधिराज कृष्णदेवराय, आणि त्या वेळच्या आदिलशाही, निजामशाही अित्यादी मुसलमानांच्या महाराष्ट्रातील पाची सुलतानांचा वारंवार पराभव करणारा पण अंती सर्व मुसलमान सुलतानांनी अेकत्र होअून केलेल्या स्वारीतही, राक्षसतंगडीच्या संग्रामात त्यांच्याशी शेवटपर्यंत अभिमुख लढत असता शत्रूंकडून ज्याचा शिरच्छेद केला गेला तो, 'दन्तच्छेदो हि नागानां श्लाघ्यो गिरिविदारणे' या न्यायाने, महाराजाधिराज रामरायही, ह्यांची नावेही, आमच्या हिंदुराष्ट्राच्या अितिहासातील महापुरुष म्हणून सर्वतोमुखी रुळली पाहिजेत! परंतु आज अुत्तर हिंदुस्थानातील हिंदूंना या नावांचा बहुधा पत्ताही नसतो. आणि अिकडे दक्षिणेत सुद्धा सहस्त्रांत अेखाद्या हिंदूलाच ती पुसटपणे अैकल्यासारखी वाटतात, ही लज्जास्पद स्थिती पालटली पाहिजे.

## बहामनी राज्याची स्थापना

विजयनगरचे हिंदुराज्य स्थापन होअून दिल्लीच्या सुलतानाच्या सार्वभौम सत्तेचे तुकडे तुकडे दक्षिणेत पाडण्यात आले, हे पाहताच सुलतान महंमद तघलखाने पूर्वी देवीगिरीहून दिल्लीला राजधानी परत नेताना दक्षिणेकडील मुस्लिम सत्तेचा कारभार पाहण्यासाठी हसन गंगू नावाचा जो अेक प्रबळ सुभेदार मागे ठेवला होता, त्यानेही त्याचा धनी असलेल्या त्या दिल्लीच्या मुस्लिम सुलतानाविरुद्धच बंड केले आणि नर्मदेखालच्या कृष्णेपर्यंतच्या प्रदेशाचा सुलतान म्हणून आपली स्वतःचीच घोषणा करून अेक 'बहामनी' नावाचे स्वतंत्र मुस्लिम राज्य सन १३४६ मध्ये स्थापले आणि गुलबर्गा येथे आपली राजधानी केली. विजयनगरच्या हिंदुराज्य स्थापनेनंतर अवघ्या दहा-अकरा वर्षांनी हे बहामनी मुस्लिम राज्य स्थापन झाल्यामुळे साऱ्या दक्षिणेतील दिल्लीच्या सुलतानांची सत्ता अुखडली जाअून दक्षिणेत दोन प्रमुख राज्ये काय ती अुरली, अेक हे बहामनी राज्य, नि दुसरे विजयनगरचे. बहामनी हे नाव त्या हसन गंगूने जे धारण केले त्याच्या दोन अुपपत्ती अितिहासात प्रचलित आहेत. हा हसन पूर्वी गुलाम असताना दिल्लीच्या अेका गंगू नावाच्या ब्राह्मणाच्या घरी चाकर म्हणून राहिलेला होता. त्या गंगू ब्राह्मणाने त्याच्या अेकनिष्ठ सेवेवर संतुष्ट होअून आणि त्याची कुंडली पाहून त्याला आशीर्वाद दिला होता की, 'तू केव्हातरी राजा होशील.' ते अैकताच हर्षभरित होअून हसन आपणा स्वतःला हसन गंगू म्हणून म्हणवून घेअू लागला आणि खरोखरीच दक्षिणेचे राजपद हाती येताच तो आपल्या ब्राह्मण धन्याचा प्रसादच आहे असे भावून त्याने त्या आपल्या राज्याचे नाव 'बहामनी राज्य' असे ठेवले. दुसरी अुपपत्ती काहीजण सुचिवतात ती ही की, अिराणातल्या बहामनी नावाच्या अेका राजकुलाशी आपला संबंध आहे, असे हसन गंगूला वाटत असावे म्हणून त्याने आपल्या या राज्यास बहामनी असे म्हटले. पण मग तो स्वतःच्या नावात हसन गंगू असा त्या ब्राह्मणाच्या नावाचा अुल्लेख मात्र शेवटपर्यंत जो करीतच राहिला तो का? आणि याचा अिराणातल्या बहामनी राजकुलाशी संबंध होता याला तरी पुरावा असा काहीच नाही!

ह्या बहामनी राज्याची सीमा विजयनगरच्या तुंगभद्रा नदीच्या सीमेशी भिडलेली होती. त्यामुळे, या दोनही राज्यांत सारखी युद्धे चालू राहिली. पण ज्यांना विजयनगरच्या हिंदुराज्याचा आणि तदनुषंगे या बहामनी राज्याशी त्याच्या झालेल्या युद्धांचा, त्यांच्या अितिवृत्तांचा अितिहास अधिक सविस्तरपणे वाचावयाचा असेल त्यांनी पुढील दोन पुस्तके अवश्य

वाचावीत- (1) The Forgotten Empire (2) The Never to be Forgotten Empire. पहिला ग्रंथ अेका ब्रिटिश विद्वानाने लिहिला असून दुसरा त्याला काही अंशी प्रत्युत्तर देणारा संशोधनात्मक ग्रंथ दुसऱ्या अेका विद्वानाने लिहिलेला आहे.

कारण, हा सर्व अितिहास सांगण्याचे स्थळ हा ग्रंथ नव्हे. हा ग्रंथ अितिहासग्रंथ नसून अितिहासाचे अेक समीक्षण आहे, हे आम्ही प्रथमपासूनच सांगत आलो आहोत. तथापि समीक्षणापुरत्या तेवढ्या काही अुल्लेखनीय घटनांचे कथन येथे करीत आहोत.

## विजयनगरची बांधणी

विजयनगर ही राजधानी ज्या स्थली स्थापण्याचे विद्यारण्य प्रभृति धुरंधर हिंदु नेत्यांनी ठरविले ते तुंगभद्रेच्या काठचे स्थळ स्थापत्यशास्त्राच्या नि सैनिकी दृष्टीनेही अशा बळकट परिसरात निवडले गेले होते की, परकीय तज्ज्ञ प्रवासीही त्या संस्थापकांच्या सैनिकी शिल्पशास्त्रीय दृष्टीची प्रशंसा करतात. या स्थळाच्या तिन्ही बाजूंनी अुंच टेकड्या आहेत आणि चौथ्या बाजूस खोल नदी आहे. त्यामुळे, तेथे स्थापलेल्या या राजधानीच्या विशाल नगरास अेकप्रकारे निसर्गानेच प्रचंड तटबंदी अुभारल्याप्रमाणे सुरक्षितता आणलेली होती. ह्या नगराभोवती अेकाच्या आत दुसरा असे अनुक्रमे सात बळकट तट बांधलेले होते. त्या प्रत्येक विभागात अेकाहून अेक अशी भव्य नि शोभिवंत मंदिरे, भवने, प्रासाद आणि जलाशय निर्मिलेले होते. त्या सर्व भवनांवर, मंदिरांवर आणि मुख्य राजप्रासादावरही मोठमोठे सुवर्णकलशमंडित भगवे ध्वज फडकत. कारण विजयनगर राज्याचा अधिकृत ध्वज, जो हिंदुराष्ट्राचा परंपरागत भगवा ध्वज होता, तोच भगवा ध्वज होता!

या सर्व मंदिरांमध्ये जे अत्यंत भव्य, प्रकांड आणि विस्तीर्ण मंदिर होते ते श्रीनृसिंहाचे मंदिर होय! विजयनगरच्या सिंहासनाचे कुलदैवतच नृसिंह हे होते! हिंदुस्थानात नृसिंहाची देवालये क्वचितच आढळतात. परंतु विजयनगरच्या ज्या ज्या राजांनी आपले कुलदैवत, आपले अुपास्य, आपला आदर्श अनेक देवांतून आणि दैवतांतून नृसिंह अवतार हाच निवडला, त्यांची प्रतिभा नि समयज्ञता ही निःसंशय वाखाणण्यासारखी होती.

कारण, त्या काळातील हिंदूंचा बुद्धकालापासून अतिरेकी अहिंसेच्या खुळापायी सौम्य, नेभळट नि सोशीक होत आलेला समाज आणि त्यांच्यावर तुटून पडलेल्या मुसलमानांचा धर्मांध, क्रूर नि नृशंस राक्षसी समाज, यांच्या संघर्षात प्रसंगोचित प्रत्याघातक कूटराजनीती आणि शत्रूस थरकापविणारा क्रूर पराक्रम ह्यांना हिंदूंच्या अंगी स्फुरविणारे जागृत दैवत जर आम्हा हिंदूंच्या पुराणांतरी कोणते अेखादे आढळणारे असेल तर ते श्रीनृसिंहाचेच होय.

**व्रजन्ति ते मूढधियः पराभवं!**
**भवन्ति मायाविषु ये न मायिनः ।।**
**साध्वाचारः साधुना प्रत्युपेयः ।।**
**मायाचारो मायया बाधितव्यः ।।**

**नृसिंहाची कथाच सांगते की प्रल्हादाच्या सद्गुणविकृतीने नव्हे, तर तो क्रूर राक्षस क्रूर कूटनीतीनेच मारला गेला!**

हिरण्यकश्यपूला श्रीशंकराने 'तुला दिवसा किंवा रात्री, ना आत ना बाहेर, आकाशात वा पृथ्वीवर, शस्त्राने वा अस्त्राने, पशू वा मनुष्य कोणीही मारू शकणार नाही' अित्यादी जे वर दिले होते, त्या सर्वांवर जशास तशा पुढील अनुक्रमे विस्मयकारक तोडी काढून हिरण्यकश्यपूला संध्याकाळी, अुंबऱ्यावर ओढून, मांडीवर अुताणा पाडून, स्वतःच्या करकच नखाग्रांनी त्याचे पोट फाडून, ना पूर्ण नर ना पूर्ण पशु असे नृसिंह स्वरूप घेअून त्या देवाच्या शत्रूला ठार केले! त्या दुष्ट दैत्याच्या अंगातून अुडणाऱ्या रक्ताच्या कारंजाने ज्याच्या साऱ्या देहास रक्तस्नान घडले आहे, ज्याच्या भयंकर सिंहगर्जनांनी सारा ब्रह्मांडकटाह गडबडून गेला आहे आणि ज्याच्या क्रोधाविष्ट, अुभारलेल्या नि अुगारलेल्या आयाळाच्या सटाने अक्राळविक्राळ दिसणाऱ्या सिंहस्वरूपास पाहून देवही भयाने थरथर कापत, 'शांत हो! शांत हो!' म्हणून प्रार्थना करू लागले आहेत अशी ती नृसिंहाची अक्राळविक्राळ मूर्तीच ह्या संघर्षसंकुल राक्षसी जगात ज्या राष्ट्राला

जगावयाचे असेल त्याने आपले अुपास्य दैवत म्हणून आणि राष्ट्रीय पराक्रमाचा आदर्श म्हणून आपल्या राष्ट्रमंदिरात पूजिली पाहिजे!

या कथेत आणखीही अेक अत्युदार मर्म अनुस्यूत आहे. हे वरील सिंहासारखा निर्दय नि अनिवार्य पराक्रम करणाऱ्या ह्या नृसिंहावताराचे मूर्त स्वरूप जरी असे अक्राळविक्राळ असले तरी त्यांचे अतःकरण हे नराचे आहे, मानवतेचे आहे. त्याचा क्रूर पराक्रमही मानवतेच्या विकासाला अत्यंत आवश्यक असाच आहे, अनिवार्य म्हणूनच आहे. कारण देव, दैत्य, दानवाचाही थरकाप अुडविणारे त्या अन्यायी, लोकप्रपीडक नि देवद्रोही हिरण्यकश्यपूचे पोट फाडून त्याला ठार करणारे अत्युग्र कृत्यही देवपूजक म्हणून दैवी, न्यायी अशा प्रल्हादासारख्या सज्जनांच्या रक्षणासाठीच अपरिहार्य म्हणूनच काय ते आचरिले गेले होते! मानवी सद्गुणांच्या विकासासाठीच मानवांना जी दुबळेपणाच्या शापाने पंगू बनविते अशा अहिंसेचा प्रसंगी क्रूर हिंसेनेही बळी घेतला पाहिजे - तेच मानवी विकासार्थ अशा प्रसंगी सत्कर्म, सद्धर्म असते ! जगातील मनुष्यजातीच्या त्या काळच्या अपूर्ण विकासाच्या पातळीवर, राक्षसी हिंसेने आणि स्वार्थी महत्त्वाकांक्षेने पछाडलेल्या राष्ट्राराष्ट्राच्या शत्रुधुमाळीच्या परिस्थितीत हिंदुराष्ट्रालाही आपले अस्तित्वच नव्हे, तर अजिंक्यत्वही स्थापित करण्यासाठी नृसिंहासारखेच अुपास्य दैवत असले पाहिजे होते!

विजयनगरच्या राजांनी निवडलेल्या ह्या श्रीनृसिंहाच्या अुपास्य दैवतांचे जे भव्य मंदिर विजयनगर ह्या राजधानीत अुभारले होते असे जे आम्ही सांगितले आहे, ते जसेचे तसे आज अस्तित्वात नाही. मुसलमानांनी विजयनगर जेव्हा अुद्ध्वस्त केले तेव्हाच त्या रानटी विध्वंसकांनी ते नृसिंहाचे राजमंदिरही पाडून तोडून नष्टप्राय करून सोडले. तथापि, अशा अत्यंत भग्नावस्थेतही त्या देवालयातील श्रीनृसिंहाच्या मूळ मूर्तीचा जो अवशेष आजही दिसतो आहे त्यावरूनही त्या मूर्तीच्या मूळच्या भव्य, भयंकर नि प्रचंड स्वरूपाची कल्पना येते. ते श्रीनृसिंहाचे देअूळही त्याच्या मूळ स्वरूपात आणि मूळ वैभवात किती प्रकांड, स्फूर्तिदायक आणि हिंदुस्तानातील मोठमोठ्या देवालयातही आपल्या अप्रतिमतेने अुठून दिसणारे असले पाहिजे, हे ध्यानात येते!

## विजयनगरच्या राजाने बहामनी सुलतानाचा केलेला पराभव

वीरवर हरिहर याच्या मृत्यूनंतर वीरवर बुक्क हा विजयनगरच्या सिंहासनावर बसला. हा बुक्करायही पराक्रमी आणि प्रत्याक्रमक होता. त्याने स्वतःच्या घरात बसून घराचें नुसते संरक्षणच केले नाही, तर मुसलमानांवर प्रत्याक्रमणे करुन सन १३७४ चे आगेमागे बहामनी राज्याचा सुलतान मजाहिदशाह याचा मोठा पराभव केला.

ह्या वीरवर बुक्काने चीनच्या राजाकडेही शिष्टमंडळ पाठविल्याचा अुल्लेख सापडतो. सन १३७९ मध्ये हा पराक्रमी राजा बुक्क मरण पावला. त्यावेळी त्याची गर्भवती असलेली राज्ञी गौरी हिच्या पोटी जन्मलेला त्याचा मुलगा हरिहर दुसरा हा आपल्या पैतृक सिंहासनावर बसला. त्याच्या राजवटीत मुसलमानांवर हिंदूंनी वारंवार विजय मिळवून विजयनगरच्या राज्याचा विस्तार केला. तेव्हा हरिहराने मोठ्या समारंभाने 'महाराजाधिराज' ही पदवी धारण केली. माधवाचार्यांचे (विद्यारण्य स्वामींचे) बंधू श्री सायणाचार्य, हे ह्या महाराजाधिराज हरिहराचे मुख्य प्रधान होते. सुद्द ह्या नावाचे त्याचे प्रसिद्ध सेनापती होते. हरिहराच्या पट्टराणीचे नाव मल्लंबिका अिसग गुण्ड असे होते. महाराजाधिराज हरिहराच्या राजवटीत विजयनगर राज्याचा विस्तार पुष्कळच वाढलेला होता. गोमंतकही त्याच्याच राजसत्तेखाली नांदत होता. ह्या हरिहर महाराजाच्या सन १३९१ तील अेका ताम्रपटात 'गोवाभिधां कोंकणराजधानीम्' असा अुल्लेख केलेला आहे.

ह्या ग्रंथामध्ये विजयनगरच्या किंवा कोणत्याही राजकुलातील पुत्रपौत्रादिकांची नामावली किंवा सविस्तर वृत्तांत देणे अशक्य नि अनावश्यक आहे. म्हणून अेवढेच सांगतो की, दुसऱ्या हरिहराच्या मागून जे राजे झाले तेही विजयनगरचे वैभव टिकवणारे नि वाढविणारेच झाले. त्यांमध्ये अेक अपवादात्मक नि काही अंशी खुळचट नि दुर्बळ राजा झाला त्याचा दुर्दैवी अुल्लेख केला पाहिजे. त्याचे नाव देवराय असे होते. तो सन १४०६ त गादीवर आला. मुसलमानांविरुद्ध तो जळफळतच असे. पण मुस्लिमांना हाणून पाडण्यासाठी त्याने जी विक्षिप्त तोड काढली ती अशी की, मुसलमानी

सुलतानांच्या हाताखाली त्याने जशी हिंदुसैन्ये त्यांचे चाकर म्हणून लढतात त्याप्रमाणे आपणही आपल्या सैन्यात मुसलमानी सैनिकांची भरती करून आपले सैन्यबळ वाढवावे! त्याप्रमाणे त्याने अनेक मुसलमानांची सैन्यात भर केली, पण त्याचा दुर्बळ स्वभाव पाहून ते मुसलमान अितके शेफारले की भर राजसभेत ते रीतीप्रमाणे महाराजांना मुजरा करीनासे झाले आणि अुद्दामपणे म्हणाले: ''आमच्या धर्माप्रमाणे अेका 'अल्लाला' सोडून कोणापुढेही आम्ही मान वाकवीत नाही.'' तेव्हा त्यांच्या समाधानासाठी देवरायाने आपल्या सिंहासनापुढे अेक अंच पीठावर कुराणाचे पुस्तक ठेवले. त्यामुळे स्वत:चा मान राहून मुस्लिम कुराणास मुजरा करतात, राजास नव्हे, असे बाह्यत: दिसे. त्याचप्रमाणे मुसलमानांना प्रसन्न करण्यासाठी त्या राजाने विजयनगरला अेक मशीदही बांधली. अशा शेफारून ठेवलेल्या मुस्लिम सैनिक चाकरांनी भर लढाअीत देवरायाचा विश्वासघात केला, हे सांगणे नकोच.

याचे प्रत्यंतर लगेच थोड्या दिवसांत दिसून आले. त्या वेळी फिरोजखान हा बहामनी सुलतान त्या मुस्लिम राज्यावर होता. त्याच्याशी झालेल्या अनेक युद्धांत शेवटी देवरायाचा पराभव झाला आणि मुसलमानांच्या राक्षसी रूढीप्रमाणे फिरोझखानने संधी करताना देवरायाने आपली मुलगी फिरोझला दिली पाहिजे, ही अट घातली. निरुपायाने देवरायाने ती मान्यही केली. ही रजपुती कन्यादानीय शरणगतीची खोड सुदैवाने दक्षिणच्या अितिहासात दहा-पांच दुर्बळ राजांनीच काय ती त्या दोनशे-तीनशे वर्षांत अनुसरलेली आढळते. अर्थात हेही ध्यानात ठेवले पाहिजे की, मुसलमानांवरही हिंदूंनी जे मोठमोठे विजय त्या काळात मिळविले त्यावेळी शरण आलेल्या कोणत्याही मुस्लिम सुलतानाला वा बादशहाला त्याची मुलगी त्या विजेत्या हिंदुराजाला दिली पाहिजे, अशी अट काही कोणत्याही हिंदु राजाने घातली नाही! कारण अुघडच आहे! कोणी मुसलमानाच्या मुलीशी लग्न करता तर हिंदुराजाच मुसलमान होअून जाता! हिंदूंच्या ह्या धार्मिक दुर्गुणाचे, ह्या 'सद्‌गुणविकृतीचे' दुष्परिणाम हिंदूंना कसे भोगावे लागले ते शुद्धिबंदीविषयक प्रकरणातून या ग्रंथाच्या पूर्वार्धात सविस्तरपणे सांगितले आहे.

## हिंदूंनी मुस्लिमांचा केलेला पराभव नि अुगवलेला सूड!

तथापि, देवरायाच्या मृत्यूनंतर सिंहासनावर आरूढ झालेल्या राजांनी या पराभवाचे अुट्टे काढून हिंदुराज्याचा प्रभाव सर्व मुसलमानी राज्यांवर पुन्हा पाडला. विशेषत: १४१७ साली फिराजखानाने तेलंगणच्या प्रदेशावर जी स्वारी केली तीत मुसलमानांच्या मुख्य वझिरालाच ठार मारून मुसलमानांची हिंदूंनी अगदी दाणादाण अुडवून दिली आणि पूर्वीच्या वैराचा सूड अुगविला!

अि. सन १४६० च्या आसपास विजयनगरच्या राजकुलात सत्तेविषयी तंटे-बखेडे माजले. ती संधि साधून विरूपाक्ष या नावाच्या राजाच्या राजवटीत शाल्व नरसिंह नावाच्या त्याच्या प्रबल सरदाराने त्याला गादीवरून काढून टाकून सर्व सत्ता आपल्या हाती घेतली आणि राज्याची घडी नीट बसवण्यासाठी प्रयत्न केले. मूळच्या यादवकुलीन संगम घराण्याचा ह्या प्रकारे शेवट झाला.

## युरोपियन राष्ट्राची हिंदूंवर धाड पडते

याच कालखंडात युरोपातील पोर्तुगीज लोकांना हिंदुस्थानचा जलमार्ग सापडून त्यांचा हिंदुस्थानात राजकारणीय प्रवेश झाला! तो प्रवेश विजयनगरच्या राज्यात जरी नव्हता तरी हिंदुस्थानच्या दक्षिण टोकाला सामुद्रीन (झामोरीन) राजाच्या प्रदेशात झाला. त्या काळी अगदी क्षुल्लक भासणारी ही घटना येथे कालक्रमणासाठी नुसती अुल्लेखून ठेवलेली आहे. पण तिच्याच मागोमाग अनेक युरोपियन राष्ट्रांची नवी टोळधाड हिंदुस्थानावर पडणारी होती. त्या समग्र प्रकरणाचा परामर्ष नि समीक्षण यथासमय स्वतंत्र प्रकरणातून या ग्रंथात पुढे केली जातीलच.

## महाराजा नरेश

येथे विजयनगरच्या कथानकाचा धागा हाती घ्यावयाचा म्हणजे हे सांगितले पाहिजे की, अेक-दोन पिढ्यांतच वरील शाल्व नरसिंहच्या दुसऱ्या राजकुलाचाही अंत होऊन नरेश नावाच्या त्याच्या सेनापतीने अि. सन १५०७ मध्ये त्या

वेळच्या राजाचा वध करून विजयनगरच्या सिंहासनावर आपल्या तिसऱ्या घराण्याची सत्ता चालू केली. या तिन्ही राज्यकर्त्यांत अेक त्यांतल्या त्यात समाधानाची गोष्ट आढळून येते ती ही की, मुस्लिम सुलतानांची राज्ये चारी बाजूंना या हिंदुमहाराज्याचा प्राण घेण्यास टपून बसलेली असताही आणि या दोघा मुस्लिम पक्षांत युद्धेही सतत चाललेली असताही विजयनगरच्या ह्या राज्यक्रांत्या हिंदूहिंदूतच होत राहिल्या. त्यांत परकीय मुसलमानांना हिंदूंतील या वा त्या पक्षास आपले सहाय्य देण्याच्या मिषाने मुस्लिम सत्तेचे बोट या हिंदूंच्या घरगुती कलहात शिरकविण्याची संधीसुद्धा या मुस्लिम सुलतानांना मिळाली नाही किंवा ते साहसही त्यांना करवले नाही!

## बहामनी मुस्लिम राज्याचे तुकडे पडतात

वरील तिसरी राज्यक्रांती विजयनगरच्या राज्यांत होण्यापूर्वीच विजयनगरच्या शत्रुस्थानी असणारे बहामनी मुस्लिम राज्य भंगून जाअून त्याचे पाच तुकडे पडले. बहामनी सुलतानांनी नर्मदेखाली तुंगभद्रेपर्यंतचा प्रदेश प्रथम जिंकून घेतलेला होता. पण विजयनगरच्या प्रबळ हिंदूराज्याशी त्या मुस्लिम सुलतानांच्या राज्याची सीमा कृष्णा-तुंगभद्रा यांतील दुआबात अगदी खेटून असल्याकारणाने त्यांच्यात वारंवार युद्धे होत. त्यात विजयनगरच्या हिंदुराजांनी मुस्लिमांवर जे वारंवार विजय मिळविले त्यायोगे गोमंतकासारखे अनेक प्रदेश जिंकून आपल्या हिंदुराज्यास जोडले. ओरिसापर्यंत विजयनगरच्या 'रायांची' सत्ता वाढत गेलेली होती, यामुळे तर ती बहामनी मुस्लिम सुलतानशाही आधीच दुबळी झाली होती. त्यांतही तिचे शेवटचे सुलतान टाकाअूच निघाले. तथापि, महंमद गवान नावाचा त्याचा शेवटचा वझीर जो झाला तो त्यांच्या दृष्टीने कर्तबगार नि लढाअू असा होता. त्याच्या प्रामाणिक सेवेने, पराक्रमाने नि शहाणपणाने ते मुस्लिम राज्य कसेबसे सन १४८४ ते १५२६ पर्यंत टिकले. परंतु, त्या मुसलमानी सुलतानाच्या दरबारातील महंमद गवानाचे शत्रुत्व करणाऱ्या मुस्लिम सरदारांनीच अगदी वृद्धपणी महंमद गवानाला ठार मारले. हे ध्यानात ठेवण्यासारखे आहे की, महंमद गवान हा कितीही थोर पुरुष असला तरी जवळजवळ सर्व मुस्लिम सत्ताधाऱ्यांप्रमाणे त्याने बहामनी राज्यात हिंदूंचा छळ करण्यात काही हातचा राखून ठेवला नाही. तथापि, तो जो ठार मारला गेला तो हिंदूंच्या हातून नव्हे; तर त्याच्या मुस्लिम सहकाऱ्यांकडूनच होय!

महंमद गवानाच्या मृत्यूपूर्वीच बहामनी सुलतानाची राजधानी बिदर येथे गेलेली होती. महंमद गवानाच्या मृत्यूच्या आगेमागेच ती दुर्बळ बहामनी मुस्लिम सत्ता पुरती कोसळून पडली आणि तिचे अेकामागून अेक असे पांच तुकडे झाले. ते असे :-

१) विजापूरचे आदिलशाही राज्य
२) वऱ्हाडचे अिमादशाही राज्य
(१४८४-१५०३)
३) गोवळकोंड्याचे कुतुबशाही राज्य
४) अहमदनगरचे निजामशाही राज्य
(१४८९ ते १६३७)
५) बेदरचे बेरीदशाही राज्य

ह्या मूळ बहामनी सुलतानशाहीचे पांच तुकडे जे पडले त्यांत हिंदूंनी विशेष लक्षात ठेवण्यासारख्या दोन घटना तरी सांगितल्या पाहिजेत. पहिली घटना ही की, वर दुसऱ्या क्रमांकाच्या वऱ्हाडच्या अिमादशाहीचा जो अुल्लेख केलेला आहे तिचा संस्थापक हा मूळचा अेक तेलंगी ब्राह्मणच होता! ह्याचा बाप विजयनगरात राहात असे. विजयनगराशी मुसलमानांच्या झालेल्या अेका लढाअीत त्या तेलंगी ब्राह्मणाचा हा मुलगा मुसलमानांच्या हाती लागला. मुस्लिमांनी त्यांच्या दुष्ट रूढीप्रमाणे त्या ब्राह्मण मुलास बंदिवान करून त्यास बाटवून मुसलमान केले आणि आपल्याबरोबर नेले. तो पुढे महंमद गवानाच्या कृपेने हळूहळू मोठ्या योग्यतेस चढला. शेवटी त्याने सन १४८४ मध्ये बहामनी राज्यातून फुटून स्वतंत्रपणे पण मुसलमान म्हणून

अिमादशहा असे नाव धारण केले आणि त्याची नेमणूक ज्या सुभ्यावर झालेली होती त्या वऱ्हाडचा सुलतान म्हणून तो स्वतंत्रपणे राज्य करू लागला - पण मुसलमान म्हणूनच!

दुसरी लक्षणीय घटना म्हणजे बहामनी राज्याच्या पडलेल्या तुकड्यांपैकी वर अुल्लेखिलेल्या चौथ्या क्रमांकाच्या नगरच्या सुलतानशाहीची स्थापना ही होय. विजयनगरास तिम्मप्पा बहिरू (भैरव?) नामक अेक ब्राह्मण होता. तिम्मप्पाच्या मुलाला अहमदशहाचे विजयनगराशी युद्ध चालले असता मुस्लिमांनी बंदिवान करून आणले आणि त्यास मुसलमान केले. त्याचे नाव अहमद असे ठेवले. ह्या बाटग्या अहमदची अेका मोठ्या मुस्लिम सैन्याच्या विभागावर पुढे नेमणूक होताच त्याच्या आधारे सन १४८९ त बहामनी राज्यातून फुटून अहमदनगर येथे त्याने स्वतंत्र मुस्लिम सुलतानशाहीची स्थापना केली. त्याच्या निजाम या पदवीमुळे ती सुलतानशाही निजामशाही या नावानेच प्रसिद्धी पावली. त्याने जिंकलेल्या प्रदेशातच सुप्रसिद्ध शिवनेरी गड हा होता. त्या प्रदेशातच दौलताबाद नि जुन्नर ह्यांचे दरम्यान विंकर म्हणून अेक खेडे होते. ते त्यास राजधानी करण्यास सोयीचे वाटल्यावरून, त्याच्याच अहमद या नावावरून त्या खेड्यास अहमदनगर असे नाव दिले आणि तेथे सन १४९४त राजधानी केली.

ह्या मुस्लिम राज्याचे हे जे तुकडे पडले ते मुस्लिमांच्या आपसांतील यादवीमुळेच मुख्यतः पडले हे लक्षात घेण्यासारखे आहे. मूळच्या बहामनी सुलतानशाहीने विजयनगरच्या हिंदुराज्याचा विध्वंस करण्याची प्रतिज्ञाच केलेली होती. पण लढता लढता बहामनी सुलतानशाहीचेच मुस्लिमांच्या स्वतःच्या दौर्बल्याने आणि कलहापायी पाच तुकडे पडलेले पाहण्यास हिंदूंचे ते विजयनगरचे महाराज्य टिकून राहिले आणि त्यानंतरही त्या पाची मुस्लिम राज्यांच्या तुकड्यांशी रणांगणात ठाण मांडून हिंदूपक्षाच्या वतीने अनेक वर्षे झुंजत राहिले होते! निदान पुढची पाऊणशे वर्षे तरी त्या पाचही मुस्लिम सत्तांना पुरून अुरले होते!

मूळ बहामनी मुस्लिम सुलतानशाहीतील कोणीतरी मुस्लिम सरदार प्रबळ होअी आणि मूळच्या सुलतानाविरुध्द बंड करून आपणा स्वतःसच सुलतान म्हणवून घेअी, आणि आपले वेगळे राज्य स्थापी. अशाच क्रमाने ते पाची मुस्लिम सुलतान नि त्यांची मुस्लिम राज्ये निर्मिली गेली होती. मुसलमान लोक आपसांत लढत नाहीत, ही अनेकांची हिंदूविरुद्ध म्हणून मिरवली जाणारी प्रौढी किती वायफळ आहे, ह्याचे हे बहामनी राज्यातील यादवीचे आणखी अेक ढळढळीत अुदाहरण आहे! अितकेच नव्हे, तर त्यांच्यातील कलहात काही मुस्लिम सुलतान दुसऱ्या मुस्लिम सुलतानांना हाणून पाडण्यासाठी त्या हिंदूंच्या प्रबळ अशा विजयनगरच्या राज्याचे सहाय्यही अनेक प्रसंगी घेत असत, ही वस्तुस्थिती आम्ही खाली अुल्लेखिणारच आहोत. मुसलमान आपापसातील कलहांत हिंदूंचे साहाय्य घेत नाहीत ही आढ्यताही किती निर्मूल आहे, हे विजयनगरच्या सहाय्यासाठी मुस्लिम सुलतान अनेकदा कसे भीक मागत असत ह्यावरूनही ते स्पष्ट होते!

## महाराजाधिराज कृष्णदेवराय

वर अुल्लेखिलेल्या विजयनगरच्या नरेश राजाच्या 'तुळवी' घराण्यातच कृष्णदेवराय हा प्रभावशाली नि पराक्रमी महाराजा अि. सन १५०९ ते १५३० पर्यंत राज्य करून गेला. तो विद्वान असून त्याचे भाषण चतुर नि लाघवी असे. म्हणून, मोठ्या पंडितांवर सुद्धा तो आपला प्रभाव पाडू शकत असे. संस्कृत, तेलगू, तामीळ नि कन्नड विद्यांना त्याच्या राजसभेत अुदार आश्रय मिळत असे. त्याच्या राजसभेत आठ कविश्रेष्ठ होते. त्यांना अष्टदिग्गज असे म्हणत. तो स्वतः ग्रंथकार होता. त्याने लिहिलेला 'आमुक्तामाल्यदा' हा तेलगू ग्रंथ प्रसिद्ध आहे. महाराजा कृष्णदेवराय हा विद्वत्तेप्रमाणेच शिल्पाचाही मोठा भोक्ता होता. विजयनगर येथील प्रख्यात राममंदिर त्यानेच बांधले. अितकेच नव्हे, तर त्याच्या साऱ्या राज्यात ठिकठिकाणी शेकडो गड, कोट, मंदिरे, गोपुरे, मठ नि धर्मशाळा त्याने बांधविल्या होत्या. त्याने ब्राह्मणांना नि देवालयांना अुदारहस्ते दाने दिली. वागणुकीत सभ्यता, संभाषणात पटुत्व, राजकारणात सुविचार नि दूरदर्शित्व, तसेच शत्रूंच्या प्रकरणी शौर्य नि कठोरता या गुणांनी त्याचे चरित्र विभूषित झाले होते. पाश्चात्य नि अितर परकीय अितिहासकारांनी अेकमुखाने महाराजाधिराज कृष्णदेवरायाची 'अेक थोर नि अनन्यसाधारण राज्यकर्ता' अशी प्रशंसा केलेली आहे.

महाराजा कृष्णदेवराय हा सज्जनांशी जसा सौम्यपणाने वागे त्याचप्रमाणे त्याच्या धर्मशत्रूंशी आणि राष्ट्रशत्रूंशी तो युद्धात कठोरपणे आणि पराक्रमाने झुंज देअी! त्याला विजापूरच्या आदिलशहाशी झालेल्या निकराच्या युद्धामध्ये

विजयश्रीने माळ घातली. आदिलशहाचा पराभव केल्यानंतर महाराजा कृष्णदेवरायाने संधि करताना ज्या संधीच्या अटी मान्य करावयास भाग पाडले त्या म्लेंच्छांच्या तोपर्यंतच्या मिरविल्या जाणाऱ्या डौलाचा अितका चक्काचूर करणाया आणि हिंदूंचे वर्चस्व स्थापणाऱ्या होत्या की मुसलमानांनी ती शरणागती मोठ्या कष्टाने स्वीकारली.

त्याचे सैन्यबळही प्रचंड नि शक्तिमान होते. त्यात सात लक्ष पायदळ, बावीस हजार घोडेस्वार नि पाचशे अेकावन्न हत्ती सदोदित सज्ज असत.

महाराज कृष्णदेवरायच्या राजवटीत विजयनगरच्या वैभवाचा आणि सामर्थ्याचा कळस झाला. त्याच्या राजसभेत आलेल्या अनेक परदेशी प्रवाशांनी लिहिलेल्या त्याच्या नि त्याच्या राज्याविषयीच्या विस्तृत वर्णनावरूनच हे निर्विवादपणे सिद्ध होते. त्याच्या स्वरूपाविषयी सुद्धा कित्येक प्रवाशांनी अुल्लेख केलेले आहेत. तो दिसण्यातच देखणा, कर्तृत्वशाली आणि पाहणाऱ्यांच्या मनावर छाप पडावी असा तरतरीत दिसत असे.

तो स्वतः वैष्णव असूनही अितर सर्व हिंदूंतील बहुसंख्य वैदिक पक्षाला आणि अल्पसंख्यांक जैन, लिंगायत, महानुभाव अित्यादी अितर सर्व पंथीयांना सहिष्णुतेने आणि परस्परांचा येणारा विरोध शक्य तो टाळण्याच्या कुशल सामंजस्य वृत्तीने साऱ्या हिंदूंमध्ये अेकात्मतेची भावना जोपासीत असे. विजयनगरच्या राज्याच्या स्थापनेपासूनच शंकराचार्य विद्यारण्य स्वामी, सायणाचार्य अित्यादी धुरंधर नेत्यांनी हिंदूंतील सर्व पंथांना परस्परांत कोणताही कलह सहसा येणार नाही, अशीच समतेची आणि सहिष्णुतेची नैर्बंधिक राजनीती अंगिकारलेली होती. लोकांत धर्मप्रचारानेही आपण सर्व हिंदू आहोत, अशा स्वधर्माभिमानाच्या आणि राष्ट्राभिमानाच्या अैक्य भावनेला बळकटी आणली जात होती. परदेशी प्रवाशीही या धर्मसहिष्णुतेचा आणि समतेचा अुल्लेख मोठ्या कौतुकाने करतात.

## विजयनगरच्या हिंदुराज्याचे वैभव

विजयनगरच्या नागरिक आणि धार्मिक स्वातंत्र्याविषयीच नव्हे, तर त्या राज्याच्या अेकंदर वैभवाविषयी आणि पराक्रमी प्रभावाविषयीही राजकीय प्रवाशांनी असेच गौरवाचे अुद्‌गार काढले आहेत. अुदाहरणार्थ, पोर्तुगीज प्रवासी दुआर्ते बार्बोस हा जेव्हा विजयनगरच्या राज्यात काही दिवस राहून गेला तेव्हा तो त्या राज्याचे अेकंदर वैभव पाहून थक्क झाला. तो लिहितो : ''विजयनगरच्या मार्गातून सर्व राष्ट्रांच्या नि सर्व धर्मांच्या असंख्य लोकांचा घोळका चाललेला दृष्टीस पडतो. नाना देशातील अनेक व्यापारी नि देशातील अत्यंत अुच्चवर्णीय लोक येथे गोळा होतात. अगदी मूरदेशासारख्या दूरच्या नि परकीय लोकांपासून तो अनेक देशांतील ज्यांना ज्यांना येथे व्यापार करणे आणि राहणे आवडते असे असंख्य लोक येथील पेठापेठांतून अतिशय मोकळेपणाने आणि सुरक्षित रीतीने राहतात. कोणापासूनही त्यांना कसलाही अुपद्रव होत नाही; किंवा ते कोठून आले, ते कोणता पंथ पाळतात, किंवा ते मुस्लिम, यहुदी वा ख्रिस्ती वा अुच्चवर्णीय दूरवरून आलेले हिंदू आहेत याविषयीही कोणी आक्षेप घेत नाहीत. तथापि, त्या सर्वांच्याच संबंधात नैर्बंधिक दृष्टीने कडक न्याय पाळण्यात येतो आणि संरक्षण देण्यात येते.''

अिराणच्या शहाने पाठविलेला वकील अब्दुल रझाक याने तर ''अशा प्रकारचे नगर पृथ्वी धुंडाळली तरी पाहावयास मिळणार नाही'' असे स्पष्टपणे म्हटले आहे.'' राजाच्या प्रासादास लागूनच चार विस्तीर्ण रत्नांच्या नि मोत्यांच्या पण्यवीथिका (बाजारपेठा) होत्या. सुवर्ण रत्न-मौक्तिकांनी त्या नगरातील येते-जाते सहस्त्रावधि नागरिक अलंकृत झालेले असतात,'' असेही परकीय प्रवाशांनी लिहिलेले आहे. पोर्तुगीज प्रवासी पोअेस म्हणतो, '' विजयनगरचा विस्तार रोम नगराअितका मोठा आहे.''

विजयनगरचे हिंदुसाम्राज्य हे महाराजाधिराज कृष्णदेवरायाच्या राजवटीच्या आधीपासूनच साऱ्या दक्षिणेत अत्यंत प्रबळ म्हणून गाजू लागले होते. दक्षिणेत नर्मदेपासून कृष्णा नदीपर्यंत मुस्लिमांचे अेक सोडून पांच सुलतान जरी राज्य करीत होते तरीही त्या सुलतानांच्या बहुतेक कुलांत प्रत्येकी भावाभावांचे तंटे चालूच असत आणि प्रत्येकाच्या घरातील ही घरची गादी कोणी घ्यावी याविषयी तंटेबखेडे चालत असतानाच त्या मुस्लिम सुलतानांची आपापसांतील युद्धेही चालूच असत. मुस्लिमांची आपापसांत माजलेली ही यादवी विजयनगरच्या बळकट नि रणशक्तिशाली हिंदुसाम्राज्याच्या

पथ्यावरच पडली आणि सुदैवाने त्या सुवर्णसंधीचा हिंदुसाम्राज्यविस्ताराकडे आणि मुस्लिमांची खोड मोडण्याचे कामी अुपयोग करून घेण्याची बुद्धीसुद्धा त्या वेळच्या हिंदू राजकारणी नेत्यांमध्ये प्रज्वलित होती. यामुळे मुस्लिम सुलतानांना विजयनगरच्या या ‘रायांच्या’ साहाय्यावाचून वा अनुमतीवाचून दक्षिणेतील राजकारणात स्वतंत्रपणे पाअूल टाकता येत नाहीसे झाले होते. मुसलमानी राजांच्या आपापसांतील भांडणात विजयनगरच्या हिंदुराजांचे आपल्यासच साहाय्य मिळविण्यासाठी जो तो मुस्लिम गट धडपडत असे. पूर्वी अेकदा वर अुल्लेखिलेल्या त्या दुर्बळ नि किंचित वेडसर असणाऱ्या राजा देवरायाच्या वेळेस विजयनगरच्या भर राजसभेत अुच्च पीठावर कुराण ठेवण्यासारखी जी मुस्लिम अनुनयांची भीतिगंडजन्य स्तोमे माजली होती ती यच्चयावत् झाडून टाकून हिंदूमन मुसलमानांस महाराजा कृष्णदेवरायापासून क:पदार्थ लेखू लागले होते. बहुधा मुसलमानांच्या अनुनयासाठी नि स्वत:च्या परधर्मसहिष्णुतेचा टेंभा मिरविण्यासाठी पूर्वी हिंदुराजे आपण होअून मुसलमानांना आपल्या राजधानीत मशिदी बांधून देत असत! पण आता तशा सहिष्णुतेची कापुरुषता झिडकारून हिंदुसैन्ये मुसलमानी प्रदेशावर स्वारी करून मुसलमानी राजधान्यांतील बांधलेल्या मशिदी प्रत्याचार म्हणून, सूड म्हणून धडाधड पाडीत चालले होते! सद्‌गुणविकृतीचा ‘सोसाळूपणा’ सोडून जशास तसेचा ‘ठोसाळूपणा’ चा खरा सद्‌गुण प्रदर्शवू लागले होते!

महाराजा कृष्णदेवरायाचा मृत्यू सन १५३७ मध्ये झाला. याचे आधी थोड्या वर्षापूर्वी दिल्लीत बाबराचा प्रवेश झाला होता. राणा संगही याचा समकालीन होता. त्याच्यामागे त्याचा भाअू अच्युतदेव हा राजा झाला. अच्युतदेवरायाचा सालुव तिम्म या नावाचा प्रधान होता, तोच पुढे राज्याची सारी सूत्रे हालवीत होता. अच्युतदेवराय सन १५४२ तर मरण पावला. त्यानंतर त्याचा अेक मुलगा अल्प वयातच मरण पावल्याने त्याचा पुतण्या सदाशिवराय हा राज्यावर आला. पण या सदाशिवरायास ते राज्य मिळवून देण्याचे कामी मुख्य प्रधान आणि राज्यचालक जो तिम्म त्याचा मुलगा रामराय याचे प्रयत्न अितक्या मोठ्या प्रमाणावर कारणीभूत झालेले होते की, थोड्याच दिवसात सर्व सत्ता प्रबळ नि राज्यकर्ता होण्यास योग्य असलेल्या रामरायाच्या हाती पूर्णपणे गेली. ह्या रामरायास ‘रामराजा’ असे म्हणतात.

## वीरोत्तंस धर्मवीर राजा रामराय

ह्या रामरायाच्या पराक्रमी राजवटीतही महाराष्ट्रातील पाची मुसलमान सुलतान त्याच्या प्रतापी सैन्याचा लाभ त्यांच्या आपापसांतील सदोदित चालणाऱ्या भांडणात आपापल्या पक्षास घेण्याचा प्रयत्न वारंवार करीत असत. जरी श्री रामरायाची प्रवृत्ती कट्टर हिंदुत्वनिष्ठ आहे आणि सर्वच मुसलमानांना ते विश्वासघातकी आणि हिंदुद्रोही समजून साऱ्या मुसलमानी सत्तांचा सारखाच द्वेष करतात आणि त्यांना (मुस्लिमांना) तुच्छपणे वागवितात हे ह्या साऱ्या मुस्लिम सुलतानांना मनातून माहीत होते, तरीही त्यांना ह्या हिंदुधुरंधराचे पाठबळ मिळविल्यावाचून आपले अेकट्या कोणाचेही चालणार नाही, हे पक्के अनुभवास आलेले होते.

सन १५४३ मध्ये नगरचा निजामशहा नि गोवळकोंड्याचा कुतुबशहा या दोघा सुलतानांच्या मनात त्यांचे शत्रुत्व करणाऱ्या विजापूरच्या सुलतान आदिलशहाची खोड मोडण्याचे आले. तेव्हा त्यांनी या श्रीरामराजालाच त्या कामी पुढाकार घेण्याची विनंती केली. त्याप्रमाणे या त्रिवर्गाने जूट करून विजापूरवर स्वारी केली. या स्वारीमध्ये हिंदुसैन्याने विजापूर राज्यातील मुसलमानांची नुसती लांडगेतोड केली. विशेष गोष्ट म्हणजे ही की, आम्ही या ग्रंथात ठिकठिकाणी हिंदूंच्या ज्या घातक दुर्गुणांची निंदा केलेली आहे त्या सद्‌गुणविकृतीच्या व्याधीपासून हिंदुमनाची मुक्तता झालेली आहे, हे मुसलमानांच्याही चांगलेच प्रत्ययास आले. कारण, युद्धाच्या धार्मिक आघाडीवरही हिंदूंनी मुस्लिमांवर चढाअी करून मुस्लिमांनी, जी हिंदुमंदिरे पूर्वी पाडली होती त्यांचा वचपा घेण्यासाठी अनेक ठिकाणी अनेक मशिदीही अुद्‌ध्वस्त केल्या. ज्या मुस्लिम वस्तीतून पूर्वी हिंदूंचा छळ होत असे किंवा मुस्लिमांकडून हिंदूंच्या स्त्रियांना बटकी म्हणून वागविले जात असे तसल्या वस्तीतील मुस्लिमांची घरेदारे जाळून पोळून भस्मसात केली. हिंदूंच्या अशा धार्मिक प्रत्याचारांनी मुसलमानी समाजात अेक नवीनच धाक अुत्पन्न झाला! पूर्वीप्रमाणे मुस्लिम समाज हिंदूंना किड्या-मुंगीप्रमाणे बेधडक तुडवीनासा झाला - तर अेखाद्या जिवंत सापाप्रमाणे हिंदू समाजाला वचकू लागला. ह्या युद्धात थोड्याच अवधीत

विजापूरच्या आदिलशहाने निजामशहा आणि त्याच्या साहाय्यास आलेल्या सर्वांची काहीतरी समजूत काढून शरणागती पत्करली.

तथापि, या तात्पुरत्या तडजोडीने मुसलमानी सुलतानांतील भांडणे काही सदोदितची मिटली नाहीत. सन १५५७ मध्ये विजापूरच्या आदिलशहाचे मनात त्याचे कल्याणी नि सोलापूर हे दोन दुर्ग नगरच्या निझामशहाने जे गिळले होते त्याचे शल्य डाचतच होते. ते दुर्ग परत घेण्यासाठी निजामावर स्वारी करण्याचे नक्की करून या कामी आपणास सहाय्य द्यावे म्हणून विजयनगरच्या श्री रामराजास आदिलशहाने गळ घातली. त्याप्रमाणे आता विजापूरचे मुस्लिम सैन्य आणि विजयनगरचे त्याच्या सहाय्यास म्हणूनच गेलेले हिंदू सैन्य अेकत्र होअून नगरच्या निजामी प्रदेशावर चालून गेले. आपले सहाय्य येताजाता या चारी पांची मुस्लिम सुलतानांनी त्यांची भांडणे लढविण्यासाठी मागावे या कल्पनेनेच ज्यांच्या मनात मुस्लिमांहून वरचढपणाची भावना आणि भुजांमध्ये वीरश्री संचरलेली असे अशा त्या वेळच्या विजयनगरच्या हिंदु सैन्याच्याच नव्हे, तर तिकडील अेकंदर हिंदू समाज्याच्याच मनातील मुसलमानांविषयीचा पूर्वीचा भीतिगंड नष्ट झालेला होता, हे सांगणे नकोच. त्यामुळे, वर अुल्लेखिलेल्या मागच्या विजापूरकरांशी झालेल्या युद्धाप्रमाणेच या निजामशहाशी छेडल्या गेलेल्या युद्धातही हिंदु सैन्याने निजामाच्या प्रदेशातील मुस्लिमांचे, त्यांनी केलेल्या हिंदूंवरील पूर्वीच्या अत्याचाराचे अुट्टे धार्मिक आघाडीवरही अधिकच कठोरपणे नि विस्तृत प्रमाणावर काढले! केवळ मुस्लिम सैन्याशी लढतानाच नव्हे, तर वाटेने जाताना त्या साऱ्या प्रदेशात मुस्लिम समाजाच्या पूर्वीच्या त्यांच्या हिंदूंशी वागण्यात येणाऱ्या अेरेरावी वागणुकीचा वचपा काढून त्यांची यथेच्छ लुटालूट केली. त्यांनी जशी हिंदुमंदिरे ठिकठिकाणी पाडलेली होती तशाच त्यांच्या मशिदीही ठिकठिकाणी हिंदूंनी पाडून धुळीस मिळविल्या. लढायांतही मुस्लिमांच्या सैन्यांना आपल्या पराक्रमाने हिंदूंची सैन्ये अुधळून देत चालली.

या चाळीस पन्नास वर्षांतील हिंदूंच्या ह्या मुसलमानांवर धार्मिक प्रत्याक्रमण करणाऱ्या कठोर वर्तनामुळे तिकडील अेकदंर मुस्लिम समाजच भयभीत होअून गेला. आता त्या मुस्लिम समाजाच्या मनात हिंदूंविषयी भीतिगंड अुत्पन्न झाला. तेच अुलट हिंदूंना भिअू लागले! आणि हिंदुलोक आमच्यावर मोठा अत्याचार करीत चाललेले आहेत, क्रूरपणे वागत आहेत, आमच्या धर्माचीसुद्धा नाही ती विटंबना करीत आहेत, असा अेकच आक्रोश मुसलमानांनी हिंदुस्थानभर करण्यास आरंभ केला!

## विजयनगरचा विध्वंस

वर वर्णिलेल्या राजा रामरायाने निजामशाहाच्या केलेल्या पराभवानंतर आणि विशेषतः हिंदूंनी मुसलमानी धर्मावरही अंशतः चढविलेल्या नवीनच प्रत्याक्रमणानंतर दक्षिणेतील त्या चारी - पांची सुलतानांचा आणि अेकंदर मुस्लिम समाजाचा थरकाप अुडाला. आणि भीतिजन्य संतापाने ते अत्यंत क्षुब्ध झाले. आपल्याला आपली राज्ये टिकवायची असतील आणि मुसलमान म्हणून जगावयाचे असेल तर आपण सर्व सुलतानांनी आपली सर्व वैरे विसरून विजयनगरच्या या मदोन्मत हिंदुराजावर सर्वांनी मिळून निकराची चढाअी केली पाहिजे. कारण, आपणापैकी कोणाही अेकट्यादुकट्या सुलतानी सैन्याला हे हिंदूंचे माजलेले राज्य हार जाणार नाही, हे अनेक वेळा आपल्या प्रत्ययास येत आहे, असा विचार करून ह्या धाडसी कार्याचे पुढारीपण स्वतः विजापूरचा आदिलशहा नि त्याचा वजीर खिजरखान यांनी स्वीकारले. खिजरखानाने स्वतः निजामशहा, कुतुबशहा ह्या सुलतानांच्या भेटी त्यांच्या राजधानीत जाअून घेतल्या. साऱ्या महत्त्वाच्या मुसलमान सरदारांनी, सेनापती, मुल्लामौलवींनी सर्वत्र जिहादचा (धर्म युद्धाचा) प्रचार करून सर्वांना अेकत्रित केले. या मुस्लिम सुलतानांचे अैक्य शक्य तो अगदी हार्दिक नि अभेद्य व्हावे म्हणून त्या सुलतानांनी आपल्या मुली अेकमेकांस देअून आपसांत रक्तसंबंधी जोडले आणि अशा कडेकोट सिद्धतेनंतर या संयुक्त सुलतानांची सैन्ये विजयनगरवर चालून गेली.

अिकडे राजा रामरायही काही स्वस्थ बसला नव्हता. त्याला मुस्लिमांच्या या कटाचे वृत्त सारखे कळतच होते. त्या राजपुरुषाचे वय त्यावेळी सत्तर वर्षांचे होते, तरीही त्याची मुस्लिमांशी लढण्याची खुमखुमी त्याच्या भर तारुण्यात होती

तितकीच तेव्हाही तीव्र होती. त्यानेही न डगमगता आपल्या सैन्याची कडेकोट सज्जता केली. त्याच्या तिरूमल्लराय नि व्यंकटाद्रि ह्या दोन शूर बंधूंच्या हाताखाली दोन मोठ्या सेना सज्ज करुन आपल्या दोहो बाजूंचे संरक्षणार्थ अुभ्या केल्या आणि आपण स्वत: सेनाधिपत्य स्वीकारून तो सैन्याच्या मध्यभागी अुभा टाकला.

ह्या हिंदु - मुसलमानांच्या अटीतटीच्या सैन्याची गाठ तालिकोटजवळ राक्षसभुवनला शुक्रवार दि. २ जानेवारि सन १५६५ ह्या दिवशी पडली. दोन्ही पक्षांकडे पुष्कळ तोफा होत्या. सैन्याच्यापुढे साखळीने बांधून त्या साऱ्या तोफा अुभ्या केल्या होत्या. लढाअीस तोंड लागल्यानंतर काही वेळ घनचक्कर युद्ध माजून मुसलमानांची फारच धांदल अुडाली, असे मुस्लिम अितिहासकारही म्हणतात. ते पाहून चिडून गेलेला आणि आता किंचित जरी कोणताही अंगचुकारपणा झाला तरी आपल्यासुद्धा साऱ्या मुस्लिमांचे मरण ओढवलेच आहे असे पाहून सुलताना हुसेन निजामशहा हा मध्यभागाच्या राजा रामरायाच्या फळीवर बेधडक कोसळला आणि हिंदूंची फळी फोडून राजा रामरायाच्या अंगावर धावला. या निकराच्या प्रसंगी नक्की काय झाले याविषयी अितिहासकारांत अेकमत नाही. कोणी म्हणतात, राजा रामरायाच्या पदरीच असलेल्या अेका मुस्लिम सैनिकाने विश्वासघात करून राजा रामरायाचा शिरच्छेद केला. कोणी म्हणतात, राजा रामराय पालखीतून अुतरून सैन्याच्या मध्यभागी रत्नखचित सिंहासनावर बसून सैनिकांस त्यांच्या शूरत्वाप्रमाणे मोठमोठी सुवर्णांची नि रत्नाची पारितोषिके वाटीत होता आणि सैन्यास सारखे अुत्तेजन देत होता. कोणी म्हणतात की, लढाअी हातघाअीवर येताच मुसलमानांनी राजा राजा रामरायाच्या पालखीवर अेक मदोन्मत हत्ती घातला नि त्याचा पाडाव केला. ते काही असले तरी हे पुढील वृत्त मात्र अेकमते मान्य आहे की राजा रामराय मुसलमानांच्या गराड्यात सापडताच त्यांनी राजा रामरायाचा शिरच्छेद केला आणि निजामशहाच्या आज्ञेने महाराजांचे ते रक्तबंबाळ मस्तक अेका मोठ्या भाल्याच्या टोकावर खोचून साऱ्या मुसलमानांनी मिरवित नेले. ते भयंकर दृश्य पाहता हिंदूंचा धीर खचला आणि मुसलमानांनी तुमुल जयजयकार करून चोहोबाजूंनी मोठ्या हाताघाअीची अेकच चढाअी केली.

तथापि, त्या भयंकर गोंधळातही राजा रामरायाचे बंधू नि सेनापती तिरूमल्लराय याने राजकुटुंबातील अनेक पुरूषांसह त्वरा करून राज्याची राजधानी विजयनगर गाठली, आणि मुस्लिम सैन्य तेथे पोचण्याआधीच होती नव्हती तेवढी सारी राज्यसंपत्ती साडेपाचशे हत्तींवर लादून आणि अितर अुरलेसुरले, सैन्य, घोडेस्वार अित्यादी बळ सांगती घेअून थेट दक्षिणेकडे धाव घेतली. थोड्याच काळाने त्या हिंदु सैन्याचा पाठलाग करीत विजयाने धुंद झालेले सुलतानही सैन्यासह विजयनगरात घुसले. विजयनगरचा मुस्लिमांनी नुसता पाडावच नव्हे, तर मुस्लिम क्रौर्याच्या परंपरेस धरून केवळ विध्वंस करून टाकला. मोठमोठी मंदिरे, गोपुरे, प्रासाद, शोभिवंत अुद्याने, पण्यविथिका, प्रचंड पुतळे मुस्लिमांनी क्रौर्याने धडाधड धुळीस मिळवून दिले. ग्रंथागाराची जाळूनपोळून राख करून टाकली. कोटी कोटी रूपयांची लूट केली. मुस्लिम लेखकच मोठ्या तोऱ्याने सांगतात की, जी प्रलंयकारी आग हिंदूच्या त्या अमरावतीतुल्य राजधानीस मुस्लिमांनी लावली ती पाच-सहा महिने जळत होती, असा त्या विजयनगरचा विध्वंस त्या मुस्लिम राक्षसांनी केला!

तरीही, येथे ही गोष्ट पुन्हा प्रामुख्याने अुल्लेखिली पाहिजे की, ह्या विजयनगरच्या हिंदु सैन्याने वर दिल्याप्रमाणे काही वर्षे आधीच या मुस्लिम सुलतानांचे जे पराभव केले होते आणि त्यांच्या प्रदेशात धार्मिक आघाडीवरही मुस्लिमांनी हिंदूंवर केलेल्या धार्मिक अत्याचाराचा सूड अुगविण्यासाठी मुस्लिम धर्मावरही काही यथायोग्य असे प्रत्याचार केले होते त्यांची प्रतिक्रिया म्हणून विजयनगरचा, मुस्लिमांनी अशा क्रूरपणे विध्वंस केला, असे जे काही अुथळ लेखक लिहितात किंवा सद्गुणविकृतीच्या व्याधीने त्रस्त झालेला हिंदुसमाजाचाच अेक भ्याड विभाग अशा चाकीवरचे जे रडगाणे नेहमीच गात असतो, ते मुळीच समर्थनीय ठरत नाही.

अगदी आजकाल जो अितिहास शाळेतील मुलांना शिकविला जातो त्याचे हिंदु लेखक जे म्हणतात त्याचा सारांश असा की, ‘‘विजयनगरच्या रामरायाने बिचाऱ्या मुस्लिमांचा, त्यांच्या सुलतानांचा स्वाऱ्या करून जो धार्मिक छळ केला, त्यांच्या मशिदी पाडल्या, त्यांची घरेदारे जाळली, त्या हिंदु सैन्याच्या अत्याचारांनी सारे मुसलमान चिडून गेले आणि म्हणूनच काय तो मुस्लिमांनी विजयनगरचा असा भयंकर विध्वंस केला.’

परंतु ह्या सद्‌गुणविकृतीने भ्याड झालेल्या हिंदू लेखकांना अितके दिसेना की, स्मरेना की महंमद गझनी, महंमद घोरी, तैमुरलंग, बाबर जे अनेक अत्याचारी मुस्लिम आक्रमक हिंदुस्थानावर चालून आले त्या सर्वांचे हिंदूंनी आधी काय वाकडे केले होते? हिंदुस्थानबाहेर जाअून हिंदूंनी त्यांच्या किती मशिदी गझनीला जाळल्या होत्या? त्याच्या किती मुस्लिम राजस्त्रियांना बलात्कारिले होते? आणि किती लक्ष मुस्लिम बायकांना हिंदूंनी बटकी बनविले होते? मुसलमानी धर्मावर कोणते अत्याचार हिंदूंनी त्या त्या काळी प्रथम आक्रमणे करून केले होते की ज्यांचा सूड अुगविण्यासाठी म्हणूनच काय ते ते चिडलेले मुसलमान प्रत्येकी त्या त्या वेळी धार्मिक आक्रमणे करण्यासाठी हिंदुस्थानवर चालून आले? अहो! त्या महंमद गझनवी, त्या तैमुरलंगासारख्या प्रत्येकाने त्यांच्या भरराजसभेत स्वतः प्रतिज्ञा केल्या नव्हत्या का की, ''आम्ही हिंदु काफरांचा समूळ नाश करण्यासाठीच, त्यांचा वांशिक शिरच्छेद करण्यासाठीच, किंवा त्यांना बळाने मुस्लिम करण्यासाठीच काय ते मुख्यतः हिंदुस्थानवर चालून जात आहो!''

या विजयनगरच्या विध्वंसाच्या चालू प्रकरणीसुद्धा अितके पाहिले की पुरे की, मूळ जेव्हा अल्लाअुद्दिन, मलिक काफूर आणि त्यांची मुस्लिम सैन्ये दक्षिणेवर चालून आली, त्याचे आधी तर, दक्षिणेच्या हिंदूंनी त्यांच्यावर अुत्तरेत जाअून, कोणतेही धार्मिक अत्याचार केल्याचा अुल्लेख मुस्लिम लेखकांनाही करण्याची छाती झालेली नाही ना? मग सारे मुस्लिम आक्रमक दक्षिणेतील हिंदूंवर स्वाऱ्या करून देवगिरी, वरंगळ ते मदुरेपर्यंत आमच्या साऱ्या राजधान्यांचा विध्वंस अगदी विजयनगरचा विध्वंसासारखाच करीत का गेले? हिंदुधर्माची विटंबना आणि असंख्य हिंदू स्त्री - पुरुषांचा धार्मिक छळ त्या मुस्लिम नरराक्षसांनी का केला? अर्थात हिंदूंनी त्यांची काही आधीच धार्मिक आगळीक केली होती म्हणून नव्हे; तर हिंदूंचा अुच्छेद करणे हाच आपला 'मुस्लिम धर्म' होय, अशी त्यांची त्या वेळची 'धर्मनिष्ठाच' होती म्हणून होय!

त्या वेळच्या, त्या काळच्या आधीच्या आणि नंतरच्याही मुस्लिम लेखकांचे अगदी निःसंकोचपणे, म्हणजे निर्लज्जपणे घेतलेले ठाणच मुळी असे आहे की, ''काफरांचा अुच्छेद करणे हे आम्ही आमचे मुख्य धर्मकर्तव्य समजतो, काफर हिंदूंची राज्ये जिंकणे, त्यांच्या राजस्त्रियांना बलात्कारिणे, अितर लक्षावधि काफर स्त्रियांना बटकी बनविणे, आम्हाला वाटतील तितक्या हिंदूंना गुलाम बनविणे, बाकीच्यांना सरसकट कापून टाकणे. हिंदूंच्या राजधान्या, मूर्ति, ग्रंथ, देवालये ही सर्व जाळूनपोळून भस्मसात करणे, अित्यादी प्रकारची जी सत्कृत्ये आमचे मुसलमानी 'गाझी' धर्मवीर करीत आले ती कृत्ये त्या काफरांना त्यांच्या अक्षम्य पापासाठी धर्मन्यायाप्रमाणेच केलेले दंड होते! त्या पुण्यकृत्यांनाच हे काफर जेव्हा अत्याचार म्हणून म्हणतात तेव्हा स्पष्टपणे सांगावे लागते की, ते दंड अत्याचार नव्हतेच, तर सदाचार होते! अिस्लामच्या प्रत्येक अेकनिष्ठ अनुयायाचे काफरांना शक्य तेव्हा असा दंड देणे हे आद्य धर्मकर्तव्य आहे! पण...

''पण, या काफर हिंदूंनी त्या आमच्या न्याय्य दंडकृत्यांना अत्याचार म्हणावे आणि आम्हा मुसलमानांच्या विरूद्ध त्या अत्याचारांसाठी आमच्या सत्‌धर्मावीरही तसे तसेच प्रत्याचार करावयास धजावे, आम्ही त्यांची पापी मंदिरे जाळली म्हणून त्यांनी आमच्या मशिदी जाळाव्यात, हा कोण राक्षसी क्रूरपणा आहे! हा मात्र खरा अत्याचार आहे!''

त्या काळच्या मुसलमानांची 'धर्मनिष्ठाच' अशी असल्याने ते विजयनगरच्या हिंदु राज्यावर जे चालून गेले ते मुख्यतः ते हिंदूचे राज्य होते आणि ते लोक मुसलमान होण्यास नाकारीत होते म्हणूनच काय ते होय! जरी विनयजनगरच्या हिंदु सैन्यांनी त्या काळी मुसलमानांवर वारंवार स्वाऱ्या करून मुस्लिमांनी हिंदुधर्मावर केलेल्या अत्याचारांचा सूड घेण्यासाठी, त्यांच्या मशिदी पाडून, घरेदारे जाळून, त्यांची लुटालूट करून तसतसे प्रत्याचार आणि प्रत्याघात मुसलमानांवर केले तसे केले नसते तरीसुद्धा ते हिंदू होते या अपराधासाठी म्हणूनच काय ते ते सर्व मुस्लिम सुलतान, जर त्यांना तशी अनुकूल संधि सापडली असती तर विजयनगरवर तसेच चालून जाते, विजयनगरचा तसाच विध्वंस करते!

## मुस्लिम सैन्ये विजयनगरहूनच मागे कां फिरली ?

खरी वस्तुस्थिती ही होती की, राजा रामरायाचे राजवटीत त्या काळच्या हिंदु सैन्याने आणि अेकंदर हिंदुसमाजाने परकीयांची आक्रमणे 'सोसाळूपणाने' सोसण्याचे सोडून अुलट त्या मुस्लिम आक्रमकांवरच तशी तशी धार्मिक प्रत्याक्रमणे करण्याची 'ठोसाळू वृत्ती' स्वीकारल्यामुळेच विजयनगरचा विध्वंस केल्यानंतर ते मुस्लिम सुलतान दक्षिणेत पुढे जाण्यास धजले नाहीत!

वर सांगितल्याप्रमाणे, राजा रामरायाचा भाअू जो सेनापती तिरुमल्लराय तो आधीच विजयनगरहून ससैन्य निसटून दक्षिणेत गेला होता आणि तेथे समरांगणाचे ठाण मांडून बसला होता. मुसलमान पुढे येतेच, तर त्यांची गाठ सेनापती तिरुमल्लच्या सैन्याशी पडती! अंशतः ह्या धास्तीनेच मुस्लिम सुलतान मिळाले तेवढे पदरात पाडून घेअून विजयनगरहूनच सैन्य परत फिरले.

दुसरे कारण असे होते की, विजयनगरला त्यांना हा विजय मिळाला न मिळाला तोच त्या मुस्लिम सुलतानांची आपसांतील जुनी भांडणे पुन्हा विकोपाला गेली. आपआपसांत त्यांचे शिया नि सुनी या मुस्लिम धर्मपंथांच्या कलहाने नेहमीच वैमनस्य माजलेले असे. ह्यामुळे हिंदूंविरूद्ध ही क्षणमात्र झालेली त्यांची अेकी भंगून ते आपसांत पुन्हा लढू लागले. थोड्याच काळाने त्या मुस्लिम सुलतानांचे अुत्तरेकडील प्रबल शत्रू जे मुस्लिम मोंगल बादशाह त्या शाहजहानाने नि औरंगजेबाने त्यांच्यावर स्वाऱ्या केल्या. तेव्हा ह्या नगरच्या, विजापूरच्या, गुलबुर्ग्याच्या अित्यादी सर्व सुलतानांना महाराष्ट्रात त्या काळीच बलवान होत चाललेल्या मराठ्यांचे सहाय्य घेण्यावाचून गत्यंतर अुरले नाही. अुत्तरेकडून मुस्लिम मोंगल बादशहांच्या बलवत्तर सैन्याने जर्जर करीत आणलेल्या आणि आतून स्वतःच्या सहाय्यास म्हणूनच त्या मुस्लिम सुलतानांनी बोलविलेल्या हिंदूंच्या मराठी सरदारांनी पोखरून काढलेल्या महाराष्ट्रातील ह्या सर्व मुसलमानी सुलतानांच्या सत्ता अेकामागून अेक नष्ट होत चालल्या!

## प्रतापशाली शहाजी

त्या सर्व मराठी सरदारांत अत्यंत प्रमुख म्हणजे भोसल्यांच्या कुळातील प्रतापी आणि हिंदूंची सत्ता स्थापण्याची सुप्त महत्वाकांक्षा ज्याच्या हृदयात सदैव तळपत राहिलेली होती तो शहाजी हा होय. विजयनगरच्या पाडावानंतर जे सेनापती तिरुमल्ल प्रभृति हिंदू राजपुरुष दक्षिणेकडे निसटून गेले होते त्यांनी सन १५६७ त पेनुकोंड्यास स्वतंत्र हिंदुराज्य स्थापन केले. तिरुमल्लाच्या पश्चात त्याचा मुलगा श्रीरंग ह्याने सन १५७९ त आपली राजधानी चंद्रगिरी येथे नेली.

वस्तुतः विजयनरच्या मुख्य हिंदु साम्राज्याचीच ही त्या रणधुमाळीत अुडालेली शकले होती. त्या साम्राज्याचे ठिकठिकाणचे जे 'नायक' (सुभेदार) होते, त्यांपैकीच अेक-दोन नायक स्वतंत्रपणे राज्य करू लागले. काहींनी 'पाळेदार' म्हणून जिंजी, तंजावरकडे लहानसहान हिंदु संस्थाने स्थापिली होती. अेकंदरीत विजयनगरच्या विध्वंसानंतरही विजयनगरचा खालचा रामेश्वरपर्यंतचा सारा प्रदेश स्वतंत्र हिंदुसत्तेच्याच हाती होता. पुढे त्या सर्वांवर विजापूरकर सुलतानाचे नांवापुरते नाव घेअून विजापूरचा सेनापती म्हणून, शहाजी राजांनी वस्तुतः आपली स्वतःचीच अधिसत्ता स्थापिली आणि त्यांना हळूहळू अेकसूत्रित केले. अहमदनगर ते अगदी रामेश्वरपर्यंतच्या प्रत्येक मुस्लिम राजसत्तेत गाजविलेल्या पराक्रमामुळे दिल्लीच्या मोंगल सत्तेपासून ह्या बुडत्या विजापूरकरांसारख्या मरणोन्मुख सुलतानापर्यंत शहाजीचा राजकीय प्रभाव, हिंदूंचा पक्षपाती म्हणून लौकिक आणि धाक सर्वत्र पसरलेला होता. साऱ्या दक्षिणेत तर राजकारणामध्ये तो करील ती पूर्वदिशा ठरत असे. अेका तत्कालीन हिंदी कवीने केलेल्या कवितेचा पुढील अर्थाचा चरण सर्वतोमुखी झालेला होता की पृथ्वीचे नियमन दक्षिणोत्तरचे हे दोन दिक्पाल करीत आहेत. 'अुत शहाजहाँ अित शाहजी है।'' अुत्तरेत शहाजहान आणि दक्षिणेत शहाजी!

अशा रीतीने शहाजीने दक्षिणेतील विजयनगरच्या विध्वंसानंतरची लहानसहान पण स्वतंत्र हिंदुसंस्थाने जी अुरली होती ती मुसलमानी सुलतानांच्या नावे जिंकावी ही गोष्ट हिंदुमनाला प्रथमदर्शनी कितीही खटकली तरी हे कठोर सत्य ध्यानी घेतले पाहिजे की, त्या परिस्थितीत ह्या सर्व मुस्लिम सुलतानांना अुच्छेदून अेकत्रित असे अेक मोठे हिंदुराज्य पुन्हा स्थापिण्यासाठीच ती सारी विजित नि विखुरलेली हिंदु संस्थाने आपल्या हाती शहाजीने अेका मुठीत जी आणली त्यामुळेच ज्या मुस्लिम सुलतानांचा तो नावापुरता सेवक म्हणवीत गेला त्यांनाही दरारा वाटावा अितका तो प्रबळ होअू

शकला आणि सुलतानाचा अंकित म्हणवित असताही अेखाद्या स्वतंत्र हिंदुराजाच्या थाटाने म्हैसूर येथे राहून राज्यकारभार चालवू लागला. त्याच्या हाती अेकत्रित झालेल्या या हिंदुबळाच्या आधारामुळे थोड्या काळानंतर पुढे अेका स्वतंत्र, समर्थ आणि दिग्विजयी हिंदुसाम्राज्याची संस्थापना करणाऱ्या पण अेक अुपद्रवी तरुण हिंदु पुंड म्हणूनच काय ते मुस्लिम सुलतानांना अप्रिय झालेल्या शहाजीच्या अेका पुत्राला, त्या अपेक्षित 'पुंडाअी'चे अेका अजिंक्य 'बंडाअी'त रूपांतर करण्याअितके सहाय्य तो शहाजी गुप्तपणे देअू शकला. शहाजीच्या ह्या पुत्राचे नाव कालक्रमासाठी येथेच आगाअू न सांगताही वाचकांच्या हृदयात विजेसारखे चमकून गेल्यावाचून राहणार नाही हे निश्चित.

अगदी अशाच परिस्थितीमुळे मागे पांचव्या प्रकरणात सांगितल्याप्रमाणे सन १३१६ ते १३३२ मध्ये स्वत:चे हिंदुबल सिद्ध नसल्यामुळे खुश्रूखानाने दिल्लीच्या मुस्लिम सुलतानाच्याच सर्व सैन्याचे आधिपत्य स्वत: मुस्लिम म्हणूनच चालवून, दक्षिणेतील आपण होअून सहसा अेकत्र न होणाऱ्या मोठमोठ्या हिंदुराजांना जिंकून मुस्लिम सुलतानाच्या राज्याचाच भाग म्हणून बळाने अेकत्र केले, आणि मग स्वत:च्या हिंदु अुठावणीची गुप्त सिद्धता पुरी झाल्यावर त्या मुस्लिम सुलतानाचा दिल्लीला रातोरात वध करून, दिल्लीच्या तख्तावरील 'मुसलमान' अेवढी पाटी तेवढी अुखडून टाकून, त्यावर 'हिंदुसम्राट' म्हणून स्वत:च आरोहण केले! आणि खिलजी सुलतानाचे ते अखिल भारतीय होत आलेले मुस्लिम साम्राजाचे साम्राज्य अेका दिवसात हिंदुसाम्राज्य करून सोडले. पुन्हा, पुढे थोड्याच अवधीत वीरवर हरिहर नि बुक्क हे मुसलमानांच्या हातात पडून, बाटविले जाअून, दिल्लीत बंदिवासात सडत असता, कट्टर मुस्लिमपणाच्या बुरख्याखाली ह्याच कौटिल्यनीतीने प्रथम दिल्लीच्या सुलतानाचा त्यांनी विश्वास संपादिला. त्याच्याच मुस्लिम सैन्यासह आणि संपत्तीच्या आधाराने, त्याचेच मुस्लिम सेनापती म्हणून दक्षिणेच्या बंडखोर हिंदूंवर मुस्लिम साम्राज्य स्थापण्यासाठी दक्षिणेवर चाल करून आले! परंतु दक्षिणेत येताच योग्य संधि साधून त्या हिंदू बंडखोरांनाच मिळून, शुद्धीकरणाने स्वत: हिंदू होअून त्यांनी ते विजयनगरचे प्रबल नि स्वतंत्र हिंदुसाम्राज्य स्थापिले! ह्याच कौटिल्यनीतीने आता शहाजीनेही विजापूरकरांच्या सैन्याच्या आणि राज्यकोषाच्या बळावर जिंजी, तंजावरपर्यंतची हिंदू संस्थाने जिंकून विजापूरच्या मुस्लिम सुलतानाची अंकित म्हणूनच अेकत्र केली आणि हळूहळू हिंदूंची सैन्यसंख्या वाढवीत वाढवीत संधि सापडताच विजयनगरच्या पाडावाच्या पाठोपाठ अेका नव्या, पूर्वीच्या सर्व हिंदुशक्तींच्या पेक्षा प्रबळतर आणि अंतिम हिंदुविजयाचे भाग्य जिच्या ललाटी विधाता सुवर्णाक्षरांनी अंकित करीत होता अशा त्या अुदीयमान महाराष्ट्रीय हिंदुशक्तीच्या संभवाची त्या संकटसमयकाली शक्य ती ती पूर्व सिद्धता शहाजी करीत होता!

ह्या सर्व घटनांच्या प्रभावामुळे विजयनगरच्या विध्वंसाचा आघात दुर्धर असताही हिंदुराष्ट्राच्या दुर्दम्य नि महत्त्वाकांक्षी अिच्छाशक्तीने तो पचवून टाकला. मुसलमानांच्या पदरी तर त्या विजयनगरच्या पाडावामुळे कोणतही भवितव्य पालटण्यासारखा लभ्यांश मुळीच पडला नाही.

# प्रकरण ८ वे

# असवी सनाच्या सोळाव्या शतकाच्या अंतापर्यंत आणि नंतर

येथपर्यंत हिंदुदृष्टीने हिंदुराष्ट्राच्या अितिहासाचे समीक्षण वर दिलेल्या काळापर्यंत केले. तथापि त्या सोळाव्या शतकातील काही समीक्षणार्ह अशा आनुषंगिक घटना अुरलेल्या आहेत. त्यांचा आणि नंतरच्या काही संबद्ध घटनांचा परामर्ष या प्रकरणात घेत आहोत.

## हिंदुस्थानवर युरोपियन जलदस्यूंची (चाच्यांची) टोळधाड

हिंदुस्थानावर जे पहिले युरोपियन ख्रिश्चन राष्ट्र चालून आले ते पोर्तुगीजांचे होय. समुद्राने हिंदुस्थानात येण्याचा सरळ मार्ग प्रथमतः 'केप ऑफ गुडहोप' ला वळसा घालून पोर्तुगीजांच्या वास्को द गामा ह्या सिंधुपर्यटकाने शोधून काढला. त्याला सुद्धा हा सिंधुमार्ग, तेथपर्यंत जे हिंदुव्यापारी समुद्रमार्गे जात-येत असत त्यांच्यापैकी अेका नौयान पुढाऱ्याने दाखविला होता. सन १४९८ त वास्को द गामा हिंदीमहासागरातून हिंदुस्थानच्या पश्चिम तटावरील कालिकत ह्या सिंधुद्वारास (बंदरास) पोचला. त्याने प्रथमतः व्यापाराचे निमित्त पुढे केले. परंतु पोर्तुगीज किंवा त्यांच्या मागोमाग आलेल्या सर्व युरोपियन राष्ट्रांचा, 'आम्ही व्यापार करावयास आलो आहोत' असे सांगण्याचा प्रघात हा केवळ बहाणा असे; व्यापाराच्या बुरख्याखाली शक्य तर हिंदुस्थानातील प्रदेशांवर आपापल्या राजसत्ता स्थापण्याचा त्यांचा अंतर्गत हेतू असे. त्या धोरणाने लगोलग सन १५०० व्या वर्षी पेद्री अल्वारिस कँब्रल हा पोर्तुगीजांचा अेक सिंधुसेनानी तेरा लढाअू जलयानांचे नौदल घेअून हिंदुस्थानवर सशस्त्र स्वारी करून आला. प्रथम कोचीनकडे जाअून तेथील हिंदुराजाशी त्याने सख्य केले. कारण तेथे पोर्तुगीजांच्या आधीपासूनच मुस्लिम व्यापाऱ्यांनी आपले प्रस्थ स्थापलेले पाहून पोर्तुगीजांनी आधी त्यांच्याशीच लढण्यास प्रारंभिले. पोर्तुगीजांचे मुसलमानांशी मूळचेच हाडवैर होते. पूर्वी स्पेन-पोर्तुगालवर मुसलमानांनी जे भयंकर धार्मिक आणि राजनैतिक आक्रमण केलेले होते त्याचा या ग्रंथाच्या पूर्वार्धात अुल्लेख केलेला आहे. पुढे सन १५०९ मध्ये अल्बुकर्क याची हिंदुस्थानातील पोर्तुगीजांच्या सत्तेवरचा मुख्य गव्हर्नर म्हणून पोर्तुगालच्या राजाने पाठवणी केली. त्यानेच सन १५१० त विजापूरच्या मुस्लिम सुलतानाच्या हातून गोवे आणि त्याच्या आसपासचा प्रदेश जिंकून घेतला. ह्याच अल्बुकर्कने पोतुगीजांचे वास्तव्य हिंदुस्थानात व्हावे म्हणून पोर्तुगीज लोकांना हिंदु मुलींशी प्रसंगी बळानेही विवाह करण्यास अुत्तेजन दिले. याच काळात हिंदु लोकांना बळानेही बाटवून ख्रिस्ती करणे हे आपले मुख्य धर्मकर्तव्य आहे, असा पोर्तुगीजांच्या धर्माधिकाऱ्यांनी आग्रह धरून पोर्तुगालच्या राजाकडून तशी आज्ञा सोडविली. राजसत्तेच्या बळावर पोर्तुगीजांनी तेथील हिंदु स्त्री-पुरुषांवर त्यांना बाटविण्यासाठी कोणकोणते भयंकर अत्याचार, बलात्कार, छळ केले त्यांचा निर्देश याच ग्रंथात केलेला आहे तो वाचकांनी पुन्हा अेकदा अवश्य वाचावा.

या पोर्तुगीजांच्या धार्मिक अत्याचारांना मुख्य पुरोगामी नि पुरोहित जो सेंट झेव्हिअर त्याला त्या काळचे प्रपीडित हिंदू लोक सैतानालाही लाजविणारा 'सेंट' म्हणत! तो सन १५४० मध्ये हिंदुस्थानात आला होता. हा सेंट झेव्हिअर आपल्या ह्या हिंदूंना छळण्याच्या राक्षसी पराक्रमाविषयी स्वतःच अेका पत्रात लिहितो की, 'आमचे हिंदूंना ख्रिस्ती करण्याचे कार्य अतिशय वेगाने फैलावत आहे. आमच्या प्रचारकाला पाहताच हिंदूंच्या खेड्यापाड्यात आमच्या भयाने पळापळी चालू होते. अितके कडक अुपाय आम्ही जे हिंदु ख्रिस्ती होणार नाहीत त्यांना दंड करताना योजतो. नगरातील श्रीमंत हिंदूंची शारीरीक मारासाठी लांडगेतोड करतो. त्यांची संपत्ती हिरावून घेतो, मूर्ती फोडून टाकतो, देवालये पाडून टाकतो, चाबकाच्या फटकाऱ्याखाली त्यांची शरीरे सोलून काढतो. 'ज्यांना अशी पत्रे समग्र पाहावयाची असतील त्यांनी याच ग्रंथातील सोनेरी पान पाचवे, पूर्वार्ध, प्रकरण ५- (ख्रिश्चनांचा गोमांतकातील धर्मप्रचार) पहावे. त्याने आणि त्याच्या मागे आलेल्या धर्मप्रचारकांच्या शतावधी पाद्र्यांनी नि सैनिकांनी मिळून केलेल्या राक्षसी छळापायी अगणित हिंदु लोकांना

ख्रिस्ती केले! असंख्य हिंदु लोक ह्या पोर्तुगीजांच्या छळापायी आत्महत्या करून मरणी मरून गेले! पण त्यांनी आपला हिंदुधर्म सोडला नाही! पोर्तुगीजांनी हळूहळू दीव, दमण, साष्टी, वसअी, चौल, मुंबअी ही पश्चिम सिंधुतटावरील ठिकाणे, मद्रास जवळील सेंट होम आणि बंगाल्यातील हुगळी ही ठिकाणे हस्तगत केली. पैकी मुंबअी हे गाव पोर्तुगालच्या राजाने अिंग्लंडच्या राजास सन १६६८ त आंदण दिलेले होते, ते अिग्लंडच्या राजाने पुढे स्थापन झालेल्या ब्रिटिश अीस्ट अिंडिया कंपनीस प्रतिवर्षी दहा पौंडांच्या भाडेपट्ट्याने देअून टाकले. अुरलेला वरील बहुतेक प्रदेश मराठ्यांनी पोर्तुगीजांकडून लढायात हिसकावून परत घेतला. अेक गोमांतकाचा तेवढे महत्त्वाचा भूभाग त्यांच्या हाती शेवटी अुरला होता.

**डच :** पोर्तुगीजांच्या मागोमाग हॉलंडमधल्या डच लोकांनी हिंदुस्थानात प्रवेश केला. त्यांची डच अीस्ट अिंडिया कंपनी अि. सन १६०२ त स्थापन झाली. परंतु, हिंदुस्थानात त्यांचा जम काही बसला नाही. जावा, सुमात्राकडे मात्र त्यांना अनुकूल परिस्थिती सापडली. त्यामुळे, त्यांनी तिकडेच आपले प्रस्थ वाढविले. तिकडेही अिंग्रज लुडबूड करू लागले होते. पण अंबोयना बेटात डचांनी अिंग्रज व्यापाऱ्यांचे अेकदा सरसकट शिरकाण करून टाकले. तेव्हापासून तिकडे डच निरंकुशच झाले.

**अिंग्रज :** अिंग्रजांची अीस्ट अिंडिया कंपनी जरी सन १६०० मध्ये स्थापन झाली तरी हिंदुस्थानात त्यांची पहिली वखार सन १६०८ मध्ये अुघडली गेली. जहांगीर बादशहाने सन १६१३ त अिंग्रजांना सुरत येथे बखार काढण्यास अनुज्ञा दिली. पुढे अि.सन १६८९ त या अीस्ट अिंडिया कंपनीची काही भानगड होअून तिचे अेकस्व (मक्ता) अिंग्लंडच्या शासनाकडून काढून घेण्यात आले. त्यामुळे दुसरी अेक अिंग्लीश व्यापारी मंडळी हिंदुस्थानच्या व्यापारासाठी स्थापन झाली. पण अशा स्पर्धेपासून अिंग्लिश राष्ट्राचे अहितच होते असे अनुभवून त्या दोन्ही कंपन्या सन १७०७ मध्ये अेकत्र झाल्या.

ज्या अर्थी अिंग्रजांच्या ह्या 'अीस्ट अिंडिया कंपनी' चे रूपांतर अेक-दोन शतकांच्या आतच अेका परकीय भव्य 'अिंडियन अेंपायर' (हिंदुस्थानचे साम्राज्य) मध्ये होणारे होते त्याअर्थी त्यांच्या त्या विस्तीर्ण अितिहासाचा अुहापोह येथे ह्या प्राथमिक परिचयातच करणे अनावश्यकही आहे नि अशक्यही आहे. त्यातही अिंग्लिशांच्या मराठ्यांशी समरांगणावरच शस्त्रास्त्रांच्या खणखणाटात, तोफांच्या गडगडाटात आणि साम्राज्यांच्या देवघेवीच्या पैजा लावून अनेक गाठीभेटी पुढे होणाऱ्या आहेत; त्याअर्थी त्याचवेळी याविषयी जी चर्चा अवश्य नि शक्य ती करू.

**फ्रेंच :** हिंदुस्थानात पोर्तुगीजांच्या अनुकरणाने ज्या अनेक युरोपियन राष्ट्रांनी व्यापार आणि राज्यविस्तार करण्यासाठी प्रयत्न केले त्या सर्वात फ्रेंच लोकांचा क्रमांक कालानुसार अगदी शेवटचा लागतो. कारण फ्रेंच अीस्ट अिंडिया कंपनीची स्थापना अगदी अि.स. १६६० मध्ये झाली. परंतु त्यांच्या व्यापाराची भरभराट मात्र झपाट्याने झाली. त्यातूनही हिंदुस्थानमध्ये लहानसहान प्रदेशच नव्हे, तर, अेक साम्राज्यचे साम्राज्य आपणास स्थापता येअील; ही महत्त्वाकांक्षा अिकडील परिस्थिती पाहून जर प्रथम कोणा युरोपियन पुरुषाच्या मनात आली असेल आणि त्याप्रमाणे त्याने मोठ्या प्रमाणावर हिंदुस्थानातील राजकारणात ससैन्य अुलाढाली चालू केल्या असतील तर त्या फ्रेंचांचा हिंदुस्थानात आलेला सेनापती डुप्ले ह्यानेच होय! त्याच्या खालोखाल अशीच महत्त्वाकांक्षा ज्याच्या मनात अुद्भवली तो अिंग्लिशांचा जो अेक 'अुनाड' मुलगा सैनिक म्हणून हिंदुस्थानात आला, पण जो लवकरच आपल्या धाडसाने त्यांचा सेनानी झाला तो हिंदुस्थानातील अिंग्लिश साम्राज्याचा पाया घालणारा लॉर्ड क्लाअीव्ह हा होय! या दोघांच्याही कल्पनेतील मूळ अटकळ ही होती की, हिंदुस्थानातीलच सैनिकांना युरोपियन पद्धतीचे संचलित नि संघटित (Drilled and disciplined) सैनिक प्रशिक्षण देअून त्यांची सैन्ये येथल्या येथेच फार थोड्या काळात आपणांस अुभारता येतील आणि त्यांच्या नेतृत्वासाठी काही थोड्या प्रमाणात जातिवंत युरोपियन सैन्य आणि सेनानी त्यांच्यात ठेवले की, त्या हिंदी सैन्याच्या बळावरच आपण हिंदुस्थानात आपली राज्ये अुभारू शकू! या त्यांच्या प्रयोगांना केवढे यश पुढे मिळाले ते यथाकाल समीक्षण्यात येअीलच.

येथे फ्रेंचांसंबंधी तरी थोडीशी चर्चा करणे पुरेसे आहे. कारण फ्रेंचांच्या आणि अिंग्लिशांच्या हाताखालच्या अशा सैन्यांची आपापसांतच काही युद्धे जरी हिंदुस्थानात झाली आणि हिंदुस्थानातील राज्याराज्यांमधील कलहांचे वेळी अेका पक्षाला अिंग्रजी सैन्याचे सहाय्य मिळाले की, त्याच्या विपक्षाचा पक्ष फ्रेंच सैन्याने हटकून घ्यावा, अशी स्पर्धा जरी काही काळ चालली तरी शेवटी फ्रेंचांची बाजू लंगडी पडली. त्यातही युरोपमध्ये अिंग्रज - फ्रेंचांच्या युद्धात फ्रेंचांचा पराभव झाल्यामुळे अिकडच्या फ्रेंच सत्तेचे चालकही असमर्थ झाले. पुन्हा फ्रेंचांच्या राज्यविस्तारासाठी हिंदुस्थानात जिवावाड परिश्रम केलेल्या डुप्ले, बुसी, सफ्रां प्रभृति पुढाऱ्यांना त्यांच्या स्वदेशातच फ्रेंच जनतेकडून नि अधिकाऱ्यांकडून वाअीट वागणूक मिळाली. त्यांचे कोणीही करावे तसे कौतुक वेळचे वेळी केले नाही, त्यांना पाठिंबाही दिला नाही. अिकडे फ्रेंचांची ही हिंदी सेना अेकदा-दोनदा मराठ्यांच्याही विरुद्ध गेली होती आणि त्या टकरीत हिंदी फ्रेंचसत्तेचे मस्तक चांगलेच घायाळ झाले होते! पुढेपुढे फ्रेंचांचे स्वतंत्र राज्य हिंदुस्थानांत स्थापन होण्याची अशक्यता दिसून आल्यानंतरही फ्रेंचांचा हिंदी राज्यांना आणि त्यातही विशेषतः मराठ्यांना अेका विषयात पुष्कळ अुपयोग झाला. कारण अिंग्लिश लोक त्यांचे युरोपियन संचलन आणि नवीन तोफा प्रभृति शस्त्रास्त्रे कोणा हिंदी राज्यास शिकविण्यास किंवा देण्यास अुत्सुक नसत. पण ती विद्या नि साधने फ्रेंच लोक मात्र हिंदी राज्यांना यथास्थित द्रव्यलाभ किंवा भूमिलाभ झाला तर, आणि त्यातही ते हिंदी राज्य ब्रिटीशांच्या विरूद्ध लढत असेल तर, अुत्सुकतेने देत असत. विशेषतः मराठ्यांनी ह्या युरोपियन संचलनाच्या आणि तोफाबंदुकादि अुत्कृष्ट शस्त्रनिर्मितीच्या विद्येचे अपरिहार्यत्व आणि श्रेष्ठत्व लवकरच लक्षात घेअून अनेक फ्रेंच सेनानींना त्यांच्या वैयक्तिक संबंधाने आपल्या सेवेत ठेवलेले होते. अिब्राहिमखान गारदी हा मराठ्यांच्या अुद्‌गीरच्या आणि पुढे पानिपतच्या लढाअीतील प्रचंड तोफखान्यावरील अधिकारी फ्रेंचांच्या तोफखान्यातच शिकून त्या विद्येत प्रवीण झालेला होता. पुढे महादजी शिंदे यांनी तर डी बॉयने आणि पेतांव प्रभृति फ्रेंच अधिकाऱ्यांसच आपल्या पलटणीचे आणि तोफखान्याचे मुख्य अधिकारी नेमून युरोपियन पलटणीसारखेच आपल्या स्वदेशी लढाअू पलटणींना शिक्षण देअून अेक आपले चतुरंग सैन्यच अुभारले. ह्या सैन्याच्या दराऱ्यामुळे महादजीला सारे विपक्षीय अुत्तर हिंदुस्थान वचकून राहिलेले होते आणि कित्येक लढायांत महादजीला शत्रूवर मात करता आली. परंतु काही काळाने हिंदुस्थानात वावरणाऱ्या लढाअू युरोपियन राष्ट्रांनी आपसात अेक हिंदुस्थानपुरता अलिखित करार केला की, कोणाही देशी राज्याचा कोणाही युरोपीयन राज्याशी युद्धप्रसंग अुद्‌भवल्यास त्या वेळी त्या देशी राज्याचा पक्ष घेअून कोणाही युरोपियनाने आपल्या पलटणीचे सहाय्य त्या हिंदी राज्यास देअू नये. ह्यामुळे, पुढे अिंग्लिशांशी शिंद्यांची लढाअी जुंपली असता, शिंद्यांच्या सेवेमध्ये सहस्रावधी रुपयांचा पगार खात असलेल्या ह्या डी बॉयनेच्या हाताखालील पलटनींना नि तोफखान्याला घेअून डी बॉयने याने शिंद्यांचे वतीने लढण्याचे स्वच्छपणे नाकारले. मराठ्यांनाही आपला असा विश्वासघात हे मराठी सैन्यातील पगारी युरोपियन अधिकारी केव्हातरी करतीलच हे कळत होते. यासाठी, मराठ्यांनीही स्वतः युरोपियनांसारख्या अुत्तम तोफा नि बंदुका ओतण्याची निर्माणालये (कारखाने) आणि त्यांचे ‘पलटणी’चे विशिष्ट संचलनाचे प्रशिक्षण देणारे स्वतःचे स्वदेशी अधिकारी सिद्ध करण्यासाठी यथाशक्ती प्रयत्न चालविलेलेच होते. पण, त्यासारख्या युद्धसंकुल काली अशा सगळ्याच आनुषंगिक गोष्टींकरिता अगदी अडून बसणे मूर्खपणाच झाला असता. जाटासारख्या दुय्यम राज्यांतूनही फ्रेंचांनी शिकविलेल्या संचलनदक्ष पृतना (पलटणी) ठेवू लागले होते. शिखांनीही पुढे पलटणी अुभारल्या. अेवीतेवी हिंदुस्थानात फ्रेंचांच्या लढाअू अस्तित्वाचा अुपयोग ब्रिटिशांच्या राजसत्तेचे घोडे ठिकठिकाणी अडवून ठेवण्यास पुष्कळच झाला आणि फ्रेंचांचा तसा अुपयोग करून घेण्यात मराठे, टिपू, शीख प्रभृति स्वदेशी राज्यांनीही फारशी हेळसांड केली नाही.

## दक्षिणेवर अेकसहाच जगातील झाडून
## साऱ्या लुटारू अहिंदु राष्ट्रांचा दुहेरी मारा

ज्या काळी वर दिलेल्या अनेक युरोपियन राष्ट्रांच्या स्वाऱ्या हिंदुस्थानावर झाल्या त्या काळी त्या समुद्रमार्गेच झाल्या. त्यामुळे त्यांचे प्रचंड आघात पहिली दोनशे वर्षे तरी दक्षिण हिंदुस्थानलाच आणि त्यातही केवळ मराठी सत्तेलाच सोसावे

लागले आणि प्रतिकारावे लागले. त्यांचेपूर्वी अेकट्या अुत्तर हिंदुस्थानला सहा-सात शतके साऱ्या आशियातील मोंगल, तुर्क, अफगाण, अरब अित्यादी सर्व लुटारू आक्रमकांच्या आणि धर्मांधतेच्या राक्षसी अुन्मादाने फुरफुरलेल्या मुसलमान राष्ट्रांचे प्रलयंकर आघात सोसावे लागले होते आणि शतकानुशतके प्राणपणाने प्रतिकारावे लागले होते. पुढे आशियातील ती सारी मुस्लिम राष्ट्रे नि बर्बर जाती दक्षिणेलाही पादाक्रांत करण्यासाठी तिच्यावर कोसळली. ते सारे शत्रू स्वाऱ्यांमागून स्वाऱ्या करीत असतानाच आणि त्यांच्याशी दाक्षिणात्य हिंदुराज्ये रक्तबंबाळ युद्धे झुंजत असतानाच त्या मुस्लिम धर्मछळापायी अुत्तरेप्रमाणे सहस्र-सहस्र हिंदु स्वधर्म रक्षणार्थ प्राणार्पण करीत असतानाच ह्या दक्षिण हिंदुस्थानवर समुद्राकडून ही नवी युरोपियन राष्ट्रांचीही भयंकर टोळधाड पडली! केवळ अुत्तर-पश्चिम नि अुत्तर-पूर्व दिशेनेच नव्हे, तर त्यासमवेतच पश्चिम दिशेच्या आक्रमक ख्रिश्चन जगताचीही या दक्षिण हिंदुस्थानवर प्रचंड टोळधाड येअून कोसळली! भूमर्गानेच नव्हे, तर सिंधुमार्गानेही जगातील सारि लढाअू, लुटारु, आक्रमक, धर्मोन्मत मुस्लिम आणि ख्रिश्चन राष्ट्रे अेकसमयावच्छेदेकरून दक्षिणेतील हिंदुराज्यांचा आणि हिंदुधर्माचा नायनाट करून टाकण्यासाठी आपापल्या आसुरी प्रेरणेनेच त्या क्षणी तुटून पडलेली होती!!!

अुत्तर हिंदुस्थानला केवळ आशियायी मुस्लिम राष्ट्रांनाच तोंड द्यावे लागले. तेही कार्य तोंडाचे नव्हते! राक्षसांशी झुंज देणाऱ्या देवांनीही थकून जावे अितके ते अुत्तरेतील हिंदुधर्म, हिंदुत्व नि हिंदुराष्ट्र रक्षणाच्या कार्यासाठी प्राणांतिक नि शतक व्यापी युद्ध जे अुत्तरेकडच्या हिंदूंनी झुंजत ठेवले, ते अद्‌भुत नि संकटसंकुल होतेच होते! पण त्या सगळ्या मुस्लिम राष्ट्रांशी आणि यासमवेतच या समुद्रमार्गे चालून आलेल्या दुराधर्ष, मुस्लिमांहूनही हिंदुधर्माचे द्वेष करणाऱ्या आणि हिंदु लोकांना ख्रिस्ती बनविण्यासाठी कृपाणाची नि क्रूरतेची पराकाष्ठा करणाऱ्या पोर्तुगीजादी समुद्रमार्गे तुटून पडलेल्या युरोपियन ख्रिश्चन राष्ट्रांशीही अेकाच वेळी ते दुहेरी महायुद्ध लढत ठेवण्याची पाळी केवळ दक्षिण हिंदुस्थानवरच पडली आणि दक्षिणेतील हिंदूंनी, त्यातही विशेषतः हिंदूंच्या संग्रामातीलही अध्वर्यूपद धारण केलेल्या मराठ्यांनी त्या सर्व दिशांनी अुसळलेल्या शत्रूंच्या लाटांना अेकाकी थोपवून धरणारी वीरश्री आणि दुर्दम्य साहस दाखविले! मुस्लिम आणि पोर्तुगीजांच्या सशस्त्र धार्मिक आघाडीवर सहस्त्रावधि हिंदु स्त्री-पुुष बालकांचे धर्मार्थ प्राणदान होत असतानाच युद्धाच्या राजकीय आणि सांग्रामिक आघाडीवरही दक्षिणेतल्या ह्या हिंदुवीरांनी आशियाअी, युरोपियन नि शिद्दीसारख्या आफ्रिकन अशा जगातील झाडून साऱ्या आक्रमक अहिंदु राष्ट्रांशीही हे जे सशस्त्र महायुद्ध झुंजत ठेवले ते जागतिक अितिहासातही विशेषत्वाने अुल्लेखनीय आहे!

## हिंदु विक्रमादित्य हेमू

राणा संगाच्या नेतृत्वाखालील अनेक रजपूत आणि काही मुसलमान राज्यांची सैन्ये अेकत्र होअून, राणा संगाचीच नव्हे, तर चितोडच्या राजवंशाचीच जी दिल्लीच्या सिंहासनावर हिंदु साम्राज्याची पुनः प्रतिष्ठा करण्याची चिरंतन महत्त्वाकांक्षा स्फुरत आलेली होती तिच्या अीर्षेने कनवाह येथे बाबराशी तुंबळ युद्ध होअून धर्मवीर राणा संगाचा अंतिम पराभव झाला आणि बाबराने दिल्लीस मोंगल बादशाहीची स्थापना केली. पुढे बाबर सन १५३० मध्ये मरण पावला. त्याचा पुत्र हुमायून हा बादशहा झाला परंतु त्याच्यावरही लवकरच सूर घराण्याचा संस्थापक शेरशहा याने विजय मिळवून दिल्ली पादाक्रांत केली. त्यामुळे हुमायून हा कित्येक वर्षे अिराणादि देशांत वनवासात फिरत होता. ह्या सर्व घडामोडीचे सविस्तर वृत्त देण्याचे या समीक्षणात्मक ग्रंथात काही कारण नाही, स्थळही नाही. अिथे अितकेच सांगितले म्हणजे पुरे आहे की, बादशहा शेरशहाच्या वंशातही बंडे, हत्या अित्यादी मुस्लिम राजवंशाच्या ठराविक घालमेली होअून शेवटी महंमद आदिलशाह हा बादशहा झाला.

ह्या महंमद आदिलशहाने आपला सर्व कारभार हेमू नावाच्या अेका कर्तृत्ववान् हिंदू वजिराचेच हाती सोपविला! हेमूनेही आपल्या हिंदुधर्मास लवलेशही धक्का लागू न देता बादशाहीची सर्व सत्ता आपल्या हातीच गुंडाळून घेअून सक्षमपणे चालविली.

परंतु, हुमायुनच्या मोंगलपक्षाच्या अितर मुसलमान सरदारांना ती घटना शल्याप्रमाणे बोचू लागली. मध्यंतरी सन १५४२त हुमायूनला वनवासात असताच अकबर हा पुढे भावी सम्राट होणारा मुलगा झाला. हुमायूनने अिराणच्या राजाचे सैनिक

साहाय्य घेअून हिंदुस्थानवर स्वारी केली. त्याच्याविरूद्ध गेलेल्या त्याच्या भावाचे डोळे काढून आणि अितर शत्रूंनाही कडक शासन करून हुमायूनने दिल्लीही परत जिंकून घेतली. परंतु बादशाहीपद असे त्याच्या हाती येते न येते तोच अि. सन १५५६ मध्ये हुमायून राजवाड्यातील संगमरवरी सोपानावरून (जिन्यावरून) पाय घसरून मरण पावला. त्यामुळे, हिंदुस्थानात पुन्हा जिकडे तिकडे अराजकता बळावली आणि दुष्काळही पडल्यामुळे, सर्वत्र वैराण झाले या वेळी सूर घराण्यातील, हुमायूनने पराभूत केलेला, शेवटचा बादशहा जो महंमद आदिलशहा तो वायव्येकडे पळून गेलेला होता. पण त्याने ज्या कर्तृत्वशाली हिंदू वजिराच्या हाती साऱ्या राजसत्तेचा कारभार पूर्वी दिलेला होता तो हेमू मात्र ह्या संधीचा काहीतरी लाभ घेण्यासाठी दिल्लीच्या प्रदेशातच टिकून होता.

ह्या हिंदु वीर पुरुषाविषयी त्याचे पूर्वीचे किंवा नंतरचे अगदी अल्पस्वरुप तेवढेच वृत्त मुसलमानी अितिहासांतून लिहिलेले आहे. हिंदु अितिहासकार असा त्या वेळेस होणेच दुर्घट होते आणि जे पुढे झाले त्यांनीही स्वतंत्रपणे असे ह्या हेमूविषयी काहीच सांगितलेले नाही. परंतु मागे पाचव्या प्रकरणात हिंदुसम्राट धर्मरक्षक (नासिरूद्दीन) ह्याच्याविषयी ज्याप्रमाणे त्यांनी केलेल्या प्रत्यक्ष कृत्यांचीच साक्ष अितर कोणत्याही कागदी लेखांपेक्षा अधिक प्रमाणार्ह धरलीच पाहिजे हे आम्ही दाखविले आहे, तशाच अखंडनीय प्रमाणांतही ह्या वीरवर हेमूचाही जो अितिहास देता येतो तो आम्ही देत आहो.

या कामी हेमूची ओीर्षा हिंदुसाम्राज्याची असतानाही त्याला मोंगल मुसलमानांच्या आणि विशेषत: बाबर पक्षीयांच्या विरुद्ध गेलेल्या अनेक अफगाणी मुस्लिम सरदारांचे सहाय्य मिळत गेले.

ह्या नियोजित हिंदु स्वातंत्र्ययुद्धाचा आराखडा आखण्यात आणि ती मूळ स्फूर्ती हेमूच्या मनात जागृत होण्यातही पूर्वी होअून गेलेल्या हिंदुसम्राट श्री धर्मरक्षकाच्या (नासिरुद्दिनच्या) चारित्र्याचाच आदर्श हेमूच्या पुढे असला पाहिजे. श्री धर्मरक्षकाच्या त्या महान प्रयत्नात यद्यपि त्याला स्वधर्मासाठी लढत असता मोठे अपयश आले, प्राणही गमवावे लागले, तरीही त्या अपयशामुळे किंवा त्याचे नंतर राणा संगादि रजपूत महावीरांच्या ह्याच महत्त्वाकांक्षेपायी कनवाह येते बाबराशी लढता लढता झालेल्या पराभवामुळे किंवा त्याच्याही आधी शतशत समयी ह्याच हिंदुसाम्राज्यसत्तेच्या महत्त्वाकांक्षेपायी लक्षावधि हिंदू स्त्री-पुरुषांना भोगाव्या लागलेल्या भयंकर यातनांपायी, झुंजाव्या लागलेल्या भयंकर लढायांपायी किंवा आत्मार्पणार्थ पेटलेल्या जोहारांच्या चितांमुळे- हिंदुजातीच्या अंतरात्म्यात ती मुस्लिम सत्ता अुलथून टाकून हिंदुसाम्राज्यसत्ता सर्व भारतात स्थापन करण्याची जी साहसी ओीर्षा, पुन:पुन्हा विझून जात असताही, पुन:पुन्हा भडकून अुठणाऱ्या जिवंत ज्वालामुखीप्रमाणे सळसळतीच सळसळत राहिलेली होती! तीच ह्या समयी ह्या वीरवर हेमूच्या महत्त्वाकांक्षी हिंदुमनात अुफाळून आली. वर सांगितल्याप्रमाणे अप्रगटपणे युद्धाची सज्जता करून जे मुसलमान सरदार त्याला मोगलांविरुद्ध मिळणार होते त्यांचे आणि त्यांच्या हिंदू सैन्यांचे अेकसूत्रीकरण करून अकस्मात तो हेमू दिल्लीवर स्वारी करून आला. दिल्लीस तो पूर्वी वजीर असता त्याच्याच हाताखाली राबलेले सारे हिंदु-मुस्लिम अधिकारी, राजकारणी आणि विशेषत: हिंदु लोक कोणताही म्हणण्यासारखा विरोध न करता त्याच्या पूर्वीच्या वजिरातीच्या दराऱ्याच्या प्रभावानेच त्याला शरण गेले. मोगल साम्राज्याची मुख्य राजधानी जी दिल्ली तीच त्याने जिंकल्यामुळे जिकडे तिकडे खळबळ अुडाली.

हेमू हा जन्मजात हिंदु होता. तो सुलतानाच्या राजवटीत आपल्या पराक्रमाने चढतचढत अधिकारपदावर गेला. शेवटीही, आपल्या वैयक्तिक हिंदुधर्मास लवलेश धक्का लागू न देता त्याने हिंदू म्हणूनच त्या दुर्बल सुलतानाचे वजीरपद पटकावले नि सारी बादशाही मुठीत ठेवली. आता तर त्याने अुघडपणे हिंदुत्वाचा ध्वज अुभारला होता! साऱ्या मुस्लिम सुलतानशाहीस अुच्छेदून हिंदुसाम्राज्याची अुघड अुठावणी केली होती! त्यामुळे साऱ्या कट्टर मुस्लिम जगतात 'अिस्लामी सलतनत बुडाली!' तोबा तोबा! निव्वळ काफरशाही झाली!!'' असा अेकच हाहाकार झाला!

दिल्ली जिंकताच स्वस्थ न बसता वीरवर हेमूने लगोलग दिल्लीच्या बादशाही' तख्तावर अुघडपणे आणि गाजावाजाने स्वत:च्या हिंदुत्वाची घोषणा करीत आरोहण केले. आणि त्याने स्वत: 'विक्रमादित्य' ही पदवी धारण केली! थोडी स्थिरस्थावर करून तो ससैन्य पुढील प्रदेश हस्तगत करण्यास बाहेर पडला. त्याने पूर्वी मुस्लिम सुलतानाचा वजीर असता मुस्लिम सुभेदारांची किंवा अितर बंडे मोडण्याचे कार्यी पंधरा सोळा लढाया जिंकलेल्या होत्या. त्यामुळे त्याचा समरपटुत्वाचा

आत्मविश्वास दुर्दम्य झालेला होता. तो निर्भयपणे दिल्लीहून जो निघाला तो साम्राज्यातील अगदी दुसरा जो दुर्जिंक्य दुर्ग म्हणून समजला जाअी त्या आग्र्यावरच स्वारी करून त्याने तो आग्र्याचा दुर्ग आणि ते नगर सपाट्यासरशी जिंकून घेतले! यावेळी बादशहा अकबर हा तेरा-चौदा वर्षांचा होता. त्याचे पालकत्व आणि राज्यचालकत्व बहिरामखान हा मुख्य 'वजीर' करीत होता. त्या बहिरामखानाने हेमूची बातमी अैकताच प्रथमतः या हिंदूंच्या प्रबळ अुठावणीचाच नाश केला पाहिजे असे ठरविले. पण राजपुतान्यापासून तो दक्षिणेपर्यंत अनेक लहानमोठी हिंदु नि मुस्लिम राज्ये दिल्लीच्या या नवीन स्थापल्या गेलेल्या मोंगल बादशाहीच्या विरुद्ध बंडे करून अुठलेली होती. म्हणून त्यांचा निःपात प्रथम करावा आणि तोवर बाल बादशहाला - अकबराला - लांब काबूलला नेअून ठेवावे, असा बहिरामखानाला अितर मुस्लिम कारभाऱ्यांचा आग्रह होता. पण त्या धूर्त बहिरामखानाने स्पष्ट सांगितले की, हेमूने अुद्‌घोषित केलेल्या हिंदु साम्राज्याच्या प्रबळ अुठावणीचा प्रथम नायनाट केला पाहिजे. त्याप्रमाणे बहिरामखान सुसज्ज सैन्य घेअून हेमूवर चालून आला. त्याने बाल अकबरास काबूलला न धाडता सैन्यासह स्वतःसमवेत घेतले होते. विक्रमादित्य हेमूच्या नि बहिरामखानाच्या बादशाही सैन्याची गाठ पानपतजवळ पडली. विक्रमादित्य हेमूचे सैन्यही मोठ्या वीरश्रीने लढले. लढाअी हेमूनेच जिंकली, असाही रंग दिसू लागला. पण अितक्यात हत्तीवरून लढत असलेल्या विक्रमादित्य हेमूच्या डोळ्यांत बहिरामखानाच्या सैन्यातून सुटलेला अेक बाण सूऽसू करीत शिरला. त्या आघातासरशी हेमू बेशुद्ध होअून अकस्मात हत्तीखाली कोसळला. त्याच्या सैन्यात जे मुसलमानी विभाग होते ते जवळजवळ भाडोत्रीच होते आणि स्वतः विक्रमादित्य हेमू कोसळताच हिंदु सैन्यातही अेकच गोंधळ अुडाला. बहिरामखानाने ते पाहताच निकराचा हल्ला केला आणि हेमूच्या सैन्याची वाताहात करून घायाळ हेमूस जिवंत पकडले. विक्रमादित्य हेमूला अकबर बादशहापुढे अुभा करून बहिरामखानाने सांगितले की बादशहानेच ह्या काफरचा स्वहस्ते शिरच्छेद करावा, पण बाल अकबराचे मन तसे करण्यास धजेना. तेव्हा संतप्त झालेल्या बहिरामखानानेच स्वतःचे खड्‌ग अुपसून हेमूचे शिर तत्काळ धडापासून वेगळे केले.

विक्रमादित्य हेमूचे हे बलिदान अितर कोणत्याही हिंदु हुतात्म्याप्रमाणेच हिंदुधर्माच्या आणि हिंदुराज्यलक्ष्मीच्या गौरवासाठीच, सौभाग्यासाठीच होते! हिंदु राष्ट्राने त्याच्या गौरवस्मृतीपुढे आपले मस्तक कृतज्ञतेने सदोदित लवविले पाहिजे. दुर्दैवाने त्याचे नाव हिंदुराष्ट्रात आज प्रचलित असलेल्या अिनमिन साडेतीन हुतात्म्यांच्या आणि वीरात्म्यांच्या ज्ञात असलेल्या पावन नामावळीत राष्ट्रवीर म्हणून मुळीच स्मरले जात नाही! ठीक आहे. नाही तर नाही! पण अशा या कृतघ्न हिंदुजातीतील कोटी कोटी आत्मविस्मृत जीवांनी नसले तरी हिंदु जातीने, हिंदुराष्ट्राने सामुदायिकरीत्या तरी हे ध्यान्यात ठेवले पाहिजे की, मुसलमानांच्या हातून हिंदुराष्ट्राला मुक्त करून हिंदुसाम्राज्य स्थापण्याची महत्त्वाकांक्षा जी पिढ्यानपिढ्या जिवंत राहिली आणि शेवटी मुसलमानी राजसत्तेच्या चिंधड्या चिंधड्या अुडवून तिच्या प्रेतावर आपला यशस्वी भगवा झेंडा अुभारू शकली, ती हिंदुराजसत्तेच्या विजयाची महत्त्वाकांक्षा या विक्रमादित्य हेमूसारख्या आज विस्मृत असलेल्या अनंत धुरंधर धर्मवीरांच्या आणि धाडसी 'दिल्लीन्द्रपदलिप्सवां'च्या रणयज्ञात झुंजत पडलेल्या प्राणाहुतींच्याच अन्नावर सतत पुष्ट होत राहिली म्हणूनच होय!

येथेच आम्ही आमची ही श्रद्धांजली विक्रमादित्य महान हेमूच्या स्मृतीला वाहतो! आणि स्थलाभावामुळे पुढचे कथासूत्र हाती घेतो.

**वीरांगना राणी दुर्गावती :** बहिरामखान अकबराला घेऊन थेट दिल्लीस गेला. बहिरामखान आणि अकबराने मिळून खाली ग्वाल्हेरपर्यंत सर्व बंडखोर प्रदेशांना पुन्हा अंकित केले. लवकरच बहिरामखानाचे आणि अकबराचे पटेनासे होअून अकबराने सर्व राज्यकारभार आपल्या हाती घेतला (सन १५६०). तेव्हा बहिरामखानाने अकबराविरूद्ध बंड केले. परंतु त्यात त्याचा पराभव झाला. अकबराने तरीही त्यास जीवे न मारता मक्केस धाडून दिले. पण वाटेतच बहिरामखानाच्या अेका जुन्या शत्रूने त्यास ठार मारले.

अि. स. १५६४ त गोंडवनांतील नावाजलेला स्वतंत्र रजपूत राजा वीर नारायण याजवर अकबराने स्वारी केली. राजा वीर नारायण अल्पवयी होता. पण त्याची आअी राणी दुर्गावती हिने शरण न जाण्याचे ठरवून अकबराच्या बादशाही चतुरंग सैन्याशी युद्ध

ठाणले. त्या शूर हिंदू राणीने शक्यतोवर बादशहाच्या सैन्यास पुढे सरकू दिले नाही. आपल्या राजदुर्गात सशस्त्र झुंज देत तिने आपल्या हिंदुस्वातंत्र्याचे रक्षण केले. शेवटी जेव्हा अकबराच्या अनेक पटीने मोठ्या असलेल्या सैन्यापुढे आपला निभाव लागणार नाही असे तिला वाटले तेव्हा तिने काय केले? शरण गेली ? स्त्री म्हणून क्षमेची भिक्षा मागितली? किंवा अितर काही राजपूत स्त्रियांनी अधूनमधून केले तसे अकबराकडे राखी धाडून मला भगिनी माना आणि जीवदान द्या, अशी हताश नि कोडगी लगट केली? नव्हे! नव्हे! मुसलमानांच्या हाती पडलेल्या हिंदु राजस्त्रियांच्या शीलाची लांडगेतोड करून ते राक्षस कशी निर्लज्ज आणि निर्दय चिरफाड करतात ते शेकडो अुदाहरणांवरून ठाअूक असलेल्या त्या वीरांगना दुर्गावती राणीने तसे काहीअेक न करता शेवटच्या पेटलेल्या रणकुंडातच आपल्या अनेक सहकारी स्त्रियांसह देहाचा होम केला! तरीही राजा वीरनारायण यानेही मुसलमानांशी लढाअी चालूच ठेवली. पण शत्रूच्या प्रचंड बलापुढे काही कालानंतर लढणे त्याला अशक्य होअून बसले. शेवटी त्याचे राज्य मोंगल राज्यास जोडण्यात आले.

अकबराने नंतर राजुपतांतील लवचिक स्वभावाचे जे जे राजे आढळले आणि मुसलमानांशी पिढ्यानपिढ्या लढण्याचा ज्यांना अुबग आलेला होता अशा काही हिंदू राजांशी अत्यंत स्नेहाची आणि त्यांना मोंगल साम्राज्यात गौरवाने वागविले जाअील अशा अभिवचनांची मिट्टास बोलणी चालू केली. या अकबराच्या धोरणाला अनुकूल असताही हे लवचिक रजपूत राजे चितोडच्या राण्याचा परंपरागत बाणेदारपणा पाहून पुन:पुन्हा आपला मोंगलसत्तेशी स्नेहसंबंध जुळविण्यास कचरतात, लाजतात आणि चितोडचे महाराणा तर आपले अस्तित्व मान्य करण्यास कट्टर विरोध करण्याचे सोडीत नाहीत, असे पाहून अकबराने प्रथमत: चितोडचाच पिच्छा पुरविण्याचे योजिले. पण काही केले तरी सामदामाने चितोड आपले स्वातंत्र्य गमाविण्यास सिद्ध होत नाही, हे पाहून सन १५६७ त अकबराने चितोडवर स्वारी करून त्यास वेढा दिला. त्यावेळी बाबराशी लढलेल्या विख्यात राणा संगचा मुलगा अुदयसिंह हा चितोडचा राणा होता; परंतु त्याचे अंगी आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाचा लेशसुद्धा नसल्याने तो रानावनात पळून गेला. पण चितोडची सारी राजसत्ता त्याच्या ज्या अेका नायकिणीच्या हातात अेकत्र झालेली होती, तिने साऱ्या राजपूतात पराक्रमाचे स्फुरण संचरविले. चितोडच्या मोठमोठ्या सरदार जयमल्ल, पट्ट आणि अितर राजपूत पुढाऱ्यांनी अुदयसिंह पळून गेला तरी मोगलांशी तुंबळ युद्ध चालूच ठेविले. पुढे जयमल्ल नि पट्ट हे दोघेही रणांत मारले गेले. तेव्हा पराभव निश्चित होणार हे जाणून हताश न होता ती राजपुतांची हिंदू वीरजाती अधिकच चिडून अुठली. सर्व सैनिकांनी रणात प्राणावर अुदार होअून अेकच 'हरहर महादेव' केला! मुसलमानांच्या मुंडक्यांच्या राशी पडल्या. त्या रणनिकरात आपले राजपूत योद्धे बहुतेक कापले गेले असे दिसताच चितोडच्या वीरपरंपरेप्रमाणे सर्व राजपूत स्त्रियांनी आधीच रचलेली प्रचंड चिता पेटवून दिली आणि आपल्या स्वधर्माचा जयजयकार करीत जिवावर अुदार होअून मुलालेकरांसुद्धा तटावरून त्या चितते पटापट अुड्या घेतल्या! हिंदू वीरांगना भस्म होअून गेल्या, पण दुष्ट म्लेंच्छांचा त्यांनी स्वत:स स्पर्श होअू दिला नाही! हा चितोडचा तिसरा जोहार होय.

पण, हिंदुपक्षात अेवढा हाहाकार अुडालेला पाहूनही आजच्या लाचार हिंदु अितिहासकारांनाही, जो परम अुदार, हिंदुमुसलमानांच्या अेकीसाठी तळमळणारा, हिंदूंना पूर्वी कोणत्याही मुसलमानी राजाने वागविले नसेल अितक्या अुदारतेने वागविणारा, केवळ मुसलमानी 'रामराजा'च असा जो मोंगल बादशहा वाटतो तो हिंदूमध्ये हाहाकार अुडवून देणारा अकबर हाच होय!

परंतु चितोडच्या स्त्री-पुरुष-बालकांच्या ह्या हत्याकांडानेही समाधान न पावलेला अकबर चितोडच्या रक्तबंबाळ नगरात शिरून जे अुरले-सुरले हिंदू नागरिक आक्रांत करीत होते त्या सर्व हिंदू पुरुषांची, आणि ध्यानात ठेवा! हिंदू स्त्रियांचीही त्याने सरसकट कापाकापी केली. तीस सहस्र राजपूत हिंदू या अेका चितोडच्या युद्धात मृत्युमुखी पडले! नंतर माणसांप्रमाणेच चितोडचे दगडधोंडे अित्यादी निर्जीव पदार्थही मुसलमानांचे शत्रूच आहेत असे वाटून की काय त्या राक्षसी विध्वंसकाने, बादशहा अकबराने, हिंदूंची देवळे, मंदिरे, राजवाडे, घरेदारे अित्यादी अुभे दिसेल ते ते धडाधड पाडवून मातीला मिळवून दिले. चितोडच्या नगरदेवीच्या देवळाचा, मूर्तीचा आणि सर्व परिसराचाही तसाच विनाश करून तेथील नगारे, दिवे, दुंदुभी (नौबती) दागिने, द्वारे अित्यादी सर्व प्रचंड वा मूल्यवान वा हिंदुप्रिय पदार्थ तिकडे आग्र्यास

धाडून दिले. चितोडच्या हिंदु राजधानीच्या अशा अमानुष नायनाटाने त्याची धर्मोन्मत्त पिपासा थोडीशी शांत झाल्यावर तो मुस्लिम बादशहा अकबर त्या 'सत्कृत्या' ने स्वत:स गाझी म्हणवीत दिल्लीस परत गेला!

आणि अिकडे ह्या आपल्या राजधानीच्या आणि राज्याच्या विध्वंसाचा प्रतिशोध घेता न आल्याने चार वर्षे रानावनात भटकत राहिलेला राणा अुदयसिंह राज्यभ्रंशाच्या दु:खाने सन १५७२ त मरण पावला!

## हिंदुकुलभूषण राजा प्रतापसिंह

अुदयसिंहाचा मुलगा राणा प्रतापसिंह. तो लगोलग चितोडच्या अस्तित्वात नसलेल्या काल्पनिक सिंहासनावर बसला! तथापि, झाडून साऱ्या जातिवंत राजपुतांच्या हृदयातील धर्मवीरत्वाचे नि अदम्य पराक्रमाचे सिंहासनच त्याला अर्पिले गेल्यामुळे तो राणा प्रताप अेखाद्या सत्यसत्य राणा प्रतापाप्रमाणेच सिंहासनाधीश्वर शोभू लागला! तो राणा, राजपुतांचा परंपरागत राणेपणाचा, बाणा, प्राण गेला तरी न सोडणारा असाच निघाला. अनेक यातना सोसून, त्याने अकबराशी अपमानास्पद मित्रत्व न करता, त्या अत्यंत प्रबल मुस्लिम बादशहाचे स्वधर्मस्वातंत्र्यासाठी शत्रुत्व करणेच भूषणास्पद नि हिंदूजीवनाचे नि हिंदुनृपत्वाचे खरे साफल्य आहे, असे तो मानता झाला!

त्याने मुसलमानांच्या हाती चितोड नगर पडलेले असल्यामुळे अितर नगरग्रामांतून आपली फिरती राजधानी त्या संकटकालात आपल्यासमवेत भटकवीत नेली आणि मुस्लिम सैन्याच्या सत्तेखालून हळूहळू पुष्कळ प्रदेश मुक्त करून स्वत:चे अेक जिवास जीव देणारे सैन्यही अुभारले. त्याच्या ह्या काळातील पराक्रमाचे आणि रणप्रसंगाचे वर्णन रोमहर्षक असताही स्थलाभावी येथे देता येत नाही.

शेवटी, त्याचा प्रभाव अितका वाढला की, प्रत्यक्ष अकबरलाच आपले बादशाही सैन्य राणा प्रतापचा नायनाट करण्यासाठी धाडावे लागले. त्यावेळी अकबरास शरण गेलेला जयपूरचा राजा मानसिंग नि बाटलेला रजपूत सरदार महाबतखान ह्या सरदारांसह स्वत: राजपुत्र सलीम हा अकबर बादशहाचे आज्ञेवरून राणा प्रतापावर चालून गेला. ह्याचवेळी ती अत्यंत निकराची गाजलेली हळदीघाटाची लढाअी झाली. लढण्याचा आवेशात राणाप्रतापने आपला घोडा सरळ सलीमच्या हत्तीवर घातला आणि त्या अितिहासप्रसिद्ध चेतक घोड्यानेही न डगमगता सलीमच्या हत्तीच्या सोंडेवरच झेप घेअून आपल्या टाचा रोविल्या. बिजलीच्या चमकेप्रमाणे अेका क्षणात सलीमच्या कंठाच्या अितक्या जवळून राणा प्रतापचे तेजस्वी खड्ग चमकून गेले, अितक्या जवळून की सलीमला अंधेरीच यावी, आणि त्याने मागे घ्यावे. आपल्या वारातून शत्रु निसटला असे पाहताच क्षणार्धात राणा प्रताप घोडा परत घेअून पुन्हा रणांगणात घुसून दिसेनासा झाला.

राणा प्रतापसिंह या अनिर्णीत लढाअीतून जो निसटला तो त्याच्यासमवेत त्याच्या अितक्याचा निकराने आणि त्याच्याच ह्या पराक्रमानेच अुद्युक्त झालेल्या चितोड राज्यातील सहस्त्रावधि राजपूत वीरांच्या समूहासह साऱ्या मेवाडभर मुसलमानांचा नायनाट करीत, वृकयुद्धाचा (गनिमी काव्याचा) धुमाकूळ घालीत चालला. अेक चितोड नगर तेवढे सोडून, त्याने मेवाडचे सारे राज्य स्वतंत्र केले. शेवटी राणा प्रतापने आपली फिरती राजधानी अुदेपूर येथे स्थिरस्थावर केली, ती मात्र शेवटपर्यंत अकबराच्या हाती पडली नाही. अकबराने राणा प्रतापशी मैत्री करण्याचेही अनेक धूर्त प्रयत्न केले, पण, राणा प्रताप काही केल्या त्यांना बळी पडला नाही. त्याच्या राजवटीत अितके अद्‌भुत, रोमहर्षक, स्वदेशाभिमान नि स्वधर्माभिमान यांनी रसरसलेल्या आणि सामान्य मेवाडी राजपूत नागरिकांपासून तो त्या मेवाडच्या अलौकिक महाराण्यांपर्यंतच्या कृत्यांपर्यंतचे प्रसंग घडलेले आहेत की, त्यांचे, आमच्या हिंदु तरुणांनी रामायणातील किंवा महाभारतातील वीरोत्तमांच्या आख्यानांप्रमाणेच धर्मबुद्धीने पाठांतर केले पाहिजे. सुदैवाने राजपूत वीरभाटांचे असे रसरसलेले 'रासो' अगदी भूषण कवीच्या काळपर्यंतचे अद्यापि अुपलब्ध आहेत. त्यांना माध्यमिक शाळांतून तरी अपरिहार्य वाचनीय पुस्तके म्हणून नेमले गेले पाहिजे. अशा या आमच्या 'समीक्षणात्मक' ग्रंथात त्यांचे अुतारे देण्यालासुद्धा स्थल नाही. आणि आता माझ्या या सरत्या नि मावळत्या जीवनात वेळही अुरला नाही. हा थोर हिंदुकुलभूषण राणा प्रतापसिंह लवकरच सन १५८१त मरण पावला.

## पंजाबात अेका नवीन हिंदुशक्तीचा
## शीख संप्रदायाचा अुदय

पंजाबमधल्या श्री गुरुनानक ह्या नावाच्या अेका साधु पुरुषाने पंधराव्या शतकाच्या शेवटी अेक धर्मपंथ स्थापला. त्याचे जेवढे अनुयायी होते, शिष्य होते, त्यांचा लवकरच अेक संघ बनला. ते स्वत:ला श्रीगुरू नानकाचे शिष्य म्हणून 'शिख' असे म्हणवून घेत. श्रीगुरू नानक हा स्वत: गृहस्थाश्रमीच असून ओश्वराची आराधना आणि जनसेवाही भक्तिमार्गानेच सुसाध्य असते, असे तो सांगे. मनुष्यमात्र हा भक्तिमार्गाचा अधिकारी आहे. त्याकाळी पंजाबात काय किंवा भरतखंडभर काय, मुसलमानांनी हिंदुधर्माचा अेकच अुच्छेद मांडलेला होता आणि मुसलमानी साम्राज्य स्थापण्यासाठी लढाया नि युद्धे यांचा मुसलमानांनी धुमाकूळ मांडला होता. त्यांना भरतखंडभर हिंदुराज्यकर्त्यांनी आणि जनतेने समरांगणात नेटाचा प्रतिकारही चालविला होता. अल्लाअुद्दिनसारख्याच्या होअू घातलेल्या साम्राज्याचे तुकडे तुकडे अुडवून हिंदूंनी विजयनगरसारखे स्वतंत्र नि प्रबळ हिंदू राज्यही पुन्हा स्थापन केले होते, हे सर्व पूर्वी कथन केलेलेच आहे. राजपुतान्यांत, गोंडवनात हिंदुराजांच्या पराक्रमी सैन्यांनी मुसलमानांची वारंवार धूळधाण अुडवून दिली होती.

**श्री गुरूनानक :** पंजाबात मात्र मुसलमानांच्या राजसत्तेला प्रबळ आव्हान देणारा हिंदू असा कोणी अुरला नव्हता. अशा परिस्थितीत श्री गुरूनानक पंजाबात अुपदेश देअू लागला की हिंदु आणि मुसलमान हे दोघेही ओश्वराच्या दृष्टीने सारखेच आहेत, दोघेही माझ्या या भक्तिमार्गाने गेले असता मोक्ष पावू शकतात. दोघेही भाअू भाअूच आहेत. माझ्या पंथात हिंदू आणि मुसलमान असा भेद मी मानीत नाही, असे जरी श्री गुरुनानक जीव तोडून सांगत होता, तरी त्याच्या शिष्यवर्गात सहस्रांतून अेखाददुसराच मुसलमान शिष्य आढळून येअी. अितर सर्व हिंदूच हिंदू त्याच्या पंथांत होते. स्वत: श्री गुरूनानक हा जातीने वैश्य (बनिया) होता. श्री गुरू नानक सन १५३८ मध्ये मरण पावला. त्याला जरी स्वत:चे पुत्र होते तरी ते त्याच्या मताला अनुकूल नव्हते. त्याने (गुरूनानकाने) आपला शिष्य अंगद याचीच आपल्या मागून आपल्या पंथाच्या गुरूपदावर स्थापना केली. तथापि, त्याच्या मरणापर्यंत श्री गुरूनानकाच्या पंथास अेक भक्तिपंथ, भजनी संप्रदाय अेवढेच प्रमुख स्वरूप होते आणि त्यांची संख्याही राजकारणाच्या दृष्टीने अगदी अुपेक्षणीय होती. तथापि त्यांच्या काही वचनांतून हिंदु लोकांच्या त्या वेळच्या दु:स्थितीविषयी शोकमय अुद्‌गार निघालेले आहेत. अुदाहरणार्थ.

**क्षत्रियांही धरम छोडियां, म्लेंच्छ भाखा गही ।**
**सृष्टी सब अिकवर्ण हुअी धर्मकी गति रही ।**
**नीलवर्णके कपडे पहने, तुरक पठाणी अमल भया ।।**

अशी अनेक चरणे त्याच्या नावावर त्यांची म्हणून लोकांत रूढ आहेत. अितर हिंदुसंतांप्रमाणेच गुरू नानकानेही समाजातील अनेक भाबड्या नि वेडगळ चालीरीतींचा निषेध केलेला आहे.

गुरू अंगदानंतर तिसरा गुरू अमरदास नि सन १५७४त चौथा गुरू रामदास हे झाले. त्याची नि अकबर बादशाहाची भेट झाली असे म्हणतात. बादशहाने गुरु रामदास यांना अेक विस्तीर्ण भूमी 'अिनाम' म्हणून दिली. त्याच भूमीवर गुरु रामदासाने अेक सुंदर सरोवर आणि त्याचे काठी अेक मंदिर बांधले. तेच आजचे 'अमृतसर' होय! गुरू रामदास सन १५८१त वारला. पांचवा गुरू अर्जुनमल्ल हा झाला. त्याच्याच राजवटीत शिखांची वाढ झपाट्याने होअू लागली. कारण, त्यांना अमृतसर येथे सार्वजनिक केंद्र मिळाले होते. त्यातही गुरु अर्जुनाने आपल्या ह्या वाढत्या पंथाला अेक पंथाचा मुख्य ग्रंथ असावा अेवढ्यासाठी श्री गुरू नानकाची शक्य ती वचने अेकत्र करून आणि त्यासह तत्कालीन अितरही काही संतांची वचने गोवून सर्व शिखांना प्रमाण व्हावा असा अेक ग्रंथ निर्माण केला आणि त्यासच 'गुरुग्रंथ' किंवा 'आदिग्रंथ'' असे नाव दिले. ह्या ग्रंथात कबीराची वचने आहेत, महाराष्ट्रातील संत नामदेव तीर्थयात्रेस पंजाबात गेले असता त्यांच्या भक्तिमार्गाचा आणि अभंगांचा तिकडे पुष्कळ प्रचार झाला होता. श्री गुरू नानकांची शिकवण नि संत नामदेवाची शिकवण ही समानच आहे असे पाहून संत नामदेवांच्याही काही मराठी कविता गुरुग्रंथात गोविलेल्या आहेत. हा ग्रंथ प्राकृतात आहे. ह्याच प्राकृतास सध्या पंजाबी म्हणतात. त्याकाळी केवळ शास्त्रीय विषय लिहिण्यासाठीच जिचा

विद्वानवर्ग बहुधा पंजाबकडे अुपयोग करीत नि त्यामुळे जिला 'शास्त्री लिपी' असेच म्हणत, त्या देवनागरीत मुळातच तो ग्रंथ लिहिलेला नव्हता. आपल्या अिकडे ज्याप्रमाणे अगदी कालपरवापर्यंत मोडी लिपी वापरीत त्याप्रमाणे, पंजाबात त्या पत्रव्यवहारादि सामान्यजनांच्या मोडी लिपी वापरली जाअी त्या प्राकृत लिपीतच तो ग्रंथ लिहिला गेला. तिला साधारण लोकांत लुंडोमुंडी असे म्हणत. परंतु गुरुग्रंथ त्या लिपीत लिहिला गेल्यानंतर शीख लोकांनी गुरुंनी स्वीकारलेली लिपी म्हणून तिचा विशेष गौरव व्हावा यास्तव 'गुरूमुखी' असे त्या लिपीला म्हणण्यास आरंभ केला.

जहांगीर बादशहा झाल्यानंतर त्याचा वडील मुलगा खुश्रू ह्याने बादशहाविरूद्ध बंड केले. खुश्रू पंजाबात पळून गेला. त्यावेळेस शीख गुरु अर्जुनदेवाने त्यास आपल्याकडे अुतरू दिले. त्यामुळे चवताळून जहांगीर बादशहाने अुर्जनदेवास पकडून त्याचा वध केला. शिखांच्या अितिहासात मुसलमानांशी लढताना स्वधर्मासाठी आपल्या प्राणांचे बलिदान करणारा गुरू अुर्जन हाच पहिला वीर गुरू होय! याच गुरू अर्जुनदेवाच्या काळी शीख लोकांत अेक स्वतंत्र संघटना बांधण्याची अीर्षा अुत्पन्न होअून प्रत्येक शीख पंथीयाने अेक ठराविक धार्मिक कर गुरूस दिलाच पाहिजे अशी पद्धती चालू केली गेली आणि पंथात सैनिक शक्तीही वाढावी म्हणून सैनिक अघाडीही अुघडण्यात आली.

त्या गुरूच्या वधामुळे शिखांत मुसलमानांविरुद्ध त्वेषाची लाट गुप्तपणे वाढत चालली. त्यांच्या अनुयायांत विशेषतः लढवय्या हिंदु जाट जातीच्या शेतकरी लोकांचाच त्याकाळी आणि शेवटपर्यंतही भरणा झालेला होता. हे हिंदु जाट त्या पंथांत सामावलेले आणि सबळ असल्याने त्या पंथाविषयी पंजाबच्या सर्वच हिंदु लोकांत ममतेची आणि अेकात्मतेची भावना होती. शिखात जसजसा मोंगलाच्या धार्मिक छळापायी हिंदु म्हणून, हिंदु धर्माचे संरक्षक म्हणून, शीख पंथाचे कट्टर अनुयायी म्हणून सैनिक प्रवृत्तीचा नि संघटनेचा प्रसार होत गेला, तसतसा त्यांच्या पंथाकडे अेक अुपद्रवी हिंदु सैनिक केंद्र या दृष्टीने मोंगल सरकार कटाक्षाने पाहू लागले.

अर्जुनचा पुत्र गुरू हरगोविंद याने लवकरच बादशहास कर देण्याचे नाकारले. तेव्हा त्याला धरून बादशहाने बारा वर्षेपर्यंत कारागृहात कोंडले. पुढे सुटका होताच त्याने त्या वेळचा मोंगल बादशहा जो शहाजहान त्याचे विरुद्ध अुघड बंड केले तरीही त्याकडे मोठेसे महत्त्वाचे विरोधी केंद्र म्हणून न बघता अेक लहानसे बादशाही सैन्य शहाजहानने धाडले. परंतु, संग्राम येथे अकस्मात शीख अितक्या त्वेषाने लढले की, त्या मुस्लिम सैन्यपथकाचा पराभव झाला. त्यामुळे, पंजाबातील हिंदूंना जरी आश्चर्य आणि आनंद वाटला तरी बादशहाने काही तिकडे विशेष लक्ष दिले नाही. गुरु हरगोविंद सन १६४५ त मरण पावला. त्याच्यानंतर हरराय, हरकिशन नि तेजबहादुर असे गुरु झाले. पण, ह्या गुरुपीठाला खरे तेज आणि नैतिक सामर्थ्य असे वस्तुतः गुरू तेज बहादुराच्या धर्मकार्यी केलेल्या दैदीप्यमान बलिदानानेच चढले. गुरु तेजबहादुर हा आनंदपूर येथे वास्तव्य करी. हिंदूंना बळाने मुसलमान केले जाण्याचा अत्याचार पंजाबात ठिकठिकाणी वारंवार घडत असे. अशा वेळी गुरू तेज बहादुराने आणि त्याच्या शीख सैनिकांनी मुसलमानांचा प्रतिकारही अनेकदा केलेला होता. अितक्यात नरराक्षस औरंगजेबाने सर्व हिंदुजगतासच मुळापासून अुपटून काढण्याचा अघोर निश्चय केला. साऱ्या भरतखंडभर त्याच्या त्या दुष्कार्याचा हिंदुजगतानेही घोर विरोध मांडला. तोच, काश्मीर येथील समग्र ब्राह्मणवर्गावर औरंगजेबाने धर्मांतराच्या तलवारीची धार धरून आज्ञा सोडली की, काश्मीरच्या श्रेष्ठ समजल्या जाणाऱ्या सर्व ब्राह्मणांनी अेक तर मुसलमान व्हावे, नाही तर काफरांवर औरंगजेबाने लादलेला असह्य कर त्यांनी द्यावा. तेव्हा, तिकडे हाहाकार अुडाला. अशा प्रसंगी 'गुरू तेजबहादुराने अेखाद्या धैर्यमेरूसारखे हिंदूंना सांगितले, ''देअू नका! स्वधर्मासाठी प्राण सोडा, पण स्वधर्मास सोडू नका!'' हिंदू लोकांनी अशी बाणेदार अुत्तरे देण्यास प्रारंभ करताच औरंगजेब चिडून गेला आणि त्याने श्री गुरू तेजबहादुराला पकडून आणून शिक्षा सांगितली की, ''तू अेक तर मुसलमान हो, नाही तर मृत्युदंडास सिद्ध हो!'' तेव्हा धर्मवीर गुरु तेजबहादुराने, ''हिंदुधर्माचा त्याग मी केव्हाही करणार नाही, तुला वाटेल ते कर, जा,'' असे बाणेदार अुत्तर दिले. तेव्हा अधिकच क्रुद्ध होअून औरंगजेबाने शीखगुरु तेजबहादुराचा तत्काल शिरच्छेद केला. ती गोष्ट सन १६७५ त घडली. ह्याच बलिदानप्रसंगी गुरु तेजबहादुरासमवेत त्याचे कित्येक हिंदू शिष्यही धरले गेले होते, त्या सर्वांनीही मुसलमानी धर्म स्वीकारण्याचे नाकराल्यामुळे त्यांचेही भयंकर हाल करून कित्येकांचा

शिरच्छेद करण्यात आला, तर काही ठळक हिंदु वीरात्म्यांना करवतीने त्यांची मस्तके दुभंग करून ठार मारण्यात आले. ह्या हिंदु हुतात्म्यांतच श्री भाओी मतिदास हेही मारले गेले. ह्या मतिदासांच्या कुलास भाओी ही प्रेमळ पदवी शीख गुरूकडून अर्पिलेली होती. ह्या हुतात्मा भाओी मतिदासांच्या कुलात आपले पंजाबमधले अर्वाचीन हिंदुराष्ट्रभक्त भाओी परमानंद हे जन्मलेले होते. ह्याच बीर गुरूचा पुत्र म्हणजे पुण्यप्रताप हिंदुराष्ट्रवीर श्री गोविंदसिंह हा होय!

**हिंदुराष्ट्रवीर श्री गुरू गोविंदसिंह :-** शीख संप्रदायास अक्षरशः खड्गाचे पाणी चढवून त्याचा अेक पोलादी लढाअू नि दुर्भेद्य दुर्ग करण्याचे महत्कार्य जे केले आणि त्यायोगे शिखांच्या पंजाबातील महाराजा रणजितसिंगांच्या काळची प्रबळ नि स्वतंत्र अशी हिंदुराजसत्ता नि धर्मसत्ता स्थापण्याच्या हिंदुराष्ट्रकार्याची मूळ प्रेरणा जर कोणी अितक्या बलवत्तरपणे दिली असेल तर ती श्री. गुरू गोविंदसिंह ह्यानेच होय! हे सत्य विशदविणाऱ्या श्री गुरू गोविंदसिंहाच्या - ज्याला शीखच नव्हेत तर सारे पंजाबीय हिंदु त्या काळीसुद्धा प्रेमाने दशम बादशहा म्हणत. कारण, तो गुरू नानकापासून दहावा गुरू होता. जीवनांतील अनेक पराक्रमी आणि रोमांचकारी घटनापैकी स्थलाभावी अेकच घटना जरी येथे सांगितली तरी पुरे आहे.

गुरु नानकानंतर प्रत्येक मोठ्या धार्मिक संप्रदायाच्या प्रकरणी जे घडते तसे घडून गुरू नानकाच्या शिष्यांमध्ये अनेक पंथोपपंथ पडले. पण, ते सर्व शिष्य हिंदुसमाजाचे जीवन जगत होते. लग्ने, कार्ये अित्यादी सर्व सामाजिक व्यवहारांत ते हिंदुसमाजापासून कोणत्याही प्रकारे विलगलेले नव्हते. हिंदुसमाजातील प्रत्येक संप्रदायाप्रमाणे त्यांची म्हणून काही धार्मिक मते असते. गुरुग्रंथात नामदेव, कबीरसुद्धा अनेक हिंदुसंतांच्या वाणी (वचने) स्वतः नानकाच्या वाणीसमवेत अेकत्रच दिलेल्या आहेत; आणि गुरु नानकापासून तो त्यांचा आद्य ग्रंथ वाचताना शिखांच्या धर्मपीठातून त्या सर्व वाणींना सारखेच पवित्र समजून अद्यापपर्यंत तसाच वाचला जातो. गुरु नानकाच्या अेका पुत्रानेच अेक पंथ काढलेला होता. असे अुपपंथ निघता निघता जेव्हा शिखांवर हिंदुधर्माच्या रक्षणासाठी म्हणजेच शीखधर्माच्या रक्षणासाठी मोगलांशी लढताना वर सांगितल्याप्रमाणे शिखांचेच अेक शस्त्रसज्ज दल अुभारावे लागले तेव्हा काही काळाने गुरु गोविंदांच्या मनात स्वराज्य स्थापण्याची महत्त्वाकांक्षा जागृत होताच त्याला अेक 'गुरूच्या' जीवास जीव देणारे, सशस्त्र युद्धालाच वाहून घेणारे आणि अत्यंत संघटित असे अेक शिखांतूनच निवडलेले स्थायी सैन्य स्थापावे, असे वाटू लागले.

तेव्हा गुरु गोविंदसिंहाने सर्वसामान्य शिखांची अेक मोठी महासभा बोलाविली अशा प्रसंगाविषयीची त्या प्रसंगाच्या आगेमागे शिखांनी लिहिलेल्या पद्यमय ग्रंथातून हिंदूंच्या पुराणातील रसभरित वर्णनाच्या पद्धतीवर वर्णने केलेली आहेत. पण, त्यांतील अितिहासास धरून असलेला तेवढाच सारांश येथे देतो.

शिखांची महासभा भरविल्यानंतर गुरु गोविंदाने विचारले की, स्वधर्मासाठी प्राणत्याग करण्यास केव्हाही सिद्ध असणाऱ्या आणि सैन्यातच आपले जीवन व्यवसाय म्हणून घालविण्यास सिद्ध असणाऱ्या शिखांचे अेक स्थायी सैन्य मला अुभारावयाचे आहे. तरी या कडक व्रतास अंगीकारणाऱ्या शिखांनी मला आपली नावे कळवावीत. पुढे तशा शिखांतून गुरूंनी स्वतः प्रथमतः पाच शिखांची निवड केली. त्यापैकी, प्रत्येक शिखाची प्रवृत्ती पोलादाप्रमाणे तेजस्वी नि धारदार असली पाहिजे, हे तत्त्व त्यांच्यात बिंबविण्याकरिता त्या निवडक पाचांचा पहिला संकल्प जो करण्यात आला तो म्हणजे अेका धारदार पोलादी खंड्यास (लहान खड्गास) पाण्यामध्ये काही मंत्र म्हणत ढवळून ते मंत्रित पोलादी पाणी त्या शिखाच्या डोक्यावर शिंपडले जाओी. नंतर आपल्या कटीला त्याने सदोदित कृपाण बांदलेच पाहिजे, हा दुसरा नियम त्याला पाळावा लागे. त्याने आपल्या शरीरवरचे केस केव्हाही कापता कामा नयेत; त्याचप्रमाणे त्याने सदोदित लंगोटबंद (कच्छधारी) असले पाहिजे आणि हातात त्याने घेतलेल्या लढाअू व्रताचे प्रतीक म्हणून अेकेक पोलादी कडे आणि केसात अेक कंगाही (फणी) धारण केली पाहिजे, केश, कंगा कच्छ, कडे आणि कृपाण हीच अशा प्रत्येक व्रतस्थ लढाअू शिखाला धारण करावी लागणारी पाच चिन्हे होत. यांनाच पाच कक्के म्हणतात. शीख समुदायातून ह्या विशिष्ट वीरदलात ज्या वरील प्रकारच्या व्रतस्थ शिखांना गुरूंनी त्या वेळेपासून स्वतः निवडून घेतले त्याच शीखदलास 'खालसा'

हे पुढे भारतभर प्रसिद्धीस आलेले नामकरण प्राप्त झाले. खालसा हा शब्द अुर्दू आहे. त्याचा मूळ अर्थच 'निवडलेले' असा आहे.

ह्या खालसा सैनिकांची वाढ अिष्टांकापर्यंत होताच गुरुगोविंदाने पंजाबात लहान लहान हिंदू-मुसलमान संस्थानिकांना नि प्रदेशांना जिंकून किंवा लुटून घेण्याचा अुपक्रम चालविला. अर्थातच तो त्या वेळचा मोगल बादशाह आणि गुरु गोविंदाच्या पित्याला, श्री गुरु तेजबहादुरांना-हिंदुधर्म न सोडण्यासाठी ठार मारणारा दुष्ट शत्रू औरंगजेब त्याने गुरु गोविंदालाही पकडून आणण्यासाठी मोंगल सैन्य पंजाबात धाडले. त्याच्याशी ज्या चकमकी 'खालसा' सैन्याच्या झाल्या, त्यामुळे गुरूने स्वतःसच आनंदपूरच्या गडात कोंडून घेतले. मोंगलांनी तत्काल गुरुला वेढा घातला. गुरूसमवेत जे खालसा सैन्य गडातून लढत होते त्यांतच गुरुचे दोघे अठरा वर्षाच्या वरील नि दोन आतील वीरपुत्र होते. आपल्या सैन्यास अुत्तेजण्यासाठी नि पुत्रांचीही परीक्षा पाहण्यासाठी त्या पराक्रमी गुरुने अेके दिवशी आपल्या त्या दोन पुत्रांस ससैन्य गडाबाहेर पडून मोगलांशी लढण्यास धाडले. त्या असम लढाअीत त्याचे दोन्ही पुत्र मारले जात असता या अलौकिक वीर पित्याने 'वाह! वाह!' म्हणून सारखा जयध्वनी चालू ठेवला होता. रात्र होताच लढाअी नित्याप्रमाणे थांबली आणि ते आलेले खालसा सैन्य चोरूनमारून गडात पुन्हा घुसले. पण त्या खालसा (निवडक) सैन्यातील अनेकांचा धीर मात्र बाहेर रणांगणावरच सुटलेला होता. ते पाहून गुरुने सर्वांना स्पष्टपणे सांगितले की ज्यांना आपला जीव वाचविण्यासाठी मला सोडून खालसातून बाहेर पडायचे असेल त्यांनी तत्काल तसे करावे. मी मात्र क्वचित या गडाबाहेर पडून लढाअी अशीच चालविणार आहे. तेव्हा त्या अगदी 'निवडलेल्या' तीलही (खालसांतीलही) अनेक शीख गुरुसेवेची त्यागपत्रे देअून गुरु गोविंदाला सोडून रातोरात गडाबाहेर निघून गेले. लवकरच रात्री काळोखात गोविंदसिंह त्याच्या अुरलेल्या दहा-बारा वर्षाच्या आतील दोन मुलांसह सपत्नीक त्याच्या समवेत रहिलेल्या प्रामाणिक खालसा वीरांनाही निरोप देअून, मुसलमानी वेढ्यातून किल्ल्याबाहेर निसटला.

गडातून त्या दुर्दैवी रात्रीच्या गाढ अंधारात आपल्या त्या दोन लहान मुलांसह श्रीगुरु गोविंदसिंह सपत्नीक जंगलात भटकत चालले असता शेवटी त्यांची नि त्यांच्या त्या दोन मुलांची ताटातूट होअून ती लेकरे मुसलमानांच्या हाती पडली. त्या दुष्टांनी त्या दहा-बारा वर्षांच्या आतील लेकरांनाही 'तुम्ही अेकतर हिंदुधर्म सोडून मुसलमान व्हा, नाही तर आम्ही तुम्हाला भयंकर हाल करून मारून टाकू' अशी धमकावणी दिली. तेव्हा सिंहाच्या छाव्याप्रमाणे निर्भयपणे गर्जत त्यांनी हिंदुधर्माचा त्याग करण्याचे अमान्य करून 'आम्ही स्वधर्मार्थ मरण्यास सिद्ध आहोत' असे अुत्तर दिले. संक्रुद्ध मुसलमानी अधिकाऱ्यांनी शिक्षा दिली की, ''या काफराच्या मुलांना भिंतीत चिणून ठार मारा.'' अर्थात, त्या दोघां ताठ अुभे राहिलेल्या वीर कुमारांच्या भोवती विटांवर विटा रचून गळ्यापर्यंत चुनेरी पक्की भिंत अुभारण्यात आली आणि गळा दाबून प्राण घेणाऱ्या शेवटच्या शिळा ठेवण्याच्या आधी पुन्हा अेकदा विचारण्यात आले, ''अे काफर, हिंदुधर्म छोडते हो या नहीं?'' 'नहीं, नहीं, कदापि नही' दाबलेल्या आवाजात जितके अुंच गर्जता येअील तितक्या अुंच स्वरात ते दोन छावे हिंदुधर्माचा जयजयकार करीत असतानाच चुन्यामध्ये त्यांच्या मुखमस्तकांना गाडून टाकणाऱ्या शेवटच्या विटा मुस्लिम दैत्यांनी रचून टाकल्या.

हिंदु अितिहासातील हिंदुधर्मार्थ केलेल्या बलिदानाचे जे अमर भूषणास्पद प्रसंग आहेत त्यांतच गणना करण्यासारखा हाही प्रसंग आहे! शिखांच्या हृत्पटलावर तो प्रसंग जसा ज्या भाषेत रक्ताच्या रंगाने चित्रिला गेला आहे, असे त्यांनी लिहिलेल्या अितिहासात नि काव्यात आढळते. त्याचेच वर दिलेले संक्षिप्त वर्णन ही अेक पुसट छाया आहे. अितिहास या दृष्टीने ती क्रूर घटना सत्य आहे. पण ती वरील काव्याच्या रंगातच वर्णिलेली काय ती आढळते.

**कुमार हकीकतराय :** याच कालात कुमार हकीकतराय नावाच्या अेका हिंदु मुलाने शाळेतील पाटीपूजेच्या दिवशी देवीचे अेक चित्र पाटीवर काढले होते ते पाहता त्या घोर अपराधासाठी (?) मुस्लिम अधिकाऱ्यांनी त्या लहान मुलास मुसलमान होण्याची शिक्षा दिली. त्याने ती नाकारताच त्याला ठार मारण्याचा धाक दाखविण्यात आला. तोही

त्याने धाव्यावर बसविल्यामुळे आणि आपला हिंदुधर्म सोडण्याचे नाकारल्यामुळे त्यास ठार मारण्यात आले. त्या वीर हिंदुकुमाराची स्मृति हिंदुलोकांत पंजाबभर आजही प्रतिवर्षी अेखाद्या धार्मिक सणासारखी पाळली जाते.

**गुरू गोविंदांचा अंत :** गुरु गोविंदसिंहाच्या मुलांना वर अुल्लेख केल्याप्रमाणे ठार मारल्यानंतर पंजाबच्या रानावनात भटकत असता गुरु गोविंदाने औरंगजेबास अेक त्याची काहीशी मनधरणी करणारे पत्र लिहिले. राजकारणात हे डावपेच चालायचेच. बादशहानेही त्याचे अुत्तर दिले. शेवटी काही तडजोड होअून गुरु गोविंदसिंहाने पंजाब सोडून बाहेर जावे, असे काहीसे ठरले. तेव्हा गुरु गोविंदसिंह हिंडत हिंडत महाराष्ट्रात नांदेड येथे जाअून राहिले. तेथे त्यांचे कर्मचारी असणाऱ्या दोघा पठाण युवकांनी कट करून ते निजले असता त्यांच्यावर खड्ग चालविला. त्या झटापटीत जे प्राणघातक घाव गुरु गोविंदाला लागले त्यातच त्यांचा अंत झाला.

गुरु गोविंदसिंह ह्याचे लहानपण पंजाबात गेले नसून त्यांच्या सुरक्षिततेसाठी बिहारात पाटणा येथे व्यतीत झाले होते. त्यामुळे त्यांना तिकडील हिंदी भाषेचा लळा लागलेला होता, नि तीत त्यांनी पुढे विद्वताही संपादन केली होती. त्यांनी त्यांचे लिहिलेले 'विचित्र नाटक' या नावाचे आत्मवृत्त, हा महत्वाचा ग्रंथ, त्या हिंदीतच लिहिलेला आहे, गुरुमुखी म्हणजे पंजाबी भाषेत नव्हे. त्याने चंडिकेवरही अनेक वीररसपूर्ण कविता लिहिलेली आहे. प्रत्यक्ष 'खड्गाला' तर त्यांनी चंडिकेचे प्रतीक म्हणून गौरवून त्यावर अेक लहानसे स्तोत्र रचले आहे. त्याचे आमच्या अितर ग्रंथातूनही आम्ही वीररसप्लुत काही अुतारे 'जय तेगम्' (जय खड्गम) या मथळ्याखाली दिलेलेही आहेत. या दशम गुरुची म्हणजे वीर गुरु गोविंदसिंहाची वाणी हिंदीमध्ये असल्यामुळे आणि त्यांनी खालसा पंथाला दिलेली दीक्षाही नानक-परंपरानुगत शीख सनातन्यांना तितकीशी रुचत नसल्यामुळे सर्व शिखांचा मिळून मागे जो अुल्लेखिलेला आदिग्रंथ आहे त्या अीतर नअु गुरूंची वाणी अेकत्र केली असताही या दशम गुरु गोविंदसिंहाचे तेवढे ग्रंथ समाविष्ट केलेले नाहीत. या अंतर्गत कलहामुळेच खालसापंथाने 'दशम ग्रंथ' म्हणून गुरु गोविंदांची वाणी तेवढी अेकत्र केलेली आहे.

दुसरी अेक महत्त्वाची गोष्ट तेवढी हिंदुत्वदृष्टीने येथे सांगितली पाहिजे की खालसा पंथाच्या अुत्पत्तीमुळे शिखांत सहजधारी नि केशधारी असे दोन पंथ प्रचलित झालेले आहेत. सहजधारी हे केवल नानकपंथी आचार पाळतात. ते केस ठेवत नाहीत. अितर 'कक्के' ही पाळतातच असे नाही. सहस्रावधि हिंदु लोक, जे शीख-आचारही पाळतात ते, याच सहजधारी पंथात मोडतात. परंतु, हे ध्यानात ठेवले पाहिजे की, शिखांना वीरवृत्तीचे पोलादी रसायन पाजून जर कोणी त्यांना जिवंत, लढाअू नि पंजाबातील प्रबळ मुस्लिम सत्तेचेही शस्त्रबळाने पूर्ण अुच्चाटन करणारे हिंदु अुपराष्ट्र घडविले असेल तर ते श्री गुरु गोविंदसिंहानेच होय!

**श्री वीर बंदा बैरागी :** हिंदुराष्ट्राच्या अितिहासात अमर झालेल्या वीरात्म्यात आणि हुतात्म्यात ज्याचे नाव केव्हाही गाळता कामा नये तो पंजाबात अत्याचारी मुसलमानांवर हिंदूंचा सूड घेणारा पहिला प्रत्याचारी आणि नुसता पराक्रमीच नव्हे, तर प्रत्याक्रमी असा हिंदु पुरुष म्हटला म्हणजे वीर बंदाबैरागी हा होय! श्री गुरु गोविंदसिंह पंजाब सोडून गेल्यानतर महराष्ट्रात नांदेड येथे जेव्हा स्थायिक झाला तेव्हा तिकडे प्रख्यात असलेला जो अेक वैष्णव साधुबाबा बंदा बैरागी त्याची नि गुरु गोविंदाची अेकदा भेट झाली. पुढे हळूहळू गुरुने पंजाबमध्ये हिंदूंच्या अुडालेल्या दुर्दशेचे, मुसलमानी बलात्काराने चालविलेल्या हिंदूंच्या मुस्लिमीकरणाचे, गुरु गोविंदसिंहाच्या स्वत:च्या कुलावर कोसळलेल्या अनर्थाचे आणि त्यांनी स्वत: केलेल्या युद्धाचे मर्मभेदी वृत्त बैरागी बंदाला विवरून सांगितले. आपल्या चार पुत्रांचा जो सूड घेअील असा हिंदु पंजाबात कोणीच अुरला नाही, ही गुरु गोविंदसिंहाची दु:खद गाथा अैकून बैरागी बंदाचे रक्त तापून गेले. त्यांनी आपले पूर्वाश्रमीचे धनुष्य-बाण हाती घेतले. गुरु गोविंदसिंहाने आपल्या सर्व शिष्यांना चिट्ठी दिली की बंदाचे सर्वतोपरी साहाय्य करा. ती चिट्ठी घेअून हिंदूंवर केलेल्या अत्याचारांचा, मुसलमानांवरही तसेच प्रत्याचार करून, सूड घेण्याचा कृतनिश्चय केलेला हा हिंदु वीर पंजाबकडे गेला.

पण काय करावे? स्थलाभावासाठी आणि आता अधिक लिखाण लिहिणे आम्हाला कोणत्याही प्रकरणी अशक्य झाल्यामुळे जे काही लिहिले आहे त्याच्या समारोपापुरते लिहून आता हा ग्रंथ संपविणे भाग आहे. नाही तर बाबा बंदाने

मुसलमानांची पंजाबात अुडविलेली सेहोलपट, त्याने केलेला शिरच्छेद, मुसलमानांनी हिंदु स्त्रियांच्या केलेल्या विटंबनेचा घेतलेला जशास तसा सूड, ज्या सरहिंदला गुरु गोविंदसिंहाचे लहान दोन पुत्र मुसलमानी भिंतीत चिणून मारले, त्या सरहिंद नगराला जिंकून घेअून त्यातील मुसलमानी वस्ती जाळून टाकून मुसलमानी सरदारांच्या बायकामुलांसुद्धा भर अुन्हात अनवाणी काढविलेल्या धिंडी, आणि मुसलमानांनी स्वधर्म न सोडण्यासाठी हिंदूंचे केले होते तसेच मुसलमानांचेही केलेले असह्य छळ, ह्यांचे आणि साऱ्या पंजाबात हिंदु-राजसत्तेची त्याने पिटलेली यशस्वी ग्वाही याचे संक्षिप्त वर्णन तरी आम्ही केलेच असते. ह्या ग्रंथाच्या पूर्वार्धात प्रकरण सहामध्ये हिंदूंनीही तुरळक प्रसंगी मुसलमानांवर धार्मिक स्वरूपाच्या केलेल्या प्रत्याचारांनी मुसलमान समाजाचाही भयाने कसा थरकाप अुडे, ते दाखविलेच आहे. बाबा बंदानेही पंजाबात तशाच प्रत्याचारांनी मुसलमानांचा थरकाप अुडविला. शेवटी दिल्लीच्या बादशहाने पंजाबवर मोठे सैन्य धाडले. वृकयुद्धाच्या (गनिमी काव्याच्या) पद्धतीने वीर बंदाच्या सैन्यपथकांनी त्या मुसलमानी सैन्याचा अनेक ठिकाणी पराजय केला. पण या धुमाकुळीत वीर बंदा बैरागी स्वतःला हिंदूंचा सेनापती असे जे म्हणवी त्याचे 'खालसा' पंथातील शीख लढवय्यांना मोठे वैषम्य वाटू लागले. ते वाढता वाढता वीरबंदाने अेकत्रित केलेल्या हिंदूंच्या सैन्यात फाटाफूट होअून खालसा पंथाचे शीख त्या प्रतापी सेनानीला वीर बंदा बैराग्याला सोडून गेले. पण त्या अेकट्या खालसा पंथात काही मुसलमानांना जिंकण्याची धमक नव्हती. त्यामुळे, मोगलांच्या सैन्याचे बळ वाढून अेका निकराच्या लढाअीत तो पराक्रमी सेनानी वीर बंदा बैरागी, त्याच्या अेकुलत्या पुत्रासह आणि निकटच्या सहकाऱ्यांसह मुसलमानांच्या हातात सापडला. वीर बंदाच्या अंगात काही अद्‌भुत जादू भरलेली आहे अशी भाबडी भीती बहुतेक मुसलमानांत भेदरवीत असे. बंदा वीराला पकडून बेड्या ठोकल्या तरी या जादूने वेळी-अवेळी मांजर बनून भरसैन्यातून निसटून जातो अशी समजसुद्धा मोठमोठ्या मुस्लिम अधिकाऱ्यांची झालेली असे. त्यामुळे, त्या जादूपायी पहाता-पाहता तो पळून जाअील या भीतीने भलामोठा लोखंडी पिंजरा करून त्यात त्यास अितर अनेक पाडाव केलेल्या हिंदू बंदिवानांसह कोंडून मोठ्या मुस्लिम सैनिक पथकासह दिल्लीस धाडून देण्यात आले. दिल्लीला त्याला बादशहासमोर जेव्हा आणण्यात आले तेव्हाचा तो भयंकर प्रसंग!! वीर बंदा, त्याचा अेकुलता अेक लहानसा पुत्र आणि त्याचे शंभर अेक शिष्य यांचे, ते हिंदुधर्म सोडीनात म्हणून झालेले असह्य छळ नि हत्या, ते वाहिलेले रक्ताचे पाट! बंदा वीराला तर शिरच्छेद न करता केवळ छळापायी ठार मारण्याच्या हेतूने लाल लाल तापलेल्या सांडसाने भोसकून भोसकून त्याच्या शरीरातील मांसाचे अुपसलेले लचके! हे सर्व अघोर वर्णन करण्यास येथे स्थळ नाही; पण प्रत्येक कृतज्ञ नि अभ्यासू हिंदूने ते वर्णन शिखांच्या आणि स्वतः मुसलमानांच्या तत्कालीन लिहिलेल्या ग्रंथातून आहे तितके तरी अवश्य वाचावे!

आम्ही लिहिला होता तो शिखांचा अितिहास : आम्हाला दुःख वाटते की, आम्ही लिहिलेल्या शिखांच्या अितिहासातूनच ते वाचावे, असे आज आम्हास सांगता येत नाही. त्याचे कारणही येथे थोडक्यात सांगितले पाहिजे. अिंग्लंडमधून साधारणतः सन १९०९ मध्ये राज्यक्रांतीच्या अुलाढालीत आम्ही फ्रान्समध्ये जेव्हा गेलो तेव्हा श्रीमती मॅडम कामा यांच्या घरी अेक दोन महिने होतो. तेवढ्या वेळात आमच्यापाशी संग्रहिलेल्या साधनांना अुपयोजून आम्ही शिखांचा दोनशेअेक पानांचा साधार नि रक्त सळसळविणारा अितिहास मराठीत लिहिलेला होता. वाङ्मयातील अगदी प्रथम लिहिलेले पुस्तक म्हणून जे समजले जाते त्या 'भाअी बाळाकी जनमसखी' म्हणजे गुरु नानकाच्या प्रत्यक्ष जीवनाची भाअी बाळा नावाच्या शिष्याने लिहिलेली गाथा ह्या पुस्तकापासून तो दशम गुरुच्या दशमग्रंथापर्यंत बहुतेक मूळ लिखाणांचा अभ्यास केलेला होता. शिखांचा कनिंगहॅम प्रभृति अिंग्रजी अितिहास तर वाचलेलेच होते. महाराजा रणजितसिंगाने पंजाबातून मुसलमानांचे राज्य अुखडून देअून जे शतद्रु (सतलज) ते सिंधुपर्यंत आणि वर जम्मू-काश्मीरपर्यंत विस्तारलेले नवे हिंदुराज्य स्थापले आणि जयपाल नि अनंगपाल यांच्या प्राचीन पराभवांचा सूड अुगविला, त्या महाराज्याच्या स्थापनेपर्यंतचा वृतांत आमच्या ग्रंथात आम्ही आणलेला होता. पण आम्हास आजही ही गोष्ट मनात बोचत आहे की, त्या अितिहासाचे ते हस्तलिखित बहुधा अिंग्रजांच्या हातात पडून आज नष्ट झालेले असावे! नाहीतर ज्याच्या हाती आम्ही ते लिखाण छापण्यासाठी गुप्तपणे हिंदुस्थानात धाडले होते त्यांनी येता

येता अिंग्लश आरक्षकांच्या (पोलिसांच्या) झडतीच्या भीतीने ते समुद्रास्तृप्यंतु केलेले असावे! अर्थातच, तो आमचा मराठी ग्रंथ प्रकाशित होण्याचे आधीच लुप्त झालेला आहे. नष्टच झालेला आहे.!!

तरीही, ज्याला श्री. बंदा वीराच्या नि त्याच्या त्या हिंदु सैनिक पथकाच्या अमर हौतात्म्याची ती भीषण कथा वाचावयाची असेल त्याने आमची त्या प्रसंगावरची अंदमानात लिहिलेली जी अेक कविता आजही अुपलब्ध आहे, ती तरी वाचावी.

वीर बंदाच्या शिष्यांमधील आख्यायिकेप्रमाणे बंदा वीराला तो मेला असे समजून, शेवटी, त्याचा देह त्या मुस्लिम राक्षसांनी अेका अुकिरड्यावर दिल्लीबाहेर फेकून दिलेला होता. पण, त्याच्या काही शिष्यांनी अद्‌भुत वनस्पती त्यास खावविल्यामुळे तो शुद्धीवर आला आणि त्या शिष्यांनी त्यास लगोलग गुप्तपणेच पंजाबात नेले. पुढे त्याचे अेक गुरुपीठच स्थापन झाले आणि शेकडो शीख त्याचे अनुयायी म्हणून ‘बंदअी’ या नावाने ते गुरुपीठ बंदा वीराच्या वंशाकडे अजूनही नांदवीत आहेत. पुढील रामसिंग गुरुंच्या कुका शीख संप्रदायाप्रमाणेच ते स्वत:ला कट्टर हिंदू समजतात.

बंदा वीराच्या मृत्यूनंतर खालसा शिखातील आणि खालसा या अुपपंथाच्या बंदअी, सहस्रधारी अित्यादी अितर शिखांतील कोणाही शीख संप्रदायाचे पंजाबात राजकीय आणि सैनिक बळ असे काही वर्षे अुरले नाही. जिकडे तिकडे फाटाफूट! परंतु, अुलटपक्षी बंदा वीरापर्यंत लढता-लढता मुसलमानांचीही राजकीय सत्ता मोडकळीसच आल्यासारखी झाली होती. दिल्लीसही तीच स्थिती होती. परंतु साऱ्या हिंदुस्थानात त्या वेळी बळावत चाललेल्या हिंदूंच्या नव्या धुरंधर शक्तीची-मराठ्यांची-सैनिक नि राजकीय महत्त्वाकांक्षा मात्र बळावत चालली होती. मात्र, प्रत्यक्ष दिल्लीहून पंजाब ते मुलतान, काश्मीर, कंदाहार प्रांतापर्यंत मोगल बादशाही नावापुरती तेवढी अुरलेली होती. ठिकठिकाणचे पुण्डगुण्ह आपापल्या टोळ्यांसह पुंडाअी तेवढी माजवीत होते.

त्यानंतर, शिखांच्या सत्तेची वाढ कशी कशी होत गेली आणि शेवटी, महाराजा रणजितसिंगाच्या पंजाव ते काश्मीरपर्यंतच्या साऱ्या प्रांतांत मुसलमानी राज्याचा अंत होअून हिंदु स्वातंत्र्याचा पुनरुदय कसा झाला, ते सर्व वृत्त याच स्थळी नुसते सूचित करणे काय ते शक्य आहे. कारण या ‘समीक्षक ग्रंथा’ चा जो संकल्पित काळ आहे त्यापुढील काळात त्या अैतिहासिक घटना घडत आहेत.

तथापि, दोन-तीन विधेये मात्र या पंजाबी अितिहासातील काळाविषयी येथे सूत्ररूपाने काय ती सांगणे शक्य आहे नि अवश्यही आहे.

(अ) पंजाबमधील मुसलमानांची राजसत्ता अुलथून टाकून त्याला स्वतंत्र करण्याचा पहिला यशस्वी प्रयत्न मराठ्यांनी केला. शिखांच्या अितिहासात काय किंवा अेकंदर अुथळपणे लिहिलेल्या भारतीय अितिहासातून काय, शिखांनी पंजाबातून मुसलमानी सत्ता प्रथमत: अुखडून दिली असा जो ढिला समज प्रचलित आहे तो चुकीचा आहे. शिखांची राजसत्ता जेव्हा अगदी अुत्कर्षास पोचली होती तेव्हाही, ते शेजारच्या दिल्लीलासुद्धा पूर्णपणे जिंकून घेअू शकले नाहीत, हे निक्षून सांगण्यात शिखांचा अुणेपणा दाखविण्याचा मुळीच अुद्देश नाही. पण, मराठ्यांच्या खऱ्या राष्ट्रीय पराक्रमाला खोट्या बढाया मारून अुणेपणा आणू पाहणाऱ्या निंदकांची तोंडे तेवढी बंद करण्याचा हेतू आहे. पंजाबातल्या पंजाबात तरी मुसलमानी बादशाही अुलथून पाडून महाराणा राणजितसिंगाच्या राज्यासारखे स्वतंत्र हिंदुराज्य स्थापण्याचे श्रेय अेकंदरीत मुख्यत्वेकरून आमच्या शिख संघटनेलाच आहे हे निर्विवाद. पण पुण्याहून निघून खाली तंजावरपर्यंत आणि वर सिंधु नि सिंधुच्याही पलीकडे हिंदुराष्ट्राचा लढता नि चढता ध्वज नेअून रोवणाऱ्या आणि दिल्लीच्या मुस्लिम बादशहाला तथाकथित बादशहा करून सोडणाऱ्या मराठ्यांच्या प्रचंड पराक्रमाला त्या सात शतकांच्या कालखंडाच्या हिंदु-अितिहासात तरी तोंड नाही, हेही पण निर्विवादच आहे!

**(आ) नेपाळचे स्वतंत्र हिंदुराज्य :** आपल्याकडे लिहिल्या गेलेल्या बहुतेक भारतीय म्हणविणाऱ्या अितिहासग्रंथातून किंवा शालेय पुस्तकांतून अितर सर्व भारतीय प्रदेशांचा अुल्लेख असतो. पण आश्चर्य असे की, नेपाळच्या प्रदेशाचा नि तेथील शूर हिंदुराज्याचा नावापुरता सुद्धा अुल्लेख नसतो. जणू काय नेपाळ हा भारतीय हिंदुराष्ट्राचा कोणीच लागत नाही! पण वस्तुत: जितका महाराष्ट्र, पंजाब किंवा मद्रास हे प्रदेश हिंदुराष्ट्राचे अविच्छेदनीय अंश आहेत तितकाच नेपाळ हाही अविच्छेदनीय अंशच आहे. या प्रांताच्या किंवा अुपप्रांताच्या राजसत्ता प्रसंगी निरनिराळ्या असतील; परंतु राष्ट्र असे, हे

सर्व अुपभाग ह्या हिंदुराष्ट्राचेच अंगभूत आहेत, हिंदुराष्ट्राशी ते अेकजीव झालेले आहेत. हिंदुस्थानातील अितर प्रांतांवर आशियातील मुसलमानांची आणि युरोपियन म्लेंच्छांची त्या गेल्या नअू-दहा शतकांत अनेक आक्रमणे आणि सतत युद्धे झाली, पण सुदैवाने नेपाळमध्ये मात्र त्या म्लेंच्छांचा राजकीय किंवा धार्मिक स्वरूपाचा तितका अुपद्रव होअू शकला नाही. अेकंदरीत हिंदुधर्म नि हिंदुस्वातंत्र्य, म्लेंच्छांचे तसले अुपद्रव हाणून पाडून नेपाळमध्ये स्वतंत्रपणे नांदू शकले. ह्यामुळे खरे म्हटले असता, हिंदुराष्ट्राचा नेपाळ हा भाग अेक अुत्तमांशच समजला गेला पाहिजे. आणि आपल्या हिंदुराष्ट्राच्या अितिहासात नेपाळला मानाचा नि प्रतिष्ठेचा पहिला प्रणाम केला गेला पाहिजे! पण वस्तुत: आपल्या विवेकशून्यतेमुळे परिणाम अुलटाच झालेला आहे. आमच्या अितर भारतीय प्रांतातील पारतंत्र्याच्या चिखलात नेपाळ रुतला गेला नाही, त्याचा ह्या अुलाढालीशी संबंध आला नाही; म्हणूनच, आपल्या ह्या अुथळ भारतीय अितिहासग्रंथात नेपाळचे नावही चुकतमाकतच येते किंवा येतच नाही!

हा स्वाभिमानशून्य विपर्यास निरस्त करण्यासाठी आम्ही नेपाळच्या आंदोलनाची अेक हिंदुसंघटित स्वतंत्र चळवळच सन १९२४ त अंदमानहून सुटताच हिंदुस्थानभर चालविली होती, हे प्रसिद्धच आहे. त्याच वेळी 'नेपाळी आंदोलनाचा अितिहास' हे स्वतंत्र पुस्तकही आम्ही लिहिले आहे आणि त्यात नेपाळच्या पराक्रमी अितिहासाचे आणि त्यांनी केलेल्या अखंड नि यशस्वी हिंदुस्वातंत्र्य संरक्षणाचे वृत्त दिलेलेच आहे. ह्या समीक्षणात्मक ग्रंथात मात्र स्थलाभावी ते वृत्त देण्याची शक्यता आता अुरली नाही. आवश्यकताही तितकीशी नाही. गेल्या दहा शतकांच्या प्रारंभी, नेपाळात, प्रथम आमच्या नेवारी हिंदूंचे राज्य होते. त्यानंतर जिकडेतिकडे राजपुतान्यांतून मुस्लिमांच्या अुपद्रवाने जे पराक्रमी राजपुरुष मेवाडातून अितरत्र भाग्योदय करण्यास निघून गेले त्यातीलच अेक पराक्रमी राजपूत नेता आपल्या अनुयायांसह हिमालयाच्या नेपाळकडच्या प्रांतात शिरला. त्याने अेक छोटेसे स्वतंत्र हिंदुराज्य स्थापले. पुढे, होता होता, ह्या राजपुतांनी काटमांडूपर्यंत प्रदेश व्यापला नि ते नगर आपली राजधानी केली. ते प्रबळ हिंदुराज्य त्यांनी स्थापन केले तेच आजचे हे नेपाळी राज्य होय. भारतीयांचे चित्त नेपाळच्या महत्त्वाकडे आणि हिंदुराष्ट्राचे नेपाळातील हिंदूंशी असलेल्या अेकात्मतेच्या नि अेकजीवित्वाच्या नात्याकडे वेधण्यासाठी अितका काय तो नेपाळच्या अितिहासाचा नामोल्लेख अिथे पुरे आहे! हे राजपुत कट्टर गोरक्षक असल्यामुळे त्यांना हळूहळू गोरखा हेच जातिवाचक नाव पडले.

येथे कालक्रमाने, पुढचे असले तरी, हेही सांगून टाकतो की, भारतावर अिंग्रजांचे राज्य असताना सर्व जगात जे सहस्रावधि गुरखा सैनिक अिंग्रजांच्या सैन्यात सेवेस राहिलेले होते त्यांनी युरोपातील दोन्ही महायुद्धांमध्ये शौर्य गाजविले आणि अिंग्लंडातील, अमेरिकेतील आणि जर्मनीतीलही अुत्कृष्ट सैनिकांना चकित करावे असे सैनिक नैपुण्य नि पराक्रम दाखविला. त्यामुळे, आज साऱ्या जगात गुरखा सैनिक म्हणजे अुत्कृष्ट सैनिक अशी म्हणच पडल्यासारखे झाले आहे.

**(अि) अकबराचे अुत्तरजीवन -** अकबराने त्याच्या पूर्वजीवनात हिंदुधर्माचा नि राज्यांचा अुच्छेद करण्यासाठी जी क्रूरता नि जे अत्याचार केले त्याचे वर या ग्रंथातच केलेले अगदी संक्षिप्त अुल्लेखसुद्धा हे सिद्ध करावयास पुरेसे आहेत की, राक्षसी धर्मवेडाने नि हिंदुद्वेषाने अकबरही तितकाच पछाडलेला होता, जितका अेखादा अल्लाअुद्दिन वा औरंगजेब पिसाळलेला होता.

अकबर हा अितर मोंगल किंवा मुस्लिम आततायींप्रमाणे नव्हता, तर तो हिंदुधर्माचा द्वेष न करणारा, न्यायप्रिय, हिंदु किंवा मुसलमान असा क्षुद्र भेदाभेद न मानणारा समतेने राज्यकारभार चालविणारा, असा अेक थोर मोंगल बादशहा होअून गेला आणि म्हणून हिंदु लोकांनी त्याच्याविषयी अपार आदर नि कृतज्ञता मानली पाहिजे, असा युरोपियनांनी नि हिंदु लोकांनी लिहिलेल्या आजपर्यंतच्या अितिहास ग्रंथातून अेकसुराने अकबराविषयी जो जयघोष सतत चालत आला आहे तो केवळ परकीय अितिहासकारांनी मायावीपणे आणि स्वकीयांनी दास्यप्रवण लांगूलचालक नि विवेकशून्यरीतीने चालविलेला आहे. आम्हा हिंदूंना अेकतर आदर, पूज्यभाव, राणा प्रतापाशी दाखविता येअील किंवा त्याचा शत्रू जो अकबर त्याच्याशी दाखविता येअील. आम्हाला त्या दोघांचे सारखेच ममत्व कसे मानता येअील? देवाची आणि दैत्याचीही पूजा अेकत्रच कशी बांधता येअील? राणा प्रतापसारख्या हिंदुराजाचे स्वातंत्र्य हिरावून त्यांच्यावर आपल्या दास्याचे जोखड

बळाने लादणारा आणि हिंदुधर्माचा मानभंग करण्यासाठी त्या हिंदुराजांनी आपल्या मुलीसुद्धा मला दिल्या पाहिजेत, माझ्या जनानखान्यात कोंबल्या पाहिजेत, अशा अुघडअुघड अत्याचारी मागण्या करून त्यांचा क्रूर अुच्छेद करणारा धर्मांध मुस्लिम अकबर कुठे आणि आपल्या हिंदुराष्ट्राचे राज्याचे आणि धर्माचे रक्षणार्थ लढत लढत प्राणत्याग करणारे आमचे राणाप्रताप, राणी दुर्गावती यांच्यासारखे सहस्रावधि हुतात्मे आणि वीरात्मे कुठे !

दुसरेही महत्त्वाचे विधेय (Point) आमच्या भाबड्या नि लांगूलचालक बुहतेक हिंदु लेखकांच्या अद्याप ध्यानात आलेले नाही, ते हे की, अकबर हा सर्व प्रजाजनांना समतेने वागविणारा आणि अेकंदर मनुष्यामात्रातील समतेचा मोठा पुरस्कर्ता बादशहा होअून गेला, असे जे ते शाळेतूनसुद्धा शिकवितात तेही अगदी अतथ्य आहे. मुसलमानांची वाह्यात स्तुती करण्याच्या खोडीचा तो परिणाम आहे. कारण, अकबर हा मोंगल सम्राट होता. मोंगल साम्राज्याचा जो जो दास होणार नाही त्याचा त्याचा कूरपणेसुद्धा नायनाट करण्यास तो कचरत नसे, मग तो मुसलमान का असेना. आता सारे मुसलमान काही मोंगल नव्हते. अुलट अफगाण नि तुर्क सुलतानांच्या हिंदुस्थानात असलेल्या सुलतानशाह्याच अकबराने विनाशून मोंगल बादशाही वाढविली. त्यामुळे, ते मोगलांचा कट्टरपणे द्वेष करीत. म्हणजे हिंदुराज्याच्या विरूद्धच नव्हे, तर अकबर हा त्याच्या स्वतःच्या मोंगल बादशाहीकरता अितर कोणत्याही वैयक्तिक महत्त्वाकांक्षी बादशहाप्रमाणे लढत होता. राज्य विस्तारित होता. अर्थात् तो सर्व मुसलमानांनासुद्धा समतेने वागवीत नव्हता. अनेक मुसलमानांची राज्येसुद्धा त्याने बुडविली, तुडविली. केवळ स्वतःची अेकट्याची बादशाही टिकावी ह्याच अुद्देशाने काय ते अकबराने त्याच्या अुत्तरजीवनात हिंदूंवर जिझियासारखे अगदी अुत्क्षोभक धार्मिक कर लादले नाहीत किंवा सशस्त्र लाखो हिंदूंना सरसकट मुसलमान करण्याची अभियाने (मोहिमा) काढली नाहीत. हिंदु मुसलमानांना समतेने वागवावे हा त्यामागे मुख्य अुद्देश मुळीच नव्हता. पण, हिंदूंवर असे प्रत्यक्ष धार्मिक अत्याचार जेव्हा जेव्हा मुसलमानी सुलतानांनी मागे केले तेव्हा तेव्हा त्यांचे झालेले भयंकर परिणाम त्याच्या डोळ्यांसमोर होते. तशा प्रपीडक नि धर्मांध मुस्लिम सुलतानशाह्याच्या शाह्याच केव्हा केव्हा हिंदू असंतोषाच्या आगीत भस्म झाल्या होत्या! ह्यासाठी, अकबराने त्याच्या अुत्तरजीवनात त्याची ती जवळजवळ साऱ्या अुत्तर हिंदुस्थानवरची स्वतःची अेकट्याची बादशाही शांतपणे नांदावी म्हणून, हिंदु काय-मुसलमान काय, अशा अेकंदर प्रजेस, कर, वैयक्तिक न्याय अित्यादी प्रकरणी अेखाद्या औरंगजेबापेक्षा पुष्कळ अधिक सौम्यपणे नि निरुपद्रवीपणाने वागविले. हिंदु-मुसलमानांच्या धर्मनिरपेक्षी अेकात्मतेच्या आणि समतेच्या भावनेने नव्हे, किंवा मनुष्यमात्राच्या स्वतंत्रतेला आदरण्यासाठीही नव्हे ! किंवा हिंदुधर्म हा 'काफरधर्म' होता अशी त्यांची अंतर्गत भावना नव्हती म्हणून तर नव्हेच नव्हे !

पण अैहिक राजसत्तेत स्वतः सर्वसत्ताधीश, सम्राट, अगदी अरेराव झाल्यानंतर अकबराची दुर्दम्य महत्त्वाकांक्षा त्याहीपुढे धाव घेअू लागली. लोकांचा अैहिक सम्राट झालो, पण पारलौकिक मीच आहे, मी जगाचा पैगंबरही झालो पाहिजे, हीही अिच्छा त्याच्या मनात जागृत झाली. त्या दृष्टीने त्याने 'दीने अिलाही' नावाचा अेक हिंदु नि मुसलमान या दोन्ही धर्मांहून वेगळा असा धर्म काढण्याचा घाट घातला. पण त्यातही, ध्यानात ठेवण्यासारखे असे की, हिंदूंना मागच्या मुस्लिम सुलतानांनी किंवा पुढे औरंगजेबाने जसे बलात्काराने मुसलमान बनविले तसे करणे अशक्य वाटून कारस्थानाने अकबराने या दीने अिलाहीद्वारे दिंहुधर्माचा अुच्छेद करण्याचाच प्रयत्न केला. कारण या धर्माचा मुख्य 'पैगंबर' अकबर हाच मानावा लागे. नुसते जयगोपाळ तर सोडाच, पण नमस्कार म्हणूनही भागत नसे, तर त्या अकबरी धर्मात गेलेल्या हिंदूंना प्रथम वंदनेतच 'अल्ला हो अकबर' असेच म्हणावे लागे! त्या धर्माची भाषाही पर्शियन अरेबिकच होती. अेकंदरीत अितके सांगणे पुरे आहे की, अकबराची मनुष्यजातीचा पारलौकिक सम्राट बनण्याची ही सवाअी शेख महंमदी महत्त्वाकांक्षाही धुळीस मिळाली. कारण, त्याच्या या नव्या धर्मात आधी कोणी फारसे हिंदू-मुसलमान गेलेच नाहीत; आणि जे तोंडपुजेपणापुरते अकबराचा धर्म मानीत तेही अकबर मरताच कुठच्या कुठे बेपत्ता झाले !

तथापि, त्या काळच्या जगतामध्ये जे जे थोर बादशाह, सम्राट, राज्यकर्ते युरोपात, आफ्रिकेत वा आशियात होअून गेले, त्यामध्ये, अेवढा कारस्थानी, नियंत्रक, पराक्रमी, साम्राज्याचा विजेता नि नियंता, विद्येचा, कलाकौशल्याचा भोक्ता, काही अितिहासकारांच्या मताप्रमाणे ज्याला स्वतः अेक अक्षरही लिहिता-वाचता येत नव्हते, पण ज्याने मोठमोठ्या

ग्रंथकारांना पदरी बाळगून नामांकित ग्रंथांची रचना करविली असा अकबर हाही अेक थोर बादशहा होअून गेला अितकी त्याची सापेक्ष स्तुती अितिहास करू शकेल. तो जितका मोठा होता तितका त्याला आम्हीही मोठा म्हणतो; पण त्यापुढे जाअून आम्हा हिंदूंच्या दृष्टीने तो परकीय, परधर्मीय, अत्याचारी नि अधम होता, यासाठी आम्हा हिंदूंनी त्याचा धिक्कारही केला पाहिजे.

# प्रकरण ९ वे

# आले! मुसलमानी राजसत्तेचे कर्दनकाळ मराठे आले!

वस्तुतः अितिहास म्हटला म्हणजे तो घडल्या घटनांचा अगदी हडकुळ्या गद्यासारख्या रोकड्या नि रुक्ष भाषेत सांगितला गेला पाहिजे, अशी सर्वसाधारण समज आहे. ती बहुतांशी सत्यही आहे. जे केवळ काल्पनिक नि काव्यमय आणि जे केवळ घटित नि अक्षरशः घडलेले त्याचे वर्णन हे भिन्नभिन्न प्रकारचे असलेच पाहिजे. त्याचे अुत्कृष्ट व्यक्तीकरण सालंकृत काव्य किंवा हडकुळे कथन ह्या भाषा-प्रकारानेच होअू शकते. केवळ घटनांचे संवत देणे, अमुक मनुष्य मेला, अमुक जन्मला, अमकी लढाअी झाली, ह्या 'संवतात' मोठे अवर्षण (दुष्काळ) पडले अित्यादी नुसत्या घटितांचे - घटनांचे रोकडे टिपण हा अितिहासाचा मूलाधार असला तरी ते टिपण म्हणजेच काही अितिहास नव्हे. त्याला संवतावली (सनावली) म्हणता येअील परंतु निर्भेळ अितिहासात आणि काव्यातही काही प्रदेश असा असतो की, तो अितिहास नि काव्य यांच्या संयुक्त मिश्रणानेच यथार्थपणे व्यक्तविला जाअू शकतो त्यावाचून त्या प्रसंगाच्या वर्णनाला जिवंतपणाच येत नाही. अशा प्रसंगी, अितिहास हा अकस्मात आपण होअूनच काव्यमय होतो. अशा प्रसंगी अगदी पुराणातील अद्‌भुत रूपकांचा, दैविक वर्णनशैलीचा अवलंब केल्यावाचून त्या घटनांचे अलौकिकत्व यथाप्रमाण असा रसरशीतपणे रंगविले जातच नाही. मनुष्याला साध्या घटना जशाच्या तशा गद्य भाषेत सांगता येतात. पण मनुष्याची प्रकृती नि स्वभावच असा घडविला गेला आहे की, अुत्कट, भव्य, दिव्य, अलौकिक अशा कोणत्याही भावनांना रसरसून सोडणारी घटना, ती अगदी यथावत्‌ घटना असली तरी, साध्या शब्दांत, रुक्ष गद्यात, सांगवतच नाही. त्यातं ती मावतच नाही. तेव्हाच तर मनुष्य अकस्मात खदखदून हसतो, कळवळून रडतो, आनंदाने नाचतो, संतापाने खवळून जातो, म्हणजेच अुत्कट भावनेच्या भाषेतच तो बोलू लागतो. अशा अुत्कट भावनेची नैसर्गिक भाषा म्हणजेच काव्य! मग ते प्रसंगी गद्यातही असू शकेल. अुपमा, अुत्प्रेक्षा रूपके अित्यादी अलंकार आभूषणांनी अेखाद्या राजराजेश्वरासारखें ते गद्यही बहुधा विनटलेले असते.

**'निषादविद्धाण्डजदर्शनोत्थः श्लोकत्वमापद्यत**
**यस्य शोकः ।।'**

ही त्या आद्य कवीची साक्ष नाही का की, मूळ शोकाचा, काव्याचा, जन्मच मुळी साध्या शब्दात न मावणाऱ्या अत्युत्कट भावनेत झाला!

पण अैतिहासिक, अलौकिक घटनांच्या भावनात्मक वर्णनात ही अेवढी सावधानता मात्र अवश्य पाळली पाहिजे की, त्यायोगे त्या मूळ घटितांचे स्वरूपच विकृत न झाले पाहिजे. साधार अितिहासाचे स्वरूप त्या यथोचित भावनात्मक आरशातूनही स्पष्ट दिसले पाहिजे.

ज्या भारतीय अितिहासाच्या काळाविषयी ह्या ग्रंथात आपणांस आता चर्चा करावयाची आहे तो काळही हिंदुराष्ट्राच्या दृष्टीने अशा काही अलौकिक, हृदय हलवून सोडणाऱ्या घटितानी बहरलेला आहे की, त्यांना वर्णिताना भावनांची काव्यमय भाषाच काय ती जिवंतपणे नि यथार्थपणे त्यांचे व्यक्तीकरण करू शकेल!

ह्या ग्रंथाच्या गेल्या आठव्या प्रकरणात हिंदू-मुसलमानांचे सहा शतके चाललेले महायुद्ध साधारणतः अिसवी सन सोळावे शतक अुलटून जाअून सतराव्या शतकांत प्रवेशले होते, पण ती शतके अुलटून गेली तरी साऱ्या आशियातील अरब, अफगाण, पठाण, तुर्क, मोंगल अित्यादी साऱ्या मुसलमान जातींच्या त्या भीषण धार्मिक - राजकीय आक्रमणांनी वारंवार जर्जर झाले असताही हिंदुराष्ट्र त्या सतराव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत अुत्तरेत काय किंवा दक्षिणेत काय नामशेष झाले नव्हते! नव्हे, तर रणांगणातच घायाळ स्थितीत काय होअीना, पण झुंजत रहिले होते! अुलट सन सातशेपासून तो सन १६०५ मध्ये अकबर मरेतोपर्यंतची ही दहा शतके हिंदु राष्ट्राशी सारखे झुंजता- झुंजता साऱ्या आशियातील वरील शत्रुपक्षिय मुस्लिम राष्ट्रांचेच आक्रमक बळ क्षीण होत चालले होते. आम्ही प्रकरण सहामध्ये भारतभर पसरू पाहणाऱ्या 'मुसलमान सत्तेच्या

अितीश्रीची अथश्री' या मथळ्याखाली अुल्लेखिलेली ती अथश्री अिसवी सनाच्या चौदाव्या शतकापासूनच कशी होत चालली होती आणि विजयनगरसारख्या विजयशाली नवनव्या हिंदुराज्यांची स्थापना होण्याची शक्यता कशी निर्माण होत चालली होती, हे सत्य वर दाखविलेच आहे.

हिंदूंचे तेच पुनरुज्जीवन सामर्थ्य वाढत जाता जाता शेवटी आम्ही आता ज्या अिसवी सनाच्या सतराव्या शतकाला पोचलो आहोत त्या क्षणास हिंदूंच्या त्या वर्धिष्णु सामर्थ्याचे धुरंधरत्व अंतिमतः यच्चयावत् भारतभर जो करू शकेल असा अेक अपूर्व नि अलौकिक हिंदुवंश अितिहासगर्भ पौराणिक भाषेतच बोलावयाचे तर प्रादुर्भवण्याची भारताच्या अधिष्ठात्री देवतेलाच निकड लागली! प्राचीनकाळी शक-हूणादि म्लेच्छांचा निःपात करण्याची अशीच निकड भारतच्या अधिष्ठात्री देवतेला जेव्हा लागली तेव्हा तिने अबू पहाडावर अेक महायज्ञ करून चार भारतीय वीर पुरुष निर्माण केल्याचे चांदभाट आपल्या महाकाव्यात 'अग्निकुलाची कथा' या कथेत सांगतात. परंतु दुर्दैवाने ह्या, आम्ही, ज्या कालाविषयी लिहितो आहो त्या, सन सतराव्या शतकाच्या, काळात भारतावर गुदरलेल्या हिंदू-मुस्लिम महायुद्धात मुस्लिम राजसत्तेच्या समूळ अुच्छेदनासाठी केवळ चार दैवी वीर पुरुष अुत्पन्न करून भागण्यासारखे नव्हते. त्या कार्यासाठी अेक दैवी वीर पुरुषांची जातीची जाति अुत्पन्न करावयास हवी होती. यास्तव महाकवी चांदभाटाच्या पौराणिक पण अितिहासगर्भ रूपकातच बोलावयाचे म्हणजे भारताच्या अधिष्ठात्री देवतेने साऱ्या भरतखंडावर दृष्टि टाकली. दहा शतकांवर चाललेल्या या हिंदु-मुसिल्म महायुदधाचा अेकदाचा अंत करून मुस्लिमांच्या राजसत्तेचे अंतिम निर्दालन करून टाकण्यास बहुतांशी समर्थ अशी हिंदु राष्ट्रवीरांची जातीचीजातिच अुत्पन्न करण्यास जाज्वल्य यज्ञभूमि ती हीच होय, अशा कार्यास अबूचे ते लहानसे यज्ञकुंड कसे पुरणार, असे मनात आणून त्या भारताच्या संक्रुद्ध अधिष्ठात्री देवतेने मंत्रोदकाचे सिंचन दक्षिणेत सह्याद्रीवरच केले! आणि अकस्मात सह्याद्री पर्वतचा पर्वत पेटून अुठला! अग्निकल्लोळावर अग्निकल्लोळ भडकत चालले! आणि त्यातून शतावधि-सहस्रावधि- लक्षावधि सशस्त्र वीर पुरुषांचे समूहचे समूह, जातीची जाती, राष्ट्रकूलचे राष्ट्रकूल प्रादुर्भवले! त्यातील ज्याने त्याने त्या ज्वालांच्या मालिकांतूनच अेकेक ज्वाला अुपटून, तिचाच आपल्या हातात भगवा ध्वज करून, मुसलमानी राजसत्तेच्या समूळ निर्दालनासाठी ते साऱ्या भारतभर 'हरहर महादेवा' चा रणघोष करीत चढून चालले! ह्या राष्ट्रकुलाचे नाव, 'शिवकालोत्पन्न महाराष्ट्र!

## साऱ्या जगातील अहिंदु शत्रूंशी अेकटा हिंदु महाराष्ट्र झुंजला!

ह्याच काळी ह्या दशशतकव्यापी हिंदु-मुस्लिम महायुद्धाच्या रणघाअीतच असा प्रसंग भारतावर आणि त्यातही महाराष्ट्रावर गुदरला होता की, तसा जिवावरचा प्रसंग जगातीलही तुरळक राष्ट्रांवरच काय तो गुदरल्याचे अितिहासातून आढळते! साऱ्या आशियातील अत्याचारी मुस्लिम राष्ट्रे भारतावर अेकाच वेळी अुत्तरेकडून कशी तुटून पडली होती ते सांगितले आहेच. पण त्या आशियातील अरब, पठाण, तुर्क, अफगाण, मोंगल प्रभृति मुस्लिम राष्ट्रांच्या समवेतच ह्या काळी विशेषतः दक्षिणेवर समुद्रातून पोर्तुगीज, डच, फ्रेंच, अिंग्रज ह्या प्रबल नि आक्रमक युरोपियन राष्ट्रांचीही धाडची धाड हिंदराष्ट्राचा नि हिंदुधर्माचाही अुच्छेद करण्याच्या प्रतिज्ञेने येअून कोसळली होती आणि जवळजवळ अेकट्या त्या 'यज्ञोत्थित शिवकालोत्पन्न महाराष्ट्राला'च ह्या जगातील सर्व लुटारू अहिंदू राष्ट्रांच्या भयंकर आक्रमणांना अेकाकी तोंड देणे भाग पडले! त्यातून जगाच्या अितिहासातील अेक दुर्मिळ आश्चर्यकथा ही की, ह्या 'यज्ञोत्थित महाराष्ट्रा' ने त्या जगातील सर्व अहिंदू राष्ट्रांच्या सर्व भीषण आक्रमणांना यशस्वीपणे टक्कर दिली आणि ते त्या सर्व परशत्रूंना पुरून अुरले!! दिल्लीच्या बादशाही तख्ताचे तुकडे तुकडे अुडवून त्या वेळच्या मुस्लिम राजसत्तेची सगळ्या हिंदुस्थानात अंतिम अितिश्री केली!

महाराष्ट्राच्या ह्या अलोकसामान्य पराक्रमाची गाथा तिच्या सत्य स्वरूपात आता महाराष्ट्रातील लोकांना तरी साधारणतः परिचित झालेली आहे. रानडे, राजवाडे, खरे, अितिहासाचार्य सरदेसाअी अित्यादी थोर अितिहाससंशोधकांना नि लेखकांना मराठ्यांच्या अितिहासाचे हे सत्य, दिव्य नि भव्य भारतीय स्वरूप प्रकटविण्याचे श्रेय आहे. पण अेका रानड्यांचा अपवाद सोडला तर अितरांचे ग्रंथ मराठीत आहेत. मराठीवाचून जगातील अिंग्रजी अित्यादी अितर भाषांतून

मराठ्यांचे अितिहास लिहिलेले आहेत, पण ते मुसलमान, पोर्तुगीज, अिंग्रजादी आमच्या पूर्वीच्या शत्रूंनी जाणूनबुजून आणि भारतातील आमच्या भिन्न प्रांतीय देशबंधूंनी बहुतांशी अज्ञानाने, अगदी विकृत स्वरूपात लिहिलेले आहेत.

यास्तव मला तरी अगदी विद्यार्थिदशेपासून महाराष्ट्राचा हा शिवोत्तरकाली अितिहास त्याच्या आतापर्यंतच्या संशोधित झालेल्या स्वरूपात अिंग्रजीत लिहिला जावा, म्हणजे जगाचेही डोळे अुघडतील, असे अुत्कटतेने वाटत होते. पण प्रथमपासून आमचे स्वतःचे कार्यक्षेत्र कर्तव्य म्हणून आम्ही अितिहासकालापेक्षा वर्तमानकाळाच्या कालक्षेत्रातील स्वराष्ट्राच्या शत्रूंशी झुंजणे हेच ठरविल्यामुळे ब्रिटिशविरोधी राज्यक्रांतीच्या कल्लोळांत आम्ही गुरफटून गेलो. यास्तव आम्हांला अंदमानातून सुटून येअीतो महाराष्ट्राच्या जुन्या अितिहासाविषयी तसे काही लिहिण्यास वेळच मिळाला नाही. पुन्हा, केवळ अितिहासासच वाहून घेतलेल्या सरदेसायांसारख्या श्रद्धेय अितिहासकारांनीच हे काम हाती घेणे अधिक श्रेयस्कर नि श्रमविभागाच्या दृष्टीने सोयीस्कर असेही वाटून तशी खटपट आम्ही अधूनमधून करीत होतो.

## सरदेसाअी स्वतःच मला भेटतात

अुल्लेखानुरोधे अगदी तोंडीच आली म्हणून याविषयची अेक आठवण येथेच सांगून टाकतो. आम्हाला सरदेसायांना भेटण्याची अगदी तरुणपणपासून अिच्छा असे. कारण त्यांचेच अितिहास आम्ही सारखे वाचीत होतो. पण आम्ही राज्यक्रांतिकारक; ते अेक अुच्चपदस्थ राजसेवक, मग ते बडोद्याच्या संस्थानिकासारख्यचे का असेनात! पुन्हा ते प्रौढ; आम्ही लहान. पुढे आम्ही अंदमानात गेलो आणि सन १९२४ मध्ये तेथून सुटूनही आलो. आमच्या क्रांतिकालातील अनेक कृत्यांना सरदेसाअी पराक्रम म्हणून गौरवितात, असे आम्ही तोंडोतोंडी अैकत होतो. तेव्हा रत्नागिरीस आम्ही होतो तोपर्यंतही सरदेसायांनी अिंग्रजीमध्ये मराठ्यांचा अितिहास लिहावा अशी आम्हांला तळमळ वाटे. तसे तोंडोतोंडी निरोपही आम्ही त्यांना अनेक वेळा धाडले. पण लेखी पत्र असे काही धाडवेना. कारण आमचे अक्षर म्हणजे विस्तवाची ठिणगी. अेखादवेळी त्यांच्यासारख्या सरकारी अधिकाऱ्यांच्या घराला ती आगच लावून द्यावयाची! अशी अुदाहरणे आमच्या क्रांतिकारक चळवळीत घडतही होती. म्हणून आपले चुप बसलो. अेके दिवशी रत्नागिरीस आमचे घरी श्रीयुत नाना पटवर्धन यांचे जे घर आम्ही भाड्याने घेतले होते त्या घरी, दार अुघडून अेक वृद्धसे गृहस्थ आत आले. 'कोण?' म्हणून विचारीत आम्ही आदरार्थी थोडे अुत्थापनही दिले. ते म्हणाले, 'मी, तो बडोद्याचा सरदेसाअी. अितिहास लिहितो म्हणून आपणांस ठाअूक असलेला,' आम्ही अेकदम चमकलो. 'म्हणजे? रियासतकार की काय?' ते म्हणाले, 'होय.' तेव्हा मी, 'विद्यार्थी असतानाच त्यांचे प्रसिद्ध झालेले मुसलमानी रियासत हे मोठे पुस्तक कसे वाचले आणि तेव्हापासून अपल्याविषयी कसा आदर वाटत आला आहे, हे सांगितले. आपली आजपर्यंतची सगळी पुस्तके मी वाचून काढली आहेत. पण माझी आपणांस आग्रहाची अेक विनंती आहे. मी अनेक देशांत नि मराठी नसलेल्या हिंदु विद्वानांत वावरलो आहे. पण त्यांना मराठ्यांच्या अितिहासाची थोरवी तर काय, पण पुरती जाणीवसुद्धा नसते, असे पाहिले आहे. अनेकांमध्ये तर मराठ्यांविषयी अेक प्रकारचा द्वेषही आढळतो. म्हणून आपण लिहिलेल्या मराठी अितिहासांचे संकलन केलेला, अधिकृत, अेकटाकी, साधार नि आटोपशीर असा अितिहास आपण स्वतः अिंग्रजीत लिहावा, म्हणजे महाराष्ट्रीय नसलेल्या जगालाही तो सत्य स्वरूपात कळेल.' त्यावर त्यांनी 'ते कार्य आता दुसऱ्यांनी कोणी करावें' असे म्हटले, 'नाही. आजतरी तसे कार्य करणारे आपणच अेक अधिकारी लेखक मला दिसता. वयोमानाने आपणांस जड गेले तरी हे शेवटचे कार्य सुवर्णकलश म्हणून तरी हाती घ्यावे. होअीलही पुरे; आपणास दीर्घायुष्याची देणगी दिलेली दिसतेच आहे! पण असा अिंग्रजी अितिहास लिहिण्यास आरंभ तरी तत्काल करावा.' नंतर साध्या औपचारिक गोष्टी झाल्यावर मी त्यांना जाताना गौरवून म्हटले की, 'अशा थोर अितिहासलेखकाचे दर्शन आज मला झाले याचा मला आनंद वाटतो.' तेव्हा माझे वाक्य पुरे होते न होते तोच ते म्हणाले, 'छे छे! खरा आनंद वाटतो मला! आम्ही काही झाले तरी अितिहासलेखक. पण आपण अितिहासकार, अितिहास घडविणारे! आपण अितिहास घडविल्यावर तो टिपून ठेवणारे आम्ही. मी खरोखरच आज आपणांस अितिहासकर्ते म्हणून भेटावयास आलो!' नंतर आम्ही अेकमेकांचा साभार निरोप घेतला.

ही गोष्टही येथेच सांगणे अुचित होअील की, आमच्या वरील भेटीनंतर अितिहासकार सरदेसाअी ह्यांनी पंधरा-वीस वर्षांनी का होअीना, पण त्यांच्या जीवनाचे अेक परिपक्व फल म्हणून शेवटी मराठ्यांचा विस्तृत अितिहास तीन खंडांमध्ये अिंग्रजी भाषेतच लिहिला!

अंदमानातून अि. सन. १९२४ व्या वर्षी सुटून येताच मला राजकारणात काही प्रत्यक्षपणे करण्याची बंदी झाली आणि स्थलबद्धतेमुळे संचारबंदीही पाळणे अनिवार्य झाले. तेव्हा रत्नागिरीतल्या रत्नागिरीत डांबलेल्या आमच्या त्या अस्तित्वात ग्रंथादिक साधने जवळ नसली तरी हे शिवोत्तर महाराष्ट्राच्या असामान्य पराक्रमाचे आणि मुसलमानी राजसत्तेला निर्दाळून त्यांनी केलेल्या हिंदुराष्ट्राच्या विमोचनाचे वैशिष्ट्य साधारणपणे महाराष्ट्राबाहेरच्या प्रांतीय आणि परराष्ट्रीय जगतास निवेदावे यास्तव अिंग्रजी भाषेतच; मराठ्यांच्या विस्तृत आणि विवृत (detailed) अितिहासावर नसला तरी त्या अितिहासाची आमच्या दृष्टिकोनातून चिकित्सा करणारा अेक तसा समीक्षक ग्रंथ स्वत:च लिहिण्याचे आम्ही ठरविले. अितकेच नव्हे तर १९५२ फेब्रुआरीच्या आत तो ग्रंथ पूर्णपणे लिहूनही टाकला.

## हिंदुपदपादशाही

त्या अिंग्रजी ग्रंथाचे नावच मुळी 'मराठ्यांचा अितिहास' असे न ठेवता 'हिंदुपदपादशाही' हे ठेवले. अशासाठी की आमच्या मते अेकंदरीत मराठे जे लढले ते केवळ महाराष्ट्रासाठी लढले नाहीत, आपल्या घरकुलाच्या परसूसाठी किंवा शेतीवाडीसाठी केवळ लढले नाहीत, तर त्यांचा ओढा मूलत:च हिंदुधर्म आणि हिंदुराष्ट्र - ज्याचा महाराष्ट्र हा अेक भाग म्हणूनच काय तो तो शब्द त्यांच्या तोंडी रुळला होता - यांना मुसलमानांच्या दास्यातून मुक्त करून साऱ्या हिंदुस्थानभर हिंदुराज्य 'स्वराज्य' स्थापणे हाच होता! दिल्लीच्या मुस्लिम बादशाहीला धुळीस मिळवून तिथे हिंदुपदपादशाहीचे हिंदुधर्म महामंदिर अुभारणे, हीच त्या नवमहाराष्ट्राच्या अितिहासाची प्रमुखतम नि प्रबलतम अंतर्गत प्रेरणा होती! श्री समर्थांनी व्यक्तविलेल्या-

**या सकल भूमंडळाचे ठायी ।**
**हिंदू अैसा अुरला नाही ।।**

ह्या मूळच्या पोटतिडिकेतूनच पुढचा सगळा मराठ्यांचा अितिहास अुद्‌भवला!

**रामदासोक्त :-**

**प्रस्तुत यवनांचे बंड । हिंदू अुरला नाही चंड ।**
**बहुता दिसाचे भुंड । शास्ता न मिळे तयासि ।।**

हिंदुमनातील ह्याच व्यथेने नि आर्ततेने सारे महाराष्ट्र खवळून अुठले ! त्या शतकातील हिंदुस्थानवर विस्तारलेल्या सहश: महाराष्ट्रीय चळवळींच्या, कारस्थानांच्या, स्वाऱ्यांच्या, लढायांच्या पाठलागांच्या नि पिछेहाटींच्या, सुसंगत आणि विसंगत अशा यच्चयावत् अैतिहासिक वृत्तान्ताचा, घटितांचा, आजपर्यंतच्या मोठमोठ्या अितिहासकारांना गोंधळात टाकणारा आणि न साधणारा समन्वय, ह्या 'हिंदुराष्ट्र' नि 'हिंदुपदपादशाही' ह्या दोन मंत्रमय शब्दांनीच सांधला जातो. ह्यास्तवच ह्या हिंदु-मुस्लिम संघर्षाच्या दशशतकव्यापी अितिहासावर ते युद्ध जिंकून समाप्तीची हिंदुविजयमुद्रा ठोकणारा हा 'हिंदुपदपादशाही' शब्दच त्या आमच्या मराठ्यांच्या अितिहासाच्या समीक्षक ग्रंथाचे नाव आम्ही ठेवले.

ह्या आमच्या ग्रंथातही मराठ्यांचा सगळा अितिहास संपूर्ण विवरणासह (in all details) असा दिलेला नाही. कारण, अितिहासकारांनी ते परिश्रम फार मोठ्या प्रमाणावर आधीच घेतलेले होते. अिंग्रजी लेखक जदुनाथ सरकार, मराठी अितिहासकार सरदेसाअी ह्यांनी त्या विस्तृत साधनसंशोधक परिश्रमांचे संकलन नि त्यांच्या ध्यानात जसा आला तसा समन्वयही करणारे महत्त्वाचे ग्रंथ आधीच लिहिलेले होते. यास्तव मराठ्यांचा सविस्तर अितिहास असा लिहिण्याचा यत्न पुनरुक्ती टाळण्यासाठी आम्ही केला नाही. पुन्हा रत्नागिरीजवळच्या ज्या लहानशा शिरगाव येथील खेड्यात आमचे स्नेही श्रीयुत विष्णुपंत दामले यांनी आम्हांस तशा स्थलबंदीच्या प्रसंगातही जी अेक लहानशी खोली रहावयास दिली होती तीत बसून तसा विस्तृत ग्रंथ संदर्भ-पुस्तकादि साधनांच्या अभावी लिहिताही येता ना!

## हिंदुराष्ट्र

ऐखाद्या अंधाऱ्या रात्री वाट चुकून रानात शिरु लागलेल्या वाटसरूने त्याच्या जवळची प्रवासातील मोठी विजेरी (electrical battery) काढून तिचा प्रकाशझोत चहूकडे फेकताच त्याला सर्व वस्तुजात लखकन यथास्थित दिसू लागते आणि त्याच्या मनाच्या त्या प्रकाशमय स्थितीत त्याची वाट त्याला स्पष्टपणे अुमगता येते. त्याचप्रमाणे आमच्या महाशालेय (collegian) कालातच आम्ही त्या वेळच्या मराठी अितिहासाच्या विस्तृत पण विस्कळीत पसाऱ्यावर हिंदुराष्ट्र दृष्टीच्या विद्युल्लतेचा प्रकाश झोत टाकताच आमचे मनही अकस्मात प्रकाशमय झाले. त्या हिंदुराष्ट्राच्या दीप्तिमय दृष्टिकोनातून पाहताच तो मराठी अितिहासाचा विस्कळीत, विसंगत नि विखुरलेला प्रपंच, सुसंगत नि सुसमन्वित दिसू लागला. त्याचे खरे अलोकसामान्यत्व तेव्हाच काय ते आमच्या प्रत्ययास आले. केवळ मराठ्यांच्या अितिहास म्हणून तो वाचू जाता तसा अेकेरी स्वार्थी, लुटारू, भांडकुदळ आणि भुक्कड असा जदुनाथ सरकारसुद्धा बहुतेक अितिहासकारांना वाटत होता, तसा तो नाहीच नाही! हिंदुराष्ट्रासाख्या आपल्या महान राष्ट्रावर सारा आशिया, युरोप, आफ्रिका अशा तिन्ही खंडातील म्हणजेच तत्कालीन साऱ्या ज्ञात जगातील परधर्मीय नि परकीय अहिंदु शत्रू जे तुटून पडले होते आणि ज्यांना निर्दालण्यासाठी दहा शतकांवर हिंदुजातीने तुटकपणे महायुद्ध लढत ठेवले असाताही अितर कोणाही हिंदुराजांकडून किंवा गटांकडून ते महायुद्ध जिंकून समाप्त होण्याचे चिन्ह दिसेना, तेव्हा ते महायुद्ध जिंकण्याचे महान दायित्व आता अेकट्याने स्वीकारले पाहिजे असा निर्धार करून अुठलेल्या महाराष्ट्राचे आम्हांस तेव्हा सम्यक् दर्शन झाले!

## हिंदु स्वातंत्र्ययुद्ध

ह्या हिंदुराष्ट्रीय दृष्टिकोनातून साधारणतः सतराव्या शतकापासूनच्या मराठ्यांच्या हिंदु स्वातंत्र्ययुद्धाच्या ह्या अितिहासावरील आम्ही लिहिलेले वरील 'HINDUPADPADSHAHI' (हिंदुपदपादशाही) हे पुस्तक प्रत्येक हिंदुत्वनिष्ठाने वाचावे, अशी आम्ही, राष्ट्रीय कर्तव्यासाठी दांभिक विनय बाजूस सारून स्वतःच अुत्कट विनंती करतो. कारण, शक्य तितक्या तिऱ्हाअीत दृष्टीने बघितले तरी आमचे आम्हांसच ते पुस्तक मराठ्यांच्या तत्कालीन अितिहासावरील अितर आज अुपलब्ध असलेल्या कोणत्याही पुस्तकापेक्षा अत्यंत मार्मिक आणि हिंदुत्वाच्या त्या ओसंडत भरलेल्या राष्ट्रीय जीवनरसाने रसरसलेले आहे, असे वाटते. मराठ्यांच्या राजारामकालीन अितिहासाला 'बाजारबुणग्यांचा धुडगूस' म्हणणाऱ्या परकीयांची नि स्वकीयांचीही तोंडे बंद करून रानड्यांनी 'महाराष्ट्राचे स्वातंत्र्ययुद्ध' असे त्याला म्हटले.

पण त्याच्या पुढचे हे जे अक्षरशः महाभारतीय युद्ध मराठे राजारामाच्या कालानंतर जवळजवळ अेक शकतभर लढत राहिले ते केवळ 'महाराष्ट्रीय स्वातंत्र्ययुद्ध' नव्हते, तर ते 'महाभारतीय हिंदुस्वातंत्र्ययुद्ध' होते. त्या महायुद्धाचे हे आम्ही लिहिलेले 'हिंदुपदपादशाही' हे समीक्षक पुस्तक म्हणजे अेक 'सुवर्णमंदिर' आहे! त्या महायुद्धदेवतेची अेक अजिंठ्यातील रंगशिल्पासारखी मनोवेधक मूर्ती आहे.

आणि तरीही, त्या पुस्तकातील छेदक नि छेदक साधार आहे. अितर अधिकारी अितिहासकारांच्या वाक्यांचे अुतारे त्यात आहेत म्हणून ते साधार आहे अितकेच काय ते नव्हे, तर त्या प्रत्यक्ष रणांगणात लढत असलेल्या आणि ती राजकारणे लढवीत असलेल्या वीरपुरुषांची त्या त्यावेळी अुच्चारलेली स्वतःची वाक्येच त्यात आहेत, त्यांच्या स्वतःच्या हाताने लिहिलेल्या ताज्या ताज्या पत्रांचे अुतारे त्यात आहेत, म्हणून ते पुस्तक जितके वाचनीय तितकेच विश्वसनीय आहे. महाराष्ट्राच्या त्या अितिहासाची ही अखिल भारतीय हिंदु स्वरूपाची जाणीव प्रतिभाशाली अितिहास लेखक राजवाड्यांना अगदीच नव्हती असे नाही. पण त्यांच्या लिखाणात तिचा सर्वांगीण समन्वय व्हावा तसा झालेला नव्हता. क्वचित, त्यांचा ग्रंथसंभार तसाच प्रचंड होता म्हणून त्याचे अेका दृष्टीत साकल्याने सप्रमाण अवलोकन करणे त्यांच्यासारख्या विशाल बुद्धीलाही साधलेले दिसत नाही. अधूनमधून त्या अितिहासाचे त्यांचे समीक्षण अधूरे किंवा विसंगत भासते. तर अिंग्लिश, मुस्लिम प्रभृति शत्रुपक्षीय अितिहासकारांचे तर ह्या प्रकरणी नावच काढावयास नको. अेवंच आहे या परिस्थितीत मुसलमानी राजसत्तेचा नायनाट करून ते महाभारतीय युद्ध जिंकणाऱ्या अितिहासाच हिंदुराष्ट्रीय दृष्टीतून केलेल्या समीक्षणाचे आमचे

हिंदुपदपादशाही' हेच पुस्तक अद्वितीय आहे. यासाठी प्रत्येक हिंदुत्वनिष्ठाने ते वाचावे असे आमचे आग्रहाचे सांगणे आहे.

अेवढ्यासाठी आम्ही, आमच्या सध्याच्या प्रकृतिक्षीणतेमुळे, ते समीक्षणसुद्धा आता पुन्हा येथे देत नाही. ते जिज्ञासू वाचकांनी हिंदुपदपादशाही ह्या अिंग्लिश ग्रंथातून वाचावें. ह्या ग्रंथाचे मराठी भाषांत श्री. ग. पां. परचुरे यांनी प्रसिद्ध केलेले आहे. ह्या चालू 'सहा सोनेरी पाने' ह्या ग्रंथात आता दशशतकव्यापी हिंदु-मुस्लिम महायुद्धात शेवटी हिंदूंनी मुसलमानी राजसत्तेचा नायनाट करून जो अंतिम महान विजय मिळविला त्या अुत्कर्षबिंदूला पोचविणाऱ्या घटनाक्रमाच्या केवळ अनुक्रमणिकेच्या सोनेरी साखळीचेच काय ते प्रदर्शन करण्याची आवश्यकता आहे. तेच खाली करीत आहोत.

## अलोकसामान्य घटनांच्या मालिकांची अनुक्रमणिका

ज्या सन सतराव्या शतकापर्यंत आम्ही ह्या हिंदु-मुस्लिम महायुद्धाचे समीक्षण ह्या ग्रंथात प्रकरण ८ पर्यंत वर केलेले आहे त्यापुढची त्या सन सतराव्या शतकातली, त्या वेळेस यःकश्चित भासणारी पण आज आता अितिहासाच्या अुलट दुर्बिणीतून महान् ठरणारी पहिली घटना म्हणजे सन १६२७ किंवा १६३० मध्ये झालेली -

## शिवाजीचा जन्म !

शिवाजीचे वडील शहाजीराजे हे त्या काळातील मराठ्यांच्या राजकारणकर्त्या आणि लढत्या मोठमोठ्या तुरळक सरदारांत गणले जात होते. पण, त्या साऱ्यांना त्यावेळी महराष्ट्रात राज्य करणाऱ्या पाच मुस्लिम सुलतानशाह्यांचे अंकित म्हणूनच सरदारक्या गाजविणे भाग पडलेले होते. हिंदूंचे स्वतंत्र असे अेक टीचभरसुद्धा स्थल साऱ्या महाराष्ट्रात अुरलेले नव्हते. पण वर अुल्लेखिलेल्या त्या शहाजीराजांना झालेल्या लहान मुलाच्या दैवी, मात्र पुढे त्यच्याच नेतृत्वाने, मुस्लिम राजसत्तेच्या शिरच्छेदासाठी सांडलेल्या अुष्ण रक्ताचा हिंदुस्वातंत्र्यनिर्घोषक स्वराज्यतिलक लागावयाचा होता!

## आश्चर्यकारक योगायोग

दैवाने म्हणा, देवाची अिच्छा म्हणून म्हणा, काकतालीय न्यायाने म्हणा, किंवा पेरलेल्या प्रयत्नांचे अेकसमयावच्छेदेकरून बहरून वर आलेले पीक म्हणून म्हणा; पण जिजामातेच्या गृहांगणातील शिवाजीच्या ह्या जन्मापासून अेक आश्चर्यकारक परिवर्तन हिंदु-मुसलमानांच्या युद्धसंघर्षातील राष्ट्रीय रणांगणातही घडून आले.

साधारणतः सन सातशेपासून सतराव्या शतकाच्या आरंभापर्यंत जेथे जेथे म्हणून मुसलमानांची आणि हिंदूंची प्रचंड सैन्ये लढली, जेथे जेथे म्हणून राज्यांवर नि राष्ट्रांवर निर्णायक परिणाम करणारें युद्ध समरभूमिवर हिंदु-मुसलमान लढले, तेथे तुरळक अपवाद सोडता, काहीतरी निमित्त हौअून कोणी हत्तीवर बसला म्हणून, तर कोणी पालखीत बसला म्हणून, कुठे अकस्मात विश्वासघात झाला म्हणून, तर कुठे विजय हिंदूंच्या अगदी हाती आला असता केवळ योगायोगाने-पण हिंदू सैन्याचा पूर्ण पराभव व्हावा आणि मुस्लिम पक्षाचा पूर्ण विजय व्हावा, हा निष्ठुर रणदेवतेचा शेवटचा निर्णय बहुधा ठरलेला असे! वीर दाहीरची लढाअी, वीर जयपालची लढाअी, वीर अनंगपालची लढाअी, वीर पृथ्वीराजाचा शेवटचा संगर, महाराणा संगाने झुंजविलेला संग्राम ह्या सर्व शतकोशतकांतील निकराच्या युद्धांपासून तो थेट विजयनगरच्या वीर रामराजाच्या सन १५६५ मध्ये झालेल्या तालिकोटच्या लढाअीपर्यंत प्रत्येक निर्णायक युद्धात वरील निष्ठुर रणदेवतेचा कौल हिंदुपक्षासच बाधक ठरला, हिंदुपक्षाचाच पराभव त्या त्या संग्रामात अटळपणे होत गेला!!

## पण सतराव्या शतकाच्या आरंभापासून

म्हणजेच साधारणतः शिवाजीच्या जन्मापासून हिंदु - मुस्लिमांच्या संघर्षात त्याच निष्ठुर रणदेवतेच्या निर्णयात अेक अत्यंत आश्चर्यकारक प्रभेद अकस्मात दिसून येअू लागला. तो हा की, पूर्वी जसा हिंदू-मुसलमानांच्या झुंजीत हिंदूंचा पराभव हटकून व्हावयाचाच हे अटळ दिसे, तसे ह्या पुढच्या काळात जेथे जेथे हिंदु-मुसलमानांची गाठ पडे तेथे तेथे हिंदूंचा विजय हटकून व्हावा आणि मुसलमानांचा पराजय होत जावा हेही अटळ ठरू लागले! ह्या सतराव्या शतकापासून जेथे

जेथे रणात मुसलमान भेटला, तेथे तेथे हिंदूंनी त्यास पिटला! राष्ट्रावर किंवा राज्यावर आमूलात् परिणाम करणारे रणसंगर असोत किंवा अगदी धावत्या लढाया, असोत, हिंदुसैन्याचा विजय आणि मुस्लिमांचा पराजय हा बहुधा ठरलेलाच असे! महाराष्ट्रभूमीवरीलच नव्हे, तर पंजाब ते दक्षिण समुद्रापर्यंत नि पश्चिम ते पूर्व समुद्रापर्यंतच्या शेकडो लढ्यांत मराठ्यांनी मुस्लिमांच्या केलेल्या पराभवांची हिंदूंची छाती गर्वभराने अुंचविणारी विजयजंत्री आमच्या हिंदुपदपादशाही या पुस्तकातून प्रत्येक हिंदू तरुणाने अवश्य वाचावी.

## नव्या मराठी रणनीतीचे सूत्र ‘आक्रमण’
## - केवळ ‘संरक्षण’ नव्हे!

साऱ्या हिंदुराष्ट्राचे नेतृत्व मराठ्यांनी स्वीकारल्यापासून वर दाखविल्याप्रमाणे जेथे हिंदु-मुस्लिम संग्रामात बहुधा हिंदूंचा विजय आणि मुसलमानांचा पराजय भरतखंडभर जो होत गेला त्याचे अेक मुख्य कारण हे होते की, शत्रूंवरसुद्धा सैनिकी आक्रमण करणे हे नैतिकदृष्ट्या अश्लाध्य आहे, पाप आहे, तो हिंदूंचा धर्म नव्हे, अशी जी क्षात्रत्वाची विकृत निष्ठा, सद्‌गुणविकृतीची साथ बहुतांश हिंदुसमाजात मध्यंतरी फैलावली होती, तिच्या तावडीतून मराठ्यांनी आपल्या धाडशी पराक्रमाने हिंदुमनाची झपाट्यासरशी सुटका केली.

वस्तुत: राष्ट्रीय शस्त्रबलाचे मुख्य ब्रीद शत्रूवर तो चालून येण्याच्या आधीच आपण त्याच्यावर चालून जाणे - आक्रमण करणे हेच होय. अशी आक्रमक प्रवृत्ती हिंदु लोकांत पुन्हा संचरविण्याचा सक्रिय प्रयोग मराठ्यांपूर्वी विजयनगरचे राज्य स्थापिले त्या वेळीच हिंदूंनी मुस्लिमांविरूद्ध यशस्वीपणे केलेला होता. पण, तो दक्षिणेतल्या दक्षिणेतच राहिला आणि तालिकोटाच्या भयंकर पराभवाने हिंदुमन मुसलमानांवर आक्रमक चढाया करण्यास पुन्हा कचरू लागले होते. अशावेळी मराठ्यांनी मुस्लिमांवर यशस्वी आक्रमणे करून हिंदूंमध्ये पुन्हा रणचैतन्य संचरविले.

शत्रूंवर सैनिक आक्रमण करणे हेच राष्ट्रीय शस्त्रबळाचे मुख्य ध्येय, मुख्य धर्म आहे. राष्ट्राच्या केवळ संरक्षणापुरतेच शस्त्रबल जे राष्ट्र बाळगते - पण, आक्रमणक्षम होअील अितके वाढवीत नाही, तसे करणे अधर्म समजते, त्या राष्ट्राची ती निष्ठा अेक तर भ्रांत असते, नाही तर आतून भेकड असते. हा अंतर्गत भेकडपणा छपविण्याकरिता केलेली ती अेक वल्गना असते. ज्या राष्ट्राचे सैन्यबल अुघड अुघडपणे आक्रमणक्षमतेच्या पायावर नि प्रमाणावर रणसज्जतेत अुभे असते त्या राष्ट्रात संरक्षणक्षमता असतेच असते.

पुन्हा, त्या वेळच्या मुसलमानांच्या आततायी राजसत्तेस अुखडून टाकण्यासाठी हिंदूंनी केलेले आक्रमण हे मुळातच अन्याय्य नव्हते. खरे अन्याय्य आक्रमण हिंदूंच्या देशावर मुसलमानांनी ज्या स्वाऱ्या केल्या ते होते, त्या आततायी मुस्लिमसत्तेविरूद्ध हिंदूंनी केलेले आक्रमक अुठाव ह्याला हिंदूंनी मुसलमानांविरुद्ध केलेले ‘बंड’ म्हणता येत नाही. कारण हिंदुराष्ट्राच्या स्वातंत्र्याविरुद्ध - न्याय्य सत्तेविरूद्ध मुस्लिमांनी केलेले आततायी अभियान, हेच खरें बंड होते. धन्याविरुद्ध चोरांनी केलेल्या अतिक्रमणाला बंड म्हणता येअील. चोराला दंडिण्यासाठी धन्याने केलेला अुठाव ह्याला काही ‘बंड म्हणता येणार नाही. म्हणूनच त्या काळी अुभ्या भारतातील हिंदुसमाजाचा जो बहुतांश भाग भीतीग्रस्त झालेला होता, त्याच्यात पुन्हा धैर्य संचरविण्यासाठी रामदासांनी सह्याद्रीच्या शिखरशिखरावरून रणघोषणा केली की, ‘प्रस्तुत यवनांचे बंड।’ बंड यवनांचे आहे हिंदूंचे नव्हे. त्या म्लेंच्छांच्या बंडाचा अुदंड दंड त्यांना देण्यासाठी त्याच्यावर चोहोबाजूंनी आक्रमण करा!

**‘‘धर्मासाठी मरावें । मरोनि अवघ्यांसि मारावें ।**
**मारिता मारिता घ्यावे । राज्य आपुले ।।’’**

मराठ्यांनी अवलंबिलेल्या ह्या आक्रमक रणतीनीचे प्रमुख हत्यारही त्या वेळच्या हिंदूंना तोपर्यंत नवेनवेसेच होते. पूर्वी त्यांच्या हाती ते रुळावें असे रुळलेले नव्हते. ते हत्यार म्हणजे वृक्‌युद्ध हे होय. ह्यालाच त्या वेळी गनिमी कावा म्हणून म्हणत. ह्या वृक्‌युद्धाच्या माराखाली मराठ्यांनी असंख्य सेनेसह केलेल्या मोठमोठ्या मुसलमानी स्वाऱ्यांनाच दाती तृण धरावयास लावले. शत्रूच्या चतुरंग सेनेशी सहसा आपल्या अल्पसंख्याक सैन्याच्या टोळ्यांसह सन्मुख युद्ध असे मराठ्यांनी

या वृक्‌युद्धाच्या नीतीप्रमाणे मराठी सैन्य अल्पसंख्य असेल तेव्हा तेव्हा देऊच नये; तर मागून, अुजवीकडून, डावीकडून सारखे तुटून पडावे.

तथापि, हेही ध्यानात ठेविले पाहिजे की, मराठ्यांच्या अशा लहानसहान सैन्यांनी प्रचंड मोगली सैन्याची लांडगेतोड करता करता त्या मराठी सैन्याचीही संख्या नि शक्ती कुठे कुठे जर वाढत गेली तर मराठे ह्याच वृक्‌युद्धाचा अुत्तरभाग म्हणून मोगलांच्या अेखाद्या अगडबंब सैन्यावरही अकस्मात अुघड अुघड आक्रमण करून सन्मुख लढाया देण्यास कचरत नसत. मराठी सैन्ये जेव्हा वाढत गेली, त्यांच्या हाती पडलेली लहानमोठी राज्ये, दुर्ग प्रदेश अित्यादिकांचा व्याप वाढत गेला, तेव्हासुद्धा त्यांची निरनिराळी सैन्ये आपली स्थाने संभाळून आपल्या लहान मोठ्या राजधान्यांतूनच काही लोळत पडलेली नसत. तर त्यांतील प्रत्येकजण शेजारच्या वा दूरच्या मोगली सत्तेखालील पुढच्या प्रदेशावर सारखा टपून राहून पावसाळा संपला रे संपला की स्वारी करण्यास, छापे घालण्यास मुस्लिम शत्रू आपल्या छोट्या संस्थानावर, जहागिरीवर, गडावर चालून येण्याच्या आधी त्यापुढच्या मुस्लिम प्रदेशात घुसे। आपल्यावर चालून येणाया मुस्लिम निजाम नबाबादि शत्रूंनासुद्धा हुडकूनहुडकून घराबाहेर काढून त्यांच्यावरही मराठी सैन्य तुटून पडत. त्या मराठ्यांच्या लहानमोठ्या राजधान्या, गड गुहा ह्या त्यांच्या वास्तव्याच्या स्थल काही त्यांचा खरा पत्ता सापडत नसे. मुसलमानांवर स्वाऱ्या करीत निघताना ती मराठी वृक्‌युद्ध-कुशल सैन्ये त्या आपल्या राजधान्या जणू आपल्या घोड्यांच्या पाठीवर घेअूनच मोगलांच्या हातातील प्रदेशात, दूरच्या प्रांतात हाणामार करीत निघून गेलेले असत. ह्या अनेक मराठी सेनानींचा नि लढवय्यांचा खरा पत्ता म्हणजे मोगलांच्या प्रदेशात पडलेली त्यांची लढाअू शिबिरे, - त्यांचे सारखे हलते तळ!

मराठ्यांच्या ह्या लांडगेतोडीने जर्जर झालेल्या मुस्लिमांच्या अगडबंब स्वाऱ्यांची काय दुर्दशा होअी ते राजारामकालीन औरंगजेबाच्या अेका अुदाहरणावरूनही स्पष्ट होअील. औरंगजेबाची मोठमोठी सैन्ये मराठ्यांचा पाठलाग करीत नि त्यांचे प्रदेश घेत अेका बाजूला थेट खाली जिंजीपर्यंत गेली; पण? - ती मुस्लिम सैन्ये मागे वळून जो पाहतात तो तिकडे मराठ्यांची लहानमोठी सैन्ये नर्मदा अुतरून गुजराथ प्रांतात घुसली असून तेथील मुस्लिम सुभेदाराची हवेलहंडी अुडवून देत आहेत! त्याच्या पुढच्या मध्यप्रांतातूनही अितस्ततः मराठे तुटून पडत असल्याची नवीनवी बातमीही प्रत्यही त्या गोंधळलेल्या मोगल बादशहाच्या कानावर आदळतच होती! शेवटी जळत्या निखाऱ्याप्रमाणे हातात धरलेल्या महाराष्ट्रास खाली टाकून देअून ते होरपळून निघालेले अगडबंब मुस्लिम मोगल सैन्य शक्य तितक्या त्वरेने आपण होअून पाठीमागे दिल्लीकडे निघून गेले.

जोवर मराठ्यांचे सैन्यबल किंवा राजसंस्था स्थावर, प्रबळ नि विस्तृत झालेली नव्हती तोवरच काय ते हे आक्रमणाचे रणशास्त्रीय तंत्र मराठ्यांनी अंगीकारलेले होते असे नाही, तर जेव्हा त्यांच्या अनेक सरदारांपैकी अेकेकाच्या हाताखाली दहा-दहा, वीस-वीस सहस्रांसारखी चतुरंगदले रणात झुंजत आणि जिंजी ते गुजराथ, मध्यप्रांतापर्यंत मराठ्यांची राज्येच स्थापन झाली तेव्हा तर अधिक ओर्षेने हिंदुपदपादशाहीच्या ध्येयसिद्धीस्तव पहिल्या बाजीरावासारख्या धुरंदर सेनापतीच्या नि राज्यचालकाच्या आधिपत्याखाली मराठे अुरलेल्या मुस्लिम प्रांताप्रांतावर आपण होअून आक्रमणे करीत चाललेच होते! साऱ्या भरतखंडात हिंदुपदपादशाही स्थापावयाची तर 'नुसते आहे तितुके जतन करूनच' भागणारे नव्हते, तर महाराष्ट्राबाहेर पडून, 'पुढे आणिक मेळवावे' ह्या सूत्राप्रमाणे मराठ्यांना आक्रमक रणनीतीचाच अवलंब करणे भाग होते. धर्मशत्रूंवर तसे तुटून पडण्याची वीरश्रीने रसरसलेल्या त्या वीरांना अनिवार हौस पण होती!

## मराठ्यांच्या ह्या आक्रमक रणनीतीने
## हिमालयाकडील शत्रूंच्या स्वाऱ्या बंद पडल्या

पहिल्या बाजीरावाने दिल्लीपर्यंत मारलेल्या धडकांनी मोगली बादशाही गदगदा हलवून खिळखिळी झाली आहे आणि मराठ्यांची मोठमोठी सैन्ये दिल्लीपुढेही पंजाबात आक्रमणे करण्याच्या बेतात आहेत, ही वार्ता हिमालयापलीकडील मुस्लिम राज्यांतही पोहोचल्याने काबूल, गझनी, अिराण, तुराण, बल्क, बुखारल, अरबस्थानादि मुस्लिम राजसत्तांनाही मराठ्यांच्या शक्तीचा हादरा बसल्यावाचून राहिला नाही!

मराठ्यांचा अुदय होण्यापूर्वी हिमालयापलीकडील ह्याच अरब, अिराणी, दुराणी, तुर्क, मोगल अित्यादिक मुस्लिम जाती हिमालय अुतरून हिंदुस्थानवर कशा राक्षसी स्वाऱ्यांवर स्वाऱ्या करीत होत्या ते ह्या ग्रंथात अनेकवार सांगितलेच आहे. हिंदूंची राज्ये बुडवीत, हिंदुधर्माचा अुच्छेद करीत आणि हिंदूवर अमानुष धार्मिक अत्याचार करीत हे मुस्लिम आक्रमक कोणी दक्षिणेपर्यंत चालून येअी तर कोणी दिल्लीलाच आपली स्वतंत्र नि स्थायी राज्ये स्थापून अल्लाअुद्दिनासारख्या थेट दक्षिणेच्या टोकापर्यंत स्वाऱ्या करून हिंदुधर्माचा अुच्छेद करीत जात.

तथापि, त्या काळाचे हिंदुराजे, हे राक्षसी मुस्लिम आक्रमक हिमालय अुतरून हिंदुस्थानवर स्वारी करण्याआधीच, प्रथम आपणच हिमालय ओलांडून अिराण, तुराण अरबस्थानावर स्वाऱ्या करू शकले नाहीत. ह्या मुस्लिम आक्रमकांना त्यांच्या घरी ठेचून टाकू शकले नाहीत!

## नादिरशहा आणि अब्दाल्ली

पण ह्या दशशतकव्यापि हिंदुमुस्लिम महायुद्धात मराठ्यांनी अखिल हिंदूंचे रणनेतृत्व हिंदुस्थानात सर्वत्र स्वीकारल्यानंतर त्यांच्या ह्या प्रबल सैनिकी आक्रमणांनी दिल्लीचे तटही जेव्हा कोसळू लागले तेव्हापासून मात्र वरच्या छेदकात सांगितल्याप्रमाणे आशियातील मुस्लिम आक्रमक जातींची आणि राज्यांची ती पूर्वीची महंमद गझनीप्रमाणे हिंदूंचा नि:पात करण्याच्या प्रकट डरकाळ्या फोडीत अुठल्या बसल्या स्वाऱ्या करण्याची खोडच मोडली गेली. मराठ्यांच्या सैन्यांनी दिल्ली हाती घेअून तेथील कारभार पहिल्या बाजीरावासारख्या पराक्रमी पेशव्याच्याच तंत्राने चालू ठेवला. तेव्हापासून हिमालयापलीकडील अेक अिराणचा नादिरशहा आणि दुसरा अहमदशहा अब्दाली हे दोघेच काय ते पूर्वीच्या मुस्लिम आक्रमकांसारख्या डौलाने हिंदुधर्माचा आणि लोकांचा अुच्छेद करून टाकण्यासाठी आणि हिंदुस्थानचे बादशाह बनण्यासाठी म्हणून आले. परंतु वस्तुत: ते दोघेही पूर्वीप्रमाणे केवळ स्वत:च्याच खुमखुमीने नि प्रेरणेने चालून आलेले नव्हते. दिल्लीपर्यंत साऱ्या हिंदुस्थानात आपली हिंदुसत्ता स्थापीत मराठे येअून थडकले आहेत किंवा थडकू शकतात या जाणिवेने नादिरशहा काय किंवा अहमदशहा अब्दाली काय, ह्या दोघांच्याही मनात धास्ती वाटू लागलेली होती. परंतु हिंदुस्थानातील दिल्ली नि पंजाब येथील मुसलमानी सरदारांच्या नि कधी बादशहांच्याही गुप्त निमंत्रणावरून नादिरशहा नि अहमदशहा हिमालयापलीकडून हिंदुस्थानवर चालून येण्याचे धैर्य करू शकले. 'मराठ्यांनी आम्हांस खाअून टाकले. सर्व हिंदुस्थानात काफरशाही होत आहे. तरी दिल्लीची मुस्लिम बादशाही रक्षण करण्यासाठी आपण अिस्लामचे त्राते म्हणून आम्ही आपणाकडे धाव घेत आहो. आपण सत्वर स्वारी करून यावे. आम्ही आपणांस दिल्लीस बादशाही तक्तावर बसवितो.' रोहिले, पठाण, मोगल अशा अनेक मुस्लिम सरदारांनी असा गुप्त आग्रह केल्यामुळे त्यांच्या हिंदुस्थानातील बळावर नि सहाय्यावर अवलंबूनच काय ते हे हिंदुस्थानापलीकडचे दोघे अत्याचारी पण बलिष्ठ आक्रमक हिंदुस्थानावर स्वारी करू शकले.

## नादिरशहाची स्वारी

नादिरशहाला गुप्तपणे मराठ्यांचा नायनाट करण्यासाठी ज्यांनी बोलावले त्यात निजाम-अुल-मुल्क हा प्रमुख होता. भोपाळच्या लढाअीत बाजीरावाने ह्या निजामाला यथेच्छ पिटला होता. परंतु त्यालाही ही आशा होती की, नादिरशहाकडून मराठ्यांचा काटा समूळ अुपटला जाअील. पुढे जे होअील ते होअील. नादिरशहा सन १७३९ त अटक ओलांडून लाहोरला आला. दिल्लीच्या बादशहाने ससैन्य त्याच्याशी लढण्याचा डौल घातला. पण पहिल्याच लढाअीत त्याची धूळधाण अुडाली. नादिरशहाने बादशहाला बोलावून अटकेत ठेवले; निजामलाही त्याने दरडावून विचारले की, 'तुम्ही अेवढाले सरदार असता तुम्हांला मराठ्यांना कसे हुसकता आले नाही?' आणि त्याने मान्य केलेले कित्येक कोटी रूपये दिले नाहीत म्हणून त्यालाही अटकेत ठेवले. नंतर नादिरशहा सरळ दिल्लीवर चालून गेला. १७३९ च्या मार्चला नादिरशहाने मोगल सत्तेचा अंत करून अुघडपणे दिल्लीच्या सिंहासनावर आपल्या स्वत:च्या अिराणी बादशाहीची घोषणा केली. लगोलग त्याने मुस्लिम बादशाहीच्या कुळधर्माप्रमाणे दिल्लीस अत्याचारांचा कहर केला. लुटालूट नि सरसकट शिरच्छेद यांचे थैमान मांडले. तथापि, सगळ्या मुसलमानांना ही आशा होती की, नादिरशहा मराठ्यांचा तरी नायनाट

करील. नादिरशहाने मराठ्यांची आपण होऊन कोणतीही आगळीक केली नाही. अितकेच नव्हे तर दिल्लीतील हिंदूंच्या लुटालुटीत आणि सरसहा शिरच्छेदात तिकडील मुसलमानांचाही अपवाद ठेवला नाही. नादिरशहाने स्वतः निजामाची त्याला खेचरावर बसवून धिंड काढविली.

अितक्यात दिल्लीला बातमी पोचली की, मराठ्यांनी पोर्तुगीजांवर मोठा विजय मिळविलेला असून वसअीचा प्रसिद्ध जलदुर्ग पोर्तुगीजांच्या हातून जिंकून घेतला आहे. आणि तेथील पोर्तुगीज सेनानी मराठ्यांना ससैन्य शरण गेला आहे. त्यामुळे निष्कंटक होअून स्वतः बाजीराव फार मोठ्या मराठी सैन्यासह दिल्लीवर चाल करून येत आहे.

**''अरे बघता काय!**

**चला दिल्लीवर चाल करून!**

**हिंदुपपादशाहीस आता काय अुशीर?''**

**- बाजीराव**

अुत्तरेकडील मराठे सरदार आणि बाजीरावाने सर्वत्र पेरून ठेवलेले लहान मोठे राजकारणी मराठी हस्तक ह्यांच्याही अंगात नादिरशहाची पुरती खोड जिरवून टाकावी, असेच वारे संचारले होते. त्यांनी ठिकठिकाणाहून बाजीरावला अुत्तरेकडील नादिरशहाची आणि हिंदुराज्यांची स्थिती कळविली. त्या प्रतिवृत्त लेखकांतील अेक लेखक लिहितो, ''तहमास्प कुलीखान (नादिरशहा) काही देव नाही, जो पृथ्वी कापून काढील, जबरदस्थांशी सुलुख करील, म्हणून मातब्बर फौजेनिशी यावे. आधी जबरदस्ती नि मग सुलुख. आता सारे राजपूत नि स्वामी (बाजीराव) अेक झालीया निकाल पडेल. समस्थांस बुंदेले वगैरे अेक जागा करून मोठा भाव दाखविला पाहिजे. नादिरशहा तसा माघार जात नाही, हिंदूराज्यांवरी निघेल. रायाचे (सवाअी जयसिंग) मनी राणाजी (अुदेपूरचा महाराणा) दिल्लीचे बादशाही तक्तावर बसवावे असे आहे. हिंदूराजे सवाअी आदिकरून स्वामींचे स्वारीची मार्गप्रतीक्षा करतात! स्वामींचें पुष्टिबल होताच जाट वगैरे फौज दिल्लीवरी पाठवून सवाअीजी आपण दिल्लीस जाणार....''

अशा अवसानाचीच अुत्तर हिंदुस्थानातील मराठी पुढाऱ्यांची अनेक प्रतिवृत्ते येत होती. त्यांच्या आधारे शाहूच्या मंत्रिमंडळात जे जे मराठ्यांचे पाय मागे खेचणारे आणि बाजीरावाच्या आक्रमक वीरश्रीस अपशकुन करणारे लोक बसलेले असत, त्यांना बाजीराव आवेशाने म्हणाले : 'वीरहो, विचार करीत नि शंका घेत काय बसला! अेकीने चाल करून निघा, हिंदुपदपादशाहीचा दिवस अुगवलाच म्हणून समजा! मी तर नर्मदा अुतरून सर्व मराठी सैन्य चंबळेपर्यंत पसरून देणार, मग पाहू या नादिरशहा कसा खाली येतो तो!'

मराठे आपल्यावर प्रत्याक्रमण करून अुत्तरेत येत आहेत अशी बातमी येताच नादिरशहाचा हिंदुस्थानात दक्षिणेपर्यंत पूर्वीच्या अिराणी, तुराणी, तुर्क अित्यादी मुस्लिम आक्रमकांसारखा पुढे घुसण्याचा अुत्साहच ढासळून गेला आणि मराठ्यांच्या सेना दिल्लीकडे पोचण्यापूर्वीच आपला गाशा गुंडाळावा अशा धोरणाने त्याने स्वतः होअून बादशहाचे पद सोडून दिले. आपण होअून दिल्लीच्या पूर्वीच्या मोगल बादशहास पुन्हा तख्तावर स्थापले. सर्व राजेरजवाड्यांना त्या मोगल बादशाहाची आज्ञा मानण्याचा कडक आदेश त्याने दिला. नादिरशहाने दिल्लीस मिळविलेली जवळजवळ पन्नाससाठ कोटींची लूट नि मयूर सिंहासनादि अनर्घ्य कलावस्तु समवेत घेअून अिराणास प्रयाण केले. केवळ मराठ्यांच्या आक्रमणाच्या भयाने!

हिंदुस्थानातील राजेरजवाड्यांना नादिरशहाने जी पत्रे पाठविली होती त्यांतच शाहू छत्रपतींना लिहिलेल्या पत्रात लिहिले होते की, 'सर्व हिंदूंनी दिल्लीच्या मोगल बादशहाच्या आज्ञेत राहावे; नाहीतर जे ही आज्ञा मोडतील त्यांना भयंकर शासन करण्यात येअील.' अशा आशयाचे पत्र त्याने मूर्खपणाने लिहिले आणि शहाणपणाने आपला पाय मागे काढला. अर्थातच नादिरशहाचे ते आज्ञापत्र केराच्या टोपलीत फेकले गेले आणि मराठ्यांच्या शाहू छत्रपतीने १७३९ मध्ये भरविलेल्या राजसभेत 'मराठ्यांच्या भीतीने नादिरशहा हिंदुस्थानातून पळून गेला' अशी स्पष्ट घोषणा केली.

## अहमदशहा अब्दाल्ली
## काबूलचा बादशहा होतो

नादिरशहाच्या सैन्यात त्याचा अंकित म्हणून अहमदशहा अब्दाल्ली नावाचा अेक अफगाण सरदार आपल्या कर्तृत्वाने वाढत वाढत नादिरशहाचा अुजवा हातच बनला होता. नारिशिहाच्या वर दिलेल्या हिंदुस्थानवरील स्वारीत अब्दाली त्याचेबरोबर होताच. नादिरशहा हा परत गेल्यानंतर लवकरच सन १७४७ मध्ये मारला गेला. त्याच्या मरणानंतर त्याच्या सैन्यात अुडालेल्या धांदलीत सारी सत्ता आपणच बळकावून अहमदशहाने तो पठाण जातीचा असल्यामुळे काबूल येथेच आपली राजधानी केली आणी स्वतःसच अफगाणी बादशहा म्हणून घोषित केले. (सन १७४७)

## रोहिले पठाण

हिंदुस्थानात पंजाब, दिल्ली, फरूकाबाद ते रोहिलखंडापर्यंतच्या पट्ट्यात प्रमुखत्वे मुस्लिम राजसत्तेचें संचालन करीत असलेल्या मुस्लिमांमध्ये मोगल नि अफगाण (पठाण) ह्या दोन मुस्लिम जातींमध्ये अंतर्गत द्वेष नि बादशाही पदाविषयी तीव्र स्पर्धा, कधी प्रकटपणे तर कधी गुप्तपणे सारखी चालत आलेली होती. दिल्लीच्या पूर्वीच्या सुलतानशाह्या ह्या अफगाणांच्या होत्या. त्या सुलतानशाहीतील शेवटच्या अफगाण वंशाचा अुच्छेद करूनच मोगलांचा विजेता आक्रमक बाबर ह्याने दिल्लीची बादशाही जिंकून घेतली होती, हे ह्या ग्रंथातही मागे सांगितलेच आहे. तरीसुद्धा, ह्या मोगल बादशाहीतही अनेक अफगाण सरदारांचे वर्चस्व चालूच होते. त्या अफगाणी वर्गात रोहिले आणि पठाण ह्यांची लहानमोठी संस्थाने होती. पुढे थोड्याच दिवसांत मराठ्यांची विजयी सैन्ये अुत्तर हिंदुस्थानात हिंदुराज्ये ठिकठिकाणी स्थापीत जेव्हा दिल्लीला येअून पोचली आणि दिल्लीच्या राजकारणात त्यांच्या सहाय्यावाचून जवळजवळ पानही हालेनासे झाले, तेव्हापासून ते सारे मुसलमानी पक्ष मराठ्यांचे बादशाहीतून अुच्चाटन करण्याचे कार्यी मात्र प्रथम प्रथम अेकजीव होअून जात. परंतु तरीही, पुढे त्या मुसलमानांतील फुटीर नि कारस्थानी नेते आपापल्या पक्षासच मराठ्यांचे साहाय्य गुप्तपणे घेअून अेकमेकांचा पाडाव करण्याचा प्रयत्न करू लागले.

## अहमदशहा अब्दाल्लीची
## हिंदुस्थानवरील स्वारी

दिल्लीतील ह्या अुलाढालीकडे अब्दालीचे पूर्ण लक्ष होते. तिकडील रोहिले पठाणही मराठ्यांच्या द्वेषाने आणि मोगल बादशहाला अुलथून पाडून पूर्वीची आपली पठाणी बादशाही सर्व हिंदुस्थानावर स्थापावी; नाहीतर आपलेही अस्तित्व मराठे अुरू देणार नाहीत अशा विवंचनेत होते, हे तो जाणून होता. ह्या संकाटातून वाचण्याचा त्यांना अेकच मार्ग काय तो सुचत होता. त्याप्रमाणे त्या पठाण रोहिल्यांच्या पुढाऱ्यांनी पठाणांचा नवीनच झालेला स्वजातीय बादशहा आणि जो आजवर त्यांच्या ह्या राजकारणास पाठिंबाही देत आलेला होता त्या अहमदशहा अब्दाल्लीला पत्रे धाडली की 'हिंदुस्थानात अिस्लामास जिवंत ठेवावयाचे असेल तर आता आपण धावून या!' अहमदशहा अब्दाल्लीच्या मनातही हिंदुस्थानात चालू असलेली मरणोन्मुख मोगलसत्ता नष्ट करून पूर्वीप्रमाणे तेथे पठाणी बादशाही स्थापन करावी ही अुत्कट महात्त्वाकांक्षा होतीच. पण तो पूर्वी नादिरशहाच्या स्वारीत त्याचेसमवेत हिंदुस्थानात आलेला होता आणि मराठ्यांच्या वाढत चाललेल्या प्राबल्याची त्याला चांगली कल्पना होती. म्हणून तो सावधपणे अेकेक पाअूल पुढे टाकीत चालला. आतून आतून दुआबातील रोहिले पठाणांना यथेच्छ सैनिक सहाय्य पोहोचवून अब्दाल्ली स्वतः १७४८ च्या जानेवारी महिन्यात लाहोरपर्यंत चालून आला आणि त्याने लाहोर हस्तगत केले. हीच त्याची स्वतःची हिंदुस्थानावरील पहिली स्वारी होय.

पण मोगल बादशहाच्या सैन्याने लाहोरजवळच त्याच्या आघाडीच्या सैन्याचा पराभव केला आणि त्याचा दिल्लीचा मार्ग रोखून धरला. तिकडे त्याच्या पिछाडीवर त्याचा शत्रू जो अिराणचा बादशहा तोही काबूलवर स्वारी करण्याच्या बेतात आहे असे त्याला कळले. मोगल बादशहानेही त्याच्या प्रतिकारासाठी मराठ्यांना तत्काल बोलाविले आहे आणि ते मराठे ससैन्य दिल्लीकडे येण्यासाठी निघाले आहेत, हे वृत्तही त्याला कळले तेव्हा दिल्लीवर चालून जाण्यास ही वेळ ठीक नाही हे

त्या धूर्त सेनापतीने ओळखून अहमदशहा अब्दाल्ली परत काबूलकडे निघून गेला. पण जाण्याआधी 'सारा पंजाब हा माझ्या अफगाणराज्याच्या सत्तेखाली आहे' ही घोषणा मात्र त्याने पुन्हा सर्व हिंदुस्थानभर करविली.

## मरणोन्मुख मुस्लिम बादशाहीच्या शरणागतीचा मराठ्यांशी पहिला करार

मध्यंतरी, दिल्लीच्या मोगल बादशहाने मराठ्यांशी अत्याग्रहाने करार करून त्यांच्याकडे हिंदुस्थानातील बंगाल, बिहार, ओरिसा ते सिंध (मुलतान सुभा) सारा पंजाब, रोहिलखंड, दुआबसुद्धा दक्षिणेतील सर्व सुभ्यांसह साऱ्या हिंदुस्थानचा राज्यकारभार मराठ्यांकडेच सोपविला होता.

ह्या कराराप्रमाणे त्या दिवसापासून बादशहाच्या ह्या कागदी वचनाने तरी मराठे हेच वस्तुत: हिंदुस्थानचे राजसत्ताधीश झाले होते आणि बादशहा हा केवळ अेक नामधारी पुतळा अुरला होता!!

मराठ्यांना वरील बादशहाच्या राजसत्तेच्या मिळालेल्या सर्व अधिकारांचे परिवर्तनात जे प्रचंड दायित्व अंगीकारावे लागले ते अर्थातच हे होते की, मराठ्यांनी कोणत्याही अंतर्गत किंवा सरसीमेच्या पलीकडील बाह्यदेशीय शत्रूंच्या स्वाऱ्यांपासून वा अुपद्रवांपासून बादशाहीचे संरक्षण केले पाहिजे. हे दायित्व प्रचंड असताही, स्वीकारण्याचें सामर्थ्य हिंदुपदपादशाही स्थापन करीत आणलेल्या हिंदूंमधील अेका मराठ्यांच्या मनगटात होते. म्हणूनच त्यांनी ही अट अेखाद्या वरदानासारखी तत्परतेने स्वीकारली.

## अब्दाल्लीची हिंदुस्थानावर दुसरी स्वारी

ह्या कराराची कुणकुण आधीच वर्ष-सहा महिन्यांपासून अब्दाल्लीला कळलेली होती. त्यासाठी त्याने अि. सन १७४९ मध्ये मराठ्यांना केवळ प्रतिरोध करण्यासाठी म्हणून हिंदुस्थानावर दुसरी स्वारी केली. तेव्हा पंजाबचा मोगल बादशहाचा अधिकारी जो मीर मन्नु होता त्यानेच निरुपाय म्हणून अब्दालीला ठट्टा, सिंध (मुलतान), पंजाब हे सुभे आणि त्याच बाजूचे अितर किरकोळ प्रदेश देअून टाकले आणि अब्दाल्लीची त्या प्रदेशांवरील अधिसत्ता मान्य केली. पण ह्याच प्रदेशांवरची राज्यकारभाराची सारी सत्ता मराठ्यांना बादशहाने दिल्याचे वरील करारात जे लिहिले आहे ते या मोगल बादशाहीचा अधिकारी असलेल्या मीर मन्नूच्या शरणागतीने पूसून टाकले गेले. अितकेच समाधान सध्या पुरे आहे, अधिक प्रसंग करण्याची ही वेळ नव्हे, असे पाहून अब्दाल्ली पुन्हा काबूलकडे निघून गेला.

पण बादशहाच्या अधिकाऱ्याच्या या दुटप्पीपणामुळे बादशहानेही त्यास गुप्त संमती दिली. ह्या विश्वासघाताने मराठे चिडून गेले. सापाच्या शेपटीवर जाणूनबुजून पाय द्यावा, त्याप्रमाणे, मराठ्यांशी झालेला बादशाही करार तुच्छ मानून त्याच सिंध, ठट्टा ते पंजाबपर्यंतच्या प्रदेशाचे स्वामित्व अब्दाल्लीने हिसकावून घेतले, ह्याचा सूड घेण्यास मराठे चवताळून अुठले. त्या वेळेत दक्षिणेमध्येही मुस्लिमांच्या, पोर्तुगीजादिक पश्चिमात्यांशी आणि अितरांच्या गृहकलहाच्याही राजकीय संघर्षात मराठे गुंतले होते. यास्तव नानासाहेब पेशवे यांनी पहिली आघाडी म्हणून अुत्तरेकडे सतत झुंजलेल्या आणि म्हणून तिकडचा पूर्ण अनुभव असलेल्या मल्हारराव होळकर आणि जयाजीराव शिंदे या मराठी प्रमुख वीरांनाच तिकडची व्यवस्था लावण्यास आज्ञापिले. त्याप्रमाणे लागलीच त्या दोघा मराठे वीरांनी यमुना नदी ओलांडली आणि पन्नास-साठ सहस्त्र पठाण रोहिल्यांचे सैन्य जे कादरगंज येथे तळ देअून बसले होते, त्यांच्यावरच सन १७५१ मार्च २० ला अकस्मात चाल केली. पठाणांनी अत्यंत चिकाटीने ठाव धरला. पण शेवटी, मराठ्यांनी त्या 'अस्सल' पठाण रोहिल्यांच्या संयुक्त सैन्याची धूळधाण अुडविली. ह्या विजयामागोमाग अहमदखान बंगश हा पठाण फरूकाबादला सशस्त्र चालून आला होता, त्यावरही मराठे तसेच चालून गेले. अहमदखान फरूकाबादेत घुसला तेवढ्यात त्याच्या साहाय्यास येणारे रोहिल्यांचे दुसरे बलवत्तर सैन्यही त्याला येअून मिळाले, पण मराठी सैन्याने त्या अेकत्र झालेल्या दोन्ही 'अस्सल' पठाण रोहिल्यांच्या प्रचंड सैन्यास सन १७५१ च्या अेप्रिलमध्ये अेकत्रच वेढून टाकून रणांगणात खेचले आणि त्यांच्या त्या प्रचंड सैन्यावर तुटून पडून दिनांक २८ अेप्रिल १७५१ ह्या दिवशी घनघोर संग्रामात त्यांचा पूर्ण पराभव केला! वीस पंचवीस

सहस्त्र पठाण अुभे कापून काढले! त्यांचे शिबिरसुद्धा झाडून सारे लुटून घेतले! सहस्त्रावधि घोडी, हत्ती, अुंट नि तोफखाना पाडाव केला. जयाप्पा शिंदे आपल्या पत्रात लिहितात, 'ती सारी लूट हरिभक्तांनी घेतली.'

ह्या लढायांचे वर्तमान पेशव्यास कळताच स्वतः नानासाहेबांसारख्यांना सुद्धा मराठ्यांच्या ह्या पराक्रमाची स्वतःची स्वतःला सुद्धा धन्यता वाटू लागली. त्यानी सरदारांस नि सैन्यास अुत्तेजन देणाऱ्या अुत्तरात स्वतः लिहिले की, 'शाबास तुमच्या हिमतीची नि दिलेरी रुस्तुमीची! दक्षिणच्या फौजांनी गंगा-यमुना पार होअून, पठाणांशी युद्ध करून फत्ते पावावे, हे कर्म लहान सामान्य नव्हे! तुम्ही अेकनिष्ठा कृतकर्मे, दौलतीचे स्तंभ आहात अिराण तुराणपावेतो लौकिक झाला. वझीर पळाला असता फिरोज फत्तेच्या मसनदीवर बसविला.'

## त्या 'अस्सल नि अव्वल' मुस्लिमांचाही गर्व मराठ्यांनी वारंवार धुळीस मिळविला

हिंदूंच्या नि त्यातही मराठ्यांच्या पराक्रमाला शक्य ते ते वैगुण्य आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या मुस्लिम, अिंग्रज, पोर्तुगीज अित्यादी मराठ्यांच्या शत्रूंनी लिहिलेल्या अितिहासातच नव्हे तर आपल्या हिंदू लोकांच्याही दास्यसुलभ वृत्तीने देशोदेशी लिहिलेल्या अितिहासांतूनही असे अेक ठराविक विधान करण्यात येते की, ''पुढे पुढे हिंदुस्थानात मुसलमानांचे जे पराभव होत गेले आणि त्यांचे राज्य मराठे खिळखिळे करू शकले, त्याचे अेक महत्त्वाचे कारण म्हणजे हिंदुस्थानात पूर्वी स्वाऱ्या करणारे मूळचे अरब, मोगल, तुर्क, अिराणी, तुराणी अफगाण, हे लोक त्या त्या वंशांचे जातीचे अस्सल रक्ताचे नि अवसानाचे होते. हिमालयापलीकडील देशांतील सकस वायुमान, मोठमोठ्या नद्या, पर्वतमय नि बर्फाळ प्रदेश, अेकसारखी लढायांतच जीवन गेल्यामुळे त्यांची बनलेली काटक शरीरे आणि मूळचेच असलेले धिप्पाड देह अित्यादी परिस्थितीमुळे त्या कडव्या नि रानटी लोकांच्या स्वाऱ्यांतून त्यांपुढे हिंदुस्थानातील सापेक्षतः सुसंस्कृत पण म्हणूनच सौम्य प्रवृत्तीच्या नि 'दुबळ्या' हिंदूंचा लढायांतून टिकाव लागत नसे. परंतु शतकोशतकांनी हिमालयापलीकडील ते अुग्र जातीचे नि पराक्रमी वृत्तीचे मुसलमान लोक हिंदुस्थानात वंशपरंपरा राहत गेल्यामुळे आणि त्यांच्यातील अनेक वंश राज्य करीत गेल्यामुळे त्या हिंदुस्थानातील मुसलमानांतही अैदीपणा, सौम्यपणा, सुखलोलुपता शिरली. रणांगणात टिकाव धरणारी काटकता नि कडवेपणा पहिल्याप्रमाणे अुरला नाही. हिंदुस्थानातल्या 'निकस' वातावरणाचा त्यांच्या मूळच्या धटिंगण शरीरप्रकृतीवर परिणाम होत गेला. अेकंदरीत त्याच जातीचे मुसलमान लोक हिंदुस्थानात राहिल्यामुळे 'कमअस्सल नि कमकुवत' होत गेले. म्हणूनच काय ते पुढे पुढे विशेषतः मराठ्यांना त्याच मुसलमानांचे पराभव करता आले.''

हे विधान किती अर्धवट नि अवास्तव आहे हे सिद्ध करण्यास वर दिलेल्या दुआबातील रोहिले - पठाणांशी झालेला मराठ्यांचा संग्राम आणि त्यांत मराठ्यांनी वीस वीस सहस्त्र पठाणांना जे अुभे कापून काढले ती अेक घटनाही पुरेशी आहे. हे दुआब ते रोहिलखंडापर्यंत त्यावेळी राज्य करीत असलेले पठाण रोहिले स्वतःला अगदी 'अस्सल अफगाण' समजत असत. मोगल बादशाहीला आणि तुर्क सरदारांना सुद्धा त्यांचा सारखा दरारा वाटत असे. ह्या अफगाणांचा मूळच्या हिमालयापलीकडील पठाणांशी रक्तसंबंधी त्या वेळी अविच्छिन्नपणे होत होता. तिकडच्या 'अस्सल नि अव्वल' पठाणांतून शेकडो लोक या दुआबातील पठाणिस्थानाकडे प्रतिवर्षी येअून बसत. हे अिकडचे अनेक अफगाणही तिकडे जात. म्हणजे दुआब ते रोहिलखंडापर्यंतच्या प्रदेशातील सहस्त्रावधि पठाण रोहिले तोपर्यंत अस्सल पठाणच होते - अफगाणच होते! पण मराठे तर हिंदुस्थानचे शत्रू ज्याला 'निकस' म्हणतात त्या देशात मूळचे वंशानुवंश वाढलेले तरी त्यांनी त्या 'अस्सल' म्हणविणाऱ्या पठाण रोहिल्यांना रणांगणांतील पराक्रमाच्या अंतिम परीक्षेत वारंवार 'कमअस्सल' ठरविलेच की नाही? जेव्हा नादिरशहा सहस्त्रावधि अस्सल पठाणांचे सैन्य घेअून दिल्लीवर तुटून पडला, स्वतः बादशहा झाला आणि महंमद गझनीप्रमाणे दक्षिणेपर्यंत चालून जाण्याच्या वल्गना करू लागला, तेव्हा आता गझनीचा काळ अुरला नाही-आता गाठ मराठ्यांशी आहे. हे सप्रमाण अनुभवास आल्यामुळेच तो 'अस्सल अिराणी आक्रमक' ही हिंदुस्थानाबाहेर त्वरेने निघून गेला नाही का?- केवळ मराठ्यांच्या भयाने!! ह्यापुढे अहमदशहा अब्दाल्लीने अगदी अस्सल तुर्क, अिराणी, दुराणी, पठाणांच्या संमिश्र अशा पन्नास पन्नास सहस्त्रांच्या सैन्यासह हिंदुस्थानवर तीन

चार स्वाऱ्या केल्या, पण प्रत्येक वेळी त्याला मराठ्यांच्याच प्रत्याक्रमणामुळे हिंदुस्थानातून शेवटी कसे निघून जावे लागले, जय - पराजयांच्या अुलथापालथीत पानिपतनंतरही शेवटी दिल्लीच्या साऱ्या मुस्लिम बादशाही सत्तेचे संपूर्ण संचालन मराठ्यांच्याच हाती राहावे, आपण त्यांत लवलेशही हात घालणार नाही, असा संधि करून अहमदशहा अब्दाल्लीसच शेवटी स्वतः दिल्लीचा अनियंत्रित बादशहा बनण्याच्या महत्वाकांक्षेवर पाणी सोडून मराठ्यांच्या पुढे कसे शिर झुकवावे लागले, ते वर्णन आमच्या हिंदुपदपादशाही या ग्रंथातून प्रत्येक हिंदूने अवश्य वाचावे. त्याचा काही अुल्लेख या ग्रंथात खालीही करण्यात येणार आहे.

वैयक्तिक द्वंद्वात शारीरीक अुंचीरूंदीच्या घटकालाही काही महत्व असते. तरीसुद्धा तो निरपवाद नियम नाही. याची साक्ष प्रतापगडच्या पायथ्याखाली असलेले त्या धिप्पाड अफझुलखानाचे थडगे सुद्धा देअील. पण राष्ट्राराष्ट्रांच्या द्वंद्वात तर व्यक्तींचा शारीरीक धिप्पाडपणा नि कंटकता यांच्या मोजमापाने काही जयापजयांचे प्रमाण ठरविता येत नाही. ते 'अस्सल' पठाण सुद्धा ज्यांच्यापुढे खुजे ठरतात अशा अुंच नि धिप्पाड गोऱ्या रशियन सैनिकांच्या राष्ट्रास 'बुटक्या' जपानने पहिल्या युद्धात रणांगणात चारी मुंड्या चीत केले नाही का? आमचे हिंदु गुरखे म्हणजे मराठ्यांच्याच शारीरिक बांधणीचे! पण ह्याच गुरख्यांनी अिटालियन, ऑस्ट्रियन, ते प्रत्यक्ष जर्मनीच्या अुंच अुंच हिटलरी सैन्यांनाही अनेक प्रसंगी महायुद्धातील रणांगणात पाणी पाजले नाही का? साऱ्या जगात 'हिंदु गुरखा' म्हणजे 'शूर सैनिक' हा लौकिक गाजतो आहे! साऱ्या अुंच, धिप्पाड म्हणून नावाजलेल्या जर्मन, रशियन, अित्यादी युरोपियन राष्ट्रांचा अपराजेय सम्राट म्हणून अेकदा कोण गाजत होता? बुटका नोपोलिअन नि त्याचे बुटके फ्रेंच सैन्य!

## अब्दाल्लीची हिंदुस्थानवरील तिसरी स्वारी

बादशहाने गाझीअुद्दीनला मुख्य वझीर नेमले होते. गाझीअुद्दीनने सन १७५६ च्या फेब्रुवारीत पंजाबमध्ये सरहिंदपर्यंत जाअून तेथे अदिनाबेगला मोगल बादशहाचा कारभारी म्हणून नेमले. गाझीअुद्दीनला प्रबळ आधार मराठ्यांचाच होता. गाझीअुद्दीनचे हे कृत्य म्हणजे अब्दाल्लीने बळकावलेला पंजाबप्रांत मोगल बादशहाने पुन्हा हिसकावून घेतल्याचेच द्योतक होते. दिल्लीतही अफगाणपक्षाचे अस्तित्व नामशेष होअून मराठ्यांच्या बळावर गाझीअुद्दीन वजिराचा शब्द म्हणजे मोगल बादशाहीचा शब्द झालेला होता. ह्यावेळी अगदी घाबरून जाअून मलिका झमानी ह्या बादशाही अंत:पुरातील मुख्य नि वृद्ध राजवंशीय कुटिल स्त्री संचालिका हिने स्वतः आणि हिंदुस्थानातील सर्व रोहिले पठाणांचा त्या वेळचा अत्यंत प्रमुख, मराठ्यांचा हाडवैरी, केवळ अुलट्या काळजाचा असा जो नजीबखान रोहिला ह्या दोघांनी मिळून अहमदशहा अब्दाल्लीस गुप्त पत्रे धाडली की, ''जर हिंदुस्थानात अिस्लामी सत्ता राखावयाची असेल तर आता आपणच अेक ती राखू शकाल. तरी पत्रदेखत जय्यत सिद्धतेनिशी हिंदुस्थानवर स्वारी करून यावे. मराठ्यांची मोठमोठी सैन्ये दक्षिणेत गुंतली आहेत. दिल्ली मोकळे मैदान पडले आहे. पण मोगल बादशहाकडून दिल्लीस निघून येण्याचा अत्यंत त्वर्य संदेश मराठ्यांना आधीच गेला आहे. जर का आपल्या स्वारीस थोडाही विलंब लागेल तर मराठ्यांची राजसत्ता त्यांच्या बादशहाशी झालेल्या पक्क्या कराराप्रमाणे पंजाब, ठठ्ठा नि मुलतान (सिंध) पर्यंत प्रत्यक्षपणे चालू झालीच म्हणून समजा! फार मोठ्या सैन्यानिशी ते मराठे दिल्ली-पंजाबवर तुटून पडणार आहेत.''

ही बातमी अैकताच अहमदशहा अब्दाल्ली चवताळून गेला. मराठ्यांना पंजाबादि प्रदेशांच्या राज्यकारभाराची सत्ता मोगल बादशहाने मागे करार करून दिली, त्याचा वचपा काढण्यासाठीच, अब्दाल्लीने लाहोरपर्यंत स्वारी करून अलीकडेच मोगल बादशहाकडून त्या सर्व प्रदेशाची सत्ता छिनावून आपल्या हाती घेतली होती. ती सत्ता पुन्हा गाझीअुद्दिनाने मोगल बादशहाच्या नावाने मोगली राज्यात परत समाविष्ट केली आणि आपणास अेका अक्षरानेसुद्धा विचारले नाही. ह्या आपल्या झालेल्या अुपमर्दाची अब्दालीला साहजिकच चीड आली. त्यामुळे शाह अब्दाल्ली हिंदुस्थानवर स्वारी करण्याकरिता १७५६ च्या नोव्हेंबरमध्ये स्वतः पेशावरला आला. त्याने आपला मुलगा तैमुरशहा आणि सेनापती जहानखान यांना ससैन्य लाहोरवर धाडले. मोगल सेनापती अदिनाबेग ह्याने तैमुरशाही लढाअी दिली, पण अदिनाबेगचा पराभव झाला. अफगाणांची सैन्ये रागारागाने लूटमार करीत लाहोरपासून सतलजपर्यंत पोचली तरी

त्यांचा कोणी प्रतिरोध केला नाही. दिल्लीच्या बादशाही सत्तेची ही दुर्बलता ध्यानात येताच शहा अब्दाल्लीने पेशावरहून त्वरेने त्याच्याबरोबर असलेल्या अैंशी सहस्र सैन्यासह मध्ये कुठेही न थांबता सरळ दिल्लीवर स्वारी केली. (सन १७५७ जानेवारी) जवळ जवळ कोणाचाही प्रतिकार न होता दिल्ली त्याच्या हाती पडली. त्याने तत्काळ तेथील बादशाहीचा अधिकार आपल्या हाती घेतला आणि बादशहा अहमदशहा अब्दाल्ली या नांवेच सर्व राज्यकारभार चालू केला.

पण प्रत्येक नव्या मुस्लिम बादशहाचे जे पहिले बादशाही कृत्य असलेच पाहिजे असा मुस्लिम धर्मशास्त्राचा त्या काळचे पठाणी मुसलमान जो अर्थ समजत असत, ते प्रथम धर्मकृत्यही त्याने लगेच पार पाडले. ते नव्या मुस्लिम बादशहाचे पहिले धर्मकृत्य आपल्या प्रतिष्ठेस शोभेशा रीतीने साजरे व्हावें म्हणून बादशाहा होताच अगदी य:कश्चित कारणाकरता तो रागावलासुद्धा आणि त्यानिमित्त आपण बादशाहीची राजसत्ता हाती घेतली आहे हे घोषित करण्यासाठी दिल्लीच्या जनतेचा सरसकट सामुदायिक शिरच्छेद करण्याची आज्ञाही त्याने सोडली आणि काही तासांच्या अवधीत अठारा सहस्रांहून अधिक लोकांना त्याच्या त्या 'अस्सल नि अव्वल' हिमालयापलीकडील अफगाणांनी रक्तस्नान घातले, सरसकट कापून काढले! नंतर लगेच तितकेच महत्त्वाचे जे दुसरे मुस्लिम बादशहाचे 'शास्त्रोक्तपणे' राज्याभिषेक करून घेण्याचे त्या काळचे मुस्लिम धर्मकृत्य असे तेही त्याने पार पाडले आणि 'मी' 'अिस्लामचा अेक नम्र भक्त असल्याकारणाने काफरांचा आणि त्यांच्या देवालयादि धर्मसंस्थांचा विध्वंस हिंदुस्थानातून आमूलाग्र करणार आहे,' अशी जितकी भयंकर तितकीच अर्वाच्य घोषणा केली!

त्या घोषणांना त्याने लगोलग कार्यवाहीतही आणले. तत्काल त्याच्या आज्ञेने दिल्लीतील देवळें, मंदिरे, देवमूर्ती, हिंदूंची घरेदारे धडाधड कोसळू लागली, पेटून भडकू लागली. बादशाह अब्दाल्लीचा मुख्य 'घुस्सा' मराठ्यांनी मथुरा, प्रयाग अित्यादी जी अनेक लहान-मोठी हिंदूंची तीर्थक्षेत्रें मुसलमानांच्या हातून अलीकडेच हिसकावून घेतली होती त्या त्या स्थलांवर होता. म्हणून त्याने ती ती पुन्हा भ्रष्ट करण्याचा सपाटा चालविला. अशा प्रसंगी या राक्षसी, क्रूर नि आक्रमक विजेत्यांची दिल्ली घेताच बहुधा पहिली धाड पडे ती दिल्लीपासून जवळ असलेल्या बिचाऱ्या मथुरेवर पडे; आणि त्या धन्य पुण्यनगरीनेही, अेखाद्या चितोडच्या जोहारातील वीरांगनेप्रमाणे किंवा मूर्तिमंत चितोड नगरीप्रमाणेच त्या त्या अग्निदिव्यात आपला वारंवार बळी दिला. परंतु या वेळेस तिने पूर्वीप्रमाणे अगदी न लढताच मुसलमानांच्या क्रूर धर्मछळापुढे स्वत:चे बलिदान केले नाही. विवरित (detailed) वर्णन स्थलाभावी देता येत नसताही, अितके तरी सांगणे अवश्य आहे की, जवळजवळ पाच सहस्त्र हिंदु जाट नागरिकांनी मुसलमानांच्या त्या अगणित नि संघटित सैन्यास प्राणांतिक लढाअी दिली. प्रत्येकी मरेतोपर्यंत तो तो हिंदु धर्मवीर म्लेंच्छांस मारता मारता मेला! मथुरेला रक्तस्नान घातल्यानंतर आणि देवालयांच्या पाडलेल्या ढिगाखालीच तिला गाडून टाकल्यानंतर तो दुष्ट अब्दाल्ली जवळच असलेले हिंदूंचे दुसरे पवित्रक्षेत्र जे गोकुळ, वृंदावन त्यावर जाअून आदळला. या क्षेत्रावर त्याचा विशेष राग तोच होता की, ते मराठ्यांनी मुस्लिमांच्या हातून अलीकडेच छिनावून घेतले होते. या आकस्मिक राक्षसी आक्रमणास तोंड देण्यासाठी, स्वधर्मासाठी मरेतो लढण्याच्या प्रतिज्ञा घेअून तेथील 'नंगे गोसाव्यांच्या' सुप्रसिद्ध आखाड्यातील दोन सहस्त्रांवर शूर गोसावी अब्दाल्लीच्या मुस्लिम सैन्यावर सहसाच तुटून पडले. त्या बैराग्यांचा हा मारा अितका आकस्मिक, संघटित आणि भयंकर होता की अब्दाल्लीचे सैन्य अेकदम मागे कोसळले. मुसलमानांचे सहस्रावधी सैन्य ठार मारले गेले, आणि त्या धर्मवीर गोसावी वीरांचे पण! दिवसभर अशी रणधुमाळी चालल्यानंतर मुसलमान ते नगर सोडून मागे परतले आणि त्यांच्या गोकुळनाथाचे संरक्षण केल्याविषयी स्वकीय धन्यतेच्या जयघोषाने त्या नंग्याबैरागी संप्रदायाने सारे गोकुळ-वृंदावन गर्जवून दिले. नंगा गोसावी असावा तर असा!

तेथून अब्दाल्ली सरळ आग्र्यावर चालून गेला आणि त्या बळकट दुर्गास त्याने वेढा घातला. याच दुर्गात पठाण पक्षाचा हिंदुस्थानातील परमद्वेषी आणि म्हणून मोगल बादशाही टिकविण्यास मन:पूर्वक झटणारा जो वझीर गाझीअुद्दीन तो लढत होता आणि क्षणाक्षणाने त्याचे मुख्य संरक्षणकर्ते नि साहाय्यक जे मराठे त्यांच्या येण्याची वाट पाहात होता!

पण, अशा हिंदुधर्मावरील आणीबाणीच्या वेळी जयपूर, जोधपूर, अुदयपूर आणि तिकडील अितर प्रांतांतील लक्षावधि - कोट्यवधि हिंदुराजेरजवाडे, लढवय्ये नि लोक काय करीत बसले होते? त्यांच्या डोळ्यांसमोर अब्दाल्ली सहस्त्रावधी गाअींना, हिंदु स्त्रियांना, स्वधर्म वाचवा म्हणून सरसकट सहस्त्रावधि हिंदूंना कापीत चालला असता, हिंदूंच्या वरील हुतात्मा रक्ताच्या पावसाने सारी तीर्थक्षेत्रे लालाभडक करीत चालला असता ह्या साऱ्या वर दिलेल्या लक्षावधी कोट्यवधि हिंदु लोकांपैकी सामान्य जनता जेवढी होती तेवढी मराठे केव्हा येतात नि या मुस्लिम अत्याचाऱ्यांच्या हातून आमची नि आमच्या धर्माची सुटका केव्हा करतात याची केवळ अनिमिष वाट पाहात होती! आणि जे अितर हिंदुराजे-रजवाडे, जहागिरदार लढवय्यांची सैन्ये होती, ती बसली होती केवळ मराठ्यांचा द्वेष करीत! सारे रजपूत मराठ्यांचा नायनाट अब्दाल्लीने परस्पर केला तर टाळी वाजविण्यासाठी हात अुभारून अुभे होते! त्या तिकडील हिंदूंपैकी अनेक लहानमोठे संस्थानिक तर अब्दाल्लीशी आतून अनुसंधान बांधून होते! पण मराठ्यांचे सिंधु-मुलतानपासून अुत्तर हिंदुस्थानात थेट रोहिलखंडाच्या अंतापर्यंत नि नेपाळच्या सीमेपर्यंत वाढत गेलेले राजकीय प्रभुत्व ह्या अुत्तरेतल्या हिंदू-मुसलमान राजेरजवाड्यांच्या अिच्छेप्रमाणे अब्दाल्लीने नष्ट केले असते तर काय? हा प्रश्न काही त्या हिंदूंच्या बधिर मनाला डिवचून गेला नाही! मराठ्यांचे मागून त्या साऱ्या प्रदेशात पुन्हा हिंदू प्रभुत्व स्थापन करणारा मुसलमानी सत्तेचा काळ नि विजेता होणारा अेक तरी हिंदुमायेचा पूत त्या हिंदूंत होता का? नाही! म्हणजे मग मराठ्यांचे प्रभुत्व जर अब्दाल्लीने नाहीसे केले असते आणि त्याची मुस्लिम बादशाही साऱ्या हिंदुस्थानात पुन्हा प्रस्थापित झाली असती तर या हिंदुराजपूत प्रभृति मराठ्यांचा द्वेष करणाऱ्या अुत्तरेच्या नाकर्त्या हिंदूंच्या पदरांत काय पडले असते? केवळ कोणा नव्या अल्लाअुद्दिनचे किंवा नव्या औरंगजेबाचे मुस्लिम साम्राज्य आणि हिंदुधर्मावरील आणि राज्यावरील भयंकर अत्याचार नि लाखो हिंदूंचा रक्तपातच ना?

पण, मुसलमानी सत्तेचा सत्यानाश व्हावा अशी सुप्त तळमळ ज्यांच्या हृदयात होती आणि तसा नाश करण्यास समर्थ असे अेक हिंदू मराठे तेवढेच आहेत अशी मनातून निश्चिती असल्यामुळे चातकाप्रमाणे मराठ्यांच्या येण्याची गुप्तपणे वाट पाहणारी, तथापि, स्वतः काहीही करू न शकणारी अशी जी लक्षावधी असंघटित हिंदूंची जनता तिकडे होती म्हणून वर सांगितले आहे त्या जनतेच्या अिच्छाशक्तीमुळे म्हणा अथवा अेकंदर हिंदुराष्ट्राच्या मूळ जीवनयोजनेमुळे म्हणा, पण तसे काहीअेक घडले नाही.

कारण, रघुनाथराव दादा यांच्या नेतृत्वाखाली मल्हारराव होळकर ह्यांना दक्षिणेतून नानासाहेबाने वरील प्रकारची मराठे सरदारांची नि गाझी-अुद्दिनादींची पत्रे आल्यावरून तत्काल अुत्तरेत ससैन्य धाडले. अुत्तरेकडील गोविंदपंत बुंदेले, बर्वे अित्यादी सरदारसुद्धा सर्व मराठी पुढाऱ्यांनाही रघुनाथरावाला साहाय्य देण्याची निकडीची पत्रे गेली. रघुनाथराव अिंदूरच्या पुढे जातात न जातात तोच बातमी आली की, अहमदशहा अब्दाली आग्र्यापासून मराठ्यांच्या प्रत्याक्रमणाची वार्ता अैकताच त्याने घेतलेली मथुरा, वृंदावन, प्रभृति सर्व हिंदु क्षेत्रे नि हिंदुप्रदेश सोडून दिल्लीला गेला, आणि तेथून त्याने मिळविलेले सगळी लूट तेवढी बरोबर घेअून काबूलकडे चालता झाला. पण जाताना हिंदुस्थानातील त्याची सत्ता चालविण्यासाठी त्याचा मुलगा जो तैमूरशहा त्याला तिकडील प्रदेशाचे प्रभुत्व दिले, आणि त्याच्या हाताखाली दशसहस्र सैन्य सरहिंदला ठेवले. त्याचप्रमाणे, पंजाबात पुढे जाता जाता महत्त्वाच्या ठिकाणी आपले अधिकारीही ठेवले.

अिकडे जी मराठी सैन्ये रघुनाथराव याच्या सैन्यापत्याखाली अुत्तर हिंदुस्थानातील निरनिराळ्या मराठी सेनानींच्यासह अेकत्र झाली होती त्यांना घेअून त्यांनी अुत्तर हिंदुस्थानात ज्यांनी ज्यांनी मराठ्यांविरुद्ध अब्दालीच्या आधारवर बंडाळी मांडली होती त्यांची त्यांची डोकी ठेचून टाकण्यास प्रारंभ केला. सखाराम भगवंत, गंगाधर यशवंत, आणि अितर मराठे सरदारांनी दुआबमध्ये शिरून रोहिल्यांना आणि पठाणांना पुन्हा चोपून काढले. वजीर गाझीअुद्दीन अब्दाल्लीच्या पक्षाच्या हाती बंदिवान झालेला होता त्यास सोडवून आपल्या कह्यात आणले. स्वतः विठ्ठल शिवदेवाने दिल्लीवर चाल केली आणि जवळ जवळ पंधरा दिवसांच्या निकराच्या लढाअीत अब्दाल्ली पक्षाचा धुव्वा अुडवून देअून त्या राजधानीत पुन्हा

प्रवेश केला. आणि सगळ्यांत मुख्य गोष्ट जी केली ती म्हणजे मराठ्यांचा कट्टर शत्रू आणि अब्दाल्लीचा अुजवा हात जो नजीबखान रोहिला त्याला जिवंत पकडले. यामुळे, अब्दाल्लीने त्या प्रांताचा स्वतःला बादशहा समजून जी व्यवस्था केली होती ती सारी अकस्मात कोसळून पडली. दिल्लीपुढे सरहिंदला अब्दाल्लीने दहा सहस्र पठाणी सैन्य जे त्याच्या प्रभुत्वरक्षणासाठी अब्दुल समद नांवाच्या सेनानीच्या नेतृत्वाखाली ठेवलेले होते, त्यांचे धैर्य डळमळीत झाले. अितक्यात, दिल्लीहून मराठेही सरहिंदवर चालून आले. तेव्हा मुसलमानी सैन्याचा रीतसर लढाअी देण्याच्या आधीच गोंधळ अुडून लहानमोठ्या चकमकीत मराठ्यांनी धुव्वा अुडवून दिला आणि त्यांचा सेनानी जिवंत पकडला. ही बातमी हां हां म्हणता बादशहा अब्दालीचा पुत्र नि पंजाबवर त्याने नेमलेला त्याचा प्रमुख प्रतिनिधी (गव्हर्नर) तैमूरशहा आणि त्याचा सरसेनापती जहानखान ह्यांना कळताच लाहोर निकराने लढविण्याचाही त्यांचा बेत त्यांनी सोडून दिला आणि मराठ्यांच्या ह्या प्रभावी नि वेगवान प्रत्याक्रमणामुळे मराठ्यांना तोंड देण्याचेसुद्धा धाडस न करता ते दोघेही लाहोर सोडून मराठे लाहोरात घुसतात न घुसतात तोच काबूलकडे ससैन्य माघार घेते झाले. अब्दाल्लीने त्यांना निक्षून सांगितले होते की, कोट्यवधि रुपयांची लूट अजून तुमच्या हाती आहे ती शत्रूच्या हाती पडू देअू नका. यासाठी त्यांनी ती सांभाळून नेण्याची आणि माघारही व्यवस्थितपणे चालविण्याची पराकाष्ठा केली. पण मराठ्यांच्या सेनेने लाहोरच्या पुढेही घुसून मुस्लिमांच्या केलेल्या पाठलागात तैमूरची अितकी लांडगेतोड केली की त्याचे हत्ती, घोडे, अुंट, रोकड, यच्चयावत् संपत्ती ठिकठिकाणी टाकून देत जेव्हा अटक ओलांडून तैमूर त्याच्या प्रदेशांत पळून गेला तेव्हा त्याच्यापाशी भारतातील लुटीचा अंश असा त्याचा अेक जीव तेवढा राहिलेला होता! बाकीचे त्याचे म्हणून जेवढे वस्तुजात होते ते सर्व मराठ्यांनी लुटून, अफगाण सैन्य त्याच्यासारखेच स्वतःचा जीव काय तो बचावून काबूलला परत गेले तेवढेच काय ते जगले! अब्दाल्लीच्या मागे त्याने हिंदुस्थानात साऱ्या हिंदुधर्माचा आणि हिंदुलोकांचा विध्वंस करण्याकरता म्हणून ठेवलेले जे पंधरा-वीस सहस्र 'अस्सल पठाणादि' मुस्लिमांचे सैन्य दिल्लीपंजाबात होते ते तुकड्यातुकड्यांनी, टोळ्याटोळ्यांनी, व्यक्तिव्यक्तिशः गाठून मराठ्यांनी झुंजीत ठार केले. (१७ मार्च १७५८)

बादशहा अहमदशहा अब्दाल्ली ह्याचा असा लांच्छनास्पद पराभव करून मराठ्यांनी त्याच्या अफगाण बादशाहीतील परत जिंकून घेतलेल्या सिंध ते मुलतानपर्यंत आणि मुलतान ते सरहिंदपर्यंतच्या साऱ्या विस्तृत प्रदेशाची राजसत्ता आणि राज्यकारभार हा पूर्वी ठरलेल्या मोगली बादशहाच्या कागदी कराराप्रमाणे जिंकला होता तो आता मराठ्यांनी आपल्या पौरुषाने प्रत्यक्ष जिंकून हाती घेतला! पण, त्या वेळेस दिल्लीचा मोगली बादशहा आणि त्याचा वझीर जो गाझीअुद्दीन त्यांच्याही हितासाठी हीच गोष्ट अवश्य होती हे ते जाणून होते; म्हणून रघुनाथराव साऱ्या पंजाबची राजधानी जी लाहोर तेथे पुन्हा राजधानीचा सर्व थाट नि राज्यकार्य चालू करण्यासाठी प्रकटपणे जाण्याच्या प्रसंगी मोठा बादशाही अुत्सव करावा, अशी दिल्लीच्या बादशहानेच आज्ञा सोडली. सारा पंजाब नि आजूबाजूचेही प्रदेश जिंकून घेणाऱ्या मराठ्यांच्या पराक्रमाने, त्या काळापूर्वी पंजाबात नुसताच स्थानिक धुमाकूळ घालीत असलेले हिंदूंचे काश्मीर, डोग्रादि रजवाडे, शिखांच्या 'मिसली' आणि मुसलमानांचे तथाकथित अमीर-अुमराव, निजाम, नबाब अित्यादी प्रस्थे आश्चर्याने नि भयाने चकित होअून गेली होती. दबून गेली होती; आणि सेनापती रघुनाथराव यांना अंकितभावाने येअून मिळू लागली होती. पंजाबात त्या वेळी शिखांचे प्रस्थ हळूहळू वाढत चालले होते. त्यात अहमदशहा अब्दाल्लीने मराठ्यांच्या भयाने अलीकडेच काबुलास माघारे जाताना वाटेत शिखांचे मुख्य क्षेत्र जे अमृतसरचे सुवर्णमंदिर ते पाडून टाकले होते आणि तेथील ते पवित्र सरोवर चिखल - मळ - माती-दगडांची भर घालून बुजवून टाकले होते. यामुळे, अब्दाल्लीचे शिखांशीही अुभे शत्रुत्व ठाणले होते. म्हणून, शिखांतील त्या वेळच्या अेका प्रबळ मिसलीचा मुख्य जो आलासिंग जाट (ज्याला त्या वेळच्या मराठी पत्रव्यवहारातून आला जाट म्हटलेले आहे तो) सरहिंदच्या लढाअीत तर मराठ्यांना अुघडपणे येअून मिळाला होता. ह्या सर्व पंजाबातील राजकीय अुलाढाली करणाऱ्या पक्षांतील आणि पुढाऱ्यांतील बहुतेकांची अनुकूलताही रघुनाथरावाचा असा मोठा सन्मान करण्यास असल्यामुळे हा बादशाही समारंभ मराठी सैन्यासह रघुनाथराव ज्या दिवशी

सिंधूकडच्या प्रदेशाकडे स्वारी करून परत येतील आणि पंजाबची राजधानी जी लाहोर तेथेच काही कालाकरिता तरी वास्तव्य करण्यासाठी लाहोरात प्रवेश करतील, त्यानंतर थोड्याच दिवसांत साजरा करावा, असे ह्या सर्वांनी ठरविले.

## पंजाबात रघुनाथराव पेशव्यांचा विजयप्रवेश

तैमुर लाहोर सोडून सरसीमेपलीकडे पळून जात असता त्याच्या सांगाती जी प्रचंड लूट पळविली होती ती छिनावून घेण्यासाठी रघुनाथवरही लाहोर सोडून त्या धूम पळत सुटलेल्या पठाणी सैन्याचा पाठलाग करीत पंजाबात पुढे घुसला. अर्धाअधिक पंजाब जिंकीत आणि अब्दाल्लीच्या त्या सैन्यास 'दे माय धरणी ठाय' करीत सीमेकडे हुसकून दिल्यानंतर पुढचे अुरलेले सीमाविजयाचे काम मराठ्यांच्या अनेक सैनिक पथकांकडे सोपवून रघुनाथराव जिंकलेल्या प्रदेशात मराठी सत्तेची घडी पक्की बसविण्यासाठी पंजाबची मुख्य राजधानी जी लाहोर तिकडे परतला आणि ११ अेप्रिल १७५८ ला लाहोरात मराठी सैन्यासह विजयप्रवेश करता झाला.

त्याच्या या विजयप्रवेशाचे अभिनंदन नि गौरव करण्यासाठी लाहोरला मोठा अुत्सव करण्यात आला स्वतः रघुनाथराव बादशाही राजवाड्यातच अुतरले होते. मराठी सैन्याचे प्रमुख अधिकारीही लाहोरातील मोठमोठ्या वाड्यांतून किंवा लाहोरच्या परिसरात आपापले तळ ठोकून राहिले होते. जिकडे तिकडे शेकडो शृंगारलेले हत्ती, घोडे, अुंट, पुष्ट वृषभ मिरवत होते. ठिकठिकाणचे हिंदु-मुसलमान अधिकारी, अमीर, अुमराव, तथाकथित नबाब, निजाम, राव, राजे-रजवाडे हे त्या दिवशीच्या दुपारी भरविलेल्या भव्य राजसभेत अुपस्थित राहिले होते. त्या सर्वांकडून पंजाबातील बादशाही सैन्यासुद्धा सर्व राजसत्तेचे आणि राज्यकारभाराचे आधिपत्य ज्या पेशव्यांना अर्पिले होते, त्यांचे विजयी प्रतिनिधी म्हणून रघुनाथराव पेशवे यांचा सर्वांनी मोठा गौरव केला. सर्वांकडून आपापल्या परीने रघुनाथरावांना अंकित भावाने नाना प्रकारचे पुरस्कार (नजराणे) अर्पण करण्यात आले. रात्री नगरात जिकडे तिकडे मोठा लखलखाट करण्यात आला. प्रेक्षणीय दारूकामही सर्वत्र अुडविण्यात आले. लाहोर नगराच्या लगतच्या नगरातूनही असेच मोठे दीपोत्सव नि दारूकाम प्रदर्शविले गेले!

ही हिंदूंच्या - मराठ्यांच्या विजयोत्सवाची राजसभा आणि हे दीपोत्सव कुठे साजरे झाले? तर मोगल घराण्यातील अकबर, औरंगजेब असले असले मुस्लिम बादशहांचे जे विलासस्थान होते त्या सुप्रसिद्ध लाहोरच्या शालिमार बागेच्या भव्य पटांगणात!! मुसलमानांच्या राजसत्तेला मराठ्यांनी अशी बटीक बनविली!

मराठ्यांनी मिळविलेल्या ह्या विजयचे वृत्त अैकून दक्षिणोत्तर नि पूर्व-पश्चिम हिंदुस्थानात मराठ्यांच्या हिंदुपदपादशाहीच्या जिवापाड पराक्रमाविषयी जे जे स्वतःही अुत्युत्कट प्रयत्नशील होते किंवा अत्युत्सुक शुभचिंतक होते अशा लक्षावधि राजेराजवाड्यांच्या, लहान-मोठ्या सरदारांच्या, शास्त्रीपंडितांच्याच काय, पण निरिच्छ साधुवर्गीयांच्या कडूनही अभिनंदनपत्रांचा रघुनाथराव पेशव्यांवर नुसता पाअूस पडत होता! आम्ही या ग्रंथात मागे वर्णिल्याप्रमाणे त्या पत्रलेखकांच्या भावना ह्या कल्पनातीत हिंदूंच्या विजयामुळे अितक्या अुत्कट झाल्या होत्या की त्या साध्या गद्यमय वर्णनाच्या कक्षेत मावून शकल्या नाहीत! तर, काही दैवी पुराणांतरीच्या वर्णनातूनच त्या व्यक्त होअू शकल्या. याचे अेक अुदाहरण म्हणून पेशव्यांच्या दिल्लीमधील सेनापती अंताजी माणकेश्वरासारख्या केवल साधी प्रतिवृत्ते (Political reports) लिहिण्याची सवय असलेल्या आणि अेक अुच्च अधिकारी असलेल्या पुरुषाचे रघुनाथरावांना ५ मे १७५८ला जे पत्र गेले तेच पहा!

'सेवकास स्वामीनी कृपा करून पत्र (१८ अेप्रिलचे) पाठविले ते पावले. वर्तमान लाहोरच्या फत्तेचे, शत्रूच्या पारिपत्याचे नि तिकडील मुलूख काबीज केल्याचे लिहिले ते सविस्तर वाचून परम आनंद झाला तो पत्री कोठवर लिहावा. हिंदुस्थानात कीर्त लौकिक मातबर झाली. कुलराजे, अुमराव, सुभे यांस दहशत पडली. सारे हिंदुस्थानचा सूड अब्दाल्लीपासून अेक स्वामींनी घेतला. तेणेकरून यशाचे पर्वत झाले. स्वामी यशस्वीच आहेत. याचा विस्तार सेवकास लेखन करावयास सामर्थ्य कैचें? हे वर्तमान वजिरांनी अैकोन बहुतच हर्ष मानिला. स्वामी अवतारी पुरूष आहेत. त्यांची स्तुती मनुष्यांनी काय करावी! सेवकास आश्रय स्वामींचे पायाखेरीज दुसरा कोठेही नाही. जरी स्वामींची छावणी लाहोर

प्रांती झाली, ती वजीर पादशहास घेऊन छावणीत आपल्याजवळ येतो. वजीर नि लहानमोठे सर्व म्हणतात की खास छावणी न जाली तर पठाण मागती लाहोर प्रांती पावसाळा येतील. अुगेच लोक म्हणतात ते सेवेशी लिहिले. करणे न करणे अख्त्यार खावंदांचा. वजीर नि पादशहा यावयाचा निश्चय कोणे प्रकारचा तो निवडून सेवकास आज्ञा लिहावी, त्याप्रमाणे त्यास घेऊन विठ्ठल शिवदेव सेवेशी येतील त्याप्रमाणे कृष्णराव (काळे) ही येतील. सर्व विनंती करतील, (५-५-१७५८)

## सेनापती रघुनाथराव पेशवे यांनी पंजाब विजयाचे स्वतः धाडलेले प्रतिवृत्त

आता रघुनाथरावांना दक्षिणेत पावसाळ्याआधी ससैन्य परत येण्यासाठी श्रीमंत नानासाहेब यांची पुण्याहून पत्रांवर पत्रे येअू लागली होती. परंतु पंजाबातील जो विस्तीर्ण प्रदेश मराठ्यांनी अलीकडेच जिंकला होता त्याची पक्की राज्यव्यवस्था लावण्याचे काम लगोलग करून टाकणे हे अवश्य असल्याने रघुनाथरावाने ससैन्य पंजाबातच आणखी चार महिने तरी थांबून राहणे अत्यंत अिष्ट होते. रघुनाथरावाने दक्षिणेत, मल्हारराव होळकरांसह, सध्याच परत जाअू नये असा अुत्तर हिंदुस्थानात सगळ्याच मराठी कर्त्या मंडळीचा नि सेनानींचा आग्रह पडला होता. परंतु, स्वतः रघुनाथरावाच्या नि मल्हारराव होळकराच्या मनाचा कलही दक्षिणेकडे जावे असा होता. त्यात आता नानासाहेब पेशव्यांनीच ''परत या'' अशी आज्ञा सोडल्याने रघुनाथरावाने, मराठ्यांनी या स्वारीत जो अपूर्व विजय मिळविला त्याचे अधिकृत प्रतिवृत्त (Offical report) स्वतः लिहून श्रीमंत नानासाहेबांना धाडले आणि ढाला परत फिरविल्या. मल्हाररावासह अनेक मराठे सरदारही रघुनाथरावासह दक्षिणेकडे निघाले. पंजाबात शक्य तितकी सेना निरनिराळ्या स्थानी मराठी सत्ता पक्की करण्यासाठी रघुनाथरावाने काही सरदारांसह अर्थातच मागे कामावर ठेवलेली होती.

या पंजाबवरील स्वारीतील मराठ्यांच्या पराक्रमाचे वर्णन अेखाद्या वीर काव्यातील सर्गा सारखे भव्योदात्तपणे करता येण्यासारखे असताही रघुनाथरावाने त्याचे जे प्रतिवृत्त पुण्यास धाडले म्हणून वर सांगितले आहे ते किती सैनिकी बाण्याचे, लवलेश पाल्हाळ वा आत्मस्तुती किंवा मिथ्या स्तोम नसलेले केवळ घटना नि अपरिहार्य राजकीय चर्चा तेवढीच काय ती अुल्लेखिणारे आहे ते बघण्यासारखे आहे. यास्तव ते प्रतिवृत्त जसेचे तसे रघुनाथरावाच्या शब्दांमध्येच खाली देत आहो.

ता. ४-५-१७५८ रोजी रघुनाथराव पेशव्यांस लिहितोः 'लाहोर, मुलतान, काश्मीर वगैरे अटकेअलीकडील सुभ्यांचा बंदोबस्त करून अंमल बसवावा, त्यास, काही जाला, काही होणे तोही लवकरच करितो. तयमूर सुलतान नि जहानखान यांचा पाठलाग करून फौज लुटून घातली. थोडीशी झडत-पडत अटकेपार पिशावरास ते पोचले. अब्दाली अिराणवर चालून गेला, त्याची फौज पादशहाने लुटून घेतली. अब्दाली कंदाहरास आला, अिराणची फौज पाठलाग करीत आली आहे. जबरदस्तखान नि मुकरबखान या प्रांतीचे सरदार नि जमिनदार अब्दालीच्या जबरदस्तीमुळे त्यास रूजू होते, तेही बदलोन हंगामा करितात. हल्ली रफीक होअून सेवा करून दाखवू, अब्दालीस तंबी भरू अशा त्यांच्या अर्ज्या झाल्या आहेत. अब्दालीचा धीर सुटला आहे. सारांश, त्यांचा जोम तिकडून होतो अैसे नाही. तिकडून अिराणचे शहाने जेरबस्त केले. तिकडून जोरा पोचवून सरकारचा अंमल अटकेपार करावा. त्याचा पुतण्या नि दौलतेचा वारस स्वामींपाशी देशाला आला. तो स्वामींनी आम्हांकडे पाठविला होता. त्यास अटकेअलीकडे थोडीशी जागा बसावयास देअून अटकेपार काबूल पिशावरचा सुभा देअू. अब्दालीच्या फौजेवर अब्दुल समरखान सरहिंदेत होता, तो सरकारात पाडाव आहे. तो नि आणखी या प्रांतीची फौज, अिराणी, मोंगल देवून मशारनिल्हेची रवानगी करितो. हे तिकडील पैरवी करतील. पारिपत्य अुत्तम प्रकारे करून अटकेपार अंमल बसवतील, लाहोरप्रांती रेणके अनाजी नि रायजी सखदेव असे ठेविले. गोपाळराव गणेश (बर्वे) यांचाही पैगाम आहे, तेही राहतील. अिराणचे पादशहाचे स्वदस्तुरचे कागदही आम्हांस नि मल्हारबांस आले होते की लौकर कंदाहारास यावे आणि यांचे पारिपत्य करून अटकेची हद्द करावी. परंतु आम्ही तरी काबुलचा अब्दुल रहीमखान, स्वामीनी पाठविला, त्यास देतो फौज वगैरे थोडे बहुत साहित्यही करितो. काबूल नि कंधार हे अटकेपारचे सुभे हिंदुस्थानकडे अकबरापासून अलमगीरपावेतो होते, ते आम्ही विलायते कां द्यावे.

अिराणचा अंमल बसवून तूर्त त्यास गोडच जाब पाठविणार आहो. जंबू काश्मीर वगैरे तमाम वकील आले आहेत. मामलत थोडीबहुत अटके अलीकडील करीत आहो. पलीकडील तूर्त होत नाही. खटपट मात्र होअील. तूर्त तांतडीमुळे जे होअील ते करितो. पुढील स्वारीस जो कोणी मातबर येअील तो बंदोबस्त करील. मुलूख दोचौ करोडींचा वसुली, परंतु जमिनदार भवास मोठमोठे आहेत. आम्ही नांवास मात्र खंडणी करितो. जेथे पंचवीस लक्षांचा मुलुख तेथे अेक दोन लक्ष येणेच कठीण आहेत. तूर्त माघारी फिरावयाचा डौल स्वामींचे आज्ञेवरून वरिला आहे, याचमुळे जे होते तेच करितो, तटी लावीत नाही. तूर्त अदिना बेगावरच सारा यखतियार दिल्हा आहे; त्यासच कमाविसीने लाहोर मुलतान दिल्हे आहे. यंदा तर सारे शिबंदी खालीच जाअील, शिबंदी करताच कठीण पडेल, दोन-तीन वर्षांनी काही सोअीस लागेल, स्वामींस कळावे'.

## लांच्छनास्पद गोष्ट ही की,
## मराठ्यांनी दक्षिणेत परतताना मुस्लिमांवर धार्मिक सूड मात्र अुगविला नाही!

ह्या ग्रंथाच्या ह्या दुसऱ्या भागाच्या पूर्वार्धात हिंदुसमाजाला सद्‌गुणविकृतीच्या दुष्ट व्याधीने कसे पछाडलेले होते आणि त्यामुळे हिंदुधर्मावर मुसलमानांनी जे असह्य नि अपरिमित अत्याचार केले त्या धार्मिक अत्याचारांचा मात्र हिंदूंनी, शक्ती पुन्हा अंगी आली असताही, कसा लवलेश सूड अुगविला नाही, त्या वेळच्या मुसलमानांसारख्या राक्षसी धार्मिक अत्याचारांनाच स्वधर्म समजणाऱ्या शत्रूंवरही त्यांनी हिंदुधर्मावर केले तसेतसेच किंबहुना त्याहून जास्त कठोर प्रत्याचार त्या मुसलमानांवरही करून त्या वेळेसच हिंदूंनी हिंदुस्थानाला निर्मुस्लिम केले नाही, जसे स्पेनने, पोर्तुगालने, बल्गेरिया, ग्रीस अित्यादी देशांनी त्यांच्या त्यांच्या देशांना निर्मुस्लिम करून ख्रिश्चन धर्माला संकटमुक्त केले - हे सविस्तरपणे सांगितलेलेच आहे. परधर्मीयांनी आपल्या धर्मावर काहीही अत्याचार केले तरी आपण त्यांचा प्रतिकार करण्यासाठी सुद्धा त्यांच्या त्या आक्रमक परधर्मावर प्रत्याक्रमणे न करणे अशी परधर्मसहिष्णुता हाच निदान आपला तरी स्वधर्म आहे- सद्‌गुण आहे - अशी जी परधर्मसहिष्णुतेची आत्मघातक नि विकृत व्याख्या हिंदूंच्या रोमांरोमांतून भिनलेली होती, तीमुळेच मुसलमानांवर राजकीय क्षेत्रात अतुल विजय मिळविला असताही, धार्मिक आघाडीवर मुस्लिमांचा लवलेश प्रतिकार न केल्यामुळे धार्मिक आघाडीवर मात्र हिंदुस्थानातून मुसलमानी धर्माचे आणि त्या लोकांचे अस्तित्व त्या वेळीच अुखडून टाकले गेले नाही - जसे ग्रीकांचे, शकांचे, हूणांचे अस्तित्वच त्या त्या वेळी हिंदूंनी अुखडून टाकले होते!

हिंदुराष्ट्राला त्यावेळी अत्यंत घातक ठरलेल्या ह्या सदगुणविकृतीच्या व्याधीचे आणखी अेक अुदाहरण हिंदूंच्या मुसलमानांवर पंजाबात मिळविलेल्या राजकीय विजयाच्या ह्या अुत्कर्षबिंदूच्या प्रसंगीच घडले, ते तरी, या स्थळी दाखविल्यावाचून पुढे जाणे ही कर्तव्यच्युतीच होअील.

ज्यावेळी रघुनाथराव पुण्याहून ससैन्य अब्दाल्लीवर चालून आला आणि १४ फेब्रुवारी १७५७च्या आसपास अिंदूरपर्यंत पोचला त्याच वेळी अत्याचारी अब्दाल्लीने दिल्लीला हिंदुधर्माची नि हिंदुस्त्रियांची अत्यंत विटंबना करून मराठ्यांनी बादशहाच्या हातून मथुरा, वृंदावन, कुरुक्षेत्रादि हिंदूंची क्षेत्रें छिनावून घेतली होती हे पाहून त्याचा वचपा काढण्याकरिता त्या क्षेत्रांवर आपल्या क्रूरांतील क्रूर मुस्लिम सेनानींना धाडून दिले. त्या मुस्लिम सेनानींना अब्दाल्लीने सक्त नि स्पष्ट आज्ञा सोडली की, मथुरादि, जी जी हिंदूंची पवित्र क्षेत्रे म्हणून समजली जातात त्या सर्वांना अुद्‌ध्वस्त करून तेथील शक्य तितक्या हिंदूंना ठार मारून टाकणे, त्यांच्या कापलेल्या शिरांच्या राशीच्या राशी रचणे, हे तुमचे मुसलमान म्हणून धर्मकर्तव्य आहे! तुमच्यापैकी जो जो हिंदूंची शिरे तो काफर आहे म्हणून छाटून टाकील त्या त्या 'अिमानी' मुसलमानाला हिंदूंच्या छाटलेल्या प्रत्येक शिरामागे मी पाच रूपये 'बक्षिशी' देअीन.

अब्दाल्लीच्या ह्या आज्ञेप्रमाणे हे चवताळलेले मुस्लिम लांडगे ह्या मथुरादि क्षेत्रांवर कसे तुटून पडले ते मागे वर्णिलेलेच आहे. त्याप्रमाणे मुस्लिमांनी त्या अगदी निरपराध हिंदूंच्या मथुराक्षेत्रावर अकस्मात घाला घालून तेथील हिंदूंचे सरसकट शिरकाण आरंभिले, मोठमोठी देवळें धडाधड पाडून टाकली, हिंदु स्त्री-पुरूष, बाल-वृद्ध यांच्या रक्ताचे मार्गामार्गानी आणि घराघरांतून अक्षरशः पाट वाहविले, तरूण स्त्री अशी दिसताच पळविल्यावाचून सोडले नाही. गाय अशी जिवंत

ठेवली नाही! ते गोरक्तही पाण्यासारखे वाहात होते. अेवढ्यावरही त्या मुस्लिम पिशाच्चांना त्या क्रूरतेची किळस किंवा कंटाळा आला नाही. अुलट त्या क्रूरतेला कलेच्या करमणुकीची झालर लावण्याची हौस वाटून त्याच वेळेस पडलेल्या हिंदूंच्या रंगपंचमीच्या सणाची विटंबना करण्यासाठी त्यांनीही रंगपंचमी साजरी केली! पण ती कशी? तर हिंदूंच्या सांडलेल्या रक्ताने मोठमोठ्या कढया नि हंडे भरभरून ठिकठिकाणी ठेवले आणि मोठमोठ्या पिचकाऱ्या हाती घेअून ते मुस्लिम सैन्य मार्गामार्गांनी नि घराघरांतून घुसून हिंदूंना त्या त्यांच्याच रक्ताच्या रंगाने भिजवून चिंब करीत चालले!!! जी दुर्दशा मथुरेची त्यांनी केली तीच त्या पुढच्या गोकुळ, वृंदावनाचीही केली! पण अितक्यात रघुनाथरावांचे प्रबळ मराठी सैन्य त्यांचा नि:पात करण्यासाठी अिंदूराहून पुढे सरकले आहे अशी बातमी येताच स्वत:स शहानशहा म्हणविणारा अब्दाल्ली त्याच्या त्या साऱ्या सैन्यासह जीव घेअून मागे दिल्लीला परतला - तिथून लाहोरकडे पळाला नि तेथून थेट काबूलकडे!

पण अब्दालीला ज्यांनी स्वपराक्रमाने असे रंगागणात चोपीत चोपीत सरसीमेपलीकडे पळवून लावले त्याच मराठ्यांची सैन्ये आता पंजाब विजयानंतर सन १७५० मध्ये परत दक्षिणेकडे चालली असता त्याच मथुरा, गोकुळ, वृंदावन अित्यादी क्षेत्रांना भेट देत, तेथे तीर्थस्नान, व्रत-वैकल्ये करीत असताही आणि अवघ्या अेक वर्षापूर्वी मुस्लिमांनी तेथे केलेल्या हिंदुधर्मावरील क्रूर अत्याचारांची कहाणी अैकत असताही, मुस्लिमांनी सांडलेल्या हिंदुरक्ताने भिजलेले मथुरेचे घाट पुरते सुकले नसताही आणि गोरक्ताची साचलेली डबकी मार्गामार्गातून तशीच कुजत पडली असताही आपल्या क्षेत्रांवर मुस्लिमांनी केलेल्या ह्या धार्मिक अत्याचारांनी त्या हिंदुसैन्याची माथी संतापाने पेटली नाहीत. कोणाच्याही तळपायाची आग मस्तकापर्यंत पोचली नाही. धार्मिक सूड घेण्यासाठी ते अुन्मत्त झाले नाहीत! मुसलमानांनी हिंदुधर्मावर जे जे अत्याचार केले तसेतसेच प्रत्याचार तुम्हीही मुसलमानांवर करा– मुसलमानांना सरसकट कापून टाका, मार्गोमार्गी पडलेल्या ह्या देवळांच्या ढिगाऱ्यांप्रमाणे मुसलमानांच्या झाडून साऱ्या मशिदी पाडून टाकून त्यांचेही ढिगारे मार्गोमार्गी पडू द्यात-हिंदूंच्या स्त्रियांची जशी मुसलमानांनी विटंबना केली तशीतशीच मुस्लिमांच्या स्त्रियांचीही विटंबना करा! हिंदु म्हणून असा हिंदुधर्माचा सूड घेणे हेच तुमचे कर्तव्य आहे !!! अशी कचकचीत आज्ञा विजयी सेनाधुरंधर रघुनाथरावाने हिंदुसैन्यांना सोडली नाही! जशी अब्दालीने मुस्लिम सैन्याला सोडली होती!

या सद्‌गुणविकृतीच्या प्राणघातक व्याधीने हिंदुसमाजाची किती भयंकर हानी केली ते आम्ही या भागाच्या पूर्वार्धात अितके विशद केले आहे की, आता अिथे त्याची द्विरुक्ती करण्याचे काही अेक कारण नाही. प्रत्येक वाचकाला आमचा असा आग्रह आहे की, त्याने या ठिकाणी या भागाच्या पूर्वार्धातील सद्‌गुणविकृतीचे ४ थे प्रकरण. अवश्यमेव, पुन्हा पुन्हा वाचावे.

हिंदूंच्या परमभाग्याची गोष्ट अितकीच की, त्यांच्या ह्या धार्मिक आघाडीवरील धर्मभोळेपणापायी, हिंदुधर्माच्या, हिंदुराष्ट्राच्या प्राणावरच जे बेतणार होते ते संकट त्यांच्या नि विशेषत: मराठ्यांच्या राजकीय आघाडीवरील प्रत्याघातक पराक्रमामुळे शेपटावरच निभावले, धर्मभोळेपणापायी मुसलमानांवर मथुरा-वृंदावनाचा सूड मराठ्यांनी या पंजाबविजयाहून परतताना जरी न घेण्याचा प्रमाद केला असला, तरीही, हिंदूंच्या मुसलमानांशी ठाणलेल्या अेक वर्षाच्या अतूट महायुद्धात त्यांनी मुसलमानांना चारी मुंड्या चीत करून शेवटी मराठ्यांनी संपादिलेल्या ह्या पंजाबवरील स्वारीतील विजयात मुस्लिम साम्राज्यसत्तेचा जो समूळ अुच्छेद केला आणि हिंदुराष्ट्राचे राजकीय स्वातंत्र्य प्रस्थापिले, त्यायोगे आशियातील अितर प्राचीन राष्ट्रे जशी मुसलमानांनी समूळ नष्ट करून टाकली तशी काही हिंदुस्थानची दुर्दशा त्यांना करता आली नाही! बाबिलोनचे जसे बगदाद झाले तशी काही मथुरेची मक्का झाली नाही. दहा शतके अव्याहत झुंजत राहून मथुरा हिंदूंचीच राहिली. मुसलमानांच्या राजसत्तेचे मात्र ठावठिकाण सुद्धा पुसून गेले! पण लाखो हिंदुयात्रेकरूंच्या कंठातून श्रीकृष्णाचा जयजयकार यमुनेच्या घाटावर आणि मंदिरामंदिरातून अव्याहतपणे घुमतच राहिलेला आहे!

# प्रकरण १० वे

# अटकेवरच नव्हे...तर अटकेपलीकडेही !

## सरदार पदरचे कसे कुणी सिंह जसे कुणी शार्दुल गेंडे ।
## अरे ज्यांनी अटकेत, पाव घटकेत रोविले झेंडे ।।

- **प्रभाकर**

पंजाब दिग्विजयानंतर, गेल्या प्रकरणात सांगितल्याप्रमाणे मराठी सेनाधुरंधर रघुनाथराव हे आपल्या अनेक सरदारांसह आणि सैन्यासह दक्षिणेकडे परतत असता ते महाराष्ट्रात पोचण्यापूर्वीच त्यांच्या विजयाच्या बातम्या वेळोवेळी महाराष्ट्रात आलेल्या होत्या. आज काय अिंदूरला सर्व मराठी सैन्ये अेकत्र झाली आहेत. अुद्या काय राजपुतान्यात सर्वत्र खंडण्या अुगराणी (वसूल) करीत आहेत. पुढे अंतर्वेदीत घुसून रोहिले पठाणांना अब्दालीस मिळाल्यासाठी चोपून काढीत आहेत. नंतर, प्रत्यक्ष दिल्ली जिंकून घेअून अब्दालीने अुद्घोषिलेल्या त्याच्या बादशाहीपदाचे मर्तिक साजरे करून मोगल बादशहास पठाणांच्या बंदिवासातून सोडवून, दिल्लीच्या सिंहासनावरील मराठ्यांचे अेक बाहुले म्हणून त्यास पुन्हा स्थापीत आहेत. लगोलग, पंजाबवर स्वारी करून अब्दालीने सरहिंद संभाळण्यास ठेवलेल्या काबुली पठाणांच्या दहा सहस्त्र सेनेची रघुनाथरावाच्या मराठी सैन्याने दाणादाण अुडवून दिली आहे. अब्दालीचा पुत्र तैमूरशहा आणि सेनापती जहानखान हे मराठ्यांच्या हातून जीव वाचविण्यासाठी पुढची लढाअी न देताच लाहोर सोडून काबूलकडे धूम पळत सुटलेले आहेत; आणि रघुनाथरावाने ससैन्य त्यांची लांडगेतोड करीत त्यांना पंजाबबाहेर हुसकीत नेले आहे. नंतर, पंजाबची राजधानी जी लाहोर तीत रघुनाथरावांच्या ससैन्य प्रवेशाचा अपूर्व विजयोत्सव साजरा होत आहे अशा प्रत्यही आणि प्रतिपावली मिळणाऱ्या विजयाच्या आणि सर्व शत्रूंचे दमन करणाऱ्या मराठ्यांच्या पराक्रमाच्या बातम्या महाराष्ट्रात येत गेल्याने सारा महाराष्ट्र गर्वभराने डोलत राहिलेला होता! जगातील जे नामवंत नि दिग्विजयी सेनापती होअून गेले त्यांच्या मालिकेत शोभावे असे नाव सेनापती रघुनाथरावाने या त्यांच्या पुण्यापासून थेट सिंधूनदीपर्यंतच्या अप्रतिहत अशा अेका झेपेत केलेल्या विजयी अभियानाने (मोहिमेने Campaign ने) पटकावले होतेच होते! त्या अप्रतिहत विजयी झेपेविषयी, सह्याद्रीच्या गरूडाच्या ह्या हिमालयीन भरारीविषयी, वाटणारे आश्चर्य आणि त्याविषयी वाटणारी धन्यता व्यक्तविताना सारा महाराष्ट्र कळत नकळत, रघुनाथरावांना लाडिकपणे 'राघो भरारी' या नावाने संबोधू लागला! सेनापती रघुनाथरावाची अितिहासात तीच पदवी चिरंतन झाली.

### हिंदूंच्या सुवर्णयशोमंदिरावर
### रत्नजडित कळस चढविणारी वार्ता

सेनापती रघुनाथरावाने पंजाबातून दक्षिणेत परतताना काही सरदारांना मराठी सैन्यासह पंजाबात, विशेषतः सिंधुनदीच्या परिसराकडे साऱ्या सरसीमेवर जे मुस्लिम अमीर-अुमराव, गुंडपुंड, फकीर-फुकडे अव्यवस्था नि लुटालुट माजवीत राहिले होते त्यांचा पूर्ण समाचार घेअून; मराठ्यांच्या सत्तेची घडी तिकडे चोपूनचापून बसविण्यासाठी आणि मराठ्यांच्या राजस्वाची (महसुलाची) बिनबोभाट अुगराणी (वसुल) करण्यासाठी ठेवलेले होते, त्यांतील सरदार तुकोजी होळकर, साबाजी शिंदे आणि गोपाळराव बर्वे यांच्या हाताखालील मराठी सैन्याने सिंधुनदीच्या परिसराचे नाकच असलेला जो अटक नगरचा गड त्यावर चढाअी करून तो मुसलमानांच्या हातून त्या सन १७५८ च्याच जुलै महिन्यात जिंकून घेतला! मुसलमानांचा हिरवा ध्वज अुखडून फेकून देअून हर हर महादेवाच्या गर्जनेत मराठ्यांचा हिंदूंचा, भगवा जरिपटका सरसर करीत अटकेवर चढला!! मराठ्यांचे हिंदूंचे घोडे सिंधूचे पाणी पुन्हा प्याले!!

अटकेची हिंदूंना दहा शतके पडलेली हिंदूंचीच शास्त्रीय अटक सुद्धा हिंदूंच्या शस्त्राने, खड्गाने, त्या दिवशी शेवटी तोडून टाकली! अितकेच नव्हे, तर, मराठ्यांची सैन्ये सिंधु ओलांडून पलीकडे कंदाहारपर्यत म्लेच्छांचा पाठलाग करीत गेली!

ह्या नगराला हे अटक नाव का नि केव्हा पडले ते दुदैवी वृत्त ह्या भागांत दिलेलेच आहे.
मराठ्यांनी अटक जिंकून तीवर जरिपटका फडकविला ही वार्ता महाराष्ट्रात येताच मराठ्यांचा विजयानंद गगनात मावेनासा झाला. दहा शतकांनंतर हिंदूंचा सूड, मराठ्यांनी प्रत्यक्ष काबूल-कंदाहारपर्यंत मुसलमानांची दाणादाण उडवीत, साऱ्या हिंदुस्थानची वास्तविक (de facto) साम्राज्यसत्ता त्या मुस्लिमांच्या हातून छिनाऊन घेऊन उगविला!

## हेच पाचवे सोनेरी पान होय!

ही अटक-विजयाची अलौकिक घटना घडून ह्या हिंदु-मुस्लिमांच्या दशशतकव्यापी महायुद्धात शेवटी हिंदूंचा हा अंतिम महान विजय झाला आणि हिंदुस्थानवरील मुस्लिम साम्राज्यसत्ता हिंदूंनी पादाक्रांत केली, हे वृत्त **हिंदुराष्ट्राच्या अितिहासाच्या ज्या पानावर अंकित झाले, तेच होय हिंदुराष्ट्राच्या अितिहासातील सोनेरी पान पाचवे!!**

## यद्यपि -

ज्याप्रमाणे, मरणोन्मुख पडलेला मनुष्यही मरता मरता काही काळ आचके देतच असतो नि क्वचित वायूच्या झटक्याने अेखादी उसळीही घेतो, पण, शेवटी मरतो; किंवा अरण्यातून वावरणारे प्रचंड वीस-वीस वाव लांब असणारे आणि वटवृक्षाच्या बुंध्यासारखे जाडजुड सर्प त्यांचे डोके ठेचून टाकले गेले तरीही त्यांचे सर्व शरीर पहिल्याच क्षणात पूर्ण निश्चेतन होऊन पडत नाही, तर सारखे काही काळ वळवळत राहते नि क्वचित मधूनच उसळी घेऊन पुढे झेप घेऊ पाहते, परंतु शेवटी ते मरू घातलेले धूड मरतेच मरते; त्याचप्रमाणे, यद्यपि, सिंधूच्या परिसरात मराठ्यांनी मुसलमानी साम्राज्यसत्तेचे डोके ठेचून तिला मरणोन्मुख करून रणांगणात पाडले तरी तिची वळवळ काही अितस्ततः होत होती. अेखादी पानपतसारखी उसळीही तिच्या त्या मरू घातलेल्या धुडाने घेतली होती; तथापि, शेवटी गतप्राण होऊन मरणी मरून गेली ती गेलीच!
आणि अंततः साऱ्या हिंदुस्थानावर स्वतंत्र हिंदुसाम्राज्यसत्तेचा ध्वज फडकू लागला! सिंधुपासूनच नव्हे तर काबूल नदीपासून सारा पंजाब, जम्मू ते थेट काश्मीरच्या सरसीमेपर्यंत महाराणा रणजितसिंगाचे निर्मुस्लिम हिंदु-शीख महाराज्य, पुढे दिल्लीपासून थेट रामेश्वरपर्यंत साऱ्या उर्वरित हिंदुस्थानात दिग्विजयी हिंदु मराठ्यांचे निर्मुस्लिम अधिराज्य आणि वर नेपाळचे स्वतंत्र हिंदुराज्य, अशी साऱ्या हिंदुस्थानात जिकडे तिकडे हिंदुसत्ता पुन्हा नांदू लागली; मुस्लिम राजसत्ता मेली ती मेलीच!
म्हणूनच, अटकेवर ज्या दिवशी मुस्लिमांच्या राजसत्तेचा ध्वज उखडून मराठ्यांनी फेकून दिला आणि आपला विजयी भगवा जरीपटका तेथे रोवला त्याच दिवशी मुस्लिम राजसत्तेला हिंदूंनी खरा प्राणांतिक प्रहार करून तिचा अंत केला.
सरदेसायांसारखे हात राखून सावधपणे लिहिणारे अितिहासकारसुद्धा लिहितात की, 'All Maharashtra felt electrified with the proud performance of Raghunathrao and his bands having reached the extreme frontier of India and bathed their horses in Indus. (New History of Maharashtra, Vol. I, page 401)
ह्या हिंदू-मुस्लिम महायुद्धात मुस्लिमांवर मिळविलेल्या अंतिम विजयाची वार्ता महाराष्ट्रात येताच, त्या काळी, अत्युत्कट अशा राष्ट्रीय भावनांचे जे प्रमुख वक्ते असत त्या चारण, भाट, गोंधळी अित्यादी कवींनी आपापल्या वीरसाने मुसमुसलेल्या वीरकाव्यांच्या आणि पोवाड्यांच्या निनादाने महाराष्ट्राच्या खेड्याखेड्यांतील वातावरण विजयानंदाने भरवून सोडले! ज्यांचे बाहू त्यांच्या सैन्याचे हे पराक्रम अैकून थरारले नाहीत असा स्वाभिमानी मराठा उरला नाही. महाराष्ट्रातील त्या दिवसाच्या मानसाचे हे रोमहर्षक चित्र मानसाच्या भाषेतच यथावत व्यक्तविणे शक्य असल्यामुळे ते आम्ही गोमंतक काव्यात तत्कालीन भाट-चरण गोंधळी याचे अेक प्रतीक म्हणून कल्पिलेल्या 'महराष्ट्र' भाटाच्या तोंडून व्यक्तविले आहे, तेच विजयगीत (काही चरण) आम्ही खाली देत आहो!

## महाराष्ट्रभाटाचे विजयगीत

अैका-अैका हिंदुमात्रहो! वार्ता विजयाच्या आल्या;
उभ्या दहा शतकांचा उगवे सूड जिंकिलें जेत्याला

करा महोत्सव हिंदुमात्रहो! तुमच्या हौतात्म्यें आला
विजय तयाच्या महोत्सवाचा हक्कचि आहे तुम्हाला
तथापि अजुनी कार्य न सरले अिच्छित; हाता तट आला
परंतु अजुनी चढुनि दुर्ग हा कुशल पोचणे असे घरा!
आज हिंदुपदपादशाहिचा योग सत्यची हा आला
तथापि अजुनी समारंभ तो संपूनि निर्विघ्न न गेला!
शककर्त्यासम सत्यचि आम्ही धन्य विजय हा अुपार्जिला
शककर्त्यासम परंतु विजया करी पाहिजे राखियला!
आज दहा शतकाने विजयी मिरवित सोनेरी तोडा
पिअी सिंधूचे पाणी पुनरपि हिंदु सैनिकाचा घोडा
सागरसंगत भागीरथि ये कावेरीच्या पूतजला
सिंधु, शतद्रु, त्रिवेणि, यमुने, गोदे, कृष्णे या सकला
हे तीर्थांनो, हे क्षेत्रांनो, अखिल भारती भूमितल्या
हरिद्वार, कैलास, काशिके, पुरी द्वारके या साऱ्या
अैका-अैका लोमहर्षणा वार्ता विजयाच्या आल्या
अुभ्या सात शतकांचा अुगवे सूड जिंकिले जेत्याला
हिंदूवीरांचा की श्रीशे असे यशस्वी हट केला
आज हिंदवी जरिपटका की पुन्हा पोचला अटकेला

# सोनेरी पान सहावे

## अिंग्रजही गेले ; हिंदुराष्ट्राचे स्वातंत्र्य सिद्ध झाले.

हिंदुराष्ट्राच्या अितिहासातील ‘सहा सोनेरी पाने’ हा जो ग्रंथ आम्ही लिहित आहोत त्याचे हे सहाव्या सोनेरी पानाचे प्रकरण शेवटचेच होय.

ह्या ग्रंथाच्या, आधीच प्रसिद्ध झालेल्या पहिल्या भागाच्या प्रारंभी ह्या समग्र ग्रंथाचे विषयक्षेत्र व्यक्तविले आहे. त्या अनुरोधाने सूचित होतेच आहे की, ह्या सहाव्या सोनेरी पानातही अिंग्रजांनी हिंदुस्थानवर आपले साम्राज्य स्थापित केले असता, त्या प्रबल परदास्यातूनही हिंदुराष्ट्राने आपली मुक्तता कशी करून घेतली ; आणि आज ते हिंदुराष्ट्र पुन्हा अेक स्वतंत्र नि सार्वभौम प्रजासत्ताक महाराज्य अशा प्रतिष्ठेने जगात कसे नांदू लागले आहे, ह्याचा सविस्तर अितिहास देण्याचे काही अेक प्रयोजन नाही. त्या अिंग्रजांशी झालेल्या हिंदुराष्ट्राच्या स्फूर्तिदायक स्वातंत्र्ययुद्धातील हिंदुत्वाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाच्या असताही, अितर बहुतेक परकीय वा स्वकीय अितिहासकारांपैकी पुष्कळांनी, जाणूनबुजून गाळलेल्या आणि काहींनी अज्ञानाने अुपेक्षिलेल्या वैशिष्टयांचे, तेवढे, समीक्षण करण्याचेच काय ते ह्या ग्रंथाचे अुद्दिष्ट आहे.

परंतु ते कार्य बहुतांशी मी माझ्यापुरते ह्यापूर्वीच माझ्या अितर ग्रंथांतून आवश्यक तितके आधीच केलेले आहे. ते असे :

(१) गेल्या प्रकरणाच्या शेवटी हे अुल्लेखिलेलेच आहे की हिंदुस्थानातून मुसलमानांच्या परकीय अधिसत्तेचे हिंदूंनी शेवटी पूर्ण अुच्चाटन केले होते आणि अटकेपासून आसामपर्यंत आणि काश्मीर, लडाखपासून रामेश्वरपर्यंत जिकडे तिकडे पुन्हा हिंदुराज्येच स्थापिली गेली होती. हिंदुस्थानच्या अेक अंगुलमात्र भूमीवर सुद्धा मुसलमानांची अधिसत्ता वस्तुतः अुरलेली नव्हती. परंतु मुसलमानी अधिसत्तेचा असा पूर्ण नायनाट करण्यासाठी, जे दशशतकव्यापी प्रचंड महायुद्ध हिंदूंना लढवावे लागले त्यातच हिंदुराष्ट्राचे सर्व बळ नि जीवन व्यग्र झालेले असताच, अिकडे युरोपातील पोर्तुगीज, फ्रेंच, डच आणि मुख्यत्वेकरून अिंग्लिश ह्या राष्ट्रांनीही हिंदुस्थानात आपापली सत्ता स्थापण्याचे चोरटे वा प्रकट प्रयत्न चालविलेच होते. हिंदुराष्ट्राचे त्याकाळी धुरीणत्व करणाऱ्या मराठ्यांनी, अेकसमयावच्छेदेकरून, रणांगणात तोंड दिले आणि शेवटी डच, पोर्तुगीज, फ्रेंच ह्या तिघा युरोपियन राष्ट्रांच्या आक्रमणांचा जरी पुष्कळ यशस्वी प्रतिकार केला तरी, अिंग्लिशांनी मात्र, मराठे मुसलमानांशी तशा प्राणांतिक युद्धात गुंतलेले असताना, ती संधी साधून, बंगालच्या बाजूने तिकडे असलेल्या दुर्बल मुस्लिम नबाबांना पायाखाली तुडवीत, हिंदुस्थानच्या त्या भागात हळूहळू आपली राजसत्ता स्थापिली. त्या बळावर त्यांनी त्यांचे सशस्त्र आक्रमण पुढे चालवीत, दिल्लीपर्यंतच्या भूभागावरही, त्यांचे स्वामित्व नावाने नसले तरी, वस्तुतः स्थापन केले. अर्थातच हिंदुराष्ट्राचे राजकीय धुरीणत्व करणाऱ्या मराठ्यांचे नि त्यांचे लवकरच प्रत्यक्षतः युद्ध जुंपले. त्या पैकी पहिल्या नि दुसऱ्या अिंग्रज-मराठ्यांच्या युद्धात मराठ्यांनी अिंग्रजांचाही कसा नि कितपत मोड केला त्याचे हिंदु दृष्टिकोनातून अवश्य तितके समालोचन आम्ही आमच्या ’पह्ल्र्ल्ड् ईँ्’ ह्या अिंग्रजी ग्रंथात केले आहे. त्याचे मराठी भाषांतरही झालेले आहे. जिज्ञासू वाचकांनी ते वृत्त त्या पुस्तकांतून वाचावे.

त्या समालोचनावरून खालील दोन ठळक विधेये स्पष्ट होतील. पहिले विधेय हे की, अिंग्रज हिंदुस्थानात आले तेव्हापासून हिंदुस्थानच्या राजकीय स्वातंत्र्यासाठी मुसलमान असे अिंग्लिशांशी लढलेच नाहीत. अेक म्हैसूर संस्थानचा, हैदर टिपूचा अल्पकालीन नि आंशिक अपवाद सोडला असता हिंदुस्थानच्या सार्वभौमत्वासाठी अिंग्रजांना लढावी लागलेली सारी युद्धे हिंदूशीच लढावी लागली. ह्यावरूनही हेच सिद्ध होते की, हिंदूंनी हिंदुस्थानवरील मुस्लिम राजसत्तेचा वस्तुतः संपूर्ण अुच्छेद करून ती सार्वभौम सत्ता परत आपल्या हाती घेतलेली होती. दुसरे विधेय हे की, राजकारणातील त्या परिस्थितीत सोयिस्कर असलेला अेक डावपेच म्हणून, मराठ्यांनी दिल्लीला असलेल्या त्या जुनाट मोगली बाहुल्याला ‘हिंदुस्थानचा बादशहा’ असे नांवापुरते तेवढे म्हणू देत असावे, तसेच, दिल्ली मराठ्यांच्या हातून अिंग्रजांनी जिंकून घेतल्यानंतर आणि

हिंदुस्थानभर वस्तुतः (ﾐ) त्यांचेच अधिपत्य स्थापिल्यानंतरही अिंग्रजांनीही नावापुरते त्याच जुनाट मोगल बाहुल्याला 'बादशहा' म्हणून पुढे पन्नास वर्षेपर्यंत राहू दिले होते हे लक्षात घेण्यासारखे आहे.
कारण त्यामुळे त्या 'बादशहाला' मराठ्यांनी, तसे नावापुरते ज्या राजकीय डावपेचासाठी राहू दिले होते त्यासाठी, मराठ्यांना जे अिंग्रजाळलेले लोक हसतात त्यांच्या अज्ञानाचे पितळ सहजच अुघडें पडते. कारण अिंग्रजांनाही तोच राजकीय डावपेच वर दाखविल्याप्रमाणे योजणेच सोयिस्कर वाटले. परंतु अिंग्रजांना मात्र त्या दुबळेपणासाठी ते अदूरदर्शी अिंग्रजाळलेले लोक हसत नाहीत!

## अिंग्रजांचे शीख हिंदूंशी झालेले युद्ध

(२) मराठ्यांची हिंदुस्थानावरील राजकीय अधिसत्ता अि. स. १८१८ नंतर मोडून काढून, अुरलेल्या मराठी संस्थानांना आपले मांडलिकत्व मानावयास लावून अिंग्रजांनी हिंदुस्थानवर वस्तुतः आपले आधिपत्य स्थापन केले न केले तोंच त्यांना ज्या अेका नवोदित हिंदुशक्तीशी युद्ध करावे लागले ती शक्ति म्हणजे पंजाबात सन १८१८ नंतर अुदयास आलेल्या महाराजा रणजित सिंह याचे शीख-हिंदु-महाराज्य हे होय! महाराजा रणजितसिंगाच्या मृत्यूनंतर काबूल नदीपासून ते शतद्रू (सतलज) नदीपर्यंत आणि वर काश्मीर ते लडाखपर्यंत पसरलेल्या शीख, जाट नि डोग्रा या पराक्रमी हिंदू जातीच्या सामाअीक राजशक्तीशी अिंग्रजांनी युद्ध छेडले, त्यात शेवटी अिंग्रजांचा विजय झाला आणि पंजाब ते काश्मीरपर्यंतही अिंग्रजांची अधिसत्ता अिसवी सन १८५० चे आसपास स्थापन झाली.

## माझा नष्ट केला गेलेला शिखांचा अितिहासग्रंथ

हिंदुपदपादशाही या अिंग्रजी ग्रंथात ज्याप्रमाणे आम्ही मराठी साम्राज्याच्या कालखंडाचे समालोचन केले होते, त्याचप्रमाणे 'शिखांचा अितिहास' या मराठीत लिहिलेल्या आमच्या ग्रंथात आम्ही मराठी कालखंडानंतरच्या ह्या शीख हिंदुमहाराज्याच्या कालखंडाचेही समीक्षण केले होते. पण अिंग्रजांविरूद्ध केलेल्या ज्या राज्यक्रांतीच्या अुठावात आम्ही पॅरिसमध्ये सन १९०९-१० च्या आसपास व्यग्र झालेलो होतो, त्याच्याच धामधुमीत ह्या 'शीख अितिहास' च्या ग्रंथाचे हस्तलिखितच अिंग्लिश गुप्त टपाल विभागाच्या हाती पडून, प्रकाशनापूर्वीच नष्ट झाले! तथापि, रणजितसिंगाचे ते हिंदुमहाराज्य ज्या १८५०च्या आसपास संपूर्णपणे नष्ट झाले त्या कालखंडापर्यंतच्या सर्व शीख हिंदु दृष्टिकोनातून अुल्लेखनीय असणाऱ्या बहुतेक घटनांविषयीची चर्चा आम्ही आमच्या 'पृष्ठभूमि' आणि ह्या 'सहा सोनेरी पाने' अशा ग्रंथातून केलेलीच आहे. ती जिज्ञासू वाचकांनी वाचावी.

## नेपाळच्या स्वतंत्र हिंदुराज्याशी अिंग्रजांचे युद्ध

(३) अिंग्रजांना ज्यांची अधिसत्ता साऱ्या हिंदुस्थानावर स्थापण्यासाठी ज्या तिसऱ्या हिंदुशक्तीशी लढावे लागले ती शक्ति म्हणजे नेपाळचे स्वतंत्र हिंदूराज्य ही होय. त्या काळात स्वतंत्र नि बलिष्ठ असलेल्या नेपाळच्या महाराजांशी झालेल्या अिंग्रजांच्या ह्या लढ्यात शेवटी अिंग्रजांचा जय झाला. पण तो जय नेपाळचे हिंदुराज्य नष्ट करण्याअितका प्रबळ नव्हता. नेपाळच्या हिंदुराज्याला अिंग्रजांचे मांडलिकत्व तेवढे मानावे लागले. ते सोडल्यास सर्व प्रकारची त्याची अंतर्गत स्वतंत्रता अबाधित राहिली. पुन्हा, नेपाळच्या हिंदुराज्याच्या अशा अस्तित्वाची अिंग्रजांच्या हिंदुस्थानवरील साम्राज्यसत्तेसाठी पुढे बऱ्याच काळपर्यंत आवश्यकताही होती. कारण अिंग्रजांच्या सैन्याला अत्यंत शूर नि कडव्या हिंदू गुरखा सैनिकांचा पुरवठा करणारे नेपाळ हे सर्वात सुपीक क्षेत्र होते. हे हिंदु गुरख्यांचे सैन्य हिंदुस्थानातच नव्हे तर युरोपादिक परखंडातही, फ्रेंच, जर्मन अित्यादि अिंग्रजांच्या समबल असणाऱ्या गोऱ्या शत्रूंशीही तोंड देण्यास समर्थ ठरे. त्यातही अिंग्रजाला हिंदी साम्राज्याच्या अुत्तर सीमेवर चढाअी करून येअू शकणाऱ्या आणि अिच्छिणाऱ्या, त्या काळच्या बलाढ्य अशा, रशियाच्या आक्रमणांची सदोदित भीति वाटत असल्यामुळे, त्या रशियन साम्राज्याचा आणि हिंदुस्थानातील ब्रिटीश साम्राज्याचा हा संभाव्य

संघर्ष शक्यतो अकस्मात नि सहज घडू नये म्हणून त्या दोघांच्या मध्ये, नेपाळसारखी अेक लढाअू शक्ति, कीलक राज्य (Buffer State) म्हणून, अस्तित्वात असणे हे अिंग्लिशांनाच त्या काळी अभिप्रेत होते.

वर सांगितल्याप्रमाणे मराठा, शीख आणि नेपाळ ह्या तिन्ही हिंदू राज्यशक्तीचा असा पराभव झाल्यानंतर त्या संघर्षात अंतिम विजय पावलेल्या अिंग्रजांचे हाती हिंदुस्थानचे राजकीय प्रभुत्व संपूर्णपणे गेले.

अीस्ट अिंडिया कंपनी ही जी अेक लहानशी व्यापारी मंडळी अिंग्लंडमध्ये, अिकडे हिंदुस्थानात शिवाजीमहाराजांचा अुदय होण्याच्या आसपास, स्थापन झालेली होती त्याच अेक-दोन वखारी काय त्या हाती असलेल्या यःकश्चित कंपनीचा व्याप वाढता वाढता, अशा रीतीने अिसवी सन १८५० च्या आसपास, तीच हिंदुस्थानच्या साऱ्या महाराज्याचे स्वामित्व संपादित झाली! मूलतः अेका क्षुल्लक दहा-बारा प्रमुख अिंग्लिश गृहस्थांची असलेली व्यापारी मंडळी जी अीस्ट अिंडिया कंपनी तीच अवघ्या दोन-अडीचशे वर्षांच्या आत अेका साम्राज्याची स्वामिनी बनली! त्याच कालावधीत आमच्या अिकडे हिंदुस्थानच्या आधिपत्यासाठी स्पर्धा करणारे अनेक राजवंश अुदय पावले आणि नष्ट झाले. अनेक चिल्लर राज्ये स्थापन झाली, त्यांची आपआपसात त्याच हिंदुस्थानच्या राजसत्तेसाठी युद्धामागून युद्धे जुंपली आणि संपली, पण शेवटी ती हिंदुस्थानची सार्वभौम सत्ता, ह्या सर्व संघर्षात लढून झगडून टिकून शेवटी सर्व स्पर्धकांवर मात करणाऱ्या प्रभविष्णु अशा त्याच अीस्ट अिंडिया कंपनीने जिंकून घेतली! अगदी पहिल्या दिवशी ही अीस्ट अिंडिया कंपनी स्थापन झाली तेव्हा किती क्षुद्र, केवळ मूठभर भागधारकांची अेक व्यापारी मंडळी होती. पण तिची त्या पहिल्या वर्षाच्या आयव्यय- पत्रकापासून पुढची सगळी वार्षिक आयव्ययपत्रके, अगदी प्रत्येक विगत वर्षाच्या शेवटी शेष (बाकी) म्हणून दाखविलेल्या रकमेला पुढच्या वर्षीच्या आयव्ययपत्रकास जोडीत, काटेकोरपणे आणि सलग रीतीने लिहीत लिहीत दोन अडीचशे वर्षांनंतर जेव्हा ती हिंदुस्थानच्या साम्राज्याचेच 'भांडवल' करून तो व्यवसाय करीत आली तेथपर्यंत या साऱ्या आयव्ययपत्रकांच्या वह्या सुसंगतपणे तिच्या लंडनच्या कार्यालयात लावून ठेवलेल्या होत्या! आणि जेव्हा १८५८ च्या अिसवी सनात त्या अीस्ट अिंडिया कंपनीचे विसर्जन झाले आणि स्वतः ब्रिटीश सरकारने ते हिंदुस्थानचे साम्राज्य स्वयं व्हिक्टोरिया सम्राज्ञीच्या नावे करून घेतले तेव्हा त्या अीस्ट अिंडिया कंपनीची अगदी पहिल्या वर्षाच्या त्या क्षुद्र आयव्ययपत्रकापासून संततपणे ठेवलेल्या गणनाप्रमाणे ह्या शेवटच्या १८५८च्या विसर्जनाच्या दिवसापर्यंतच्या तिच्या आयव्ययपत्रकाप्रमाणे तिच्या सर्व भागधारकांच्या भागांच्या रकमा देअून नि अितरही सर्व देणे मिटवून ती अगदी अेखाद्या व्यावहारिक नि व्यावसायिक व्यापारीमंडळीप्रमाणे (कंपनीप्रमाणे) पद्धतशीर रीतीने विसर्जित केली गेली.

अिंग्लिश कारभाराची ही शतकानुशतके टिकून राहणारी संततता, टापटीप, प्रशासनशीलता नि संघटनक्षमता कुणीकडे आणि आमच्या अिकडची त्याच काळातील वर वर्णिलेली बजबजपुरी, अव्यवस्था, राजकीय अस्थैर्य नि संघटनशून्यता कुणीकडे! त्या वेळचे ते ब्रिटीश राष्ट्र आणि आमचे हे हिंदुराष्ट्र यांच्यातील साम्य किंवा वैषम्य ही यद्यपि अशा अेकेरी नि सापेक्षतः यकश्चित अुदाहरणावरून स्थापणे हे असमर्थनीय होणारे आहे. तथापि शितावरून भाताची परीक्षा या चाल-चलाअू न्यायाने ते साम्य नि वैषम्य दर्शविण्यापुरते हे, मूलतः क्षुल्लक अशा अीस्ट अिंडिया कंपनीने हिंदुस्थानाची साम्राज्यसत्ता चालवणारी 'दि ऑनरेबल कंपनी सरकार बहादुर' म्हणून शेवटी मिरवू लागावे हे अुदाहरण अेक लहानसे पण परिणामकारक प्रतिक म्हणून अुपयोगी आहेच आहे.

आमच्या हिंदुराष्ट्राचा ब्रिटीशांनी असा जो संपूर्ण पराभव केला तो आमच्या हृदयात शिरलेल्या अेखाद्या विषारी शल्याप्रमाणे सलत राहिलेला होता. तरीही, आम्ही त्यासाठी ब्रिटिशांना खोटेनाटे शिव्याशाप देअून त्यांनी आमच्यावर मिळविलेला विजय केव्हाही नाकारला नव्हता, लपविलेला नव्हता. कारण आमच्या अंगात आमच्या हिंदुराष्ट्राच्या पराभवाचे अुट्टे काढण्याची धमक होती... ती काही मेली नव्हती. अुलट आम्ही प्रांजलपणे हे समजून होतो की ब्रिटिशराष्ट्र आणि हिंदुराष्ट्र यांच्यात हे जे तुमुल मल्लयुद्ध जुंपले होते त्यात अेकंदरीत जो मल्ल नियुद्धाच्या (कुस्तीच्या) डावपेचांत नि सामर्थ्यात त्या काळी निपुणतर होता त्या ब्रिटिश राष्ट्राचा विजय व्हावा हे साहजिकच होते, रणांगणात होणारे जयापजय न्यायान्यायाच्या पोथीप्रमाणे होत नसतात हे आम्ही जाणून होतो.

यासाठीच रणांगणात विजयी झालेल्या ब्रिटिश राष्ट्राला रणांगणातच गाठून चारी मुंड्या चीत करण्यासाठी पुन्हा कोणते तरी नृसिंहीय आक्रमण नि पराक्रम करण्याचे रणकंकण ब्रिटिशांची साम्राज्यसत्ता हिंदुस्थानात स्थापित होते न होते तोच हिंदुस्थानातील अंतस्थ वीरवृत्तीने हाती बांधले!

हिंदुस्थानचे साम्राज्य ब्रिटिशांनी हिंदुराष्ट्राच्या हातून छिनावून घेतल्यानंतर पराभूत झालेले ते हिंदुराष्ट्र काही काल हतप्रभ नि निष्प्राण होऊन पडले होते. ज्वालामुखीचा कोणताही स्फोट होऊन गेल्यानंतर तोही काही काल हतप्रभ आणि थंडगार होऊन पडतो. परंतु जर त्या ज्वालामुखीचा तो स्फोट शेवटचाच नसेल तर त्याच्या पोटातील भयंकर स्फोटक घटक आतल्याआत सळसळत राहिल्याने त्याची दाहक रसायने पुनः पुन्हा कढू लागतात तसेच ब्रिटिशांकडून ते हिंदुराष्ट्र केवळ पराभूत झालेले होते, मेले नव्हते, अेतदर्थ त्याच्या अंतरंगात त्या विजेत्या ब्रिटीश शत्रूशी पुन्हा टक्कर देण्यासाठी अनेक वीरात्म्यांचे स्पोटक घटक लवकरच सळसळू लागले - कढू लागले.

## ब्रिटिश सत्तेविरूद्ध
## हिंदुस्थानचा पहिला प्रचंड स्फोट

रणजितसिंगाचे पंजाबातील शेवटचे स्वतंत्र हिंदुराज्य ब्रिटिशांनी जिंकून पुरती दहा-बारा वर्षेही अुलटली नव्हती तोच हिंदुस्थानावरील त्या ब्रिटिश साम्राज्याला अुलथून पाडण्यासाठी हिंदुस्थानातील हिंदु-मुसलमानांचा अेक प्रचंड असा संयुक्त अुठाव झाला आणि हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी ब्रिटिशांविरूद्ध झालेल्या क्रांतियुद्धाचे रणकुंड अि. सन १८५७ मध्ये भडकले!!!

या क्रांतियुद्धाचे अेक प्रमुख वैशिष्ट्य हे होते, की, आपसांतील शतकानुशतकांचे धार्मिक वैर त्या प्रसंगापुरते विसरून हिंदू आणि मुसलमान ह्या दोघांनीही अेका संयुक्त राजकीय आघाडीत संघटित होअून देशव्यापी महायुद्ध ब्रिटिशांविरूद्ध लढविले!

परंतु ह्या प्रचंड क्रांतियुद्धाचा अितिहास आम्ही सविस्तरपणे आमच्या 'Indian War of Independence of 1857' – हिंदुस्थानचे १८५७चे ‘स्वातंत्र्यसमर’ ह्या जवळ जवळ पाचशे पृष्ठांच्या मौलिक नि सुप्रसिद्ध ग्रंथात अि. सन १९०८-०९ मध्येच लिहिलेला आहे. त्यात हिंदुराष्ट्राच्या दृष्टिकोनातून त्या क्रांतियुद्धाचे समीक्षण संपूर्णपणे केलेले असल्याने आता येथे त्याची पुनरुक्ति करण्याची काहीच आवश्यकता नाही.

त्या क्रांतियुद्धात अवघ्या दोन-तीन वर्षांच्या घनघोर संग्रामात अिंग्लिशांची अितकी भयंकर हानी झाली की हिंदुस्थानच्या साम्राज्यासाठी मराठे, शीख नि नेपाळी ह्या तिघांशीही झालेल्या युद्धामध्ये जितके ब्रिटिश सैनिक मारले गेले नाहीत तितक्या ब्रिटिश सैनिकांचा नि गोऱ्या लोकांचा क्रांतिकारकांनी बळी घेतला. अितक्या ब्रिटिश शत्रूंना ठार मारले! अिंग्लिशांचे लहानसहान कॅप्टन, लेफ्टनंट, कलेक्टर, मॅजिस्ट्रेट अित्यादी दुय्यम अधिकारी तर सोडाच, पण कर्नल व्हाअीट, जनरल नील; सर हेन्री लॉरेन्स, जनरल औट्रॅम, कमांडर अिन चीफ अॅन्सन अित्यादी अिंग्लिशांच्या अनेक धुरंधर अधिकाऱ्यांचे नि पुढाऱ्यांचेही त्या संग्रामात बळी पडले. क्रांतिकारकांनी त्या बहुतेकांना रणांगणात निवडून टिपून ठार मारले. हिंदी क्रांतिकारक पक्षाचेही जवळजवळ अेक लक्ष झुंजार पुरुष अिंग्लिशांनी ठार मारले, असे नानासाहेबांसारख्या क्रांतीच्या धुरंधराने स्वतःच सांगितले आहे.

या क्रांतियुद्धाचा शेवट क्रांतिकारकांना जी प्रत्यक्ष अिंग्रज सरकारच वाटे आणि म्हणून जिचा हिंदी लोक अतोनात द्वेष करीत त्या ‘दि ऑनरेबल ओीस्ट अिंडिया कंपनी सरकार बहादुर’ हिचाही ब्रिटिशांनी शेवटी प्रत्यक्षपणे बळी दिला! ब्रिटिशांना वाटले की, ह्या कंपनीचे विसर्जन करून तिची सत्ता नाहीशी केली की क्रांतिकारकांचे पुष्कळ समाधान होअील; आणि त्याच्या मनासराखे अेक महत्कृत्य आपण केले असे क्रांतिकारकांना वाटेल. यास्तव, ब्रिटिश सरकारने मोठ्या डामडौलाने नि गाजावाजाने प्रसिद्ध केले की, यापुढे हिंदुस्थानचा सारा राज्यकारभार ओीस्ट अिंडिया कंपनीच्या हातातून काढून घेअून, तिला पदच्युत करून, तिचे विसर्जन करण्यात आले आहे आणि ब्रिटिशांची राणी जी व्हिक्टोरिया तीच यापुढे स्वतः हिंदुस्थानची सम्राज्ञी Empress of india (हिंदुस्थानची बादशाहीण) हे पद धारण करून हिंदुस्थानची सार्वभौम

राजसत्ता प्रत्यक्षपणे हाती घेत आहे. ह्यप्रमाणे, क्रांतिकारकांच्या तीन वर्षे चालविलेल्या रणधुमाळीने शेवटी 'दि ऑनरेबल ओीस्ट अिंडिया कंपनी सरकार बहादुर' म्हणून मिरवणाऱ्या त्या ओीस्ट अिंडिया कंपनीचा तरी बळी घेतला!!
याहीपुढे जाअून, त्या नवीन हिंदुस्थानची सम्राज्ञी झालेल्या व्हिक्टोरियाच्या नावे अेक घोषणापत्रकही ब्रिटिशांनी हिंदुस्थानभर प्रसिद्ध केले. त्यात क्रांतिकारकांना अुद्देशून आणि अर्थातच त्यांचे काहीतरी समाधान करण्यासाठी असे प्रसिद्धिले की, या पत्रकानंतर अिंग्रजांशी चालविलेले युद्ध बंद. जे जे 'बंडखोर', आपली हत्यारे प्रकटपणे किंवा अप्रकटपणे खाली ठेवतील आणि काही अेक अुपद्रव न देता आपापल्या घरी जाअून शांततेने आयुष्यक्रम चालवू लागतील, त्या सर्वांना, मागच्या कोणत्याही बंडाप्रकरणीच्या हालचालीविषयी विचारपूस न करता त्यासंबंधी, पूर्ण राजक्षमा केली जाअील.
क्रांतिकारकांपुढे वरील दोन प्रकरणी अप्रत्यक्ष असली तरी धादांत शरणागति पत्करल्यानंतर सर्व हिंदुस्थानातील लोकांना शांत करण्यासाठी आणि क्रांतिची आग पूर्णपणे शमविण्यासाठी हिंदुस्थानच्या 'बादशाहिणीच्या' ह्या घोषणापत्रकात पुढील महत्त्वाचे अभिवचन दिले होते की, 'ब्रिटिश सरकार किंवा कोणचाही स्थानिक गोरा अधिकारी किंवा मिशनरी ब्रिटिश हिंदुस्थानातील 'नेटिव्हांच्या धर्मात काणत्याही प्रकारे हस्तक्षेप करू शकणार नाही. हिंदुस्थानची बादशाहीण आणि तिचे सरकार तिच्या हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती अित्यादी प्रजाजनांच्या सर्व धर्मांना समानतेने वागवू अिच्छितात. त्यातील कोणत्याही धर्मीयांना अन्य कोणाकडूनही ही सम्राज्ञी अुपद्रव होअू देणार नाही.'' क्रांतीच्या मूळ कारणांपैकी अेक महत्वाचे जे कारण होते की, कंपनीराज्य आम्ही हिंदु-मुसलमानांचा धर्म बुडवून आम्हास बळाने ख्रिश्चन करणार आहे, अशी भीति हिंदी लोकांना पडली होती, ते कारण यापुढे अुरू नये म्हणूनच हे अभिवचन 'त्या राणीच्या जाहिरनाम्या'त (घोषणा पत्रकात) दिलेले होते आणि ही–ही क्रांतिकारकांपुढे ब्रिटिशांनी अेक शरणागतीच पत्करलेली होती.
तशीच न बोलता पण आणखी अेक महत्त्वाची शरणागति ब्रिटिशांनी या घोषणापत्रकांत जी गुपचूप स्वीकारली होती ती ही होय की, ओीस्ट अिंडिया कंपनीने संस्थानिकांचा दत्तक घेण्याचा अधिकार अमान्य करून त्यांना ब्रिटिश साम्राज्यात गिळंकृत करण्याचा जो सपाटा चालविला होता तो या घोषणापत्रकाने तसे प्रत्यक्ष काहीही न बोलता बंद केला. कारण, त्या घोषणापत्रकात असे स्पष्टपणे प्रसिद्धिले होते की संस्थानिकांचा दत्तक घेण्याचा पूर्वापार अधिकार सन्मानिला जाअील. त्यानी घेतलेल्या दत्तकांना वंशपरंपरेप्रमाणे राज्यविषयक जे अधिकार मिळत होते ते मिळत राहतील.
या सर्व प्रकरणी या घोषणापत्राने क्रांतिकारकांचा हा भयंकर अुठाव होण्यास जी जी कारणे निमित्तभूत झाली होती असे ब्रिटिशांना वाटले ती ती ब्रिटिशांनी निस्तरली होती. तरीही, त्या घोषणापत्रातील सर्वात महत्त्वाचे आणि ब्रिटिशांच्या मते जे सर्व हिंदी लोकांचे पूर्ण समाधान करील असे वाटले ते अभिवचन असे होते की सम्राज्ञी व्हिक्टोरिया हिच्या सर्व हिदी प्रजाजनांना ब्रिटिश प्रजाजनांच्या सारखंच, अगदी समानतेने वागविले जाअील. त्यांना सम्राज्ञीच्या साम्राज्यातील सारे अधिकार जाति-धर्म-रंग निर्विशेषेण वैध रीतीने अुपभोगिता येतील!!

## पण या घोषणापत्रकांचा क्रांतिकारकांवर काही अेक परिणाम झाला नाही !

अितकेच नव्हे, तर ब्रिटिश राणीच्या ह्या घोषणापत्रकाला क्रांतिकारकांच्या वतीने अेक खरमरीत प्रत्युत्तर म्हणून प्रतिघोषणापत्रही प्रसिद्धिले गेले होते. ते किती मार्मिक होते ते आमच्या सत्तावनच्या क्रांतियुद्धाच्या अितिहासात आम्ही चर्चिलेच आहे. त्यातले सूत्रवाक्यच मुळी असे होते की, ''आम्ही हे जे क्रांतियुद्ध लढत आहो ते काही केवळ ब्रिटिश अिंडिया कंपनीची हिंदुस्थानवरील अधिसत्ता जाअून ब्रिटिश राणीची साम्राज्यसत्ता आमच्यावर यावी म्हणून काही नव्हते! तर आम्हांला कोणचीही परसत्ता ब्रिटिशांचे राज्यच नको असून सर्व राजकीय दास्यातून निर्मुक्त झालेले स्वतंत्र असे स्वराज्य हवे आहे. म्हणून आम्ही ह्या राज्यक्रांतीच्या रणांगणात लढत आलो आहोत.'' यद्यपि हे राणीचे घोषणापत्रक साऱ्या हिंदुस्थानभर भिंतीभिंतीवर चिकटविलेले होते तथापि, त्याचा लाभ न घेता सहस्रावधी क्रांतिकारक आणि सेनापती तात्या टोपे, श्रीमंत नानासाहेब, बाळासाहेब, रामभाअू, अमरसिंह, फेरोझशाह अित्यादी क्रांतीचे धुरंधर

सेनानी पुढे महिनोगणती लढतच राहिलेले होते! त्या बहुतेकांचा लढत लढत त्या क्रांतीच्या अग्निज्वालात प्रत्येकी बळी पडल्यानंतर काय ते ते यज्ञकुंड हळूहळू विझत गेले!

तथापि सहस्रावधि हिंदी लोकांची जी तरूण पिढी अिंग्रजांच्या पुढे लवकरच निघालेल्या शाळाकॉलेजातून शिकत गेली तिच्यावर आणि अिंग्रजी सराकारच्या पगारावर पोसली जाणारी सहस्रावधि हिंदी अधिकाऱ्यांची नि सेवकांची जी पिढी तिच्यावर मात्र या हिंदुस्थानच्या सम्राज्ञीच्या घोषणापत्रातील या शेवटच्या दोन - तीन अभिवचनांचा ब्रिटिशांना अनुकूल असा परिणाम झाल्यावाचून राहिला नाही. विशेषतः कलकत्ता, मुंबअी, मद्रास, अशा ज्या मुख्य नगरांत ब्रिटिश सुधारणांचे मायावी जाळे १८५७ च्या बऱ्याच आधीपासून पसरले होते तेथेतर ह्या व्हिक्टोरिया राणीच्या जाहीरनाम्यात ''ती राणी आपल्या हिंदी नि ब्रिटीश प्रजाजनांना राज्यातील सर्व अधिकार समानतेने अुपभोगू देणार आहे'' ह्या अभिवचनाने त्या वेळचे हिंदी पुढारी अितके हुरळून गेले की, आता ब्रिटिश साम्राज्य हे जितके ब्रिटिशांचे तितकेच आमचेही साम्राज्य झालेले आहे, असे अुद्‌गार त्यांनी 'बंडाचा' बीमोड झाल्याच्या आनंदाप्रीत्यर्थ भरविलेल्या प्रकट सभांमधून काढले. हे घोषणापत्रक खरे पाहता, केवळ क्रांतिकारकांचा बीमोड करण्यासाठी जसा ब्रिटिशांनी 'दंडाचा' भयंकर अुपयोग केलेला होता, तसाच हा अेक 'सामाचाही' अुपयोग करण्यासाठी वस्तुतः काढलेले होते. त्याचप्रमाणे भविष्यात ब्रिटिश राजनीति चालवावी असा लवलेशही हेतु ब्रिटिशांच्या मनात नव्हता! हे माझ्या ह्यापुढील काळच्या अितिहासावर लिहिलेल्या पुस्तकांतून मी ब्रिटिशांच्याच अुद्‌गारांवरून सिद्ध केलेले आहे. पण ह्या वर अुल्लेखिलेल्या त्या काळच्या अिंग्रजी शिक्षित नि आंग्लसेवारित हिंदी लोकांचा जो वर्ग होता त्याच्या भाबड्या नि बाटग्या ध्यानांत ब्रिटिशांचा हा कूटहेतू मुळीच आलेला नव्हता. अितकेच नव्हे तर त्या हिंदुस्थानचे सम्राज्ञीपदावर स्वतःच विजयोन्मत्त आरोहण करणाऱ्या व्हिक्टोरियाच्या घोषणापत्रकामुळे त्या भुरळलेल्या हिंदी पुढाऱ्यांनी त्या घोषणापत्रकाला, 'हा पहा आमचा मॅग्नाचार्टा' म्हणून त्यांच्या सभांतून आणि वृत्तपत्रांतून गौरविण्याचा धूमधडाका चालविला! कुठे तो अिंग्लिश लोकांनी त्यांच्या स्वतःच्याच राजाशी लढून त्याच्याकडून स्वतःचे लोकसत्ताक अधिकार मान्य करून घेणारा अिंग्लंडच्या अितिहासातील खरा 'मॅग्नाचार्टा' आणि कुठे आपल्या देशाच्या पारतंत्र्याच्या शृंखला आपल्या स्वदेशाच्या पायातं लोखंडी खिळ्यांनी पूर्वीहून अधिक बळकटपणे जखडून टाकून त्यावर केवळ सोनेरी पाणी चढविणारे आणि त्यांना अलंकार म्हणून अुल्लेखिणारे ते राणीचे छद्मी घोषणापत्रक!

परंतु, सन १८५७ च्या क्रांतिचा तात्कालिक अुपशम झाल्यानंतर आणि ब्रिटिश साम्राज्यसत्ता हिंदुस्थानभर निर्वेधपणे अधिष्ठित झाल्यानंतर हिंदुस्थानच्या राजकीय अितिहासाचे समीक्षण हिंदुदृष्टीकोनातून आम्ही लिहिलेल्या आमच्या आत्मवृत्ताची 'पूर्वपीठिका' ह्या पुस्तकात अवश्य तितक्या समग्रपणे केलेलेच आहे. ह्यास्तव तेही येथे देण्याचे प्रयोजन नाही.

## ह्या कालखंडाचे वैशिष्ट्य :
## ब्रिटिशनिष्ठ राजकारण

१८५७ च्या क्रांतियुद्धाच्या अुपशम जेव्हा १८६० पर्यंत झाला तेव्हापासून तो साधारणतः सन १९०० पर्यंतच्या कालखंडाचे हिंदुस्थानातील राजकीय अितिहासाचे वैशिष्ट्य मुख्यतः ब्रिटिश साम्राज्यात राहूनच आपला भाग्योदय पुन्हा होअील आणि तसा तो आपण करून घेतला पाहिजे अशा मताच्या राजकीय पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखाली चाललेल्या देशव्यापी चळवळीचे प्रस्थ हे होय. या कालखंडाला साधारणतः ब्रिटिशनिष्ठ राजकारणाचा काळ असे नाव देता येअील. अर्थात् ह्या कालखंडातही जी ब्रिटिशांच्या परदास्यातून मुक्त होण्यासाठी सशस्त्र क्रांती केलीच पाहिजे अशा वीरवृत्तीची परंपरा तीही काही अगदीच अस्तंगत झालेली नव्हती. गुप्तपणे वा केव्हा केव्हा धाडसी अुठावातून ती पेट घेत होतीच. अितकेच नव्हे, तर तिचे असे तात्कालिक स्फोट सुद्धा हिंदुस्थानातील राजसत्तेला हादरा दिल्यावाचून आणि भारतीय जनतेत तेवढ्यापुरता तरी क्षोभ नि स्फूर्ती निर्मिल्यावाचून राहिले नाहीत. अशा सशस्त्र क्रांतिच्या अुठावाच्या वानगीसाठी दोन अुदाहरणांचा अुल्लेख केला तरी पुरे आहे. रामसिंग कुका याचे नेतृत्वाखाली

पंजाबात सन १८७० ते ७४ मध्ये ब्रिटिशांविरूद्ध आणि मुसलमानांविरूद्ध स्वराज्यासाठी नि स्वधर्म रक्षणासाठी झालेली हिंदूत्वनिष्ठ अुठावणी हे अेक प्रमुख अुदाहरण होय; आणि दुसरे म्हणजे त्याहूनही अधिक व्यापक प्रमाणावर आणि अधिक परिणामकारक असे महाराष्ट्रातील वासुदेव बळवंत फडके यांचे नेतृत्वाखाली ब्रिटिशांविरूद्ध हिंदुस्थानच्या संपूर्ण स्वातंत्र्यासाठी झालेला धुमधडाक्याचा सशस्त्र अुठाव हे होय!! ह्या घटनांचेही समीक्षण आमच्या वर अुल्लेखिलेल्या 'आत्मचरित्राच्या पूर्वपीठिकेत' केलेले आहे.

ह्यापुढेच टिळकपर्वाचा अुदय झाला आणि क्रांतिवीर चाफेकर बंधु यांचे अिंग्रजी अधिकाऱ्यांवर झालेले सशस्त्र आक्रमण आणि स्वराज्यासाठी सशस्त्र क्रांतीच्या गुप्त संघटनांचे पर्व सुरू झाले.

## सन १९०० नंतरचे हिंदुस्थानातील राजकारण

वर अुल्लेखिलेल्या सन १९०० च्या अंताचे आसपास ब्रिटिश राजनिष्ठ राजकारणाचा काळ संपला आणि ज्याला जहालांचे राजकारण असे त्यावेळी संबोधीत असत, त्या टिळकांच्या प्रत्यक्ष क्रांतिमय नसले तरी क्रांतिप्रवण राजकारणाचा आणि पूर्ण स्वातंत्र्यसंपादनार्थ सशस्त्र क्रांतिकारक संघटनांचा आणि सशस्त्र क्रांतिकृत्यांचा काळ चालू झाला. ह्याच काळाशी हुतात्मा चाफेकरांच्या अुठावापासून माझ्या बालपणीच माझ्या जीवनाचे धागेदोरे गुंफले गेले आणि पुढे तर माझे सारे जीवन त्याच क्रांतिकार्याला अर्पिले गेले. त्यायोगे माझे चरित्र म्हणजेच ह्या अिंग्रजांविरूद्धच्या स्वातंत्र्यायुद्धाचे अेक महत्त्वाचे प्रदीर्घ पर्वच झाले! अर्थात् ह्या कालखंडातील देशव्यापी घटनांचे समीक्षण हिंदुत्वाच्या दृष्टिकोनातून जे काही करणे अवश्य आहे ते ते माझ्या 'आत्मवृत्ता' च्या लिहिलेल्या आणि पुढे शक्य झाल्यास कदाचित् लिहिल्या जाणाऱ्या विस्तृत ग्रंथातून आले आहे आणि येणारच आहे. माझा संबंध या पारतंत्र्य विमोचनांच्या चळवळीत माझ्यापेक्षा ज्येष्ठ असलेल्या बहुतेक नामांकित पुढाऱ्यांशी मी अगदी विशीच्या आत होतो तेव्हापासून येत गेला.

अगदी जुन्यातील जुन्या अशा या 'ब्रिटिशनिष्ठ' राजकारणाच्या आद्य संस्थापकांपैकी, ज्यांना राष्ट्रीय पितामह म्हणून गौरविले गेले, त्या दादाभाअी नौराजी यांच्याशी सुद्धा त्यांच्या वयाच्या अैंशीव्या वर्षी, अिंग्लंडमध्ये मी अगदी तरुणपणी गेलो असताना माझा तेथल्या राकीय चळवळीत संबंध आलेला होता. अितकेच नव्हे तर त्यांच्या तिकडील 'ब्रिटिशनिष्ठ' पक्षाशी माझ्या सशस्त्र क्रांतिनिष्ठ पक्षाचा प्रत्यक्ष संघर्षही अिंग्लंडमधील भारतीय राजकारणाचे धुरीणत्व कुणाकडे असावे याविषयीच्या रस्सीखेचीतच घडलेला होता. या राष्ट्रपितामह दादाभाअींच्या मागोमागच्या पिढीत भारतीय राजकारणी पुढाऱ्यांपैकी बंगालचे माननीय नि धुरंधर नेते श्रीयुत सुरेंद्रनाथ बॅनर्जी, रमेशचंद्र दत्त, अित्यादींशीही अिंग्लंडमध्ये माझा प्रत्यक्ष संबंध आलेला होता. त्याच कालखंडातील पण त्यांच्यापेक्षा वयाने लहान असलेल्या आणि ब्रिटिशनिष्ठ राजकारणाविरूद्ध झुंजणाऱ्या 'जहाल' किंवा राष्ट्रीय पक्षाच्या पुढाऱ्यांपैकी तर बहुतेकांशी माझा वैयक्तिक नि वैचारिक संबंध आलेला होताच होता. पंडित श्यामजी कृष्ण वर्मा, लाला लजपतराय, बिपिनचंद्र पाल, नामदार गोखले अशा अखिल भारतीय पुढाऱ्यांपासून तो शतावधि अितर प्रांतोप्रांतीच्या पुढाऱ्यांपर्यंत माझा व्यक्तिशः संबंध आणि राजकीयदृष्ट्या अनेक प्रकरणी संघर्षही घडत गेला. लोकमान्य टिळक, शिवरामपंत परांजपे, श्रीमंत दादाराव खापर्डे, डॉ. मुंजे आणि महाराष्ट्रातील प्रभावळीतले अनेक नेते हे तर मला वैयक्तिक रीत्याही अितके परिचयाचे झालेले होते की, त्यांच्यापैकी काहींचे आणि परप्रांतीय 'जहाल' पुढाऱ्यांचेही मजवर व्यक्तिशः पितृतुल्य प्रेम असे. अुदाहरणार्थ बिपिनचंद्र पाल अिंग्लडमध्ये असताना त्यांच्या घरीच त्यांचे चिरंजीव निरंजन पाल यांच्यासह मी काही काल राहात होतो. बिपिनबाबूंनी स्वतः आपल्या हातांनी बंगाली पद्धतीप्रमाणे मांसाची नि माशांची पक्वान्ने करून मला आग्रहाने वाढलेली आहेत आणि माझ्यासारख्या अेका महाराष्ट्रीय शाकाहारी ब्राह्मणाला बाटविण्याचे पुण्य जोडलेले आहे! अहिंसात्मक सत्याग्रहाच्या नि असहकाराच्या चळवळीचे धुरंधर आचार्य म्हणून पुढे विख्यात झालेले 'महात्माजी' हे जेव्हा अिंग्लंडमध्ये केवळ 'बॅरिस्टर गांधी' या साध्या नावानेच लोकांना माहीत होते तेव्हा ते अिंग्लंडमध्ये आलेले असता त्यांच्याशीही माझा वैयक्तिक नि स्नेहशील परिचय तिकडेच झालेला होता आणि पुढे हिंदुस्थानमध्ये राजकारणाच्या

आखाड्यात त्यांच्याशी त्यांच्या जन्मभर माझा संबंध आणि संघर्ष घडत राहिलेला होता! सशस्त्र राज्यक्रांतिकारक पक्षाविषयी तर बोलावयासच नको, हिंदुस्थानातील हुतात्मा नि वीरात्मा चाफेकरांनंतर सशस्त्र राज्यक्रांतीचे भारतीय धुरंधरत्व करण्याचे महत्कार्य प्रथम महाराष्ट्रात नि नंतर अिंग्लडमध्ये असताना आरंभी आरंभी योगायोगाने माझ्याकडेच आल्यामुळे त्या पक्षातील सहस्त्रावधि हुतात्मे, वीरात्मे, आणि क्रांतिकार्यरत तरूण यांच्याशी माझा दाट परिचय झाला हे सांगणे नकोच. शामजी कृष्णवर्मा, मॅडम कामा, बॅ. राणा ह्या सारख्या माझ्याहून वडिलधाऱ्या असणाऱ्या परंतु ज्यांनी सशस्त्र क्रांतिकार्याची दीक्षा माझ्या प्रेरणेने आणि प्रचाराने माझ्या हातूनच घेतली होती अशा अुभ्या भारतातील अनेक महनीय व्यक्तींशी माझा नुसता परिचय नव्हे तर वैयक्तिक लोभही जडलेला होता. माझ्या ‘अभिनव भारत’ संस्थेतल्या अगदी भगूर नाशिकपासूनच्या तो पुढे पुढे अनेक परकीय देशांतूनही पसरलेल्या शाखांतल्या लहानमोठ्या सहस्रावधि सभासदांना तर मी बहुधा व्यक्तिशःच क्रांतिदीक्षेची शपथ दिलेली होती. हुतात्मा मदनलाल धिंग्रा, लाला हरदयाळ, चट्टोपाध्याय, सेनापति बापट, अितिहासकार डॉ. जयस्वाल, भाअी परमानंदजी, त्रिमलाचार्य, ‘ऋषि’ अय्यर, – अशी नावे कुठवर सांगावीत! पुढे आम्हास अदंमानात जन्मठेपेवर जावे लागले तेव्हा तर बंगालमधील अनुशीलन समितिचे प्रमुख पुलिन बिहारीदास, युगांतर समितीचे विरेंद्र घोष, अुपेंद्रनाथ बॅनर्जी, आशुतोष लाहिरी, हेमचंद्रदास, अित्यादी अनेकानेक बंगाली क्रांतिकारक; पंजाबातील अुणेपुरे शंभरअेक गदरपक्षातील आणि अितर पक्षांतील ज्या क्रांतिकारकांना प्रथम फाशीच्या शिक्षा होअून नंतर त्या जन्मठेपेच्या करण्यात आल्या ते शीख नि शीखेतर हेही अंदमानातील बंदिवासात माझ्यासमवेत देशाच्या स्वातंत्र्यासाठी अतोनात कष्ट भोगीत वर्षानुवर्षे अेकत्रच राहिलेले होते. त्यानंतर अंदमानातून परतल्यावर त्या ब्रिटिशविरोधी सशस्त्र क्रांतिकारक कार्यासहच त्याचाच अेक अपरिहार्य परिणाम आणि भाग असलेल्या अिस्लामविरोधीअशा अखिल भारतीय हिंदुसंघटनांच्या प्रचंड आंदोलनातही अुभ्या भारतातील लक्षावधि हिंदुत्वनिष्ठांशी माझा दृढ संबंध आला. अिथे केवळ स्थलाभावामुळे त्यांची त्यांची नावे दिग्दर्शनापुरती सुद्धा अुल्लेखिणे अशक्य होय! तरीही अितके आवर्जून सांगावेसे वाटते की, ज्यांची नावे गाळावी लागताहेत त्यांची त्यांची कार्ये, ज्यांची नावे अुच्चारिली आहेत त्यांच्याअितकी महत्त्वाची नव्हती म्हणूनच काय ती गाळली गेली असे कोणीही समजू नये!

अठराशे सत्तावनच्या क्रांतिसमरातील पराजयानंतरच्या हिंदुस्थानी राजकारणाचे जे तीनचार महत्त्वाचे टप्पे वर अुल्लेखिलेले आहेत त्यांत ब्रिटिशनिष्ठ (नेमस्त), निःशस्त्र राष्ट्रनिष्ठ (जहाल), सशस्त्र क्रांतिनिष्ठ आणि हिंदुत्वनिष्ठ, अशा सर्व पक्षांशी मी साधारणतः वयाच्या सोळाव्या वर्षी सक्रिय राजकारणात भाग घेअू लागल्यापासून माझा वर सांगितल्याप्रमाणे अगदी व्यक्तिशः निकट संबंध आणि काहीसा केव्हा - केव्हा कडाक्याचा संघर्षही घडलेला असल्यामुळे हिंदुस्थानच्या ह्या कालखंडातील साऱ्या अितिहासाचे समीक्षण मी गेल्या पन्नास-साठ वर्षे तरी क्षणाक्षणाला जे माझ्या लेखांमध्ये वा भाषणांमध्ये माझ्या हिंदुत्वनिष्ठ दृष्टिकोनातून करीत आलो त्या मी लिहिलेल्या साहित्यात परिपूर्णरीतीने अंकित झालेलेच आहे. त्यापैकी माझी शतावधि भाषणे, संभाषणे वा लेख सोडून दिले तरी, विस्मृतीत गेलेले लिखाणही सोडून दिले तरी, आज माझ्या त्या साहित्याची न्यूनतः जी सात आठ-सहस्त्र पृष्ठे अुपलब्ध आहेत किंवा ग्रंथरूपाने प्रचलित आहेत त्यापेक्षा अधिक अेक अक्षरही या विषयावर लिहिण्याची मला आवश्यकता वाटत नाही - आणि आता या माझ्या अैंशीव्या वर्षी नि क्षीणतेने रूग्णशय्येस खिळलेल्या अवस्थेत त्याची पुनरुक्ती करीत बसण्याची मला शारीरिक शक्तीही अुरली नाही!

## समारोप

ब्रिटिश साम्राज्यसत्तेच्या पूर्ण ग्रासांतून सुटून स्वतंत्र होण्यासाठी हिंदुस्थानने विशेषतः १८५७ सनाच्या पहिल्या प्रचंड क्रांतियुद्धांपासून तो दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या सन १९४६ मध्ये झालेल्या अंतापर्यंत निःशस्त्र आणि सशस्त्र मार्गांनी ब्रिटिशांशी जो हा निकराचा लढा शंभर अेक वर्षे सारखा दिला त्यात शेवटी आमच्या हिंदुराष्ट्राला आपले राजकीय नि राष्ट्रीय स्वातंत्र्य संपादिण्यात महान विजय मिळण्याची सुवर्णसंधी त्या दुसऱ्या जागतिक महायुद्धाचे रणशिंग फुंकले जाताच अेकदाची आली!!

ह्या संग्रामात आम्हाला जर कोणा परराष्ट्राचे अत्यंत परिणामकारक सहाय्य मिळाले असेल तर ते जर्मनीचा सर्वेसर्वा जो हिटलर आणि जपानचा रणधुरंधर प्रमुख नेता जो टोजो त्यांचेच होय! ब्रिटिशांशी लढत राहिलेल्या हिंदुस्थानच्या सशस्त्र क्रांतिकारक पक्षाला अगदी प्रथमपासून म्हणजे अभिनव भारताच्या युरोपातील सशस्त्र आंदोलनापासून तो दुसऱ्या जागतिक महायुद्धातील हिंदी सेनापती सुभाषचंद्र बोसांनी ब्रिटिशांविरुद्ध घोषित केलेल्या महायुद्धापर्यंत, भूदल, नौदल, वायुदलापर्यंतच्या सर्व अद्ययावत् शस्त्रास्त्रांचे सहाय्य ह्या जर्मनीने आणि जपानने दिले! म्हणून तर ब्रिटिशांच्या विरुद्ध सिंगापूर, मलायाकडील अुणेपुरे-चाळीस-पन्नास सहस्त्र हिंदी सैन्य बंड करुन अुठू शकले आणि सेनापती सुभाषबाबूंच्या नेतृत्वाखाली हिंदुस्थानला स्वतंत्र करण्यासाठी 'चलो दिल्ली' अशी रणगर्जना करीत हिंदुस्थानवर चालून आले! त्याच वेळी हिंदुस्थानात ब्रिटिशांच्या हाताखाली असलेल्या भूदल, नौदल नि वायुदलातील हिंदीसैन्यानेही स्वातंत्र्यरणात अुडी घेण्याचा कट केलेला आहे हे ब्रिटिशांच्या स्पष्टपणे ध्यानात आले. हिंदुस्थानातील कोट्यवधि नागरिक तर ब्रिटिशांविरुद्ध अुठाव करण्यास आधीपासूनच तरवारलेले होते. कोणी भूमिगत होअून क्रांतिकारक अुठाव करीत होते, तर कोणी ब्रिटिशांच्या शस्त्रागारावर अकस्मात अुघड-अुघड चढाया करून ती लुटून नेत होते, तर कुणी लहानलहान प्रतिसरकारेच स्थानीस्थानी स्थापून ब्रिटिश राजवट तेवढ्यापुरती अुखडून देत होते! अशा सर्व बाजूंनी सतावल्या गेलेल्या आणि युरोपातील दोन जागतिक महायुद्धांत लढून लढून शक्तिक्षय झालेल्या, क्षतविक्षत झालेल्या ब्रिटिश साम्राज्यसत्तेची हिंदुस्थानवरील पकड सुटली. त्यांच्या साम्राज्यमदाची धमकच तुटली. अवसान गळून गेले. शेवटी सन १९४७ मध्ये 'हिंदुस्थानचे स्वातंत्र्य आम्ही मान्य करून आमची राजसत्ता सोडून देतो' असे बोलणे ब्रिटिश व्हॉइसरॉयने हिंदुस्थानातील पुढाऱ्यांशी चालू केले!

अर्थात अिंग्रजांना त्यांतल्या त्यात ज्या ज्या हिंदी पक्षांचे राजकीय धोरण प्रथमपासूनच तत्त्वतः भ्रांत, स्वभावतः भेकड, साधारणतः ब्रिटिशधार्जिणे, मुसलमानांपुढे चळचळ कापणारे आणि कशीतरी नि हाती येअील तितकीच राजसत्ता का होअीना, पण आपल्या पक्षाच्या पदरात पाडून घेण्यास आतुर झालेले आढळले, त्या पक्षांनाच हिंदुस्थानचे पुढारी म्हणून ब्रिटिशांनी मान्यता दिली आणि सारी राजकीय सत्तांतराविषयीची बोलणी त्यांच्याशीच काय ती केली! अर्थात हे पक्षही देशभक्तच होते. वैध नि निःशस्त्र मार्गांनी का होअीना, पण त्यांनीही कष्ट केले होते.

परंतु अिंग्रजांनी अुपक्रमिलेल्या ह्या सत्तांतराच्या वाटाघाटीत अेक कपटी नि भयावह अट मात्र घालून ठेवलेली होती. ती अशीः 'ब्रिटिशांना हिंदुंविरुद्ध ब्रिटिश अशा ह्या स्वातंत्र्यसंग्रामात, सन १८५७ नंतर ज्या मुसलमानांनी देशद्रोही साहाय्य केलेले होते आणि त्याचे पारितोषिक म्हणून जे मुसलमान हिंदुस्थानचे दोन तुकडे करून मुस्लिम बहुसंख्य असलेल्या भागाचे राज्य आम्हांस स्वतंत्रपणे तोडून द्यावे म्हणून हट्ट धरून बसलेले होते, त्या मुसलमानांना त्यांच्या त्या हिंदुद्रोही नि देशद्रोही मागणीला पाठिंबा देअून त्यांनी दिलेल्या सहाय्याचे अुतराई व्हावे यासाठी आणि भावी स्वतंत्र हिंदुराष्ट्राला अेक नित्याचा शत्रू अुत्पन्न करून ठेवावा या दुष्ट नि कूटबुद्धीने हिंदुस्थानची विभागणी केली पाहिजे' असा ब्रिटिशांनी आग्रह धरला.

हा ब्रिटिशांचा आग्रह म्हणजे मूलतः मुसलमानांचीच मागणी होती की, हिंदुस्थानचे दोन तुकडे पाडून आमचा मुस्लिम बहुसंख्य प्रदेश आम्हांला आमचे स्वतंत्र राज्य स्थापण्यासाठी मिळाला पाहिजे. मुसलमानांच्या ह्या हट्टाला भारतातील यच्चयावत् मुसलमानांनी कट्टरपणे अुचलून धरले. परंतु हिंदुस्थानातील सर्व हिंदूंचा मात्र या मुसलमानांच्या पाकिस्तानच्या मागणीला कट्टर विरोध नव्हता!! अेक अपवाद वगळला तर हिंदुस्थानातील सर्व पक्षांच्या मते मुसलमानांना पाकिस्तान तोडून द्यावे आणि कटकट मिटवावी असेच होते! म्हणजे सर्व पंजाब नि बंगाल पाकिस्तानात द्यावा. ह्यावरही, मुसलमानांची तिसरी निकराची मागणी होतीच की, पंजाब नि बंगालमधील त्यांची ही दोन मुस्लिम राज्ये जोडण्यासाठी अेक 'कॉरिडॉर' थेट पंजाबपासून तो बंगालपर्यंत जाणारा अुत्तर हिंदुस्थानामध्यल्या प्रदेशाचा अेक पट्टाचा पट्टाही मुस्लिमांना देण्यात यावा!

**ह्या मुस्लिमांच्या मागण्यांना कट्टर विरोध साऱ्या हिंदुस्थानात ज्या अपवादात्मक अशा अेक पक्षाने काय तो शेवटपर्यंत केला; तो पक्ष म्हणजे हिंदुत्वनिष्ठ पक्ष होय! हिंदुस्थानच्या विभागणीविरुद्ध त्यांनी हिंदुमहासभेच्या नेतृत्वाखाली अखंड भारताचे**

**निकराचे आंदोलन अुभारले. करवेल तितका तीव्र प्रतिकार केला. हिंदुद्रोह्यांनी, मुस्लिमांनी, ब्रिटिश सरकारने त्या हिंदुत्वनिष्ठांच्या प्रबल आंदोलनास हाणून पाडण्यासाठी त्यांचा छळ केला, त्यांना बंदिवासात कोंडले, स्थानी स्थानी रक्तपात झाले. पण साऱ्या देशभर त्या हिंदुत्वनिष्ठांनी, अल्पसंख्य असताही, त्या शत्रूंच्या अत्याचारांना प्राणपणाने तोंड दिले. शक्य तेथे हिंदुंच्या रक्तपाताचा सूड हिंदूंच्या शत्रूंचाही रक्तपात करून घेण्यास आणि प्रसंगी हिंदुद्रोह्यांचे शिरच्छेद करण्यासही सोडले नाही!**

सुदैवाने हिंदुत्वनिष्ठांचा हा प्राणपणाने केलेला प्रतिकार अगदी विफलही झाला नाही. कारण हिंदुस्थानची विभागणी करण्याचे आमच्या मताविरूद्ध ब्रिटिश सरकारने ठरविले तरी निदान मुसलमानांनी मागितल्याप्रमाणे सबंध पंजाब आणि सबंध बंगाल त्यांना ने देता त्यांतला मुस्लिम बहुसंख्य भाग तेवढाच काय तो यांच्या भावी पाकीस्तानात समावेशिला जावा आणि हिंदुबहुसंख्य असा पूर्व पंजाब आणि पश्चिम बंगाल हे हिंदूंचे भाग भारतात समाविष्ट व्हावे, ही हिंदुत्वनिष्ठांची न्यूनतम मागणी सरकारला मान्य करावी लागली. 'Let us vivisect their proposed Pakistan before they vivisect our Hindusthan'. ही हिंदुत्वनिष्ठांची मागणी यशस्वी झाली. त्याच्याही पुढे जाअून मुसलमान जी अधिक भयंकर मागणी करीत होते की पंजाबपासून तो बंगालपर्यंतच्या सलग मार्गासाठी अुत्तर प्रदेशाचा अेक पट्टाचा पट्टा मुस्लिमांच्या पाकिस्तानास देण्यास यावा, ती त्यांची अघोरी मागणी तर सत्तांतराच्या चर्चेत हिंदुत्वनिष्ठांच्या विरोधामुळे विचारास सुद्धा घेण्यात आली नाही!

त्यांतही हिंदुस्थानच्या विधिमंडळाच्या प्रांतीय आणि केंद्रीय अशा दोन्ही प्रातिनिधिक सभांसाठी म्हणून, ज्या सार्वजनिक निवडणुकी झाल्या त्यांत पाकिस्तान देण्यास अनुकूल असणाऱ्यांसच बहुसंख्य मतदारांनी निवडून दिले तेव्हा अखंड भारताचा घात करण्याच्या घोर राष्ट्रीय महापातकाचे हेच बहुसंख्य मतदार खरे अपराधी ठरले!

त्यांतही स्वतः हिंदूत्वनिष्ठ पक्षही मनोमन हे जाणून होते की, हे पाकिस्तान म्हणजे हिंदूंनी, पूर्वजन्मी केलेल्या सद्गुणविकृती, शुद्धिबंदी अित्यादि सामाजिक नि धार्मिक महापापांचा अवश्यंभावी परिपाकच होता. ह्या रूढीपायीच हिंदूंनी नगरोनगरी आधीच आपल्या हाताने जी छोटी-मोठी पाकिस्थानने निर्मून ठेवली होती त्या सामाजिक पापांचा हा परिपाक केव्हातरी भोगणे प्राप्त होते. ह्याचा सविस्तर अुलगडा पूर्वार्धात केलेलाच आहे.

ह्या सर्व अुलाढाली हिंदुस्थानात चालल्या असताना त्यांचा मथितार्थ विचारात घेअून ब्रिटिश पार्लमेंटमध्ये Independence of India चे विधेयक स्वतः ब्रिटिश मंत्रिमंडळाने मांडले आणि ते अेकमताने पार्लमेंटने संमत केले. त्या प्रमाणे शेवटी १५ ऑगस्ट सन १९४७ ला दिल्ली येथे ब्रिटिश गव्हर्नर जनरलने वरील सार्वजनिक निवडणुकीत निवडून आलेल्या हिंदुस्थानच्या प्रतिनिधींच्या संमतीने घोषणा केली, ''ब्रिटिश राष्ट्र हिंदुस्थानवरील त्यांची साम्राज्यसत्ता सोडून देअून साऱ्या हिंदुस्थानास राजकीय स्वातंत्र्य देत आहे. हिंदुस्थानात मुस्लिम बहुसंख्य असे जे पश्चिम पंजाब नि पूर्व बंगालचे भाग आहेत त्यांचे 'पाकिस्तान' नावांचे अेक मुस्लिम स्वतंत्र राज्य स्थापले जाअील आणि अुरलेल्या साऱ्या हिंदुस्थानचे स्वतंत्र 'भारतीय राज्य' स्थापले जाअील!!''

अशा प्रकारे, शेवटी ब्रिटिश साम्राज्याच्या दास्यातून भारताची मुक्तता होअून हे भारतीय महाराज्य स्थापन झाले! तेव्हा राजनीतिपटू हिंदूत्वनिष्ठांनीही विचार केला की, सद्यःस्थितीत अितके जे साधले हेही काही थोडके नाही. अगदी अखंड भारत नाही तरी तीन चतुर्थांश भारत सलगपणे आज स्वतंत्र होत आहे हेही महद्भाग्य होय! अुण्यापुऱ्या अेक सहस्त्र वर्षांनी आमच्या हिंदू अितिहासात हे महान राष्ट्रीय पर्व अुगवले आहे! तरी आता, आज प्रथम हे संपादिलेले भारतीय महाराज्य आत्मसात् करून टाकणे हीच हिंदुत्वहिताच्या आणि हिंदुत्व-गौरवाच्या दृष्टीने खरी राजनीती आहे. मग अुरलेल्या अेक - दोन तुकड्याताकड्यांच्या प्रश्नासही अुद्या बघून घेता येअील!

लगोलग दिल्लीच्या लालकिल्यावर शंभर-दीडशे वर्षे साम्राज्यमदाने धुंद झालेला जो ब्रिटिश युनियन जॅक ध्वज भारताच्या छातीवर फडकत होता तो परकीय ध्वज अुखडून टाकला गेला आणि तेथे भारतीय स्वातंत्र्याच्या तुमुल जयजयकारात या भारतीय सर्वतंत्र स्वतंत्र महाराज्याचा सुदर्शनचक्रांकित ध्वज फडकविण्यात आला!

ज्या आमच्या पश्चिम समुद्रातून 'आम्ही खड्गानेच साम्राज्य जिंकू आणि खड्गानेच चालवू' अशा मदोन्मत गर्जना करीत ब्रिटिश साम्राज्य सत्ता आमच्या हिंदुस्थान देशावर चढून आली आणि थेट दिल्लीच्या सिंहासनावर आरुढ झाली, त्याच दिल्लीच्या सिंहासनावरून तिला पुन्हा खाली ओढून आणि तिच्या त्या गर्विष्ठ खड्गाचे तुकडे अुडवून त्याच आमच्या पश्चिम समुद्राच्या तटापर्यंत आम्ही परत पिटाळीत नेली आणि त्याच पश्चिम समुद्रात बुडविली! पराभूत ब्रिटनचा शेवटचा सोजिर आम्हांला पाठ दाखवित आणि मान खाली घालीत त्या पश्चिम समुद्रात परत जाताना आम्ही आपल्या डोळ्यांनी पाहिला!

ह्याप्रमाणे हिंदुस्थानावर अैतिहासिक काळाच्या दोन सहस्त्र वर्षांमध्ये जी परचक्रे चालून आली त्यांतील ह्या सर्वात महाबलाढ्य अशा ब्रिटिशांच्या सहाव्या परचक्राचीही हिंदुस्थानने दाणादाण अुडविली. त्यांच्या राजकीय दास्याचे तुकडे तुकडे केले!

असे अिंग्लिशांचे महाबलाढ्य राज्य गेले आणि गेले तेव्हा अितक्या त्वरेने नि संपूर्णपणे गेले की, अेका प्रचंड साम्राज्याचे सत्तांतर हे सत्तांतर न वाटता अेखादे केवळ स्वप्नांतर वाटावे! अगदी परवा परवापर्यंत अिंग्रजांच्या आज्ञेवाचून या हिंदुस्थानात अेक पानही हालत नव्हते..... आज अिंग्रज अधिकारी असा.... अिंग्रज असा औषधालाही ह्या हिंदुस्थानात अुरला नाही!

अिंग्लिशांवर मिळविलेला हा अश्वमेधीय विजय ज्या ह्या पानावर आम्ही आता अंकीत आहोत हे पान होय....

**हिंदुराष्ट्राच्या अितिहासातील**
**सहावे सोनेरी पान !!**